# ॥ श्रीरामचरितमानस ॥

( मराठी )

अनुवादक

श्री. प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज



रामेति रामभद्रेति रामचंद्रेति वा स्मरन् ।
नरो न लिप्यते पापैः भुक्ति मुक्ति च विन्दति ॥

# ।। श्रीरामचरितमानस ।।

( मराठी )



अनुवादक

श्री. प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज

मुद्रक :

स्वस्तिक प्रिंटिंग प्रेस,

हंस टॉकीज रोड,

बेळगांव–२.

❋

तृतीय आवृत्ति १९८७

मि. चैत्र शु. १ शके १९०९

**मुल्य ४० रुपये** – 80/-

❋

प्रकाशक

**गुरुदेव रानडे मंदिर**

हिंदवाडी : बेळगांव–५९०११.

## ध्यान

रक्तांभोजदलाभिरामनयनं पीताम्बरालङ्कृतं ।
श्यामाङ्गं द्विभुजं प्रसन्नवदनं श्रीसीतया शोभितम् ॥
कारुण्यामृतसागरं प्रियगणैर्भात्रादिभिर्भावितम् ।
वन्दे विष्णुशिवादिसेव्यमनिशं भक्तेष्ट सिद्धिप्रदम् ॥

❖ ❖ ❖

## अर्थ

" भक्ताची अभिलाषा पूर्ण करणारा, ब्रह्मा, विष्णु, शिवादि देवांकडून ज्याची निरन्तर उपासना केली जाते, हनुमान् सुग्रीवादि तसेच भरतादि बंधु ज्याच्या आराधनांत रंगून जातात, जो हेतुरहित करुणारूपी अमृताचा अनन्त सागर आहे, ज्याच्या वामांगीं श्रीसीता शोभायमान झाली आहे, जो श्यामसुन्दर, द्विभुज, पीताम्बरधारी, प्रसन्नमुख असून लाल कमलाच्या दलाप्रमाणें ज्याचे मनोहर नयन आहेत, अशा भगवान् श्रीरामाला मी वन्दन करतों."

# आरती श्रीरामचरित्राची (मराठी)

जय जय जय जय आरति सुखकर रामचरित्रातें ।। सुखकर० ।।
श्रवणें मननें पठणें गानें दे हरि मित्रातें ।। धृ० ।।
शंकर मानसि रचिले पावे हिमगिरि कन्या तें ।। पावे० ।।
काक भुशुंडी याज्ञवल्क्य मुनि लोमश घटजातें ।। १ ।।
नरहरि तुलसीदासापासुनि गंगादासातें ।। पासुनि० ।।
तेणें होउनि कृपाल दिधलें मजला दीनातें ।। २ ।।
भवभयहरणा शांतिवितरणा रघुवर चरणांतें ।। वितरणा० ।।
प्रेमळ पापविनाशन पावन पाववुनी मातें ।। ३ ।।
माते सम मम अहित निवारुनि निजपद दात्यातें ।। निवा० ।।
सच्चित्सुखकर राम कृपाकर भक्तिरसा दातें ।। ४ ।।
जनहितकारक षड्रिपुमारक भवतारक पातें ।। मारक० ।।
नाहीं साधन नीतिसुशिक्षण तुजसम जगतातें ।। ५ ।।
म्हणुनी रामें आज्ञापुनि मज या अनुवादातें ।। रामे० ।।
करवुनि, केलें तीर्ण कांहिसें तव उपकारांतें ।। ६ ।।
परधर्मीहि निधर्मी वानिति बहु महिमा; त्यातें ।। बहु० ।।
वेदशास्त्रवरमंथन–उध्दृत या नवनीतातें ।। ७ ।।
नवनीताचा स्वाद घेउनी नवनीतचि व्हावें ।। नवनीत० ।।
रामचरितवर तुलसीवंदन प्रज्ञा करि भावें ।। ८ ।।

❖ ❖ ❖

श्रीरामसमर्थ

# श्रीरामचरितमानस (मराठी) नित्यपठण पद्धति

प्रारंभी नमनाचे श्लोक म्हणावेत. श्रीहनुमंताचें आसन स्वतंत्र मांडावे व खालील प्रार्थना करावी.

– श्रीहनुमंताचें आवाहन –

रामकथाप्रिय अंजनितनया आतां बहु सत्वर यावें ।
करा अलंकृत आसन शुभ हें दिधलें आम्ही सद्भावें ।। १
' रामचरितवर मानस ' कथितों, सावधान प्रभु ऐकावें ।
रघुवरचरणीं निर्मल भक्ती दान अम्हांला अर्पावें ।। २
सुराः सिद्धाः साधका ये रामायणकथाप्रियाः ।
ते सर्वे श्रोतुमायांतु कथयिष्ये शुभाः कथाः ।। ३

सीतापति रामचंद्र की जय । महारुद्र हनुमान की जय ।

– जय जय रघुवीर समर्थ –

❖ ❖ ❖

## – समाप्ति –

जयति रघुवरो भक्तहितकरो जयति लक्ष्मणो राघवानुजः ।
जयति कपिपतिर्जयति चांगदो रामसेवको मारुतात्मजः॥१॥

दशरथात्मजो जानकीपतिर्लक्ष्मणाग्रजो मङ्गलप्रदः ।
भवतु सर्वदा भक्तवत्सलो भाववल्लभो भक्तिदः प्रभुः ॥ २

दो०–कथा समाप्ती होतसे ऐकावें हनुमान
जाती सदनीं सकल सुर श्रोते करिति प्रयाण ॥ ३ ॥
सांगा अमुचें दंडवता प्रभुला विनवुनि फार ।
मज दासाची रघुवरा द्या स्मृति वारंवार ॥ ४ ॥

सियावर रामचंद्र की जय । पवनसुत हनूमान की जय । उमापति महादेव की जय । रमापति रामचंद्र की जय । बृंदावनकृष्णचंद्रकी जय । भक्तवर तुलसीदास की जय । श्री बाबा गंगादास की जय । सब संतो की जय । आपापने गुरुदेव की जय । बाल गोपाल की जय ।

– जयजय रघुवीर समर्थ ।

❖ ❖ ❖

श्रीराम समर्थ

# पारायण-विधि

श्रीरामचरित मानसाचें विधिपूर्वक पारायण करण्यापूर्वी श्री सत्यनारायणाच्या पूजेप्रमाणें पूर्वतयारी करावी. कलशावर जें ताम्हण ठेवावयाचें त्यांत खालीं आकृति काढून दर्शविल्याप्रमाणें पीठ, देवतांच्या स्थानीं सुपाऱ्या – हळदीकुंकवाचें कमल काढून त्यावर–ठेवाव्यात.

शत्रुघ्न

| | |
|---|---|
| तुळशीदास— | —बाबा गंगादास |
| लक्ष्मण—सीता | राम —भरत |
| गौरीपति— | —वाल्मीकि |

हनुमान

विधिपूर्वक त्यांचें आवाहन व षोडशोपचार पूजन आणि ध्यान करावयाचें. त्यानंतर पठणास आरंभ करावा.

आचमनादि करून पुढील संकल्प सोडावा–अस्य श्रीरामचरित-मानसरामायणस्य नवाह्पारायणांगभूतं श्रीरामचंद्राद्यावाहित—देवतापूजनं करिष्ये। तदंग निर्विघ्नता सिद्ध्यर्थं श्रीमहागणपति पूजनं करिष्ये। आदौ कलशशंखघंटादीन् पूजयेत्। आत्मानंच प्रोक्षेत्।

– अथ आवाहनमन्त्राः –

शं शत्रुघ्ननमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः ।
पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरुष्व मे ॥ १ ॥
– श्री सपत्नीकाय शत्रुघ्नाय नमः –

गं गंगादास नमस्तुभ्यं मानसार्थप्रदायक ।
पीठेऽस्मिन्नुपविश्येदं मम पूजां गृहाण च ॥ २ ॥
– श्री बाबा गंगादासाय नमः । –

भं भरत नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः ।
पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरुष्वमे ॥ ३ ॥
– श्रीसपत्नीकाय भरताय नमः । –

वाँ वाल्मीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुभप्रद ।
पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरुष्वमे ॥ ४ ॥
– श्रीवाल्मीकाय नमः । –

हँ हनुमन्नमस्तुभ्यमिहागच्छ कृपानिधे ।
पीठस्य पश्चिमे भागे तिष्ठ पूजां गृहाण मे ॥ ५ ॥
– श्री हनुमते नमः । –

गौं गौरीपते नमस्तुभ्यमिहागच्छ महेश्वर ।
पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरु प्रभो ॥ ६ ॥
– श्री गौरीपतये नमः ।–

लं लक्ष्मण नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः ।
याम्यभागे समातिष्ठ पूजनं संगृहाण मे ॥ ७ ॥

तुं तुलसीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुचिव्रत ।
पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं प्रतिगृह्यताम् ॥ ८ ॥
अथ प्रधान पूजाच कर्तव्या विधिपूर्वकम ।
पुष्पाञ्जलि गृहीत्वा तु ध्यानं कुर्यात्परस्य च ॥ ९ ॥
रक्ताम्भोजदलाभिरामनयनं पीताम्बरालङ्कृतम् ।
श्यामाङ्गं द्विभुजं प्रसन्नवदनं श्रीसीतयाशोभितम ।
कारुण्यामृतसागरं प्रियगणैर्भ्रात्रादिर्भावितम ।
वन्दे विष्णुशिवादिसेव्यमनिशं भक्तेष्टसिद्धिप्रदम् ॥ १० ॥
आगच्छ जानकीनाथ जानक्यासह राघव ।
गृहाण मम पूजांच वायुपुत्रादिभिर्युतः ॥ ११ ॥
– इत्यावाहनम् –
सुवर्णरचितं राम दिव्यास्तरणशोभितम् ।
आसनं हि मया दत्तं गृहाण मणिचित्रितम्ः ॥ १२ ॥
इति षोडशोपचारैः पूजयेत् ।

अस्य श्रीमन्मानसरामायणश्रीरामचरितस्य श्रीशिवकाकभुशुण्डियाज्ञवल्क्य गोस्वामितुलसीदासा ऋषयः श्रीसीतारामो देवता श्री रामनाम बीजं भवरोगहरी भक्तिः शक्तिः मम नियन्त्रिताशेषविघ्नतया श्रीसीतारामप्रीतिपूर्वकं ( अधर्म विनाशार्थं धर्मविवृद्ध्यर्थंच सामूहिक ) नवाह्पाठं करिष्ये । तदंगन्यासांश्च करिष्ये ।

अथ करन्यासः

जग–मंगल रामाचे गुणगण । दायक मुक्ती धाम धर्म धन ॥
( १-३२-२ )

अङ्गुष्ठाभ्यांनमः

राम वदत जे जांभइ देती । पापपुंज त्यांपुढें न येती ॥ (२-१९४-५)

तर्जनीभ्यां नमः

'राम' सकल नामांहुनि अधिकहि। असो नाथ ! अघखगगण–वधिकहि
( ३-४२-८ )

मध्यमाभ्यां नमः

दारुनारि सम सब जीवांप्रति । उमे ! राम गोस्वामि नाचवति ॥
( ४-११-७ )

अनामिकाभ्यां नमः

सम्मुख होइ जीव मम जेव्हां । जन्मकोटि अघ नासति तेव्हां ॥
( ५-४४-२ )

कनिष्ठकाभ्यां नमः

मामभिरक्षय रघुकुल नायक । धृतवर चाप रुचिर करि सायक ॥
( ६-११५-६ )

करतलकरपृष्ठाभ्यां नमः

इति करन्यासः । एवं हृदयादि न्यासांश्च कुर्यात् । जगमंगल० हृदयायनमः । रामवदत० शिरसे स्वाहा । राम सकल० शिखायै वषट् ।

दारुनारि० कवचाय हुम् । सम्मुख० नेत्राभ्यां वौषट् । मामभिरक्षय० अस्त्राय फट् । इति हृदयादिन्यास: ।।

अथध्यानम्

मामवलोकय पंकज-लोचन । कृपाविलोकनि शोच विमोचन ।।
नील तामरस शाम काम अरि । हृदय कंज मकरंद मधुप हरि ।।
यातुधान-वरूथ-बल-भंजन । मुनि सज्जन रंजन अघ गंजन ।।
विप्रसस्य नववृंद बलाहक । अशरण शरण दीनजन पालक ।।
भुजबल विपुल, भार महि खंडित । खर दूपण विराध वध पंडित ।।
रावणारि सुखरूप भूपवर । जय दशरथ कुल कुमुद सुधाकर ।।
सुयश पुराणि कथित निगमार्गमि । गाती सुरमुनि संत समागमि ।।
कारुणीक मिथ्या-भद खंडन । सकल कुशल कोशल पुर-मंडन ।।
कलिमल मथन नाम ममताहन । तुलसिदास प्रभु पाहि ! प्रणतजन ।।

इतिध्यानम्

❖ ❖ ❖

## नवाह्नपारायण विश्रामस्थान


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| पहिला विश्राम | ७६ | | |
| दुसरा विश्राम | १४१ | सहावा विश्राम | ४१३ |
| तिसरा विश्राम | २०८ | सातवा विश्राम | ४९७ |
| चौथा विश्राम | २७४ | आठवा विश्राम | ५८६ |
| पांचवा विश्राम | ३३७ | नववा विश्राम | ६६९ |

# मासपारायण विश्रामस्थान


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| पहिला विश्राम | २२ | सोळावा विश्राम | २७४ |
| दुसरा विश्राम | ४० | सतरावा विश्राम | २८३ |
| तिसरा विश्राम | ५८ | अठरावा विश्राम | ३०६ |
| चौथा विश्राम | ७६ | एकोणिसावा विश्राम | ३२६ |
| पांचवा विश्राम | ९३ | विसावा विश्राम | ३३७ |
| सहावा विश्राम | ११० | एकविसावा विश्राम | ३८४ |
| सातवा विश्राम | १२६ | बाविसावा विश्राम | ४२५ |
| आठवा विश्राम | १४१ | तेविसावा विश्राम | ४४८ |
| नववा विश्राम | १५७ | चोविसावा विश्राम | ४८७ |
| दहावा विश्राम | १७४ | पंचविसावा विश्राम | ५२० |
| अकरावा विश्राम | १९० | सव्विसावा विश्राम | ५५५ |
| बारावा विश्राम | २१० | सत्ताविसावा विश्राम | ५७५ |
| तेंरावा विश्राम | २२९ | अठ्ठाविसावा विश्राम | ६१७ |
| चौदावा विश्राम | २४५ | एकोणतिसावा विश्राम | ६५४ |
| पंधरावा विश्राम | २६२ | तिसावा विश्राम | ६६९ |

॥ श्रीरामसमर्थ ॥

# द्वितीय अनुवादासाठीं निवेदन

हा अनुवादहि प्रथमानुवादाप्रमाणेंच मुख्यतः गीताप्रेस गोरखपुराच्या श्रीरामचरित्र मानसाधारें केला आहे. मुख्यतः म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, त्या प्रतींतील पाठ जेथें असमाधानकारक वाटले, तेथें कांहीं ठिकाणीं अन्यत्र उपलब्ध पाठ घेतले आहेत. त्याविषयीं अधिक स्पष्ट खुलासा पुढें केला आहे.

मानसपीयूष या बृहद् हिंदी रामचरित मानसावरील टीकेच्या पुनर्मुद्रणकाळीं, संपादकांच्या इच्छेवरून त्या टीकेसाठीं हिंदीत टीका लिहीत असतां असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, मूळ हिंदी रामचरितमानसांतून जे गूढार्थ व भावार्थ सहज निघूं शकतात, ते अनुवादाच्या प्रथमावृत्तींतील शब्दाधारें कांहीं ठिकाणीं निघूं शकत नाहींत.

( क ) प्रथमानुवाद लेखन शके १८६७ मध्यें अवघ्या तीन महिन्यांत कसें व कां झालें इत्यादि विषयीं खुलासा प्रथमावृत्तीच्या निवेदनांत केला आहे. त्या अनुवादांत मुळांतील शब्द शक्य तितके कायम ठेवण्याचा कसून प्रयत्न केला होता परंतु मूळ हिंदी मानसाच्या पारायणादिकांत जे भावार्थ पुढें सहज स्फुरले ते प्रगट होण्यास लागणारी शब्द-योजना प्रथमानुवादांत सांपडेना !

( ख ) शिवाय एका ठिकाणचा अर्थ निश्चित करण्यास

लागणाऱ्या आधार वचनांतील खुणेचे शब्द अपुरे पडूं लागले. तसेच विशिष्ट शब्दांनीं जे भाव प्रगट होतात ते प्रगट होण्यास लागणारे विशिष्ट शब्दच त्या ठिकाणीं अनुवादांत घालणें जरूर असतें. उदा०— सरोरुह, सरोज, पंकज, जलज, कंज इ० शब्दांचा सामान्यार्थ कमल हा एकच असला तरी सूक्ष्मार्थांत फार भेद आहेत. पंकज शब्दांत जो ' पंक ' आहे तो जलज शब्दांत खास नाहीं ! म्हणून अशा भेदांचे निदर्शन करण्यास लागणारी शब्द-योजना प्रथमानुवादांत अपुरी व अयथार्थ आहे असें ठरूं लागलें.

या आवृत्तीत विशेष काय साधलें ? —( विशेष माहितीसाठी गू. चं. टीका पहा. )

१) काण्डारंभीं दिलेल्या अनुवाद-कृत मंगलाचरणाच्या श्लोकांत किरकोळ फरक केला गेला आहे. तथापि त्या श्लोकांची संख्या व श्लोक तेच आहेत.

२) विशिष्ट शब्दांच्या विशिष्ट जागाप्रमाणें त्या शब्दांच्या उपयोगाच्या विशिष्ट संख्येसहि गोस्वामीनीं महत्त्व देऊन एक स्वतंत्र विषय गुप्तपणें सूचित करण्याचा संकेत साधल्याचें दिसून येतें. अर्थात् अशा शब्दांच्या संख्येंत कमी जास्त केल्यास तो संकेत साधतां येत नाहीं; म्हणून त्या शब्दांची ठराविक संख्या अनुवादांत कायम ठेवली आहे. उदा० मानसांत रामचंद्र शब्द १५ वेळां वापरला आहे. ती पंधरा वचनें घेऊन संगतवार लावली म्हणजे एक स्वयंपूर्ण, सुसंबंध व स्वतंत्र विषय बनतो.

हरियान; श्रुतिसिद्धांत, विश्राम, रघुराया इ० अनेक शब्द अशाच प्रकारांनीं वापरले आहेत.

३) आंग्ल भाषा-काव्य समालोचक रस्किननें म्हटल्याप्रमाणें मानसांतील कांहीं ठिकाणीं असलेला शब्दांचा नुसता क्रमसुद्धा अनुवादांत बदलणें अनर्थकारक ठरतें, म्हणून तो तो क्रम कायम ठेवला आहे. उदा० बंदौनाम रघुबरको । हेतु कृसानु भानुहिम करको ।। ( १।१९।१ )

४) **कांहीं नवीन शब्द**–(क) मुळांतील यथार्थ व गूढार्थ प्रगट करण्यास मराठी भाषेंतील व संस्कृतांतील शब्द अपुरे पडूं लागले म्हणून, कांही अगदीं नवीन शब्द योजावे लागले. उदा०– स्वागती= स्वागत करण्यास पुढें जाणारी मंडळी; भाती=लहान भाता इ०

क) कांही नामावरून क्रियापदें बनवलीं :– उदा० **आव्हांनणें आहेरणें** इ०

**ख**) कोंकणी बोल भाषेंतील कांहीं शब्द उपयोगांत आणले; उदा०–हेरणें=पहाणें, शोधणें. तुकणें=उचलणें. निसण, निसणी= शिडी इ०

**ग**) कांहीं संस्कृत रूपें वापरलीं. उदा०–यस्य=ज्याचा, विहाय=सोडून, टाकून. श्रुत्वा=ऐकून इ०

**घ**) ' नामैक देशे नामग्रहणम् ' या संस्कृत भाषेच्या नियमनुसार सत्या, भामा=सत्यभामा, अमा=अमावस्या, इ० प्रयोग

संस्कृत भाषेंत आहेत. गोस्वामींनीं अनुसरलेल्या याच पद्धतीप्रमाणें हनू=हनुमान, अनी=अनीकिनी=सेना इ० प्रयोग या द्वितीय अनुवादांत केले आहेत.

( ५ ) संस्कृत असुन असंस्कृत वाटणारे शब्द:—श्री तुलसी मानसांत संस्कृत असून, संस्कृतज्ञांसहि शब्दकोषपूर्णज्ञानाभावी असंस्कृत वाटणारे पुष्कळ शब्द आहेत. अमरव्याख्यासुधा पाहिल्यानें त्या शब्दांचें शुद्ध संस्कृतत्व कोणासही पटेल. त्यांचा उपयोग मूळ काव्याप्रमाणें अनुवादांतहि केला आहे, उदा०— मास, किण, घुण, रय, भाग ( भाग्य ), चंद ( चंद्र ) इ०

( ६ ) **युक्त पूर्व दीर्घ**:–जोडाक्षरापूर्वीचें ऱ्हस्वाक्षर काव्यांत दीर्घ समजण्याचा संस्कृतानुसारी मराठींतील नियम प्रथमावृत्तींत पाळला नव्हता; हिंदीप्रमाणेंच पद्धति ठेवली होती द्वितीया वृत्तींत या नियमाचें उल्लंघन सहसा झालेलें नाही. चरणांतील यति म्हणजे, विश्रामस्थानानंतरच्या जोडाक्षरानें, उच्चार पद्धतीप्रमाणें पूर्वाक्षरास दीर्घत्व येण्याचें कारण नसतें. ( क ) प्र आणि ऱ्ह या जोडाक्षरांपूर्वीच्या अक्षरांस दीर्घत्व द्यावें किंवा देऊं नये, 'प्र, ऱ्हे वा' असा संस्कृत भाषेंतहि नियम आहे. त्याचा फायदा संस्कृत ग्रंथाप्रमाणें या आवृत्तींत कांहीं स्थळीं घेतला आहे.

(७) **विरामचिन्हें** – प्रथमावृत्तींत वाचनसौकयासाठीं विराम चिन्हांचा उपयोग केला आहे. तसा या आवृत्तींत न करतां अर्थ

निश्चय सुकर व्हावा व मतभेदास जागा राहूं नये या हेतूनें तीं वापरलीं आहेत

(८) **एक आवश्यक नवीन प्रथा** — जड (मराठी) जड (संस्कृत) जरा (म.) जरा (सं.) इत्यादि शब्द लेखनांत 'ज' मराठी व 'ज' संस्कृत यांतील उच्चार भेद स्पष्ट करण्याचें, लेखनांत साधन नाहीं त्यासाठीं संस्कृत 'ज' अक्षराखालीं टिब दिल्यानें उच्चारांतील वरील अडचण दूर होईल म्हणून ही प्रथा या अनुवादांत जरूर तेथें शक्यतों अवलंबिली आहे. (९) क्वचित् हिंदी शब्द किंवा त्यांचें रूपांतर वापरावें लागलें. उ० वरात = मिरवणूक; दरोगा = कोतवाल; घमंड = घमेंड व समुदाय, द्वयर्थी, (क) मराठी संत कवीनीं वापरलेले कांहीं शब्द घेतले आहेत.

(१०) तृतीया व सप्तमीचीं अनेकवचनीं रूपें ई या प्रत्ययानें होतात व त्याचें निदर्शन 'लोकीं' = लोकांनीं किंवा लोकांत, हा तृतीयेचा उपयोग जसा अनेकवचनांत केला जातो तसा फार क्वचितच, पण एकवचनांतसुद्धां करावा लागला आहे.

(११) महाकाव्यदूषण पण नाटयकाव्यभूषण-मानस नाटय काव्य आहे हें प्रथमावृत्तीच्या वेळीं ध्यानीं आलें नव्हतें; भासमान महाकाव्य दोष हेतुपुरःसर निर्माण केलेले आहेत असें वाटत असूनसुद्धां हेतु ध्यानीं न आल्यानें, मुळांतील यतिभंग, छंदोभंग, लयभंग, मात्रान्यून, वृत्तदोष इत्यादींचें संरक्षण प्रथमावृत्तींत केलें नव्हतें, पण मानस नाटय महाकाव्य आहे हें जेव्हां दिसून आलें व त्यास

तद्देशीय प्राच्यप्रौर्वात्य भाषा कोविदांचा आधार मिळाला तेव्हां मुलानुसारी रचना मुद्दाम करणे भागच पडलें. लहान मुलांच्या तोंडी सुसंस्कृत शुद्ध भाषा घालून नाटच सौंदर्य व स्वभावोक्ती साधणार नाहीं, बोबडे बोलच तेथें पाहिजेत. अशा नाटचकाव्यभूषक पण महाकाव्यदूषक सर्व स्थळीं मुळांतील रचना नाटच वा भाव-माधुर्य पोषक व प्रकाशक असल्यानें द्वितीयावृत्तींत त्या त्या काव्य-कलांचें संरक्षण त्या त्या स्थळीं करावें लागलें व तें साधलें गेलें.

( १२ ) **कांही अन्य काव्यकला :—** शब्दश्लेष, वाक्यश्लेष, लिंगभेदानें अर्थनिर्णय, अर्थविशदीकरणार्थ अन्यत्र खुणेचे शब्द, पर्यायवाचक शब्द वा वाक्यें, भावप्रकाशनार्थ दोह्यांत किंवा चौपाईत विशिष्ट शब्दसंख्या, शब्दांचा किंवा वाक्यांचा देहली-दीपाप्रमाणें उभयान्वयी उपयोग, इत्यादि विविध विपुल काव्य-कलांचा उपयोग या आवृत्तींत मूलानुसार केला आहे.

प्रथमावृत्तींत कांहीं ठिकाणीं दोह्यांच्या जागीं सोरठा किंवा सोरठ्याच्या जागीं दोहा वापरला होता; पण या वृत्तांचा उपयोग निरपवादपणे रस-भाव-पोषक सहेतुक असल्याचे ठरल्यामुळे तसा प्रमाद या आवृत्तींत घडला नाही.

कार्यातील त्वरानिदर्शक युक्ति, अध्यात्मपर अर्थास आधारभूत शद्ब, योगपर अर्थास खुणेचे शद्ब, दार्शनिक मतभेदास वाव ठेवणारी शद्बरचना, संक्षेपयुक्ति, कालनिदर्शनकला, विविधमत समन्वयकारक

शद्वकला इत्यादि गोस्वामीजींच्या अनेक काव्यकलांचें रक्षण या आवृत्तींत झालें आहे.

( १३ ) कविता कामिनीचीं अंगें व भूषणें–ध्वनि, गुणीभूत व्यंग; रस, भाव; रीति; गुण इत्यादि अंगें व शद्वालंकार अर्थालंकारादिभूषणें यांचे मूलानुसार संरक्षण प्रथमावृत्तीपेक्षां या आवृत्तींत बहुतांशानें साधलें आहे.

क्वचित् कांही ठिकाणीं मुळांतील अलंकारात थोडा बदल झाला असेल तर कांही ठिकाणी मुळांत नसलेल्या जागीं अलंकार चढले असतील; पण अशीं स्थळें फार तर १५।२० च असतील.

तुलसी मानसांत अंत्य यमकांमध्यें यमकानुप्रास नाहींच म्हटलें तरी चालेल; पण या आवृत्तींत या अलंकाराचा भरणा पुष्कळ आहे.

( १४ ) श्री तुलसी मानस अगाध असल्यानें त्यांत कांही ठिकाणी अर्थनिश्चयासाठी पूर्वापर संदर्भ व ग्रंथसंदर्भ यांचा सूक्ष्म विचार करावा लागतो. अशा ठिकाणीं टीकाकारांत 'मतामतांचा गलबला' दिसतो. म्हणून निःसंदेह एकच अर्थ घेतां येईल, अशी रचना अशा सर्व ठिकाणीं या आवृत्तींत झालेली दिसेल.

**( १५ ) मराठी म्हणींचा उपयोग** – हिंदी म्हणींच्या जागीं समानार्थक मराठी म्हणींचा अधिक उपयोग या आवृत्तींत सहज साधला आहे.

**( १६ ) व्यावसायिक पारिभाषिक शब्द** — निरनिराळ्या

धंद्यातील मराठी पारिभाषिक शब्दांचा उपयोग या आवृत्तींत अधिक केलेला आढळेल.

( १७ ) **कमलिनी कमलसंबंध** — तुलसी रामायणांतील चौपाया या कमलिनी व दोहे, सोरठे, छंद हीं त्यांचीं कमलें असा स्पष्ट संबंध असल्यानें अन्यवृत्तांत मनसोक्त अनुवाद करणाऱ्यांना 'मानसा' चा अनुवाद म्हणण्यांत अनेक दोष पत्करावे लागतील. ( विशेष माहिती प्र. खं. पा. ६८ पहा. ) कमलांना आधार जसा कमललता असतात तसा दोहे, सोरठे, छंद यांना आधार कुठली तरी चौपाई किंवा चौपाया असतात. म्हणून कमलिनी कमलसंबंध मूलानुसार ठेवणें ही एक फार मोठी जबाबदारी अनुवादकावर आहे मुळांतीलच वृत्तें व मुळानुसार खुणेचे शब्द अशी रचना झाल्यानें ही जबाबदारी या आवृतींत पूर्णपणें पार पडली आहे.

( १८ ) **समच्छंद अनुवादांत अडचणी** — एका भाषेंतील काव्यांचा दुसऱ्या भाषेंत समच्छंद अनुवाद करण्यांत अनुवादकाचे हातपाय बांधलेले असतात. या शिवाय भाषाभेदांच्या अडचणी असतात त्या निराळ्याच. सर्वसाधारण काव्यांतील या अडचणींचे दगड तुलसीदासांच्या परमोत्कृष्ठ व अप्रतीम काव्यांत महान पर्वत बनतात. तशांतहि गूढार्थ, भावार्थ, भाव, अध्यात्मपर अर्थ, आधिदैविक अर्थं इत्यादि सर्वांचें रक्षण करणें तर अतीशयच कठीण. असें

असतां. या आवृत्तींत या सर्व गोष्टी सहज साधल्या, हें केवळ श्रीसंत हरिकृपेनेंच घडलें.

( १९ ) **बोलभाषेचा उपयोग**— या आवृतींत जसं, तसं, असं, कसं, इत्यादि बोलभाषेंतील अनेक शब्द वापरले आहेत. यामुळें मात्रांची बचत होऊन भावार्थादि संरक्षणाकडे विशेष लक्ष पुरवितां आलें.

(क) गोस्वामींच्या सारखीं चार मात्रात्मक अंत्य यमकें वापरल्यानें यमक सौंदर्यासाठीं प्रसाद, अर्थसौकर्य व भावरम्यता यांची हानि होत असल्याचें दिसून आल्यामुळें पुष्कळ ठिकाणी एकाक्षरी किंवा द्विमात्रात्मक यमकें वापरलीं. निर्यमक काव्यांत प्रसादमाधुर्यादि गुण जरी अधिक साधणें शक्य असलें तरी, मूळ काव्य सयमक असल्यानें त्याची प्रतिकृति निर्यमक करणें अयोग्य. **श्लेषालंकार** जेथें आहेत तेथें क्वचित् हिंदी शब्द वापरून सुद्धां अर्थ विविधता साधली आहे.

(२०) **कठीण शब्दांचे अर्थ** — शब्दांचा कठिणपणा, वाचक सापेक्ष असल्यानें, कोणते शब्द कठिण हें निश्चित ठरविणें कठीण आहे. तथापि सर्वसाधारण वाचकाच्या दृष्टीनें व अनुवादांत विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट अर्थानें वापरलेले, अर्थ सहज वाचतांच ध्यानीं येण्यास अडचण पडणारे अशा बऱ्याच शब्दांच्या अर्थाची सूची ग्रंथांच्या शेवटीं दिली आहे. तिचा उपयोग वाचक-पाठकांना होईल अशी आशा आहे.

प्रथमावृत्तीचें स्वागत महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं मोठ्या उत्साहानें व आदरानें होत आहे. त्यापेक्षां या द्वितीयावृतींत पुष्कळच, सुधारणा केल्या आहेत. त्यामुळें महाराष्ट्रजनतेच्या आदरास ही आवृत्ति अनेक पटीनें पात्र होईल असा अनुवादकांस पूर्ण विश्वास असला तरी ही आवृत्ति सर्वांग सुंदर व संपूर्णतया निर्दोष झाली आहे असें म्हणण्याचें धाष्टर्य त्याच्या हातून होणार नाहीं. निर्दोष असलेल्या मूळ रामचरितमानसांत दोष काढणारे टीकाकार आहेत व त्यांचें खंडन त्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालून हा लेखक आवडीनें करतोहि; मग खरोखरच ज्यांत दोष आहेत त्यांत ते दोष शोधकास दिसतील यांत नवल काय ?

**उपसंहार** — हा अनुवाद कां व कसा जन्मास आला व त्यांत विशेष काय साधलें इत्यादींची अगदीं संक्षिप्त रूपरेषा याप्रमाणें यथामति दाखवली आहे ( विशेष माहितीसाठीं गू. चं प्रस्तावना खंड पृ. ६३ ते ७० पहा )

— जय जय रघुवीर समर्थ —

❖ ❖ ❖


श्री राम समर्थ

# श्री गोस्वामी तुलसीदासांचें अल्पचरित्र

( गोरखपूर, गुटका मूळ आधार )

प्रयागचे जवळ बांदा जिल्ह्यांत राजापूर नांवाचें एक गांव आहे. त्या ठिकाणीं आत्माराम दुबे नांवाचे एक सरयूपारी ब्राह्मण राहात असत. त्यांच्या धर्मपत्नीचें नांव हुलसी होतें. संवत् १५५४ च्या श्रावण शुद्ध सप्तमीस अभुक्त मूल नक्षत्रावर या भाग्यवान मातेच्या पोटी बारा महिने गर्भांत काढून गोस्वामी तुलसीदासांचा जन्म झाला. जन्मकालीं रडण्याचा स्वर बालकाच्या मूखांतून न येतां ' राम ' नाम आले ! मुखांत बत्तीस दांत व्यवस्थित होते. मुलाचा अंगलोट जवळ जवळ चार पांच वर्षांच्या मुलासारखा होता. अशा प्रकारच्या अद्‌भुत बालकाला पाहून हें कांहींतरी दुश्चिन्ह आहे, असें पित्याला वाटलें व तो भयभीत झाला. या मुलाचा संबंध कसा सोडावा याचा तो विचार करूं लागला. हुलसीचें मातृहृदय यामुळें अत्यंत चिंताग्रस्त झालें. तिनें दशमीच्या रात्रीं आपल्या नवजात शिशूच्या संरक्षणासाठीं त्याला आपल्या दासीच्या स्वाधीन केलें. त्याचे संगोपन तिनें आपल्या सासरीं जाऊन करावें असें तिला सांगितलें. त्याप्रमाणें आपल्या अंगावरील दागिन्यासह तिची रवानगी झालेली पहातांचं हुलसीला या असार संसाराचा वीट आल्यामुळें तिनें

स्वर्गाचा रस्ता धरला !! चुनिया दासीनें मोठ्या जिव्हाळ्यानें या बालकाचें पालन पोषण केलें. पण हें कार्य तिच्या हातून जेमतेम पांच वर्षे झालें कारण त्यानंतर चुनियानेंहि देह ठेवला ! हें बालक आतां मात्र पूर्ण अनाथ झालें. दारोदार अन्नासाठीं भटकण्याच्या त्याच्या जीवनक्रमास प्रारंभ झाला. लवकरच, जगज्जननी पार्वतीला या सुकुमार बालकाची दया आली व एक ब्राह्मण स्त्रीच्या वेषांत प्रत्येक दिवशीं या बालकाला भोजन घालण्याच्या व्रताचा तिनें अंगीकार केला. मुलगा उपनयनास योग्य झाला. प्रत्यक्ष पार्वतीनें सांभाळ केलेल्या या बालकाच्या उपनयनाची काळजी अर्थात् शंकरांना लागली. श्री. अनन्तानंदजींच्या प्रिय शिष्यांना--श्री. नरहर्यानंदांना—या बालकास शोधून त्याचे उपनयन करण्याचा दृष्टांत झाला. त्याला अनुसरून श्री नरहर्यानंदांनी मुलगा शोधून काढला व त्याचें नांव 'रामबोला' ठेवलें. माघशुद्ध पंचमी शुक्रवार या दिवशीं अयोध्येस नेऊन रामबोलाचा उपनयन संस्कार उरकला-त्या समयीं कोणीही न शिकवतां रामबोलानें गायत्री मंत्राचा स्पष्ट उच्चार केला !! सर्व लोक आश्चर्यचकित झाले. त्यांनंतर श्री. नरहर्यानंदांनीं वैष्णवीदीक्षेचे पांच संस्कार करून रामबोलाला राममंत्र दिला. अयोध्येला कांहीं काल वास्तव्य होऊन शिष्याच्या अध्ययनास प्रारंभ झाला. बुद्धि प्रखर व तैल असल्यानें गुरुमुखांतून एकवेळ श्रवण झालेला पाठ शिष्याचा लगेच तयार होई ! कांहीं काळ असा गेल्यावर गुरुशिष्यांची जोडी 'सूकरखेत' गांवीं



श्री. गोस्वामी तुलसीदास

येऊन पोंचली या ठिकाणींच गुरुदेवांनीं तुलसीदासांना रामचरित मानस ऐकवलें. सूकरखेतांतील हें कार्य आटोपून तुलसीदासासह गुरुजी काशीस गेले. तेथें शेष सनातनजींच्या सन्निध पंधरा वर्षे राहून तुलसीदासांनीं वेदवेदागांचें संपूर्ण अध्ययन केलें. या ठिकाणीं त्यांची लोकवासना थोडी जागृत होऊन विद्यागुरुंच्या आज्ञेनें राजापुरास-आपल्या जन्मभूमीस ते परत आले. पहातात तों, आपला सर्व परिवार नष्ट झाला आहे ! त्यांनीं विधीपूर्वक आपल्या पितरांच्या श्राद्धादि क्रिया केल्या. तेथेंच वास्तव्य करून लोकांना प्रभु रामचंद्राच्या कथा सांगण्यास प्रारंभ केला.

संवत १५८६ ज्येष्ठ शु।। १३ गुरुवारी भारद्वाज गोत्रांतील एका सुंदर कन्येशीं त्याचा विवाह झाला व ते आपल्या नवपरिणीत वधूसह सुखानें राहूं लागले. कांहीं वर्षांनीं एक दिवस त्यांची पत्नी आपल्या बंधूसह विवाहोत्तर प्रथमच आपल्या माहेरीं गेली. पण तेवढाही विरह न सोसून तुलसीदासांनी पाठोपाठ आपल्या सासुरवाडीचा रस्ता सरळ सुधारला ! आपल्या श्रेष्ठ पतीची ही केविलवाणी स्त्रैण स्थिति पाहून, तुलसीदासांच्या धर्मपत्नीला कर्तव्य कठोर व्हावें लागलें. तिच्या मुखातून खालील शब्द बाहेर पडले, " धि:कार असो ! माझ्या या हाडामांसाच्या शरीरावर जितकें प्रेम करतां, त्याच्या अर्धे जरी श्रीरामावर केलें असतें तरीं या भयंकर संसारातून मुक्त झाला नसता काय ?"

तुलसीदासांच्या हृदयावर वरील शब्दांचा खोल परिणाम होऊन

एक क्षणभरहि तेथें न थांबतां त्यांनीं आपल्या सासुरवाडीस व त्याबरोबर गृहस्थाश्रमास कायमचा रामराम ठोकला !

तुलसीदास प्रथम प्रयागास गेले, गृहस्थवेषाचा तेथें त्याग करून साधुवेष ग्रहण केला. दीर्घकाळ तीर्थाटन करून ते परत काशीस येऊन पोचले. मानससरोवराचे जवळ त्यांना काकभुशुंडीचें दर्शन झालें.

काशींत राहू लागल्यावर तुलसीदासांनीं आपलें रामकथाकथन-व्रत पुन: सुरुं केलें. एके दिवशीं एका पिशाचानें त्यांना श्री हनूमंताची भेट कशी होईल याची कल्पना दिली. त्याप्रमाणें रामदूत दर्शन घेऊन ' मला श्रीरघुनाथांचें दर्शन करवा, ' अशी त्यांची प्रार्थना श्री तुलसीदासांनीं केली. तें कार्य चित्रकूटावर होईल असें उत्तर मिळतांच त्यांनीं तिकडे प्रयाण केलें.

चित्रकूटावरील रामघाटावर गोस्वामींनीं आपलें आसन ठोकलें. एके दिवशी चित्रकूटाच्या प्रदक्षिणेस ते चालले असतां मार्गावर श्रीरामचंद्रजींचें दर्शन झालें. धनुष्यबाण हातीं घेऊन दोन अत्यंत सुंदर राजकुमार घोड्यावर स्वार होऊन जात असलेले पाहिले. तें दृष्य पाहून तुलसीदास मुग्ध झाले, पण ओळख पटली नाहीं. थोड्या वेळानें श्री हनूमंतांनीं येऊन सर्व वृत्त समजावून सांगित-ल्यावर ते माशासारखे तडफडूं लागले ! अखेर मारुतिरायानीं त्यांचें सांत्वन करून उद्यां प्रात:काळीं पुन: तुम्हांस दर्शन होईल म्हणून आश्वासन दिलें.

संवत १६०७ च्या मौनी अमावस्येस बुधवारीं त्यांच्या समोर पुन: भगवान प्रगटले ! बालरामचंद्ररुपांत त्यांनीं तुलसीदासांना सांगितलें, ‘ बाबा, आम्हाला गंध लावा. ’ या वेळीहि धोका होऊ नये म्हणून हनूमंतांनीं शेजारच्या झाडावर शूकरूपानें बसून दोहा म्हटला :–

चित्रकूटके घाटपर भइ संतन की भीर ।
तुलसिदास चंदन घिसें तिलक देत रघुवीर ॥

त्या त्रिभुवनलावण्यललामाच्या सौंदर्याचे आपल्या नेत्रांनी आकंठ पान करीत असतांना तुलसीदासांचें देहभान हरपलें ! भगवंतांनीं आपल्या हातांनीं चंदन घेऊन आपल्या व तुलसी-दासांच्या मस्तकाला लावलें व प्रभु अंतर्धान पावले ! !

संवत १६२८ मध्यें श्री हनुमंतांच्या आज्ञेनें तुलसीदास अयोध्येस जावयास निघाले. त्या वेळीं प्रयागास माघमेळा होता म्हणून कांहीं दिवस तेथें त्यांनीं मुक्काम ठेवला. पर्वकाळचे सहा दिवस झाल्यावर त्यांनी एका वटवृक्षाखालीं भरद्वाज व यज्ञवल्क्य या मुनि श्रेष्ठांचें दर्शन घडलें. आपल्या गुरुकडून सूकर खेतगांवीं जी कथा तुलसीदासांना ऐकावयास मिळाली होती, तिचेंच श्रवण करण्याचें भाग्य पुन: त्यांना येथें लाभलें. तेथून ते काशीस येऊन प्रल्हाद घाटावरील एका ब्राह्मणाच्या घरीं राहूं लागले. त्या ठिकाणी त्यांच्या हृदयांत कवित्वशक्ति जागृत झाली व संस्कृतमध्यें ग्रंथ

रचना होऊं लागली. पण चमत्कार असा कीं, दिवसभर झालेली सर्व काव्यें रात्री नष्ट होऊं लागलीं. याप्रमाणें एक आठवडा गेल्यावर रात्रीं तुलसीदासाना स्वप्न पडलें. भगवान् शंकरांनीं प्रगट होऊन प्राकृत भाषेंत काव्य रचना करण्याची आज्ञा दिली. गोस्वामी खडबडून जागे झाले. अंथरुणावर मांडी घालून बसतात तों भगवान श्रीशंकर, भगवती पार्वतीसह प्रत्यक्ष प्रगटले. तुलसीदासांनीं साष्टांग प्रणाम केला श्री शिवजी बोलले, "तुम्ही अयोध्येस जाऊन हिंदी भाषेंत काव्य रचना करा. माझ्या आशीर्वादाने तुमचें काव्य सामवेदाप्रमाणें फलद्रूप होईल." एवढा आदेश देऊन भगवान शंकर अंतर्धान पावले. गोस्वामीनीं ही आज्ञा शिरसामान्य करून ते अयोध्येस गेले.

संवत १६३१ उजाडलें. त्यावर्षी त्रेतायुगांत श्री रामजन्मकाळीं जसा योग होता तसाच बरोबर श्रीरामनवमीस तेव्हां होता. त्या दिवशीं गोस्वामीनीं आपल्या श्रीरामचरितमानसाच्या लेखनास प्रातःकाळीं प्रारंभ केला. दोन वर्षे, सात महिने, सव्वीस दिवस, अव्याहत या काव्य रचनेंत घालवून ग्रंथ समाप्त केला. संवत १६३३ च्या मार्गशीर्ष शुक्लपक्षी रामविवाहदिनीं सातीं कांडें संपूर्ण झालीं.

पुनः भगवदाज्ञेनें गोस्वामी काशीस परतले. तेथें त्यांनीं भगवान विश्वनाथ व माता अन्नपूर्णा यांना आपलें काव्य ऐकवलें. रात्रीं पुस्तक श्री विश्वनाथांच्या मंदिरांत ठेवलें. सकाळीं जेव्हां पडदा

खोलला तेव्हां ग्रंथावर 'सत्यं शिवं सुंदरं' असें लिहून खालीं श्रीशंकर अशी सही केलेली सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आली. त्याच वेळीं तेथें जमलेल्या लोकांच्या कानांवर 'सत्यं शिवं सुंदरं' अशी गाभाऱ्यांत प्रगटलेली गंभीरवाणी आली.

ही बातमी पंडितांच्या कानीं पडतांच त्यांच्या मत्सरानें उचल खाल्ली. त्यांची टोळी तुलसीदासाची निंदा करण्यास व 'मानस' ग्रंथ नष्ट करण्यास एकत्र झाली. त्यांनीं पुस्तक चोरुन आणण्या-साठीं दोन चोर पाठवले. हातांत धनुष्य बाण घेतलेले श्याम, गौर व अतीव सुंदर दोन वीर रात्रभर गोस्वामींच्या झोपडीभोंवती पहारा करीत असलेलें भव्य-दिव्य दृश्य त्यांना रात्रभर पहावयाचे भाग्य लाभले भगवंतांच्या दर्शनानें त्या चोरांची चित्त-शुद्धि होऊन त्यांनीं चौर्यकर्म त्या दिवसापासून कायमचें सोडलें व आपलें उर्वरित आयुष्य भजनानंदात व्यतीत केलें. आपल्यासाठीं भगवताला कष्टविणारी कुटिका दुसऱ्याच दिवशीं गोस्वामींनी जाहिररीत्या लुटवली व आपला मित्र राजा तोरडमल याच्याकडे श्रीरामचरित. मानस रक्षणार्थ दिलें. त्यांच्या आधारें दुसऱ्या हस्तलिखित प्रति भराभर तयार होऊन ग्रंथाचा प्रचार दिवसेंदिवस वाढू लागला.

पंडितंमन्यांना अन्य उपाय न दिसल्यानें त्यांनीं महाविद्वान श्री मधुसुदन सरस्वतींना या ग्रंथाचें परीक्षण करण्यासाठीं प्रेरणा दिली. ग्रंथाचें परिशीलन केल्यावर त्यांचें हृदय अत्यंत प्रसन्न होऊन त्यावर त्यांनीं आपल्या मान्यतेचा खालील अभिप्राय दिला.

आनंदकानने ह्यस्मिन् जंगमस्तुलसीतरुः ।।
कविता मंजरी भाति रामभ्रमरभूषिता ।।

या वाराणसीरुपी आनंदवनांत हिंडता फिरता, तुलसीदासरुपी तुलसी वृक्ष आहे. त्याच्या कवितारुपी मंजरीला श्रीरामचंद्ररूपी भ्रमर भूषवित असल्यानें त्या मंजरीचें सौंदर्य अनुपम झालें आहे.

हा श्रेष्ठ प्रकारचा अभिप्राय मिळाल्यानें पंडितांची पुनः निराशा झाली. त्यांच्या हृदयस्थ मत्सरानें त्यांना आणखी एक अखेरचा मार्ग सुचवला. भगवान् श्री. विश्वनाथाच्या समोर सर्वात वर वेद, त्याखालीं शास्त्र, त्याखालीं पुराणें आणि सर्वांच्या खालीं ' रामचरितमानस ' असें ठेवलें. मंदिरास सीलबंद कुलुप लावून टाकलें. प्रातःकालीं पंचादेखत मंदिर द्वार खोलून पहातात तों वेदांच्याहीवर श्रीरामचरितमानस !! या चमत्काराने मात्र पंडित लज्जित झाले त्यांनीं गोस्वामीची क्षमा मागून त्यांच्या चरणोदकाचें भक्तिपुरःपर सेवन केलें.

आतां तुलसीदास काशींतील असी घाटावर राहूं लागले. एकेदिवशीं रात्रीं कलियुग प्रत्यक्ष देहधारी होऊन गोस्वामींना त्रास देऊं लागलें. त्यांनी लगेच श्री हनुमंतांचे ध्यान केलें. हनुमंतांनी गोस्वामींना विनय–पदें लिहिण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणें ' विनय–पत्रिका ' नामक श्रेष्ठ काव्य करुन तें श्री भगवंताच्या

चरणीं त्यांनीं समर्पण केलें. श्रीरामचंद्रांनीं त्यावर स्वाक्षरी करुन तुलसीदासांना निर्भय केलें.

संवत् १६८० श्रावण कृष्ण तृतीयेस शनिवारी असी घाटावर श्री गोस्वामींनी श्रीराम राम राम असा भगवन्नामोच्चार करत आपल्या जड शरीराचा त्याग केला.

❖ ❖ ❖

द्वितीय आवृत्ति

## प्रकाशकाची प्रस्तावना

श्रीरामचरितमानस–मराठी, समश्लोकी समवृत्त अनुवाद, द्वितीय आवृत्ति–भरपूर सुधारलेली, गोरखपूर गुटका आकाराची आज प्रसादप्रकाशनामार्फत प्रसिद्ध होत आहे.

श्री. प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज, हल्लीं मुक्काम शृंगेरी मठ, नाशिक-पंचवटी, यांनीं हा अनुवाद केला असून त्याची प्रथमावृत्ति शके १८७१ मध्यें प्रकाशित झाली. ती आतां जवळ-जवळ संपली आहे.

श्री स्वामींचा मुक्काम परंडा (जि. उस्मानाबाद) येथें असतां, श्रींच्या विषयीं आदर बाळगणाऱ्या कांहीं वकील व डॉक्टर मंडळींना, श्रीरामचरितमानसाच्या द्वितीया अनुवादाच्या प्रकाशनाची गरज वाटूं लागली. त्यांनीं त्या दृष्टीनें परंडा येथें 'मराठी मानस मंडळ' या नांवाची एक संस्था स्थापन केली. या मंडळानें हें प्रकाशनाचें कार्य हातीं घेतलें. मुख्यत: श्री. वासुदेवराव तथा नानासाहेब देशमुख वकील यांच्या मातोश्री, श्रींच्या अनुगृहींत असल्यामुळें त्यांच्यासाठीं म्हणून श्री नानासाहेब यांनीं सुरवातीस एकदम २५०० रु. ची रक्कम आणून दिल्यामुळेंच या छपाईच्या कामास चालना मिळाली.

महाराष्ट्रांत, अशा ग्रंथाच्या प्रकाशनाला प्रसाद-प्रकाशनाइतकीं योग्य जागा सदरच्या मंडळास न आढळल्यानें, हा ग्रंथ प्रसाद प्रकाशनानें प्रकाशित करावा, अशी मंडळानें विनंति केली. प्रभु

श्रीरामाच्या कृपेनें व श्री स्वामींच्या आशीर्वादानें, प्रसाद-प्रकाशना-कडून त्याप्रमाणें हा ग्रंथ आज प्रकाशित होत आहे, ही मोठ्या आनंदाची व समाधानाची गोष्ट आहे.

श्रीरामचरितमानस अर्थात् तुळसी रामायण, हा मूळचाच ग्रंथ मोठ्या योग्यतेचा ! त्याचा समश्लोकी समवृत्त मराठी अनुवाद करणारे श्री स्वामी, हेहि अखिल भरत खंडांतील जे 'मानस–तज्ञ' आहेत, त्यांपैकीं एक श्रेष्ठ अधिकारी पुरुष आहेत, हें आतां आम्ही सांगण्याची गरज उरलेली नाहीं.

श्रींचा पहिला अनुवाद प्रकाशित होऊन सुमारें बारा वर्षें झालीं! महाराष्ट्रांतील शेंकडो–स्त्री पुरुष, त्याच्या सहाय्यानें आपली रामो–पासना दृढ करीत आहेत ! त्याचप्रमाणें उत्तरहिंदुस्थानांत प्रसिद्ध झालेल्या मानसपीयूष नामक प्रचंड टीकाग्रंथांत, श्रींची टीका प्रका-शित झाली आहे; इतकेंच नव्हें तर गूढार्थचंद्रिका नांवाचा एक स्वत:चाच तुळसीरामायणावरील टीका गंथ सुमारें ६००० पृष्ठांचा लिहून श्रींनी पूर्ण केला आहे. त्याचा पहिला प्रस्तावना खंड सुमारें ७०० पृष्ठांचा प्रकाशित झाला असून, तोहि महाराष्ट्रांतील अनेक विद्वानांच्या आदरास अधिकाधिक पात्र होत आहे ! अशा स्थितींत हा द्वितीय अनुवाद कां केला व तो सर्व दृष्टींनीं सरस कसा आहे, याची कारणें श्रींच्याकडूनच समजून घेणें इष्ट, म्हणून यासंबंधीं त्यांच्याच लेखणींतून उतरलेला प्रस्तावना खंडातील भाग, आम्ही स्वतंत्रपणें, जवळजवळ उद्‌धृत केलेला आहे. (प्र. खं. पृष्ठें ६३ ते ७०).

याशिवाय प्रथमावृतींत उणीव म्हणून जाणवणाऱ्या कांहीं प्रकरणांचा समावेश या आवृत्तींत हेतुपुरःसर केला आहे. उदाहरणार्थ— पारायण विधि, रामायण पठणाच्या प्रारंभीं व शेवटीं करावयाचें नमन इत्यादि.

ही आवृत्ति संपूर्णतया निर्दोष आहे, असें कोणीच केव्हांहि म्हणूं शकत नाहीं–तथापि प्रभु कृपेनें व छपाईच्या कामांत अनेकांनीं लक्ष घातल्यानें, ती प्रायः निर्दोष स्वरूपांत वाचकांना देणें आम्हांस शक्य झालें आहे. छपाईच्या कामीं प्रतिभा मुद्रणालयाचे मालक मेसर्स जोशी व लोखंडे, मॅनेजर प्र. भा. काळे व हेड् कंपॉझिटर श्री. पुरोहित यांचे जिव्हाळ्याचे साहाय्य झाल्यानेंच ग्रंथ या स्वरूपांत प्रकाशित होऊं शकला. म्हणून त्यांचा मी आभारी आहे.

या ग्रंथाच्या पठनानें महाराष्ट्रीय रामोपासक व रामचरित–मानसोपासक आपली उपासना वाढवोत, एवढीच त्या जगच्चालक रघुवीराच्या चरणीं प्रार्थना आहे.

चैत्र शु।। १/१८८३
( दि. १७ मार्च १९६१ )

**यशवंत गोपाळ जोशी**

❖ ❖ ❖

॥ श्री सद्‌गुरुप्रसन्न ॥

ब्रह्मीभूत परमपूज्य परमहंस परिव्राजकाचार्य

# श्री प्रज्ञानानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचा अल्प परिचय

**श्रीमति कमल वैद्य,** एम्. ए.


श्रींचे पूर्वाश्रमीचे नाव श्री. दत्तात्रेय नारायण कर्वे असे होते. त्यांचा जन्म वैशाख वद्य ३० शके १८१५ म्हणजे दि. १५ मे १८९३ रोजी माहीम ( ता. पालघर, जिल्हा ठाणे ) येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण बदलापूर येथे, माध्यमिक शिक्षण मुरुड जंजिरा येथे व महाविद्यालयीन शिक्षण बडोदा येथे झाले. इ. स. १९१८ मध्ये ते बी. ए. झाले व त्यानंतर एस. टी. सी. होऊन इ. स. १९३६ पर्यंत मुरबाड, वसई, डहाणू व चिंचणी तारापूर येथे त्यांनी शिक्षकाचे काम केले.

इ. स. १९३१ मध्ये चिंचणी तारापूरला गोस्वामी तुलसीदासांचे एकनिष्ठ भक्त श्री बाबा गंगादास यांची व स्वामींची भेट झाली. त्यांच्या विरक्त, नित्य समाधानी आणि प्रेमळ वृत्तीमुळे स्वामी त्यांच्याकडे ओढले गेले. त्यांनीच स्वामींना गोस्वामी तुलसीदासांच्या श्रीरामचरितमानसाची गोडी लावली. त्यांच्या

प्रेरणेने स्वामींनी या ग्रंथाची एकाह्, त्रिदिनात्मक, नवाह् अशी शेकडो पारायणे केली. यावर श्री बाबा गंगादासजींनी रामायणाचा प्रसार करण्याचा आदेश देऊन 'तुझ्या मुखाने गोस्वामी बोलतील' असा अमोघ आशीर्वाद दिला. त्यांच्या संगतीचा लाभ फक्त ५–७ वर्षे मिळाला. पण त्यांचा आदेश मात्र स्वामींनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत पाळला.

यानंतरचा काळ अधिक प्रगतीचा ठरला. बालपणापासून अंतरी असणाऱ्या धगधगीत वैराग्याचे स्वरूप प्रगट होण्याची वेळ आली. पौष शुद्ध १२ शके १८६४ (१८–१–१९४३) रोजी श्रींनीं चतुर्थाश्रमाची दीक्षा खेड (जिल्हा पुणे मुक्कामीं घेतली. श्री. ब्र. भू. प. प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज, ( पोटे स्वामी ) आळे, यांच्याकडून दंड ग्रहण केला. त्यांच्या कृपाप्रसादाने श्रींची काव्यशक्ती जागृत होऊन अनेक काव्यग्रंथ निर्माण झाले. प्रथम श्रीरामचरितमानसाचा समवृत्त–समच्छंद मराठी अनुवाद अवघ्या तीन महिन्यांत झाला. नंतर संगीत समश्लोकी गीता, अभिनव रामायण, वेदांतसार अभंग रामायण, श्रीगुरुगीता–प्रबोधिनी, श्री ब्रह्मस्तुति ( प्राकृत ), श्रीवेदस्तुतिभास्कर ( प्राकृत ), श्रीपरमामृत प्रकाश ( टीका ), श्रीगीताकीर्तन तरंगिणी असे अनेक काव्यग्रंथ लिहून झाले. यानंतर श्रीरामचरित मानसावरील 'मानस-गूढार्थ-चंद्रिका' हा सुमारे ७००० पृष्ठांचा बृहत् टीका ग्रंथ मराठी व

श्री प. प. प्रज्ञानानंद सरस्वती



॥ मंगलभवन अमंगल हारी। द्रवउ सो दशरथ-अजिर बिहारी ॥

हिंदी दोन्ही भाषांत लिहून तुलसी मानसाचा मराठी द्वितीयानुवाद, व ' संध्योपासना ' हा ग्रंथ लिहिला. हे कार्य चालू असता, वर्षा-नुवर्षे दररोज १८ ते २० तासपर्यंत लेखन कार्य केवळ रामप्रभूंची सेवा म्हणून श्री स्वामींनी केले !

श्रींची काव्य प्रतिभा प्रासादिक, ओजस्वी व ओघवती आहे. संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराथी, व इंग्रजी या भाषांवरील असामान्य प्रभुत्व, वैदिक, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचा सखोल अभ्यास, योग व मंत्र शास्त्रातील प्रत्यक्ष घेतलेले अनुभव, विविध क्षेत्रांतील व्यावहारिक जगतांत वावरताना आलेले कटुतर अनुभव, व अनेक वर्षे केलेली खडतर अनुष्ठाने, पुरश्चरणे व तपश्चर्या, यात्रादि निमित्ताने केलेले भरत खंडातील सूक्ष्मावलोकनपूर्वक पर्यटण, इत्यादिच्या योगे त्यांच्या ठिकाणी ज्ञान, वैराग्य, योग व पराभक्ती यांचा आदर्श समन्वय झाला होता.

चतुर्थाश्रम घेतल्यावर चास–कमान, इसलामपूर, सातारा, सांगली, माधवनगर, कुंडल परांडा, गंगाखेड, मुंबई, पुणे, नाशिक, उस्मानाबाद वगैरे निरनिराळ्या ठिकाणी श्रींचे वास्तव्य झाले. पण १९५९ पासून मुख्यतः परांडा येथेच वास्तव्य झाले. परंड्याला श्रीसमर्थ शिष्य कल्याणस्वामी, नाथपंथीय कवी श्रीनाथभुजंग, सुप्रसिद्ध वेदान्ती संतकवी श्रीहंसराजस्वामी, समर्थभक्त प. पू. श्री.

अनंतदास रामदासी इत्यादि अनेक संतांनी वास्तव केल्याने त्यास संतभूमीचा गौरव प्राप्त झाला आहे. या भूमीत स्वामी रमले.

दीपस्तंभाप्रमाणे अनेकांच्या ऐहिक, पारमार्थिक जीवनांत त्यांनी मार्गदर्शन केले व शेवटी देहाचे नियोजित कार्य पार पडल्याने, प्रायोपवेशनपूर्वक देहविसर्जनाचा कठोर निर्णय त्यांनी घेतला व सतत दहा दिवस अन्नपाणी वर्ज्य करून, फाल्गुन वद्य १० शके १८९० (दि. २३ मार्च १९६८) या पुण्यदिवशी ते समाधिस्थ झाले. परांडा येथेच त्यांची समाधि असून पुण्यतिथीस तेथे मोठा उत्सव होत असतो.

❖ ❖ ❖

तृतीय आवृत्ति

# प्रकाशकाची प्रस्तावना

श्री रामचरित मानस ( मराठी अनुवाद ) या पुस्तकाच्या मराठी प्रति मिळेनाशा झालेमुळे श्री गुरुदेव रानडे मंदिर बेळगांव या संस्थेनें या ग्रंथाची तृतीय आवृत्ति छापून प्रसिद्ध करानी अशा सूचना कांही लोकाकडून मंदिराच्या व्यवस्थापनाकडे आल्या.

'मग्नीराम रामकुवा चॅरिटेबल ट्रस्ट कलकत्ता' या संस्थेने या ग्रंथाचे छपाईकरिता कागद खरेदीसाठी अंशत: आर्थिक मदत देणेचे कबूल केलेने पुस्तकाची तिसरी आवृत्ति छापणेचा प्रश्न विचाराधीन झाला.

यानंतर 'स्पेशल वेल्फेअर चॅरिटेबल ट्रस्ट, बेळगांव' या संस्थेनेही छपाईसाठी आर्थिक मदत देण्याची इच्छा प्रदर्शित करून पुस्तकाच्या कांहीं प्रति एकटाकीने विकत घेण्याची तयारी दाखविली. यामुळे छपाई काम हाती घेणेचे विचारास चालना मिळाली. असा ग्रंथ छापणेचा म्हणजे या दिवसांत हाती २५ ते ३० हजार रुपये तरी पाहिजेत. अशावेळी श्रीमती कमल वैद्य M. A. मुंबई यानी ४०० प्रतीची योग्य तेवढी किमत आगाऊ देवून इतक्या प्रती खरेदी करणेचे कबूल केले व त्याप्रमाणे रकमही आगाऊ पाठवून दिली. यामुळेच गुरुदेव मंदिरातर्फे 'श्रीरामचरित मानस' या ग्रंथाची तिसरी आवृत्ति छापून, प्रसिद्ध करणेचे ठरले. या आर्थिक मदती-बद्दल आम्ही १) मग्नीराम रामकुवा ट्रस्ट, कलकत्ता व सोशल

वेल्फेअर ट्रस्ट, बेळगांव व २) श्रीमती कमल वैद्य M. A. मुंबई यांचे अत्यंत ऋणी आहोत. शिवाय श्रीमती वैद्य यांनी या ग्रंथांचे शुद्धीपत्रक काळजीपूर्वक तयार करून देवून वेळोवेळी मार्गदर्शनही केले. तसेच श्री रामजी गिल्डा, डोंबिवली यानी पूज्य श्री प्रज्ञानानंदजी महाराज यांच्या फोटोच्या रंगीत प्रती मुंबईला तयार करून घेवून इकडे पाठविल्या त्याबद्दल वरील दोघांचेही आम्ही फार आभारी आहोत.

स्वस्तिक प्रिंटिग प्रेसचे मालक, श्री राजाभाऊ देशपांडे बेळगांव यानी छपाईचे काम सुबक केले व याबद्दल आम्ही त्यांचेही अत्यंत आभारी आहोत.

प. पू. श्री प्रज्ञानानंद सरस्वति महाराज यांची पुण्यतिथी फाल्गून कृष्ण १० रोजी परांडा (जिल्हा उस्मानाबाद) येथे साजरी केली जाते. त्याच दिवशी हा ग्रंथ साधकांचे हाती ठेवणेचा आमचा विचार होता. पण अनिवार्य कारणानें तसें करणें शक्य झालें नाहीं. हा ग्रंथ वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध होत आहे. या ग्रंथाचे नियमित वाचन व मनन केल्याने मनाला शांति व समाधान मिळेल, यांत शंका नाहीं.

हें नित्य श्रवण करावें । मनन निदिध्यासें अनुभवावें ।
आळस करून न दवडावें । आयुष्य वृथा ।।

( मुकुंदराजकृत परमामृत )

मि. चैत्र शुद्ध १ शके १९०९
ता. ३०–३–१९८७

– प्रकाशक

## परिशिष्ट-१

# श्रीहंसमंडळ-परांडा

## जिल्हा उस्मानाबाद (र. नं. ए २७७६)

परांडा येथील श्रीहंसराजस्वामींच्या मठाची व्यवस्था पाहण्यासाठी आणि त्यांच्या ग्रंथांचा प्रसार करण्यासाठी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी 'श्रीहंसमंडळ' स्थापन करण्यांत आले. श्रीहंसराज-स्वामींच्या मठाच्या परिसरांत तीन श्रेष्ठ संतांच्या समाध्या आहेत. विशेष म्हणजे सर्वच समर्थ सांप्रदायिक होते. श्री. हंसराज स्वामींच्या समाधीच्या दोन्ही अंगाना अगदी अलीकडच्या काळातील श्रेष्ठ समर्थ भक्त श्री. अनंतदास रामदासी आणि सुप्रसिद्ध तुलसीभक्त प. प. श्रीप्रज्ञानानंद सरस्वती स्वामी यांच्या समाध्या आहेत.

मंडळाने अंगिकारलेल्या कार्यामध्ये मठाचा जीर्णोध्दार व या सत्पुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन ही प्रमुख कार्ये आहेत. मठातील सत्पुरुषांचे पुण्यतिथि-उत्सव श्रीहंसमंडळ मोठ्या उत्साहाने करीत असते. श्री हंसराज स्वामींचा पुण्यतिथ्युत्सव वैशाख शु० ७, ८, ९ या दिवशी, साजरा होतो. श्री अनंतदास महाराजांची पुण्यतिथी अश्विन शु० १० ला साजरी होते व श्री प्रज्ञानानंद स्वामींच्या पुण्यतिथीचा सोहळा फाल्गुन व. ८, ९, १० ला साजरा होतो. त्यानिमित्त मठात कीर्तन, प्रवचन, भजन, अन्नसंतर्पण इ. कार्यक्रम आयोजित करण्यांत येतात. त्यासाठी कायम स्वरूपाचा मंडप मठात असणे आवश्यक आहे सवड होताच हे कार्य हाती घेण्यात येईल.

(या मंडळाचे कायदेशीर रजिस्ट्रेशन ३ वर्षांपूर्वी करण्यांत आलेआहे.)
श्री हंसराजांची १३१ वी पुण्यतिथी मंडळाने नुकतीच साजरी केली.

# विषयानुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| श्रीराम चरित्र आरती (मराठी) | ४ |
| नित्यपठण पद्धति | ५ |
| पारायण विधि | ७ |
| नवाह्नपारायणाचे विश्राम | ११ |
| मासपारायणाचे विश्राम | १२ |
| लेखकाचें निवेदन | १३ |
| श्रीतुलसीदासांचें अल्प चरित्र | २३ |
| प्रकाशकाचें निवेदन (द्वि. आ.) | ३२ |
| श्री प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज यांचा अल्प परिचय | ३५ |
| प्रकाशकाची प्रस्तावना तृ. आ. | ३९ |
| श्रीहंसमंडळ-परांडा | ४१ |
| विषयानुक्रमणिका | ४२ |
| **बालकाण्ड** | |
| मंगलाचरण | ३ |
| श्रीनामवंदन | १८ |
| याज्ञवल्क्य भरद्वाज संवाद | ३४ |
| सतीमोह | ३७ |
| शिव पार्वती संवाद | ७० |
| नारदांचा अभिमान | ८० |
| मनुशतरूपातप | ८७–८८ |
| भानुप्रतापकथा | ९३ |
| रामजन्म | ११५ |
| विश्वामित्राच्यायज्ञाचें रक्षण | १२५ |
| पुष्पवाटिका निरीक्षण | १३४ |
| धनुष्य-भंग | १५३ |
| श्रीसीता राम विवाह | १८० |
| **अयोध्याकाण्ड** | |
| मंगलाचरण | २१३–१४ |
| रामराज्यभिषेक तयारी | २१६ |
| श्रीसीता राम संवाद | २४६ |
| श्रीलक्ष्मण सुमित्रा संवाद | २५२ |
| वनगमन | २५५ |
| केवटाचें प्रेम | २६६ |
| भरद्वाज संवाद | २६९ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| श्रीराम वाल्मीकि संवाद | २७९ |
| चित्रकूट निवास | २८३ |
| दशरथ मरण | २९५ |
| भरत कौसल्या संवाद | ३०० |
| भरताचें चित्रकूटासाठीं प्रस्थान | ३११ |
| भरत भरद्वाज संवाद | ३२१ |
| राम भरत भेट | ३३९ |
| जनकागमन | ३५७ |
| श्रीराम भरत संवाद | ३६९ |
| भरताला निरोप | ३७९ |
| नन्दिग्रामांत वास्तव्य | ३८२ |
| **अरण्यकांण्ड** | |
| मंगलाचरण | ३८७–८८ |
| जयंताची कुटिलता | ३८९ |
| श्रीसीता-अनसूया मिलन | ३९१ |
| सुतीक्ष्णाचें प्रेम | ३९५ |
| पञ्चवटी निवास | ३९९ |
| खरदूषण वध | ४०६ |
| मारीच–कांचनमृग | ४१० |
| सीताहरण | ४१२ |
| शबरीवर कृपा | ४१७ |
| **किष्किंधाकांड** | |
| मंगलाचरण | ४२७–२८ |
| श्रीरामहनुमान् भेट | ४२८ |
| वालीवध | ४३४ |
| सीताशुद्धीसाठीं वानरप्रस्थान | ४४२ |
| हनुमान् जाम्बवन्त संवाद | ४४७ |
| **सुन्दरकाण्ड** | |
| मंगलाचरण | ४५१–५२ |
| लंकाप्रवेश | ४५५ |
| सीता हनुमान् संवाद | ४६० |
| लंकादहन | ४६७ |
| श्रीराम हनुमान् संवाद | ४७० |
| लंकाप्रस्थान | ४७२ |
| बिभीषण शरणागति | ४७८ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| समुद्रावर रोष | ४८५ |
| **लंकाकाण्ड** | |
| मंगलाचरण | ४८९–०९ |
| सेतुबन्ध | ४९१ |
| अंगदशिष्टाई | ५०२ |
| लक्ष्मण-मेघनाद-युद्ध | ५२३ |
| श्रीरामप्रलापलीला | ५२७ |
| कुम्भकर्णवध | ५३८ |
| मेघनादवध | ५३३ |
| रामरावण युद्ध | ५४९ |
| रावणवध | ५५९ |
| सीतेचें अग्निदिव्य | ५६४ |
| अयोध्याप्रस्थान | ५७२ |
| **उत्तरकाण्ड** | |
| मंगलाचरण | ५७७–७८ |
| भरत हनुमान् भेट | ५७९ |
| राम भरत भेट | ५८२ |
| रामराज्याभिषेक | ५८७ |
| प्रजेला श्रीरामोपदेश | ६०७ |
| गरुड भुशुंडी संवाद | ६१८ |
| काकभुशुंडी लोमश संवाद | ६५० |
| ज्ञानभक्तिनिरूपण | ६५५ |


❖ ❖ ❖

# शुद्धीपत्र

## प्रस्तावना ( पहिली ४० पाने )

| पान नं. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | ४ | भिर्मवितम् | भिर्भावितम् |
| ५ | ३ | प्रारंभी | प्रारंभीचे |
| ६ | १ | ४ . | उत्तरकांड दो. १९ रा. |
| ८ | २ | सह प्रियः | सहप्रियः |
| ९ | ६ | शोभितम | शोभितम् |
| | १३ | चित्रितम्ः | चित्रितम् |
| १० | ११ | कनिष्ठकाभ्यां | कनिष्ठिकाभ्यां |
| | १२ | करि | कर्रि |
| | १३ | ६-११५-६ | ६-११५-१ |
| ११ | ८ | दूपण | दूषण |
| | १० | गा ती | गाती |
| | १४ | नवाह्नपारायण | नवान्हपारायण |
| १४ | ११ | अनुवाद- | अनुवादक- |
| | २१ | सुसंवंध | सुसंबद्ध |
| १५ | २० | अमावस्या | अमावास्या |
| १८ | १ | प्रौर्वात्य | पौर्वात्य |
| | २ | मुलानुसारी | मूलानुसारी |

| पान नं. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २१ | ४ | कसं, इत्यादि | कसं, इथं इत्यादि |
| २५ | ४ | वेदवेदागांचे | वेदवेदांगांचे |
| | १० | १५८६ | १५८३ |
| | ११ | त्याचा | त्यांचा |
| २७ | ४ | शुक्ररुपानें | शुकरुपानें |
| | १५ | त्यांनी | त्याना |
| | | यज्ञवल्क्य | याज्ञवल्क्य |
| २९ | १५ | तोरडमल | तोडरमल |
| | १६ | त्यांच्या | त्याच्या |

## मूळ ग्रंथ

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १० | मू–जल–नभ–वासी | भू–ज़ल–नभ–वासी |
| ११ | उच्च चि रुचिरहि | उच्च रुचि रुचिरहि |
| १३ | उपजनि इथे तिथे | उपजुनि इथे तिथे |
| १३ | वष घाण्याचा | वृष घाण्याचा |
| १५ | कलियग–कविना | कलियुग-कविना |
| १८ | चरण–कमल वदे सबलायक | चरणकमल वंदे सब लायक |
| १९ | जन मव कज मजु | जन मन कंज मंजु |

| | | |
|---|---|---|
| २० | उमा प्रबोधक | उभां प्रबोधक |
| २२ | राजाराम अवघ नृप–धार्नी | राजाराम अवध नृप–धानी |
| २२ | घ्रव | ध्रुव |
| २६ | सद्गुण सुरगण अव | सद्गुण सुरगण अंब |
| २६ | बीज सकल धमा | बीज सकल धर्मा |
| २७ | शकर वदले | शंकर वदले |
| २७ | गुरू पट पंकज | गुरू पद पंकज |
| ३० | अर्थधर्मकामदिक | अर्थ धर्म कामादिक |
| ३१ | अभागं ! | अभागे ! |
| ३१ | सरसरिते | सुरसरिते |
| ३२ | शमन अमित उत्पाद | शमन अमित उत्पात |
| ३३ | आशां तृषा मनोमेलहारी | आशातृषामनोमलहारी |
| ३४ | किनर–नर–सुर | किन्नर नर सुर |
| ३४ | एक वळ भरि | एक वेळ भरि |
| ३५ | शंभू अविनाशी | शंभु अविनाशी |
| ३५ | सत्यधाम सवज्ञ | सत्यधाम सर्वज्ञ |
| ३६ | तुलसी ! दशन–लोभ | तुलसी ! दर्शन–लोभ |
| ४० | नयन पाहुले | नयन पाहिले |
| ४० | हरिइच्छा भापी वलवान् | हरिइच्छा भावी बलवान् |
| ४४ | तैं शकर–वच | तैं शंकर–वच |
| ४४ | श्रुत कृत | श्रुत कृत |

| | | |
|---|---|---|
| ४५ | तिये सिद्धि | तिथें सिद्धि |
| ४५ | सहज वंरः सब | सहज वैर सब |
| ४५ | गिरिपति सुस्वागत्म सादर | गिरिपति सुस्वागत सादर |
| ४६ | आणुनि धालि मुलिस | आणुनि घालि मुलिस |
| ४६ | उदासीन बस शंकाक्षीणहि | उदासीन सब शंकाक्षीणहि |
| ४६ | गिरि मथना | गिरि मयना |
| ४७ | दे वंदनुज | देव दनुज |
| ४७ | समर्थ शभु | समर्थ शंभु |
| ४८ | वर जर गिरिजे | वर जर गिरिजे |
| ४९ | मन पद्रि अनुरागे | मन पदिं अनुरागे |
| ५० | बघुनि आत उमाशरीरा | बघुनि अति उमाशरीरा |
| ५० | गगनी वणित | गगनी वर्णित |
| ५० | महिवरि फिरतो | महिवरि फिरती |
| ५१ | कृपाधन | कृपाघन |
| ५२ | सहज उदा स | सहजं उदासा |
| ५५ | सद्ग्रंथ–पव्रत–कंदरी | सद्ग्रंथ–पर्वत–कंदरीं |
| ५५ | रक्षक क्रोण | रक्षक कोण |
| ५६ | शुक पिय | शुक पिक |
| ५७ | वघुदि शि व | बघुनि शिव |
| ५७ | देवां सवहि वृत्त | देवां सर्वहि वृत्त |
| ६० | विष्ण हसुनि | विष्णु हसुनि |

| पान | अशुद्ध | शूद्ध |
| --- | --- | --- |
| ६० | गणां वाहले | गणां बाहले |
| ६१ | शंल सकल जगिं | शैल सकल जगिं |
| ६४ | पालन–लायकारिणी | पालन–लयकारिणी |
| ६४ | घई सती सियवेष | घेई सती सियवेष |
| ६४ | स्वयपाक नानाविध | स्वयंपाक नानाविध |
| ६५ | मुनीश उभे बोलाविति | मुनीश उमे बोलाविति |
| ६६ | मयना घ री | मयना धरी |
| ६८ | कथालालसा वाढ | कथालालसा वाढे |
| ७० | ज्ञानयोगवराग्यनिधि | ज्ञानयोगवैराग्यनिधि |
| ७२ | कडु तंवडिशीं | कडु तुंबडिशीं |
| ७३ | वेद विसगत | वेद विसंगत |
| ८१ | अत:करणी | अंत:करणी |
| ८४ | होते भद कळे हि | होते भेद कळे हि |
| ८४ | सकुमारि जणुं | सुकुमारि जणुं |
| ८६ | –प्रवलते | प्रबलते |
| ८६ | प्रभु | प्रभु |
| ८६ | प्रबेधुनि | प्रबोधुनि |
| ८७ | भजन भू–भार | भंजन भू–भार |
| ८९ | मनं जडता | मनं जडतात |
| ८९ | सवत सप्त सहस्र | संवत सप्त सहस्र |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ९० | जास्तव | ज्यास्तव |
| ९१ | प्रसन्न | प्रसन्न |
| ९४ | प्रताप | प्रताप |
| ९६ | भुप–सुधीर | भूप-सुधीर |
| ९५ | न मिळ | न मिळे |
| ९९ | रहित–तन | रहित तनु |
| १०३ | त्याज वाजिवर | त्याच वाजिवर |
| १०६ | विप्रशापवश | विप्रशापवश |
| १०६ | ब्रह्म याने | ब्रह्मयाने |
| १०९ | आपला मंत्र | अपला मंत्र |
| ११५ | माते रामजाविति | माते समजाविति |
| ११६ | सुर–सत–हित | सुर–संत-हित |
| ११७ | सुषमा–कद | सुषमा–कंद |
| ११८ | लक्ष्मण–धाम | लक्षण–धाम |
| १२२ | घति सवे मित्रा | घेति सवें मित्रा |
| १२३ | जाता व लगे वार | जातां न लगे वार |
| १२४ | जननि-भवनि गले प्रभु | जननि–भवनि गेले प्रभु |
| १२६ | प्रभु | प्रभु |
| १२६ | रावणारिपु | रावणरिपु |
| १२७ | उपधिदेहपुर | उपविदेहपुर |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १२९ | घाडि भूप | धाडि भूप |
| १३० | रघुवशमणि | रघुवंशमणि |
| १३२ | अशि अति आति | अशि अति आर्ति |
| १३८ | बघुनि कां घ्याना | बघुनि कां घ्याना |
| १३८ | मिषें फिरत | मिषें फिरते |
| १३८ | शोभा–गण–खाणी | शोभा-गुण–खाणी |
| १४० | सीता–वदन सम | सिता–वदन सम |
| १४१ | बघु धनुमख शाले | बघु धनुमखशाले |
| १४६ | ब्रीदावलि वणित | ब्रीदावलि वर्णित |
| १५१ | मीन युग जन विधुमंडल | मीन युग जणु विधुमंडल |
| १५३ | वदी–मागध | बंदीं–मागध |
| १५६ | बहु–दर | बहुतर |
| १५६ | शिव्या दति | शिव्या देति |
| १५८ | भजबळे | भुजबळें |
| १६२ | अवनिप–रववि | अवनिप- रमणी |
| १६३ | मुनिवेषें यतां | मुनिवेषें येता |
| १६४ | जो समय तुम्हां ही | जो सभय तुम्हां ही |
| १६४ | दहन–कृशान् | दहन–कृशान् |
| १६६ | घाला मडप | घाला मंडप |
| १६६ | बंधहि खचले | बंधहि रचले |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १६९ | सुखधूर्णित | सुखघूर्णित |
| १७१ | सजुनि दुनि दामिनि | सजुनि दुति दामिनि |
| १७१ | जणु भरे चोंकडे | जणुं भरे चौंकडे |
| १७३ | गुरु–आज्ञा घेउति | गुरु–आज्ञा घेउनि |
| १७६ | सुत हृदि धरित | सुत हृदि धरत |
| १७९ | निशाणीं धाव घातला | निशाणीं घाव घातला |
| १८५ | मत्त–कुजर–गामिनी | मत्त–कुंजर–गामिनी |
| १८९ | कामदुघांसी | कामदुधांसी |
| १९२ | कुमर ते आले | कुमर तैं आले |
| १९३ | निमत्रण | निमंत्रण |
| १९५ | कितिदां अलिंगति | कितिदां आलिंगति |
| १९५ | म्हणति निमि कां | म्हणति निर्मि कां |
| १९५ | घण्यासाठी | घेण्यासाठिं |
| १९६ | भप अयोध्ये | भूप अयोध्ये |
| २०० | विपणि सुजाजित | विपणि सुसाजित |
| २०१ | सुभग तर | सुभग तरु |
| २०३ | सूत चारी | सुत चारी |
| २०६ | पलग घालुनि | पलंग घालुनि |
| २०७ | मणि–मर्दिरि | मणि–मंदिरि |
| २१० | श्रीमद्रामचि तमानसे | श्रीमद्रामचरितमानसे |
| २१४ | गताभिषेकत | गताभिषेकतः |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| २१८ | भूषणें भरि लाभले | भूषणें भूरि लाभले |
| २१९ | मगल-मूल | मंगल-मूल |
| २२४ | सांगनी | सांगुनी |
| २२८ | नयन-मुख-मुरडनि | नयन-मुख-मुरडुनि |
| २३२ | नारिमिष | नारिमिषें |
| २३६ | सलिल तब भली | सलिल सब भली |
| २३७ | त्यजुनि वच न मम | त्यजुनि वचन मम |
| २४५ | निरखि तमोरी | निरखि तमारी |
| २४७ | शरदचद | शरदचंद |
| २४८ | प्याण | प्राण |
| २५० | प्रबाधिती | प्रवोधिती |
| २५० | विकल मख | विकल, मुख |
| २५२ | आज्ञा घण्या | आज्ञा घेण्या |
| २५९ | सच्चिदानंदमय कद | सच्चिदानंदमय कंद |
| २६० | चरण दावि | चरण दाबि |
| २६१ | सुमन सुगधि | सुमन सुगंधि |
| २७० | मुदित मुनिस निघतात | मुदित नमुनि मुनिस निघतात |
| २७७ | असा आनदू | असा आनंदू |
| २८० | कसे न वदां | कसं न वदा |
| २८२ | स्वाप जागृती शरण | स्वप्न जागृतीं शरण |
| २८५ | प्रभु-पाय | प्रभु-पाय |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| २८९ | बृद्धी | वृद्धि |
| २९१ | इदु | इंदु |
| २९२ | प्रभू–आज्ञेस | प्रभु–आज्ञेस |
| २९४ | प्त्रियावचें | प्रियावचें |
| २९८ | उसपले | उपसले |
| ३०० | कुसुमर्यि | कुसमर्यि |
| ३०२ | उठ्नी | उठ्नी |
| ३२० | म्लानि करिति | ग्लानि करिति |
| ३२२ | देह्घर | देह्धर |
| ३२३ | चकार कैरव | चकोर कैरव |
| ३२३ | अदूषित रोषे | अदूषित दोषे |
| ३२३ | संकोच-वच | संकोच–वश |
| ३२४ | मनिं सोधले | मनिं शोधलें |
| ३२६ | अणुराग देह्धर | अनुराग देह्धर |
| ३३२ | बधुभीड | बंधुभीड |
| ३३२ | प्रीति सर्वि | प्रीति सर्वि |
| ३३३ | मोह्वश हाती प्रगटति | मोह्वश होत प्रगटति |
| ३४४ | इधन–पत्र–मित्र | इंधन–पत्र–मित्र |
| ३४७ | एक वदन संकोच | एक वदत संकोच |
| ३५२ | कामघेनुशत | कामधेनुशत |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ३५३ | समुख विमुख | संमुख विमुख |
| ३५३ | नहि सदेहा | नहि संदेहा |
| ३५६ | रघुनदन संकोचती | रघुनंदन संकोचती |
| ३६१ | विधमति भोळी | विधिमति भोळी |
| ३६२ | मुनि योगसिद्ध तंव | मुनि योगिसिद्ध तव |
| ३६४ | मनीं स्वप्ना ना | मनीं स्वप्नीं ना |
| ३७१ | महिसुर-मत्री | महिसुर-मंत्री |
| ३७२ | मरत स्वभाव | भरत स्वभाव |
| ३७४ | खग मृत सर | खग मृग सर |
| ३७५ | गत जथें रघुराव | गत जेथें रघुराव |
| ३७८ | दीनवधु हे वंधुवच | दीनबंधु हे बंधुवच |
| ३८० | वधु युग | वंधु युग |
| ३८२ | अवघी–आस | अवधी–आस |
| ३८३ | प्रशंसिति | प्रशंसिति |
| ३८३ | प्रभू खडावा | प्रभु खडावा |
| ३८४ | सिताराम–पदि होइ नक्कि | सिताराम–पदिं प्रेम-होइ नक्कि |
| ३८४ | श्रीमद्रामचरिन मानसे | श्रीमद्रामचरित मासेन |
| अरण्यकांड | | |
| चित्राखालील | मार्गिच अचल | मार्गिच अचल |
| ३८८ | पीताम्बरं सुन्दरं | पीताम्बरं सुन्दरं |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ३८८ | राजौवायत–लोचनं | राजीवायत–लोचनं |
| ३९० | प्रभु आसनिं | प्रभु आसनिं |
| ३९० | प्रफुल्ल कंज–लोचनं | प्रफुल्ल कंज–लोचनं |
| ३९० | प्रलंब बाहु | प्रलंब बाहु |
| ३९० | ८ भोऽप्रमेय | प्रभोऽप्रमेय |
| ३९१ | शची–पति–प्रियानुजं | शचि–पति–प्रियानुजं |
| ३९४ | जानकी–सगा | जानकी–संगा |
| ३९६ | मार्गिच अचल | मार्गि अचल |
| ३९८ | मार्गि कथित | मार्गि कथित |
| ४०४ | एका, जन्मामधे | ऐका, जन्मामधे |
| ४०५ | बहु भज–मुंड | बहु भुज–मुंड |
| ४०५ | कट्कटति काठण कराल | कट्कटति कठिण कराल |
| ४०६ | प्रभु बघुनी | प्रभु बघुनी |
| ४०७ | त्याचें भुजबळ | त्यांचे भुजबळ |
| ४२५ | बोध यथार्तंहि | बोध यथार्थंचि |
| ४२७ | प्रतितरुकुरग | प्रतितरुकुरगं |
| ४२८ | सद्धर्म वर्मौ | सद्धर्म वर्मौं |
| ४२८ | न भजसि मन मद | न भजसि मन मंद |
| ४२९ | ते सुख उभे वर्णु | ते सुख उमे वर्णु |
| ४३१ | ज्याची अशौ मति | ज्याची अशी मति |
| ४३१ | कृपासिधु बलशीव | कृपासिंधु बलशीव |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ४३३ | जहा प्रसादा | जया प्रसादा |
| ४३५ | ज्या योनि क्रमे जन्म | ज्या योनि कर्मे जन्म |
| ४३६ | ग्रभु वदले | प्रभु वदले |
| ४३६ | प्रीष्म विगत | ग्रीष्म विगत |
| ४३९ | निघात मुदित | निघति मुदित |
| ४४१ | हा गुण साधना करुनि | हे गुण साधन करुनि |
| ४४२ | अशी चर्चा चालता | अँशी चर्चा चालता |
| ४४२ | दृष्ट उभे म्यां | दृष्ट उमे म्यां |
| ४४३ | बक मल्लक उडती | बक मल्लिक उडती |
| ४४३ | पुसत वृत्तांतहि | पुसता वृत्तांतहि |
| ४४७ | प्रभु बलिबघनि | प्रभु बलिबंधनि |
| ४५१ | आञ्जनेयं कपी शम् | आञ्जनेयं कपीशम् |
| ४५२ | यदनुग्रह–भानुकैरर्दृश्यं | यदनुग्रह भानुकरैर्दृश्यं |
| ४५२ | शाश्वतमप्रेमयमनघं | शाश्वतमप्रमेयमनघं |
| ४६० | अर्थ पांसुनी कथा | अथ पासुनी कथा |
| ४६४ | ब्रह्मबाण तो कपिला भारी | ब्रह्मबाण तो कपिला मारी |
| ४६४ | हत नि शिचर | हत निशिचर |
| ४६४ | यद्वल | यद्बल |
| ४६७ | सादृहास कपि गर्जे | साट्टहास कपि गर्जे |
| ४६८ | पुसत वटत | पुसत वदत |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ४७६ | होइ म खास | होइ न खास |
| ४७९ | तोंवरि जौवा कुशल | तोंवरि जीवा कुशल |
| ४७९ | जों न राम मजतो | जों न राम भजतो |
| ४७९ | अतां कुशल, य भारि | अतां कुशल, भय भारि |
| ४८६ | जळति जंतु, ज जलनिधि | जळति जंतु, जैं जलनिधि |
| ४९० | शखन्द्वाभमतीवसुंदर–तनुं | शंखेन्द्वाभमतीवसुंदर–तनुं |
| ४९० | कन्दर्पह शंकरम् | कन्दर्पहं शंकरम् |
| ४९० | यो ददाति मता शंभु: | यो ददाति सतां शंभु: |
| | कवल्यमपि दुलभम् | कैवल्यमपि दुर्लभम् |
| ४९० | शकर: शं | शंकर: शं |
| ४९१ | चे कपि निकरा | घे कपि निकरा |
| ४९५ | न पुरे पड या | न पुरे पडे या |
| ४९६ | कटु भेषन जैसे | कटु भेषज जैसे |
| ४९८ | रामशर य आश्रयी निषग | रामशर ये आश्रयीं निषंग |
| ४९८ | सभा सशक सब | सभा सशंक सब |
| ४९८ | सतत शुभ | संतत शुभ |
| ४९८ | छंत्र मुकुंट ताटक तैं ताडी | छत्र मुकुट ताटक तैं तोडी |
| ४९८ | ज्जैं | जैं |
| ४९८ | सभा सशक सब | सभा सशंक सब |
| ४९९ | रघुवोर पद | रघुवीर पद |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ५०० | प्र उपदिं ठेवी | प्रभुपदिं ठेवी |
| ५०३ | धर्मव्रतधारी भर बुडुनी | धर्मव्रतधारी मर बुडुनी |
| ५१२ | धरौ रामपद कंज | धरी रामपद कंज |
| ५१४ | पहाट जाणनि | पहाट जाणुनि |
| ५१५ | तोमर मुग्दर | तोमर मुद्गर |
| ५१५ | परशू चड हि | परशू चंड हि |
| ५१९ | कपदळि | कपिदळी |
| ५२४ | ये सुषण नमि | ये सुषेण नमि |
| ५२८ | लक्ष्मण हृषित | लक्ष्मण हर्षित |
| ५२८ | कुभकर्ण | कुंभकर्ण |
| ५३१ | मग य | मग ये |
| ५३१ | राजीवाक्ष कृपाळू | राजीवाक्ष कृपाळ |
| ५३२ | निघुनि शिर फिरती | निघुनि शर फिरती |
| ५३२ | महानद करि गर्जे | महानाद करि गर्जे |
| ५३५ | जर्जर–वन | जर्जर–तन |
| ५३८ | उचलुनो | उचलुनी |
| ५४५ | जय जय करुणानिधि | जय जय जय करुणानिधि |
| ५४६ | जणुं तौर तरु | जणुं तीर तरु |
| ५४६ | प्रत भूतें, | प्रेत भूतें |
| ५४७ | रामबल–दपे युत | रामबल दर्पे युत |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ५५२ | कपि सभेत उडाला | कपि समेत उडला |
| ५५२ | रघुवीर चितुनी धीर | रघुवीर चितुनि धीर |
| ५५४ | दर्पे धनु | दर्पे धनू |
| ५५४ | मूढ न भरत तुटत | मूढ न मरत तुटत |
| ५५१ | बघनी निशा रंथि | बघुनी निशा रथीं |
| ५५७ | तो पाखड | तो पाखंड |
| ५५९ | उभे यदिच्छे | उमे यदिच्छे |
| ५५९ | श्रक्त कृपालु | श्रवत कृपालु |
| ५५९ | एवतीस | एक्तीस |
| ५५९ | दुखड | दुखंड |
| ५६० | जय कृपाकद | जय कृपाकंद |
| ५६० | ज णुं | जणुं |
| ५६० | भुजदडि | भुजदंडि |
| ५६१ | गणिला मनु जसम | गणिला मनुज राम |
| ५६२ | शुभं ही कीर्ति | शुभ ही कीर्ति |
| ५६४ | (नीट उठलेले नाही.) | जर मनवच कृति |
| ५६५ | प्रभुचरित | प्रभुचरित |
| ५६५ | प्रभुशोभा | प्रभुशोभा |
| ५६६ | विभुं विरजं | विभुं विरजं |
| ५६७ | सदा शुभदा | सदा शुभदं |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ५६७ | उभे ! मुक्त | उमे ! मुक्त |
| ५६८ | स्वाभिमान | स्वभिमान |
| ५६९ | प्रियवाक् | प्रियवाक् |
| ५७० | वारिधिमंदश | वारिधिमंदर |
| ५७१ | सखे विषभिण | सखे बिभीषण |
| ५७२ | प्रभु-आज्ञे | प्रभु-आज्ञें |
| ५७२ | निनिमेष | निर्निमेष |
| ५७२ | सुसस्वर | सुसत्वर |
| ५७४ | प्रभ | प्रभू |
| ५७४ | प्रभु=आज्ञा | प्रभु–आज्ञा |
| ५७४ | मुद्रित मन | मुदित मन |
| ५७५ | श्री र घुनाथ–नामविण | श्रीरघुनाथ–नामविण |
| ५७८ | शान्ती | शान्ति |
| ५८२ | सुरमति | सुरमुनि |
| ५८३ | कृपानिधी | कृपानिधि |
| ५८३ | तैं | तैं |
| ५८३ | ॥ ५ ॥ | ॥ |
| ५८४ | विलोकिती | विलोकिति |
| ५८५ | मभ | मम |
| ५८५ | हर्षे | हर्षें |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- |
| ५८६ | सकलाहि | सकलहि |
| ५८६ | अगळे | सगळे |
| ५८६ | हर्षें यति | हर्षे येति |
| ५८८ | जाण | जाणे |
| ५८८ | दुःख विनाश | दुःख–विनाश |
| ५८८ | कर्मैं | कर्मे |
| ५८९ | सुर. दुर्लभ | सुर–दुर्लभ |
| ५९० | ताप भयाकुल | ताप–भयाकुल |
| ५९१ | हर्षैं | हर्षे |
| ५९१ | सुरसुर्लभ | सुरदुर्लभ |
| ५९६ | रस वह | रस–वह |
| ५९६ | सेवाविधि गुणी | सेवाविधिगुणी |
| ६०० | मुगयुथ | मुगयूथ |
| ६०३ | मडण | मंडण |
| ६०३ | वदसा | वदला |
| ६०४ | दुख | दुःख |
| ६०५ | त्यगिति | त्यागिति |
| ६०७ | पाहूनि | पावुनि |
| ६१० | पढनि | पढूनि |
| ६११ | चरण अनुरागी | चरण–अनुरागी |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ६१२ | तोही | तेही |
| ६१२ | धर्मव्रत धारी | धर्मव्रत-धारी |
| ६१३ | सभ्यक | सम्यक |
| ६१५ | श्रणु | श्रुणु |
| ६१७ | सत्संगत | सत्संग न |
| ६१९ | परत्मोसाह | परमोत्साह |
| ६२० | सभेत | समेत |
| ६२६ | नूपूर | नूपुर |
| ६३० | नयने | नयन |
| ६३२ | भ्यां | म्यां |
| ६३३ | सागुं | सांगु |
| ६३३ | भरवंसा | भरंवसा |
| ६३३ | उठुनि | उठुनी |
| ६३७ | सुशिल | सुशील |
| ६३८ | वर्णीं | वर्णी |
| ६४० | सूर | सुर |
| ६४१ | य | ये |
| ६४२ | मनुजा | मनुजा । |
| ६४३ | करति | तरति |
| ६४५ | धन | धन |

| पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ६४६ | निर्गृणं | निर्गुणं |
| ६४६ | गिराज्ञानगोतीतशं | गिराज्ञानगोतीतमीशं |
| ६४६ | नीलकंठ | नीलकंठ |
| ६४७ | रुद्रष्टक | रुद्राष्टक |
| ६५० | आसनि | आसीन |
| ६५१ | द्वैत्यबुद्धिविण | द्वैतबुद्धिविण |
| ६५६ | सुटे, न | सुटे न, |
| ६५७ | मिळुनि | मिळुनी |
| ६६१ | प्रार्णि | प्राणी |
| ६६४ | कृत्यकृत्य | कृतकृत्य |
| ६६७ | उद्धिरली | उद्धिरली |
| | शंभ | शंभु |
| ६६८ | जानित | जनित |
| | यत्पुर्वं प्रभुणा | यत्पूर्वं प्रभुणा |

❖ ❖ ❖

॥ श्रीरामाय नमः ॥

# श्रीरामचरितमानस

## ( मराठी )

### बालकाण्ड



## मायामुक्त नारद



मुनि सभीत अति धरि हरि चरणा ।
पाहि ! वदे प्रणतार्ती हरणा ।।

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# ॥ श्रीरामचरितमानस ॥

## ( मराठी )

## ॥ प्रथम सोपान ॥

### ( बालकाण्ड )

❖ ❖ ❖

अध्याय १ ला

### अनुवादक–कृत मंगलाचरण

आर्या :–श्रीरामनाम-महवित् पूज्याग्र्यो विघ्ननाशको देवः ॥
तं गणनाथं वन्दे हंसारूढां च शारदां रसदाम् ॥१॥
श्रीरामभक्तवंद्यं रघुपतिभक्तार्तिनाशनं धीरम् ॥
वन्दे रघुवीरनुतं शरणागतरक्षकं महावीरम् ॥२॥
शरदंबराभनीलं शरत्सरोरुहसुरम्यमुखकञ्जम् ॥
रामं विधिशिववन्द्यं वन्दे वाल्मीकिविमलवागीड्यम्॥३॥

आद्यकवेरवतारं भवतारकरामचरितविस्तारम् ।।
कामारिप्रियभक्तं तुलसीदासं नमामि साष्टाङ्गम् ।।४।।
यस्याशीर्वादघनो मानसगूढार्थवृष्टिना हृदयम् ।।
सततं प्लावयतीदं गंगादासं नमामि भक्त्या तम् ।।५।।

व० ति० :--यत्पादपङ्कजपरागपवित्रमौलि--
भूयो न पश्यति नरो जठर जनन्याः ।।
त वासुदेवमजमीशमनंतबोधम् ।।
श्रीमद्गुरुं शरणदं प्रणतोऽस्मि नित्यम् ।।६।।

अनुष्ठुभ् :--तुलसीमंजरीशुद्धा रामभ्रमरभूषिता ।।
रामाज्ञया स्वभाषायां प्रज्ञानेनाऽनुवाद्यते ।।७।।

## मूळ मंगलाचरण

वर्णानामर्थसङ्घानां रसानां छंदसामपि ।।
मंगलानां च कर्तारौ वन्दे वाणी–विनायकौ ।।१।।
भवानी–शङ्करौ वन्दे श्रद्धा–विश्वासरूपिणौ ।।
याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धाः स्वान्तस्थमीश्वरम् ।।२।
वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शङ्कररूपिणम् ।।
यमाश्रितो हि वक्रोऽपि चन्द्रः सर्वत्र वन्द्यते ।।३।।
सीतारामगुणग्राम–पुण्यारण्य–विहारिणौ ।।
वन्दे विशुद्धविज्ञानौ कवीश्वर कपीश्वरौ ।।४।।

उद्भव–स्थिति–संहारकारिणीं क्लेशहारिणीम् ॥
सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम् ॥५॥

शा०वि०–यन्मायावशवर्ति विश्वमखिलं ब्रह्मादिदेवाऽसुरा।
यत्सत्वादमृषेव भाति सकलं रज्जौ यथाऽहेर्भ्रमः ॥
यत्पादप्लव एक एव हि भवाम्बोधेस्तितीर्षावताम् ।
वन्देऽहं तमशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम् ॥६॥

व० ति०:––नाना–पुराण–निगमागम–संमतं यद् ।
रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि ॥
स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथ–गाथा ।
भाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति ॥७॥

सो०–स्मरत सिद्धि दे तूर्ण गणनायक करिवरवदन ॥
करो कृपा तो पूर्ण बुद्धिराशि शुभगुणसदन ॥मं० १॥
मूक होइ वाचाल पंगु चढै गिरिवरि गहन ॥
कृपया यस्य दयाल द्रवु तो सब कलि-मल-दहन ॥मं० २॥
नील-सरोरुह-शाम तरुण-अरुण-वारिज-नयन ॥
करो हृदयि मम धाम सदा क्षीर-सागर-शयन ॥मं० ३॥
कुंद-इंदु-सम देह उमारमण करुणायतन ॥
जो करि दीनों स्नेह करो कृपा मर्दन मदन ॥मं० ४॥
वंदे गुरुपद-कंज कृपासिंधु नररूप हर ॥
महामोहतमपुंज यद्वचनें रविकर-निकर ॥मं० ५॥

चौ०–वंदे गुरु–पद–पद्म-परागा। सुरुचि–सुवास सरस–अनुरागा ॥
अमृत–मुळीमय चूर्ण सुचारू। शमन सकल भवरुज परिवारू ॥
सुकृति शंभुतनु विमल विभूती। मंजुल मुद–मंगला प्रसूती ॥
जन–मन–मंजु–मुकुर–मलहरणी। करत तिलक गुणगण वशकरणी ॥
श्रीगुरु-पद नख-मणि–गण–जोती। स्मरतां दिव्य-दृष्टि हृदिं होती ॥
दलन मोहतम सुप्रकाश तो। महाभाग्य ज्या हृदयीं पडतो ॥
हृदय-विलोचन विमल उघडती। दु:ख दोष भवशार्वर झडती ॥
रामचरित–मणि–माणिक दिसती। प्रगट गुप्त जिथं जे खनि असती ॥

दो०–नेत्रिं सु-अंजन घालितां साधक सिद्ध सुजाण ॥
वनिं पर्वतिं कौतुकिं बघति भूतळि भूरि निधान ॥१॥

गुरुपद–रज मृदु मंजुल अंजन। नयनामृत दृग्–दोष–विभंजन ॥
तत्कृत विमल विवेक–विलोचन। वर्णिन रामचरित भवमोचन ॥
वंदे प्रथम महीसुर–चरणां। मोहजनित सब संशय–हरणां ॥
सुजन समाज सकल गुण–खाणी। करतो प्रेमें प्रणति सुवाणीं ॥
साधु-चरित शुभ्र चरित कपासी। निरस विशद गुणमय फल ज्यासी ॥
दु:ख सहुनि परछिद्रां झांकति। जेणें जगतिं वंद्य यश पावति ॥
मुद–मंगलमय संत– समाजहि। जो जगिं जंगम तीर्थराज ही ॥
रामभक्ति जिथं धार भागिरथि। ब्रह्मविचार प्रचार सरस्वति ॥
विधिनिषेधमय कलिमल–हरणी। कर्मकथा ती भानुनन्दनी ॥
वेणी हरिहर-कथा विराजे। श्रवत सकल मुद–मंगलदा जे ॥

वट विश्वास अचल निजधर्मा । गणा तीर्थपति-माज सुकर्मा ।।
सकल सुलभ सब दिन सब देशां । सादर सेवत शमवी क्लेशां ।।
अकथ अलौकिक तीर्थराज हा । उघडा महिमा सद्य फलद हा ।।

**दो०-परिसुनि समजति मुदित मन मज्जति अति अनुरागिं ।।**
**लाभ चारि फल या तनूं साधुसमाज-प्रयागिं ।।२।।**

मज्जन फल तत्काल पहावें । बकें हंस पिक काकें व्हावें ।।
ऐकुनि कुणि विस्मय ना माना । गुप्त संत-संगतिमहिमा ना ।।
वाल्मीकी – नारद – घटजांनी । निज होणें कथिलें स्वमुखांनीं ।।
स्थलचर जलचर नभचर नाना । जीवां जगिं चेतनां जडानां ।।
मति गति भूति भलेपण कीर्ती । जैं ज्या जेथें प्राप्त जशीं तीं ।।
तो सत्संगति – महिमा जाणा । लोकीं वेदिं उपाय दुजा ना ।।
विण सत्संग विवेक न होतो । रामकृपेविण सुलभ न हो ! तो ।।
सत्संगति मुद –मंगल – मूलहि । ती फल सिद्धि साधनें फूलंहि ।।
सुधारती शठ सुसंग पावुनि । लोहिं हेमता परीस लागुनि ।।
विधिवश सुजन कुसंगीं पडती । निजगुण फणिमणि सम अनुसरती ।।
विधि-हरि-हर कवि कोविद वाणी । लाजे साधू–महिमा गानीं ।।
तो मजला वदवेलच कैसा । शाकविक्या मणिगुणगण जैसा ।।

**दो०–वंदे संतसमान मन हित अनहित ना कोणि ।।**
**अंजलिगत शुभ सुमनं जशि सम सुगंध कर दोनि ।।३ रा।।**
**संत ! सरल-मन जगत-हित स्नेहशील जाणून ।।**
**रामपदीं द्या रति कृपें बाल–विनति ऐकून ।। ३ म ।।**

अथ वन्दे सद्भावें खलगण। दक्षिणास जे वाम अकारण ।।
परहितहानि लाभ त्यां वाटत। हर्ष विनाशि विषादहि नांदत ।।
हरिहर–यश–राकेशा राहू। पर-अकाजि भट सहस्र-बाहू ।।
परदोषां लक्षिति सह साक्षी। पर-हित-घृति यांचे मन माशी ।।
तेजि कृशानु रोषि महिषेश्वर। अघ-अवगुण-धन-धनी धनेश्वर ।।
सर्वां हितकर उदय केतु सम। कुंभकर्ण सम निजतां उत्तम ।।
परिहरती तनु परापकारा। पीक विनाशूनि वितळति गारा ।।
वंदे खल–शेषास सरोषा। वर्णी सहस्रमुखि परदोषां ।।
पुन्हां प्रणति पृथुराज–समाना। पर अघ ऐके शतशत-कानां ।।
पुन्हां शक्रसम विनवि तयातें। संतत सुरानीक हित ज्यातें ।।
प्रीती संतत वचनवज्रि ज्या। सहस्राक्षि परदोष निरखि त्या ।।

**दो०–उदासीन-अरि-मित्र-हितश्रवणि जळति खलरीति ।।**
**जाणुनि करयुग जोडुनी दास विनवि सप्रीति ।। ४ ।।**

मी आपल्यापरि केली विनंती । घेति चुकुन ते ध्यानिं कधि न ती ।।
प्रेमें वायस फार पाळले। काक निरामिष कधीं जाहले ।।
वंदे संत असंत पदांही। दुःखद उभय भेद परि कांहीं ।।
हरुनि वियोगीं प्राणां नेती। एक मिळत दारुण दुख देती ।।
उभय जगामधिं सर्व उपजतां। जलज जळू जशि गुणीं विषमता ।।
सुधा सुरासम साधू असाधू। जनक एक जग-जलधि अगाधू ।।
भले बुरे निज निज कर्तूनीं। घेती कीर्ति अकीर्ति विभूति ।।

सुधा सुधाकर सुरसरि सज्जन । गरल अनल कलिमलसरि दुर्जन ॥
गुण अवगुण सगळेच जाणती । जो ज्या रुचे श्रेष्ठ तो गणती ॥

**दो०—भल्या भलेपण लाभतें नीचत्वहि नीचास ॥**
**सुधाप्रशंसा अमरतें मरणें स्तुति गरळास ॥ ५ ॥**

खल-अघ-अगुण साधु-गुण वर्णन । दोन अपार पयोधिच ठाव न ॥
म्हणुन अल्प गुण दोष वानले । त्याग न संग्रह विना जाणले ॥
बऱ्यां वाइटां विधिनें सृजिलें । गणुनि दोष गुण वेदिं निवडिले ॥
श्रुति-इतिहास-पुराणिं निवेदित । विधीप्रपंच गुणागुण-मिश्रित ॥
दुख सुख पाप पुण्य दिनराती । साधु असाधु सुजाति कुजाती ॥
दानव देव नि उच्च नीच पण । विष पीयूष मरण संजीवन ॥
माया ब्रह्म जीव जगदीश्वर । लक्ष्मि अलक्ष्मि रंक अवनीश्वर ॥
काशि मगध सुरसरि क-विनाशी । मरु मालव महिदेव गवाशी ॥
स्वर्ग नर्क अनुरक्ति विरक्ती । निगमागमिं गुणदोष-विभक्ती ।

**दो० :— जडचेतन गुणदोषमय कर्ता निर्मि जगास ॥**
**संत हंस गुण घेति पय त्यजुनि जला दोषास ॥ ६ ॥**

देइ विधाता विवेक हा जैं । गुणिं हि रमे मन त्यजि दोषा तैं ॥
काळ कर्म नो स्वभाव दडपणि । भले प्रकृतिवश चुकति भलेपणि ॥
ती घे हरि जन-चूक सुधारुनि । देइ सुयश दुखदोष निवारुनि ॥
करिती खलहि भलें सत्संगें । तरी स्वभाव मलिन ना भंगे ॥
बघुनि सुवेषहि जगवंचक जे । वेषबलें पुजिलेहि जाति ते ॥

बेंड फुटे अंति न निर्वाहू । कालनेमि रावण इव राहू ।।
सन्मानहि कृत-कुवेष संतां । जगिं सम जांबवता हनुमंता ।।
हानि कुसंगीं लाभ सुसंगमिं । लोकीं सकल विदित निगमागमिं ।।
चढे पवनसंगति रज गगनीं । होइ चिखल नीचग-जल-मिलनीं ।।
सज्जन-खल-गृहिं शुक साळुंक्या । राम वदति मुखि शिव्या शेलक्या ।।
धूम काळिमा कुसंगि बनतो । लिहिति पुराण शाइ जें शुभ तो ।।
तो जल-अनल-अनिल संघातां । होइ जळद जग-जीवन-दाता ।।

**दो०—ग्रह भेषज जल पवन पट मिळुनि कुयोग सुयोग ।।**
**होति कुवस्तु सुवस्तु जगिं बघति सुलक्षण लोक ।। ७ रा ।।**
**नाम भेद विधि पक्षि करि सम तम जरी प्रकाश ।।**
**शशि पोषक शोषक गणुनि दे जगिं यश-अयशास ।। ७ म ।।**
**जगिं जडचेतन जीव सब राममयचि जाणून ।।**
**सर्व-पदाब्जां वंदितो सदा करां जोडून ।। ७ चं ।।**
**देव दनुज नर नाग खग प्रेत पितर गंधर्व ।।**
**नमतो निशिचर किंनरां कृपा करा तरि सर्व ।। ७ द्र ।।**

## अध्याय २ रा

आकरिं चारि लाख चवऱ्यांशी । विविध जीव भू-जल-नभ-वासी ।।
सितासाममय सव जग जाणुनि । करतो प्रणति पाणियुग जोडुनि ।।
मजसि कृपाकर-किंकर समजुनि । कृपा करा सर्वहि छल विसरुनि ।।

मज निजमति बल निश्चित नाहीं । म्हणुन विनविता सर्वांनाही ॥
मज इच्छा रघुपति-गुण-गानीं । चरित अगाध नि मम मति सानी ॥
नुमजें अंगा एक उपाया । मन मति रंक मनोरथ राया ॥
मति अति नीच उच्च चि रुचिरहि । अमृत इच्छि जगिं मिळत तक्र नहि।
सज्जन मम उद्धटता क्षमतिल । मन लावुन शिशु-शब्द ऐकतिल ॥
बोल बोबडे बालक बोलति । माता पिता मुदित-मन ऐकति ॥
क्रूर कुटिल हसतिल कुविचारी । जे पर - दूषण - भूषण - धारी ॥
प्रिय निज काव्य न कोणा गमतें । असो सुरस वा अति नीरस तें ॥
हर्षति परिसुनि परकाव्यःाही । ते वर पुरुष न बहु जगिं काहीं ॥
बहु नर सरसरिसम जगिं राहति । जे निज जल-वृद्धिनेंच वाढति ॥
सज्जन सकृत सिंधुसम कोणी । ज्यास वृद्धि विधु पूर्ण बघोनी ॥

**दो०—भाग्य अल्प अभिलाष अति एक असे विश्वास ।**
**श्रवणें संत सुखावती खल करितिल उपहास ॥ ८ ॥**

खल परिहासें हित मम थोरचि । काक कथिति कलकंठ कठोरचि ॥
हंसा बक चातकास वाघुळ । विमल कथेला हसति मलिन खळ ॥
रति न रामपदिं काव्यरसिक नहि । कथा हास्यरस सुखद तयांसहि ॥
मम मति भोळी प्राकृत रचना । हसण्या योग्य हसोत दोष ना ॥
ग्राहकशक्तिहि ना प्रभुपद-रति । कथा निरस ही श्रवणि तयांप्रति ॥
हरिहरपदरति मति न कुतर्की । त्यां ही रघुवरकथा मधुर कीं ॥
रामभक्तिभूषित मनिं जाणुनि । परिसति सुजन सुवाणीं वानुनि ॥

कवि न, वचनि मी नसे प्रवीणू । सकल कला सब विद्या हीनू ॥
नाना अर्थ अलंकृति अक्षर । विविधा छंद-प्रबंध सुंदर ॥
भावभेद रसभेदां पार न । काव्य दोष-गुण बहु, अठ्ठावन ॥
काव्य-विवेक न एकहि मातें । सत्य लिहीं नव-कागदि ह्यातें ॥

**दो०-मम रचना सबगुणरहित विश्वविदित गुण एक ॥**
**तो जाणुनि परिसति सुमति ज्यांमधि विमल विवेक ॥ ९ ॥**

यामधि रघुपति-नाम उदार । श्रुति-पुराण-अति-पावन-सार ॥
मंगलभवन अमंगलहारी । उमे सहित जें जपति पुरारी ॥
काव्य विचित्र सुकविकृत जेंही । रामनाम-विण शोभत नाहीं ॥
सर्वपरी भूषित विधुवदना । वर नारि न शोभे विण वसना ॥
सबगुण रहित कुकविकृत वाणी । रामनाम यश अंकित, गणुनी ॥
श्रवण कथन बुध करती सादर । संत गुणग्राही सम मधुकर ॥
यदपि काव्यरस यांत न एक हि । रामप्रताप आहे प्रगटहि ॥
ह्याच भरंवसा मम हृदयाला । कोण सुसंगि न मोठा झाला ॥
त्यजि धूम्रहि निज सहज कडूपण । अगरुसंगि करि सुगंध अर्पण ॥
भाषा ग्राम्य वस्तु भलि कथिता । रामकथा करि मंगल जगता ॥

**छंद-करि मंगला हरि कलिमला रघुनाथ-गाथा परम ही ।**
**गति काव्य-सरिते कुटिल जेवीं पुण्यपाथांची मही ॥**
**प्रभु-सुयश-संगति होइ कृति भलि सुजनमन-सुखदायिनी ।**
**भव-अंगि भूति मसाणिची ती स्मरत शोभन पावनी ॥ १ ॥**

दो०—प्रिय सकलां अति होइ मम काव्य रामयशरंगिं ॥
दारु-विचार किं करी कुणि वंदिति मलय-सुसंगिं ॥१०रा॥
श्याम सुरभि पय विशद अति गुणद करिति सब पान ॥
गिरा ग्राम्य सिय-राम यश ऐकति गाति सुजाण ॥१०म॥

मणि माणिक मुक्ता छवि जैसी । अहिगिरिगजशिरिं खुले न तैसी ॥
नृप-मुकुटीं तरुणीतनुं बसतां । लाभति कीं सौंदर्य—विपुलता ॥
तशीं सुकवि-काव्यें बुध वदती । उपजुनि इथें तिथें छवि लभती ॥
भक्तीस्तव विधि-भवना त्यागुनि । स्मरत शारदा येते धाउनि ॥
रामचरित-सरिं घडे स्नान ना । ते श्रम जाति न कोटि-साधनां ॥
कवि कोविद मनिं अशा विचारीं । गाती हरियश कलिमलहारी ॥
करतां प्राकृतजनगुणगानें । गिरा शिरा पिटि अनुतापानें ॥
हृदय सिंधु मति शुक्ति समाना । स्वाति शारदा गमे सुजाणां ॥
जर वर्षी वर वारि विचारू । होति काव्य—मुक्तामणि चारू ॥

दो०—ओविति वेधुनि युक्तिनें रामचरित वर ताग ॥
घालिति सज्जन विमल हृदिं शोभा अति अनुराग ॥११॥

जे जात किं कलिकालिं कराळीं । कृति काकांची वेष मराली ॥
गति कुपथीं श्रुति—पथा सांडिती । कपटकाय कलिपंक—भांडि तीं ॥
वंचक मिरविति रामभक्त वर । काम—कोप—कनकाचे किंकर ॥
अशांमधें जगिं गणा प्रथम मज । वृष धाण्याचा धिग् धर्मध्वज ॥
निज अवगुण वर्णिन जर सांगें । वाढे कथा पार ना लागे ॥

अल्पचि वर्णन केलें यास्तव । पारखि चतुर शितें भाता तंव ॥
परिसुनि बहुविध माझी विनंती । श्रवुनि कथा कुणि दोष न देती ॥
या ऊपर जे करिति अशंका । ते मजहुनि जड मति अति रंका ॥
चतुर न म्हणवित मी कवि नाहीं । गात यथामति राम-गुणांही ॥
कोठे रघुपतिचरित अपारहि । मम मति कुठें निरत संसार हि ॥
जो मारुत गिरि मेरु उडवितो । वदा तूल किति तया पुढति तो ॥
रामप्रभुता अमित, समजतां । कथा गानि मनि अति कातरता ॥

**दो०–शेष शारदा शिव विधि आगम निगम पुराण ॥**
**नेति नेति वदुनी करिति संतत यद्गुण-गान ॥ १२ ॥**

ती प्रभुची प्रभुता सब जाणति । परि वदल्याविण कोणि न राहुति॥
तिथें वेद हें कारण दावित । भजनीं विविधा प्रभाव भाषित ॥
एक अनीह अरूप अनाम । अज सच्चिदानन्द परधाम ॥
व्यापक विश्वरूप भगवंत । देह धरुनि कृत चरित अनंत ॥
करिति सकल हें भक्तालागीं । प्रणति कृपाल परम अनुरागी ॥
कृपा सु-ममता दासांवरती । करुनि कृपा जे क्रोध न करती ॥
गतप्रदायक दीन-दयाळहि । सरल सबल साहिब रघुराजहि ॥
हें जाणुनि वुध हरियश-वर्णन । करिति गिरा निज सुफल सुपावन॥
त्याच बळें रघुपति-गुण-गाथा । वदतो नमुनि रामपदिं माथा ॥
मुनिहीं हरियश कथिलें प्रथमहि । तो पथ धरतां मजला सुगमहि ॥

**दो०–भूप करविती सेतु जैं अति अपार सरितांस ॥**
**अति लघु मुंगिहि जातसे अश्रम परतीरास ॥ १३ ॥**

यापरि करुनि मना बल अर्पण । करिनहि रघुपति कथेस शोभन ।।
व्यासादिक कविपुंगवि नाना । कृत सादर हरि-सुयश वर्णना ।।
त्यांच्या मी नमितों पदकमलां । पुरवा मनोरथां मम सकलां ।।
कलियुग-कविनां करतों वंदन । जिहि वर्णित रघुपतिचे गुणगण ।।
जे प्राकृत कवि सुज्ञ अति भले । निजभावें जिहि हरियश लिहलें ।।
झाले जे होतिल जे असती । त्यजुनि कपट सकलां त्या प्रणती ।।
व्हा प्रसन्न हें द्या वरदान । साधु-समाजि काव्य-सन्मान ।।
जो प्रबंध बुध ना आदरिती । वृथा बालकवि ते श्रम करिती ।।
कीर्ति भूति कविता ती लायक । सुरसरि-सम सकलां हितकारक ।।
राम-सुकीर्ती भाषा बोजड । याच विषमतें वाटे हो ! जड ।।
कृपें आपुल्या मजहि सुलभ तें । रेशिम तरटावरहि शोभतें ।।
दो०–विमल कीर्ति कविता सरल सुज्ञ आदरिति तीस ।।
सहज वैर विसरूनि रिपु परिसुनि वानिति जीस ।। १४ रा ।।
तें न होइ विण विमल मति मम मतिबल लवभार ।।
करा कृपा हरियश वदें विनवित वारंवार ।। १४ म ।।
कवि कोविद रघुवरचरित-मानस मंजु मराल ।।
बाल-विनति ऐकुनि सुरुचि लक्षुनि कृपा कराल ।। १४ चं ।।
सो.-वंदे मुनि-पद-कंजु ज्यानीं रामायण रचित ।।
सखर सुकोमल मंजु दोषरहित दूषणसहित ।। १४ द्रा ।।

वंदे चारी वेद भववारिधि जहाजा-सदृश ।।
ज्यां स्वप्निहि ना खेद वर्णित रघुवर-विशद यश ।।१४य ।।
वंदे विधिपदरेणु भवनिधि निर्मिति, जेथुनिहि ।।
संत सुधा शशि धेनु प्रगटति खल विष वारुणिहि ।।१४न ।।
दो०-विनति जुळुनि कर, नमुनि बुध ग्रह सुर विप्र पदांस ।।
व्हा प्रसन्न पुरवा सकल शुभ मम मनोरथास।।१४मः।।

नमूं शारदा नी सुरसरिता । युगल पुनीत मनोहर-चरिता ।।
मज्जन पानि पाप हरि एका । श्रवणि कथनि दुजि हरि अविवेका
गुरुपितृमाय महेश-भवानी । प्रणमूं दीनबंधु दिनदानी ।।
स्वामि सखा सेवक सियपतिचे । हित निरुपधि सबपरीं तुलसिचे ।।
कलि पाहूनि जगहित गिरिजा हर । मंत्रजाल जिंहि सृजिलें शाबर ।।
अर्थ न वर्णमेळ, जप केवळ । महिमा प्रगट महेश-महाबळ ।।
ते उमेश अनुकूलहि मजला । करिति कथा मुद मंगल-मूला ।।
स्मरुनि शिव शिवा प्रसाद पावुनि । वदतो रामचरित मनिं हर्षुनि ।।
कवितां मम शिवकृपें विराजे । जणुं सोडुप-उडु सुनिशा भ्राजे ।।
जे स्नेहें ही कथा सांगतिल । सावधान समजुनी ऐकतिल ।।
होतिल रामचरण-अनुरागी । कलिमलरहित सुमंगल भागी ।।
दो०-जर हर गौरि पसाय कीं मजहि खरा स्वप्नांत ।।
जो प्रभाव कथिला, खरा हो प्राकृत काव्यांत ।।१५।।

❖ ❖ ❖

## अध्याय ३ रा

वंदु अयोध्यापुरी सुपावनि । सरयू–सरि कलि-कलुष-विनाशनि
पुन्हां प्रणमतो पुरनारीनर । प्रभु ममता थोडी ना ज्यांवर ॥
सिय-निंदक-अघ-ओघ नाशिले । शोक हरुनि निजलोंकि वसविले ॥
वंदे कौसल्या दिक् पूर्वा । सकल जगीं यत्कीर्ति अपूर्वा ॥
प्रगट जिथुनि रघुपति शशि चारू । विश्व-सुखद खलकमल-तुषारू ॥
दशरथ नृप सह राण्या सकला । गणुनि मूर्ति शुभ पुण्य मंगला ॥
नमन वाङ्‌मनें करांस जोडुनि । कृपा करा सुत–सेवक जाणुनि ॥
ज्यांस निर्मुनी धन्य विधाता । महिमा-सीम राम-पितृमाता ॥

**सो०–वंदुं अयोध्यापाल प्रेम सत्य ज्यां रामपदि ॥**
**विरहित दीनदयाल प्रिय तनु तृणसम परिहरिलि ॥१६॥**

प्रणमन परिजन सहित विदेहा । गूढ रामपदिं करि जो स्नेहा ॥
योग ठेविला भोगीं लपवुनि । प्रगट सपदिं तो रामा निरखुनि ॥
प्रणमीं प्रथम भरत चरणांनां । वर्णवे न यद्व्रत-नेमांनां ॥
यन्मन रामपदांबुजि राही । लुब्ध मधुपसें त्यजि न जराही ॥
वंदे लक्ष्मण पदजलजांते । शीतल सुभग भक्त-सुखदाते ॥
रघुपति कीर्ति-पताके विमले । ज्यांचें यश दंडासम बनलें ॥
शेष सहस्रशीर्ष जग-कारण । जो अवतरला भू-भय-दारण ॥
सदा प्रसन्न असो माझ्यावर । कृपासिंधु सौमित्रि गुणाकर ॥
रिपुसुदन-पदकमल नमामी । शूर सुशील भरत-अनुगामी ॥

महावीर विनवूं हनुमाना । स्वयें राम करि यद्यश-गाना ॥

**सो०—प्रणमूं पवनकुमार खल-वनपावक बोध-घन ॥**
**ज्याचें हृदयिं अगार करिति राम शर-चाप-धर ॥ १७ ॥**

कपि-पति रीस-निशाचर-राजा । अंगदादि सब कीश—समाजा ॥
वंदे शुभचरणीं सर्वांना । प्राप्त राम ज्या अधम तनूनां ॥
रघुपतिचरण—उपासक नाना । खग-मृग देव दनुज मनुजांना ॥
नमितो पदसरसिजि सर्वांचे । जे अकाम किंकर रामाचे ॥
शुकसनकादि भक्त मुनि नारद । जे मुनिवर विज्ञान विशारद ॥
नमुं सकलां शिर ठेवुं धरणिवर । करा कृपा जन जाणुनि मुनिवर ॥
जनकसुता जगजननि जानकी । कृपानिधान-प्रिय अतिशय कीं ॥
तिचे विनवितो युग-पद कमलां । जिचे कृपें मति पावुं निर्मला ॥
तन मन वचनि अतां रघुनायक । चरण-कमल वंदे सब लायक ॥
राजिवलोचन धृत-धनुसायक । भक्तविपद्—भंजक सुखदायक ॥

**दो०—गिरा अर्थ जलवीचि सम म्हणती भिन्न न भिन्न ॥**
**वंद्रे सीता-रामपद परम जयां प्रिय खिन्न ॥ १८ ॥**

वंदे नाम राम रघुवरचे । हेतु कृशानु भानु हिमकरचे ॥
विधिहरिहरमय वेद प्राण तें । अगुण अनूपम गुण-निधान तें ॥
महामंत्र जो महेश जपती । काशीं मुक्ति-हेतु उपदिशती ॥
महिमा जाणति गणपति नामी । प्रथम पूज्य हा प्रताप नामीं ॥
आदिकविह्नि तत्प्रताप जाणे । उलटा जपुनी विशुद्धि बाणे ॥

'नामसहस्रासम' शिववाणीं । जपुनि जेवि पतिसवें भवानी ।।
प्रेम हृदयि हेरुनि हर हर्षति । स्त्री स्त्रीभूषण भूषण बनवति ।।
शंभुस नामीं प्रताप सुविदित । काळकुटें फळ सुधा समर्पित ।।

**दो०—वर्षाऋतु रघुपति-भक्ति तुलसी शालि सुदास ।।**
**रामनाम—वरवर्णयुग श्रावण भादव मास ।। १९ ।।**

दोन्हि अक्षरें मधुर मनोहर । वर्ण विलोचन दास—जीव तर ।।
स्मरत सुलभ सकलां सुखदायक । लाभ लौकि परलोक-निभावक ।।
स्मरत वदत पारसत अतिशोभन । तुलसी-प्रिय सम राम नि लक्ष्मण ।।
वर्णंत वर्णीं प्रीति न टिकते । ब्रह्मजीव सम सखे सहज ते ।।
नर नारायण सम सुभ्राते । जग—पालक दासां सुत्राते ।।
भक्ति सुस्त्रि कल कर्ण-विभूषण । विश्वहितार्थ विमल विधुपूषण ।।
स्वाद-तोष सम सुगति सुधेचे । कमठ-शेष सम धर वसुधेचे ।।
जन मन कंज मंजु मधुकरसे । जोभ यशोदे हरि-हलधरसे ।।

**दो०—छत्र एक पर मुकुटमणि वर्ण-शिरीं बसतात ।।**
**रघुवर-नाम-वर्णयुग तुलसी विराजतात ।। २० ।।**

समजत सदृश नाम नी नामी । प्रीति उभयतां प्रभु-अनुगामी ।।
नामरूप युग ईश-उपाधी । अकथ अनादि विवेकी साधी ।।
गुरु लघु कोण वदत अपराधू । श्रवत भेद गुणि समजति साधू ।।
नामाधीन रूप परि राही । रूप-समज नामाविण नाहीं ।।
रूपविशेष, न नाम जाणतां । करतलगतहि, न ये ओळखतां ।।

रूप न दिसतां स्मरण नाम करि । स्नेहें हृदयीं रूप येत तरि ॥
नाम-रूप गति अकथ, कहाणी । समजत सुखद, न वदवे वाणीं ॥
अगुणीं सगुणीं नाम सुसाक्षी । उमां प्रबोधक चतुर दुभाषी ॥

**दो०-रामनाम मणि दीप धर जीभ देहलीं द्वार ॥**
**तुलसी अंतर्बाह्य जर इच्छा प्रकाश फार ॥२१॥**

नाम जपुनि मुखि जागे योगी । विरत विरंचि प्रपंच वियोगी ॥
ब्रह्मसुखा अनुभवि अनुपम जें । अकथ अदोष, न नाम रूप तें ॥
गूढ गती जे जाणूं पाहति । नाम जिभेनें जपतां जाणति ॥
नाम जपति साधक लय लावुनि । होति सिद्ध अणिमादिक लाहुनि ॥
भक्त आर्त अति नामा जपती । होती सुखी सुसंकट टळती ॥
रामभक्त जगि चतुः प्रकारीं । सुकृती अनघ उदारहि चारी ॥
नामाधार चहूं चतुरांप्रति । ज्ञानी प्रभुस विशेषें प्रिय अति ॥
नामप्रभाव वेदिंहि चहुंयुगिं । आन उपाय न विशेष कलियुगिं ॥

**दो०-सकलकामनाहीन जे रामभक्तिरसलीन ॥**
**नाम प्रेमसुधा-ह्रदी त्यांनिहि कृत मन मीन ॥२२॥**

ब्रह्मरूप दो निर्गुण सगुणहि । अनुपम अकथ अनादि अगाधहि ॥
दोघांहुनि गुरु नाम मम मतें । जें उभयां निजबलवश करतें ॥
प्रौढि सुजन माना न जनाची । रति रुचि वदें प्रतीति मनाची ॥
एक दारुगत दिसतो एक । पावकयुगसा ब्रह्मविवेक ॥
उभय अगम युग नामें सुगमचि । ब्रह्म राम यांहुनि गुरु नामचि ॥

व्यापी ब्रह्म एक अविनाशी । सच्चिद्घन आनंदगुराशी ॥
असुनि असा प्रभु हृदि अविकारी । दुःखदैन्य जग-जोवां भारी ॥
नाम निरूपण सुयत्न घडतो । होई मणिमूल्यसा प्रगट तो ॥

**दो०–अगुणाहुनि नामीं असा महा प्रभाव अपार ॥**
**नाम थोर रामाहुनी वदूं स्वमतिअनुसार ॥ २३ ॥**

रामभक्तहित मानवतनुधर । सहुनि संकटें भक्तां सुखकर ॥
प्रेमें जपतां नाम, विनाश्रम । भक्त बनति मुदमंगलआश्रम ॥
राम एक मुनि-नारी तारी । नाम कोटिखलकुमति सुधारी ॥
ऋषिहित रामें सुकेतुतनया । सहित सैन्य सुत नेली विलया ॥
दास दुराशा सदुःखदोषां । ध्वंसी नाम जसा रवि दोषा ॥
रामें स्वतां भग्न भवचापहि । भवभयभंजन नामप्रतापहि ॥
प्रभु दंडकवन करिति सुशोभन । जनमनअमित नाम करि पावन ॥
निशिचरनिकर दलिति रघुनंदन । नाम सकल कलि कलुष निकंदन ॥

**दो०–शबरी गृध्र सुसेवकां सुगति देति रघुनाथ ॥**
**नाम अमित खल उद्धरी वेद वदति गुणगाथ ॥ २४ ॥**

राम सुकंठा विभीषणासी । राखिति शरण विदित सर्वांसी ॥
करि गरिबीं बहु नाम कृपा, जें । ब्रीद लोकिं वर वेदिं विराजे ॥
राम भल्लकपिकटक जमवती । श्रम सेतूस्तव अल्प न करती ॥
नाम घेत सुकती भव सागर । सुजन विचार करा मनिं नागर ॥
रामें निहत सकुल रणिं रावण । कृत सह सीते स्वपुरिं पदार्पण ॥

राजाराम अवध नृप-धानी । गुण गाती सुर मुनिवर वाणीं ।।
प्रेमें सेवक नामा स्मरती । प्रबल मोहदल अश्रम जितती ।।
प्रेम-मग्न फिरती स्वेच्छेनें । स्वप्निहि शोक न नामकृपेनें ।।

**दो०-ब्रह्मरामगुरु नाम दे वरदांत्या वरदान ।।**
**रामचरित शतकोटितुनि गणि महेश घे प्राण ।। २५ ।।**

## मासपारायण, प्रथमविश्राम

❖ ❖ ❖

## अध्याय ४ था

नामकृपेंच शंभु अविनाशी । साज अमंगल मंगलराशी ।।
शुक सनकादि सिद्ध मुनि योगी । नामकृपेंच आत्मसुखभोगी ।।
नारद जाणति नाम-बलातें । जग प्रिय हरिहर हरिसि हरा ते ।।
नामजपें प्रभु करी प्रसादा । भक्तमुकुटता ये प्रल्हादा ।।
ध्रुव सग्लानि जपुनि हरिनामा । पावे निश्चल अनुपम धामा ।।
स्मरुनि पवनसुत पावन नामा । ठेवी करुनी निजवश रामा ।।
गजगणिका अति पतित अजामिल । मुक्त होति हरिनामबलें किल ।।
किति वानूं नामाची महती । राम नामगुण गाउं न शकती ।।

**दो०-रामनाम हा कल्पतरु कलि कल्याणनिवास ।।**
**स्मरुनि, भांग जो तो बने तुलसी तुलसीदास ।। २६ ।।**

त्रय कालीं चहूं युगीं त्रिलोकीं । नाम जपुनि बहु जीव विशोकी ।।
वेद-पुराण-संत-मत हें हो ! । सकल सुकृत फल रामीं स्नेहो ।।
ध्यानें कृतयुगिं मखविधि दूजे । द्वापरिं परितोषे प्रभु पूजें ।।
कलि केवल मलमूल मलीन हि । पाप पयोनिधि जनमन मीनहि ।।
नाम कामतरु कराल काळा । स्मरतां शमवि सकल जग-जाळा ।।
रामनाम कलि अभिमत दाता । हित परलोक लोकिं पितृ-माता ।।
कलियुगिं कर्म न भक्ति विवेकू । रामनाम अवलंबन एकू ।।
कालनेमि कलि कपटनिधानू । नाम समर्थ सुमति हनुमानू ।।

**दो०—रामनाम नरकेसरी कनककशिपु कलिकाल ।।**
**जापक ते प्रल्हादसे सुररिपु वधि जनपाल ।। २७ ।।**

भाव-कुभाविं चिडुनि अळसानें । दशदिशि मंगल नाम-जपानें ।।
स्मरुनि नाम तें राम-गुण-कथा । वदें नमुनि रघुनाथा माथा ।।
सर्व सुधारिल तो मम दोषू । करत कृपा तत्कृपें न तोषू ।।
सुधनी राम कुसेवक मी तों । राखि दयानिधि निजशीलें तो ।।
लोकीं वेदिं सुसाहिब-रीती । परिसुनि विनति जाणती प्रीती ।।
निर्धन धनी ग्रामनर नागर । पंडित मूढ मलीन सुभास्वर ।।
सुकवि कुकवि निजमति अनुसारें । स्तविति नृपा नारी नर सारे ।।
साधुसुजाण सुशीलहि नृपती । ईश-अंश-भव कृपाकर अती ।।
श्रवुनि सुवचि सकलां सन्मानी । जाणुनि भक्ती नति-गति-वाणीं ।।
असे स्वभावें प्राकृत महिपति । ज्ञानी-शिरोमणी कोसलपति ।।

राम तोषती प्रेमें निर्मल । मज सम जगि कुणि मंद अमंगल ॥

दो०-शठदासाच्या कृपानिधि राखिल प्रीति-रुचींस ॥
करि उपलां जलयान जो सुमति सचिव कपिरीस ॥२८ रा॥
मीहि म्हणवितो म्हणति जन राम सहति उपहास ॥
स्वामी सीता-नाथसे सेवक तुलसीदास ॥ २८ म ॥

अघ धिटाइ अतिशय मम खोडी । ऐकुनि नरकहि नाका मुरडी ॥
जाणुनि मन निज भयें भीतसे । स्वप्निं राम मम अघ न बघतसे ॥
परिसुनि, बघुनि विचारुनि चित्तें । प्रभु वानिति मम बुद्धि-भक्तितें ॥
वदति अबद्ध हृदयिं रस-भरती । जन-मन जाणुनि राम रीझती ॥
प्रभुमनि राहि न चूक कृतीची । स्मरती शतदां स्थिती हृदींची ॥
अघें व्याध इव ज्या हत वाली । करि सुकंठ मग तीच कुचाळी ।
तीच कृती मग बिभीषणाची । स्वप्निंहि रामा स्मृति न तयाची ॥
भेटत भरता त्यां गौरविले । रघुवीरें नृपसदसि वर्णिले ॥

दो०-प्रभु तरुतळि विटपीं कपी केले त्यां स्वसमान ॥
तुलसी कुठें न रामसे स्वामी शील-निधान ॥ २९ रा ॥
राम ! भलेपण आपलें असे भलें सकलांस ॥
सदा सत्य जर वाक्य हें भले तुलसिदासास ॥ २९ म ॥
कथुनि दोष गुण निज असे पुन्हां नमुनि सर्वांस ॥
वर्णीं रघुवर विशदयश श्रवणें कलिमलनास ॥ २९ चं ॥

❖ ❖ ❖

# अध्याय ५ वा

याज्ञवल्क्य जी वदले मुनिवर । कथा भरद्वाजाला सुंदर ।।
त्या संवादा वदुं विस्तारुनि । ऐका सुजन सर्व सुख मानुनि ।।
शंभु चरित हें सुंदर रचिती । पुढें कृपेनें उमेसि कथिती ।।
तें शिव काकभुशुंडिस अर्पिति । रामभक्त अधिकारि परीक्षिति ।।
तेथुनि लाभ याज्ञवल्क्याला । त्यानीं कथित भरद्वाजाला ।।
ते श्रोते वक्ते सम शीलें । सर्वदर्शि जाणति हरिलीले ।।
त्रिकालज्ञ ते, आत्मज्ञाना- । जाणति करि आमलक समाना ।।
इतर सुज्ञ हरिभक्त कितीतरि । सांगति ऐकति समजति बहुपरि ।।

**दो०-गुरु वदले मज ती कथा सूकरखेतिं सुजाण ।।**
**बालपणें नुमजे तशी तैं मी फार अजाण ।। ३० रा ।।**
**श्रोता वक्ता ज्ञाननिधि रामकथा कीं गूढ ।।**
**कशि समजे मी जीव जड कलिमल ग्रसित विमूढ ।।३० म ।।**

वारंवार परी गुरु सांगति । कांहि समजली मला यथामति ।।
ती करीन मी भाषाबद्धहि । जिनें होइ मम मनीं प्रबोधहि ।।
ज्ञान बुद्धिबल अंतरिं जेवीं । प्रेरी हरि मज वदेन तेवीं ।।
भ्रम-संदेह-मोह निज हरणी । करूं कथा भवसरितातरणी ।।
बुध विश्राम सकल जन-रंजनी । रामकथा कलि-कलुष विभंजनि ।।
रामकथा कलि पन्नग भरणी । ज्ञानपावकाला कीं अरणी ।।
रामकथा कलि-कामधेनुवर । मुळी सुजन-संजीवनि सुंदर ।।

ती वसुधातळिं सुधातरंगिणि । भयभंगा भ्रमभेकभुजंगिनि ।।
असुर सैन्य सम नरक निकंदिनि । साधु विबुधकुलहित गिरिनंदिनि।।
संत-समाज-पयोधि रमासी । विश्वभारभर अचला क्षमासी ।।
यमगणमुखि मसि जगिं यमुनाशी । जीवन्मुक्ति-हेतु जणुं काशी ।।
रामप्रिय पावन तुलसीसी । तुलसिदास-हित हृदि हुलसीसी ।।
शिवप्रिय मेकलशैल-सुतासी । सकलसिद्धि सुख संपतिराशी ।।
सदगुण-सुरगणअब अदितिसी । रघुपति भक्ति प्रेम परिमितिसी ।।

**दो०-रामकथा मंदाकिनी चित्त चित्रकुट चारु ।।**
तुलसी ! स्नेहसुभगवनि सियरघुवीर-विहारु ।। ३१ ।।

रामचरित चिंतामणि चारू । संतसुधी-स्त्री-शुभ-शृंगारू ।।
जग-मंगल रामाचे गुणगण । दायक मुक्ती धाम धर्म धन ।।
सद्‌गुरु बोध विरागां योगा । विबुधवैद्य भवभीषण-रोगा ।।
जननि जनक सियराम-प्रेमा । बीज सकल धमा व्रतनेमां ।।
शमन पाप-संतापां शोका । प्रिय पालक परलोका लोका ।।
सचिव सुभट विवेक भूपतिचे । कुंभज अपार लोभोदधिचे ।।
काम-कोप-कलि-कलुष करिगणां । केसरिशावक दास मनवना ।।
प्रियतम पूज्य पुरारि-अतिथि हे । कामद घन दारिद्र्य-दावि हे ।।
मंत्र महामणि विषयां व्यालां । पुसति कठिण जे कुअंक भालां ।।
हरण मोहतम दिनकर-करसे । सेवक-शालि-पाल जलधरसे ।।
अभिमतदानि देवतरुवरसे । सेवत सुलभ सुखद हरिहरसे ।।

सुकविशरद मन-नभिं उडुगणसे । रामभक्त–जन–जीवन–धनसे ॥
सकलसुकृतफल भूरि भोगसे । जगहित निरूपधि साधु लोकसे ॥
सेवक मन मानस–मराल से । पावन गांगतरंगमालसे ॥

**दो०–कुपथ कुतर्क कुचालि कलि कपट दंभ पाखंड ॥**
**दहन रामगुण–गण जसा अनल इंधना चंड ॥ ३२ रा ॥**
**दो०–रामचरित राकेशकर सदृश सुखद सर्वांस ॥**
**सज्जन कुमुद चकोर मन हितकर अति लाभास ॥३२म॥**

उमा प्रश्न करि जशा प्रकारें । शंकर वदले जसं विस्तारें ॥
सकल हेतु तो वदु विस्तारुनि । कथा-प्रबंधा विचित्र बनवुनि ॥
कथा श्रवणि ही आली न जया । मानुं नये तेणें आश्चर्या ॥
ज्ञानी कथा अलौकिक ऐकति । जाणूनि असें न विस्मय मानति ॥
राम-कथेला मिति जगिं नाहीं । अशी प्रतीति तयां मनिं राही ॥
नाना रीतिं रामअवतारहि । रामायण शतकोटि अपारहि ॥
कल्पभेदिं हरिचरित सुशोभन । मुनिवरिं केलें विविधा गायन ॥
समजुनि असें, न संशय धरणें । श्रवणा प्रेमें सादर करणें ॥

**दो०–राम अनंत अनंत गुण अमित कथाविस्तार ॥**
**परिसुनि विस्मय करिति ना ज्यांना विमल विचार ॥३३॥**

दूर असे सब संशय करुनी । गुरुपदपंकजरज शिरिं धरुनी ॥
येइ कथेमधिं दोष न कसला । म्हणुनि विनतिकर जोडुनि सकलां ॥
नमुनीं सादर शिवास माथा । वर्णूं विशद रामगुणगाथा ॥

संवत सोळाशें एकतीसां । करूं कथा नमुं हरिपदिं शीसा ॥
भौमवार नवमी मधुमासीं । येइ अयोध्यें चरित प्रकाशीं ॥
राम-जन्म-दिनिं कीं श्रुति वानति । तीर्थ सकल पुरि चालत ठाकति ॥
दनुज मनुज खग नाग अमर मुनि । करती रघुपतिसेवा येउनि ॥
जन्म महोत्सव रचिति सुजाण । करिति रामकलकीर्ति सुगान ॥

**दो०—मज्जति सज्जन-वृंद बहु पावन शरयू-नीरिं ॥**
**ध्यात जपति हृदिं राम जे सुंदर शाम-शरीरिं ॥३४॥**

दर्शन मार्जन मज्जन पानें । अघ हरि वदति वेद पुराणें ॥
नदी पुनीत अमित महिमा अति । वदुं न शके शारदा विमलमति ॥
रामधामदा पुरी सुशोभन । लोकीं सकल विदित अति पावन ॥
अमित जीव जगिं खाणीं चारी । त्यजि तनु अवधिं, न ये संसारी ॥
जाणुनि सवर्परिं पुरी मनोहर । सकल सिद्धिदा सुमंगलाकर ॥
विमल कथेच्या कृत आरंभा । श्रवत विनाश काम-मद-दंभां ॥
रामचरितमानस हिज नामहि । श्रवणिं पडत पावति विश्रामहि- ॥
मनकरि विषयवनानलिं जळतां । होइ सुखी या सरांत पडतां ॥
रामचरितमानस मुनि-भावन । विरचित शंभु सुशोभन पावन ॥
त्रिविध दोष दुख दैन्य विदाहक । सकल कलुष कलिकुचालि नाशक ॥
रचुनी महेश मानसिं राखति । सुसमय मिळतां शिवेस भाषति ॥
यास्तव रामचरित मानस वर । हृदिं हेरुनि दे नाम हर्षि हर ॥
वदूं कथा ती सुखदा सुंदर । श्रवा सुजन मन लाउनि सादर ॥

दो० जसं मानस, जे परि घडे जगीं प्रचारा हेतु ॥
तो प्रसंग वदतो सकल स्मरुनि उमा वृषकेतु ॥ ३५ ॥

❖ ❖ ❖

## अध्याय ६ वा

हृदि शिवकृपें स्फुरण सुमतीसी । राम-चरित-मानसकवि तुलसी ॥
करी मनोहर मति अनुसारहि । सुजन सुवारुन सुमनें घ्यालहि ॥
सुमति भूमि थळ हृदय अगाधू । वेद पुराण उदधि घन साधू ॥
वर्षति राम-सुयश वर-वारी । मधुर मनोहर मंगलकारी ॥
विस्तृत लीला सगुण वानिती । करी स्वच्छता कलुषहानि ती ॥
प्रेम-भक्ति, शक्य न वर्णाया । ती मधुरता सुशीतलता या ॥
तें जल सुकृत-शालि - हितकर्ते । रामभक्त सेवक जीवन तें ॥
मेधा-महिगत तें जल पावन । जमुनी श्रुतिपथि जाइ सुशोभन ॥
भरे सुमानस सुथळीं स्थिरलें । सुखद शीत रुचि चारू पिकलें ॥

दो० अति सुंदर संवाद वर विरचित बुद्धिविचारि ॥
ते या पावन सुभग सरि घाट मनोहर चारि ॥ ३६ ॥

सप्त प्रबंध सुभग सोपान । ज्ञान-नयनि निरखत मानी मन ॥
रघुपति महिमा अगुण अबाधित । अगाधता ती सुजला वानित ॥
रामसितायश सलिल सुधोपम । उपमा वीचिविलास मनोरम ॥
कमलिनि सघन चारु चौपाया । युक्ती मंजुल मणिशिपा या ॥
छंद सोरठा दोहा मंजुल । शोभे बहुरंगी अंबुजकुल ॥

अनुपम अर्थ सुभाव सुभाषा । गणुं पराग मकरंद सुवासा ।।
सुकृतपुंज मंजुल अलिमालचि । ज्ञान विराग विवेक मरालचि ।।
ध्वनी व्यंग्य जाती गुण कविते । मीन मनोहर बहु शोभति ते ।।
अर्थधर्मकामदिक चारां । वदूं ज्ञानविज्ञानविचारा ।।
नव रस जप तप योग विरागा । ते सब जलचर चारु तडागा ।।
सुकृती–साधु–नामगुणगान । ते विचित्र जल-विहग-समान ।।
संतसभा चौदिशीं आम्रवन । श्रद्धा वसंत-ऋतु सम वर्णन ।।
भक्तिनिरूपण विविध विधानें । क्षमा दया द्रुमलतावितानें ।।
शम यम नियमचि फुलें ज्ञान फल । हरिपद रति रस वेद वदे कल ।।
अपर कथा ज्या विविध मनोरम । ते शुक पिक बहुवर्णविहंगम ।।

**दो०–पुलक वाटिका बाग वन सुख–सुविहंग–विहारु ।।**
**सुमनचि माळी स्नेहजल सिंचत लोचनिं चारु ।। ३७ ।।**

सावधान गाती चरितातें । रक्षक चतुर तलावा या ते ।।
श्रवति सदा सादर नर नारी । ते सुरवर मानसअधिकारी।।
बगळे काक विषयि अतिखळ, ते । जाति अभागि न सरा जवळ ते ।।
कालु भेक शैवालजंतुगण । विषयकथारस नाना अत्र न ।।
येत यामुळें हृदयि कचरले । कामी काक बिचारे बगळे ।।
या सरि येतां बहुत कठिणता । रामकृपेविण ये न पावतां ।।
कुपथ कराल कठीण कुसंगम । तद्वच हरि करि वाघ भुजंगम ।।
गृहकार्ये किति अति जंजाळहि । ते अति दुर्गम शैल विशाळहि ।।

मोह मान मद सुघोर कानन । सरिता नाना कुतर्क भीषण ॥

**दो०–श्रद्धा पथ–धन ना जयां नहि संतांची साथ ॥**

**त्यानां मानस अगम अति ज्यां प्रिय ना रघुनाथ ॥३८॥**

कष्ट करुनि जरि कोणि पावले । जातहि निद्राहिवें ग्रासले ॥
हुडहुडि जाडच विषम उरिं लागे । जाउन न घडे स्नान, अभाग ! ॥
करवे ना सरि मज्जन–पाना । परत येति घेउन अभिमाना ॥
मग जर येउन कोणि विचारिति । सरनिंदेनें त्यांस शांतविति ॥
त्या न सकल हीं विघ्नें व्यापिति । सुकृपें राम जयास विलोकिति ॥
तो सादर सरिं मज्जन करतो । घोर महा त्रयतापिं न जळतो ॥
त्यजति न ते नर कधीं सरा या । ज्यां सु–भाव रामाचे पायां ॥
ज्यामनिं या सरिं बुडवूं अंगा । करो सुचित्तें तो सत्संगा ॥
अस मानस मानसाक्षि पाहुनि । कविमति होइ विमल अवगाहुनि ॥
हृदि उत्साहानंद पसरला । वाहे प्रेमामोद उमळला ॥
निघे सुभग कविता सरिता ती । रामविमलयशजलभरिता ती ॥
सरयू नाम सुमंगलमूला । लोकवेदमत मंजुल–कूला ॥
नदी पुनीत सुमानसनन्दिनि । कलिमलतृणतरुमूलनिकन्दिनि ॥

**दो०–त्रिविधा श्रोतृसमाज पुर ग्राम नगर युग कूलिं ॥**

**संत–सभा अनुपम अवध सकलसुमंगलमूलि ॥३९॥**

जाउनि रामभक्ति सुरसरिते । शरयू सुकीर्ति मनोहर मिळते ॥
सानुज रामसमरयश पावन । मिळे महानद शोण सुशोभन ॥

उभयि भवित सुरधुनी सुधारा । शोभे सहित सुविरतिविचारा ।।
त्रिका त्रासिका त्रय तापांतें । रामस्वरूपसिंधुस जाते ।।
मानसमूळ मिळें सुरसरिते । श्रवत सुजनमन पावन करिते ।।
मधि मधि कथा विचित्र विभाग । जणुं सरितीरिंतीरिं वन बाग ।।
जे वऱ्हाडि शिवउमाविवाहीं । ते जलचर अगणित विविधाही ।।
रघुवरजन्मि मोद अभिनंदन । तें आवर्तवीचिसुंदरपण ।।

**दो०-बालचरित चौबंधुकृत वनज विपुल बहुरंग ।।**
**नृपराज्ञी-परिजनसुकृत मधुकर वारिविहंग ।। ४० ।।**

सिता-स्वयंवर कथा मनोहर । व्याप्त नदीमधि ती छवि सुंदर ।।
सरितीं नावा प्रश्न पटु खरे । पटु नाविक सविवेक उत्तरें ।।
ऐकुनि कथन परस्पर करती । सरि-तटिं ते बहु पथिक शोभती ।।
भृगुपतिकोप धार भयखाणी । घाट सुबंधुरामवर-वाणी ।।
राम-विवाहोत्सव भावांसह । सुभग पूर तो सकलसुखावह ।।
श्रवणिं कथनिं हर्षती पुलकती । ते सुकृती मन मुदित मज्जती ।।
सजिति रामअभिषेकमंगळां । पर्वकाळिं जणुं समाज जमला ।।
कैकयि-कुमति धरे शेवाळहि । जिचें फल पडे विपत्तिजालहि ।।

**दो०-शमन अमित उत्पाद सब भरतचरितजपयाग ।।**
**कलि-अघ खलअवगुण कथन ते जलमलबककाग ।।४१।।**

कीर्तिसरित साहीं ऋतुं सुंदर । समयिं सुशोभन पावन बहुतर ।।
हिम हिम-गिरिजा-शंभु-विवाहू । शिशिर सुखद हरिजन्मोत्साहू ।।

वर्णित रामविवाहसमाजा । तो मुदमंगलमय ऋतु-राजा ॥
दुःसह ग्रीष्म राम-वन-गमनचि । पंथकथा खर आतप पवनचि ॥
वर्षा घोर असुररण भारी । सुर-कुल-शालि-सुमंगलकारी ॥
रामराज्य सुख विनय महत्ता । विशद सुखद ती शरदरम्यता ॥
सतीशिरोमणि सियगुणगाथा । तो गुण अमल अनूपम पाथा ॥
भरत सुभाव सुशीतलता ही । सदा एकरस वदवत नाहीं ॥

**दो०– दर्शनि भाषणिं भेटिमधि प्रीति परस्पर हास ॥**
**चौघामाजि सुबंधुता जलमाधुरी सुवास ॥ ४२ ॥**

माझी आर्ती विनति दीनता । लघुता थोडि न सुजलीं ललिता ॥
अद्भुत सलिल श्रवणिं गुणकारी । आशातृषामनोमेलहारी ॥
पोषि राम सुप्रेमा पाणी । हरी सकल कलि कलुषें ग्लानी ॥
शोषि भवश्रम तोषक तोषा । शमन दुरित-दुखदरिद्रदोषां ॥
कामकोपमद-मोह- विनाशक । विमलविवेकविराग-विवर्धक ॥
करतां सादर मज्जन पाना । पाप हृदयिं परिताप उरत ना ॥
जिहिं या जलिं मानस ना क्षालित । ते कातर कलिकालें वंचित ॥
तृषित बघुनि रविकरभववारी । फिरतिल जिवमृग दुःखी भारी ॥

**दो०– गणुनि सुजलगुण यथामति मना घालुनी स्नान ॥**
**स्मरुनि भवानी-शंकरां वदे कथा कवि छान ॥ ४३ रा ॥**
**रघुपतिपदाब्ज धरुनि हृदिं पावोनियां प्रसाद ॥**
**अतां वदूं द्वयमुनिवरीं मिलन सुभग संवाद ॥ ४३ म ॥**

भरद्वाज मुनिवरां प्रयागीं– । वस्ति, रामपदिं अति अनुरागी ।।
तापस शमदमदयानिधानू । परमार्थीपथि परम सुजाणू ।।
माघि मकरगत होतो रवि जैं । तीर्थपतिस येती सर्वहि तैं ।।
किंनर–नर–सुर–असुरश्रेणी । सादर सव मज्जती त्रिवेणीं ।।
माधव-पद-जलजातां पूजति । स्पर्शुनि अक्षयवट तनु पुलकति ।।
भरद्वाजआश्रम अति पावन । परम रम्य मुनिवर-मन-भावन ।।
तिथें जमति मुनि ऋषिगण नाना । तीर्थराजि जे जाती स्नाना ।।
हर्षें प्रातःस्नाना सारति । हरिगुण कथा परस्पर सांगति ।।

**दो०– ब्रह्मनिरूपण धर्मविधि वर्णिति तत्त्वविभाग ।।**
**भगवद्भक्ती सांगती ज्ञानासह सविराग ।। ४४ ।।**

यापरिं माघीं करिती स्नाना । मग सव जाती निजाश्रमांनां ।।
हा दरसाल लुटिति आनंद । मज्जुनि मकरिं फिरति मुनिवृंद ।।
एक वळ भरिं मकर मज्जले । सकल मुनीश निजाश्रमिं वळले ।।
परम विवेकी याज्ञवल्क्य मुनि । भरद्वाज राहवि त्यां प्रणमुनि ।।
सादर कृत चरणाब्ज क्षालन । वसवीले आसनिं अति पावन ।।
पूजुनि मुनिसुयशा वाखाणी । बोले अति पुनीत मृदु वाणी ।।
नाथ एक मज संशय भारी । करगत वेदतत्त्व तुज सारीं ।।
गमे लाज भय मज तो वदतां । वहु अकार्य घडतें न सांगतां ।।

**दो०–संत कथिति नीति ही प्रभु ! श्रुति पुराण मुनि गात ।।**
**गुरुशिं कपट करतां नव्हे ज्ञान विमल हृदयांत ।। ४५ ।।**

प्रगटि नाथ ! निज मोहा म्हणुनी । हरणें, दासा कृपाळु बनुनी ।।
रामनामिं जो प्रभाव मिति नहि । संत पुराण वदति उपनिषदहि ।।
संतत जपति शंभू अविनाशी । शिव भगवंत बोध-गुण-राशी ।।
आकरिं चार जीव जे जगतीं । काशी-मरणिं परमपद लभती ।।
तोहि राममहिमा मुनिवर्या । शिव उपदेशा करिति युत दया ।।
तुज पुसतो प्रभु कवण राम ते । वदणें विवरुनि कृपाधाम तें ।।
एक राम तो अयोध्येशसुत । संसारीं तच्चरित्र विश्रुत ।।
नारीविरहें दुःखी पार न । येइ रोप रणिं वधिला रावण ।।

**दो०–प्रभु तो राम कि कुणि दुजा ज्या जपतो त्रिपुरारि ।।**
**सत्यधाम सर्वज्ञ तुम्हि वदा विवेक-विचारि ।४६ ।।**

जाइल जेणें भ्रम मम भारी । प्रभु ! अशि कथा वदा विस्तारीं ।।
याज्ञवल्क्य मग वदले सस्मित । तुम्हां रघुपती-प्रभुता सुविदित ।।
रामभक्त तुम्हि मनवाक्कर्मीं । जाणे तुमची चतुराई मी ।।
गूढ रामगुण ऐकुं बघतसां । प्रश्न जणूं अति मूढ करितसां ।।
मन लाउनि ताता ! श्रुणु सादर । सांगूं रामकथा अति सुंदर ।।
महामोह महिषेश विशालहि । रामकथा कालिका करालहि ।।
रामकथा शशिकिरण-समाना । संत चकोर करिति यत्पाना ।।
करि संशय ऐसेच भवानी । महादेव विस्तृत वाखाणी ।।

**दो०– अतां यथामति सांगुं तो उमा-शंभु संवाद ।।**
**कारण काळहि सांगतो श्रुणु मुनि, मिटे विषाद ।।४७।।**

## अध्याय ७ वा

त्रेतायुग एकवार चाले। शंभु कुंभजापाशीं आले ।।
सवें सती जगजननि भवानी। पूजी ऋषि अखिलेश्वर जाणी ।।
रामकथा मुनिवर वाखाणति। श्रवति महेश परम सुख मानति ।।
ऋषि सुंदर हरिभक्ति विचारी। सांगति शंभु मिळुनि अधिकारी ।।
श्रवत कथित रघुपति-गुण-गाथा। वास कांहि दिन तिथं गिरिनाथा ।।
मुनि-निरोप घेती त्रिपुरारी। निघति भवनिं सह दक्षकुमारी ।।
भूमि–भार–भंजन ते अवसरिं। रघुवंशीं अवतरलेले हरि- ।।
त्यक्तराज्य पितृवचें उदासी। दंडक वनिं विचरति अविनाशी ।।

**दो०–हृदयीं चिंतित जाति हर दर्शन कसें घडेल ।।**
**अवतरले प्रभु गुप्त कीं जातां जनां कळेल ।। ४८ रा ।।**
**सो०–शंकर-हृदिं विक्षोभ कळे सतीला मर्म न ।।**
**तुलसी ! दर्शन-लोभ मनिं भय लालुचि विलोचन ।।४८म ।।**

रावण मरण मनुजकरिं याची। प्रभु करुं इच्छिति विधिवाक्साची ।।
जाइन ना तर अनुतापावें। करत विचार, न उपाय फावे ।।
होति शोच–वश असे महेश्वर। त्याच समयिं जाउनि दशकंधर ।।
घेई नीच मारीचा संगतिं। कपटकुरग तो वने शीघ्रगतिं ।।
वैदेहीला मूढ हरि छळें। तसा प्रभूचा प्रभाव न कळे ।।
मृगा वधुनि हरि सबंधु वळले। आश्रम बघुनि नयन डबडबले ।।
विरहविकल नर इव रघुराऊ। धुंडित वनिं फिरती द्वय भाऊ ।।

योग वियोग न कधिहि जयातें । दिसे प्रगट शुच विरहं तयाते ॥

**दो०–अति विचित्र रघुपतिचरित जाणे परम सुजाण ॥**
**जे मतिमंद विमोहवश धरिति कांहि हृदिं आन ॥४९॥**

शंभु समयिं त्या रामा पाहति । हर्ष हृदयिं अति विशेष पावति ॥
लोचनभर छवि-सिंधुस निरखुनि । परिचय करिति न कुसमय समजुनि॥
जय सच्चिदानंद जगपावन । चालति वदुनि मनोजविनाशन ॥
शिव पथिं चालत जाति सह सती । घडि घडि कृपानिकेत पुलकती ॥
बघत सती त्या शंभू-दशेसी । उपजे हृदिं संदेह विशेषीं ॥
शंकर जगद्वंद्य जगदीशा । सकल नमिति मुनि नर सुर शीर्षा ॥
ते करिती नृपसुता प्रणामा । वदुनी सच्चित्सुख परधामा ॥
होति मग्न छवि त्याची पाहुनि । प्रीति अझुनि हृदिं राहि न रोखुनि॥

**दो०–ब्रह्म निरीह विरज अज व्यापक अकल अभेद ॥**
**तें किं धरुनि तनु होइ नर जाणति ना ज्या वेद ॥५०॥**

विष्णु सुरहिता नरतनु-धारी । तो सर्वज्ञ जसे त्रिपुरारी ॥
तो किं अज्ञसा शोधिल नारी । ज्ञाननिधी श्रीपति असुरारी ॥
मृषा होइ परि शंभुगिरा ना । शिव सर्वज्ञ विदित सर्वांनां ॥
असें संशयीं अमित भरे मन । तिळहि संचरे हृदीं प्रबोध न ॥
प्रगट वदे ना जरी भवानी । हर हृदयस्थित जाणे ज्ञानी ॥
स्त्रीस्वभाव तव सती, ऐकणें । संशय हृदिं न असा कधि धरणें ॥
कुंभज ऋषि यत्कथेस गाती । मी कथिली मुनिला यद्भक्ती ॥

ते रघुवीरचि इष्टदेव मम । सेवित नित्य धीर मुनि निर्मम ।।

**छंद० ज्या ध्याति योगी सिद्ध संतत धीर मुनि मन शुचि अती**
**यत्कीर्ति वेद पुराण आगम नेति नेतिहि वानती ।।**
**तें ब्रह्म सर्वग राम भुवन–निकाय–पति मायाधनी**
**अवतीर्ण भक्तहितार्थ निज निजतंत्र अज रघुकुलमणी ।।१।।**

**सो०–शिरे न उरिं उपदेश जरि शिव वदले वार किति ।।**
**कथिती हसुनि महेश हरिमायाबल विदित हृदि ।।५१।।**

अति संदेह मनीं तुमचे जर । जाउन कां न परीक्षा घ्या तर ।।
तोंवर वटतळि मी वसतों या । तुम्ही परत मजपाशीं जों या ।।
मोह महाभ्रम जेणें जावा । यत्न विवेक–विचारिं करावा ।।
निघे सती शिव-आज्ञा मिळतां । मनिं चिंती कीं काय करुं अतां ।।
करिति शंभु अनुमान इथं मना । दक्षसुताकल्याण दिसत ना ।।
संशय हटति न मी वदतां ही । विधि विपरीत भलाई नाहीं ।।
तेंच घडें जें रामा वाटे । तर्क करुनि कां फोडू फाटे ।।
असें म्हणुनि हरिनामा जपती । प्रभु सुखधामाकडे गत सती ।।

**दो०–घडि घडि हृदयिं विचारुनी धरुनी सीता रूप ।।**
**होई पुढें त्या गता पथिं जिथुनि येति नरभूप ।।५२।।**

लक्ष्मण वघति उमाकृत वेषा । चकित पावले भ्रमा विशेषा ।।
कांहि न वदवे अति गंभीरा । प्रभूप्रभाव विदित मतिधीरा ।।
जाणति सतिछल देवस्वामी । सर्वदर्शि सर्वांतर्यामी ।।

स्मरण जयाचें हरि अज्ञाना । त्या सर्वज्ञ राम भगवाना-॥
कपटें सतीहि भुलवूं पाहे । स्त्रीस्वभावबल बघ बापा ! हें ॥
निज मायाबल हृदीं प्रशंसुनि । राम मृदुलवच वदले विहसुनि ॥
प्रभु जोडुनि कर करी प्रणामा । वदुनि तात-नामा निज नामा ॥
मग पुसलें कि कुठें वृषकेतू । एकट फिरा काय वनिं हेतू ॥

**दो०-श्रवुनि रामवच गूढ मृदु उपजे अति संकोच ॥**
**सती महेशाप्रति सभय निघे हृदयिं अति शोच ॥५३॥**

शंकर शब्दां मी न मानले । रामीं निज अज्ञान लादलें ॥
काय देउं मी जावा जाउन । उपजे हृदयीं दाह सुदारुण ॥
राम सती-दुःखास ओळखिति । प्रगट जरा स्वप्रभाव दाविति ॥
सती बघे कौतुक पथि जातां । राम समोर सवें श्री भ्राता ॥
फिरुनि बघे मागें प्रभु पाही । रुचिरवेषिं सानुज सीताही ॥
जिथें बघे प्रभु तिथें उपस्थित । सिद्ध-मुनीशीं प्रवीण सेवित ॥
पाही शिव विधि विष्णु अनेकां । महिमामित एकाहुनि एका ॥
नमिति चरणिं करिती प्रभुसेवा । बघे विविध वेषीं सब देवां ॥

**दो०-सती विधात्री इंदिरा अनुपम दिसति अमूप ॥**
**जे जे वेषिं अजादि सुर त्या त्या तनु-अनुरूप ॥५४॥**

जिथं तिथं दिसले रघुपति जितके । शक्तींसहित सकल सुर तितके ॥
जीव चराचर जे संसारीं । दिसले सगळे किती प्रकारीं ॥
पूजिति प्रभुस वेषिं बहु सुरगण । रामरूप दिसलें न अपर पण ॥

कितितरि रघुपति दृष्टिस आले। सीतेसहित, न वेष निराळे ॥
ते रघुवर ते लक्ष्मण सीता। होई बघुनि अति सती सभीता ॥
हृदयिं कंप तनु-शुद्धि जरा ना। वसली मार्गि मिटुनि नेत्रांना ॥
नंतर उघडुन नयन पाहलें। दक्षकुमारिस कांहि नाढळे ॥
नमुनि रामपदिं शिर कितिदां तरि। जिथें गिरीश तिथें गमना करि ॥

**दो०– गता समीप महेश तैं हसत पुसति कुशलास ॥**
**कशी परीक्षा घेतली सत्य वदा वृत्तास ॥ ५५ ॥**

## मास पारायण, द्वितीय विश्राम

❖ ❖ ❖

## अध्याय ८ वा

ती रघुवीर प्रभाव जाणे। तरि करि कपट शिवासि भयानें ॥
कृता परीक्षा कांहीं ना मी। नमिलें आपण तेंवीं स्वामी ॥
तुम्हि जें कथिलें नव्हें मृषा तें। ही प्रतीति मम अती मनातें ॥
ध्यान धरुनि तैं शंकर पाहति। सर्व सतीकृत चरिता जाणति ॥
तदा राम-माये शिर नमिलें। जिनें सतीमुखिं मृषा वदविलें ॥
हरिइच्छा भावी बलवान् अति। हृदयीं शंभु सुजाण विचारति ॥
सीतावेष सतीनें धरला। शिवहृदिं खेद विशेषचि भरला ॥
जर करु अतां सतीशीं प्रीती। भग्न भक्तिपथ होइ अनीती ॥

**दो०– परम पुनीत, न टाकवे प्रेम करिन अति पाप ॥**
**प्रगट महेश न जरि वदति हृदयिं अधिक संताप ॥५६॥**

तैं प्रभुपदि शंकर शिर नमती । स्मरत राम, मनिं विचार उठती ।।
सतीभेट या तनुनें नाहीं । चिंत्ति करिति शिव संकल्पा ही ।।
शंकर ठरवुनि असें धीरमति । निघति रघुविरा स्मरत गृहाप्रति ।।
जातां होइ गिरा नभिं सुंदर । जय महेश कृत भक्ति दृढा वर ।।
अन्य असा पण कोणि न कर्ता । रामभक्त भगवंत समर्था ।।
सती सचिंत नभोवाग् ऐकुनि । तदा शिवास पुसे संकोचुनि ।।
पण केला कोणता कृपाला । प्रभो सत्यनिधि दीनदयाला ।।
होइ सती पुसती विविधा जरि । त्रिपुराराती सांगति ना तरि ।।

**दो०–सती करी अनुमान हृदिं जाणति सब सर्वज्ञ ।।**
**म्यां कृत कपटा शंभुसी नारि सहज जड अज्ञ ।।५७रा।।**
**सो०–पयसम भाव जलास बघा प्रीतिची रीति बरि ।**
**भिन्न होइ रसनास आम्ल कपट पडतांच परि ।।५७म।।**

शोक हृदयिं निज चरित चिंतितां । चिंता अमित, न येइ वर्णितां ।।
कृपासिंधु शिव परम अगाधहि । प्रगट न वदले मम अपराधहि ।।
शंकर-रोख भवानिस कळला । व्याकुळ, त्यजिली प्रभुनीं मजला ।।
निज अघ समजुनि वदवत नाहीं । ताप अव्यासम उरिं अति दाही ।।
वघुनि सशोक सती वृषकेतू । कथिति कथा सुंदर सुखहेतू ।।
पथिं वर्णित विविधा इतिहासां । विश्वनाथ पोचति कैलासा ।।
तिथें शंभु समजुनि अपला पण । वटतलिं बसले कृत-कमलासन ।।
शंकर सहज स्वरूप चिंतित– । लग्न समाधि अपार अखंडित ।।

**दो०–सती वसे कैलासिं तैं शोक अधिक चित्तांत ॥**
**मर्म न जाणति कांहि कुणि युग सम दिन जातात ॥५८॥**

नित्य सती–मनिं शोकभार नव । कधिं जाइन पारा दुःखार्णव ॥
मी जें रघुपतिला अपमानीं । पति–वचना ही मिथ्या मानीं ॥
देइ विधाता मजला तत्फळ । उचित कांहिं जें तें कृत केवळ ॥
अतां विधे, हें अनुचित करिसी । शंकरविमुखी मला जगविसी ॥
वदवेना मुळिं चित्तीं ग्लानी । मनिं रामा ती स्मरे शहाणी ॥
प्रभु जर दीन दयाळू म्हणविति । आर्ति–हरण यश वेदहि वर्णिति ॥
तर मी कर जोडुन तुज विनवीं । या देहा मम शीघ्र टाकवी ॥
असे स्नेह जर मम शिवचरणीं । हेंच खरें व्रत तन–मन–वचनीं ॥

**दो० तर सबदर्शी प्रभो श्रुणु करा कि शीघ्र उपाय ॥**
**जेणें अश्रम मरण मरण यं दुःसह् विपत्ति जाय ॥५९॥**

दुःखी अती नगेशकुमारी । अकथनीय दारुण दुख भारी ॥
गत सत्यायशीं हजार वत्सर । त्यजि समाधि अविनाशी शंकर ॥
रामनाम तैं स्मरुं शिव लागति । जाणे सती जगत्पति जागति ॥
जाउनि शंभुपदीं कृत वंदन । देती शंकर सन्मुख आसन ॥
वदुं लागति हरिकथा रसाला । दक्ष समयिं त्या प्रजेश झाला ॥
विधिमति अति तो दिसला लायक । दक्षा करी प्रजापतिनायक ॥
होतां दक्ष महा अधिकारी । हृदिं अभिमानें फुगला भारी ॥
जगिं न जन्मला कोणि असाही । ज्या प्रभुता पावुनि मद नाहीं ॥

दो० बोलावुनि मुनि सब महा आरंभी तो याग ॥
सादर सकल निमंत्रि सुर जे पावति मखभाग ॥ ६० ॥

नागसिद्ध गंधर्व हि किंनर । वधू सहित निघती सगळे सुर ॥
विष्णु विरंचि महेशांवाचुनि । जाति सकल सुर यानें साजुनि ॥
सती विलोकी व्योमि विमानां । नानाविध सुंदर जातानां ॥
सुर–सुंदरी करिति कलगानहि । श्रवत मुनींचें सुटतें ध्यानहि ॥
सती विचारी सांगति शिव जंव । परिसुनि मरव पितृगेहिं हर्ष लव ॥
जर कि अनुज्ञा देति महेश्वर । जाउं राहुं, या मिषें काहिं तर ॥
पतित्यक्त हृदिं दुःखी भारी । वदे न निजअपराध विचारीं ॥
बोले सती मनोहर वाणी । भय–लज्जा–प्रीती–रसखाणी ॥

दो०–पितृगृहिं उत्सव परम मी सादर पहावयास ॥
जाइन संमति देति जर प्रभु मज कृपानिवास ॥६१॥

उचित वदां मम मान्य करी मन । परि अनुचित कीं नाहिं निमंत्रण ॥
मुली दक्ष बोलावित सकलां । मम वैरें वगळल्या तुम्हांला ॥
ब्रह्मसभें मज विरुद्ध मानिति । यास्तव अद्यापहि अपमानिति ॥
जाल भवानी निमंत्रणाविण । स्नेह–शील–मर्यादा राहि न ॥
मित्र–पिता–प्रभु–गुरु–सदनाही । जावें जरि आमंत्रण नाहीं ॥
तदपि विरोध जिथें कुणि मानी । जात तिथें कल्याणा हानी ॥
शंभु विविधपरि जरि समजावी । बोध ठसेना मनिं, वश भावी ॥
म्हणती प्रभु अनिमंत्रित जां जर । बरें दिसेना मम चित्ता तर ॥

**दो०–करुनि यत्न हर बघति बहु राहि न दक्षकुमारि ॥**
**दिले प्रमुख गण तैं सवें देति निरोप पुरारि ॥६२॥**

पितृभवनीं जैं गता भवानी । दक्षभये कोणि न सन्मानी ॥
सादर भेटे केवळ जननी । स्वसा भेटल्या विहसत वदनीं ॥
दक्षें नहि पुसलें कुशलाही । बघुनि सतिस अंगांची लाही ॥
सती जाइ मग यागा पाही । कुठें शंभुचा भागच नाहीं ॥
तैं शंकर-वच चित्तिं उमटलें । प्रभु-अपमान गणुनि मन जळलें ॥
पूर्व-दुःख वोचे न मनिं असें । जाळि महा परिताप हा जसें ॥
दुःखें दारुण जरि जगिं नाना । तीं न कठिण सम जात्यवमाना ॥
समजुनि हेंच सती सक्रोधा । जननी बहुविध करी प्रवोधा ॥

**दो०–शिव-अपमान न साहवे हृदयिं न शिरे प्रबोध ॥**
**सकल सभे हटकुनि हठें वदली अति सक्रोध ॥६३॥**

ऐका सर्व मुनींद्र सभासद । ज्यांनीं शंकर निंदा श्रुत कृत ॥
सकलां तत्काल मिळेल सत्वर । पित्यासही अनुताप पोटभर ॥
संत–शंभु–मापति–अपवादा । ऐंकति तेथें अशि मर्यादा ॥
जीभ कापण्या शक्त असावें । नातर कान मिटून पळावें ॥
जगदात्माच महेश पुरारी । जगज्जनक सर्वां हितकारी ॥
पिता मंदमति निंदी त्यांही । दक्ष-शुक्र-संभव काया ही ॥
त्यजितें त्वरित देह त्या–हेतू । हृदिं शशिमौलि धरुनि वृषकेतू ॥
मग योगाग्नित देह जाळला । मखिं सब हाहाकार जाहला ॥

**दो०–श्रवुनि सती-मृति शंभुगण करुं लागति मखनाश।**
**यज्ञ-विनाशा बघुनि भृगु रक्षि मुनीश तयास ।।६४।।**

समाचार सब शंकर पावति। वीरभद्रकोपोद्भव धाडति ।।
तो जाउन करि मख-विध्वंसन। समुचित फल लाभले अमरगण ।।
गति जगविदित होइ दक्षाची। होई जशि किं शंभु- विमुखाची ।।
हा इतिहास सकल जग जाणें। यास्तव वर्णित संक्षेपानें ।।
सती हरिशि वर मागे मरणीं। जन्मोजन्मीं रति शिवचरणीं ।।
म्हणुनी जाउनि हिमगिरि-गेहा। जन्मे पावुनि पार्वति–देहा।
यदा उमा गिरिगेहिं जन्मली। तियें सिद्धि सब संपत् जमली ।।
जिथं तिथंशुभ आश्रम मुनि करिती। उचित वास हिमभूधर देती ।।

**दो०–सदा सुमन-फल-युत नवे द्रुम नाना होतात ।।**
**प्रगटति सुंदर पर्वतीं मणि खाणी बहु तात ।।६५।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ९ वा

पावन जल सरिता सब वाहति। खग मृग मधुप सुखी सब राहति ।।
सहज वैर सब जीवीं त्यजिलें। प्रेम गिरीवर करिती सगळे ।।
शोभे गिरि गिरिजा गृहिं येतां। रामभक्ति जन जसा पावतां ।।
नित्य नवें मंगल गृहिं त्याचें। ब्रह्मादिक यश गाती ज्याचें ।।
वृत्त सकल नारदा मिळालें। कुतूहलें गिरि-गेहा आले ।।
करि गिरिपति सुस्वागत्‌म सादर। प्रक्षालुनि पद दे आसन वर ।।

मुनिवर्यदि पत्नीसह शिर नमवी । चरणसलिल सब भवनिं शिंपवी ॥
निज सौभाग्या बहु गिरि गाई । आणुनि धालि मुलिस मुनि-पाईं ॥

**दो० त्रिकालज्ञ सर्वज्ञ तुम्हि गति सर्वत्र तुम्हांस ।**
**वदा बघुनि मनिं मुनिवर तनयादोषगुणास ॥ ६६ ॥**

वदले हसुनि गूढ मृदुवाणी । तुमची तनया सब गुणखाणी ॥
सुंदर सहज सुशील शहाणी । नाम उमा अंबिका भवानी ॥
सब लक्षणसंपन्न कुमारी । होइ पतिप्रिय संतत भारी ॥
अचल सदा सौभाग्यहि राहिल । माय बाप यश हिनें पावतिल ॥
होइल पूज्य सकल जगता ही । हिज सेवत दुर्लभ ना कांहीं ॥
हिचें नाम जगिं नारी स्मरतिल । पतिव्रतीं असिधारीं चढतिल ॥
तुमची तनया शैल ! सुलक्षण । श्रुणु अवगुण जे दोन चार पण ।
अगुण अमान जननिपितृहीनहि । उदासीन बस शंकाक्षीणहि ॥

**दो० जोगी जटिल अकाम मन नग्न अमंगल वेष ॥**
**स्वामि मिळेल असा हिला करीं असे अशि रेख ॥६७॥**

खरी मुनिगिरा परिसुनि गमली । दुःख दंपतिस, उमा हर्षली ॥
भेद नारदाहि न हा कळला । दशा एक परि भाव वेगळा ॥
सकल सखी गिरिजा गिरि मथना । तनु पुलकित जल भरलें नयनां ॥
मृषा नव्हें देवर्षीभाषित । उमा वचन तें दृढ मनिं राखित ॥
उपजे शिवपदपद्मीं स्नेहो । प्राप्ति कठिण अति मनिं संदेहो ॥
लपवी प्रीतिस कुसमय जाणुनि । सखिउत्संगिं बसे मग जाउनि ॥

देवर्षीचें वच मिथ्या नहि । सुज्ञ सखी दंपती सशोक हि ॥
वदे धीर धरुनी गिरिराया । नाथ ! वदा करुं कवण उपाया ॥

**दो०–श्रुणु हिमवंता ! मुनि म्हणे ब्रह्मलिखित जें भाळिं ॥**
**दे वदनुज नर नागमुनि कुणि न शक्त जो टाळि ॥६८॥**

तदपि मांगतो एक उपाया । होई, करी जर दैव सहाया ॥
तुम्हां कथित मी, वर तैसा ही– । मिळे उमेला संशय नाहीं ॥
दोष वराचे जे सांगितलें । शिवापाशिं सव हें मज गमलें ॥
शंकरासि जर विवाह होइल । दोषहि गुणसम सर्वहि वदतिल ॥
जरि करि हरि अहिशेजे शयना । तरि बुध कांहीं देति दोष ना ॥
भानु कृशानु सकल रस खाती । कोणि न मंद तयां म्हणताती ॥
सलिल सकल शुभ अशुभ वाहतें । गंगे कुणि अपवित्र न म्हणतें ॥
दोष समर्था नहि हृषिकेशा । रवि–पावक–गंगे–सम लेखा ॥

**दो०–स्पर्धा जर अशि करिति नर जड अभिमानी ज्ञान ॥**
**पडती कल्पभर नरकिं ते जीव किं ईशसमान ॥ ६९ ॥**

जाणुनि गंगाजलकृत वारुणि । पान करिति ना संत तया कुणि ॥
गंगे मिळतां पावन जैसें । ईशअनीशीं अंतर तैसें ॥
सहज समर्थ शभु भगवान । या विवाहिं सर्वंचि कल्याण ॥
दुराराध्य परि असति महेश्वर । करतां क्लेशां तोषति सत्वर ॥
जर तप तुमची करिल कुमारी । फिरवुं शकति भावीहि पुरारी ॥
जगामाजि बहुवर विविधा जरि । शिवाहुनी हिज नहिं दुसरा तरि ॥

वरदाता प्रणतार्ति–विभंजन । कृपासिंधु सेवकमनरंजन ॥
इच्छितफळ विण शिवआराधन । देति न कोटि योगजपसाधन ॥

**दो०–मुनि असं वदुनी स्मरुनि हरि दे गिरिजे आशीस ॥**
**हें कल्याण घडे अतां शंका त्यजा गिरीश ॥७०॥**

मुनि वदुनी विधिभवना वळले । ऐका चरित पुढें जें घडलें ॥
पतिस वदे एकांतीं मयना । नाथ न उमजें मी मुनिवचना ॥
जर घर वर कुल असेल अनुपम । द्यावि वरा अनुरूप सुता मम ॥
ना तर वरें कुमारी राही । प्राणप्रिय मम, कान्त ! उमा ही ॥
वर जर गिरिजे मिळेल योग्य न । गिरिजड सहज वदति जगिं लोक न ॥
हें समजुनि पति करा विवाहा । मग उरदाह न जेणें व्हावा ॥
वदुनि पडे शिर ठेवुनि पायां । सुस्नेहें वदले गिरिराया ॥
अग्नि निघे हिमकरिं जरि पाही । नारदवचन अन्यथा नाहीं ॥

**दो०–प्रिये शोक सब सोड हा स्मर कीं श्रीभगवान ॥**
**पार्वतीस जो निर्मि तो करिल सकल कल्याण ॥७१॥**

स्नेह सुतेवर असे अतां जर । द्या जाउनि उपदेश असा तर ॥
करि तप जेणें महेश मिळती । अन्य उपायें क्लेश न टळती ॥
नारदवचन सगर्भ सहेतू । सुंदर सब गुणनिधि वृषकेतू ॥
अशा विचारें धर न अशंका । शंकरि जागा नाहिं कलंका ॥
हर्षे मनिं पतिवचन ऐकुनी । गत गिरिजेप्रति सत्वर उठुनी ॥
उमे बघुनि लोचनि जल येई । स्नेहें तिज मांडीवर घेई ॥

वारंवार धरी उरिं तिजला। कंठ दाटला शब्द नुमटला ॥
जगदंबा सर्वज्ञ भवानी। मातृसुखद वदली मृदुवाणी ॥

**दो०-पडले माते स्वप्न तें वदतें ऐक विशेष ॥**
**सुंदर गौर सुविप्रवर मज करि हा उपदेश ॥७२॥**

कर तप शैल कुमारी जाउनि। नारद वचना सत्यचि जाणुनि ॥
रुचतें हें मत ताता माते। दोष दुःख हरि तप सुखदाते ॥
तपोवलें रचि विश्व विधाता। विष्णु तपवलें जगतां त्राता ॥
तपोवलें करि हर संहारा। शेष तपबळें धरि महिभारा ॥
सृष्टिस तप आधार भवानी। जाउनि तप करधर हें ध्यानीं ॥
माता विस्मित वचना ऐकुनि। सांगे स्वप्न गिरिस बोलावुनि ॥
समजाउनि बहु ताता माते। हर्षें गेली उमा तपातें ॥
प्रिय परिवार पिता नी जननी। होति विकल वच नुमटे वदनीं ॥

**दो०-समजाविति सकला मुनि वेदशिरा येऊन ॥**
**पार्वति-महिमा परिसुनी राहति बोध ठसून ॥७३॥**

धरि उरिं उमा प्राणपति-चरणां। गत वनिं लागे तप-आचरणा ॥
अति कोमल तनु योग्य तपा ना। स्मरुनि पतिपदां त्यजि भोगांनां ॥
नित्य अधिक मन पदिं अनुरागे। विसरे देह तपीं मन लागे ॥
खाइ मूल फल वर्षे दशशत। शाक खात संवत्सर शत गत ॥
किति दिन गेले जल-वातावर। करि उपवास कठिण किति वासर ॥
बिल्वपत्र पडलेलें वाळुनि। तें वर्षें त्रय सहस्र खाउनि ॥

पुन्हां त्यागि ती शुष्कहि पर्णा । उमे नाम तैं पडे अपर्णा ॥
क्षीण वघुनि आत उमाशरीरा । ब्रह्मगिरा गगनीं गंभीरा ॥

**दो०—सुफल मनोरथ होइ तव श्रुणु गिरि-राज-कुमारि ॥**
**क्लेशां दुःसह थांबवी मिळति अतां त्रिपुरारि ॥७४॥**

कोणि न कृत तप असें भवानी । बहुत धीर मुनि झाले ज्ञानी ॥
धर हृदिं अतां ब्रह्म वर वाणी । सदा सतत शुचि सत्य जाणुनी ॥
येइ पिता बोलावूं जेव्हां । हट्ट सांडुनी जा घरिं तेव्हां ॥
सप्त ऋषी भेटती तुम्हां जैं । सत्य गणावी श्रेष्ठ गिरा तैं ॥
श्रवुनि गिरा विधि गगनीं वर्णित । हर्षित गिरिजा शरीर पुलकित ॥
उमाचरित मी कथिलें सुंदर । ऐका शंभु-चरित्र मनोहर ॥
जाउनि सती तनू जैं त्यागी । तैं पासुनि शिवचित्त विरागी ॥
जपती रघुपति नामा संतत । रामगुणगणां कुठेंहि ऐकत ॥

**दो०—चिदानंद सुखधाम शिव विगत मोहमदकाम ॥**
**महिवरि फिरतो हृदयिं हरि सकल लोक अभिराम ॥७५॥**

कुठें प्रबोधिति मुनिनां ज्ञाना । कुठें वानिती राम-गुणांनां ॥
अकामही भगवान सुज्ञ जरि । भक्तविरहदुःखें दुःखी तरि ॥
बहुत काळ गेला या रीतीं । नित्य नवी रामांघ्रीं प्रीती ॥
शंकर नेमा प्रेमा पाहुनि । भक्ति चिन्ह अविचल हृदिं लक्षुनि ॥
प्रगटति राम कृतज्ञ कृपालू । रूपशीलनिधि तेज विशालू ॥
बहुपरि राम शंकरा वानिति । कोण तुम्हांविण हें व्रत पाळिति ॥

राम शिवा विविधा समजावति । जन्मकथा पार्वतिची सांगति ॥
करणी गिरिजेची अति पावन । विस्तारें वानिती कृपाधन ॥

**दो०–श्रुणु मम-विनती अतां शिव । स्नेह मजसि जर साच ॥**
**जाउनि गिरिजे उद्वहा हें मी मागत द्याच ॥ ७६ ॥**

शिव वदले हें उचित नसे जरि । नाथवचन मज न भंगवे तरि ॥
पालन आज्ञा धरुनी माथां । परम धर्म हा अमचा नाथा ॥
माता–पिता–गुरू–प्रभुवचनें । शुभ जाणुनि, विण विचार करणें ॥
तुम्हीं परमहितकारि सर्वपरिं । आज्ञा अपुली नाथ शिरावरि ॥
प्रभु संतोषित शंकर-वचनें । भक्ति–विवेक–धर्मयुत रचनें ॥
प्रभु वदले कृत पूर्ण हरा ! पण । कथित आम्हि तें मनीं धरा पण ॥
अंतर्धान वदुनि असं पावति । त्या मूर्तिस शंकर उरिं राखति ॥
तों ऋषि सप्त निकट शिव आले । प्रभु सुंदर अति वचन बोलले ॥

**दो०– प्रेम- परीक्षा पोचुनी पार्वतिपाशि पहावि ॥**
**प्रेरुनि गिरि संशय हरुनि धाडुन सदना द्यावि ॥७७॥**

तैं ऋषी गौरीपाशी आले । बघुनि दशा ते विस्मित झाले ॥
गौरी दिसली ऋषींस कैसी । मूर्तिमतीच तपस्या जैसी ॥
ऐक वदति मुनि शैलकुमारी । कारण कवण करां तप भारी ॥
कुणा उपासुनि काय इच्छितां । सत्य मर्म कां अम्हां न वदतां ॥
वदत मर्म अति मन संकुचतें । ऐकुनि हसाल अमचे जडते ॥
हट्ट धरी मन मानि न शिकवण । भिंत वारिवर बांधु पाहि पण ॥

नारद कथितचि सत्य मानतों । पंखाविण आंम्हि उडूं पाहतों ॥
पहा मुनी आमची मूर्खता । इच्छूं सदा शिवासी भर्ता ॥

**दो०–परिसुनि ऋषि वदले हसत गिरिसंभव तव देह ॥**
**नारद वचनां मानितां राहि कुणाचें गेह ॥७८॥**

दक्ष सुतां उपदेशिति जाउनि । बघती ते न भवनमुख येउनि ॥
चित्रकेतुघर तेच भंगविति । कनककशिपुचि ती गति करविति ॥
मानिति नारदवच नरनारी । त्यजुनि खचित घर बनति भिकारी ॥
मन कपटी वर सज्जन दिसतो । अपणांसम सकलां करुं बघतो ॥
तद्वचनीं ठेवुनि विश्वासा । करुं बघतां पति सहज उदास ॥
अगुण अलज्ज कुवेष कपाली । अकुल दिगंबर अगृही व्याली ॥
वदा कवण सुख मिळुनि असा वर । ठकें ठकवितां बहु ठकलां वर ॥
शिवें पंचमति सती विवाहित । फंदि पाडुनी त्यजुनि मारवित ॥

**दो०–सुखें निजे शुच ना अतां भीक मागि भव खाइ ॥**
**सहज एकटयाचें गृहीं स्त्री कधि टिकलीं जाइ ॥७९॥**

अझुनि आमचें वच माना बरं । आम्हि पाहिला तुम्हां वरा वर ॥
अति सुंदर शुचि सुशील सुखदहि । यद्यश लीला गाती वेदहि ॥
दूषणरहित सकलगुणरासी । श्रीपति पुर वैकुंठ निवासी ।
तुम्हां असा वर देउं मिळवुनी । ऐकुनि वदे भवानी हसुनी ॥
सत्य वदां तनु ही गिरिभव खरि । हट्ट सुटेना सुटे देह जरि ॥
कनक पहा पाषाणि जाहले । त्यजी स्वभाव न जरी जाळलें ॥

म्यां नारदवच नच परिहरणें । राहों गृह जावो ना डरणें ॥
विश्वास न गुरुवचनीं ज्यासी । स्वप्नि सुगम सुख सिद्धि न त्यासी ॥

**दो०–महादेव अवगुण भवन विष्णु सकलगुणधाम ॥**
**ज्याचे मन रमलें जिथें त्याला तिथेंच काम ॥८०॥**

प्रथम मुनीश तुम्हीं येतां जर । धरत्यें तुमचें वचन शिरावर ॥
हरलें मी मम जन्म हरा जर । कोण दोष गुण बघे अतां तर ॥
जर मन तुमचें हठ सोडी ना । लग्न जमविल्याविण राहीना ॥
कौतुकि पुरुषां आळस नाहीं । अमित जगामधिं वर कन्या ही ॥
कोटि जन्म हठ करिन तपासी । राहिं कुमारि किं वरिन शिवासी ॥
त्यजीं कधिं न नारदवचना पण । शिव शतदां सांगति जरि आपण ॥
धरतें पाय वदे जगदंबा । घरिं जावें कां करां विलंबा ॥
प्रेम बघुनि मुनि वदले ज्ञानी । जय जय जगदंबिके भवानी ॥

**दो०–तुम्हि माया भगवान शिव सकल विश्वपितृमाय ॥**
**निघति नमुनि मुनि शिरपदीं कितिदां हर्षित काय ॥८१॥**

❖ ❖ ❖

## अध्याय १० वा

जाउनि मुनि हिमवंता धाडिति । ते विनवुनि गिरिजे गृहिं आणिति ॥
शिवाकडे पुनरपि ऋषि जाती । निवेदिती त्यां उमाकथा ती ॥
श्रवतां स्नेहमग्न शिव होती । सप्तर्षी हर्षित गृहिं जातीं ॥

शंभु सुज्ञ मग मना स्थिरावति । रघुपतिचें घ्याना करुं लागति ।।
तैंच तारकासुर बलि भारी । झाला तेजप्रतापधारी ।।
लोक लोकपति सब तो जिंकित । झाले सुर सुखसंपद् विरहित ।।
अजर अमर ना जाइ जिंकला । करुन विविध रण सुरगण थकला ।।
जाउनि विरिंचिला आळवलें । दु:खी देव विधिस आढळले ।।

**दो० समजाउनि विधि वदति तैं दनुज निधन होईल ।।**
**शंभुशुक्रसंभूतसुत तो या रणिं जिंकील ।। ८२ ।।**

मी वदतो त्या करा उपाया । होईल, ईश्वर करिल सहाया ।।
सती दक्षमखिं जी त्यजि देहा । जन्मा जाइ हिमाचल गेहा ।।
कृत तप तिनें शंभुपतिलागीं । समाधिस्थ शिव सगळें त्यागी ।।
जरि भारी दुष्करता गमते । ऐका सांगूं गोष्ट एक ते ।।
जाउन धाडा काम शिवासी । शंकर-मनिं करुं द्या क्षोभासी ।।
जाउनि मग शिवपदिं शिर नमवूं । भीड घालुनी विवाह करवूं ।।
हाच सुरहिता उपाय उत्तम । सर्व वदति कीं मत हें अनुपम ।।
प्रस्तुति कृत अमरीं अतिहेतू । प्रगटे विषमबाण झषकेतू ।।

**दो० निज विपदा सुर सांगती परिसुनि करी विचार ।।**
**शंभुविरोधि न कुशल मम हसुनि वदे असं मार ।। ८३ ।।**

तदपि करिन कार्या तुमचे बरं । वेद वदे उपकार धर्म पर ।।
परहितसाधनिं त्यजि देहाला । सदा प्रशंसिति संत तयाला ।।
निघे नमुनि सर्वां मग मस्तक । सुमन–धनू करिं, समेत हस्तक ।।

जात मार अस चिंतित चित्तीं । शिवविरोधिं मृति अम्हां निश्चितीं।।
तैं प्रभाव अपला विस्तारी । करि निजवश सकलां संसारीं ।।
कोपे यदा वारिचरकेतू । नष्ट सर्पादि सगळे श्रुतिसेतू ।।
ब्रह्मचर्य संयम नाना व्रत । धैर्य धर्म विज्ञान बोध युत ।।
सदाचार जप योग विरागहि । सभय विवेक कटक सब पळतहि ।।

**छंद०–पळला विवेक सहाय सह रणिं विमुख सुभटहि जाहले**
**सद्ग्रंथ-पर्वत-कंदरीं ते लपुन जाऊन राहले ।।**
**होणार हे ! विधि ! काय ? रक्षक कोण ! खळबळ जगभरीं ।**
**युग शीर्ष कोण किं काम कार्मुक कुपित करिं घे शर वरीं ।।१।।**

**दो०– जे सजीव जगिं अचर चर नर वा नारी नाम ।।**
**निज मर्यादा त्यजुनि ते सब झाले वश काम ।।८४।।**

सर्वां मनीं मदनअभिलाषा । बघुनि लता लववििति तरु शाखा ।।
नद्या फुगुन सिंधूप्रति पळती । पुष्करिणींनां तलाव मिळती ।।
जिथें जडांची होइ दशा अशि । चेतन–करणी कोण वदे कशि ।।
खग मृग–नभ–जल–भूचर सगळे । बनुनि कामवश सभय विसरले ।।
लोक विकल सगळे मदनांधहि । कसा कशी दिन रात बघत नहि ।।
सुर किंनर नर असुरां व्याळां । प्रेत पिशाच भुतां वेताळां ।।
जी स्थिति वर्णन तिचें न केलें । जाणुनि संतत मन्मथ–चेले ।।
सिद्ध विरक्त महामुनि योगी । तेहि कामवश होति वियोगी ।।

**छंद०–जैं कामवश योगीश तापस पामरा गति का वदा ।।**
**स्त्रीमय चराचर पाहती ज्यां ब्रह्ममय दिसलें सदा ।।**

नारी विलोकिति पुरुषमयजग पुरुष नारीमय तसें ।।
ब्रह्मांड उदरीं दोन घडिभरि कामकृत कौतुक असें ।।१।।
सो०—धरला कोणि न धीर सकल मना मनसिज हरी ।।
ज्यां रक्षिति रघुवीर ते बचले त्या समयिं परि ।।८५।।
दोन घडी अस कौतुक होई । शंभु समीप काम जों जाई ।।
शिवा विलोकुनि शंका मारा । प्राप्त पूर्वीची स्थिति संसारा ।।
सुख सत्वर जीवांस समस्तां । जसें उतरतां मद मदमस्तां ।।
दुराधर्ष दुर्गम रुद्राला । वघुनि मदन भगवंता भ्याला ।।
फिरतां लाज, न करवे कार्या । घे शिर करतळिं रची उपाया ।।
शीघ्र रुचिर ऋतुराजा प्रगटवि । तरुराजी भ्राजे कुसुमित नवि ।।
उपवन वन वापिका तडागीं । परम सुभग दशदिशा-विभागीं ।।
जणुं ये पूर महा अनुरागा । वघुनि, मनोज मृतहि मनिं जागा ।।
छं० जागृत मनोभव मृतहि मनिं वदवे न वनशोभा जरा ।
शीतल सुगंधि सुमंद मारुत मित्र मदनानल खरा ।।
बहु सरसिं विकसित कंज मधुकरपुंज मंजुल गुंजती ।।
कलहंस शुक पिय मधुरकल रव, गाति सुरनटि नाचती ।।१।।
दो०— सकल कला कोटी करुनि कचला कटकसमेत ।।
चळे न अचल समाधि शिव कोपे हृदयनिकेत ।।८६।।
बघुनि रसाल विटपि विटपा वर । मदन रुष्ट चिडुनी चढला वर ।।
सुमन धनुर्षि निज शर संधानी । लक्षुनि कोपें आश्रुति ताणी ।।

सोडी विषम विशिख उरिं लागति । सुटे समाधि शंभु तैं जागति ।।
क्षुब्ध ईशमन फार जाहलें । दशदिशिं उघडुनि नयन पाहलें ।।
सौरभपल्लवि मदन विलोकित । होइ कोप तैं त्रिलोकि कंपित ।।
तिजा नयन तैं शिवें उघडला । निरखत जळुनी काम भस्मला ।।
हाहाकार होइ जगिं भारी । सभय सकल सुर सुखी सुरारी ।।
स्मरुनि कामसुख शोचति भोगी । होती अकंटक साधक योगी ।।

**छं०-योगी अकंटक होति पतिगति परिसतां मूर्च्छित रती ।**
**विलपे रडे बहु करत शोका जाइ शंकरनिकट ती ।।**
**कर जोडि, सन्मुख राहुनी सप्रेम विनवी बहुपरीं ।**
**प्रभु आशुतोष कृपाळु अबला बघुनि शिव वदले तरी ।।१।।**

**दो०-रति ! तव नाथा येथुनी होइल नाम अनग ।।**
**व्यापिल वपुविण सर्व तो श्रुणु भेटिचा प्रसंग ।।८७।।**

जैं यदुवंशि कृष्ण अवतार । हरण्या होइ महा महिभार ।।
कृष्णतनय होईल तुझा पति । वचन अन्यथा मम न घडे रति ! ।।
रति शंकरवच परिसुनि परते । सांगु अतां, श्रुणु कथा अपर ते ।।
देवां सवहि वृत्त समजलें । ब्रह्मादिक वैकुण्ठीं जमले ।।
सब सुर विष्णु विरंचि-समेत । जाति जिथें शिव कृपानिकेत ।।
पृथक् पृथक् कृत तिहीं प्रशसा । केले प्रसन्न शशिअवतंसा ।।
कृपासिंधु वदले वृषकेतू । अमर काय आगमनीं हेतू ।।
विधि वदले प्रभु ! अंतर्यामी । तदपि भक्तिवश विनवूं स्वामी ।।

**दो०-सकल सुरा हृदयीं असा शंकर ! परमोत्साह ।।**
**निज नयनीं बघुं वांछिती तुमचा नाथ ! विवाह ।।८८।।**

हा उत्सव बघुं भरून लोचन । करणें तेंच, मदन मद मोचन ! ।।
जाळुनि काम दिला रतिला वर । हें केलें अतिभलें कृपाकर ।।
शासन करुनी प्रसाद करती । नाथ ! समर्थां प्रकृति सहज ती ।।
पार्वतिनें कृत तपा अपारा । आतां करणें तदंगिकारा ।।
श्रवुनि विनति विधि, प्रभुवच समजुनि । घडो असेंचि वदति सुख मानुनि ।।
सुमनवृष्टि दुंदुभि रव करती । सुर, सुरनायक जयजय वदति ।।
येति सप्तऋषि अवसर जाणुनि । विधि सत्वर गिरिगृहिं दे धाडुनि ।।
प्रथम भवानी भवनीं वळले । मधुर वचन छलसंयुत वदले ।।

**दो० अमचा शब्द न मानिला नारद मुनि उपदेश ।।**
**झाला तुमचा वितथ पण कामा जाळि महेश ।।८९।।**

## मासपारायण, तृतीय विश्राम

## अध्याय ११ वा

ऐकुनि वदली हसुनि भवानी । उचित वदां मुनिवर विज्ञानी ।।
दग्ध काम आतां, मत अपलें । शंभु आजवरि कामी ठरले ।।
अमचे मतें सदाशिव योगी । अज अनवद्य अकाम अभोगी ।।
मी कृत शिव सेवा भावें या । प्रेमें जर मन वाणी–कायां ।।

तर ऐका अमचा पण मुनिवर ! । करितिल सत्य कृपानिधि ईश्वर ।।
कथित तुम्हीं हर मारा जाळति । तो अपला अविवेक महा अति ।।
तात अनलिं सहज हा स्वभावो । हिम न शके कधि समीप जावों ।।
नष्ट निकट जातांच अशेषीं । न्याय तोच कीं, मदनमहेशीं ।।

**दो० वचनें मुनि मनिं हर्षले प्रीति बघुनि विश्वास ।।**
**जाति भवानिस नमुनि शिर जिथें गिरीशनिवास ।। ९० ।।**

वृत्त सकल गिरिपतीस सांगति । मदन दहन ऐकुनि दुःखी अति ।।
मग कथिले रति वरदानाला । ऐकुनि सुख बहु हिमवानाला ।।
शंभूप्रभुता चित्तीं आणुनि । घे सादर मुनिवर बोलावुनि ।।
सुदिन सु-घटि- नक्षत्र बघवुनी । वेगिं वेदविधि लग्न ठरवुनी ।।
सप्तर्षिस पत्रिका समर्पिति । धरुनि पदांस हिमाचल विनविति ।।
जाउनि विधिला ऋषि देती ती । वाचित मनिं ना मावे प्रीती ।।
विधि वाचुनि पत्रिका दाखवति । हर्ष सकल मुनि सुरगण पावति ।।
पुष्पवृष्टि नभिं वाजे वाजति । दश दिशिं मंगल कलशां साजति ।।

**दो०-सजूं लागले सकल सुर वाहन विविध विमान ।।**
**होति शकुन मगल शुभद करिति अप्सरा गान ।।९१।।**

शिवगण शिवशृंगारा करिती । जटामुकुटिं अहिमौर सजविती ।।
व्याल-कुण्डले-कंकण घालिति । व्याघ्राजिन पट विभूति लाविति ।।
शशि ललाटिं, गंगा शिरिं सुंदर । नयन तीन उपवीत सर्पवर ।।
गरळकंठ, उरिं नृ-मुंड-माला । अशिव वेष शिवधाम कृपाला ।।

करीं त्रिशूळ नि डमरु विराजे । निघति बसुनि वृषिं वाजति बाजे ॥
बघुनि शिवा सस्मित सुरललना । जगिं वर लायक वधू प्राप्त ना ॥
विष्णुविरंचि आदि सुर-जातीं । निज निज वाहनिं वऱ्हाडि जाती ॥
सुर-समाज अनुपम नानापरिं । वर अनुसार वऱ्हाड नसे परि ॥

**दो०–विष्णू हसुनि वदले असें बोलावुनि दिग्राज ॥**
**अलग अलग व्हा चला सब निज निज सहित समाज ॥ ९२**

वरअनुसारी वऱ्हाड हें ना । परपुरिं जाउनि होइ हसें ना ! ॥
विष्णुवचें सुर हसुनि निराळे । निज निज सेने सहित निघाले ॥
सस्मित होति महेश मनोमन । व्यंग्य भाषणा हरिच्या खंड न ॥
प्रियवच कानीं प्रिय अति पडलें । भृंगी प्रेरुनि गणां वाहले ॥
शिवशासन परिसुनि गण जमले । प्रभुपदपद्मिं तिहीं शिर नमलें ॥
नाना वाहन वेषां नाना । शिव हसले बघुनी स्वगणांनां ॥
कुणि मुखहीन कुणा बहु आनन । पद बहु बाहु कुणा कर पाय न ॥
कुणा चक्षु बहु कुणा नसे ही । धष्ट पुष्ट कुणि अति कृश-देही ॥

**छं०–कृश-देहि अति कुणि पीन पावन कुणि अपावन गति धरी ।**
**भूषण कराल कपाल करिं, सब सद्यशोणित तनुवरी ॥**
**खर–कुकर–शुकर–शृगाल–मुख गण वेषही अगणित तसे ॥**
**बहु जाति भूत पिशाच जोगि जमात वर्णन करुं कसें ॥ १ ॥**

**सो०–नाचति गाती गीत परम तरंगी भूतगण ॥**
**दिसती अति विपरीत कृति विचित्र वदती वचन ॥ ९३**

जसा वर तसें व-हाड आतां । कौतुक विविध होति पथि जातां ।।
इथें हिमाचल रचिति विताना । अति विचित्र ये वर्णाया ना ।।
शैल सकल जगिं जितके असती । लघु विशाल करवे ना गणती ।।
वन सागर सव नद्या सरांनां । धाडिति हिमगिरि निमंत्रणांना ।।
कामरुप सुंदर–तनु–धारी । सहित समाज सहित वरनारी ।।
सकल तुहिनगिरिगेहा जाती । स्नेहें मंगल गीतें गाती ।।
प्रथमचि गिरि वहु गृह शृंगारी । तिथें उतरलें यथाधिकारीं ।।
वघतां पुरशोभा अनुपमता । विरंचिची लघु गमे निपुणता ।।

**छंद०–लघु भासली विधिनिपुणता निरखून पुरशोभा खरी ।।**
**वन बाग सरिता कूप सर सब सुभग वर्णि किं कुणि तरी ।।**
**मंगल विपुल तोरण पताका ध्वज घरोघरिं शोभती ।**
**नरनारि सुंदर चतुर छवि बघुनी मुनी मनिं मोहती ।। १ ।।**

**दो०–जगदंबा जिथं अवतरे कोण वर्णि पुर तें हि ।।**
**ऋद्धि सिद्धि संपत्ति सुख नित्य अधीक नवें हि ।। ९४ ।।**

नगर निकट ये व-हाड, कळलें । पुरिं खळवळ सौंदर्य वाढलें ।।
कृत सुवेष वहु वाहन सजती । स्वागति सादर अणण्या जाती ।।
हर्षति हृदिं सुरसेना वघुनि । सुखी होति अति हरिस निरखुनी ।।
शिवसमाज जैं वघूं लागती । सकल वाहनें वुजून पळती ।।
धीर धरुनि परि सुजाण राहति । वाल जीव घेउनि सव धावति ।।
जातां भवनि वडील विचारति । वदति, भयें तनु थरथर कापति ।।

काय सांगुं की जाइ न वदलें। धाड यमाची वऱ्हाड कुठलें ॥
वर वेडा बसला वैलावर। व्याल कपाल राख भूषण वर ॥
छंद-वर भस्मनागकपालभूषित नग्न जटिल भयंकर।
सप्रेत भूत पिशाच जोगिणि विकटमुख रजनीचर ॥
जो जीत राहि वऱ्हाड पाहुनि पुण्य त्याचें अति खरें।
तो पाहि पार्वतिलग्न वदती घर घरीं पोरें भरें ॥ १ ॥
दो०-जाणुनि शंभुसमाज हा हसें मायशपांस ॥
बहुपरि समजाविति मुलां भ्या ना ठाव भयास ॥९५॥

## अध्याय १२ वा

स्वागति वऱ्हाड घेऊन आले। जानोसे त्या रुचिर अर्पिले ॥
सज्ज करी शुभ आरति मयना। गाती मंगल गीतें ललना ॥
कनकपात्र करिं. चारु भासतें। हर्षि हरा ओवाळुं चालते ॥
पाहुनि रुद्रा कराल वेषीं। अवला उरिं भयभीत विशेषीं ॥
घुसल्या सभय घरामधि धावत। गेले महेश जानोशाप्रत ॥
मैना चित्तीं दुःखी भारी। वोलाविली गिरीश कुमारी ॥
अंकीं बसवी स्नेहें भारी। श्याम-सरोज-नयनि ये वारी ।
या रूपा तुज विधि देई जो। कां जड वर वावळा सृजी तो ॥
छंद-कां बावळा वर निर्मि विधि जो तुजसि सौंदर्यास दे।
सुरतरुसि फळ जें उचित जबरीं बाभळीला येइ तें ॥

**गिरिवरुनि तुजसह पावकीं या मी पडेन किं सागरीं ॥**
**घर बुडो अपयश होउं जगिं जगतां विवाह न मीं करीं ॥१॥**
**दो०—विकल सकल अबला बघुनि गिरिनारी-दुःखास ॥**
**रडे वदे विलपतां अति स्मरुनि सुतास्नेहास ॥९६॥**

काय नारदा मी विधडीलें। गृह किं नांदतें मम बुडवीलें ॥
त्यांनी असें उमे शिकवीलें। मूढ वरास्तव तप आचरिलें ॥
त्यांस खरेंच न मोह न माया। उदासीन धन धाम न जाया ॥
परघरघातक लाज खेद ना। वांझ किं जाणे प्रसव-वेदना ॥
जननी व्याकुळ बघुनि भवानी। वदली विवेकयुत मृदु वाणी ॥
कर विचार शुच हा त्यज आई। ब्रह्मलिखित फिरविलें न जाई ॥
कर्मि लिखित जर नाथ बावळा। द्यावा का मग दोष कुणाला ॥
पुसशिल कीं तूं विधिचे अंका। घेसि वृथा कां जननि कलंका ॥

**छं०—कां घेसि जननि कलंक शोका सोड हा अवसर नसे।**
**जें दुःख सुख मम लिखित भालीं जाइं तेथें मिळतसें ॥**
**या उमा वचनिं विनीत कोमल सकल अबला शोचती।**
**बहुरीतिं विधिला देति दूषण नयन वारि विमोचती ॥ १ ॥**
**दो०—समाचार हा तुहिन-गिरि ऐकुनि त्या समयास ॥**
**नारदमुनि सह सप्तऋषि गेले शीघ्र गृहास ॥९७॥**

नारद समजाविति सर्वांला। सांगुनि पूर्व कथा-वृत्ताला ॥
ऐक सत्य, मैंने ! मम वाणी। जगदंबा तव सुता भवानी ॥

शक्ति अनादि अजा अविनाशिनि । सदा शंभु-अर्धांग-निवासिनि ॥
जग संभव–पालन–लयकारिणि । स्वेच्छें लीला-विग्रह-धारिणि ॥
प्रथम दक्ष-गृहिं जन्मे जाउनि । नाम सती सुंदर तनु पाउनि ॥
सती तिथें पण शिवा विवाही । विश्रुत विश्वीं सर्व कथा ही ॥
एक वेळ येतां शिव-संगा । पाहुन रघुकुल-कमल-पतंगा ॥
मोह होइ मानि न शिवभाषण । भ्रमें सिता-वेषा कृत धारण ॥

**छंद–घई सती सिय वेष या अपराधि शंकर टाकती ।**
**हरविरहिं गत जैं जनकमखि योगानलीं तनु दग्धती ॥**
**तत्र भवनिं जन्मुनि निजपतीस्तव ती तपा करि दुःसहा॥**
**गिरिजा सदा प्रिय शंकरा समजा त्यजा संशय महा ॥**
**दो०–ऐकुनि नारदवच उडे सर्वांचाच विषाद ॥**
**क्षणिं पसरे सगळ्या पुरीं घरिं घरिं हा संवाद ॥९८॥**

तैं मैना हिमवंत आनंदति । पुन्हां पुन्हां पार्वति पद वंदति ॥
जरठ तरुण बालक नर नारी । सर्व नगरजन हर्षित भारी ॥
आरंभिति पुरिं मंगल-गाना । सकल सजिति हाटकघट नाना ॥
स्वयपाक नानाविध झाला । जसा सूप-शास्त्रानें कथिला ॥
स्वयंपाक तो कोण किं वानी । वसे सदनिं जे जननि भवानी ॥
सादर सकल वऱ्हाड अणविती । विष्णु विरंचि येति सुर-जाती ॥
पंक्ति भोजना नाना बसती । निपुण वाढपी वाढुं लागती ॥
सुरां जेवतां स्त्रिया पाहती । मधुर उखाणे विविध घालती ॥

छंद–सुंदरि उखाणे मंजु घालति मर्म वचनें बोलती ।
सुर करिति भोजन सावकाश विनोद ऐकुनि हासती ॥
आनंद वाढे जवतां मुख कोटि वर्णिति केंवि तो ।
अचवून देतां पान जिथं जनवास ज्याचा जाइ तो ॥ १ ॥
दो०–लग्न पत्रिका वाचिती मुनि मग हिमवंतासि ॥
लग्नसमय अवलोकुनी बोलाविति देवांसि ॥ ९९ ॥
अणवुनि सादर सर्व सुरांनां । आसन उचित दिलें सर्वांनां ॥
सजिति वेदविधिवत वेदीतें । नारि गाति शुभ मंगल गीतें ॥
सिंहासन अति दिव्य सुशोभन । रचित विरंचि न करवे वर्णन ॥
बसति नमुनि शिव विप्रपदांनां । स्मरुनि हृदीं प्रभु निज रघुराणा ॥
तदा मुनीश उभे बोलाविति । सखी तिला शृंगारुनि आणिति ॥
बघत रूप सुर सर्व मोहले । वर्णिति छवि कवि विश्वि कोठले ॥
जगदंबा जाणुनि भव-भामा । करिती सुर निज मनीं प्रणामा ॥
सुंदरतासीमाच भवानी । वर्णुं शकति ना कोटिहि वाणी ॥
छं०–जगदंबिका शोभा महा मुखि वर्णवेना कोटि ती ।
श्रुति शेष लज्जित शारदा, मग मंदमति तुलसी किती ॥
छविखाणि गत माता भवानी मध्यमंडपि शिव जिथें ।
लाजे, शकेना पाहुं पतिपदपद्म मन मधुपचि तिथें ॥ १ ॥
दो०–मुनिअनुशासनि गणपतिसि पूजिति शंभुभवानि ॥
ऐकुनि संशय धरुं नका सुर अनादि घ्या ध्यानि ॥१००॥

श्रुति विवाहविधि वर्णिति जेवीं । करविति सकल महामुनि तेवीं ॥
घे गिरीश कुश कन्यापाणी । जाणुनि भवा समर्पि भवानी ॥
पाणिग्रहणा महेश करती । तैं सुरेश सब हृदयिं हर्षति ॥
वेदमंत्र मुनिवर उच्चरिती । जय जय जय शंकर सुर करती ॥
वाजति वाद्यें विविध विधानां । पुष्पवृष्टि गगनीं विध नाना ॥
झाला हरगिरिसुता विवाहू । सकल भुवनिं भरला उत्साहू ॥
दासीदास तुरग रथनागां । धेनु वसन मणि वस्तु विभागां ॥
अन्न कनक भाजनि वहु यानीं । आंदण दिलें कवण वाखाणी ॥

**छं०–आंदण दिलें विविधा करां मग जुळुनि हिमगिरि बोलले।**
**म्यां काय द्यावें आप्त कामा, धरुनि शिवपद राहले ॥**
**संतुष्ट शंकर सासऱ्या करिती कृपानिधि बहुपरीं ।**
**मग पाद पद्मां प्रेमपूरितमानसें मयना धरी ॥ १ ॥**

**दो०– नाथ ! उमा मत्प्राणसी गृह-किंकरी करा हि ॥**
**क्षमा अतां अपराध वर मजला प्रसन्न द्या हि ॥ १०१ ॥**

शंभु किती सासुस समजाविति । गता भवनिं शिर नमुनि पदांप्रति ॥
जननि उमे बोलावुनि घेई– । अंकीं सुंदर शिकवण देई ॥
संतत कर शंकरपदपूजा । नारिधर्म पति देव न दूजा ॥
लोचनिं वळलें वदतां वारी । मग आलिंगी हृदयिं कुमारीं ॥
का विधि जगिं निर्मी नारींना । पराधीन सुख तों स्वप्नींना ॥
प्रेम परम विव्हळ करि माते । जाणुनि कुसमय धरि धीरातें ॥

भेटे असकृत् धरी पद नमी । प्रेम परम करुं कसें कथन मीं ॥
उमा सकल नारींस भेटली । जाउनि जननीउरीं चिकटली ॥
**छं०-भेटुनि पुन्हां माते निघे सब देति आशिस उचित ही ।**
**फिर फिरुनि जननिस पाहते सखि नेति शंभुसमीप ही ॥**
**सब याचकां तोषूनि शंकर सह उमे गृहिं चालती ।**
**सब अमर हर्षति सुमन वर्षति वाद्य नभि बहु वाजती ॥१॥**
**दो०-प्रेमें अति हिमगिरि सवें पोचविण्या जातात ॥**
**बहु सांत्वुनी निरोप त्यां वृषकेतू देतात ॥ १०२ ॥**
शीघ्र भवनि आले गिरिराजा । अणवुनि शैलसरादि समाजा ॥
आदर दान विनति बहु मानें । बोळविलें सकलां हिमवानें ॥
शंभु यदा कैलासीं आलें । निज निज लोका देव निघाले ॥
पितरौ विश्वा शंभु भवानी । यास्तव तच्छृंगार न वानीं ॥
करित विविधविध भोगविलासां । गणांसहित वसति कैलासा ॥
प्रतिदिन हरगिरिजा विहार नव । काळ लोटला असा विपुल जंव ॥
जन्मे तदा कुमार षडानन । रणिं करि तारकअसुर विनाशन ॥
विश्रुत आगम निगम पुराणां । षण्मुखजन्म विदित सकलांना ॥
**छं०--जगविदित षण्मुख जन्म कर्म प्रताप पुरुषार्थहि महा ।**
**याकारणें वृषकेतुपुत्रचरित्र कृत संक्षेप हा ॥**
**हा उमाशंभुविवाह जे नर नारि गाती सांगती ।**
**कल्याण-कार्यि विवाहमंगलिं सर्वदा सुख पावती ॥ १ ॥**

**दो०-चरितसिंधु गिरिजारमण वेद न पावति पार ॥**
**तुलसिदास वर्णिल कसा अति मतिमंद गवार ॥१०३॥**

❖ ❖ ❖

## अध्याय १३ वा

सुंदर शंभुचरित्रा परिसुनि — । सरस; सुखी अति भरद्वाज मुनि ॥
कथालालसा वाढं भारी । तनु पुलकित अति लोचनिं वारी ॥
प्रेमविवश मुखि नुमटे वाणी । दशा बघुनि मुनि हर्षे ज्ञानी ॥
अहो ! धन्य तव जन्म मुनीश्वर । तुम्हां प्राणसे प्रिय गौरीश्वर ॥
शिवपदकमलीं रति ना ज्यांसी । ते स्वप्निहि ना प्रिय रामासी ॥
विश्वनाथपदिं प्रेम छलाविण । हेंच रामभक्ताचें लक्षण ॥
शिवसम कुणि रघुपतिचें व्रतधर । अनघ सतीशी स्त्री परिहृत वर ॥
दावि करुनि पण रामभक्तिला । कोणि किं शिवसा प्रिय रघुपतिला ॥

**दो०-प्रथमहि सांगुनि शिवचरित जाणें तव मर्मास ॥**
**रहित समस्त विकार शुचि तुम्हि रामाचे दास ॥१०४॥**

मी जाणें तुमचे गुण शीला । सांगु अतां शृणु रघुपतिलीला ॥
मुनि घडतां तव आज समागम । कसें सांगु सुख मिळे मना मम ॥
रामचरित अति अमित मुनीशा ! । वदवे ना शतकोटि अहीशां ॥
तदपि यथाश्रुत सांगुं सविस्तर । स्मरुनि गिरेशा प्रभुसि धनुर्धर ॥
दारुनारिसम वाणी, स्वामी — । राम सूत्रधर अंतर्यामी ॥
ज्या जन जाणुनि कृपाधार दे । नाचवि कवि-उरअजिरिं शारदे ॥

कृपाकरा प्रणमुनि रघुनाथा । विशद वर्णितो तद्गुण-गाथा ।।
परम रम्य गिरिवर कैलासीं । सदा जिथें शिव उमा निवासी ।।

**दो०–सिद्ध तपोधन योगिजन सुर किंनर मुनिवृंद ।।**
**तिथें वसति सुकृती सकल सेविति शिव सुखकंद ।।१०५।।**

हरिहर विमुखी धर्म रती ना । नर ते स्वप्नि तिथें जाती ना ।।
तिथें विटपवट विशाल, गिरिवर । नित्य नवा त्रय काळीं सुंदर ।।
त्रिविध पवन शीतल छाया अति । शिव-विश्राम विटप गाती श्रुति ।।
प्रभु एकदां तया-तळिं गेले । अति सुख उरिं तरु बघुनि उदेलें ।।
स्वकरिं नागरिपुचर्म पसरलें । शंभु कृपालु सहज वर बसले ।।
कुंद-इंदु-दर-गौर शरीरहि । दीर्घबाहु, मुनिपट परिधानहि ।।
चरण तरुण अरुणांभोजा सम । नखभा भक्तहृदयगत हरि तम ।।
भुजग-भूतिभूषण त्रिपुरारी । आनन शरदचंद-छवि हारी ।।

**दो०–जटामुकुट सुरसरित शिरिं लोचन नलिन विशाल ।।**
**नीलकंठ लावण्यनिधि भालिं चारु विधु बाल ।।१०६।।**

बसलेले शोभति कामारी । जेविं शांतरस शरीरधारी ।।
संधि पार्वति सुयोग्य मानी । शंभुपाशि गत जननि भवानी ।।
प्रिया जाणुनी कृत अति आदर । वामभागिं दे शुभासना हर ।।
हर्षित ती शिवसमीप बसली । मागिलजन्मकथा आठवली ।।
प्रेम अधिक पतिमनिं अनुमानी । विहसुनि वदे उमा मृदु वाणी ।।
कथा सकल लोकां हितकारी । तीच बघे पुसुं शैलकुमारी ।।

विश्वनाथ मम नाथ पुरारी । त्रिभुवन जाणे महिमा भारी ॥
देव नाग नर अग जग जगतीं । सकल कमलपद सेवा करती ॥

**दो०–प्रभु समर्थ सर्वज्ञ शिव सकल कला गुणधाम ॥**
**ज्ञानयोगवैराग्यनिधि प्रणतकल्पतरुनाम ॥ १०७ ॥**

मजसी प्रसन्न जर सुखरासी । समजा सत्य मला प्रिय दासी ॥
तर हरणें प्रभु ! मम अज्ञाना । वदुनि विविध रघुनाथ कथांना ॥
ज्याचें घर सुरतरुतळि राही । तो दारिद्र्य दुःख कधि साही ॥
शशिभूषण हें हृदयिं धरावें । महा भ्रमा मम नाथ ! हरावें ॥
प्रभु ! परमार्थवादि मुनि असती । ब्रह्म अनादि राम, ते म्हणती ॥
शेष शारदा वेद पुराणें । सकल करिति रघुपतिगुणगानें ॥
तुम्हि तर राम राम दिनरातीं । सादर जपा अनंगाराती ॥
राम अयोध्यानृपसुत तो ही । कुणि कि अगुण अज अलक्षगतिही ॥

**दो०–ब्रह्म कसा जर भूपसुत स्त्रीविरहें धी भ्रान्त ॥**
**बघुनि चरित महिमा श्रवुनि मम मतिला भ्रम नान्त ॥ १०८ ॥**

व्यापक अनीह विभु जर कोणी । नाथ वदा मज समजावोनी ॥
अज्ञ गणुनि हृदि रोष न धरणें । जाइ मोह मम तेवीं करणें ॥
वनिं मज राम प्रभुत्व दिसलें । अति भय विकल, न तुम्हांस वदले ॥
तदपि मलिन मन, बोध न येई । तत्फल उचित पदरिं मी घेई ॥
अझुन कांहि मम मनिं संशय ते । कृपा करा कर जुळुनि विनवतें ॥
बोध विविध मज कृत तैं प्रभुनीं । नाथ ! न रोष धरा तें स्मरुनी ॥

आतां तसला विमोह नाहीं । रामकथा मम रुचे मना ही ।।
वदा पुनीत रामगुणगाथा । भुजगराजभूषण सुर–नाथा ।।

**दो०–नाक घासुनी नमुनि पदिं विनवीं कर जोडून ।।**
**विवरा रघुवरविशदयश श्रुतिसिद्धान्त पिळून ।। १०९ ।।**

अधिकारी नारी नाहीं जरि । प्रभुदासी मनवच–कर्में तरि ।।
गूढहि तत्त्व न साधू लपवति । आर्त यदा अधिकारी पावति ।।
पुसतें अति आर्ता सुरराया ! । रघुपतिकथा वदावी सदया ।।
प्रथम विवंचुनि वदा कारणहि । ब्रह्म अगुण कां धरि वपु सगुणहि ।।
प्रभु मग वदा रामअवतारा । पुढें बालचरिताहि उदारा ।।
वदा जानकिस कशी विवाही । त्यजि राज्या त्या दूषण कांहीं ।।
वसुनि वनीं कृत चरित्र पार न । वदा नाथ हत केवीं रावण ।।
राज्यीं बसुनि कृत बहुलीला । वदा सकल शंकर सुखशीला ।।

**दो०–वदा कृपाकर कृत कसें रामें आश्चर्यास ।।**
**गत सप्रज रघुवंशमणि कैसे निजधामास ।। ११० ।।**

मग तें तत्त्व वदावें विवरुनि । यद्विज्ञानीं ज्ञानि मग्न मुनि ।।
ज्ञानभक्तिविज्ञानविरागा । सकल सांगणें सहित विभागां ।।
रामरहस्यां अनेक अपरां । प्रभु! अति विमलविवेकी! विवरा ।।
नाथ! न जें मज पुसतां आलें । ठेवुं नये तें गुप्त दयाले ।।
त्रिभुवनगुरु तुम्हि वेद वानती । क्षुद्र जीव किति आन जाणती ।।
प्रश्न उमेचे सहज मनोहर । कपटहीन शिवचित्ता रुचिकर ।।

हर-हृदिं रामचरित सब आलें। प्रेमपुलक लोचनिं जल भरलें ॥
श्रीरघुनाथ- रूप हृदिं आलें। परमानंद अमित सुख झालें ॥

**दो०--बुडे ध्यानरसिं दुघडि मन मग भानावर नेलि ॥**
**रघुपति चरित महेश तैं हर्षे वर्णू घेति ॥ १११ ॥**

मिथ्यहि सत्य गमे ज्या नेणुनि। जसा भुजंग, न रज्जु ओळखुनि ॥
लया जाइ जग जया जाणतां। स्वप्नींचा भ्रम जसा जागतां ॥
वंदु बालरूपा त्या रामा। सिद्धि सुलभ जपतां यन्नामा ॥
मंगलभवन अमंगलहारी। तो द्रवु दशरथ-अजिर विहारीं ॥
प्रणमुनि रामाला त्रिपुरारी। हर्षित सुधागिरा उद्गारी ॥
धन्य धन्य गिरिराज-कुमारी। तुम्हां समान न कुणि उपकारी ॥
पुसिले रघुपति कथा-प्रसंगां। सकललोक पावनि जग गंगा ॥
तुम्हि रघुवीरचरणिं अनुरागी। पुसले प्रश्न जगत-हित-लागी ॥

**दो०– रामकृपेनें पार्वती स्वप्निंहि तव मनिं कांहि ॥**
**शोक मोह संदेह वा भ्रम मज वाटे नांहि ॥११२।**

❖ ❖ ❖

## अध्याय १४ वा

तरी अशंका कृता तुवां जी। श्रवणिं कथनिं हितकर सर्वां ती ॥
जिंहि हरिकथा श्रुता नहिं कानां। श्रवणरंध्र अहिभवन हि माना ॥
नयनिं संत दर्शन ना करती। मोरपंखलोचन ते गणती ॥
तुलणें कडु तंबडिशीं शिर तें। हरिगुरुपदमूलिं न जें नमतें ॥

हृदयीं हरिभक्ति न आणिति जे । जीत शवासम गणा प्राणि ते ॥
गान रामगुण जीभ करी ना । ती दर्दुरजिव्हाच खरी ना ॥
निष्ठुर कुलिशकठोरा छाती । हरिचरिता श्रवुनि न हर्षे ती ॥
गिरिजे श्रुणु रामाची लीला । सुरहित दनुजविमोहनशीला ॥

**दो०-रामकथा सुरधेनु सम सेवत सब सुखदानि ॥**
**सत्‌समाज सुरलोक, हें कळुन न ऐके प्राणि ! ॥११३॥**

रामकथा सुंदर करटाळी । संशयविहगां दूर पिटाळी ॥
रामकथा कलिविटपकुठारी । सादर ऐक गिरीशकुमारी ॥
रामनाम गुण चरित्र शोभन । जन्म कर्म वदती श्रुति माप न ॥
अंत न जेंवि राम भगवाना । तथा कथा कीर्तीस गुणांनां ॥
तदपि यथाश्रुत तुजसि यथामति । वदतो वघुनि तुझी प्रीती अति ॥
उमे प्रश्न तव सहज चांगले । सुखद संतसंमत मज रुचले ॥
एक गोष्ट मजला नहि रुचली । जरी मोहवश भवानि ! कथिली॥
तुम्हि कथिलें जें राम दुजा कुणि । श्रुति गाती ज्या ध्याति महामुनि ॥

**दो०-श्रवति वदति असं अधम ज्यां लागे मोहपिशाच ॥**
**पाखडी हरिपदविमुख जाणति मृषा न साच ॥११४॥**

अज्ञ अकोविद अंध अभागे । विषय बुरशि मन मुकुरीं लागे ॥
फार कुटिल लंपट कपटी ही । स्वप्नि न संतसभा दिसली ही ॥
वदति वाणि ते वेद विसगत । लाभ हानि ना ज्यांना उमगत ॥
मुकुर मलीनां नयन विहीनां । रामरूप कसं दिसेल दीनां ॥

अगुण न सगुण विवेक जयांनां । ते जल्पति कल्पित वच नाना ॥
हरिमायावश विश्वीं भ्रमती । त्यां अघटित ना कांहिहि वदती ॥
वातुल भूतविवश मदमस्त । ते बोलति अविचारें ग्रस्त ॥
जिहिं कृत महामोहमदपाना । त्यांचे शब्द न घेणें कानां ॥

**सो०-असें स्वहृदिं सुविचारि, त्यज संशय भज रामपद ।।**
**शृणु गिरिराजकुमारि भ्रमतमरविकरवचन मम ॥११५॥**

सगुणि अगुणि काहीं नहि भेदहि । गाती मुनि पुराण वुध वेदहि ॥
जो अलक्ष अज अरूप अगुणहि । भक्तप्रेमें होतो सगुणहि ॥
जो गुणरहित सगुण तो केवीं । जल जलगार अलग ना जेवीं ॥
नाम जयाचें भ्रमतमभानु । त्या विमोहसंबंध वदा नु ॥
राम सच्चिदानंद दिनेशीं । नाहीं मोहनिशा लवलेशीं ॥
सहज प्रकाशरूप भगवाना । अरुणोदयविज्ञान कदा ना ॥
हर्ष खेद नी ज्ञानाज्ञानहि । जीवधर्म मी हा अभिमान हि ॥
व्यापी ब्रह्म राम जग जाणें । परमानंद परेश पुराणें ॥

**दो०प्रथित पुरुष जो प्रभानिधि प्रगट परावर नाथ ॥**
**रघुकुलमणि मत्स्वामि ते वदुनि नमिति शिव माथ ॥११६॥**

अज्ञानी भ्रम निज न जाणती । प्रभुवर जड निज मोह लादति ॥
घन घनपटल बघुनि नभिं भारी । म्हणती छन्न भानु कुविचारी ॥
लोचनिं अंगुलि घालुनि पाही । इंदु दोन दिसती त्याला ही ॥
रामाविषयीं उमे मोह ते । नभ जस तम रज धूम्रि शोभतें ॥

विषय इंद्रियें सुर जीवांसी । एकें चेतनता दुसऱ्यासी ॥
सर्वां परमप्रकाशक हि जो । राम अनादि अयोध्यापति तो ॥
जगत् प्रकाश्य प्रकाशक रामहि । मायापति ज्ञानगुणधामहि ॥
यत्सत्यत्वें जड जी माया । गमे सत्यशी मोह सहायां ॥

**दो०–रजत शुक्तिमधिं भासतें यथा भानुकरिं वारि ॥**
**मृषा त्रिकाळिंहि तरि कुणी शक्त न जो भ्रम वारि ॥११७ ।**

राही हरिआश्रित जग यापरिं । जरि असत्य देतें दुःखा तरि ॥
स्वप्नी शिर जर कोणि कापलें । जागृतिविण कधिं दुःख हरपलें ॥
ज्यांची कृपा असा भ्रम हरते । गिरिजे ! कृपालु रघुनायक ते ॥
कोणि यदन्त न आदि समजले । मतिअनुमानिं निगम असं वदले ॥
चळे अपद ऐके विण कानां । कर्म करांविण करि विध नाना ॥
भोगी सकल रसां मुख नाहीं । अति पटु वक्ता वाणिविना ही ॥
स्पर्शे तनुविण अचक्षु पाहे । घ्राण न, गंध अखिल घेता हे ॥
अशि सवपरीं अलौकिक करणी । कोण कसा तन्महिमा वर्णी ॥

**दो०–श्रुति बुध गाती ज्या असें मुनि धरिती यद्ध्यान ॥**
**ते दशरथसुत भक्तहित कोसलपति भगवान ॥११८॥**

काशीं मरत जंतु जैं बघतो । नामबलें ज्या विशोक करतो ॥
ते प्रभु मम विश्वाचे स्वामी । रघुवर सकल हृदंतर्यामी ॥
यन्नामा नर विवशहि वदती । वहु जन्मार्जित अघगिरि दहती ॥
जे स्मरणा नर सादर करती । भववारिधि गोपद इव तरती ॥

तो परमात्मा राम भवानी ! । भ्रम तिथं ! अति अविहित तव वाणी।।
हृदयिं आणतां संशय असले । ज्ञान विरति गुण पळती असले ।।
श्रुत्वा भवभंजक शिव-वचना । सकल विलयिंगत कुतर्करचना ।।
रघुपतिपदिं ये प्रतिती प्रीती । दारुण असंभावना गत ती ।।

**दो०– कितिदां प्रभुपद कमल धरि; पंकजपाणि जुळून ।।**
**बोले गिरिजा वचन वर प्रेमरसिं किं घोळून ।।११९।।**

परिसुनि तुमचे वच सम शशिकर । फिटे मोह शरदातप अतितर ।।
तुम्हि कृपालु सब संशय हरले । रामस्वरूप मज आकळलें ।।
नाथ ! कृपें पळविला विषादा । अतां सुखी प्रभु-पद-प्रसादां ।।
आतां जाणुनि मज निज किंकरि । नारी सहज अडाणी जड जरि ।।
पुसिलें मी जें प्रथम वदा तें । प्रभु जर असती प्रसन्न मातें ।।
ब्रह्म राम चिन्मय अविनाशी । सर्वरहित सब उरपुरवासी ।।
नाथ ! हेतु नरतनू धराया । मज वृषकेतु वदा समजाया ।।
श्रवुनि उमावच परम विनीत । रामकथेवरि प्रीति पुनीत ।।

**दो०–हृदिं हर्षति कामारि तें शंकर सहज सुजाण ।।**
**उमे प्रशंसुनि बहुपरीं वदले कृपानिधान ।।१२० रा।।**

## नवाह पारायण, प्रथम विश्राम

## मास पारायण, चौथा विश्राम

❖ ❖ ❖

## अध्याय १५ वा

**सो०–श्रुणु शुभ कथा भवानि ! रामचरितमानस विमल ।।**
**जी भुशुंडिवाखाणि ऐके खगनायक गरुड ।।१२० म।।**
**तो संवाद उदार घडे कसा सांगेन मग ।।**
**ऐक रामअवतार चरित परम सुंदर अनघ ।।१२०चं।।**
**हरिगुणनाम अपार कथा रूप अगणित अमित ।।**
**मी निजमति-अनुसार वदतो सादर उमे श्रुणु ।।१२०द्रा।।**

श्रुणु गिरिजे हरिचरित मनोरम । विपुल विशद गाती निगमागम ।।
हरिअवतारा हेतु कोणते । इदमित्थं वदले न जात ते ।।
राम अतर्क्य बुद्धिमनवाणीं । मत अमचें हें ऐक शहाणी ।।
तदपि संत मुनि वेद पुराणें । वदति कांहि जें मतिअनुमानें ।।
सुमुखि सांगतो तुजला तैसें । कारण मजहि समजलें जैसें ।।
जैं जैं येते धर्मा ग्लानी । माजन्ति असुर अधमअभिमानी ।।
करिति अनीति, न वदली जाई । सीदति विप्र धरा सुर गाई ।।
तैं तैं प्रभु वपु विविधा धरती । सज्जनपीडा कृपाब्धि हरती ।।

**दो०–स्थापि सुरां असुरां वधुनि निज राखी श्रुति सेतु ।।**
**जगिं विस्तारिति विशद यश रामजन्मि हा हेतु ।।१२१।**

तें यश गाति भक्त भव तरती । भक्तहिता तनु कृपाब्धि धरती ।।
हेतु रामजन्मास अनेक हि । एकाहुनि अति विचित्र एकहि ।।

एक दोन जन्मां मीं वानीं । श्रुणु सावध तूं सुमति भवानी ॥
द्वारपाल हरिचे प्रिय दोघे । जय नि विजय जाणती अवघे ॥
विप्रशापवश दोघे भ्राते । धरिति असुर तामस देहा ते ॥
कनककशिपु नी हाटकलोचन । जगविश्रुत सुरपतिमदमोचन ॥
रणविजयी विख्यात वीर; परि । एका वराहवपुधर वधि हरि ॥
दुसऱ्या मारी बनुनी नरहरी । प्रल्हादाचें सुयशा पसरी ॥

**दो०–होति वीर बलवन्त अति धरुनि असुरदेहास ॥**
**कुंभकर्ण रावण सुभट सुरजयि विदित जगास ॥१२२॥**

मुक्त न झाले हत भगवानें । जन्म तीन कीं द्विजवचनानें ॥
एके वेळीं हरि त्यां लागी । धरिति शरीर भक्तअनुरागी ॥
कश्यप अदिति तदा पितृमाता । दशरथ कौसल्या विख्याता ॥
एक कल्पि अवतार असा धरि । संसारीं पावन चरिता करि ॥
एक कल्पि सुर दुःखी दिसतां । सकल जलंधर-समरीं हरतां ॥
त्यासि शंभु करिती रण पार न । दनुज महाबल मारुन मरत न ॥
परम सती असुराधिपनारी । तिच्या बळें त्रिपुरारिस भारी ॥

**दो०–भंगुनि कपटें व्रत तिचें प्रभु करि सुरकार्यास ॥**
**मर्म तिनें जैं जाणलें दे कोपें शापास ॥१२३॥**

हरि तच्छापा प्रमाण मानी । भगवान् कृपालु कौतुकखाणी ॥
जलंधरें रावणवपु धरिलें । रामें रणिं हत परमपद दिलें ॥
जन्मा एका हेतु असे हा । ज्यास्तव रामें धृत नरदेहा ॥

प्रभुच्या प्रतिअवतार कथांनां । श्रुणु मुनि कविनीं वर्णित नाना ।।
शापिति नारद एके वारां । एक कल्प घे तरि अवतारा ।।
चकितचि गिरिजा ऐकुनि वाणि । विष्णुभक्त नारद तों ज्ञानी ।।
कारण काय कि मुनीश शापति । काय करी अपराध रमापति ।।
हा प्रसंग मज वदा पुरारी । मुनि मनिं मोह ! आश्चर्य भारी ।।

**दो०–वदले हसुनि महेश तैं कोणि मूढ ना ज्ञानि ।।**
**रघुपति करि जैं ज्या जसा होइ तसा तैं प्राणि । १२४ रा ।।**

❖ ❖ ❖

## अध्याय १६ वा

**सो०–वदूं रामगुणगाथ भरद्वाज आदरें श्रुणु ।।**
**भवभंजन रघुनाथ भज तुलसी त्यज मान मद ।।१२४ म ।।**

हिमगिरिगुहा एक अति पावन । सुरनदि वाहे समीप शोभन ।।
आश्रम परम पवित्र सुशोभन । बघुनि रमे अति देवर्षीमन ।।
बघुनि गिरि, नदी, विपिनविभागीं । रमे रमापति-पदानुरागीं ।
हरिला स्मरत शापगति बाधित । सहज विमल मन मग्न समाधित।।
सुरपति मुनिगति बघुनी भ्याला । बाहुनि सन्मानी कामाला ।।
हस्तकयुत जावें ममहेतू । निघे हर्ष मनिं जलचरकेतू ।।
सुनासीर धरि मनिं या त्रासा । इच्छी सुरर्षि मम पुरवासा ।।
जे कामी लोलुप या जगतीं । सकलां कुटिल काकसे डरतीं ।।

**दो०-सुकें हाड घे पळे शठ श्वान बघुनि मृगराज ।।**
**घेइल हिरुनि म्हणून जड तशि सुरपतिस न लाज ।। १२५ ।।**

त्या आश्रमा मदन जैं गेला । निजमायें ऋतु वसंत केला ।।
विविध विटप बहुरंगीं फुलती । कूजति कोकिल भृंग गुंजती ।।
त्रिविध मनोहर वाहे वारा । कामकृशानुस वाढविणारा ।।
रंभादिक सुरनारि नवीना । सकल विषमशरकलाप्रवीणा ।।
करिति गान सह तानतरंगां । क्रीडति विविधा पाणिपतंगा ।।
पाहुनि साह्या मदन हर्षला । बहुविध माया प्रपंच रचला ।।
व्यापि न कामकला मुनिला लव । स्वभयें पापी भीत मनोभव ।।
कोण तयाची सीमा भक्षक । ज्यासि रमापति महा सुरक्षक ।।

**दो०-सहित सहाय सभीत अति मदन मानि मनिं हार ।।**
**जाउनि धरि मुनिचरण तैं वदुनि दीन वच फार ।।१२६।।**

नारदमनिं मुळिं रोष न आला । प्रिय वचनें तोषवि कामाला ।।
घे आज्ञा नमुनी पदिं मस्तक । फिरला मदन सहित निज हस्तक ।।
मुनिची सुशीलता निज करणी । जाउनि सुरपति सभेंत वर्णी ।।
ऐकुनि सर्वहि विस्मय पावति । हरिसि नमिति मुनिवरा प्रशंसति ।।
मग नारद पोचले शिवाप्रति । जित मी कामा गर्व मना अति ।।
मारचरित शंकरांस सांगति । प्रिय अति जाणुन महेश शिकवति।।
वारंवार विनवुं मुनि तुजसी । निवेदिली ही कथा मज जशी ।।
हरिपाशीं तशि कधि न वदावी । निघे प्रसंग हि तरि लपवावी ।।

**दो०-हित उपदेशिति शंभु जरि नहिं नारदा पसंत ॥**
**भरद्वाज कौतुक बघा हरीच्छा च बलवंत ॥१२७॥**

राम करूं इच्छिति तें घडतें । कोणि नसे जो करी उलट तें ॥
शंभु-वचन मुनि-मना न आलें । तैं विरंचि-लोकास निघाले ॥
एकवार वर-वीणा-पाणी । गात हरिगुणां प्रवीण गानीं ॥
क्षीराब्धीं मुनिनाथ पोचती । श्रुति शिर जेथें श्रीपति वसती ॥
उठुनि रमापति मुदित भेटले । ऋषि समवेत निजासनिं बसले ॥
चराचरेश्वर वदले विहसुनि । केली बहुदिनिं दया आज मुनि !॥
कामचरित नारदें वर्णिलें । पूर्विच यद्यपि शिवें वर्जिलें ॥
अति रघुपतिची प्रचंड माया । मोहि न कोणा जगिं जाता या ॥

**दो०-करुनि रुक्ष मुख मृदु वचा वदले श्रीभगवान ॥**
**तुमचें स्मरणें पळति कीं मोह मार मद मान ॥१२८॥**

मुने मोह मनिं होई त्यांचे । ज्ञान विराग हृदयिं ना ज्यांचें ॥
ब्रह्मचर्य रत तुम्हीं धीरधी । मनसिज पीडा शके करुं कधीं ॥
नारद वदति सहित अभिमाना । सकल कृपा तुमची भगवाना ॥
करुणानिधि मनिं बघति विचारुनि । महागर्व तरु उरिं ये उगवुनि ॥
त्या मी शीघ्र करिन उन्मूलन । सेवक-हितकारी अमचा पण ॥
मुनि हित होइल कौतुक मम पण । अशा उपाया योजिन वेळ न ॥
निघति नमुनि मुनि शिर हरिचरणीं । अहं प्रबल तैं अतःकरणीं ॥
तैं प्रेरिति निज माये श्रीपति । ऐका तिची कठिण करणी अति ॥

**दो०-विरचि नगर ती पंथि जया शत योजन विस्तार ॥**
**श्रीनिवासपुरिहुनि अधिक रचने किती प्रकार ॥१२९॥**

वसति नगरिं सुंदर नर नारी । जणुं बहु मनसिज रति तनुधारी ॥
त्या पुरिं वसे शीलनिधि राजा । सैन्य अमित गजवाजि समाजा ॥
शत सुरेशसम विभव, विलासहि । रूपतेजबलनीति निवासहि ॥
त्यास कुमारीं विश्वमोहिनी । श्री मोहे यद्रूप पाहुनी ॥
ती हरि माया सबगुणखाणी । शोभा तिची कोण कशि वानी ॥
करी स्वयंवर ती नृपबाळी । भूप अमित आले त्याकाळीं ॥
मुनि कौतुकी करुनि पुरिं गमना । पुसते झाले सकल पुरजनां ॥
श्रवुनि चरित सब, नृपगृहिं आले । बसवीले पूजुनी नृपालें ॥

**दो०-भूपति दाखवि नारदा तनयेला आणून ॥**
**नाथ हिचे गुण दोष सब वदा विचार करून ॥१३०॥**

रूप बघुनि मुनि विरति विसरले । बहुत वेळ मग बघतचि बसले ॥
तिचें लक्षणा निरखुनि भुलले । हृदयिं हर्ष, ना प्रगट बोलले ॥
जो हिज वरिल अमर तो होइल । रणीं कधीं जिंकिला न जाइल ॥
सेविति सकल चराचर त्याला । वरिल शीलनिधिकन्या ज्याला ॥
बघुनि सकल लक्षणं उरिं राखति । कांहि बनावट भूपा सांगति ॥
वदुनि नृपा तव सुता सुलक्षणि । निघती सचिंत नारद तत्क्षणिं ॥
करुं जाउन तो यत्न विचारीं । जेणें मजही वरिल कुमारी ॥
वेळ कुठें जप तप करण्याला । दैवा ! मिळे कशी बरं बाला ! ॥

**दो०-हवीं अशा वेळीं परम शोभा रूप विशाल ॥**
**ज्यां पाहुनि कुमरी रिझे मग घालिल जयमाळ ॥१३१॥**

मागूं हरिपाशीं सुंदरता । उशिर होय बा ! तिथें पोचतां ॥
हरिसम हितकर कोणि न मातें । तोच करो वेळिच साह्यातें ॥
परोपरीनीं तदा विनवलें । प्रभु कृपालु कौतुकी प्रगटले ॥
प्रभुस बघुनि मुनि लोचन निवले । काम होइलच हृदयिं हर्षले ॥
दीन आर्त अति वदुनि कथेतें । करा कृपा करणें साह्यातें ॥
द्या प्रभु मज अपुल्या रूपा या । अन्य उपाय न तिज पावाया ॥
नाथ दास मी जेणें हित मम । होइल, करणें तसें शीघ्रतम ॥
निजमायाबल विशाल बघुनी । दीन दयाल वदति मनिं हसुनी ॥

**दो०- जेणें होइल परमहित श्रुणु नारदा त्वदीय ॥**
**आम्हि तेंच करुं नान्य कीं वचन न मृषाऽस्मदीय ॥१३२॥**

मागि कुपथ्य गदाकुल रोगी । वैद्य न देई बघा मुनि योगी ॥
मी तसेंच तुमचे साधिन हित । होति वदुनि हें प्रभु अन्तर्हित ॥
मायावश मुनि झाले मूढ । कळली ना हरिगिरा अगूढ ॥
तिथें त्वरें ऋषिराज पोचले । जिथें स्वयंवर ठाण शोभलें ॥
बसले राजे सहित समाजां । निजासनीं बहु सजुनी साजां ॥
मुनिमनिं हर्ष कि रूप मला अति । वरिल मलाच, न चुकुन दुजाप्रति ॥
कृपाब्धिनें मुनिहित साधाया । दिलें कुरूप; न ये वर्णाया ॥
त्या लीले कोणि न अवगमती । नारद जाणुन शिर सब नमती ॥

**दो०–तिथें रुद्रगण दोन त्यां होते भेद कळे हि ।।**
**विप्रवेषिं फिरती बघत परम कौतुकी तेहि ।।१३३।।**

ज्या समाजि मुनि बसले होते । रूपाहंकृति हृदिं अधिका ते ।।
तिथें रुद्रगण बसले दोनी । विप्रवेषिं जाणे ना कोणी ।।
कूट वचन नारदा ऐकविति । देइ वरी हरि सुंदरता किति ।।
राजकुमारि रिझे छवि पाहुनि । यांस विशेष वरिल हरि जाणुनि ।।
दुसऱ्यांचे करिं मन मोहित मुनि । हसति शंभुगण अति सुख पावुनि ।।
मुनि जरि वचनां विचित्र परिसति । भ्रमित अमित मति मुळीं न उमगति
चरित विशेष न कुणा कळे तें । दिसे रूप परि नृपकन्येतें ।।
मर्कटमुखा भयंकर काये । बघतां हृदयीं क्रोध तिला ये ।।

**दो०–सखीं सहित सकुमारि जणुं चाले राजमराल ।।**
**फिरे निरीक्षित नृपगणां करसरोजजयमाल ।।१३४।।**

बसले नारद फुलून जिकडे । चाळवि चक्षु न चुकून तिकडे ।।
मुनि फिरफिरुनि उठति तळमळती । हरगण बघुनि दशा स्मित करती ।।
नृपतनुधर तिथं कृपाल आले । मुदित कुमारि घालि जयमाले ।।
लक्ष्मीपति गत घेउन नवरी । भूप समाजि निराशा जबरी ।।
मोहनष्टधी विकल अति मुनी । गाठ सुटुनि जणुं मुक्ता गळुनी ।।
सस्मित वदले हरगण तैं, मुनि ! । पहा मुकुरिं मुखवटा कि जाउनि ।।
वदुनि उभय अति सभय पळाले । मुनि निज मुख जलिं बघते झाले ।।
बघुनि वेष अति रोष वाढला । शाप घोर अति तयांस दिधला ।।

**दो०–व्हा निशिचर जा उभय ही कपटी पापि असां कि ॥**
**हरलां मज घ्या फल, पुन्हां कोणा मुनिस हसां कि ॥१३५॥**

मगजाळि बघति रूप निज भिळलें । तरि संतुष्ट न चित्तीं इवले ॥
अधर थरकती क्रोध मनासी । सपदि निघति कमलापतिपासी ॥
शाप देउं वा प्राण, ठरविले । मम उपहासा जगतिं करविलें ॥
मध्यमार्गि भेटति दनुजारी । सवें रमा ती राजकुमारी ॥
मृदु सुरनाथ वदति वचनाला । व्याकुळसे मुनि कुठें निघालां ॥
हें ऐकत अति कोप संचरे । मायाविवश बोध मति विसरे ॥
परसंपदा तुम्हां ना बघवे । ईर्षा कपट विशेषें करवे ॥
सिंधुमथनिं रुद्रास चकविलें । प्रेरुनि सुर विषपान करविलें ॥

**दो०–सुराऽसुरां विष शंकरा स्वयें रमा मणि चारु ॥**
**स्वार्थसाधु तुम्हि कुटिलही कपटि सदा व्यवहारु ॥१३६॥**

सहा स्वतंत्र न कोणि शिरावरि । रुचे मना जें तेंच करां तरि ॥
खला सुजन सुजना खल करतां । हर्ष विषाद न मनिं तिळ धरतां ॥
धीट बना ठकवुनि सकलानां । संतत उत्साही मन भय ना ॥
कर्म शुभाशुभ तुम्हां न बाधी । कोणि आजवर तुम्हां न साधी ॥
केला आज अहेर थोर घरिं । निज कर्माचा घ्या बदला तरि ॥
धरुनि फसविला मज जे देहा । तोच धरा मम शाप असे हा ॥
कीश वेष मज दिला भयानक । माकड होतिल तुम्हां सहायक ॥
मम अपकार तुम्हीं कृत भारी । दुःखी व्हाल वियोगें नारी ॥

**दो०–धरुनि शाप शिरिं हर्ष हृदिं प्रभु विविधा विनवून ।।**
**घे निजमाया-प्रबलते कृपाब्धि आकर्षून ।।१३७।।**

जैं हरि हरिती माया सारी । तिथें रमा ना राजकुमारी ।।
मुनि सभीत अति धरि हरिचरणा । पाहि ! वदे प्रणतार्ती हरणा ।।
ठरो मृषा मम शाप कृपालू । म्हणति मदिच्छा दीनदयालू ।।
मी वदलों कितितरि दुर्वचनें । पापनाश मम कसा ? मुनि म्हणे ।।
जा शंकरशतनामा जपणें । शीघ्र हृदयिं विश्राम पावणें ।।
प्रिय शिवसम मजला नहि कोणी । ही प्रतीति सोडा न चुकोनी ।।
कृपा पुरारि न करिति जयासी । भक्तिलाभ मम मुनि ! न तयासी ।।
महिं विचरा हें धरुनि उराशीं । अतां न माया येइ तुम्हांसी ।।

**दो०–प्रभु बहु मुनिला प्रबोधुनि पावति अंतर्धान ।।**
**सत्यलोकिं नारद निघति करत राम गुणगान ।।१३८।।**

हरगण मुनिस जात पथि पाहुन । विगत मोह मनिं विशेष हर्षुन ।।
नारदनिकट भीत अति आले । पाय धरुनि अति दीन म्हणाले ।।
मुनिवर ! आम्हीं हरगण विप्र न । कृत अपराध महा फळला पण ।।
शापानुग्रह करा कृपाळू । वदले नारद दीनदयाळू ।।
निशिचर जन्मा जरि दोघे जा । पावा विपुल विभव बलतेजा ।।
विश्वभुजवळें जिंका जेव्हां । विष्णु मनुजतनु धरतिल तेव्हां ।।
मरण समरिं हरि-करिं हि तुम्हांला । मुक्त व्हाल याल न जन्माला ।।
ते मुनिपदिं शिर नमुनि निघाले । जातां काळ निशाचर झाले ।।

**दो०–एक कल्पि या मुळें प्रभु धरिति मनुजअवतार ॥**
**सुररंजन सज्जन सुखद हरि भजन भू- भार ॥१३९॥**

ऐशा हरि-जन्मा-कर्मांना । सुंदर सुखद विचित्र न गणना ॥
कल्पीं कल्पीं प्रभु अवतरती । चारुचरित नानाविध करती ॥
तैं तै कथा-प्रबंधां पावन । रचुनी मुनीश करिती गायन ॥
अनुपम नाना प्रसंग वानिति । परिसुनि सुज्ञ न विस्मय मानिति ॥
हरि अनंत हरिकथा अनंत । श्रवति कथिति बहुविधि सब संत ॥
सुंदर रामचंद्र-चरितानां । कल्पकोटि पुरति न गातानां ॥
हा प्रसंग मी कथित भवानी । मोहति मुनि हरिमायें ज्ञानी ॥
प्रभु कौतुकी प्रणतहित-कारी । सेवत सुलभ सकल दुखहारी ॥

**सो०–सुर नर मुनि कुणि नाहिं ज्या न मोहि माया प्रबल॥**
**सुविचारें मनिं याहि भजा महामायापतिस ॥१४०॥**

❖ ❖ ❖

## अध्याय १७ वा

हेतु दुजा श्रुणु शैलकुमारी । वदूं विचित्र कथा विस्तारीं ॥
ब्रह्म अरूप अजहि जें निर्गुण । कोसल पुरनृप होण्या कारण ॥
तुम्हां फिरत वनिं जे प्रभु दिसले । बंधुसहित मुनिवेष घेतले ॥
बघुनि भवानी यच्चरिताला । सतीशरीरीं भ्रमिष्ट झालां ॥
ती छाया तव अझुनी न गता । भ्रमरुजहारी श्रुणु तच्चरिता ॥
लीला कृत जी त्या अवतारीं । सकल सांगुं मग मतिअनुसारीं ॥

भरद्वाज ! शंकरवच ऐकुनि । उमा सस्मिता प्रेमें लाजुनि ॥
वर्णुं लागले मग वृषकेतू । तो अवतार धराया हेतू ॥

**दो०–तो मी वदतो सब मुने शृणु मन लावुनि भारि ॥**
**रामकथा कलिमलहरणि सुंदर मंगलकारि ॥१४१॥**

स्वायंभू मनु नी शतरूपा । ज्यां पासुनि नरसृष्टि अनूपा ॥
दंपति धर्माचरणीं उत्तम । वेद गाति यत्सुयशा अनुपम ॥
नृप उत्तानपाद सुत त्यांचा । ध्रुव हरिभक्त होइ सुत ज्याचा ॥
तया प्रियव्रत मुलगा साना । प्रशंसिला जो वेदपुराणां ॥
देवहूति त्यांचीच कुमारी । कर्दममुनिची जी प्रियनारी ॥
आदिदेव प्रभु दीन–दयाला । जठरिं धरी ती कपिल कृपाला ॥
सांख्य शास्त्र वर्णिते प्रगट ते । भगवान् तत्त्वविचारनिपुण ते ॥
तो मनु राज्य करी बहुकाळीं । प्रभु आज्ञा सगळ्या प्रतिपाळी ॥

**सो०–नव्हे विरति विषयांत भवनिं वसत ये वृद्धपण ॥**
**बहुत दुःख हृदयांत जन्म गत किं हरिभक्तिविण ॥१४२॥**

वळें सुता राज्यार्पण केलें । काननिं नारी समेत गेले ॥
प्रथित तीर्थवर नैमिष कानन । साधक-सिद्धिद जें अति पावन ॥
वसति सिद्धमुनिसमाज जेथें । मनु नृप हर्षित निघती तेथें ॥
जात पथीं शोभति मतिधीर । ज्ञान-भक्ति जणुं धरुनि शरीर ॥
यदा पोचले गोमतितीरीं । मुदित मज्जले निर्मल नीरीं ॥
भेटूं आले ज्ञानि सिद्ध मुनि । धर्मधुरंधर नृपर्षि जाणुनि ॥

होतीं पावन तीर्थे जेथें । मुनि करविति विधि सादर तेथें ॥
कृश शरीर मुनिपट परिधाना । श्रवण नित्य सत्संगि पुराणां ॥

**दो०–अनुरागें द्वादशाक्षरी मंत्रा मग जपतात ॥**
**वासुदेवपदपंकर्जीं दंपति-मनं जडतात ॥१४३॥**

कंद मूल फल शाक भक्षती । ब्रह्म सच्चिदानंदा स्मरती ॥
मग हरिसाठिं करिति तप भारी । त्यजुनि फलादिक सेविति वारी ॥
वसे निरंतर अभिलाषा मनिं । तो प्रभु परम बघावा लोचनिं ॥
अगुण अखंड अनादिहि अंत न । ज्या चिंतिति परमार्थवादि जन ॥
नेति नेति जें वेदिं निरूपित । निजानंद निरुपाधि निरुपमित ॥
शंभु विरंचि विष्णु भगवानां । उद्भव अंशें ज्यांच्या नाना ॥
असा प्रभुहि सेवकवश असतो । भक्तांस्तव लीला-तनु धरतो ॥
सत्य असे जर ही श्रुतिभाषा । तर पुरेल अमची अभिलाषा ॥

**दो०–षट्सहस्र गत वर्ष अशि करुनि वारि-आहार ॥**
**संवत सप्तसहस्र मग केवल पवनाधार ॥१४४॥**

त्यजुनि अयुत संवत्सर तोही । उभी एकपदिं राहति दोहीं ॥
विधिहरिहर तप अपार पाहुनि । बहुवेळां मनुसमीप पावुनि ॥
किती प्रलोभिति घ्या वर वदती । चाळविता अतिधीर, न चळती ॥
अस्थिमात्र तनु होउनि राहि । तरि पीडा मनिं मनाग नाहीं ॥
प्रभु सर्वज्ञ दास निज जाणति । नृपराणी तापस अनन्य गति ॥
माग माग वर होइ नभगिरा । मिश्र कृपामृत परम गंभिरा ॥

मृत संजीवनि सुंदर वाणी । हृदिं ये श्रवणरंध्रि जैं शिरुनी ॥
हृष्टपुष्टतनु सुंदर ` झालीं । जणुं आतांच घराहुनि आली ॥

**दो०-श्रवणामृत वच ऐकुनी पुलकीं प्रफुल्ल देह ॥**
**वदति दंडवत करुनि मनु हृदयिं न मावे स्नेह ॥१४५॥**

श्रुणु सेवकसुरतरुसुरधेनू । विधिहरिहरवंदितपदरेणू ॥
सेवत सुलभ सकल सुखदायक । प्रणत पाल सचराचर नायक ॥
जर अनाथहित स्नेह अम्हांवर । द्यावा प्रसन्न होउनि हा वर ॥
जें स्वरूप शिवमानसिं राही । जास्तव मुनि करिती यत्नां ही ॥
जें भुशुंडिमनमानसिं हंसहि । सगुण अगुण जे वानिति वेदहि ॥
आम्हि रूप तें बघुं भर लोचन । कृपा करा प्रणतार्तिविमोचन ॥
प्रिय वाटे दंपतिवच फार हि । मृदुल नम्र तें प्रेमरसार्द्रहि ॥
कृपानिधी प्रभु भक्तवत्सलहि । प्रगटति विश्ववास भगवानहि ॥

**दो०-नील सरोरुह नीलमणि नीलनीरधरशाम ॥**
**लाजति तनु-शोभा बघुनि कोटि कोटि शतकाम ॥१४६॥**

शरद-मृगांकवदन छवि सीवा । चारु गाल हनु कंबुग्रीवा ॥
अधर अरुण, रद रुचिर नासिका । विधुकर निकर विनिंदि हासिका ॥
नव अंबुज अंबक छवि सुंदर । दृष्टि ललित पडतां चेतोहर ॥
भृकुटि मदन-धनुशोभाहारक । तिलक ललाटपटीं द्युतिकारक ॥
कुंडल मकर मुकुट शिरिं राजें । कुटिल केस मधुपावलि लाजे ॥
श्रीवत्सोरिं रुचिर वनमाला । पदिक हार भूषित मणिजालां ॥

चारु जानवें केसरि-कंधर । बाहु-भूषणें तींहि मनोहर ॥
करिकरसदृश सुभग भुजदंड । कटि निषंग, शर करिं कोदंड ॥

**दो०–तडित्–विनिंदक पीतपट त्रिवली वर उदरास ॥**
**नाभि मनोहर हरि छवि जी यमुना भंवऱ्यास ॥१४७॥**

पदराजीव न वर्चनि गवसती । तेथें मुनिमन – मधुप निवसती ॥
वामभागिं शोभे अनुकूला । आदिशक्ति छविनिधि जगमूला ॥
जिचे अंश उपजति गुण खाणी । अगणित रमा उमा ब्रह्माणी ॥
भृकुटि-विलासिं जिचे जग होती । रामवाम दिशिं सीता हो ! ती ॥
छवि-समुद्र हरि-रूप विलोकुनि । टकमक बघति नयनपट रोखुनि ॥
सादर निरखिति अनुपम रूपा । तृप्ति न मानति मनु शतरूपा ॥
हर्षविवश तनुभान विसरुनी । पडति दंडवत करिं पद धरुनी ॥
प्रभु निज कर-कंजा शिरिं ठेविति । सत्वर करुणानिधान उठविति ॥

**दो०–वदति कृपानिधि पुन्हां अति मी प्रसन्न जाणून ॥**
**मागा वर जो रुचे मनिं महादानि मानून ॥१४८॥**

प्रभु-वच परिसुनि जोडुनि पाणी । धीर धरुनि वदले मृदुवाणीं ॥
नाथ बघुनि पदकमला अपले । अमचे काम पूर्ण कीं सगळे ॥
एक लालसा महा मना ही । सुगम अगम वदवत ती नाहीं ॥
दान सुगम अति गोस्वामींनां । अगम वाटते परि मज कृपणा ॥
रंक विबुधतरु जसा लाभतां । लाजे बहु संपत्ति मागतां ॥
तो न तयाचा प्रभाव जाणे । तसें हृदयिं मम संशयठाणें ॥

तो तुम्हि जाणा अंतर्यामी। मनोरथा मम पुरवा स्वामी ॥
माग मजसि नृप, संकोचाविण। तुला अदेय असें मम कांहि न ॥

**दो०–दानि–शिरोमणि कृपानिधि नाथ वदें सद्भाव ॥**
**इच्छीं तुम्हां समान सुत प्रभुशि किं कपटा ठाव ॥१४९॥**

प्रीति वघुनि वच अमोल ऐकुनि। वदति कृपानिधि 'तथास्तु' बोलुनि॥
शोधुं कुठें मी सम मज जाउनि। नृप तव तनय होइं मी येउनि ॥
शतरूपे पाहुनी बद्धकर। देवि रुचे जो तुजसि माग वर ॥
नाथ चतुर नृप याचित जो वर। कृपानिधे तो मजला प्रियतर ॥
प्रभु परंतु अतिधाष्टर्यचि घडते। भक्तहिता जरि तुम्हांस रुचतें ॥
जगत्स्वामि तुम्हि अजादितातहि। ब्रह्म सकल-चालक हृदयांत हि ॥
अस समजुन मन संशय धरते। परी प्रमाण असे प्रभुवच तें ॥
जे निजभक्त नाथ तव असती। जें सुख पावति जी गति लभती ॥

**दो०–तें सुख ती गति भक्ति ती निजपदिं त्या स्नेहास ॥**
**तो विवेक ती राहणी द्या प्रभुकृपें अम्हांस ॥१५०॥**

ती मृदु गूढ रुचिर वचरचना। श्रवुनि कृपाब्धि वदति मृदु वचना।
जी रुचि तुमच्या मनांत काहीं। दिली सकल मी संशय नाहीं ॥
ज्ञान अलौकिक तुझें, न माते। कधि मदनुग्रहिं जाइ लयातें ॥
चरणिं नमुनि मनु पुनरपि वदती। प्रभु मम अपर असें कीं विनती ॥
सुतविषयिक रति असो तव पदीं। मूढ म्हणें ना मज कुणि अगदीं! ॥
मणिविण फणिसम जलविण मीना। मम जीवनमिति तव आधीना ॥

वर मागुन पद धरून बसले । एवमस्तु करुणानिधि वदले ॥
आतां मम आज्ञा तुम्हि मानुनि । रहा अमरपति नगरीं जाउनि ॥

**सो०–भोगुनि सुखां विशाल तात कांहि काळें जंव ॥**
**व्हाल अयोध्यापाल तुमचा सुत मी होइं तव ॥१५१॥**

इच्छामय नरवेषा घेइन । प्रगट निकेतीं तुमच्या होइन ॥
तात ! धरुनि देहा अंशांसह । करिन चरित भक्तांस सुखावह ॥
जें सुभाग्य नर सादर ऐकुनि । तरतिल भव ममता मद टाकुनि ॥
आदि शक्ति जी निर्मि जगा या । ती ही मम अवतरेल माया ॥
मी पुरवीन मनोरथ तुमचा । सत्य सत्य पण सत्य आमचा ॥
कितिदां असें कृपाब्धि म्हणाले । भगवान् अंतर्धान जहाले ॥
भक्तकृपाला स्मरत दंपती । कांहि काळ त्या आश्रमिं वसती ॥
त्यजुनि समयिं तनु विण आयासां । जाउनि सुरपुरिं करिति निवासा ॥

**दो०–अति पुनीत इतिहास हा कथित उमे वृषकेतु ॥**
**भरद्वाज ऐका दुजा रामजन्मि जो हेतु ॥१५२॥**

❖ ❖ ❖

## अध्याय १८ वा

श्रुणु मुनि कथा पुराण पुनीता । जी गिरिजेसि शंभुनीं कथिता ॥
प्रथित एक जगिं केकय देश । सत्यकेतु तेथिला नरेश ॥
धर्मधुरंधर नीतिनिधान । तेजप्रतापशीलबलवान ॥
दोन तयाला तनय सुवीरहि । सब गुण धाम महा रण धीरहि ॥

धनी ज्येष्ठ सुत जो राज्यातें । म्हणती प्रतापभानु तयातें ।।
अवर पुत्र अरि–मर्दननामा । भुजबल अतुल अचल संग्रामा ।।
परम मित्रता त्या भावांची । प्रीति दोषछलवर्जित साची ।।
ज्येष्ठ सुता नृप करि राज्यार्पण । हरिसाठीं वनिं गेला आपण ।।

**दो०–जैं प्रताप रवि होइ नृप फिरली देशीं द्वाहि ।।**
**प्रजा पाळि अति वेद विधि अघ लव कुठें हि नाहिं ।।१५३।।**

नृपहितकारक सचिव शहाणा । नाम धर्मरुचि शुक्रचि माना ।।
सचिव सुजाण, बंधु बलवीरहिं । स्वतां प्रतापपुंज रणधीरहि ।।
सैन्य संगि चतुरंग अंत ना । रण झुंझार सुभट ना गणना ।।
सेने निरखुनि हर्षनृपा अति । धडाम् धडाम् धम् भेरी वाजति ।।
दिग्विजया नृप फौज सजवुनी । निघे शुभदिनीं डंके पिटुनी ।।
होति लढाया ठायीं नाना । बळें जिंकिले सकल नृपांना ।।
द्वीप सप्त वश करुनि भुजबलें । लादुनि कर घे भूप सोडले ।।
अवनि-मंडला तेव्हां सकलहि । भूपति भानूप्रताप एकहि ।।

**दो०–करुनि विश्व वश भुजबळें स्वपुरीं करी प्रवेश ।।**
**अर्थ धर्म कामादि सुख सेवी समयिं नरेश ।।१५४।।**

भानू–प्रताप–नृपबल–शाली । कामधेनु भूमी शुभ झाली ।।
प्रजे न लेश दुःख, सुख भारी । धर्मशील सुंदर नर नारी ।।
सचिव धर्मरुचि हरिपदिं प्रीती । नित्य शिकवि नृपहितार्थ नीती ।।
गुरु सुर संत पितर भूदेवां । पूजी भूप सदा करि सेवा ।।

भूप–धर्म जे वेदीं वानित । सादर सकल करी सुख मानित ।।
प्रतिदिन देइ विविधविध दानां । ऐके श्रुतिवर शास्त्र पुराणां ।।
विविध कूप कासार वापिका । सुंदर बागा सुमन–वाटिका ।।
विप्रवास सुरसदनें सुंदर । सर्व तीर्थि नृप निर्मि मनोहर ।।

**दो०–वेद-पुराणीं उक्त जे एक एक सब याग ।।**
**वार हजार हजार नृप करी सहित अनुराग ।।१५५।।**

हृदयीं कांहि फलाकांक्षा नहि । भूप विवेकी परम सुजाण हि ।।
करि जो धर्म कर्म–मन–वाणीं । वासुदेवि नृप अर्पी ज्ञानी ।।
एकवार वाजीवरि राजा । बसुनि, सजवुनी शिकार-साजां ।।
विंध्याचल–वनिं गभीर शिरुनी । विविधा पावन मृगां मारुनी ।।
फिरत विपिनिं नृप पाहि वराहू । गिळुनि शशिस, वनिं लपे कि राहू ।।
विधु विशाल वदनीं ना राही । जणूं क्रोधवश ओकित नाहीं ।।
कोल कराल दशनछवि कथिता । तनु विशाल अधिका पीवरता ।।
घुर्घुरतो हय चाहुल लागुनि । चकित बघे श्रवणां टव्कारुनि ।।

**दो०–नील महीधर–शिखर सा बघुनि विशाल वराह ।।**
**सडकि, हाकि हय नृप म्हणे अतां नसे निर्वाह ।।१५६।।**

बघुनि वाजि ये फार जवानें । पळे वराह समीररयानें ।।
नृप करि सत्वर शरसंधाना । धरि धरणीस विलोकुनि बाणा ।।
नेम धरुनि नृप तीर चालवी । सूकर करि छल देह वाचवी ।।
प्रगटत लपत जात किरि पळला । भूप कोपवश पाठि लागला ।।

क्रोड दूरगत घन वन–राजीं । जिथें प्रवेश नव्हें गज वाजी ॥
अति एकल, वन अती क्लेशकर । तरि न सोडि मृगमाग नरेश्वर ॥
कोल विलोकुनि भुप–सुधीर । त्वरें शिरे गिरिगुहें गभीर ॥
अगम बघुनि, नृप परितापाकुल । वळे, महावनिं पडे तया भुल ॥

**दो०–क्षुधित तृषित नृप अश्व ही अतिशय असतां श्रांत ॥**
**फिरे सोधि सरसरिज्जल न मिळे विवळे भ्रांत ॥१५७॥**

फिरत विपिनिं त्या आश्रम दिसला । छल-मुनिवेषिं तिथें नृप बसला ॥
ज्याचा देश नृपें आक्रमला । सैन्य समर सोडुन जो पळला ॥
रविप्रतापा सुसमय जाणुनि । काल आपला फिरला मानुनि ॥
सदनिं न गत अति चित्तीं ग्लानी । साम नृपासि न करि अभिमानी ॥
नृप रंकासम कोपा गिळुनी । वसे वनीं तापस मुनि बनुनी ॥
तत्समीप जैं भूप पोचला । त्यानें प्रतापरवि ओळखला ॥
ओळख नोहे तृषित नरेशा । मानि महामुनि बघुनि सुवेषा ॥
उतरुन तुरगावरुनि वंदिलें । परम चतुर निज नाम न कथिलें ॥

**दो०–तृषित बघुनि भूपास तो दाखवि तया तलाव ॥**
**स्नान पान करि सह हया हर्षानें नृपराव ॥१५८॥**

श्रम गत सकल सुखी नृप झाला । स्वाश्रमिं तापस नेइ तयाला ॥
जाणुनि सूर्यास्ता दे आसन । करी तपस्वी मग मृदु भाषण ॥
कोण फिरां वनिं एकल कां बरं । सुंदर तरुण उदार जिवावर ॥
चक्रवर्ति–लक्षणं तव सारीं । बघुनि दया येई मज भारी ॥

नामें प्रतापभानु महीश्वर । ऐका मी तत्सचिव मुनीश्वर ।।
भुललों मी कीं फिरत शिकारीं । येउनि बघुं पद भाग्यें भारी ।।
आम्हां अपलें दर्शन दुर्गम । सन्निध दिसतो भाग्योदय मम ।।
तात ! पडे काळोख वदे तो । सत्तर योजन पुर तुमचें तों ।।

**दो०–निशा घोर गंभीर वन सुज्ञा ! दिसे न वाट ।।**
**रहा आज हें जाणुनी होतां जाल पहाट ।। १५९ रा ।।**

**दो०–तुलसी जशि भवितव्यता तसें मिळे सहाय ।।**
**आपण ये त्यापाशि कीं त्याला घेउनि जाय ।। १५९ म ।।**

वरें नाथ ! आज्ञा शिरिं वंदुनि । तुरग तरुसि नृप बसला बांधुनि ।।
नृप बहुपरी प्रशंसी त्याला । पदिं नमुनी स्तवि निज भाग्याला ।।
होइ रुचिर मृदु वच नृप वदता । गणुनि पिता प्रभु ! करूं धृष्टता ।।
मज मुनीश ! सुत दास गणावें । नाथ ! नाम निज मज सांगावें ।।
जाणि नृपा तो, नृपति तया ना । भूप सुहृद तो कपट–शहाणा ।।
वैरी क्षत्रिय तशांत राजा । साधु पाहि छलवलें स्वकाजा ।।
स्मरुनि राज्यसुख खिन्न अराती । अवा-अनल इव जळतं छाती ।।
भूप–सरल–वच पडतां कानीं । स्मरे वैर मनिं हर्षा मानी ।।

**दो०–कपटमिश्र वचना मृदुल बोले युक्ति समेत ।।**
**अमचें नाम भिकारि अतां निर्धन रहित निकेत ।।१६०।।**

नृप वदला विज्ञान–निधान । जे अपणांसम गताभिमान ।।

ते स्वरूप निज सतत लपवती । वसुनि कुवेषीं कुशल पावती ।।
यास्तव पुकारती श्रुति सज्जन । हरिला प्रिय जे परम अकिंचन ।।
अधन भिकारि तुम्हांसम अगृही । होति विरंचि शिवहि संदेही ।।
योसि सोसि तव चरण नमामी । अतां कृपा मज करणें स्वामी ।।
बघुनि नृपाची प्रीती सहजहि । अपणावर विश्वास विशेषहि ।।
बहुपरिं नृप अपलासा करुनी । वदे स्नेह अति दावुनि वरुनी ।।
सत्य सांगतो श्रृणु भूपाला । वसत इथें घालवुं बहु काला ।।

**दो०–कुणि न आजवर भेटला मी प्रगटि न अपणास ।।**
**लोकमान्यता अनलसम जाळी तप–विपिनास ।।१६१रा।।**

**सो–तुलसी बघुनि सुवेष भुलती मूढ न चतुर नर ।।**
**दिसतो बर्हि सुरेख वचन सुधेसम अशन अहि ।।१६१ स।।**

म्हणुन गुप्त वसतो जगिं, कांहीं । हरिविण दुजें प्रयोजन नाहीं ।।
सकळ कळे प्रभुला न कळवितां । सिद्धिकवण वद जनां रिझवितां ।।
तुम्हीं सुमति शुचि मला प्रिय अती । प्रीती मजवर तुला प्रतीती ।।
लपविन तुजसी तात ! अतां जर । दोष सुदारुण लागे मज तर ।।
जों जों तापस उदास वदतो । तों तों नृपविश्वास वर्धतो ।।
तनमनवचनें निजवश दिसला । वकध्यानि तापस तैं वदला ।।
नाम एकतनु अमचें बाळा । पदिं शिर नमुनि नृपाल म्हणाला ।।
नामाचा या अर्थ वदावा । मज निज सेवक परम गणावा ।।

**दो०–आदि-सृष्टि झाली यदा तैं मम उद्‌भव जाण ।।**
**नाम एकतनु म्हणुन कीं देह न धरला आन ।।१६२।।**

नको करूं आश्चर्या कांहीं । सुत दुर्लभ नहि कांहि तपाही ॥
तपोवलें सृजि जगा विधाता । तपोवलें विष्णू परिपाता ॥
तपोवलें करि हर संहारा । कांहि न अगम तपा संसारा ॥
ऐकुनि भूपति अति अनुरागे । कथा पुरातन तो वदुं लागे ॥
कर्म–धर्म–इतिहासांनेकां । करी निरूपण विरति विवेकां ॥
उद्भव पालन प्रलय कहाणीं । वदे अमित आश्चर्यी वानी ॥
श्रवुनि महिप तापस वश बनला । नाम आपलें सांगुं लागला ॥
नृप ! तुज तापस म्हणे जाणलें । कपट तुझें मज गोड वाटलें ॥

**सो०-श्रणु महीश अशि नीति जिथ तिथं नाम न वदति नृप॥**
**तुजवर मम सुप्रीति ती बघुनी चतुरता तव ॥१६३॥**

नामें तुम्ही प्रताप–दिनेश्वर । सत्यकेतु तव पिता नरेश्वर ॥
नृपा ! सर्व गुरुकृपें समजतें । जाणुनि निज हानि न सांगवतें ॥
बघुनि तात तव सहज सरलता । श्रद्धा प्रीती नीति–निपुणता ॥
उपजे तुजवर मनि मम ममता । कथित कथा निज, बा ! तूं पुसतां॥
निःसंशय मी प्रसन्न आतां । माग मना जें रुचेल ताता ॥
नृप हर्षित परिसुनि शुभ वचना । विविधा विनवी धरुनी चरणां ॥
कृपासिंधु मुनि दर्शनि तूझें । चारी पदार्थ करतलि माझे ॥
तरिही प्रभुला प्रसन्न पाहुनि । होउं अशोक अगम वर मागुनि ॥

**दो०–जरा–मरण–रुज–रहित–तनु रणि अजिवय होईन ॥**
**करिन कल्पशत राज्य महि एकछत्र रिपुहीन ॥१६४॥**

❖ ❖ ❖

# अध्याय १९ वा

म्हणे तपी नृप ! ऐसें व्हावें । कारण एक कठिण परिसावें ।।
कालहि तवपदिं नमील शीसा । फक्त विप्रकुल–विना महीशा ।।
तपें सदा विप्रां बल भारी । तत्कोपिं न कुणि रक्षणकारी ।।
जर विप्रां वश करिशि नरेश । तर तव वश विधि विष्णु महेश ।।
ब्रह्मकुळीं जबरी चाले ना । सत्य सांगुं उचलुनी भुजांना ।।
द्विजशापाविण ऐक नृपाळा । तुझा नाश नहिं कोण्या काळा ।।
प्रमुदित नृप परिसुनि तद्भाषण । नाथ ! अतां मम होणें नाश न ।।
प्रभो ! कृपें तव कृपानिधाना । मी पावेन सतत कल्याणा ।।

**दो०–वदुनी तथास्तु मुनि कुटिल कपटी वदे पुन्हां हि ।।**
**भुलणें वनि मम भेट जर वदसि बोल मज नाहिं ।।१६५।।**

राजा ! तुज वर्जितसें यास्तव । वदसि करिसि अति अकार्य बा ! तव ।।
षट्कर्णी ही पडत कहाणी । तुमचा नाश सत्य मम वाणी ।।
प्रगट होत हें वा द्विजशापां । नाश तुझा श्रुणु रवि-प्रतापा ।।
अन्य उपायिं निधन तव नाहीं । जरि हरिहर चढले कोपा ही ।।
सत्य नाथ ! नृप म्हणे पदां धरि । द्विज-गुरु कोपीं रक्षि कोण तरि ।।
रक्षिति गुरु जर रुष्ट विधाता । गुरु विरोधिं जगिं कुणि ना त्राता ।।
पाळिन जर ना प्रभु ! आज्ञा ही । घडो नाश मज चिंता नाहीं ।।
एकचि मज वाटे भीती पण । प्रभु ! भूदेव शाप अति भीषण ।।

**दो०– होति विप्र वश केविं तें कृपा करुनि सांगा हि ।।**
**दीन–दयाळा तुजविणें हितकर्ता मम नाहिं ।।१६६।।**

शृणु नृप यत्न जगीं नाना ही । कष्टसाध्य तरि फळति किं नाहीं ।।
एक असे अति सोपें साधन । अडचण तेथें एक महा पण ।।
असे युक्ति ती मम आधीना । घडे गमन मम तव नगरीं ना ।।
आजवरीं जोंपासुन झालों । गृहि कोणाच्या ग्रामि न गेलों ।।
महा हानि तव, गेलों ना तर । पडले संकट महा पहा बरं ।।
ऐकुनि नृपति वदे मृदु वाणीं । नाथ निगम अशि नीती वानी ।।
स्नेह थोर सानांवर करती । निज शिरिं गिरि संतत तृण धरती।।
जलधि अगाध फेस शिरिं वाही । सदा शिरीं धरि धूळ धरा ही ।।

**दो०–असें वदुनि नृप धरि पदां स्वामी व्हाल कृपाल ।।**
**दुःख सहा प्रभू ! मम हिता सज्जन दीनदयाल ।।१६७।।**

भूप आपल्या अधीन जाणुनि । वदला कपटकुशल तापस मुनि ।।
सत्य सांगतो भूपति तुजला । दुर्गम काहिंहि जगीं न मजला ।।
करिन अवश्य तुझ्या मी कार्या । तूं मम भक्त वचन मन काया ।।
योग–युक्ति-तप–मंत्र-शक्ति, ती । फळे तदा जैं गुप्त रक्षिती ।।
यदि नरेश मी शिजविन अन्ना । तुम्हि वाढा जाणे कुणि मज ना ।।
तर जे जे तें अन्न भक्षिती । ते ते तव आज्ञेस रक्षिती ।।
त्यांचें घरिं मग जेविल जो ही । भूपा तुज वश होईल तोही ।।
जाउनि नृप कर यांच उपाया । वत्सरभर कर संकल्पा या ।।

**दो०–नित्य नवे द्विज लक्ष बा! वरणें सह परिवार ॥**
**मी त्वां संकल्पित दिवस स्वयंपाक करणार ॥१६८॥**

अल्प कष्टि नृप! अशा पद्धतीं। विप्र सर्व ही तव वश बनती ॥
द्विज मख होम करिति पूजा स्तव। त्यांना देव सहज वश त्यास्तव ॥
आणिक सांगु एक तुज लक्षण। या वेषें मीं येइन ना, पण– ॥
तुमच्या पुरोहिताला राया। आणिन हरुनि इथें निज मायां ॥
त्या तपबळें रूप मम देइन। आणि वर्षभर येथें ठेविन ॥
त्याचें रूप धरुनि मी राजा। सर्वपरीं तव करीन काजा ॥
रात्र फार गत, निज बरं आतां। तिजे दिनीं भेटूं तुज ताता ॥
तपोबलें तुज तुरग-समेता। सुप्त पोचविन तुझ्या निकेता ॥

**दो०–त्या रूपें येईन मी ओळख मला तदाच।**
**बोलावुनि एकांति जैं सांगूं कथेसि याच ॥ १६९ ॥**

आज्ञा मानुनि नरपति निजला। छली ज्ञानि गत आसनिं बसला ॥
श्रान्त भूप अति निद्रा आली। कशि ये त्याला चिंता जाळी ॥
कालकेतु निशिचर तैं आला। किरि-रूपें जो भुलवि नृपाला ॥
तपी नृपाचा परम मित्र तो। कपट विपुल अत्यंत जाणतो ॥
सुत शत, दहा तयाचे भ्राते। खल अति अजय देव-दुखदाते ॥
पूर्विच नृप रणिं झाला वधता। विप्र संत सुर दुःखी बघतां ॥
तो खल पूर्विल वैरा स्मरुनी। तपी नृपासि मंत्र करि मिळुनी ॥
योजिति रिपुक्षयार्थ उपाया। भावी-वश मुळि नुमजे राया ॥

**दो०– तेजस्वी अरि एक जरि क्षुद्र न गणणें त्यास ॥**
**अझुन राहु शिरमात्र जरि छळतो रविचंद्रास ॥१७०॥**

तापस नृप निज मित्रा पाहे । मुदित उठुनि भेटे सुख लाहे ॥
मित्रा कथा निवेदी सकला । सुखा पावुनी राक्षस वदला ॥
तुम्हि माझा उपदेश मानिला । नृपति ! रिपुस मी अतां मारिला ॥
स्वस्थनिजा सब चिंता त्यागुनि । शमवि कफा विधि सुंठी वाचुनि ॥
कुळासहित नृपमूळ उपटूनी । चौथें दिनिं भेटेन येउनी ॥
तापस नृपा बहुत परितोषी । निघे महाकपटी अति रोषी ॥
रविप्रतापा वाजिसमेता । क्षणें पोचवी राजनिकेता ॥
राणी-सन्निध नृपा निजविला । तुरग नीट हयगृहीं खुटविला ॥

**दो०– पुरोहिता मग नृपतिचे तो आणी चोरून ॥**
**लपवुनि ठेवी गिरि गुहें मायें मति मोहून ॥१७१॥**

आपण घेइ पुरोहित रूपा । त्याचे शेजे निजे सुरूपा ॥
भूप पहाटे पूर्विच जागे । बघुन भवन विस्मय करुं लागे ॥
मग मुनि-महिमा मनिं अनुमानी । गुपचुप उठे कि नुमजे राणी ॥
त्याज वाजिवर जाइ वनासी । न कळे पुरनर नारि कुणासी ॥
प्रहरिं दोन ये नगरिं भूप तो । गृहिं गृहिं उत्सव गजर खूप तों ॥
पडे पुरोहित जैं आलोकीं । स्मरुनि कार्य नृप चकित विलोकी ॥
नृपा तीन दिन युग सम गमती । कपटी-मुनि-पदिं लीन नृप-मती ॥
समजुनि समय पुरोहित आला । सांगे कृत संकल्प नृपाला ॥

**दो०– गुरुस ओळखुनि मुदित नृप भ्रमवश नुरे विचार ।।**
**नियुत निमंत्रित विप्रवर शीघ्र सहित परिवार ।।१७२।।**

पुरोहितें त्या पाक बनविला षड्रस चारिपरीं श्रुति कथिला ।।
तो निर्मी मायामय पाका । अगणित पक्वान्नादिक शाका ।।
विविध मृगांचें आमिष रांधी । विप्रमांस खल तयांत सांधी ।।
विप्र सर्व आणवि जेवाया । सादर बसवी क्षालुनि पायां ।।
भूप वाढुं लागे तो जेव्हां । गगन-गिरा अशि झाली तेव्हां ।।
विप्रवृंद उठुनी गृहिं जावें । महा हानि हें अन्न न खावें ।।
असे रांधिलें ब्राह्मण मांस । विप्र उठति ठेउनि विश्वास ।।
भूप विकल मति भुले भ्रमानें । भावी-वश वच ये न मुखानें ।।

**दो०–वदले विप्र सकोप तैं केला नाल्प विचार ।।**
**जा रजनीचर हो नृपा ! मूढा सह परिवार ।।१७३।।**

क्षत्रबंधु ! तूं विप्र आणले । भ्रष्टविण्यास कुळांसह सगळे ।।
ईश्वर अमचा धर्म राखि रे । परिवारासह लया जा किं रे ।।
नाश तुझा वर्षामधिं होइल । कुलिं जलदाता कोणि न राहिल ।।
श्रवुनि शाप नृप भयें सुविव्हळ । पुन्हां गिरा नभि झाली निर्मळ ।।
विप्र विचारें दिला हि शाप न । केला कांहिं नृपें अपराध न ।।
चकित विप्र परिसुनि नभवाणी । गेला भूपति भाणस-ठाणीं ।।
तिथें अशन ना द्विज बल्लव तो । फिरला नृप शोकें विव्हळतो ।।
विप्र कानिं सव घटना घाली । व्याकुळ पडे अवनिवर खालीं ।।

**दो०–भूपति भावी ना टळे जरि न दोष तव कांहि ॥**
**विप्रशाप अति घोर, तो यत्नें नव्हें मृषाहि ॥१७४॥**

असें वदुनि भूदेव परतले। वृत्त सकल पुरजनां समजलें ॥
दु:खी देति दोष दैवाला। विरचित हंस रची काकाला ॥
भर्वाने पोचवी पुरोहिताला। असुर खबर दे तपी नृपाला ॥
दुष्टें सकलां पत्र धाडलें। सैन्य सजुनि सब भूप धावले ॥
डंके पिट्टनि नगर वेढलें। नित्य विविध रणकुंड पेटलें ॥
लढति सुभट सब करुनी करणी। सानुज नृप पडला रणि धरणीं ॥
सत्यकेतु–कुळि कुणि ना राही। विप्रशाप कधि ठरे मृषा ही ॥
जितरिपु नृप ते नगरा वसवुनि। निजपुरिं गेले जय यश पावुनि ॥

**दो०–भरद्वाज बघ होइ जैं ज्यास विधाता वाम ॥**
**रेणु मेरुसम जनक यम तया व्यालसम दाम ॥१७५॥**

श्रुणु मुनि यथासमय तो राजा। झाला निशिचर सहित समाजा ॥
दश शिर तया वीस भुज दंड हि। रावण नाम वीर बलि-वंद्य-हि ॥
भूपानुज अरिमर्दन नाम। कुंभकर्ण झाला बलधाम ॥
सचिव धर्मरुचि होति जयाला। बंधु विमातृज लघु तो झाला ॥
नाम विभीषण विदित जनांनां। विष्णुभक्त जो निधि विज्ञाना ॥
जं नृप-सुत-सेवक ते सगळे। घोर निशाचर अगणित बनले ॥
कामरूप नानाविध दुर्जन। कुटिल महा अविवेकी भीषण ॥
कृपारहित हिंसक सब पापी। वदवे ना, विश्वा परितापी ॥

**दो०–जन्मुनि अमल पुलस्त्यकुळिं अनुपम पूत अमूप ।।**
**विप्रशापवश जाहले ते सगळे अघ रूप ।।१७६।**

❖ ❖ ❖

## अध्याय २० वा

करिति विविध तप तीन्ही भ्राते । परम उग्र ना वदलें जातें ।।
गत समीप तप बघुनि विधाता । वर मागा मी प्रसन्न ताता ।।
दशमुख विनवि धरुनि चरणांला । श्रुणु जगदीश ! म्हणे वचनाला ।।
आम्हि न मरुं मारितांहि कोणी । जाति मनुज कपि यां वाचोनी ।।
एवमस्तु तुम्हि कृत सुतपाला । मी ब्रह्मयानें दत्त वराला ।।
प्रभु मग गत घटकर्णापाशीं । त्या पाहुनि विस्मय चित्तासी ।।
नित्य करिल जर खल आहारा । सकल उजाडिल हा संसारा ।।
प्रेरुनि गिरे फिरवि धी त्याची । मागे निद्रा षण्मासांची ।।

**दो०–गेले निकट बिभीषणा म्हणति पुत्र वर माग ।।**
**तो मागे भगवंत-पद-कमलिं विमल अनुराग ।।१७७।।**

ब्रह्मा वर देउनी निघाले । ते हर्षित निज सदनीं आले ।।
मय-तनया मंदोदरि नामा । परम सुंदरी नारि-ललामा ।।
रावणास ती मय दे आणुनि । यातुधान-पति होइल जाणुनि ।।
हर्षित होइ नारि भलि पावुनि । करि भावांचे विवाह जाउनि ।।
त्रिकूटाद्रि गिरि एक सागरीं । विधि निर्मित दुर्गम अति भारी ।।
त्यास पुन्हां मय दानव सजवित । रत्नजडित कांचन गृह अगणित ।।

अहिकुलवास जशी भोगावति । शक्रनिवास जशी अमरावति ॥
त्यांहुनि दुर्ग सुरम्य न शंका । जग विख्यात नाम ती लंका ॥

**दो०– खंदक सिंधु गभीर अति चारि दिशांस तदीय ॥**
**कनककोट मणि-खचित दृढ रचना अवर्णनीय ॥ १७८ रा ॥**

**हरि-इच्छें ज्या कल्पि जो होइ निशाचर-राज ॥**
**बली प्रतापी शूर अति वसे ससैन्य-समाज ॥ १७८ म.।**

होते निशिचर तिथें भट महा । अमरिं समरिं मारिले सरसहा ॥
शक्रें प्रेरित तेथें सांप्रति । अमित यक्षपति रक्षक नांदति ॥
कुठें खबर ही दशमुख पावुनि । घाली वेढा ससैन्य जाउनि ॥
बघुनि विकट भट कटक महा तें । यक्ष पळति घेउनि जीवांतें ॥
मग सब नगर दशानन पाहे । गत चिंता सुख विशेष लाहे ॥
सुंदर सहज अगम अनुमानी । रावण करि ती स्वराजधानी ॥
उचित वास वाटी ज्यां त्यांना । सुखवी सर्वां निशाचरांना ॥
मग घाली धनदावर घाला । जिंकुनि पुष्पक घेउनि आला ॥

**दो०– उचलुनि घेई एकदां लीलेनें कैलास ॥**
**जणुं निज भुजबल तोलुनी पावे परम सुखास ॥ १७९ ॥**

सुख सुत सैन्य साह्य संपत्ती । जय, बल वृद्धी प्रताप महती ॥
वाढति नवनव निशिवासर तीं । प्रतिलाभें जशि लोभा भरती ॥
अतिबल कुंभकर्णसा भ्राता । जगीं जया प्रतिभट न पहातां ॥
पान करुनि निजतो षण्मासीं । जैं जागे धडकीं त्रिजगासी ॥

प्रतिदिन तो जर दुर्भर भरता । विश्वा वेगें सपाट करता ।।
समरधीर करुं कसें वर्णना । तत्सम वीर बलाढ्य न गणना ।।
मेघनाद मोठा सुत रावणि । लेखित लोकिं सकल-वीराग्रणि ।।
ज्या कोणि न रणिं सन्मुख वळतें । सुरपुरिं सतत पळापळ उडते ।।

**दो०—कुमुख अकंपन कुलिशरद धूमकेतु अतिकाय ।।**
**प्रत्येक हि जग जिंकि कीं ऐसे सुभट-निकाय ।।१८०।।**

कामरूप सब अति मायावी । स्वप्निंहि धर्म दया ना ठावी ।।
सभे एकदां बसला रावण । पाहे निजपरिवारा पार न ।।
पुत्र पौत्रगण कुटुंब परिजन । कोण गणुं शके ते निशिचरगण ।।
सेना बघुनि सहज अभिमानी । क्रोध मदें युत वदला वाणी ।।
ऐका निशिचरवरूथ सगळे । विबुध-संघ निज वैरि आगळे ।।
ते सन्मुख ना युद्धा वळती । प्रबल रिपूला पाहुनि पळती ।।
त्यांच्या मरणा एक उपाया । सांगूं आतां श्रवण करा या— ।।
द्विजभोजन मख होमां श्राद्धां । करा जाउनी सकलां बाधा ।।

**दो०—क्षुधाक्षीण बलहीन सुर सहज शरण येतील ।।**
**तैं मारूं वा सोडुं कीं मज वश जर होतील ।।१८१।।**

घननादा बोलावुनि आणवि । दे उपदेश वैर बल वाढवि ।।
समरधीर बलवंत सुरांनां । जे धरिती कीं रणाभिमाना ।।
रणीं जिंकुनी आण बांधुनी । जावें पितृवचं वंद्य मानुनी ।।
ऐसें देउन सर्वां शासन । निघे गदा करिं घेउन आपण ।।

दशमुख चाले डोले अवनी । गर्जत गळति गर्भ सुररमणी ॥
क्रोधें रावण येत, परिसती-- । देव मेरुगिरि गुहा हुडकती ॥
दिक्पालांचे लोक सुशोभन । पाहे सगळे शून्य ! दशानन ॥
सिंहनाद करि कितिदां भारी । गाळि देइ देवां पाचारी ॥
रणमदमत्त फिरे जगिं धावत । शोधी प्रतिभट कुठें न पावत ॥
रवि शशि पवन वरुण धनधारी । अग्नि काल यम सब अधिकारी ॥
किन्नर नाग सिद्ध नर अमरां- । पाठिं हठें लागे अति जबरा ॥
ब्रह्मसृष्टि जितकी तनु-धारी । दशमुख वशवर्ती नरनारी ॥
आज्ञापालन सुभीत करती । नित्य येति पदिं विनम्र नमती ॥

**दो०–करुनि विश्व वश भुजबळें ठेवि न कुणा स्वतंत्र ॥**
**मंडलीकमणि रावणा शासनि आपला मंत्र ॥१८२ रा॥**

**दो०–देव–यक्ष–गंधर्व–नर–किन्नर–नाग–कुमारि ॥**
**जिंकि वरी निज भुजबळें बहु सुंदर वर नारि ॥१८२ म॥**

इंद्रजिता जें कथिलें जेवीं । तो जणुं आधिं करुन तें ठेवी ॥
आज्ञा प्रथम जयां दिधली ते । पहा कशा करती करणीतें ॥
दिसती भीमरूप सब पापी । निशिचर-निकर देव-परितापी ॥
असुर निकाय उपद्रव करती । विविधरूप मायेनें धरती ॥
जेणें होइ धर्म–निर्मूलन । श्रुति–विरोधि ते करिती भूल न ॥
जिथें जिथें द्विज धेनू पावति । नगरगांवपुरिं आगी लावति ॥
शुभ आचरणा करि कोणी ना । देव विप्र गुरु कुणि मानी ना ॥
ज्ञान भक्ति जप तप मख कांहि न । वेद पुराणें स्वप्निहि कानिं न ॥

छं० जप योग विरागहि तप-मख-भागहि कानि येत दशशीसा।
तो धावत येई चालुं न देई सकल नेइ विध्वंसा ।।
आचार महितला भ्रष्ट जहाला धर्महि ये ना कानां ।
त्यां विविधा त्रासवि विदेशि घालवि वदती वेद पुराणां ।। १ ।
सो०—वदलि न जाइ अनीति घोर निशाचर जी करिति ।।
अति हिंसेची प्रीति त्यांच्या पापा कवण मिति ।।१८३।।

— मास पारायण, सहावा विश्राम —

❖ ❖ ❖

## अध्याय २१ वा

वाढति वहु खल चोर जुगारी । जे परधन—लंपट परदारी ।।
मानिति माय न पिता न देवां । साधू-करवीं करविति सेवा ।।
ज्यांचें असं आचरण भवानी । जाण सर्व निशिचर ते प्राणी ।।
ग्लानी अति धर्माची कळतां । सु-भय धरेला परम विकलता ।।
गिरि सरि सिंधु भार मज नाहीं । परद्रोहि जड एक जसाही ।।
पाहि सकल धर्मां विपरीतां । वदुं न शके रावण-भय-भीता ।।
धेनुरूप धरुनी सुविचारें । गता जिथें सुर-मुनि-गण सारे ।।
रडुनी दाखवि निजदुःखाला । कांहींही करवे न कुणाला ।।
छं—सुरमुनि गंधर्वहि मिळुनि सर्वहि विरंचिचे गतलोकीं ।।
सह गोतनुधारी भूमि बिचारीं परम विकल भय शोकीं ।।

**ब्रह्मा सब जाणति मनिं अनुमानति मम आधीन न कांहीं ।**
**ज्यांची तूं दासी ते अविनाशी तुला सहाय अम्हांही ॥१॥**
**दो०–धरे धरी धीरास स्मर हरिपद वदले द्रुहिण ॥**
**जाणति जन-दुःखास प्रभु करि दारुण-भय-हरण ॥१८४॥**

करित विचार सकल सुर बसती । प्रार्थाया प्रभु कुठें गवसती ॥
वैकुण्ठा जावें कुणि वदती । प्रभु पयनिधि वसती कुणि म्हणती ॥
प्रीति भक्ति जशि हृदयीं ज्यातें । प्रगट सदा प्रभु तैसे त्यातें ॥
उमे ! सभें त्या होतों बसलों । अवसर पावुनि वच मी वदलों ॥
हरि सर्वां व्यापुनि सम राहति । मी जाणें की प्रेमें प्रगटति ॥
देश काल दिग् विदिक् कवण ती । सांगा तरि जेथें प्रभु नसती ॥
अग–जग–मय निर्लेप अलग तो । प्रेमें पावक तसा प्रगटतो ॥
मत माझें सकलां आवडलें । साधु साधु तैं ब्रह्मा वदले ॥

**दो०–तैं विरंचि मनिं हर्ष तनु पुलकित नयनीं नीर ॥**
**जोडुनि कर करती स्तुती सावधान मति धीर ॥१८५॥**
**छं०–जय जय सुरनायक जन सुखदायक प्रणतपाल भगवंता**
**गो-द्विज-हितकारी जय असुरारी सिंधुसुता-प्रियकान्ता ।**
**पालन सुरधरणी अद्‌भुतकरणी मर्म कळे न कुणाही ।**
**जो सहज कृपाळू दीन दयाळू करो अनुग्रह तो ही ॥१॥**
**जय जय अविनाशी सब घटवासी व्यापक परमानंदा ।**
**अविगत गोऽतीता चरित-पुनीता मायारहित मुकुंदा ॥**

ज्या लागिं विरागी अति अनुरागी विगतमोह मुनिवृंदा ।।
दिनरातीं ध्याती गुणगण गाती जयति सच्चिदानंदा ।।२।।
जो सृष्टि उपजवी त्रिविधा बनवी कोणी साह्य न दूजा ।
तो देवो अघहर लक्ष अम्हांवर जाणूं भक्ति न पूजा ।।
जो भवभयभंजन मुनिमनरंजन गंजन विपद्वरूथां ।
मन-वाक्कृति-बाणा त्यजुनी ज्ञाना शरण सकल सूरयूथा ।।३
वाणी-श्रुतिशेषां ऋषिस अशेषां ज्याचें ज्ञान कुणा ना ।।
प्रिय दीन जया श्रुति वदति दया अति यो कीं श्रीभगवाना ।।
भववारिधि मंदर सबविधि सुंदर गुणमंदिर सुखपुंजा ।।
मुनि सिद्ध सकल सुर परम भयातुर नमिति नाथ पदकंजां ।।४

दो०—बघुनि सभय सुर भूमि तें परिसुनि वच सस्नेह ।।
होइ गभीरा नभगिरा हरणि शोक संदेह ।।१८६।।

भिऊं नका मुनि सिद्ध सुरेश्वर । तुमचेस्तव धरुं नरवेषा वर ।।
अंशांसहित मनुज अवतारा । घेइन दिनकरकुलीं उदारा ।।
करतां कश्यप अदिती तप महा । पूर्वीं त्यां मी दिला वर पहा ।।
तीं दशरथकौसल्यारूप । कोसलपुरीं प्रगट नरभूप ।।
जाउनि धरुं तद्गृहिं अवतार हि । रघुकुलतिलक वंधु ते चारहि ।।
नारद वचन सत्य सव करतो । परम शक्ति समेत अवतरतो ।।
करिन सकल भूभार निवारण । निर्भय आतां रहा देवगण ।।
नभीं ब्रह्मवाणी ती श्रवुनी । शीघ्र निघति सुर हृदयें निवुनी ।।
तैं ब्रह्मा सांत्विति धरणीला । धरी भरंवसा त्यजि भीतीला ।।

**दो०—गत विरंचि निज लोकिं तैं अस सांगुनि देवांस ।।**
**महिवर वानर वपु धरुनि सेवा हरि-पायांस ।।१८७।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २२ वा

देव सकल गत निज निज धामा । भूसह मनिं पावति विश्रामा ।।
जें काहीं विधिचें आज्ञापन । हर्षित करिती विबुध विलंब न ।।
क्षितिवर वनचर देहां धरती । अतुलित बली प्रतापी बनती ।।
गिरितरु-नरव-आयुध सब वीर । हरिची वाट बघति मति धीर ।।
गिरि-काननिं भरपूर निवसुनी । निज निज सेना रुचिर बनवुनी ।।
हें सब रुचिर चरित मी कथिलें । ऐका जें मध्येंच राखिलें ।।
रघुकुलमणि जे अयोध्याधिपति । नामें दशरथ विदित वेदिं अति ।।
धर्मधुरंधर गुणधी ज्ञानी । हृदयिं भक्ति मति शारंग्-पाणी ।।

**दो०— कौसल्यादी स्त्रिया प्रिय सब आचरण पुनीत ।।**
**पति-अनुकूला प्रेमदृढ हरिपदकमलिं विनीत ।।१८८।।**

एकवार भूपाल मना ही । ग्लानि होइ मजला सुत नाहीं ।।
त्वरें भूप गेले गुरु-भवनीं । पायिं पडुनि कृत परम विनवणी ।।
निज दुख सुख सब गुरुला सांगति । तैं वसिष्ठ विविधा समजावति ।।
धीर धरा होतिल सुत चारी- । त्रिभुवन-विदित भक्त-भय-हारी ।।
शृंगी ऋषिला वसिष्ठ अणविति । पुत्रकाम शुभ यज्ञा करविति ।।
भक्ति सहित मुनि आहुति अर्पति । तदा अग्नि चरुपाणी प्रगटति ।।

जें वसिष्ठ ! हृदयीं अवधारित । कार्य सकल तें तुमचें साधित ।।
हें हवि वाटुनि दे नृप जाउनि । योग्य जसें ज्यां तसें विभागुनि ।।

**दो०–पावक होति अदृश्य तैं समजाउनि सभ्यांस ।।**
**परमानंदी मग्न नृप पुरे न मन हर्षास ।।१८९।।**

नृप तैं प्रिय नारीं बोलावत । कौसल्यादी आल्या चालत ।।
कौसल्येला अर्ध अर्पुनी । दोन भाग अर्ध्याचे करुनी ।।
एक कैकयिस नृप दे त्यांतुनि । मग उरलेला द्विधा विभागुनि ।।
कौसल्या-कैकयि करिं ठेवुनि । खूप सुमित्रा कृता देववुनि ।।
यापरि झाल्या सगर्भ नारी । हर्षित हृदयिं सुखावति भारीं ।।
जैं पासुनि गर्भा हरि आले । लोकिं सकल संपत् सुख झालें ।।
सकल विराजति मंदिरिं राणी । शोभा-शील-तेज–सत्खाणी ।।
कांहि काल जैं सुखयुत गेला । प्रगटाया प्रभु समय उदेला ।।

**दो०–लग्नवार तिथि योग सब ग्रहादीक अनुकूल ।।**
**सकल चराचर हर्षयुत रामजन्म सुखमूल ।।१९०।।**

नवमी तिथि मधु महिना पावन । शुक्ल पक्ष अभिजित् हरिभावन ।।
मध्य दिवस अति शीत न घाम । पावन काल लोक-विश्राम ।।
शीतल मंद सुगंधि गंधवह । सुरां हर्ष संतां उत्साह ।।
वन कुसुमित गिरि रत्नविभूषित । सरिता सकल सुधारस पूरित ।।
तो अवसर विरंचि जैं जाणे । निघति सकल सुर सजुनि विमानें।।
गगन विमल संकुल सुरनिवहीं । गुण गाती गंधर्व सर्वही ।

रचुनि रुचिर सुमनांजलि वर्षति । नभीं दुंदुभी दुम् दुम् गर्जंति ।।
अहि मुनि सुर करती स्तवनातें । अर्पिति विविधा निज सेवा ते ।।
दो०— सुरगण विनवुनि पोचले जेथें निज निज धाम ।।
जगनिवास प्रभु प्रगटे अखिल लोक-विश्राम ।।१९१।।
छं०— ते प्रगट कृपालू दीन-दयालू कौसल्या-हितकारी ।
मुद माते भारी मुनि-मन-हारी अद्‌भुतरूप विचारीं ।।
लोचनाभिरामा तनुघनशामा निज आयुध भुजचारी ।
भूषण वनमाला नयन विशाला शोभासिंधु खरारी ।।१।।
कर जोडुन वदली, स्तुती आपली करूं अनंता कशि, ती ।
गुण-माया-ज्ञानातीत अमानहि वेद पुराणें कथिती ।।
करुणा-सुख-सागर सकलगुणागर वदति असें श्रुति संत ।।
तो मम हितलागीं जन-अनुरागी प्रगट इथें श्रीकान्त ।।२।।
ब्रह्मांड निकाया निर्मित माया प्रति रोमीं ज्या वेद म्हणे ।
त्या मदुदर-वास वदत उपहासहि चलित धीरधी श्रवुनि बने ।
जैं ज्ञान उपजलें प्रभु मृदु हसले चरित विविध विध करुं बघती
माते समजाविति सुकथे सांगति सुत वात्सल्या जशि धरि ती ३
मग माता बोले ती मति डोले, त्यजा तात या रूपा ।
करिजे प्रियशीला अति, शिशुलीला अनुपम सुखद अमूपा
सुरपति करि रुदना ऐकुनि वचना सुज्ञ धरुनि शिशुरूपा ।
या चरिता गाती हरिपदिं जाती ते न पडति भवकूपा ।।४।।

**दो०– विप्र-धेनु-सुर-सत-हित धरिति मनुज-अवतार ।।**
**स्वेच्छेनें निर्मित तनू माया-गुण-गो-पार ।।१९२।।**

प्रिय अति शिशुरुदनाला ऐकत । शीघ्र येति राण्यां सव चालत ।।
हर्षें धावति चहुं दिशि दासी । मग्नानंदि सकल पुरवासी ।।
पुत्रजनन दशरथास कळलें । ब्रह्मानंद-मग्न जणुं झाले ।।
प्रेमपरम मनिं पुलक वपूवरि । करुनि धीर मति वधे उठूं तरि ।।
नामहि शुभद जयाचें, श्रवणीं । तो प्रभु आला माझे भवनीं ।।
परमानंद–पूर्ण–मन राजा । वदे वाजवा विविधा बाजां ।।
बोलवुं वसिष्ठ गुरुला धाडति । द्विजांसहित नृपभवना ठाकति ।।
अनुपम बालक जाउन बघती । रुपराशि गुण वदत न सरती ।।

**दो०– श्राद्धा नांदीमुख करुनि जातकर्म संपादि ।।**
**नृप विप्रां दे दान मणि धेनु कनक वसनादि ।।१९३।।**

ध्वज केतन तोरणं पुर झाकिति । जाइ न वदलें शृंगारित किति ।।
सुमनवृष्टि गगनांतुनि सुटती । ब्रह्मानंदिं लोक सब बुडती ।।
मिळुनि नारि बहु वृंदें निघती । सहज साजयुत उठुनि धावती ।।
घट हाटक ताटीं शुभ भरती– । मंगल गात राजगृहिं शिरती ।।
आरति करुनि वस्तु ओवाळति । पुनः पुन्हां शिशुचरणां प्रणमति ।।
मागध सूत वंदिगण गायक । गाती पावन गुण रघुनायक ।।
सर्वहि दान देति सर्वस्वहि । जे पावति ते राखिति त्या नहि ।।
मृगमद–कुंकुम–चंदन–चिखलें । भरले मधें मधें पथ सगळे ।।

**दो०– गृहिं गृहिं उतसव घोष शुभ प्रगटत सुषमाकद ॥**
**जिथें तिथें सब हर्षयुत नगर-नारि-नरवृंद ॥१९४॥**

कैकयि एक सुमित्रा तों द्वय । प्रसवे सुत सुंदर ते अतिशय ॥
त्या सुख संपत् समय समाजा । वर्णुं न शकति गिरा अहिराजा ॥
अशी अयोध्या शोभित झाली । प्रभु-दर्शना निशा जणुं आली ॥
जणुं भानुस पाहुनि संकोचित । परि वनली संध्या किं यथोचित ॥
अगरु धूप बहु जणूं सम तमा । पसरे उडुनि गुलाल लालिमा ॥
मंदिर-मणिगण जणुं तारा अति । नृप-गृह-कळस किं पूर्ण निशापति॥
वेदपाठ अति मृदु जो भवनीं । जणुं खग-मुखर किं पुरी उपवनीं ॥
कौतुक पाहुनि पतंग भुलला । एक मास त्या जात न कळला ॥

**दो०– होत मासदिन दिवस तो नुमजे मर्म कुणी हि ॥**
**रथ समेत रवि थबकला होई निशा कशी हि ॥१९५॥**

हें रहस्य कळलें कोणा ना । दिनमणि निघे करत गुणगाना ॥
बघुनि महोत्सव सुरमुनि नागहि । जाति भवनिं वर्णित निज भागहि ॥
आणि एक सांगूं निज चोरी । श्रुणु गिरिजे तव दृढ मति भारी ॥
काक भुशुंडी मी दोघेजण । मनुजरूप, कोणि न जाणे पण ॥
प्रेम-परम-मोदें सुख-फुलले । फिरतों मार्गि मग्न मन भुललें ॥
हें शुभ चरित तयासच कळतें । ज्यावर रामकृपा जळ गळतें ॥
त्या अवसरिं जो जैसा आला । दिलें नृपें जें रुचलें त्याला ॥
गज रथ तुरग हेम गो हीरे । दिधलीं भूपें विविधा चीरें ॥

**दो०-सर्वांचें मन तोषवी जो तो दे आशीस ।।**
**चिर जीवोतहि सकल सुत दास तुलसिचे ईश ।।१९६।।**

कांहीं दिन या प्रकारिं पळले । दिवस रात्र जाती ना कळलें ।।
नामकरण-अवसरास जाणुनि । बोलाविलें नृपें ज्ञानी मुनि ।।
पूजुनि भूप म्हणे मुनि-देवा । मनिं निर्धारित नांवें ठेवा ।।
यांचीं नांवें अनेक अनुपम । मी वदेन नृप ! यथा बुद्धि मम ।।
जो आनंद-सिंधु सुखरासी । त्रिजगी पावे लवें सुखासी ।।
तो सुखधाम राम तन्नाम । सव लोकां दायक विश्राम ।।
जो ही विश्व-भरण-पोषण करि । नाम तयाचें भरत जाण तरि ।।
यत्स्मरणें रिपु नाश पावतो । श्रुति-विश्रुत शत्रुघ्न-नाम तो ।।

**दो०-लक्ष्मण-धाम राम प्रिय सकल जगा आधार !।**
**त्या गुरु वसिष्ठ ठेवी लक्ष्मण नाम उदार ।।१९७।।**

ठेविति नांवें गुरु सुविचारीं । वेद तत्त्व नृप ! तव सुत चारी ।।
मुनि-धन, जन सर्वस्व शंभु असु । ते सुख मानिति बालकेलि रसु ।।
जाणुनि निज हितपति आशिशुपण । रामचरणरत झाले लक्ष्मण ।।
भरत शत्रुहा दोनी भ्रात्यां । प्रभुसेवकशी प्रीती स्तुत्या ।।
श्याम गौर सुंदर युग्में तीं । निरखति जननी दृष्ट काढती ।।
शील-रूप-गुण-धामहि चारी । तदपि राम सुखसागर भारी ।।
इंदु अनुग्रह हृदीं प्रकाशे । सुचविति किरण मनोहर हासें ।।
वर पर्यंकिं अंकिं कधिं अंबा । गोंजारी अति छकुल्या ! प्रिय वा।।

**दो०–ब्रह्म निरंजन अगुण अज व्यापक विगत विनोद ॥**
**तो कौसल्ये-अंकि दे प्रेमभक्ति-वश मोद ॥१९८॥**

❖ ❖ ❖

## अध्याय २३ वा

कामकोटि-छवि शाम शरीर । नीलकंज वारिद-गंभीर ॥
अरुण चरण पंकज नख जोती । कमलदलीं वसलीं जणुं मोतीं ॥
ध्वज रेखांकुश कुलिश तळपती । मुनि मनं नूपुर-नादिं मोहती ॥
कटीं किंकिणी उदरीं त्रिवली । नाभि गभीर कळे ज्या दिसली ॥
भुज विशाल बहूभूषणयुत वर । हृदिं हरि-नखशोभा अति सुंदर ॥
उरिं मणिहार पदक अति शोभे । विप्रचरण देखत मन लोभे ॥
कंबु कंठ अति चिबुकहि सुंदर । अमित मदन-छवि वसे मुखावर ॥
दो दो दशन नि अधर अरुण धर । वर्णिल नासा तिलक कोण वरं ॥
सुंदर कर्ण सुचारु कपोल । प्रिय अति मधुर तोतरे बोल ॥
चिक्कण काळे कुरळे जावळ । मातें रचित करुनि विविधा कळ॥
वपुवरि पिवळें पातळ झबलें । रांगत दुड्दुड् प्रिय मज गमले ॥
छवि न वर्णवे श्रुति-शेषां ही । तो जाणे स्वप्निंहि जो पाही ॥

**दो०–सुख-संदोह मोह-पर-ज्ञान-गिरा गोऽतीत ॥**
**दम्पति-परम-प्रेम-वश करि शिशुचरित पुनीत ॥१९९॥**

या परिं राम जगत्पितृमाता । कोसलपुर-लोकां सुखदाता ॥
जे मानिति रघुनाथ-पदां रति । अशी भवानी ! प्रगट तयां गति ॥

रघुपति-विमुख यत्न करि कोडी । शक्त कवण भवबंधन सोडी ।।
जी वश जीव चराचर करते । ती माया प्रभुचें भय धरते ।।
तिला नाचवी भृकुटि-विलासें । भजणें कोणा त्यजुनि प्रभु असे ।।
मन-कृति-वचनिं चतुरता त्यजतां । करिति कृपा रघुराजा भजतां ।।
अशापरीं प्रभु शिशु – लीलांसी । करुनि सुखवि सब नगरनिवासी ।।
घेउनि उत्संगीं कधिं डोलवि । पाळण्यांत कधि घालुनि हालवि ।।

**दो०– प्रेम मग्न कौसल्या निशिदिन जाति न भान ।।**
**सुतस्नेहवश माता बालचरित करि गान ।।२००।।**

एकवेळ जननिनें न्हाणिला । शृंगारुनि पर्यंकि निजविला ।।
निजकुल-इष्टदेव भगवाना । पूजायास्तव करुनी स्नाना ।।
पूजन करि नैवेद्य समर्पी । स्वयें पाकगृहिं पदांस अर्पी ।।
पुनरपि आली देवघरासी । खात दिसे सुत नैवेद्यासी ।।
सभय पाळण्यापाशि पळाली । सुप्त तिथें सुत बघती झाली ।।
येइ फिरुनि, सुत दिसला तो ही । हृदयिं कंप मनिं धीर न राही ।।
इथें तिथें दो बालक पाही । भ्रम मम मतिचा, दुजें किं कांहीं ।।
जननी व्याकुळ राम निरखती । मधुर सुस्मिता प्रभु तैं करती ।।

**दो०– दाखविलें मातेसि निज अद्‌भुतरूप अखंड ।।**
**प्रतिरोमीं किति कोटी लागलि हो ब्रह्मांड ।।२०१।।**

अगणित रविशशि शिव चतुरानन । बहु गिरि सरित सिंधु महिकानन।।
काल कर्म गुण दोष स्वभावहि । बघे तें हि जें कानीं कधिं नहि ।।

माया विविधा प्रवल पाहिली । सभय जुळुनि कर उभी राहिली ।।
पाहि जीव, नाचवि ती ज्याला । दिसे भक्ति सोडी जी त्याला ।।
तनु पुलकित मुखि शब्द न आला । मिटी नयन पदिं ठेवि शिराला ।।
पाहुनि माते विषण्ण भारी । होति पुन्हां शिशुरूप खरारी ।।
स्तुति करवे ना, मानि भयाला । जगत्पिता मी पुत्र मानला ।।
बहुपरिं हरि जननिस समजावी । अंब ! गोष्ट कोठें न वदावी ।।

**दो०– पुनः पुन्हां कौसल्या विनवी जोडि करां हि ।।**
**प्रभु न अतां कधि लागो तव माया मजला हि । २०२॥**

हरि करि विविध बालचरितांला । परमानंद दिला दासांला ।।
कांहिं काळ लोटत ते भ्राते । वाढति ही परिजन-सुखदाते ।।
जाउनि गुरु कृत चूडाकरणा । विप्र पुन्हां बहु लभति दक्षिणा ।।
परम मनोहर चरित अपार । करत फिरति चारिहि सुकुमार ।।
मन-तन-वचन अगोचर जो ही । दशरथ-अजिरिं फिरे प्रभु तोही ।।
बोलावति जेवत जैं राजा । त्यजुनि येत ना बाल समाजा ।।
कौसल्या बोलावुं जात जैं । ठुमुक् ठुमुक् प्रभु जाति पळत तैं ।।
निगम नेति शिव अंत न पावे । जननि हटें त्या धरण्या धावे ।।
धूलि धूसरित-तनु तैं आले । हसुनि अंकि नृप घेते झाले ।।

**दो०– जेवत चंचल मन इथें तिथें सुसधि बघून ।।**
**पळति हर्षरव करत मुखि दहीभात लावून ।।२०३।।**

बालचरित अति सरल मनोहर । शेष गिरा श्रुति सुगीत शंकर ।।

यांत नव्हें ज्यांचें मनरंजन । केलें त्यांचें विधिनें वंचन ॥
यदा चारि ते कुमार बनती । गुरु पितरौ व्रतबंधा करती ॥
गत गुरुगृहिं रघुराव पढाया । अल्पकालिं विद्या सब आल्या ॥
श्वास सहज ज्याचा श्रुति चारी । हरि तो पढतो कौतुक भारी ॥
विद्या–विनय–निपुण गुण शीलां । रुचती खेळ सकल नृपलीला ॥
चापबाण करतलिं अति शोभति । देखत रूप चराचर मोहति ॥
ज्या पथिं विहरति भाऊ चवघे । थक्क होति नरनारी अवघे ॥

**दो०–कोसलपुरवासी नर नारि वृद्ध आबाल ॥**
**प्रिय सर्वां प्राणांहुनिहि वाटति राम कृपाल ॥२०४॥**

घति सवें मित्रा भावांला । जाति नित्य मृगयेस वनाला ॥
पावन मृग मारिति जिविं जाणुनि । नित्य दाखविति भूपा आणुनि ॥
राम शरानीं मृग जे वधले । तनू त्यजुनि सुरलोकीं वसले ॥
भोजन सानुज समित्र करती । ताताम्बा–आज्ञां अनुसरती ॥
जेणें पुरजन सुखां पावती । असे कृपाकर योग आणती ॥
श्रुति पुराण ऐकति मन लावुनि । स्वयें कथिति अनुजा समजाउनि ॥
उषःकालिं रघुनायक उठती । माय पिता गुरु यां शिर नमती ॥
आज्ञा घेति करिति पुरकाजा । बघुनि चरित हर्षित मनिं राजा ॥

**दो०–व्यापक अकल अनीह अज निर्गुण नाम न रूप ॥**
**भक्तांस्तव विविधा चरित अनुपम करत अमूप ॥२०५॥**

❖ ❖ ❖

## अध्याय २४ वा

हें सब चरित कथित मी गाउनि । पुढिल कथा ऐका मन लाउनि ।।
ज्ञानी विश्वामित्र महा मुनि । विपिनिं वसति आश्रम शुभ जाणुनि ।।
तिथं जप यज्ञ योग मुनि करती । अति मारीच-सुबाहुसि डरती ।।
देखत यज्ञ निशाचर धावति । त्रास देति मुनि दुःखां पावति ।।
गाधिज–चित्ता चिंता व्यापी । हरिविण मरति न निशिचर पापी ।।
तैं मनिं मुनिवर करिति विचारा । प्रभु अवतीर्ण हरण महिभारा ।।
याचमिषें जाउन पद बघतो । विनति करुन दो बंधु आणतो ।।
ज्ञान–विराग–सकल–गुण–अयना । प्रभुस बघेन भरुन मी नयनां ।।

**दो०–बहुविध करत मनोरथां जातां व लगे वार ।।**
**करुनी सरयू–स्नान गत जेथें राजद्वार ।। २०६ ।।**

मुनि-आगमन कळे जैं राजा । भेटुं जाति सह विप्र-समाजा ।।
करुनि दण्डवत सन्मानें मुनि । निज आसनिं बसवीले आणुनि ।।
प्रक्षाळुनि पद कृत अति पूजा । मजसा धन्य आज नहिं दूजा ।।
भोजन नानाविधा घातलें । मुनिवर मनिं अति हर्ष पावले ।।
तनय चारि घालिति मग पायां । राम बघुनि मुनि विस्मृत काया ।।
मग्न होति देखत मुख–शोभे । जणुं चकोर राकाशशि लोभे ।।
नृप हर्षित मनिं, वदले वचना । मुनि अशि केली कृपा न कवणा ।।
कवण आपणां येण्या कारण । वदणें, करण्या लाविन वार न ।।
असुर–समूह सताविति मजसी । आलों याचाया नृप तुजसी ।।

मज सानुज रघुनाथा द्यावें। निशिचर वध मी सनाथ व्हावें ॥

**दो०-भूपति ! द्या मनिं हर्षूनी त्यजा मोह अज्ञान ॥**
**धर्म सुयश ही प्रभु तुम्हां यांचे अति कल्याण ॥२०७॥**

अति अप्रिय वच नृपें परिसलें। हृदयिं कंप मुख-तेज हरपलें ॥
वृद्धपणीं सुत झाले चारी। विप्र वचन वदलां न विचारीं ॥
मागा भूमि धेनु धन कोषा। देऊं आज सर्वस्व सहर्षा ॥
प्रिय न तनू-प्राणांहुनि कांही। ते मुनि देउं निमिषिं एका ही ॥
प्रिय मज सुत सगळे प्राणासम। स्वामि ! न देणें घडे राम मम ॥
कुठें घोर अति कठोर निशिचर। कुठें किशोर परम सुत सुंदर ॥
प्रेम-रसाळा परिसुनि वाणी। ज्ञानी मुनि मनिं मोदा मानी ॥
तैं वसिष्ठ विविधा समजावति। नृप-संदेह विनाशा पावति ॥
आणवि अति सादर दो तनयां। शिकवी विविधा धरुनी हृदया ॥
माझे प्राण नाथ सुत दोनी। तुम्हि मुनि पिता आन नहिं कोणी ॥

**दो०- नृप सोपवि सुत मुनिकरीं देउनि बहु आशीस ॥**
**जननि-भवनिं गले प्रभु निघति नमुनि पदिं शीस ॥२०८रा।**
**सो०- पुरुषसिंह युगवीर हर्षि निघति मुनिभयहरण ॥**
**कृपासिंधु मतिधीर अखिल विश्व-कारण-करण ॥२०८म॥**

अरुण नयन उर भुजा विशाला। नील जलज-तनु शाम तमाला ॥
कटिं पटपीत कसित वर भाता। रुचिर चाप सायक दो हातां ॥
श्याम गौर सुंदर दोघे अति। विश्वामित्र महानिधि पावति ॥

प्रभु ब्रह्मण्य देव मी जाणें । त्यक्त मदर्थ पिता भगवानें ।।
पथि जातां ताडके दावि मुनि । रोषें धावत आली ऐकुनि ।।
एकचि बाणें प्राण हरण करि । निज-पद दिधलें दीन बघुनि तरि ।।
तैं ऋषि हृदिं निज नाथ ओळखिति । विद्यानिधिला विद्या अर्पिति ।।
तिनें न लागे क्षुधा तृषा ही । तनुबल अतुल देइ तेजा ही ।।

**दो०– प्रभुस समर्पुनि आयुधें निजाश्रमीं आणून ।।**
**देति कंद फल भोजना भक्तिप्रिय जाणून ।।२०९।।**

रघुपति वदले सकाळिं, कीं मुनि! । यज्ञ करावा निर्भय जाउनि ।।
मुनिसमूह होमा करूं लागति । आपण मख–संरक्षक राहति ।।
क्रोधी मारीचासुर ऐकत । मुनिद्रोहि ये ससैन्य धावत ।।
तया राम फलविण शर मारिति । शतयोजन सागरतटिं टाकिति ।।
पावकशरें सुबाहुस मारी । निशिचर-कटक अनुज संहारी ।।
असुर-वधें द्विज–निर्भय–कारा । स्तवी देव–मुनि–समाज सारा ।।
तेथें रघुराया दिन कांही । राहति करिति दया विप्रां ही ।।
भक्ति–हेतु बहु कथा पुराणें । कथिलीं विप्रें प्रभु जरि जाणें ।।
वदति आदरें मुनि समजाउनि । चरित एक बघणें प्रभु जाउनि ।।
कळत धनुर्मख रघुकुलनाथा । निघति हर्षित मुनिवर–साथां ।।
आश्रम एक दिसे मार्गीं ही ! । खग मृग जीव जंतु तिथं नाहीं ।।
बघुनि शिला प्रभु मुनिस विचारति । कथा विशेष सकल, मुनि सांगति ।।

**दो०– गौतमनारी शापवश धरुनि उपल-वपु धीर ! ।।**
**चरण-कमल-रज वांछिते कृपा करा रघुवीर ।।२१०।।**

छं०—स्पर्शत पदपावन शोक-विनाशन ती प्रगटे तप पुंज खरी
देखत रघुनायक जन सुखदायक राहि पुढें कर जुळुनि; परी
सुप्रेमाऽधीरा, पुलक-शरीरा शब्द निघे ना मुखीं बळें।
अति महा भागिनी पडली चरणीं युगल नेत्रि जलधार गळे।।१
मनि धीरा धरुनी प्रभु ओळखुनी भक्तिलाभ रघुपति कृपया
अति निर्मल वाणीं स्तवनें वानी ज्ञानगम्य जय रघुवर्या।।
मी नारि अपावन प्रभु जग-पावन रावणारिपु जन-सुखदा ही
राजीव-विलोचन भवभयमोचन पाहि शरण मीं प्रभु पाही।।२
मुनि शापा वदले उत्तम घडलें परम अनुग्रह गमे मला।
दिसले भरलोचन हरि भवमोचन हाच लाभ शंकर-रुचला।।
विनती प्रभुजवळीं बुद्धि बावळी मी न वरा मागें आना।
पद-कमल-परागांरस अनुरागा मम मन-मधुप करो पाना।।३
ज्या पदिं सुरसरिता परम पुनीता प्रगट होइ शिव शिरीं धरी।
ते हे पद-पंकज जे पूजिति अज धृत मम शिरीं कृपाल हरी!।
अशि गौतमजाया निघतां जाया पुनः पुन्हां प्रभुपायिं पडे।
जो मनि अति भावे तो वर पावे मुदित गमन पति-लोकिं
घडे।।४।।

दो०—दीनबंधु हरि असे प्रभु कारणरहित दयाळ।।
तुलसिदास शठ भज तयां त्यजुनि कपट जंजाळ।।२११।।

मास पारायण, सातवा विश्राम

## अध्याय २५ वा

निघति राम-लक्ष्मण मुनि संगें । प्राप्त सकल जगपावन गंगे ।।
गाधिज वदले सकल कथेला । सुरसरिता जशि येइ धरेला ।।
प्रभु ऋषिसह तैं स्नाना करती । विविध दान महिदेव पावती ।।
सह मुनिवृंद सहर्ष निघाले । उपधिदेहपुर सुशीघ्र आले ।।
पुररम्यता राम जैं पाहति । सानुज हर्षा विशेष पावति ।
कूप सरित सर वापी नाना । सलिल सुधा-सम मणि-सोपाना ।।
भृंग मंजु रसमत्त गुंजती । विविधवर्णि कल विहग कूजती ।।
वर्ण वर्ण विकसित वनजातें । त्रिविध पवन दे सदा सुखातें ।।

**दो०–सुमनवाटिका बाग वन विपुल विहंग निवास ।।**
**पुष्पित सफल सुपल्लवित शोभति पुर चौपास ।।२१२।।**

न घडे नगर-रुचिरता वर्णन । जेथें जाई तिथें लुब्ध मन ।।
सुंदर हाट विचित्रित सज्जे । मणिमय निजकरिं रचित जणुं अजें।
धनिक वणिकवर धनद समानहि । स्थित घेउनि सब वस्तू विविधहि।।
चारु चव्हाटे उपपथ सुंदर । सतत सुगंधें सिक्त मनोहर ।।
मंगलमय मंदिर सब भासत । जणुं रतिनाथ चितारी चित्रित ।।
पुर-नर नारि सुभग शुचि संतहि । ज्ञानी धर्मशील गुणवंतहि ।।
अतिशय अनुपम जनक निवासा–। वघुनी विबुध थकीत विलासा ।।
चित्त चकित जैं कोट विलोकित । सकल-भुवन-शोभा जणुं रोखित ।।

**दो०– धवलधाम मणि-पुरट-पट नानापरिं सुघटीत ।**
**सियनिवास सुंदर सदन शोभा अकथ अमीत ॥२१३॥**

द्वार सुभग सब कुलिश-कपाटी । भूप-भाट-नट-मागध-दाटी ॥
तुरग–नाग–शाला सुविशाला । हय-गज-रथ-संकुला त्रिकालां ॥
शूर सचिव सेनप बहु वसती । नृप-गृह-सम सब सदनें असती ॥
पुरा-बाह्य सर समीप सरिते । विविध उतरले नृप कितितरि ते ॥
बघुनि एक अनुपम अमराई । रुचिर सर्वपरिं सब सुखदाई ॥
कौशिक वदले रुचे मम मना । इथं उतरुं रघुवीर सुजाणा ॥
बरें नाथ ! तैं कृपाब्धि वदले । मुनिवृंदांसह तिथें उतरले ॥
विश्वामित्र महामुनि आले । मिथिलापतिला वृत्त मिळालें ॥

**दो०– सवें सचिव शुचि भूरि भट भूसुर वर गुरु जाति ॥**
**मुदित असे मुनिनायका नृप भेटाया जाति ॥२१४॥**

प्रणमति नृप शिर ठेवुनि पायां । देति मुदित आशिस मुनिराया ॥
विप्रवृंद सब सादर वंदति । महाभाग्य जाणुनि आनंदति ॥
वारंवार पुसुनि कुशलाला । बसविति विश्वामित्र नृपाला ॥
आले बंधूद्वय समया या । गेलेले फुलबाग बघाया ॥
श्याम-गौर मृदु वयें किशोर । नयन सुखद जग-चित्ता चोर ॥
येतां रघुपति सर्वहि उठले । विश्वामित्रें निकट बसवले ॥
सकल सुखी दोघांस निरखितां । वारि विलोचनिं वपू पुलकिता ॥
मूर्तिस मधुर मनोहर देखे । होइ विदेह विदेह् विशेखें ॥

**दो०–प्रेममग्न मन बघुनि नृप धरुनि विवेकें धीर ॥**
**शिर मुनिपदिं वंदुनि वदे गद्गद गिरा गभीर ॥२१५॥**

नाथ ! वदा द्वय सुंदर बालक । मुनिकुलतिलक किं नृप-कुलपालक
ब्रह्म नेति जें निगमिं गाइलें । उभय वेष कीं धरुनि पावलें ॥
सहज विरागरूप मम चित्तहि । चंद्रि चकोरासम अति थक्कहि ॥
पुसतो प्रभु ! यास्तव सद्भावें । वदा नाथ ! कांहिं न लपवावें ॥
यांस विलोकित अति अनुरागी । ब्रह्मसुखा मन जबरीं त्यागी ॥
वदति हसुनि मुनि, वदलां ठीक । नृप ! तुमचें वच नव्हें अलीक ॥
हे प्रिय सर्वां जितके प्राणी । श्रवुनि राम सस्मित मनिं, वाणी॥
हे रघुकुलमणि दशरथ-आत्मज । धाडि भूप ममहिता सवें मज ॥

**दो०–राम नि लक्ष्मण बंधुवर रूप–शील- बल–धाम ॥**
**मख रक्षित जग साक्षि; रणिं जिकुनि असुर ग्राम । २१६॥**

राव वदति मुनि! तव पद बघुनहि । पुण्यप्रभाव निज वदवत नहिं ॥
श्याम गौर सुंदर हे भ्राते । आनंदा आनंदहि दाते ॥
यांची प्रीति परस्पर पावन । वदवेना, शोभन मनभावन ॥
मुदित विदेह वदे श्रुणु मुनिवर । ब्रह्म जीवसे स्नेहि सहज वर ॥
प्रभुसि बघति बहुदां नर–नाहो । पुलक गात्रिं मनिं अति उत्साहो ॥
स्तवुनि मुनिस शिरपदीं ठेवुनी । निघति नगरिं अवनीश घेउनी ॥
सुखद सर्वदा सुंदर सदनीं । नेइ, निवासा देइ नृपमणी ॥
बहुविध सेवा पूजन केलें । आज्ञा घेउन नृप घरिं गेले ॥

**दो०–ऋषि समेत रघुवंशमणि कृत भोजन विश्राम ॥**
**प्रभु सानुज बसले तदा एक उरे दिन-याम ॥२१७॥**

हौस लक्ष्मणा मनीं आगळी। येऊं जनकपुरि पाहुन सगळी ॥
प्रभु-भय मुनि-संकोचहि वाटे। सस्मित मनि न निघे मुखवाटें ॥
अनुज-मनो-गति रामा कळली। हृदयि भक्तवत्सलता स्त्रवली ॥
अति विनयें, लाजतां स्मितानन। वदले पावुनि गुरु-अनुशासन ॥
नाथ ! नगर लक्ष्मण बघुं इच्छिति। प्रभु-संकोच भयें ना प्रगटति ॥
आज्ञा आपली मिळेल मज जर। नगर दाखवुनि आणिन सत्वर ॥
तैं मुनीश वदले सप्रीती। राम तुम्हि न कशि राखा नीती ॥
धर्म-सेतु-पालक तुम्हि ताता। प्रेम-विवश सेवक सुख-दाता ॥

**दो०–सुख-निधान युग बंधु जा या नगरी पाहून ॥**
**करा सुफल जननेत्र सब सुंदर मुख दावून ॥२१८॥**

वंदुनि मुनिपद-कमलां भ्राते। निघति लोक-लोचन सुखदाते ॥
बालकवृंद बघुनि अति शोभे। येति सवें लोचन-मन-लोभे ॥
पीत वसन परिकर कटि भाता। चारु चाप शर शोभति हातां ॥
तनु–अनुसार उटी चंदन वर। जोडी श्यामल गौर मनोहर ॥
केसरि-कंधर भुजा विशाला। उरिं अति रुचिर नागमणिमाला ॥
सुभग सोन-सरसीरुह लोचन। मुख-मृगांक तापत्रय-मोचन ॥
कानीं कनकफुलें छवि देती। बघत चित्त चोरुन जणुं घेती ॥
भृकुटि कुटिल वर दृष्टि मनोहर। तिलक रेख शोभति जणुं मोहर ॥

**दो०–रुचिर चौतनी सुभग शिरिं मेचक कुंचित केश ॥**
**नख–शिख सुंदर बंधु दो शोभे सकल सुदेश ।।२१९॥**

वघण्या नगर भूप–सुत आले । समाचार पुरजना मिळाले ॥
धावति धामां कामां त्यागुनि । जणूं रंक निधि लुटण्या लागुनि ॥
बंधु सहज सुंदर दो पाहुनि । सुखी होति लोचन-फल पावुनि ॥
युवती भवन–गवाक्षीं बसती । रामरूप अनुरागे बघती ॥
परस्परां म्हणती सुप्रेमें । कोटि काम छवि जित इहिं नेमें ॥
सुर मुनि मनुज दनुज नागांमधि । श्रुत न कुठें अशि अति शोभा कधिं ॥
विष्णु चतुर्भुज विधि चतुरानन । विकट वेष पुररिपु पंचानन ॥
असा देव दुसरा कोणी नहि । ही छवि सखी ! तुलणें जयासहि ॥

**दो०–वय किशोर सुषमा–सदन श्याम गौर सुखधाम ।**
**ओवाळा प्रत्यंगि तरि कोटि कोटि शत काम ।।२२० ।**

वद सखि कवण असे तनुधारी । जो छवि, बघुनि न मोहे, भारी ।।
प्रेमें कुणि मृदु वचनें म्हणते । सुज्ञे कळलें मला ऐक तें ॥
दोघे सुत दशरथ राजाचे । हे कल युगल बाल–हंसांचें ॥
कौशिक–मुनि–मख–रक्षण कर्ते । रणाजिरीं निशिचर संहर्ते ॥
श्याम–गात्र कल कंज विलोचन । जो मारीच सुभुज–मद–मोचन ॥
तो कौसल्या सुत सुखखाणी । नाम राम धनु सायक पाणी ॥
गौर किशोर वेष वर धारी । करिं शरचाप राम–अनुसारी ॥
लक्ष्मण नाम राम लघु–भाई । सखे सुमित्रा त्याची आई ॥

**दो०-करुनि विप्रहित बंधुयुग पथि मुनि वधूद्धरून ।।**
**आले बघण्या चाप-मख त्या हर्षित ऐकून ।।२२१।।**

बघुनि राम छवि एक म्हणाली । योग्य जानकिस हा वर आली ! ।।
जर सखि यां पाहिल नरनाहो । हटें त्यजुनि पण करिल विवाहो ।।
अपर वदे यां नृपें जाणिले । मुनिसह सादर बहुत मानिले ।।
सखि ! परंतु पण नृप ना त्यजतो । विधिवश हटि अविवेका भजतो ।।
कोणि म्हणे जर भला विधाता । सकलां म्हणति, उचित फळदाता।।
मिळे जानकिस तर वर हाही । आलि ! यांत संदेहचि नाहीं ।।
दैवें हा येईल योग जर। होतिल सब कृतकृत्य लोक तर ।।
कारण अशि अति आर्ति अम्हांतें । कधि तरि यां आणिल हें नातें ।।

**दो०-ना तर सखि बघ आपणां यांचें दर्शन दूरि ।।**
**येइ सुयोग कि हा यदा पुण्य पुराकृत भूरि ।।२२२।।**

म्हणे अपर कीं कथिलें समुचित । या विवाहि सर्वांचें अति हित ।।
कोणि म्हणे शिवचाप कठोर । हे श्यामल मृदु-गात्र किशोर ।।
सुज्ञे ! सगळें दुर्घट गमतें । ऐकुनि अपर सखी मृदु वदते ।।
कोणि कोणि सखि यां असं म्हणती । महा प्रभावी जरि लघु दिसती ।।
यत्पद-पंकज धूळ लागली । अति पापीण अहल्या तरली ।।
तो कि न तोडी शिवधनुला ही । त्यज न चुकुन विश्वास असा ही।।
जो विरंचि रचि सीते सुंदर । तो सुविचारिं रची श्यामल वर ।।
श्रवुनि तिचे वच सकल हर्षल्या । घडो असेंच सकल मृदु वदल्या ।।

**दो०-हृदिं हर्षति वर्षति सुमन सुमुखि सुलोचनि-वृंद ।।**
**बंधू जाति जिथें जिथें तेथें परमानंद ।।२२३।।**

जाति बंधु पुर-पूर्व दिशेला । जिथें धनुर्मख-मंडप केला ।।
अति विस्तृत वर फरशि वसविली । विमल वेदिका रुचिर सजविली ।।
भंवति कनक-मंचां सुविशालां- । निर्मित बसावया महिपालां ।।
भोंवति मागें निकट तयां अति । अपर मंच-मंडलें विराजति- ।।
उंच कांहिशीं विविधा सुंदर । बसतिल पुरजन येतां ज्यांवर ।।
त्यांचे निकट विशाल सुशोभित । धवल धाम बहुवर्णी निर्मित ।।
जिथें वसुनि वघतिल पुरनारी । यथा योग्य निजकुल अनुसारीं ।।
पुर-बालक अति मृदुमृदु वचनें । प्रभुस दाखविति सादर रचने ।।

**दो० - प्रेमविवश शिशु या मिषें स्पर्शति मनहर गात्र ।।**
**पुलकति बंधुंस बघबघुनि हृदयें प्रमोद-पात्र ।।२२४।।**

प्रेमविवश शिशु राम जाणती । निकेतांस सप्रीति वानती ।।
वोलावति सब जशि रुचि ज्यातें । स्नेहें जाती दोघे भ्राते ।।
राम दाखविति अनुजा रचने । वदुनि मधुर मृदु मनहर वचनें ।।
लव निमिषामधि भुवन-निकायां । ज्याचे अनुशासनिं रचि माया ।।
दीन दयाळू भक्तीस्तव तो । चकित चापमख-शाला वघतो ।।
वघुनि कौतुका निघति गुरुकडे । उशिर जाहला भीति मनिं पडे ।।
भीतिस भिववी धाक जयाचा । तो प्रभाव दाखवि भजनाचा ।।
रुचिर मधुर मृदु वोलुन वचनां । वळें बालकां धाडिति सदनां ।।

**दो०—प्रेमें, सभय, विनीत अति संकोचित दोघेहि ।।**
**गुरु-पद-पंकजिं नमुनि शिर आज्ञेनें बसले हि ।।२२५।।**

निशामुखीं दे मुनि अनुशासन । सर्वांनीं कृत संध्या-वंदन ।।
वदत कथा इतिहास पुराणां । क्रमिति रुचिर युग निशियामांनां ।।
मग मुनिवर जाऊन झोपले । दाविति पायां बंधु युग भले ।।
ज्यांच्या चरण-सरोजां-लागीं । करिति विविध जप योग विरागी ।।
बंधू जणुं ते प्रेमें जितले । गुरुपद—पंकज—सेवे रतले ।।
वारंवार देति आज्ञा मुनि । रघुवर करिती शयना जाउनि ।।
चेपि चरण लक्ष्मण हृदिं लावुनि । प्रेमें सभय परम सुख पावुनि ।।
कितिदां प्रभु वदले निज बाळा ! । पडे धरुनि हृदिं पद—जलजांला ।।

**दो०—उठले लक्ष्मण गत निशा कुक्कुट—रव ये कानिं ।।**
**गुरुचे पूर्वी जगत्पति राम जागले ज्ञानि ।।२२६।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २६ वा

शौचां करिती स्नानहि जाउनि । मुनि-पदिं नमिती स्वकर्म सारुनि ।।
बघुनि समय गुरु—आज्ञा मिळतां । बंधु चालले कुसुमां करतां ।।
भूपबाग वर जाउनि बघती । लुब्ध वसंत जिथें करि वसती ।।
विटप मनोहर विविध लागले । लताकुंज वर चित्र बनवले ।।
नव पल्लव फल सुमन सुशोभित । निज संपदिं सुर-रुखां लाजवित ।।
चातक कोकिल कीर चकोर । कूजति विहग नटति कल मोर ।।

मध्यबाग सर रुचिर शोभले । मणि सोपान विचित्र बनवले ॥
विमल सलिल सरसिज बहु-रंगित । जल-खग कूजति भृंग विगुंजित ॥

**दो०-प्रभु तडाग बागे बघुनि हर्षति बंधु समेत ॥**
**परम रम्य आराम हा जो रामा सुख देत ॥२२७॥**

चहुं दिशि बघुनि पुसुनि माळयानां । प्रमुदित जमविति दल-फूलांना ॥
येइ तिथें सीता समया ते । गिरिजा-पूजे प्रेषित मातें ॥
सवें सखी सब सुभग जाणत्या । मधुर मनोहर गात गान त्या ॥
सर-समीप गिरिजा-गृह शोभत । वर्णवे न देखत मन-मोहत ॥
मज्जन करि सरिं सखीं-समेता । गेली प्रमुदित गौरि-निकेता ॥
पूजा करुनि अधिक अनुरागें । निज अनुरूप सुभग वर मागे ॥
एक सखी सोडुनि सियसंगति । गेलेली बघुं फुलवागे प्रति ॥
जातां पाहि उभय भ्रात्रांसी । प्रेमविवश ये सीतेपासी ॥

**दो०-दिसत सखिस तद्दशा तनु पुलकित लोचनिं पाणि ॥**
**वद कारण कां हर्ष तुज पुसति सकल मृदु-वाणि ॥२२८॥**

प्राप्त कुमर युग बघण्या बागे । वय किशोर सुंदर सर्वांगें ॥
श्यामल गौर कवण वाखाणी । गिरा अनयन नयन विण वाणी ॥
ऐकुनि सब सखि सुजाण हर्षित । जाणति सीता अति उत्कंठित ॥
एक म्हणे आली ! नृप सुत ते । श्रुत आले मुनिसवें काल जे ॥
जिहिं निजरूप-मोहनी घालुन । कृत निजवश पुर-नर-नारीजन ।
जिथें तिथें छवि वर्णिति लोकहि । बघणें, अवश्य बघण्या-योग्यहि ॥

तिचें वचन सीते अति रुचलें । दर्शनार्थि लोचन आकुळले ॥
निघे पुढें करि त्या प्रिय सखितें । प्रीति पुरातन कुणि न लक्षि ते ॥

**दो०-नारद वच सीता स्मरे उपजे प्रीति पुनीत ॥**
**निरखि सकल दिशि चकित ती जणुं शिशु मृगी सुभीत॥२२९॥**

कंकण किंकिणि नूपुर रुणझुण । परिसुनि अनुजा म्हणति विवंचुन ॥
जणूं मदन दुंदुभि वाजवितो । मनिं आणत करि विश्व-विजय तो ॥
वळुनि बघति जिकडे मन चोर । सीतामुखशशिं नयन चकोर ॥
होति विलोचन चारु अचंचल । त्यजि जणुं निमि संकोचि दृगंचल ॥
सीतारूप बघुनि सुख झालें । स्तविती हृदयीं वचनिं न आले ॥
जणु विरंचि निज पाटव साठवि । विरचुनि विश्वीं प्रगटुनि दाखवि ॥
सुंदर सुंदरतेला करते । छविगृहिं दींपशिखा जणुं जळते ॥
कवि-उच्छिष्टचि उपमा सारी । उपमुं कुणासि विदेह कुमारी ॥

**दो०-वानुनि सीतारूप हृदिं स्ववशा घेति विचारिं ॥**
**प्रभु शुचिमन बंधुस वदति वचन समय-अनुसारि ॥२३०॥**

हीच जनक-तनया ती ताता ! । होइ धनुर्मख जीचे करतां ॥
गौरि पूजना सखि तिज आणित । फुल बागेला फिरे प्रकाशित ॥
पाहुनि तिचे अलौकिक शोभे । सहज पूत मन माझे क्षोभे ॥
जाणे कारण सकल विधाता । स्फुरति शुभांगे मम बघ ताता ! ॥
सहज रघुकुळीं स्वभाव राया ! । मन कुमार्गि कधिं टाकि न पाया ॥
मला प्रतीति मनाची भारी । स्वप्निंहि दृष्ट न कधिं परनारी ॥

रणिं रिपु ज्यांची पाठ न पाहति । मन किं नजर परनारि न पावति।।
याचक कधिंहि न ऐकति 'नाहीं' । ते नरवर थोडे जगिं पाही ।।

**दो०–बंधुसि वार्ता करत मन लोलुभ सिता छवींत ।।**
**मुख सरोज मकरंद छवि तें मधुपा–सम पीत ।। २३१ ।।**

बघते चकित चहूं दिशि सीता । कोठें गत नृपकिशोर चिंता ।।
जिथं मृग-शावक-नयनि विलोकी । वर्षि कमल सित पंक्ति तिथें कीं ।।
लते आड सखि खुणें दाखवित । श्यामल गौर किशोर सुशोभित ।।
लालचि लोचन रूपा बघतां । हर्षति जणुं निज निधि ओळखतां ।।
नयन बघत रघुपतिछवि थक्कित । मिटण्याचें पापण्याहि सोडित ।।
स्नेह अधिक वपुभान न राहे । शरद-शशिस जणुं चकोरि पाहे ।।
नयन-मार्गिं रामा उरिं आणी । पक्ष्म कवाडें लावि शहाणी ।।
प्रेमविवश सीता, सखि जाणति । वदवेना, मनिं संकुचिता अति ।।

**दो०–बंधु उभय तों प्रगटले लतागृहाआंतून ।।**
**निघे विमल विधु युगल जणुं जलदपटल सारून ।।२३२।।**

शोभा-शीव सुभग युग वीर । नील–पीत–जलजाभ–शरीर ।।
काकपक्ष शिरिं शोभति त्यांचे । गुच्छ मधीं मधिं कुसुमकळ्यांचे ।।
भाळिं टिळे श्रमबिंदु विराजति । सुभग भूषणें श्रवणीं भ्राजति ।।
विकट भ्रुकुटि कच काळे कुरळे । लोचन अरुणकंज नव खुलले ।।
चारु चिबुक नासिका कपोलहि । हास-विलास घेत मन मोलहि ।।
केवि वर्णवे मुख छवि मातें । बघुनि लाज बहु किति कामांतें ।।

हृदिं मणि–माल सु–कम्बू–ग्रीवा । कामकलभकर भुज वल–शीवा ।।
द्रोण सुमनयुत रुचिर वाम करिं । श्याम कुमर सखि! फार रुचिर तरिं।।

**दो०–केसरि कटि, पटपीतधर सुषमा–शील–निधान ।।**
**बघुनि भानुकुल–भूषणा विसरति सखि निज भान ।।२३३।।**

धरुनि धीर सखि एक शहाणी । सांगे सीते धरूनी पाणी ।।
मग गौरींचे करणें ध्याना । भूप किशोर बघुनि कां ध्याना ।।
सिता नयन संकोचें उघडित । सन्मुख दो रघुसिंह विलोकित ।।
रघुपतिशोभा नखशिख निरखुन । स्मरुनि पितृपणा क्षोभे अति मन ।।
परवश दिसतां सखींस सीता । झाला उशिर म्हणति सब भीता ।।
येउं उद्यां किं पुन्हां या कालीं । वदुनि, एक मनिं हसली आली ।।
गूढ गिरें सीता संकोचित । समजुनि उशिर मातृभय मानित ।।
वहु धरि धीर राम हृदिं आणी । वळे, तातवश अपणां जाणी ।।

**दो०–खग मृग तरु बघण्या मिषें फिरत वारंवार ।।**
**बघबघुनी रघुवीर छवि वाढं प्रीति अपार ।।२३४।।**

जाणुनि शिवधनु कठिण, कळवळे । राखुनि शामल मूर्ति उरिं वळे ।।
प्रभु जैं जात जानकी जाणी । सुख–स्नेह–शोभा–गुण–खाणी ।।
परम प्रेममय मृदु मसि करिती । चारु चित्त–भित्तीवर लिहिती ।।
पुन्हां भवानी–भवनीं आली । पदिं वंदुनि कर जुळुनि म्हणाली ।।
जयजय गिरिवर–राज किशोरी । जय महेश–मुख–चंद्र–चकोरी ।।
जय गजवदन–षडानन–माये । जगतजननि दामिनि–दुति–काये ।।

आदि मध्य ना तव अवसान न । श्रुती प्रभावा अमित जाणत न ॥
भवभव-विभव-पराभव-कारिणि । विश्वविमोहिनि स्ववशविहारिणि॥

**दो०–पति-देवता-सुनारिमधिं प्रथम अंब तव रेख ॥**
**महिमा अमित न वदुं शकति अयुत शारदाशेष ॥२३५॥**

तुज सेवतां सुलभ फल चारी । वरदायिनी पुरारी–प्यारी ॥
देवि पूजुनी तव पद-पद्मां । पावति मुनि नर सुर सुखसद्मा ॥
मनोरथा मम नीट जाणसी । सर्व–हृदय-पुरिं सदा राहसी ॥
म्हणुनी प्रगट न मी वदलें ही । असें वदुनि पद धरि वैदेही ॥
प्रेम विनति वश भवानि झाली । सस्मित मूर्ती माळ गळाली ॥
सादर सीता प्रसाद शिरिं धरि । वदे गौरि, हर्षित अति अंतरिं ॥
श्रुणु आशीस सत्य मम सीते । पुरी होइ कामना मनीं ते ॥
नारदशद्ब सदा शुचि साचा । तो वर मिळे ध्यास मनिं ज्याचा ॥

**छं०–मनिं ध्यास ज्याचा तो मिळे वर सहज सुंदर सावळा ॥**
**करुणानिधान सुजाण शीलहि स्नेह जाणत आपला ॥**
**हा गौरि-आशीर्वाद परिसुनि हर्ष सखिसह पावली ॥**
**तुलसी भवानिस पूजि घडि घडि मुदित मंदिर चालली ॥१॥**

**सो०–बघुनि गौरि अनुकूल हर्ष सिते मनिं कसा वदुं ॥**
**मंजुल मंगल-मूल वामांगें लागलीं स्फुरुं ॥२३६॥**

वानित मनिं सीता-रूपासी । गेले अनुजासह गुरुपासीं ॥
राम कौशिका सगळें सांगत, । सहज सरल, छल नाहीं स्पर्शत ॥

मिळत सुमन मुनि करिति पूजना । मग देती आशिस उभयांनां ॥
होतिल सुफल मनोरथ तुमचे । रामलक्ष्मणां मनि सुख संचे ॥
कृत-भोजन मुनिवर विज्ञानी । सांगुं लागले कथा पुराणी ॥
विगत दिवस गुरु-आज्ञा मिळतां । उभय बंधु गत संध्ये करतां ॥
प्राचीं दिशि शशि सुभग उगवला । सीता-मुखसम सुखदचि दिसला ॥
पुनरपि करिति विचार मनांही । सीता-वदन सम हिमकर नाहीं ॥

**दो०—जन्म सिंधुमधिं बंधु विष, दिनमलीन सकलंक ॥**
**सीतामुख समता किं या चांद बापुडा रंक ॥२३७॥**

घटे चढे विरही-दुखदायक । ग्रासि राहु निजसंधी साधक ॥
द्रोहि पंकजां शोकद चक्रां । अवगुण बहु तुजमाजीं चंद्रा ! ॥
वैदेही मुख तुजसी तुलतां । दोष घडे कृति करुनि अनुचिता ॥
सीता मुख छवि शशिमिषिं वानुनि । निघति गुरुकडे निशाऽति जाणुनि ॥
मुनिवर चरण-सरोजीं प्रणमुनि । कृत विश्रामा आज्ञा पावुनि ॥
सरे रात्र रघुनायक जागति । बंधुस बघुनि असें वदुं लागति ॥
बघ अरुणोदय झाला ताता । पंकज-कोक-लोक-सुखदाता ॥
प्रभुचा प्रभाव सूचक भाषण । मृदु करती कर जोडुन लक्ष्मण ॥

**दो०—म्लान कुमुदं अरुणोदयीं उडुगण तेजें क्षीण ॥**
**तव आगमना ऐकुनी जसे नृपति बलहीन ॥२३८॥**

नृपगण-उडुगण-तेजें सारीं । ढळवुं न शकति चापतम भारी ॥
कमल कोक मधुकर खग नाना । हर्षित सगळे निशावसानां ॥

भक्तां प्रभु तव असें समस्तां । सुख होइल बहु धनू भंगतां ।।
भानु उदित तम अश्रम सरला । तारे लपले प्रकाश भरला ।।
रघुराया ! निज-उदय-मिषें रवि । प्रभू-प्रताप नृपांनां दाखवि ।।
तव भुजबल-महिमा उद्‌घाटित । धनु-विघटन-परिपाटीं प्रगटित ।।
परिसुनि हें प्रभु सुस्मित करती । सहज पूत शुचि होति मज्जती ।।
नित्यकर्म कृत येति गुरूप्रति । चरण सरोजिं सुभग शिर नमवति।।
जनक शतानंदा तैं अणविति । शीघ्र कौशिकापाशिं पाठविति ।।
येउन जनकविनति ते सांगति । हर्षित मुनि बंधुस बोलावति ।।

**दो०–शतानंद पद नमुनि गुरुपाशीं प्रभु बसतात ।।**
**चला वदति मुनि निमंत्रण जनकें प्रेषित तात ।।२३९।।**

**मास पारायण, आठवा विश्राम.**

**नवाह्न पारायण, द्वितीय विश्राम.**

❖ ❖ ❖

## अध्याय २७ वा

जाऊं सीता-स्वयंवराला । बघुं महती दे ईश कुणाला ।।
लक्ष्मण वदे तोच यशभाजन । ज्यावर नाथ ! कृपाकर आपण ।।
हर्षित मुनि सब वर वच ऐकुनि । देती आशिस सब सुख पावुनि ।।
मग मुनिवृंद-समेत कृपालें । कृत गमना बघुं धनुमखशाले ।
रंगभूमिं आले दो भ्राते । पुरजन सब पावति शोधातें ।

निघति भुलुनि गृह-कार्यें सारीं । बाल जवान जरठ नरनारी ॥
जनक बघुन बहु गर्दी जमली । शुचि सेवक सब आणवि जवळी ॥
त्वरें निकट लोकां सब जावें । उचितासनिं सकलां बसवावें ॥

**दो०–बोलुनि त्यानीं नम्र मृदु बसवीले नर नारि ॥**
**उत्तम मध्यम नीच लघु स्थळिं निज पदानुसारिं ॥२४०॥**

राजकुमर आले त्या समयीं । प्रसृत मनोहरता जणुं कायीं ॥
गुणसागर नागर वर वीर । सुंदर शामल गौर शरीर ॥
राजसमाजिं विराजति सुंदर । उडुगणिं जणुं युग पूर्ण इंदु वर ॥
मनी भावना ज्यांच्या जैसी । दिसली त्या प्रभु-मूर्ती तैसी ॥
बघती रूप महा रणधीर । जणूं वीररस धरी शरीर ॥
सभय कुटिल नृप प्रभुला पाहत । भारि भयानक मूर्ती भासत ॥
असती असुर कपट-नृप-वेषीं । प्रगट तयां प्रभु काळ विशेषीं ॥
बंधू-द्वया बघति पुरवासी । नरभूषण लोचन-सुख-रासी ॥

**दो०–नारी निरखिति मुदित मन निज निज रुचि अनुसार ।**
**मूर्ति परम अनुपम धरुनि जणुं शोभ शृंगार ॥२४१॥**

प्रभु-विराटमय पाहति पंडित । बहु पद कर शिर मुखाक्षि मंडित ॥
जनक जाति अवलोकति कैसे । स्वजन सगे प्रिय वाटति जैसे ॥
सहित विदेह विलोकिति राणी- । शिशुसम कशी प्रीति कुणि वानी ॥
परमतत्त्वमय योगि-जनांसी । शांत शुद्ध सम स्वयंप्रकाशी ॥
हरिभक्तां दिसले दो भ्राते । इष्टदेव इव सब सुखदाते ॥

सिता राम ज्या भावें बघते । स्नेह न वा कथनीय सौख्य तें ।।
तिजहि न वदवे हृदयें अनुभवि । शके कोण कधि केवीं वदुं कवि ।।
एवि भाव मनि जेवीं वसले । त्यां कोसल पति तेत्रीं दिसले ।।

**दो०–राज-समाजि विराजती कोसलराज-किशोर ।।**
**सुंदर शामल गौर तनु विश्व-विलोचन-चोर ।।२४२।।**

दोन्ही सहज मनोहर मूर्ती । कोटि काम उपमा हि अपूर्ती ।।
सुंदर मुख शरदेन्दु–विनिन्दक । नीरज–नयन मना आल्हादक ।।
नजर सुचारु मार–मनहारी । वदवत ना, जीवा प्रिय भारी ।।
श्रुति कल गाल, कुंडलें लोलहि । चिबुक अधर सुंदर, मृदु बोलहि ।।
हास्य निन्दितें कुमुद–वंधु कर । विकट भ्रुकुटि नासिका मनोहर ।।
भालिं विशालीं तिलक झळकती । कच लक्षुनि अलि-अवलि लाजती ।।
पीत चौतनीं शिरीं मनोरम । कुसुम-मुकुल मधि गुंफित उत्तम ।।
कंवु गळां कल रेखा परमा । त्रिभुवन सुषमेची जणुं सीमा ।।

**दो०–कुंजर-मणि-कंठा कलित हृदयीं तुलसी माळ ।।**
**वृषस्कंध केसरी-ढब बलनिधि बाहु विशाळ ।।२४३।।**

बद्ध पीतपटिं तूण कटीवर । स्कंधीं वाम धनू हातीं शर ।।
सुन्दर यज्ञोपवीत पिवळें । नखशिख मंजु महाछवि नटले ।।
बघुनि, सकल लोकां सुख मिळलें । लोचन खिळले वुबुळ न हलले ।।
हर्षित जनक बघुनि भावांनां । जाति धरिति मुनिपद कमलांनां ।।
विनति करुनि निज कथा निवेदिति । रंगअवनि सव मुनिस दाखविति ।।

उभय कुमरवर जाती जेथें । चकित सकल अवलोकति तेथें ॥
निज सन्मुख सब पाहति रामा । कोणि न जाणे विशेष मर्मा ॥
भलि रचना, मुनि नृपा म्हणाले । राजा मुदित, महासुख झालें ॥

**दो०–मंच एक जो उच्चतम सुंदर विशद विशाल ॥**
**मुनि समेत दो बंधुनां तिथें बसवि महिपाल ॥२४४॥**

प्रभुस बघुन नृप हरले सारे । जणुं राकेश–उदयिं नभि तारे ॥
मनीं प्रतीती सर्वांना ही । मोडिल राम चाप शक नाहीं ॥
न भंगुनिहि भव–धनुस विशाला । घालिल सिता राम गळि माला ॥
हें जाणुनि निज भवनांते जा । यश प्रताप हरुनि बल–तेजा ॥
विहसति परनृप परिसुनि वाणी । जे अविवेक–अंध अभिमानी ॥
दुस्तर विवाह धनु तुटतां ही । कोण, न भंगुन कुमरि विवाही ॥
एक वेळ काळहि जरि आला । सीतेस्तव रणिं जिकुं तयाला– ॥
सस्मित परनृप ऐकुनि कानें । धर्मशील हरिभक्त शहाणे ॥

**सो०–करूनि भूप-मद चूर राम सितेला पर्णितिल ॥**
**दशरथ-सुत रणशूर कोण तयां रणिं जिंकितिल ॥२४५॥**

शेखी मिरवुनि मरा न वाया । मनमांडे किं भूक शमवाया ॥
ऐका शिक्षा परम पुनीता । जाणा जिविं जगदम्बा सीता ॥
विश्वपिता रघुपतीस जाणुनि । घ्या डोळेभर रूप न्यहाळुनि ॥
सुंदर सुखद सकल गुणरासी । हे दो बंधु शंभु–उर–वासी ॥
सुधा–समुद्र समीप न बघतां । मृगजळ बघुनि पळुनि कां मरतां ॥

करा जसें जा रुचे जयाला । आज जन्मफल लाभ अम्हांला ।।
सांगुनि भले भूप अनुरागति । अनुपम रूप विलोकूं लागति ।।
सुर वधती नभिं बसुनि विमानां । वर्षति पुष्प करिति कल गाना ।।

**दो०–सिते आणण्या धाडि तैं सुसमय जनक बघून ।।**
**सादर सुंदर चतुर सब सखी निघति घेऊन ।।२४६।।**

सीता–रूप न वदवे वाणीं । जगदंबिका रूप–गुण–खाणी ।।
उपमा सकल तुच्छ मज वाटति । प्राकृत–नारि–अंगि अनुरागति ।।
सीते त्या उपमांनीं वर्णुनि । अयश कोण घे कुकवी म्हणवुनि ।।
सीते जर नारींस तुलावी । अशि कमनीया कुठें पहावी ।।
गिरा मुखर, तनुअर्ध भवानी । पति अनंग रति विषाद खाणी ।।
प्रिय वारुणि विष बंधु जितें ही । म्हणूं रमेसम कशि वैदेही ।।
जर छवि सुधा–पयोधि असे ही । परम–रूपमय कच्छप तेही ।।
शोभागुण मंदर शृंगारू । मथी पाणिपंकजिं निज मारू ।।

**दो०–अशि उपजे लक्ष्मी यदा सुंदरता–सुख–बीज ।।**
**संकोचें तरि कवि वदति सीते समान तीज ।।२४७।।**

घेउनि निघती सुज्ञ सखि सवें । गात मनोहर गीत कल रवें ।।
शोभे नवतनु सुंदर साडी । जगजननी छवि अतुलित गाढी ।।
भूषण सकल सुदेशीं खुललीं । सखिनीं प्रत्यंगीं शुभ सजलीं ।।
जैं सीता करि रंगि पदार्पण । रूपें मोहित नर, नारी पण ।।
मुदित देव दुंदुभि वाजविती । वर्षुनि कुसुम, अप्सरा गाती ।।

करसरोजिं शोभे जयमाला । बघे अचानक सकल नृपांलां ।।
सीता चकित, बघे रामासी । होति सकल नृप वश मोहासी ।।
मुनि समीप युग बंधू दिसतां । लोचन लुब्ध अचल, निधि मिळतां।।

**दो०–गुरुजन लाज समाज बहु सिता सलज्ज बघन ।।**
**बघुं लागे सखिकडे उरिं रघुवीरा आणून ।।२४८।।**

रामरूप सीता-छवि बघुनी । नरनारी निर्निमेष बनुनी ।।
सकल सचित वदूं संकुचती । विधिस विनंति मनोमय करती ।।
वेगिं जनक–जडतेस विधे हर । त्या आम्हां–सम बुद्धी दे वर ।।
विण विचार पण नृपें त्यजावा । सीताराम विवाह करावा ।।
भलें म्हणे जग, रुचतें सर्वां । हट्टें अंति दाह उरिं बर्वा ।।
ध्यास हाच लोकांस लागला । जानकि–जोगा सु–वर सावळा ।।
वंदीजनां जनक बोलावति । ब्रीदावलि वर्णित ते ठाकति ।।
वदले नृप जा सांगा मम पण । जाति भाट, मनिं थोडा हर्ष न ।।

**दो०–बोलति बंदी वचन वर ऐका सब महिपाल ।।**
**आम्हीं सांगुं विदेह–पण, भुज उचलून, विशाल ।।२४९।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २८ वा

नृपभुजबल विधु शिवधनु राहू । गुरु कठोर ठाउक सर्वां हूं ! ।।
भारि महाभट बाण नि रावण । गत चुपचाप बघोनि शरासन ।।

त्या कठोर पुरारिपु कोदंडा । राज समाजिं आज करि खंडा ।।
त्रिभुवन–जयासहित वैदेही । त्या विचारविण वरिल हटें ही ।।
पणें सकल भूपाल लोभले । भट मानी मनिं फार रोषले ।।
त्वेषें उठले परिकर कसुनी । जाति इष्ट देवां शिर नमुनी ।।
क्रोधें बघति धरिति धनु लक्षुनि । न ढळे बहुबळ करतां कुंथुनि ।।
ज्यांस विचार जरासा चित्तीं । चाप समीप महीप न जाती ।।

**दो०–त्वेषें जड नृप धरिति धनु न हले लज्जित जाति ।।**
**जणुं पावुनि भट-बाहुबल अधिक अधिक जडताऽति।।२५०।।**

एकदांच दशसहस्र नृपती । लागति उचलुं, न हले हलवती ।।
शंभु–सरासन डगे न कैसे । कामीवचनिं सती मन जैसें ।।
पात्र सकल नृप उपहासासी । जेविं विराग विना संन्यासी ।।
कीर्ति विजय वीरता भारी । हटें हरुनि गत धनुकरिं सारीं ।।
श्रीहत राजे हृदयीं हरले । जाउनि निज निज समाजिं बसले ।।
पाहुनि नृपां जनक घाबरले । वदति शब्द जणुं रोषें भरले ।।
द्वीपा–द्वीपाचे नृपती–गण । आले परिसुनि कृत जो मी पण ।।
सुर दानव मानव–वपुधारी । आले वीर धीर रणिं भारी ।।

**दो०–कुमरि मनोहर जय महा कीर्ति परम कमनीय ।।**
**मिळविणार जणुं विरंचि न विरची धनु- दमनीय ।।२५१।।**

वदा लाभ हा कुणा न रुचला । कुणि शंकर–धनु–गुण न लावला ।।
करणें सज्य मोडणें राहो । नुचलां जमिनीवरुन जरा हो ! ।।

अतां न मद भट-मानी धरणें । वीर-विहीन मही मी जाणें ॥
त्यजा आस जा निज ठावां, हा ! । विधि न लिही वैदेहि-विवाहा ॥
सुकृत-हानि जर पणास परिहरुं । राहो कुमरि कुंवारि काय करु ॥
भट-विहीन जर मही जाणतों । पण करुन न उपहास पावतों ॥
जनकवचन परिसुन नरनारी । बघुन जानकिस, विषण्ण भारी ॥
रोष लक्ष्मणा भृकुटी चढती । नेत्र रुषारुण ओठ फडकती ॥

**दो०–वदुं न शकति रघुवीर भय लागति वच्च जणुं बाण ॥**
**नमुनि रामपद-कमलिं शिर वदले गिरा प्रमाण ॥२५२॥**

जिथें असेल कुणी रघुवंशी । त्या समाजि कुणि असें न भाषी ॥
जनक जसे वच अनुचित वदले । जाणुनि रघुकुलमणि बसलेले ॥
पहा ! भानुकुल-पंकज-भानू । वदें स्वभाव न लव अभिमानू ॥
जर आज्ञा आपली पावतो । कंदुकसें ब्रह्मांड उठवतो ॥
कच्चा घटसे टाकिन फोडुन । मेरु मुळ्यासम देइन मोडुन ॥
भगवन् ! प्रताप महिमा तव तर । कोण विचारें पिनाक जर्जर ॥
म्हणुन नाथ ! मज आज्ञा देणें । कौतुक करतो सुखें पाहणें ॥
कमलनालसम सज्य शरासन । घेउन धावुं सत्य शत योजन ॥

**दो०–मोडिन–छत्रक-दंडसे त्वत्प्रताप-बल नाथ ! ॥**
**जर न घडे, प्रभुपदशपथ धरिति न धनुशर हात ॥२५३॥**

जैं लक्ष्मण वच सकोप वदले । कंपित महि दिक्करी डोलले ॥
लोक सकल नृप भयें गांजले । सिते हर्ष हृदिं, जनक लाजले ॥

गुरु रघुपति मुनिगण मनि सगळे । मुदित, देह बहुवार पुलकले ॥
रघुपति अनुजा खुणें निवारिति । प्रेमानें निज समीप बसविति ॥
विश्वामित्र समय शुभ जाणति । अती स्नेहमय वचनें सांगति ॥
उठा राम भंगा भवचापा । वारा तात ! जनक–परितापा ॥
परिसुनि गुरुवच पदिं शिर नमलें । हर्षविषाद न मनास शिवले ॥
उभे स्वभावें सहजचि राहति । लाजवि ढब नव मृग–राजाप्रति ॥

**दो०–उदति उदयगिरि–मंचकीं रघुवर बाल-पतंग ॥**
**विकसित संत सरोज सब हर्षित लोचन भृंग ॥२५४॥**

भूपति-आशा निशा संपली । वाङ्नक्षत्रावली लोपली ॥
मानी महीप कुमुदें मिटलीं । कपटी भूप उलूकें लपलीं ॥
सोडी शोक कोक मुनि-देवां । वर्षति पुष्पें प्रगटति सेवा ॥
वंदुनि गुरुपद अनुरागें अति । राम मुनींची आज्ञा मागति ॥
सहज जाति सब जगती–स्वामी । मत्त-मंजु वर-कुंजर-गामी ॥
जात राम सब पुर नारी नर । पुलक पूर्ण वपु होति सुखाकर ॥
स्मरुनि सुकृत वंदुनि सुर पितरां । जर निज पुण्यां प्रभाव किं जरा ॥
तर शिवचाप समान मृणाला । तोडो राम देव ! गणपाला ! ॥

**दो०–प्रेमें रामा निरखुनी सखिस निकट घेऊन ॥**
**सीता माता स्नेहवश वदे खिन्न होऊन ॥२५५॥**

सखि सगळे कौतुक बघणारे । जे हितेच्छु अमचे म्हणणारे ॥
कोणिहि समजावी गुरुला ना । बालक हे ! हा हट्ट भला ना ॥

रावण बाण न शिवले चापा । सब नृप हरले दावुनि दर्पा ।।
तें धनु राजकुमर करिं देत किं । बाल मराल मंदरा घेत किं ।।
नृपशहाणपण सरलें सगळें । सखि ! विधिगति कांहींही नकळे ।।
बोले चतुरसखी मृदु-वाणीं । तेजवंत लघु गणां न राणी ! ।।
कुंभज कोठें अपार सागर । शोषित, सुयश सकलही जगभर ।।
रविमंडल बघतां लघु वाटे । उगवे तैं त्रिभुवन-तम आटे ।।

**दो०–मंत्र परम लघु ज्यास वश विधि हरि हर सुर सर्व ।।**
**महामत्त गजपतिस ही वश करि अंकुश खर्व ।।२५६।।**

काम कुसुम–धनु-सायक धरतो । भुवन निकाया निज वश करतो ।।
देवि ! म्हणुन संशय सोडावे । राम मोडतिल चाप पहावें ।।
ये सखिवच परिसुनी प्रतीती । गत विषाद अति वाढे प्रीती ।।
तैं वैदेहि बघुनि रामाला । सभय हृदयिं विनवी ज्या त्याला ।।
प्रार्थी मनिं अति होउनि विकला । व्हा प्रसन्न शिव-भवानि मजला ।।
आज सुफल निज भजना करणें । स्नेह करुनि धनु–जडत्व हरणें ।।
गणनायक वरदायक देवा । आजवरी केली तव सेवा ।।
कितिदां कृत मम विनति मनिं धरा । कार्मुक–गुरुता स्वल्प अति करा ।।

**दो०–बघुनि बघुनि रघुवीर तनु प्रार्थि सुरांस सधीर ।।**
**भरे प्रेमजल विलोचनिं भरलें पुलकिं शरीर ।।२५७।।**

निरखुनि नीट नयनभर शोभे । स्मरुनि तातपण मन विक्षोभे ।।
अहह ! तात ! हट दारुण हा पण । लाभ हानि समजां ना आपण ।।

सचिव सभय, त्यां नहि उपदेशित । बुध समाजि घडतें अति अनुचित ।।
कुठें धनू अति कुलिश–कठोर । कुठें श्याम मृदुगात्र किशोर ।।
हे विधि केविं मनीं धरुं धीरा । शिरिष-सुमन अणि वेधिल हीरां? ।।
सकल–सभा–मति एवीं भ्रमतां । शंभुचाप! गति तूंचि मम अतां ।।
निज जडता लोकांवर टाकुनि । धर लघुता रघुपती न्यहाळुनि ।।
सीतेच्या परिताप मनीं अति । लव निमेष युगशतसम लोटति ।।

**दो०–प्रभुस बघुन मग पाहि महिं राजति लोचन लोल ।।**
**खेळति मनसिज मीन युग जनु विधुमंडल दोल ।।२५८।।**

वाग्भ्रमरिस मुखपंकज कोंडत । निरखुनि लाज-निशे ना प्रगटत ।।
लोचनकोनिं राहि जल-लोचन । जसें परम कृपणाचें कांचन ।।
लाजे अति विकलते बघोनी । धरि विश्वासा धीर धरोनी ।।
मम पण तन मन वचनिं सत्य अति । रघुपतिपदसरसिजीं चित्तरति ।।
तर भगवंत सकल उरवासी । करितिल मजला रघुवर दासी ।।
खरा ज्यावरी ज्याचा स्नेहो । मिळे तया तें नहि संदेहो ।।
बघुनि प्रभुकडे प्रेमपणा करि । जाणति राम कृपानिधि अंतरिं ।।
सीते बघुनि बघति धनु कैसें । गरुड बघे व्याला लघु जैसें ।।

**दो०बंधु लक्षि रघुवंशमणि निरखिति हर-कोदंड ।।**
**पुलकित-तनु वदले वचन पदिं दाबुनि विध्यंड ।।२५९।।**

दिक्कुंजर अहि कूर्म सूकरा । न चळो, धीरें धरा तुम्हि धरा ।।
राम शंभु धनु भंगूं पाहति । सावध ममशासनें रहा अति ।।

चाप समीप राम जैं पावति । सुर-सुकृतां नरनारी प्रार्थति ।।
संशय अज्ञानहि सकलांचें । मद अभिमान मंद महिपांचे ।।
भृगुपति-गर्वाची अति गुरुता । सुर मुनिवर यांची कातरता ।।
सीताशोच जनक परिताप हि । राण्यांचा दारुण हृत्तापहि ।।
महाजहाज शंभुधनु-मिळुनी । जाउनि चढले सगळे मिळुनी ।।
रामबाहुबळ सिंधु अपारहि । तरूं बघति कुणि कर्णधार नहि ।।

**दो०–राम विलोकित दिसति जन चित्रलिखित निःशेष ।।**
**सीते बघति कृपायतन जाणति विकल विशेष ।।२६०।।**

दिसली विपुल विकल वैदेही । निमिष कल्पसें तिज जातें ही ।।
त्यजी तृषित तनु तोयाविण जर । सुधा तडाग मृता निष्फल तर ।।
वर्षा काय कृषी सब्र सुकतां । वृथाऽनुताप कि समयीं चुकतां ।।
निरखिति, चिंतुनि असें, जानकिस । प्रभु पुलकति अति बघतां प्रीतिस ।।
गुरुला स्वमनीं प्रणाम करुनी । सुलाघवें धनु घेति उचलुनी ।।
चपलेसम घेतांच चमकलें । मग नभिं धनु मंडलसम वळलें ।।
घेत सज्यतां वळें ओढतां । लक्षि न कुणि, सब बघति तिष्ठतां ।।
रामें भग्न धनू मधि तत्क्षण । भुवनिं भरे ध्वनि कठोर भीषण ।।

**छं०–भुवनांत घोर कठोर रव रवि-वाजि उत्पथिं धावती ।।**
**चीत्करति दिग्गज डोल महि अहि कूर्म कोलहि विवळती ।।**
**सुर असुर मुनि कर कार्नि देती सकल विकल विचारती ।।**
**कोदंड खंडिति राम तुलसी सकल ‘ जय ’ उच्चारती ।।१।।**

**सो०–शंकर-चाप जहाज सागर रघुवर–बाहुबल ।।**
**बुडला सकल समाज चढे प्रथम जो मोहवश ।।२६१।।**

प्रभु दो चाप-खंड महिं टाकति । पाहुनि सकल लोक सुख पावति ।।
कौशिक रूप-पयोनिधि पावन । प्रेम सुवारि अगाध सुशोभन ।।
रामरूप–राकेशा पाहत । वीची वहु पुलकावलि वाढत ।।
नभीं नौवदी दुम्दुम् वाजति । देव–वधू वहु गाती नाचति ।।
ब्रह्मादिक सुर सिद्ध मुनीश्वर । स्तविती प्रभुस देति आशिर्वर ।।
वर्षति बहुरंगीं सुम-माला । किंनर गीतां गाति रसालां ।।
भुवनिं कोंदली जय जय वाणी । धनुर्भंग रव येइ न कानीं ।।
जिथं जिथं म्हणति मुदित नरनारी । रामें भग्न शंभु-धनु भारी ।।

**दो०–बंदी–मागध–सूत गण ब्रीद वदति मति धीर ।।**
**करिति लोक ओवाळणी हय गज धन मणि चीर ।।२६२।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २९ वा

झांजा मृदंग सणया बहु दर । ढोल दुंदुभी भेरी सुंदर ।।
सुंदर विविधा वाद्य–सुवादन । जिथं तिथं युवती-मंगल-गायन ।।
सखीं सहित हर्षित अति राणीं । सुकत साळि जणुं पडलें पाणी ।
सुख जनकास काळजी जाउनि । तरतां दमत ठाव जणुं पावुनि ।।
श्रीहत होति भूप धनु तुटतां । दीप-तेज दिन जसें उगवतां ।।
येइ कसें सीतासुख वदतां । चातकि जणूं स्वातिजल मिळतां ।।

लक्ष्मण रामा निरखिति केवीं । विधुस चकोर-किशोरक जेवीं ।।
शतानंद आज्ञा तंव झाली । सीता रामाकडे निघाली ।।

**दो०–सवें सखी सुंदर चतुर गाती मंगल गीत ।।**
**चाले बाल–मराल–गति सुषमा अंगि अमीत ।।२६३।।**

शोभे सीता सखि मधि कैसी । छवि-गणमध्य महाछवि जैसी ।।
कर-सरोज-जयमाला सुंदर । विश्वविजय शोभा पसरे वर ।।
तन सलज्ज मन परमोत्साही । प्रेम गूढ ना कळे कुणाही ।।
जाइ समीप रामछवि पाही । चित्रलिखित कुमरी जणुं राही ।।
चतुर सखी जाणुनि समजावति । घाल गळां जयमाळ शुभा अति ।।
परिसुनि उचली माल युगल करिं । प्रेमविवश ती घालवे न परि ।।
शोभति जणुं युग जलज सनाल । शशिस सभय घालिति जयमाल ।।
गाती छवि अवलोकुनि आली । सिय जयमाल रामगळिं घाली ।।

**सो०–रघुवर–उरिं जयमाळ बघुनि विबुध वर्षति सुमन ।।**
**म्लान सकल भूपाळ बघुन भानु जणुं कुमुदगण ।।२६४।।**

नभीं नगरिं बहु वाजे वाजति । खल उदास सब साधू राजति ।।
सुर किन्नर नर नाग मुनीश्वर । जयजय करिति देति आशीर्वर ।।
विबुध-बधू कल गाती नाचति । वारंवार सुमांजलि वाहति ।।
विप्र वेद-घोषा बहु करती । बंदी ब्रीदावलि उच्चरती ।।
महि-पातालिं भरे यश नाकां । राम सिते वरि, मोडि पिनाका ।।
पुर-नर-नारी आरति करुनी । ओवाळति धन भान विसरुनी ।।

जोडा सीताराम सुचारू । एके स्थळिं शोभा-शृंगारू ॥
म्हणति सखी प्रभुपद धर सीते । स्पर्श न चरणां करि अति भीते ॥

**दो०-स्मरुनी गौतमनारि-गति लावि न पायां हात ॥**
**प्रीति अलौकिक बघुनि मनिं रघुकुलमणि हसतात ॥२६५॥**

सीते बघुनि भूप लोलुभले । कुटिल कुपुत्र मूढ मनिं रुपले ।
उठुनि घालुनी कवच अभागी । शेखी मिरविति जागोजागीं ॥
म्हणति हरुनि घ्या सीता कोणी- । घ्या बांधा नृप बालक दोनी ॥
काम न भागे चाप भंगतां । वरि कुणि कुमरि जीत अम्हि असतां॥
जरि विदेह करि कांहिहि साह्या । जिंकु तया रणिं सह उभयां या ॥
ऐकुन वदले साधु भूप ते । राज-समाजा लाज लाजते ॥
बल प्रताप-वीरता-महती । नाक, पिनाका संगें गत ती ॥
तीच शूरता नव किं मिळाली । अशि मति तरि विधि मुखं करि काळीं॥

**दो०-राम नयन भर पहा मद क्रोधेर्षा सोडून ॥**
**लक्ष्मण रोषानलिं महा व्हा न शलभ जाणून ॥२६६॥**

वैनतेय बलि काक कांक्षतो । ससा नागरिपु-भाग मागतो ॥
कांक्षि अकारण कोपी कुशला । शिवद्रोहि जशि संपद सकला ॥
लोभी लोलुप सुकीर्ति कांक्षिति । अकलंकिता किं कामी मिळविति ॥
वांछी हरिपद-विमुख परमगति । लालुच तुमची तशीच नरपति ॥
ऐकुनि गडबड सशंक सीता । सखिनीं राणी-सन्निध नीता ॥
राम सहज जाती गुरुपाशीं । वर्णित सीतास्नेह मनासी ॥

सीता राण्यांसहित विव्हळे । काय करी विधि आतां न कळे ॥
ऐकुनि नृपवच लक्ष्मण फिरवित । दृष्टी, रामभयें ना बोलत ॥

**दो०–अरुण नयन भृकुटी कुटिल निरखिति नृपां सक्रोप ॥**
**मत्त गजगणां बघुनि जणुं हरिशावक साटोप ॥२६७॥**

खळबळ बघुनि विकळ-पुरनारी । शिव्या दति सब भूपां भारी ॥
तदाच, परिसुनि शिव-धनु-भंग । आला भृगुकुल-कमल-पतंग ॥
पाहुनि महिप सकल संकुचले । श्येन-झडपि जणुं लावे लपले ॥
गौर शरीरिं भूति विभ्राजे । भालिं विशाल तिपुंड्र विराजे ॥
शिरीं जटा शशिवदन सुशोभन । क्रोधें अरुण जरा दिसतें पण ॥
भृकुटि कुटिल लोचन रोषारुण । सहज बघति तरि जणुं संतापुन ॥
वृषस्कंध उर भुजा विशाला । जानवं चारु मृगाजिन माला ॥
कटि मुनिवसन तूणयुग कसले । स्कंधिं परशु करिं शर धनु धरलें ॥

**दो०–शांतवेष करणी कठिण ना वर्णवे स्वरूप ॥**
**धृत-मुनि-तनु जणुं वीर रस प्राप्त जिथें सब भूप ॥२६८॥**

भृगुपति-वेषा भीषण पाहति । भय विव्हळ सब उठले क्षमापति ॥
तात नाम निजनामा वदती । सगळे दण्डप्रणाम करती ॥
हित मानुनि ज्या सहज पाहलें । भरले निज दिन तया वाटलें ॥
जनक येति मग मस्तक नमविति । आणुनि सीते प्रणाम करविति ॥
दे आशीर्वच, हर्ष सखींसी । सुज्ञ नेति निज समाजिं तिजसी ॥
येउनि विश्वामित्र भेटले । पद-सरोजिं युग बंधु घातले ॥

राम नि लक्ष्मण दशरथ-नंदन । आशिस दे छवि जोडी पाहुन ।।
होति बघत रामा स्थिर-लोचन । रूप अपार मार-मद-मोचन ।।

**दो०–विदेहासि मग बघुनि, अति गर्दि वदा कशि काय– ।।**
**पुसती जाणुनि अज्ञसे व्यापि कोप सब काय ।।२६९।।**

सांगति जनक समाचारा तंव । जमला महिपति समाज ज्यास्तव ।।
तें ऐकुनि बघतांच पलिकडे । दिसले भूवर पिनाक-तुकडे ।।
अति रोषें वच कठोर सोडी । वद जड जनक ! कोण धनु मोडी ।।
दाखव शीघ्र मूढ ! अजि नातर । उलथिन भूमि राज्य तव जोंवर ।।
नृप अति भीत, न देई उत्तर । कुटिल महीपां मनीं हर्षभर ।।
सुर मुनि नाग नगर नर नारी । सकल सचिंत सभय मनि भारी ।।
मनीं शोक सीता-मातेला । विधि बिघाडि संच कि जुळलेला ।।
श्रवुनि भृगुपतीस्वभाव सीते । अर्ध निमेष कल्प सम जाते ।।

**दो०–सभय विलोकुनि लोक सब जाणुनि जानकि भीरु ।।**
**हर्ष विषाद न हृदिं जरा वदले श्रीरघुवीरु ।। २७०।।**

**— मास पारायण, नवम विश्राम —**

## अध्याय ३० वा

नाथ ! शंभु-धनु-भंजन जो करि । कुणि असेल अपला सेवेकरि ।।
आज्ञा काय कां न मज सांगा । तैं क्रोधी मुनि वदले रागां ।।

सेवक तोच कि जो सेवा करि । युद्ध करावें करि अरिकृति जरि ।।
वधा राम जो शिवधनुभंजक । सम सहस्रबाहू रिपु मामक ।
व्हावें तेणें नृपां-वेगळे । ना तर सब नृप जाति मारले ।।
ऐकुनि मुनिवच लक्ष्मण सस्मित । वदले परशुधरा अपमानित ।।
बाल्यि धनुकल्या भग्न कितीतरि । स्वामि न रुष्ट असे कधिही परि ।।
या धनुवर कां विशेष ममता । वदति कुपित भृगुनाथ परिसतां ।।

**दो०–रे नृपबालक कालवश वदसी विना विचार ।।**
**धनुकलि सम कि पुरारि-धनु, जाणे सब संसार।। २७१।।**

लक्ष्मण हसुनि वदति अम्हि जाणूं । ऐका देव समान सब धनू ।।
का क्षतिलाभ जीर्ण धनु तुटलें । चुकुन नवें रामास भासले ।।
तुटलें स्पर्शत रघुपति दोष न । मुने करां कां कोप अकारण ।।
वदले परशुकडे अवलोकित । शठ रे ! स्वभाव मम नहि माहित ।।
वधतो ना तुज बालक समजुनि । कीं केवळ जड समजसि मज मुनि ।।
बालब्रह्मचारि अति कोपक । विश्वविदित नृपकुल-विद्रोहक ।।
भूमि भजवळें अभूप केली । विपुलवार भूदेवां दिधली ।।
दशशतभुज–भुज–छेदक तो हा । भूप-कुमारा परशु मम पहा ।।

**दो०–मायबाप शोकांबुधीं लोट न महिपकिशोर ।।**
**गर्भार्भक-निर्दालक परशु महा मम घोर ।।२७२।**

लक्ष्मण मृदु वदतात विहसुनी । अहो मुनीश ! महाभटमानी ।।
मज कुऱ्हाड कितिदां दाखवितां । फुंकुनि उडवुं पहाड कि बघतां ।।

अति लघु डांगर इथें न कोणी । जो किं मरे तर्जनी बघोनी ॥
बघुनि कुठार-शरासन-बाणां । वदलो कांहि सहित अभिमाना ॥
भृगुसुत कळुनि जानवें पाहुनि । सोशिन बोलां तें रुष दाबुनि ॥
धरणी-सुर सुर सुरभी हरिजन । यांवरिं अमचें कुळिं न शूरपण ॥
वधें पाप अपकीर्ति हारतां । पायां पडुं ही तुम्हीं मारतां ॥
कोटि कुलिश सम शब्दां धारा । वृथा धरा धनुबाण कुठारां ॥

**दो०—त्यां पाहुनि अनुचित कथित क्षमा महामुनि धीर ॥**
**श्रवुनि रुष्ट भृगुवंशमणि वदले गिरा गभीर ॥२७३॥**

कौशिक पहा मंद हा बालक । कुटिल कालवश निजकुल-घातक ॥
भानुवंश राकेश कलंकू । निपट निरंकुश अबुध अशंकू ॥
काल कवल होई क्षणि काहीं । स्पष्ट वजावुं दोष मज नाहीं ॥
गमे जगावा तर किं हटकणें । अमचा प्रताप बल रुष वदणें ॥
लक्ष्मण म्हणति सुयश तुमचें मुनि । तुम्हि असतां कीं वर्णुं शके कुणि ॥
निजकरणी निजमुखें चि आपण । बहुवेळां वर्णित विविधा; पण ॥
जर संतोष न, आणिक वदणें । दुःसह दुख, न गिळुनि रुष, सहणें ॥
तुम्हि अक्षोभ धीर वीरव्रत । देतां गाळि न अपणां शोभत ॥

**दो०—शूर समरिं करणी करिति स्वयें न कधि वदताति ॥**
**विद्यमान अरि बघुनि रणि भित्रे प्रताप गाति ॥२७४॥**

तुम्हि तर आणा काळा हाकुनि । घडि घडि मजलागीं बोलावुनि ॥
ऐकुनि लक्ष्मण-गिरा कठोरा । धृत करिं परशुस घासुनि घोरा ॥

द्या न दोष मज अतां लोक हो ! । वधा योग्य कटुवादि तोक हो ! ।।
बाल बघुनि बहु मी वाचवला । आतां निश्चित मुमूर्षु बनला ।।
क्षमा, म्हणति कौशिक, अपराधू । बाल दोष गुण गणति न साधू ।।
करिं कुठार अकरुण मी क्रोधी । पुढें गुरुद्रोही अपराधी ।।
सोडूं, मारुं न, देतां उत्तर । कौशिक केवल शीलें तव वरं ! ।।
न तर कुठारें घोर, कापतों । अश्रम गुरुआनृण्य पावतों ।।

**दो०—हसुनि गाधिसुत मनिं वदति मुनिमनिं हिरवळ रान ।।**
**आयस खड्ग, न सितामय नुमजें अज्ञुनि अजाण ।।२७५।।**

लक्ष्मण म्हणति शील मुनि अपलें । विश्वविदित, कोणा ना कळलें? ।।
जननिजनक-रिण भलें फेडलें । गुरु-रिण राहि फार मनिं सलले ।।
तें पतिवर अमच्या किं काढलें । व्याज बहु दिन जात वाढलें ।।
घ्या आतां धनको बोलावुनि । शीघ्र देत मी थैली खोलुनि ।।
श्रुत कटुवचन कुठार उगारति । हाय! हाय! सब जन उद्‌गारति ।।
मला दावितां कुठार भृगुवर ! । विप्र म्हणुनि तजुं नृपद्रोहि! वरं! ।।
सुभट न कधिं रणिं भेटे गाढा । द्विजदेवा! तुम्हि घरांत वाढा ।।
'अनुचित' असें सकल उच्चारिति । खुणें लक्ष्मणा रघुपति वारिति ।।

**दो०—लक्ष्मण-वचनाहुतीस्तव भृगुवर-कोप कृशानु ।।**
**भडकत पाहुनि वदति वच जलसम रघुकुलभानु ।।२७६ ।।**

नाथ ! कृपा बाळावर करणें । शुद्ध दुग्धमुख कोप न धरणें ।।
प्रभु-प्रभावा जर किं जाणता । तर किं बरोबरि अजाण करता ।।

बाल कांहिं जरि खोडचा करती । गुरु-पितृ-माता मनि मुद भरती ।।
करा कृपा शिशु सेवक समजुनि । ज्ञानि धीर तुम्हि सुशील सम मुनि।।
रामवचनिं कांहींसे निवले । वदुनि कांहिं लक्ष्मण मृदु हसले ।।
हसत बघुनि नखशिख रुट् व्यापी । राम तुझा भ्राता अति पापी ।।
गौर शरीरें श्याम मनां ही । कालकूट-मुख, पयमुख नाहीं ।।
सहज वक्र अनुसरे न तुजला । नीच, मृत्युसमय मानि न मजला ।।

**दो०-लक्ष्मण वदले हसुनि मुनि ! क्रोध असे अघमूल ।।**
**यद्वशजन अनुचित करति चरति जगा प्रतिकूल ।।२७७।।**

मी तुमचा अनुचर मुनि राया । त्यजुनि कोप व्हा सदय अतां या ।।
धनु तुटलें रोषें नहि जुळतें । बसा, दुखत कीं पद असतिल ते ।।
प्रिय जर अति तर करूं उपाया । अति गुणि आणुं सांगुं सांधाया ।।
सभय जनक लक्षण वदतां ही । गप्प बसा अनुचित वरं नाहीं ।।
कांपति थरथर पुर-नर-नारी । लघु कुमार खोटा अति भारी ।।
भृगुपति ऐकत निर्भय वाणी । रुष तनु दाही होइ बलहानी ।।
सांगति रामा उपकृति दावुनि । वाचवुं तुझा बंधु लघु जाणुनि ।।
मन मलीन तन सुंदर केवीं । विषरसपूर्ण कनक-घट जेवीं ।।

**दो०-परिसुनि लक्ष्मण विहसले नेत्र वटारिति राम ।।**
**गुरु समीप गत लाजुनी वारुनि वाणी वाम ।।२७८।।**

अति विनीत मृदु शीतल वाणी । वदले राम जुळुनि युग पाणी ।

सहज सुजाण नाथ! ऐकावें । बाल-बोल ना कानीं घ्यावें ।।
गांधिल वालक सम-स्वभावहि । त्यांस संत डिवचीत कधीं नहि ।।
बिघडवि कांहि न तो कार्याला । अपराधी मी नाथ ! आपला ।।
कृपा कोप वध बंधन मजला । करणें स्वामी ! निज दासाला ।।
वदा काय करुं झट् रुष जाया । मुनि नायक त्या करिन उपाया ।।
राम ! म्हणति मुनि जाइ रुष कसा । अझुन अनुज तव बघे वक्रसा ।।
कंठस्नान न यास घातलें । तर मी क्रोधें काय साधलें ।।

**दो०–स्रवति गर्भ अवनिप-ख्वि श्रवुनि परशुगति घोर ।।**
**परशु असून जिवंत बघुं वैरी भूप-किशोर ।। २९७ ।।**

हात धजे न, दाहि रुष छाती । हा कुठार कुंठित नृपघाती ।।
वाम विधाता ! स्वभाव वदले । कृपा कधीं कशि हृदयिं मम वळे ।।
आज दया दुख दुःसह सहवी । सौमित्री विहसुनि शिर नमवी ।।
वायु कृपा मूर्ती-अनुकूल । वदतां वचन झरति जणुं फूलं ।।
मुने कृपा जाळी गात्रां जर । क्रोधें राखो तनु धाता तर ।।
जनका बालक जड हट्टें हा । करूं पाहतो यमपुरिं गेहा ।।
डोळ्यांआड शीघ्र कर, छोटा– । दिसे परी खोटा नृप–पोर्टा ।।
विहसुनि लक्ष्मण म्हणति मनांही । मिटतां नेत्र कुठें कुणि नाहीं ।।

**दो०–परशुराम रामास तैं वदले हृदिं सुक्रोध ।।**
**शंभु-धनू भंगूनि शठ करिशी अम्हां प्रबोध ।। २८० ।।**

बंधु वदे कटु तुझी संमती । तूं कर जुळुनि करिशि छल-विनती।।

मज तोषवि करुनी संग्रामा । ना तर सोड 'राम' तव नामा ॥
त्यज छल कर रण शंभुद्रोही । ना तर सानुज तुज वधतो ही ॥
परशु उगारुनि भृगुपति बकती । स्मित मनिं करुनि राम शिर नमती॥
रोप अम्हांवर दोषी लक्ष्मण । क्वचित् सरलता महा दोष पण ॥
जाणुनि वक्र करिति सव नमना । राहु न करि वक्रेंदू–ग्रहणा ॥
राम म्हणति रुष सोडा मुनिवर । पुढें शीर्ष हें, कुठार करिं वर ॥
क्रोध जाइ तें करणें स्वामी । मजला समजा निज अनुगामी ॥

**दो०–युद्ध कसें प्रभु-सेवकीं त्यजा विप्रवर रोष ॥**
**वेष बघुनि वदला जरा बाळाचाहि न दोष ॥ २८१ ॥**

कार्मुकवाण–परशुधर बघुनी । कोपे वालक वीर समजुनी ॥
नाम विदित परि तुम्हीं न ठावें । दिलीं उत्तरें कुल–स्वभावें ॥
स्वामी ! मुनिवेषें यतां जर । चरण-रजा शिरिं शिशु धरता तर॥
चूक नेणतां घडे क्षमावी । कृपा विप्र-उरिं फार असावी ॥
अम्हां तुम्हां कशि नाथ! वरोबरि । वदा कुठें पद कुठें शीर्ष तरि ॥
राम मात्र लघु नाम आमचें । नाम परशुसह मोठें तुमचें ॥
देव एक-गुण धनू आमचे । नव-गुण परम पवित्र तु तुमचें ॥
आम्हि सर्वपरि उणे तुम्हांहुनि । क्षमा विप्र अपराधा लागुनि ॥

**दो०–वरचेवर मुनि विप्रवर वदले रामा राम ॥**
**वदति रुष्ट भृगुपति हसुनि तूंहि बंधू सम वाम ॥ २८२ ॥**

मानसि मजसि किं विप्र मात्र, तो । कसा विप्र मी तुला सांगतो ॥

स्त्रुवा चाप आहुति शर जाणहि। थोर घोर मम कोप कृशान हि ।।
समिधा शुभ सेना चतुरंग हि। महा महिप पशु बनति येउन हि ।।
या कुठारिं कापुनि बलि अर्पित। म्यां कृत समर यज्ञजप अगणित ।।
तुला प्रभाव न माझा माहित। भ्रमें विप्र वदसी अपमानित ।।
दर्प फार धनु भंगुनि हृदयीं। ताठ उभा जणुं मी जग-विजयी ।।
राम म्हणति मुनि वदा विचारीं। क्षुद्र चूक अमची रुप भारी ।।
स्पर्शत तुटे पिनाक पुराण हि। कशासाठि मी धरुं अभिमान हि ।।

**दो०–विप्र म्हणुन जर अनादरु सत्य सांगु भृग्वीश ।।**
**असा सुभट जगिं कोण ज्या नमवूं सभीत शीस ।।२८३।।**

देव दनुज भट भूप जगांतिल। समबल अथवा अतिबल असतिल ।।
जर कुणि देइ समर-आव्हाना। सुखें लढूं काळासिहि जाणा ।।
क्षत्रिय तनुधर रणा कचरतो। लावि कलंक कुला पामर तो ।।
वदें स्वभाव न कुला प्रशंसीं। कुणि न डरे काळा रघुवंशी ।।
विप्रकुळीं प्रभुता अशि राही। अभय बने जो समय तुम्हां ही ।।
श्रवुनि गूढ मृदु वच रघुपतिचें। हटलें पटल परशुधर-मतिचें ।।
राम रमापति-धनु घेणें करिं। सज्य करा संदेह फिटे तरि ।।
देत धनू तों स्वयेंचि गेले। परशुराम मनिं विस्मित ठेले ।।

**दो० रामप्रभुता जैं कळे पुलक देहिं फुलतात ।।**
**पाणि जुळुनि वदले वचन प्रेम न हृदयिं रहात ।।२८४।।**

जय रघुवंश-वनज-वन-भानू। गहन-दनुज-कुल – दहन–कृशानू ।।

जय सुरविप्र–धेनु–हित कारी। जय भ्रम मोह कोप मद–हारी ॥
विनय-शील-करुणा-गुण-सागर । जयति वचन-रचना अतिनागर ॥
सेवक सुखद सुभग सब अंगां। जय जय तनु छवि कोटि अनंगा ॥
कशी एक मुखि करूं प्रशंसा। जय महेश–मन–मानस–हंसा ॥
नेणुनि वदलो बहु अनुचित तें। क्षमा क्षमा–मंदिर दो भ्राते ॥
वदुनि जय जय रघुकुल केतू। भृगुपति वनिं गेले तप हेतू ॥
कुटिल कुपति कल्पित-भय-भरले। पळती कातर गुप्चुप् सगळे ॥

**दो०–देव वाजविति दुंदुभी प्रभुवर वर्षति फूल ॥**
**पुर नरनारी हर्षती नष्ट मोहमय शूल ॥२८५॥**

घडघडाट अति वाजे वाजति। सकल मनोहर मंगल साजति ॥
मिळुन थव्यांनीं सुमुखि सुनयना। गान करिति कल कोकिल वचना ॥
केविं विदेह सुखा वर्णवें। जन्मदरिद्र जणूं निधि पावे ॥
त्रास विगत सीते सुख भारी । जणुं विधु–उदयिं चकोरकुमारी ॥
तदा जनक कौशिक-पदिं वंदिति। प्रभू–प्रसाद ! राम धनु खंडिति ॥
मज कृतकृत्य करिति दो भ्राते। स्वामि! सांगणें उचित अतां तें ॥
मुनि वदले शृणु नृपा ! प्रवीण । होता विवाह चापाधीन ॥
धनु तुटतांच कि विवाह झाला। विदित नागनरसुर सकलांला ॥

**दो०–तरि जाउनि करणें अतां वंशि जसा व्यवहार ॥**
**द्विज–कुलवृद्ध नि गुरुमतें वेद-विदित आचार ॥२८६॥**

दूत अयोध्ये धाडा जाउनि। आणिति दशरथ नृप बोलावुनि ॥

म्हणे मुदित नृप भलें कृपाला। धाडि दूत अणवुनि ते काला ॥
मग सब महाजनां बोलाविति। येति सकल सादर शिर नमविति ॥
हाट वाट मंदिर सुर–सदनें। चहुं दिशि पुरि शृंगारुनि सजणें ॥
मुदित निघुनि निज निजगृहिं येती। सेवकांस बोलावुनि घेती ॥
घाला मडप विचित्र सजुनी। जाति मुदित आज्ञा शिरिं धरुनी ॥
आणविती ते गुणी बहुजनां। सुज्ञ कुशल जे वितान–रचना ॥
वंदुनि विधिस करिति आरंभा। रचिति कनक कदलींचे स्तंभां ॥

**दो० हरित मण्यांचीं पत्रफलं पद्मरागकृत फूल ॥**
**रचना बघुनि विचित्र अति विरंचिचे मनि भूल ॥२८७॥**

वेणु हरित–मणिमय कृत सगळे। सरळ सपर्व न जाती कळले ॥
कलित कनक अहिवेलि बनवल्या। चारु सपर्ण न कुणि ओळखल्या ॥
कोरुन त्यांचे बंधहि खचले। मधिं मधिं मुक्तादाम विरचले ॥
माणिक मरकत कुलिश पिरोजें। चिरुनि कोरुनी रचित सरोजें ॥
कृत भृंगां बहुरंगि विहंगां। गुंजति कूजति समीरसंगां ॥
अमरमूर्ति खांबांत विरचिल्या। उभ्या समंगलवस्तु राहिल्या ॥
रंगवल्लि बहु विविध काढल्या। कुंजर मणिमय सहज शोभल्या ॥

**दो०–कृत सौरभ–पल्लव सुभग नीलमणी कोरून ॥**
**मरकत घड मोहर कनक रेशमि गुणि टांगून ॥२८८॥**

रुचिर तोरणें रचिलीं बहु वर। लावि मनोज कि पाश मनोहर ॥
मंगल कलश विपुल पट चामर। चारु पताका ध्वजा कृता वर ॥

दीप मनोहर मणिमय नाना । वर्णु न येई विचित्र विताना ॥
नवरी वैदेहि ज्या वितानां । । त्या वर्णिल कवि अशि मति कोणां।
वर वर राम रूप–गुण–सागर । तो मंडप लोकत्रय–भास्वर ॥
जनक–निकेता शोभा जैसी । नगरीं प्रतिगृहिं शोभे तैसी ॥
जे कुणि मिथिले तदा पाहती । क्षुद्र भुवन दश चार वाटती ॥
जी संपदा नीचगृहिं शोभित । ती पाहुन सुरनायक मोहित ॥

**दो०-लक्ष्मि वसे ज्या नगरिं कृत-कपटनारि-वरवेष ।**
**त्या पुरिची शोभा वदत गिरा संकुचित शेष ॥ २८९॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ३१ वा

पोंचति दूत रामपुरि पावन । हर्षति नगरी पाहुन शोभन ॥
खबर भूपती–द्वारीं देती । तैं दशरथ बोलावुनि घेती ॥
करुनी प्रणमन पत्र अर्पती । मुदित उठोनी घेति महिपती ॥
पत्र वाचतां सजल विलोचन । छाति भरुनि आली पुलकित तन ॥
करिं सुपत्र, हृदिं राम नि लक्ष्मण । स्तब्ध, न वदवे अशुभ किं शोभन॥
धीर धरुनि मग पत्रा वाचति । वृत्तें सत्य सभासद हर्षति ॥
खेळत असतां खबर मिळे ती । भरत स-मित्र, रिपुघ्नहि येती ॥
पुसलें स्नेहें अति संकोचुनि । तात ! पत्र हें ! आलें! कोठुनि ॥

**दो०–बंधू प्राणप्रिय उभय कुशल ! कुठें ! आहेत ॥**
**प्रेमळ वच परिसुनि पुन्हां नरपति वाचूं घेत ॥२९०॥**

पुलकति परिसुनि पत्रा भ्राते । प्रेम फार राहि न गात्रां तें ।।
प्रीति पुनीत बघुनि भरताची । सर्व सभा सुख विशेष सांची ।।
नृपें दूत मग निकट बसवले । वचना मधुर मनोहर वदले ।।
बावा ! वदा कुशल मम बाळां–। नीट नेत्रिं निज तुम्हीं न्यहाळां ? ।।
श्यामल गौर विधृत–धनु–भाते । वय किशोर, कौशिक–सांगातें ।।
वदा स्वभावा जर ओळखले । नृपें प्रेमवश कितिदां पुसले ।।
घेउनि गेले ज्या दिनिं मुनिवर । आज कुशल कळलें तेथुनि खरं ।।
वदा विदेहें केविं जाणले । प्रिय वच परिसुनि दूत हासले ।।

**दो०–भूप-मुकुट-मणि तुम्हां सम ऐका धन्य न कोणि ।।**
**जयां राम लक्ष्मण तनय विश्व-विभूषण दोनि ।।२९१।।**

भवत्सुतां पुसणें किं अवश्यक । पुरुषसिंह जे जगत्प्रकाशक ।।
ज्यांच्या यशा–प्रतापा–पुढतीं । शशि मलीन रवि शीतल गमती ।।
'कसे विदित ते' कीं प्रभु पुसती । रवि किं दीप करिं घेउनि बघती ।।
सीता स्वयंवरीं नृप सगळे । सुभट एक एकाहुनि जमले ।।
शंभु–शरासन कोणि न उचली । हरले सगळे वीर बहुवली ।।
त्रय–लोकांतिल जे भट–मानी । त्यांची शक्ति शंभु–धनु हाणी ।।
उचलुं शरासुर मेरु शके जो । चित्ती विचकुनि परत फिरे तो ।।
जो शिवशैला सलील उचली । तोहि सभे त्या पराजित वली ।।

**दो०–तिथें राम रघुवंशमणि पहा महामहिपाल ।।**
**अश्रम चापा खंडिती यथेभ, पंकज-नाल ।। २९२ ।।**

ऐकुनि आले सरोष भृगुपति । नानापरिं दाबिति धमकावति ॥
बघुनि रामबल निज धनु देती । स्तुति अति करुनि काननीं जाती ॥
राजन् राम अतुलबल जैसे । लक्ष्मण तेजनिधानहि तैसे ॥
त्यांनी बघतां कंपति भूपति । हरिशावक–अवलोकें गजपति ॥
देव ! बघुनि बालक तव दोनी । दृष्टिपुढें ये अतां न कोणी ॥
दूत-वचन-रचना प्रिय गमली । प्रेमैश्वर्य–वीर–रस भरली ॥
सभे सहित भूपति अनुरागति । दूतां बक्षिस देऊं लागति ॥
म्हणुन 'अनीति' कान ते झाकति । धर्म विचारुनि सब सुख मानति ॥

**दो०-उठुनि पत्र मग देति नृप वसिष्ठांस जाऊन ॥**
**गुरुसि सांगविति सादर कथा दूत अणवून ॥ २९३ ॥**

ऐकुनि गुरुं वदले सुखघूर्णित । मही पुण्य पुरुषा सुखपूरित ॥
सागरिं सरिता जाति जशा ही । जरी कामना तयास नाहीं ॥
तशि न मागतां सुख–संपत्ती । सहज धर्मशीलासी जमती ॥
तुम्हि गुरु–विप्र–धेनु–सुर–सेवी । तशि पुनीत कौसल्या देवी ॥
जगीं तुम्हां–सम सुकृती काहीं । भूत न, नाही, होणें नाहीं ॥
पुण्य तुम्हांधिक महान् कुणाचें । राजन् रामसदृश सुत ज्यांचे ॥
वीर विनीतहि धर्मव्रत–धर । चारी गुणसागर बालक वर ॥
पावा तुम्हीं सतत कल्याणा । सजा वऱ्हाड पिटुनि डंक्यांनां ॥

**दो०-"चला शीघ्र" गुरुवचा श्रुत 'प्रभु! बरं' नमुनि पदांस ॥**
**भूपति गृहिं गत देववुनि मग दूतांनां वास ॥ २९४ ॥**

नृप राण्यांस सकल बोलाविति । जनक–पत्रिका वाचुनि दाविति ।।
पडतां कर्णीं सर्वहि हर्षति । अपर कथा सब नृप वाखाणति ।।
प्रेमें प्रफुल्ल राजति राणीं । श्रवुनि शिखिनि जणुं वारिदवाणी ।।
देति मुदित आशिस गुरुनारी । मोद–मग्न माता सब भारी ।।
प्रिय अति पत्र परस्पर घेउनि । निववविति छाती हृदयीं ठेउनि ।।
राम नि लक्ष्मण-कीर्ती–करणी । वारंवार भूपवर वर्णी ।।
म्हणुनि 'मुनिकृपा' द्वारीं निघती । राण्या भूदेवां आणवती ।।
देति दान आनंद–समेता । जाति विप्रवर आशिस देतां ।।

**सो०– ओवाळणी अपार याचक बोलावुनि दिधलि ।।**
**चिर जीवोतहि चार चक्रवर्ति दशरथ तनय ।।२९५।।**

वदत जाति घालुनि पट नाना । मुदित हणिति धम्धमां निशाणां ।।
समाचार कळला सकलांला । घरोघरी उत्सव सुरु झाला ।।
भुवन चतुर्दशभर उत्साहू । जनक सुता रघुवीर विवाहू ।।
श्रवुनि वृत्त शुभ, जन अनुरागति । पथ उपपथ गृह सजवूं लागति ।।
जरिहि अयोध्या सदैव शोभन । रामपुरी मंगलमय पावन ।।
तरी प्रीतिची रीतिच सुंदर । मंगल रचना करिति मनोहर ।।
ध्वज पताक पट चामर चारू । सजिति विचित्र परम बाजारू ।।
कनक–कलश तोरणं मणिजालां । हळद–कुंकु, दधि, अक्षत, माला ।।

**दो०– मंगलमय निज निज भवन करिति लोक सजवून ।।**
**वीथि चतुरसम–सिक्त शुभ रांगोळ्या घालून–।।२९६।।**

जिथं तिथं मिळूनि थव्यांनीं भामिनि । सब नव सप्त सजुनि दुनि दामिनि
विधुवदनीं मृग–शावक लोचनि । निज सुरूपिं रतिमान–विमोचनि ।।
गाती सुस्वर मंजुल मंगल । लाज कोकिळे ऐकुनि रव कल ।।
भूप–भवन कसं जाइं वर्णिलें । विश्व विमोहक वितान रचिलें ।।
मंगलवस्तु मनोहर राजति– । विविधा विपुल नगारे वाजति ।।
कुठें श्रीद वंदी उच्चरती । कुठें विप्र वेदध्वनि करती ।।
गाति सुंदरी मंगल गीतां । नाम ' राम ' घे घेउनि ' सीता ' ।।
महोत्साह परि भवन थोकडें । पूर येइ जणुं भरे चोंकडे ।।

**दो०–शोभा दशरथभवनिची कुणि कवि वर्णि किं पार ।।**
**जिथें सकल-सुर-शीर्षमणि रामें धृत अवतार ।।२९७।।**

घेति भूप भरता बोलावुनि । हय गय सजवा स्यंदन जाउनि ।।
चला शीघ्र रघुवीर–वऱ्हाडीं । बंधु–देहिं पुलकावलि जाडी ।।
भरत दरोगे आणवि सगळे । सांगत, उठुनी मुदित धावले ।।
जीन रचुनि रुचि तुरगां साजति । वर्ण–वर्ण वर वाजि विराजति ।।
सुभग सकल अति चंचल चरणीं । लोहिं लाल पडति किं पद धरणीं ।।
नाना जाति न येति वदाया । जिंकुनि पवन किं वघति उडाया ।।
सब शोकिन वर झाले स्वार । भरत सदृशवय राजकुमार ।।
सुंदर सकल सु–भूषणधारी । करिं शरचाप तूण कटिं भारी ।।

**दो०–शोकिन निवडक सुबक ते शूर सुजाण नवीन ।।**
**प्रतिस्वार पदचरयुगल जे असिकला–प्रवीण ।।२९८।।**

वीरवेषिं रणधीर शोभले । निघुनि पुरी बाहेर थांवले ॥
फिरविति चतुर तुरग गति नाना । हर्षति ऐकुनि पणव-निशाणां ॥
रथां सारथी विचित्र सार्जात । ध्वज पताक मणिभूषण लावति ॥
चमर चारु, किंकिणि रव करती । भानुयान-शोभा अपहरती ॥
श्यामकर्ण हय होते अगणित । सारथि ते त्या रथांस जोडित ॥
सुंदर सकल अलंकृत शोभति । त्यास विलोकुनि मुनि-मन मोहति ॥
स्थलीं तसे जे जलीं चालती । अति वेगानें टाप न बुडती ॥
अस्त्र शस्त्र सब साज सजविले । सारथिनीं मग रथी जमविले ॥

**दो०—जमुं लागे बस-बसुनि रथिं पुरि-बाहेर वरात ॥**
**होति शकुन सुंदर तयां जे ज्या कार्या जात ॥२९९॥**

अंबाऱ्या सुंदर करिवरतीं । वदलें जाइ न अशा सजवती ॥
जाति मत्त गज घंटा राजति । श्रावण-घन-राजी सुभगा अति ॥
दुसऱ्या नाना विपुल सुवाहनिं । शिबिकां सुभग सुयानि सुखासनिं ॥
बसुनी निघती विप्रवृंद वर । श्रुति छंद चि जणुं सर्व वर्ष्मधर ॥
मागध सूत वंदि गुणगायक । वाहनिं निघति जसें ज्यां लायक ॥
खेचर उंट बैल बहु जाती । लादित अगणित पदार्थि जाती ॥
गडी वाहती कोटि कावडी । वस्तु वदूं किति विविध परवडी ॥
सेवक सगळे समुदायानें । निघति समाजांसह थाटानें ॥

**दो०—हर्ष परम सकलां मनीं पूरित पुलक शरीर ॥**
**कधि पाहूं डोळें भरून राम वि लक्ष्मण वीर ॥३००॥**

गज घंटा भीषण घण्घणती । रथ रव चहुँ दिशि अश्व हेषती ॥
भेरि घनां निंदित घड्घडती । निज परशब्द न कानीं पडती ॥
गर्दी भारी द्वारिं नृपाचे । फेकत पीठचि पाषाणाचें ॥
नारि चढुन गच्च्यांवर पाहति । घेउनि पात्रीं मंगल आरति ॥
करिति मनोहर मंगल-गायन । अति आनंद किं, वदला जाय न ॥
स्यंदन युग तव सुमंत्र साजी । जोडी रविहयनिंदक वाजी ॥
ते रथ रुचिर नृपाप्रति आणी । वानुं शके ना त्यानां वाणी ॥
राज-साज रथिं एका साजे । तेज:पुंज दुजा विभ्राजे ॥

**दो०–वसिष्ठांस रथिं रुचिर त्या चढविति मुदित नरेश ॥**
**स्वयें बसति रथिं चिंतुनी हर गुरु गौरि गणेश ॥ ३०१**

सह वसिष्ठ शोभति नृप तैसे । सुर-गुरु-संगिं पुरंदर जैसे ॥
करुनि वेद-कुल विधींस राजा । सज्ज सर्वपरिं बघुनि समाजा ॥
स्मरुनि राम गुरु-आज्ञा घेउनि । निघति महीपति शंख वाजवुनि ॥
विबुध वरात विलोकुनि हर्षति । सुमन सुमंगल-दायक वर्षति ॥
अति कोलाहल हय गज गाजति । व्योमिं वरातीं वाद्यें वाजति ॥
गाति सुमंगल सुर-नर-नारी । वाजति सणया सु-रागदारीं ॥
घंटी-घंटा ध्वनि न वर्णवे । सेवक करती खेळ नव नवे ॥
करिति विदूषक कौतुक नाना । हास्य-कुशल जे पटु कल गानां ॥

**दो०–तुरग नाचविति कुमरवर मृदंगादि अनुकूल ॥**
**नागर नट निरखिति चकित तालसमेंत न भूल ॥ ३०२**

सज्ज वरात वदलि ना जाई । होति शकुन सुंदर शुभदाई ॥

चारा चास वाम दिशि घेई। मंगल सकल किं सांगुन देई॥
उजवा काक सुशेतीं दिसला। सकलां नकुल विलोकत बसला॥
त्रिविध पवन अनुकूल वहतसे। सुस्त्री शिशुसह सघट येतसे॥
भालु वळुनि दे दर्शन राजी। सुरभी सन्मुख वत्सा पाजी॥
वळुनि उजवि मृगमाला आली। मंगल-गण जणुं दाविति झाली॥
क्षेम विशेषहि वदे क्षेमकरि। दिसली श्यामा वाम सुतरुवरि॥
कुणि दधि मीनां सन्मुख आणी। विज्ञ विप्रयुग पुस्तकपाणी॥

**दो०- मंगलमय कल्याणमय अभिमत फळ जे देत॥**
**शकुन सत्य होण्या जणूं सर्व एकदां येत॥३०३॥**

त्या सब शकुन सुगम मंगलकर। ज्याचा ब्रह्म सगुण, सुत सुंदर॥
राम सदृशवर वधू सिताही। दशरथ जनक पूत हे व्याही॥
ऐकुनि असें शकुन-गण नाचे। अतां विरंचि अम्हां करि साचे॥
करि वरात यापरीं प्रयाणा। हय गज गाजति हणिति निशाणां॥
जाणुनि येति भानुकुल-केतु। जनक बांधविति सरिता-सेतू॥
मधें मधें वर वास विरचिले। सुर-पुर-सदृश संपदें खचिलें॥
अशन शयन सुंदर वर वसनें। पावति सकल रुचे जें स्वमनें॥
नव नव सुख अभिमत अवतरलें। सकल वऱ्हाडी मंदिर भुलले॥

**दो०-जाणून येत वऱ्हाड वर वाद्य घोष ऐकून॥**
**स्वागति आणूं जाति हय गजरथ आदि सजून॥३०४**

## मास पारायण, दशम विश्राम

❖ ❖ ❖

# अध्याय ३२ वा

पूर्ण कनक घट, ताट पराती । ललित भाजनें विविधा जाती ।।
भरुनि सुधेसम सब पक्वान्नें । विविध-विधा वदवति न मुखानें ।।
फळें अमित वर पदार्थ सुंदर । भेट म्हणुन पाठवी भूपवर ।।
भूषण विविध महामणि वसनें । खग मृग हय गज वहुविध यानें ।।
मंगल शकुन सुगंध सुशोभित । महीपाल नानाविध धाडित ।।
दहि पोहे उपहार पार ना । नेति गडी कावडीं न गणना ।।
यदा स्त्रागती वऱ्हाड बघती । आनंदित मन तनू पुलकती ।।
थाट माटिं जैं स्त्रागति दिसले । मुदित वऱ्हाडीं डंके पिटले ।।

**दो०—मुदित परस्पर भेटण्या किंचित दौडत जाति ।।**
**आनंदोदधि सांडुनी सीमा जणुं मिळताति ।।३०५।।**

गाती सुरसुंदरि सुम वर्षति । देव दुंदभी मुदित वाजवति ।।
वस्तु सकल ठेवुनियां पुढतीं । प्रेमें स्वागति नृपा विनवती ।।
प्रेमें राजा तया स्वीकरी । दे बक्षीस याचकां वितरी ।।
पूजुनि मान महत्ता देउनि । जानोशाप्रति जाती घेउनि ।।
पायघड्या पट विचित्र पडती । बघुनि धनद धनमदा सांडती ।।
जानोसा अति सुंदर दिधला । सकलां सव सुख सोयीं भरला ।।
ये वऱ्हाड पुरिं सीता जाणुनि । जरा स्वमहिमा दावी प्रगटुनि ।।
स्मरुनि सकल सिद्धिस वोलावी । नृप—पाहुणचारा करुं लावी ।।

**दो०–सीताज्ञें सिद्धी सकल जाती जानोशास ॥**
**सहित सकल सुख संपदा सुर-पुर-भोग-विलास ॥३०६॥**

निज निज वासि वऱ्हाडी पाहति । सुरसुख सुलभ सकल विविधा अति
विभव-मर्म कोणा ना कळलें । 'जनकाचें' वाखाणिति सगळे ॥
रघुपति सीता महिमा जाणुनि । हर्षित हृदयिं हेतुला समजुनि ॥
ऐकत तातागमना भ्राते । उर न पुरे अति आनंदातें ।
संकोचें वदुं शकति गुरुस ना । पितृ-दर्शन-लालसा बहु मना ॥
विश्वामित्र वघति अति विनया । उपजे हृदिं संतोष अति तयां ॥
मुदें बंधु युग हृदयीं धरले । पुलक अंगि अंबकिं जल भरलें ॥
निघती दशरथ–जानोशासी । जणुं तलाव लक्षुनि तृषितासी ॥

**दो०–भूप विलोकिति जैं मुनि येती सुतां समेत ।।**
**हर्षि उठुनि सुखसागरीं शिरति ठावसा घेत ॥३०७।**

मुनिस महीश दंडवत करिती । घडिघडि पदरज निज शिरिं धरिती॥
कौशिक हृदयीं धरिति नृपाला । आशिस देति पुसति कुशलाला ॥
मग बंधूद्वय करिति दण्डवत । वघुनि नृपति-मनिं सुख ना मावत ॥
सुत हृदिं धरित विषम दुख फिटलें। जणुं मृत देहा प्राण भेटले ॥
मग वसिष्ठ पदिं ते शिर नमती । प्रेम–मोदिं मुनिवर हृदिं धरती ॥
विप्रगणां युग बंधु वंदती । मना सारखे आशीस् मिळती ॥
भरत सहानुज चरणीं प्रणमति । उठवुनि राम तयां आलिंगति ॥
हर्षित लक्ष्मण वघुन बंधु, ते । भेटति कायें प्रेमपूरितें ॥

**दो०–पुरजन परिजन जातिजन याचक मित्र सचीव ॥**
**सकलां प्रभु भेटति सविधि विनयें करुणाशीव ॥३०८॥**

निवति वऱ्हाडी रामा बघतां । प्रीति रीति ना येई वदतां ॥
नृप समीप शोभति सुत चारी । जणुं धन–धर्मादिक तनुधारी ॥
सहित सुतां दशरथांस पाहति । पुर–नर नारी प्रमोद पावति ॥
वर्षुनि सुमसुर पिटिति निशाणां । करिति नाक - नटिनृत्या गाना ॥
शतानंद नी विप्र–सचिव–गण । मागध–सूत–सूरि–वंदीजन ॥
भूप वऱ्हाडासह सन्मानति । घेउनि आज्ञा फिरले स्वागति ॥
लग्नापूर्विच वऱ्हाड आलें । प्रमुदित म्हणुन अधिक पुर झालें ॥
ब्रह्मानंद लोक सव लुटती । 'विधि! वाढव वासर' पुट्पुटती ॥

**दो०–रामसिता शोभा-अवधि सुकृत-अवधि नृप दोनि ॥**
**जिथं तिथं पुरजन म्हणति असं नर बहु नारि जमोनि ॥३०९॥**

जनक–सुकृत–मूर्तिच वैदेही । रामचि दशरथ–सुकृत सदेही ॥
यांसम कुणि ना शिव आराधित । कोणि न यांसम फलासि साधित ॥
यांसम कोणि न जगिं झाला ही । कुठें नसे होणारहि नाहीं ॥
आम्हि सकल सब सुपुण्यरासी । जन्मुनि जगति जनक पुरवासी ॥
जिहिं जानकी-राम-छवि दृष्टहि । सुकृति अम्हांसम अधिक कोणि नहि
आणि पाहुं रघुवीर विवाहू । घेउं यथेष्ट किं लोचन–लाहू ॥
वदति परस्पर कोकिलवचना । या विवाहिं बहु लाभ सुनयना ॥
महाभाग्य ! विधि रचि योगातें । होतिल नेत्र अतिथि दो भ्राते ॥

दो०–स्नेहें सीते वार बहु जनक कि आणवितील ।।
कोटि-काम-छवि बंधुयुग नेण्या तिज येतील ।।३१०।।

पाहूणचारहि होतिल वाड कि । प्रिय न कुणा अशि सासुरवाड कि।।
तंव तंव निरखुनि रामलक्ष्मणां । अति सुख होईल सकल पुरजनां ।।
सखी ! रामलक्ष्मण जोडी जशि । नृपासवें सुत-जोडि दुजी तशि ।।
श्याम–गौर अंगीं शोभा अति । जे पाहुन आले ते सांगति ।।
एक म्हणे मी आज निरखिले । विरंचिनें स्वकरीं जणुं रचिले ।।
भरत कि रामाचे अनुसारीं । सहज न जाणुं शकति नरनारी ।।
लक्ष्मण–रिपुसूदन रूपें सम । नख–शिखांत सर्वांगें अनुपम ।।
मनि रुचती ये वर्णुं मुखा ना । त्रिभुवनिं कोणी उपमाया ना ।।

छं०–उपमे न कुणि जगिं वदति तुलसी,सूरि कवि वदतात कीं।
बल-विनय-विद्या-शील-शोभा-सिंधु यांसम हेच कीं ।।
पुरनारि पसरुनि पदर विधिला सकल ही विनवीत कीं ।
हो लग्न चौघा बंधुचें पुरिं गावुं मंगल गीत कीं ।।१।।

सो०–वदति परस्पर नारि वारि विलोचनिं पुलक तनुं ।
सखि सब करिल पुरारि पुण्य पयोनिधि भूप युग ।।३११।।

यापरिं सकल मनोरथ करती । उरिं आनंद पूर बहु भरती ।।
जे नृप सिता–स्वयंवरिं आगत । बघुनि बंधुना ते सुख पावत ।।
वदत राम यश विशद विशाल । निज निज भवनां गत महिपाल ।।
यापरिं काहीं वासर सरले । प्रमुदित पुरजन वऱ्हाड सगळें ।।

आला मंगलमूल लग्न–दिन । हिमऋतु महिना मार्ग सुभोभन ।
ग्रह तिथि योग वार वर तारा । लग्न शुद्ध, विधि बघुनि विचारां ।
नारद हातीं देती धाडुनि । जनक-गणकिं जो निश्चित शोधुनि।
कळे सकल लोकां ही वार्ता । म्हणति 'असे ज्योतिषी विधाता' ।

**दो०धेनु-धूलि-वेला विमल सकल-सुमंगल-मूल ।।**
**विप्र विदेहा सांगती बघुन शकुन अनुकूल ।। ३१२ ।।**

नरपति वदले पुरोहिताही । अतां विलंबा कारण नाहीं ।।
शतानंद सचिवां बोलाविति । मंगल सकल सजुनि ते आणिति ।।
शंख निशाण पणव वहु वाजति । मंगल कलश शकुन शुभ साजति ।।
सुभग सुवासिनि गाती गाणीं । विप्र पूत गाती श्रुतिवाणी ।।
निघती सादर मूळ वराला । गेले दशरथ–जानोशाला ।।
कोसलपतिच्या बघुनि समाजा । अति लघु भासे त्यां सुरराजा ।।
शीघ्र निघावें समय ठाकला । तदा निशाणीं धाव घातला ।।
करुनि गुरुवचें कुलविधि राजा । निघति सहित मुनि-साधु, समाजा।।

**दो०–अयोध्येश-भाग्य नि विभव देव अजादि बघून ।।**
**स्तवुं लागति दशशत-मुखा वृथा स्वजन्म गणून।।३१३।।**

देव सुमंगल अवसर जाणति । पिटुनि निशाणां सुमनें वर्षति ।।
शंभु-अजादिक विबुध-कदंबक । बसति विमानिं विविध निकुरंबक
प्रेम पुलक वपुं हृदिं उत्साहू । निघति बघाया राम-विवाहू ।।
बघत जनकपुर सुर अनुरागति । स्व-स्वलोक सकलां लघु लागति ।।

निरखिति चकित विचित्र विताना । रचना सकल अलौकिक नाना ।।
नगर–नारि–नर रूपनिधानहि । सुकुल सुधर्मि सुशील सुजाणहि ।।
त्यांस बघुनि सब सुर सुरनारी । विधुतेजीं जशि भगणें सारीं ।।
बघुनि सुविस्मय विधिमनि घुसला । निज करणीचा ठाव न दिसला ।।

**दो०–विबुध, विस्मयें भुलुं नका शिव शिकवितो सुरांस ।।**
**सीता-रघुविर विवाह कि धरा मनीं धीरास ।।३१४।।**

घेतां ज्यांचें नाम हिं जगतीं । सकल–अमंगल–मूल भंगती ।।
चारि पदार्थहि येति सहज करिं । सिताराम ते म्हणति काम–अरि ।।
शिव समजाउनि असें सुरांला । पुढें चालविति वृषोत्तमाला ।।
दशरथ जातां देवां दिसले । महामोद मनि देह पुलकले ।।
साधु समाज महीसुर संगें । जणुं सुख तनुधर सेविति अंगें ।।
सवें सुभग सुत शोभति चारी । जणुं अपवर्ग सकल तनुधारी ।।
मरकत–कनक–वर्ण वर जोडे । बघुनि सुरांनां प्रेम न थोडें ! ।।
मग रामास बघुनि हृदिं हर्षति । नृपा प्रशंसुनि सुम बहु वर्षति ।।

**दो०–रामरूप नखशिख सुभग निरखत वारंवार ।।**
**पुररिपु पुलकति उमेसह सजल विलोचन फार ।।३१५।।**

केकिकंठ–भा श्यामल अंगीं । तडित्–विनिंदक वसन सुरंगी ।।
विविध विवाह-विभूषणि भूषित । मंगल सर्व सर्वपरिं शोभित ।।
शरद-विमल-विधु-वदन सुशोभन । नव राजीव विलाजक लोचन ।।
सकल अलौकिक सुंदरता ते । भरे मनीं परि वदलि न जाते ।।

वंधु मनोहर शोभति संगां। जाति नाचवित चपल तुरंगां ।।
राजकुमर वर वाजि दाखवति। कुल-प्रशंसक विरुद पुकारति ।।
तुरंगमीं ज्या राम विराजति। अवलोकत गति खगपति लाजति ।।
वदवे ना सर्वांगीं सुंदर। वाजि-वेष जणुं काम धरी वर ।।
**छं–जणुं काम रामहितार्थ वाजी-वेषधर अति शोभतो।**
**आपलें वय-बल-रूप-गुण-गति सकल भुवन विमोहतो ।।**
**झगमगति जीन-जडाव-जोति सुमोति बहु मणि माणकें।**
**किंकिणि ललाम लगाम ललितहि बघुनि सुर नर मुनि ठके।। १**
**दो०–जातां प्रभुमनि लीन मन ये छवि जणुं तुरगास–।।**
**भूषित उडुगण तडितवर नाचवि बर्हि घनास ।।३१६।।**
स्वार राम ज्या अनुपम वाजीं। त्यास शारदा कशि नांवाजी ।।
शंकर रामरूपिं अनुरागति। प्रिय अति नेत्र पंच दश लागति ।।
प्रेमें हरिस राम जंव पाहति। रमा-समेत रमापति मोहति ।।
बघुनि रामछवि विधि हर्षावे। आठचि नयन ! म्हणुन पस्तावे ।।
सुर सेनप-उरिं बहु उत्साहो। विधिच्या दिडपट लोचन-लाहो ।।
रामा सुरपति सुजाण पाहत। गौतम शाप परमहित वाटत ।।
स्तविति सुरेशा सुर सेर्षा ही। आज पुरंदर सम कुणि नाहीं ।।
मुदित देवगण रामा बघतां। नृपसमाजिं युग हर्षाधिकता ।।
**छं०–अति हर्ष राजसमाजिं युग दिशि दुंदुभी वाजति घने।**
**सुर सुमन वर्षति हर्षि जयजय वदति जय रघुकुलमणे ।।**

या रीति येत वरात जाणुनि विविध बाजे वाजती ॥
ओवाळण्या राण्या सुवासिनि सह सुमंगल साजती ॥१॥
दो०– सजुनि आरती बहुविधा बहु मंगलसंभारि
जाति मुदित ओवाळण्या गजगामिनि वरनारि ॥३१७॥

❖ ❖ ❖

## अध्याय ३३ वा

विधुवदनी सब सव मृगलोचनि । सब निज-तनु-छवि रतिमद मोचनि ॥
नेसुनि वर्णवर्ण वर चीरां । सकल विभूषणिं सजुनि शरीरां ॥
मंगल सकल सु-अंगि सुसाजति । कलकंठिस कलगानि लाजवति ॥
कंकण किंकिणि नूपूर वाजति । पाहुनि चाल काम–गज लाजति ॥
वाजे वाजति विविध वहुपरीं । मंगल आचारहि नभि नगरीं ॥
शची शारदा रमा भवानी । सहज शुची सुरयुवती ज्ञानी ॥
कपटनारिवर वेषां धरती । जाउनि राणी वसां मिसळती ॥
मंगल गानां करती सुस्वरिं । सकल हर्षवश, कळे कुणा तरि ? ॥
छं०–मुदमग्न न कळे, ब्रह्मवर ओवाळण्या त्या चालती ।
कलगान मधुरनिशाण, वर्षति सुमन सुर, शोभा अती ॥
आनंदकंद विलोकुनी वर सकल हृदयीं हर्षती ॥
अंभोज-अंबकिं अंबुभरती स्वंगिं पुलकावलि अती ॥१॥
दो०–जें सुख सीता-जननिला बघुनि राम–वर–वेष ॥
वदुं न शकति तें कल्पशतिं गिरा सहस्त्रहि शेष ॥३१८॥

दाबि नयनजल मंगल जाणुनि । राणी औक्षण करि मनिं हर्षुनि ॥
वेद विधी सह कुल-आचारहि । सुविधिं सकल केले व्यवहारहि ॥
मंगल गीतें ध्वनि-रव-पंचक । पायघड्या पडल्या बहु रोचक ॥
करूनि आरती अर्घ्य अर्पिती । राम गमन मग मंडपिं करिती ॥
दशरथसहित समाज विराजति । विभव विलोकुनि लोकप लाजति ॥
समयिं समयिं सुर वर्षति फूलां । महिसुर पढति शांति अनुकूला ॥
नभिं नगरीं अति होइ गलबला । निज-पर-शब्द न जाइ परिसला ॥
राम मंडपीं असें प्रविशले । आसनिं, देउनि अर्घ्य बसविले ॥

**छं०—बसवूनि आसनिं करुनि आरति बघुनि वर सुख पावती**
**नारी सुमंगल गाति भूषण वसन मणि ओवाळती ॥**
**ब्रह्मादि सुरवर विप्रवेषीं परम कौतुक देखती ।**
**पाहोनि रघु-कुल-कमल-रवि छवि सुफल जीवन लेखती॥१॥**
**दो०—न्हावी बारी भाट नट राम-उतारे घेति ॥**
**हर्ष हृदिं न मावे, शिर नमुनी आशिस देति ॥३१९॥**

तदा जनक दशरथ सुप्रीतीं । भेटति करुन वेद-जन-रीती ॥
भेटत युग नृप महा विराजति । उपमा अति धुंडुनि कवि लाजति ॥
मिळे कुठें न, हार मनिं मानिति । यांसम हे उपमा उरिं आणिति ॥
पाहुनि भेट देव अनुरागति । वर्षुनि सुमन गाउं यश लागति ॥
जैंहुनि विरंचिनें जगिं सृजलें । बहु परिणय पाहिले परिसले ॥
सर्व—परीं सम साज समाजीं । व्याही सम दिसले परि आजीं ॥

रुचिर सत्य सुर-गिरा परिसली । प्रीति अलौकिक युगदिशि भरली ॥
पायघड्या शुभ अर्घ्यहि घालित । जनक आदरें मंडपिं आणित ॥
छं०-मंडप बघोनि विचित्र रचना रुचिरता मुनि-मन हरी ।
सिंहासनें दे, जनक सकलां सुज्ञ आणुनि निज करीं ॥
कुलदेव-सदृश वसिष्ठ पूजुनि विनविलें; आशीस दे ।
सुप्रीति पूजिति कौशिका तो रीति कवि केवीं वदे ॥१॥
दो०-वामदेव आदिक ऋषी पूजिति मुदित महीश ॥
दिव्यासनं सकलां दिलीं देति सकल आशीस ।३२०॥
मग केली कोसलपति पूजा । गणुनि ईशसम भाव न दूजा ॥
स्तुती प्रार्थना कृत कर जोडुनि । भाग्य-विभव-वृद्धी निज वानुनि ॥
पूजिति भूपति सर्व वऱ्हाडा । व्याह्यांसम आदर अति जाडा ॥
उचित आसनें दिधलीं सर्वां । एकमुखें वदवे न उत्सवा ॥
सर्व वऱ्हाड जनक सन्मानी । दान-मान विनती-वरवाणीं ॥
विधि-हरिहर दिनराज दिशापति । जे रघुवीर-प्रभाव जाणति ॥
कपट-विप्रवर-वेषां धरुनी । अति सुख पावति कौतुक बघुनी ॥
करिति जनक देवासम पूजन । ओळखल्याविण देत शुभासन ॥
छं०-जाणेल कोणा कोण ओळखि राहि ना निज शुद्ध ही ।
आनंद-कंद बघून वर आनंदमय उभ लोकही ॥
सुर कळति रामा सुज्ञ पूजुनि मानसिक दे आसनां ।
प्रभुच्या सुभावा बघुनि शीला मोद अति विबुधां मनां ॥१॥

दो०—रामचंद्र मुखचंद्रछवि लोचन चारु चकोर ॥
करिति पान सादर सकल प्रेम मोद अति थोर ॥३२१॥

समय विलोकुनि वसिष्ठ बाहति । सादर शतानंद तैं ठाकति ॥
आणा लौकर कुमारिस अतां । जाति मुदित मुनि आज्ञा मिळतां ॥
राणी श्रवुनि पुरोहित-वाणी । प्रमुदित सखींसमेत शहाणी ॥
विप्रवधू कुलवृद्धा आणुनि । गाति सुमंगल कुलविधि सारुनि ॥
स्त्री वेषीं ज्या सुरवर-वामा । सहज सुंदरी सगळ्या श्यामा ॥
त्यां देखुनि सुख पावति नारी । प्राणप्रिय परिचयविण भारी ॥
पुनः पुन्हां राणी सन्मानी । सम शारदा रमोमा मानी ॥
सीते सजवुनि समाज सजुनी । मुदित मंडपा निघति घेऊनी ॥

छं०—सखि घेति सीते निघति सादर सजुनि मंगल भामिनी ॥
नव सप्त सजुनी सुंदरी सब मत्त-कुंजर-गामिनी ॥
गाना श्रवुनि मुनि ध्यान तजिती काम-कोकिल लाजती ॥
मंजीर नूपुर कलित कंकण तालगति वर वाजती ॥ १ ॥

दो०—सहज चारु सीता खुले वनितावृंदि तदीय ॥
छविललनागण-मध्य जणुं सुषमा स्त्री कमनीय ॥३२२॥

सीता-शोभा अवर्णनीया । फ़ार मनोहरता लघु धी या ॥
येतां बघुनि वऱ्हाडी सीते । रूपराशी सबपरीं पुनीते ॥
सर्व मनोमनिं करिती प्रणमन । निरखुन रामा पूर्णकाम जन ॥
दशरथ तनयां-समेत हर्षित । वदवे ना किति हृदिं आनंदित ॥

प्रणमुनि निर्जर वर्षति फूल । मुनि-आशीर्ध्वनि मंगलमूल ॥
गान भेरि कोलाहल भारी । प्रेमाऽऽमोदिं मग्न नर नारी ॥
आली अशि मंडपिं सीता ती । प्रमुदित मुनिवर पढती शान्ती ॥
समयोचित विधिनां व्यवहारां । कुल-गुरु युगल करिति आचारा ॥

**छं०–आचार कृत; गुरु गौरि गणपति मुदित विप्रां पुजवती ।**
**सुर घेति पूजा प्रगट देति अशीस अति सुख पावती ॥**
**मधुपर्क मंगल वस्तु जी जे समयिं मुनि मनि वांछती ॥**
**तें कनक भाजन कलशभर करिं धरुनि सेवक तिष्ठती ॥१॥**
**कुलरीति रवि सप्रीति सांगत आदरें संपादिलें ॥**
**पूजवून देवां एवि, सीते सुभग सिंहासन दिलें ॥**
**अन्योन्य सीता राम बघती, प्रेम नेणति तें कुणी ।**
**मनबुद्धि-वरवाणी-अगोचर कवि वदे कसं वर्णुनी ॥२॥**

**दो०–होमिं अग्नि मूर्तचि मुदा अति आहुति घेतात ॥**
**विप्रवेषधर वेद सब विधि विवाहिं वदतात ॥३२३॥**

जनक–पट्टराणी जग–विदिता । सीता–माता ये किं वर्णितां ? ॥
सुयश सुकृत सुख सब सुंदरता । संकलुनी विधि होइ विरचिता ॥
समय बघुनि मुनिवर बोलावति । तदा सुवासिनि सादर आणति ॥
जनक–वामदिशिं खुले सुनयना । शोभे हिमगिरिसह जशि मयना ॥
कांचन कलश सुरत्न–परांतित । शुचि सुगंधि मंगल-जल-पूरित ॥
आणुनि मोदें राजाराणी । ठेविति रामापुढें करांनीं ॥

पढति वेद मुनि मंगलवाणीं । गर्गनि सुमन–झड समय जाणुनी ॥
वर निरखुनि दंपति अनुरागति । पूत पदां प्रक्षाळूं लागति ॥
छं०–प्रक्षालती पद-पंकजां प्रेमें वपू पुलकावती ।
नभिं नगरिं गान-निशाण-जय-रवपूर दशदिशि चालती॥
जे पद-सरोज मनोज-अरि-उर-सरिं सदैव विराजती ॥
जे स्मरत सकृत हि विमलता मनिं सकल कलिमल पांगती
जे स्पर्शतां मुनि-नारि लाभे सद्‌गती जरि अघवती ॥
मकरंद ज्यांचा शंभुशिरिं शुचितावधी सुर वर्णती ॥
कृत-मधुपमन मुनि योगिजन गतिभजुनि अभिमत पावती
ते क्षालिती पद भाग्य-भाजन जनक, जन जय बोलती ॥२॥
वर-कुमरि-करतल जुळुनि शाखोच्चार कृत कुल-गुरुवरीं।
पाहून पाणिग्रहण विधि-सुर-मनुज-मुनि मुद-सागरीं ॥
सुखमूल वर पाहून पुलकति दंपती मन मुद-भरीं ।
युत लोक-वेद-विधान कन्यादान नृपभूषण करी ॥३॥
हिमवंत दे गिरिजा महेशा सिंधू हरिला श्री जशी ॥
रामा समर्पिति जनक सीता कीर्ति कल नव जगिं तशी
कशि करिति विनति विदेह कृत हि विदेह छविनें श्यामला
कृत होम विधिवत गाठ मारुनि सप्तपदि-विधि चालला ॥४॥
दो०–वेदघोष, जय-बंदि-रव मंगल-गान निशाण ॥
श्रवुनि विबुध वर्षति हर्षि सुरतरु-सुमन सुजाण ॥३२४॥

करिति सप्तपदि कुमर-कुमरिवर। लोचन–लाभ लुटति जन सादर ॥
वर्णु न येइ मनोहर जोडी। जी उपमा द्यावी ती थोडी ॥
रुचिर राम–सीता–पडछाया। मणिखांबीं लागति चमकाया ॥
जणुं बहुरूप मदन रति धरती। अनुपम राम–विवाहा बघती ॥
दर्शन–लालुच लाज नाल्प, तीं–। प्रगटति पुन्हां पुन्हां परि लपती ॥
मग्न लोक बघणारे सगळे। जनकासम तनुभान निज गळे ॥
प्रमुदित मुनी सप्तपदि करविति। अहेरादि सब रीती उरकिति ॥
भरिति राम सीता–शिरिं शेंदुर। शोभा वर्णुं न जग धजें उर ॥
जलज भरुनि वर अरुण–परागां। भूषवि शशिला सुधा–सुरागां ॥
मग वसिष्ठ देतां अनुशासन। भूषविती वरवधु एकासन ॥

**छं०–बसलीं वरासनिं रामजानकि मुदितमन दशरथ अती।**
**तनुपुलक किति निज सुकृत सुरतरुं बघुनि फल नव लागती**
**उत्साह भरला भुवनिं झाला म्हणति राम विवाह हा।**
**तो वर्णुनी कीं सग्त रसना एक हें मंगल महा ॥ १ ॥**
**मग जनक मिळत वसिष्ठ शासन लग्नसाजां सजवुनी।**
**घे मांडवी श्रुतकीर्ति उर्मीला सुली बोलावुनी ॥**
**कुशकेतु-कन्या प्रथम जी गुणशील-सुख शोभाथिली।**
**सप्रीति सर्वहि रीति करुनी नृपतिनें भरता दिली ॥ २ ॥**
**जानकी-लघु भगिनी सकल-सुंदरिशिरोमणि जाणुनी।**
**जनकें दिली ती लक्ष्मणा विधि सर्व करुनि विवाहुनी ॥**

श्रुतकीर्ति नामें जी सुलोचनि सुमुखि सर्व-गुणागरी ।
रिपुसूदना ती देइ भूपति रूप-शील-सुभास्वरी ॥ ३ ॥
अनुरूप वर नववधु परस्पर बघुनि लाजति हर्षती ।
सौंदर्य मोदें स्तविति सर्वहि सुमन सुरगण वर्षती ॥
सब सुंदरी सुंदर वरांसह एक-मंडपिं राजती ।
जणुं जीवउरिं चारी अवस्था सह विभू विभ्राजती॥४॥
दो०–मुदित अयोध्याधिप बघुनि वधूंसहित तनयांस ॥
जणुं लाभति भूपाल मणि सक्रिय चार फळांस॥३२५॥
विधि रघुवीर-विवाहीं जेवीं । केले सकल मुलांच्या तेवीं ॥
वदणें केंविं देज अति अर्पित । मंडप मणि-कांचनीं प्रपूरित ॥
सुती-रेशमी-ऊर्णा-वसनें । नाना-विध वहु मोल न गणणें ॥
गज तुरंग रथ सुदास दासी । धेनु अलंकृत कामदुघांसी ॥
वस्तु अमित कशि गणना करवे । जाणति जिहिं पाहिलें, न वदवे ॥
लोकपाल पाहुनि हापापति । घेति अयोध्यापति सुख मानति ॥
दिलें याचकां जें ज्यां रुचलें । जानोशीं आलें जें उरलें ॥
वदुनि जनक मृदु जुळुनि करांनां । वऱ्हाड्यांस देती सन्माना ॥
छं०–सन्मानुनी सर्वांस आदर दान महती-विनतिनें ।
प्रमुदित महामुनि-वृंद वंदित पूजुनी सुप्रीतिनें ॥
शिर नमुनि विनवुनि सकल देवां म्हणति कीं बद्धांजली
सुर साधु इच्छिति भाव सिंधु किं तुष्ट देत जलांजली॥१॥

मग जनक अनुजासहित कोसलनृपतिनां कर जोडती ॥
सुस्नेहशीलसुभावभरलें वच मनोहर बोलती ॥
संबंधि राजन् आपले अम्हि आज महती लाहलों ।
या राज्य-विभवा सहित सेवक फुकट जाणा जाहलों ॥२
या दारिका परिचारिका करुनी सु-करुणें पाळणें ।
बोलाविलें ही धृष्टता, अपराध पोटीं घालणें ॥
सन्माननिधि केले तदा व्याह्यास रघुकुल भूषणें ।
सुप्रेम पूरित ती परस्पर-विनति कशि वाखाणणें ॥३॥
वृंदारकहि बहु सुमन वर्षति राव वासा चालले ।
जयदुंदुभी ध्वनि वेदरव; नभि नगरिं कौतूहल भलें ॥
मग सखी मंगल गान करित मुनीश-आज्ञा पावुनी ।
गौरीहरार्प्रति ज्ञाति सुंदरि वर-वधूंना घेउनी ॥४॥
दो०–सिता बघे रामा किती लाजे, परि न मनांत ॥
हर्रात मनोहर मीन-छवि चक्षू प्रेम-तृषार्त ॥३२६॥

मास पारायण, एकादश विश्राम.

❖ ❖ ❖

## अध्याय ३४ वा

श्याम शरीर सहज सुंदर, तें । कोटि काम शोभे लाजवतें ॥
अळिता–युत पदकमल विलसती । मुनि-मन-मधुप करिनि जिथं वसती

पावन पीतांबर सुमनोहर । बालभानु–दामिनि–तेजोहर ॥
कल किंकिणि कटिसूत्र मनोहर । बाहु विशाल विभूषण सुंदर ॥
पीत जानवें फार शोभतें । चित्ता करमुद्रिका चोरते ॥
वर शृंगार सकल शुभ शोभति । आयत उर उरभूषण राजति ॥
पीत उपरणें खाके खालुनि । रचित मोति मणि पदरालागुनि ॥
नयन कमल कल कुंडल कानीं । वदन सकल सौंदर्य–सुरवाणी ॥
सुंदर भृकुटी नाक मनोहर । भाल तिलक रुचिरता वास वर ॥
मोर–मुकुट मस्तकीं सुशोभित । मंगलमय मणि मुक्ता विरचित ॥

छं–खचिले महामणि मुकुटिं मंजुल अंग चित्ता चोरती ।
सुरसुंदरी पुरनारि सुवरा बघुनि दृष्टहि काढती ॥
ओवाळती मणि वसन भूषण गाति मंगल, आरती ।
सुर सुमन वर्षति सूत मागध बंदि सुयशा वानती ॥१॥
गौरीहरां आणीति कुमर–कुमारि नारि सुखावती ।
सुप्रीति मंगल गात लौकिक रीति सब करुं लागती ॥
रामास शिकवी गौरी सीते घास देउं सरस्वती ।
राण्याहि हास-विलास-रस-वश जन्मफल सब पावती ॥२॥
निज-पाणि-मणि-मधि विसतसे मूर्ती स्वरूपनिधान कीं ।
भुजवल्लि हलवित ना विलोचन विरहभयवश जानकी ॥
कौतुक विनोदामोद ववचे प्रेम ना, सखि जाणती ।
वर कुमरि सुंदर सखी घेउन निघति जानोशाप्रती ॥३॥

**त्या समयिं कानिं अशीस चहुं दिशिं नगरिं नभिं मोद हि महा।**
**चिरजीवि जोडे चारु चारी होतु म्हणती सरसहा ॥**
**सुर सिद्ध मुनि वर योगि बघुनी प्रभुस, दुंदुभि ताडती**
**गत हर्षि वर्षुनि सुमन जय जय करित निज लोकाप्रती ।।४।।**

**दो०–सहित नववधू कुमर तें आले तातापासिं ।**
**शोभा मंगल मोद भर पूर किं ये जनवासिं । ३२७ ॥**

स्वयंपाक झाला मग गाढा । धाडि जनक बोलावुं वऱ्हाडा ॥
अनुपम पायघड्या पट पडती । नृप पुत्रांसह गमना करती ॥
क्षालित सर्वांचे पद सादर । बसवीले समुचित पाटांवर ॥
क्षालित दशरथ पायां जनकें । स्नेहा शीला कोण वदुं शके ॥
राम पदाम्भोजां तैं क्षालित । जे हरहृदय सरोरुहिं गोपित ॥
तिघे बंधु रामासम गणुनी । क्षालिति चरण जनक निज पाणीं
उचितासन नृप सर्वां देई । वाढण्यांस बोलावुनि घेई ॥
पात्रें सादर मांडुं लागले । कनक कील मणिपानिं लावले ॥

**दो०–सूपोदन सुरभी–सर्पि स्वादु सुरस सुपुनीत ।।**
**क्षणिं एका परिवेषिती वाढपि चतुर विनीत ।। ३२८ ॥**

कृत पंचाहुति जेऊं लागति । श्रवुनि उखाणे अति अनुरागति ॥
नानाविध पक्वान्नं वाढलीं । सुधें समान, न जाति वानलीं ॥
सुज्ञ वाढपी वाढति भावें । बहु शाकादि, न ठाउक नांवे ॥
भोजनिं विधिवत चारी जाती । एकिं तऱ्हा ना वदल्या जाती ॥

षड्रस रुचिकर चटण्यादिक अति । एक-एक-रस-परी न गणवति ॥
घालिति मधुर उखाणे नाना । घेउनि पुरुष-नारि-नामानां ॥
समय-सुशोभन-विनोद चाले । सह समाज नृप हसते झाले ॥
यापरि सकल जेउनी उठले । सादर आचमना जल दिधलें ॥

**दो०–पूजि जनक देउनि विडे दशरथ, वऱ्हाडि यांसि ॥**
**सकल महीप-शिरोमणी मुदित जाति निजवासि ॥३२९॥**

नित्य नवें मंगल पुरि चाले । निमिषासम निशिवासर झाले ॥
उषःकाळि भूपतिमणि जागति । याचक गुणगण गाऊं लागति ॥
बघुनि कुमारां सहित वधू वर । मोद अमित मनि कसा वदूं बरं ॥
नित्यकर्म कृत गत गुरु पासीं । प्रेमा महा प्रमोद मनासी ॥
प्रणमुनि पूजन कृत जोडुनि कर । वदले गिरा सुधामय सुंदर ॥
पहा आज मुनि–राज आपले- । कृपें काम मम पूर्ण जाहले ॥
अतां स्वामि आणुनि विप्रांनां । द्या कीं सालंकृत गो-दानां ॥
ऐकुनि गुरु भूपा वाखाणति । मुनिवृंदांस निमंत्रण धाडति ॥

**दो०–वामदेव देवर्षि ही वाल्मीकी जाबालि ॥**
**आले मुनिवर–निकर तैं कौशिकादि तपशालि ॥३३०॥**

त्यां नृप करुनि दण्डवत् प्रणमन । प्रेमें पूजुनि देइ वरासन ॥
चार लक्ष अणविति धेनू वर । कामसुरभिसम सुशील सुंदर ॥
सर्वंहि सविधि अलंकृत करुनी । मुदित महिप महिसुरां अर्पुनी ॥

प्रार्थिति नानापरिं सर्वांला । जीवनलाभ आज मज झाला ।।
आशीर्वचनिं नृपति आनंदित । याचक-वृंदां तदा आणवित ।।
कनक वसनं गज-वाजी स्यंदन । मणि, जशि रुचि दे रविकुलनंदन ।।
जाती पढत गात गुण-गाथा । जय जय जय दिनकर कुलनाथा ।।
ऐसा राम-विवाहोत्साहो । वदुं न शके मुख हजार ज्या हो! ।।

**दो०–पुनः पुन्हां कौशिकपदीं वदे नमुनि शिर राय ।।**
**हें अति सुख मुनिराज तव कृपा–कटाक्ष-पसाय ।।३३१।।**

जनक-शील कर्तृत्व विभूती– । स्नेह, नृपति वानिति बहु रीतीं ।।
गमनाज्ञा कोसलपति मागति– । रोज, भूपती प्रेमें राखति ।।
अधिक नित्य नव आदर-वृद्धी । प्रतिदिन पाहुणचार–समृद्धी ।।
आनंदोत्सव नित्य नवे पुरिं । दशरथ-गमन न कुणा रुचे उरिं ।।
दिवस विगत किति दिवसा आड । स्नेह-रज्जु-बद्ध कीं वऱ्हाड ।।
कौशिक शतानंद मग जाउनि । वदति विदेहनृपा समजाउनि ।।
अतां दशरथां निरोप द्या तरि । स्नेह न आपण सोडुं शकां जरि ।।
वरें नाथ ! नृप बोलवि सचिवां । तिहिं शिर नमिलें वदुनि जय जिवा।।

**दो०–कोसलेश जातों म्हणती कळवा जाउनि आंत ।।**
**सचिव विप्र तैं सभा नृप प्रेमविवश होतात ।।३३२।।**

पुरजन परिसुन 'वऱ्हाड जाते' । पुसति परस्पर विव्हळतां ते ।।
सत्य गमन परिसुनी म्लान अति । सायं सरसिज जणूं कोमजति ।।
येतां वसले जिथें वऱ्हाडी । तेथें विविध शिधा नृप धाडी ।।

मेवा पक्वान्ने विविधा किति । भोजन-सामग्री नाहीं मिति ।।
भरुनि कावडी, अमित वृषांवर- । धाडि जनक बहु शुभ शय्या वर ।।
तुरग लाख, रथ हजार पंचवीस । सकल अलंकृत नखादि आशीस् ।।
मत्त अयुत वर सिंधुर राजति । जे दिसतां दिक्कुंजर लाजति ।।
कनक-वसन-मणि यानें भरभर । महिषी धेनु वस्तु विविधा वर ।।

**दो०-आंदण देइ न वर्णवे पुन्हां विदेह अपार ।।**
**बघत लोक लोकप सकल संपत्ती तृणसार ।।३३३।।**

यापरि सर्वहि साज साजुनी । जनक अयोध्ये देति धाडुनी ।।
'जाई वरात' परिसुनि राण्या । विकल मीनगण जणुं लघु पाण्यां ।।
सीते कितिदां अंकी घेती । आशीर्वादहि शिकवण देती ।।
संतत पतिला प्रिय वाळे ! हो । चिर सौभाग्य अशीस् अमचे हो ।।
सासु-सासरा-गुरु-सेवा कर । पतिकल बघुन पाळ आज्ञा वर ।।
स्नेहविवश अति सखि सुज्ञानी । नारिधर्म शिकविति मृदु वाणीं ।।
सादर सब सुतांस समजावति- । राण्या मग कितिदां अलिंगति ।।
भेटति वारंवारहि माता । म्हणति निर्मि कां स्त्रिया विधाता ।।

**दो०-राम भानुकुल-केतु तैं बंधु तिघे त्यां-पाठिं ।।**
**निघति जनक-मंदिरिं मुदित आज्ञा घेण्यासाठिं ।।३३४।।**

सहज चारु बंधूस बघाया । लागति पुरनरनारि पळाया ।।
आज जाउं बघती कुणि सांगत । सब पाठवणि विदेहें सज्जित ।।
रूप बघुन घ्या नयनीं भारी । प्रिय पाहुणे भूप-सुत चारी ।।

सुज्ञे ! कवण सुकृत ज्या-लागुनि । नयन-अतिथिकृत विधिनें आणुनि
मरणशील जशि सुधा पावतो । सुरतरु जन्म-भुकेला लभतो ।।
मिळे नारक्या हरि-पद जैसें । यांचे दर्शन आम्हां तैसें ।।
बघुनि राम शोभा कि उरिं धरा । निज मन फणि मूर्तीस मणि करा ।।
सकलां असें नयनफल देतां । गत कुमार सब राजनिकेता ।।

**दो०–रूपसिंधु बंधुंस बघुनि सासु मुदित उठतात ।।**
**ओवाळुनि आरति करति महामोद चित्तांत ।।३३५।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ३५ वा

बघुनि रामछवि अति अनुरागति । प्रेम-विवश पायां पडुं लागति ।।
प्रीति भरे उरिं लाज न राही । स्नेह सहज तो वर्णुं कसा ही ।।
उटणीं लावुनि चौघां स्नपविति । षड्रसान्न सुप्रेमें वाढिति ।।
राम जाणुनि सुसमय बोलति । स्नेह-शील-संकोचयुक्त अति ।।
भूप अयोध्ये जाऊं म्हणती । आज्ञा घेण्या अम्हां धाडती ।।
माय ! मुदित मन आज्ञा द्यावी । बालक म्हणुनी प्रीति करावी ।।
वचनें राण्या उदास बनती । प्रेम-विवश सासु न वदुं शकती ।।
कुमारींस पोटाशीं धरती । सोंपुनि पतिस विनति अति करती ।।

**छं०–विनवुनि सिता रामा समर्पुनि जोडुनी कर विनवते ।**
**कुरवंडु ! तात सुजाण सकलांची गती तुम्हि जाणते ।।**

**परिवार पुरजन मज नृपानां प्राण सीता, जाणणें ।**
**तुलसीश ! बघुनी स्नेह शील हि किंकरी निज मानणें ॥१॥**
**सो०–आपण सुपूर्णकाम ज्ञानि-शिरोमणि भाव-प्रिय ॥**
**ग्राहक जनगुण राम ! दोष दलन करुणायतन ॥३३६॥**

वदुनि राणि पद धरून राही । प्रेमपंकि जणुं मग्न गिरा ही ॥
स्नेहमयी वर वाणी परिसुनि । राम सासुला बहु सन्मानुनि ॥
घेति निरोपा कर युग जोडुनि । पुनः पुन्हां सर्वांना प्रणमुनि ॥
आशीर्वाद मिळे शिर नमलें । भावांसह रघुराव परतले ॥
मंजु मधुर मूर्तिस मनिं आणति । स्नेह-शिथिलता राण्या पावति ॥
धीर धरुनि मग मुलींस वाहति । माता वारंवारहि भेटति ॥
वोळविती परि परतुनि भेटति । प्रीति परस्पर अशि वाढे अति ॥
विलग करिति सखि घडिघडि विलगत । जशि नवधेनु बालवत्साप्रत ॥

**दो०–प्रेम–विवश नर नारि सब सह सखि राणिवसा हि ।**
**जणुं विदेहपुरिं येउनी करुणा-विरह कि राहि ॥३३७॥**

जानकिनें शुक मैना पाळित । कनक-पंजरीं, स्वयें सुशिक्षित ॥
व्याकुळ वदति कुठें वैदेही । श्रवुनि धीर ना त्यजि कोणाही ॥
झाले खगमृग विकल अशापरिं । कशि वदवेल कि मनुज-दशा तरि ॥
येति सबंधु तदा मिथिलापति । प्रेमपूर लोचन जल मोचति ॥
धैर्य विलोकत सीते उडलें । परम विरागी नांवच उरलें ॥
रायें जानकि हृदयीं धरली । ज्ञान–महा–मर्यादा सरली ॥

समजाविति बहु सचिव शहाणे । तदा विषाद-समय नहि, जाणे ।।
वारंवार मुली हृदिं धरल्या । सजुनि पालख्या शुभ मागवल्या ।।

**दो०–प्रेम-विवश परिवार सब बघुनि सुलग्न नरेश ।।**
**मेण्यांमधिं बसविति मुलीं स्मरुनी सिद्धि गणेश ।।३३८।।**

भूप मुलींना बहु समजाविति । नारिधर्म कुलरीती शिकविति ।।
देती दासी-दासां बहुतर । सीतेला प्रियसेवक शुचितर ।।
सीता निघत विकल पुरवासी । होति शकुन शुभ मंगल रासी ।।
भूसुर सचिव समेत समाजा । जाति बरोबर पोचवुं राजा ।।
समय जाणुनी वाद्यें वाजति । रथ गज वाजि वऱ्हाडी साजति ।।
विप्रां सब दशरथ अणवोनी । दान-मान-परिपूर्ण करोनी ।।
चरण-सरोज-रजा धरि शीसां । मुदित महीप मिळत आशीसा ।।
स्मरुनि गणेशा प्रयाण केलें । मंगल मूल शकुन बहु झाले ।।

**दो०–हर्षति वर्षति सुमन सुर करिति अप्सरा गान ।।**
**स्वपुरिं अयोध्याधिप निघति मुदित पिटून निशाण ।।३३९।।**

महाजनां नृप विनयें फिरविति । सादर सकल याचकां अणविति ।।
भूषण वसनं वाजि गज दिधले । प्रेमपुष्ट संपन्न बनवले ।।
बहुवेळां विरुदावलि भाषुनि । फिरले सकल राम हृदि राखुनि ।।
पुनः पुन्हां कोसलपति सांगति । प्रेमें जनक न परतूं पाहति ।।
नृप पुनरपि विनविति जनकांला । राजन् फिरा दूर बहु आलां ।।
तदा रथांतुनि भूप उतरले । नयनीं प्रेमपूर पाझरले ।।

तैं विदेह वदले कर जोडुनि । वचना स्नेहसुधें जणुं घोळुनि ॥
करुं तरि कशी स्तुती मी विनती । महाराज मज दिधली महती ॥

**दो०–व्याह्यां स्वजनां दशरथें दिला मान बहुरीति ॥**
**भेटि परस्पर विनय अति हृदयि न मावे प्रीति ॥३४०॥**

नमिति जनक शिर मुनि-समुदाया । आशीर्वाद देति ते राया ॥
मग सादर भेटति जामात्यां । रूप-शील-गुण-सिंधू भ्रात्यां ॥
जुळुनि रुचिर पंकेरुह पाणी । प्रेमजात जणुं वदले वाणी ॥
राम ! कशापरि करूं प्रशंसा । मुनि-महेश-मन-मानस-हंसा ॥
करिति योग योगी ज्या लागुनि । क्रोध मोह मद ममता त्यागुनि ॥
व्यापी ब्रह्म अकल अविनाशी । चिदानंद निर्गुण गुणराशी ॥
मन-वाणी आदि न ज्या जाणति । तर्कवे न सर्वहि अनुमानति ॥
नेति म्हणुनि महिमा श्रुति सांगत । जें त्रयकाळि एक रस राहत ॥

**दो०–नयन–विषय मज होइ तें जें समस्त–सुखमूल ॥**
**सकल लाभ जीवा जगीं ईश यदा अनुकूल ॥३४१॥**

दिलें सर्व परि महत्व मजला । निज जन जाणुनि केला अपला ॥
गिरा सहस्रहि शेष मिळोनी । कल्प कोटि जरि वर्णति गणोनी ॥
मम भाग्य नि अपल्या गुणगाथा । सरति न वदतां श्रुणु रघुनाथा ॥
एकचि बल मज कांहीं वदतां । अति थोडच्या स्नेहें तुम्हि रिझतां ॥
घडि घडि मागतसें कर जोडुनि । चुकुन न मन जावो पद सोडुनि ॥
परिसुनि वचा प्रेम परिपुष्ट । पूर्ण–काम रामहि परितुष्ट ॥

श्वशुरां वहु विनवुनि सन्मानति । पितृ-कौशिक-वसिष्ठ-सम जाणति॥
मग नृप भरता विनवुनि भेटुनि । प्रेमें आशिर्वादा देऊनि ॥

**दो०–भेटति लक्ष्मण–रिपुहनां मग देती आशीस ॥**
**प्रेम विवश सब परस्पर, कितिदां नमिती शीस ॥३४२॥**

करुनी कितिदां स्तुती सुविनती । रघुपति वंधूं समेत निघती ॥
जनक धरिति कौशिक-पद जाउनि । चरणरेणु शिरि नयनां लावुनि ॥
तव मुनीशवर ! दर्शनि कांहीं । मनीं प्रतीति कि दुर्लभ नाहीं ॥
जें सुख सुयश लोकपति वांछति । करतां मनोरथां परि लाजति ॥
सुलभ सुयश सुख मज तें स्वामी ! । सिद्धी तव दर्शन–अनुगामी ॥
विनवुनि पुनः पुन्हां शिर नमलें । आशीर्वच मिळतां नृप वळले ॥
डंके पिटुनी वरात चाले । सर्वहि मुदित थोर लघु झाले ॥
रामा ग्रामनारिनर पाहुनि । सुखमय होति नयन फल पावुनि ॥

**दो०–जागजागि वस्ती करित पथलोका सुख देत ॥**
**निकट अयोध्ये सुदिनि ही सुंदर वरात येत ॥३४३॥**

डंके पिटिति पणव वर वाजति । ध्वनि शंखादि वाजि गज गाजति ॥
झांजा डिंडिम मृदंग सुस्वर । वाजति सणया राग मनोहर ॥
आकर्णुन जन वरात आली । मुदित सकल पुलकांकित झालीं ॥
चारु सदनं निज सजिलीं थाटें । पुरवेशी पथ हाट चव्हाटे ॥
गल्लि सकळ अर्गजें शिंपिल्या । रांगोळ्या वर विविध विरचिल्या ॥
किति वदुं विपणि सुजाजित नाना । तोरण केतु पताक वितानां ॥

सफल पूगफल कदलि रसालां । रोपिति बकुल-कदंब-तमालां ॥
फलित सुभग तर लवले धरणीं । मणिमय आलवाल कल करणी ॥

**दो०-नानाविध मंगल कलश घरघर रचिति सजून ॥**
**ब्रह्मादिक सुर ईर्षित रघुवर-पुरी बघून ।।३४४।।**

भूप-भवन ते समयिं सुशोभित । रचना बघुन मदन मन मोहित ॥
शकुन, सुमंगल, चेतोहरपण । ऋद्धि सिद्धि सुखसंपत् शोभन ॥
जणुं उत्सव सब सहज मनोहर । जमुनि राहिले नृपघरिं तनुधर ॥
निरखावया राम-वैदेही । वदा लालसा कुणा नव्हे ही ॥
मिळुनि थव्यांनीं निघति सुवासिनि । निज छविं निंदिति मदन विलासिनि
सकल सुमंगल सजुनि आरती । गाती जणुं बहुवेषिं भारती ॥
भूप-भवनिं कलकलाट भारी । वर्णूं केविं समय, सुख सारीं ॥
कौसल्यादि राम-माता अति- । प्रेम-विवश तनुभाना विसरति ॥

**दो०-दिलीं द्विजां दानें विपुल पुजुनि गणेश पुरारि-॥**
**प्रमुदित परम दरिद्र जणुं पावुनि पदार्थ चारि॥३४५॥**

प्रेमा-प्रमोद-वश सब माता । गात्र शिथिल पद ये ना जातां ॥
रामदर्शना अति अनुरागें । जी ती औक्षण सजवूं लागे ॥
विविधा वाद्यें वाजुं लागलीं । मुदित सुमित्रें मंगल सजलीं ॥
हळद पत्रं दधि दूर्वा फूल । पान पूगफूल मंगल मूल ॥
रोह अक्षता लाजा रोचन । तुलसि-मंजरी मंजुल शोभन ॥
चित्रित कांचन-कलश सजविले । मदन-शकुनिं जणुं नीड बनविले ॥

शकुन सुगंध न जाति वर्णिले । राण्यांनीं सब मंगल सजिलें ।।
विरचित रुचिर आरत्या नाना । मुदित करिति कल मंगल गाना ।।

**दो०—कनक ताटभर कमलकरिं वस्तु घेति वरमाय——।।**
**निघति मुदित ओवाळण्या पुलक-पल्लवित काय ।।३४६।।**

धूप-धूम्रिं नभ मेचक बनलें । श्रावणि घन जणुं दाटुन भरले ।।
सुर-तरु-सुम-माळा सुर वर्षति । जणुं बलाक-अवली मन कर्षति ।।
मंजु तोरणें मणिमय निर्मित । जणूं पाकरिपु-चाप सुसज्जित ।।
सौधीं भामिनि लपती प्रगटति । चारु चपल जणुं चपला चमकति ।।
दुंदुभि-रव घन-गर्जन घोर । याचक चातक दर्दुर मोर ।।
सुर सुगंधि शुचि वर्षति वारी । सस्य सुखी सब पुर नर नारी ।।
समय बघुनि गुरूं दे आदेशा । रघुकुलमणि करि पुरीं प्रवेशा— ।।
स्मरुनि शंभु गिरिजा गणराजा । मुदित महीपति सहित समाजा ।।

**दो०—होति शकुन वर्षति सुमन देव वाद्य-गजरांत ।।**
**विबुधवधू नाचति मुदित मंगलगीतें गात ।।३४७।।**

मागध सूत बंदि नट नागर । गाति यशा त्रैलोक्य-विभाकर ।।
जय रव विमल वेद वर-वाणी । मंगलमय दश दिशिं ये कानीं ।।
विपुल वाद्य तैं वाजूं लागति । नभिं सुर नगरीं जन अनुरागति ।।
थाट वरातीचा वदवे ना । महा मोद मनिं सुख मावेना ।।
पुरवासी राया जोहारति । फार, बघुनि रामास सुखावति ।।
ओवाळिति बहु मणिगण-चीरां । वारि विलोचनिं पुलक शरीरां ।।

आरति करति मुदित पुरनारी । हर्षति बघुनि कुमरवर चारी ॥
शिविका-पडदे सुंदर सारुनि । सुखमय होती वधूंस पाहूनि ॥

**दो०-असें देत सर्वां सुख राजद्वारीं येत ॥**
**ओवाळिति माता मुदें तनयां वधूं समेत ॥३४८॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ३६ वा

करति आरती पुनः पुन्हां ही । प्रेमा प्रमोद वदवत नाहीं ॥
भूषण मणि पट नाना जाती । ओवाळति विविधा नहिं गणती ॥
वधूं सहित निरखुन सूत चारी । परमानन्द मग्न नृप-नारी ॥
सिता-राम-छवि घडिघडि बघती । मुदित, सफल जगिं जीवन गणती॥
सखि सीतामुख घडिघडि पाहुनि । गान करिति निज पुण्या वानुनि ॥
क्षणा क्षणा सुर सुमन वर्षती । गाति नाचती भेट अर्पती ।
बघुनि मनोहर जोडे चारी । शोधि शारदा उपमागारीं ॥
देतां ये ना अति लघु लागत । टकमक राही प्रेमें पाहत ॥

**दो०-निगम-नीति कुलरीति कृत अर्घ्य पायघडि देत ॥**
**ओवाळुनि सह वधूं सुत भवनीं घेउनि येत ॥३४९॥**

चार सहज सुंदर सिंहासन । जणूं मनोजें निर्मित आपण ॥
वसवुनि कुमरि कुमारां त्यांवर । प्रक्षालित पद पावन सादर ॥
धूप दीप नैवेद्य वेद-विधि । पूजित वर सवधू मंगलनिधि ॥

पुनः पुन्हां आरति ओवाळति । व्यजन चारु चामर शिरिं ढाळति ॥
वस्तु अमित ओवाळुन टाकति । मोद-मग्न माता सब शोभति ॥
परम तत्त्व जणुं पावे योगी । लभत अमृत जणुं संतत रोगी ॥
जन्मरंक जणुं परीस पावत । जणुं जन्मांध सुलोचन लाभत ॥
मूक वदनिं शारदें वसावें । जणूं शूर समरीं जय पावे ॥

**दो०-या सौख्या शत-कोटिपट मातांनां आनंद ॥**
**बंधूंसह परिणीत घरिं आले रघुकुलचंद ॥३५०रा॥**
**लोकरीति जननी करिति वरवधु संकुचतात ॥**
**पाहुन मोद विनोद अति सस्मित राम मनांत ॥३५०म॥**

करिति सुविधि सुर पितरपूजना । पुरतां सकलहि मनोवासना ॥
त्यां वंदुनि मागति वरदाना । बंधूं सहित राम-कल्याणा ॥
अंतर्हित सुर आशिस देती । मोदें माता पदरीं घेती ॥
नृप वऱ्हाडि बोलावुनि घेती । यान वसन मणि भूषण देती ॥
आज्ञा मिळे, ध्यात हृदिं रामा । मुदित जाति सब निज निजधामा ॥
पुर-नर-नारिंस अहेर दिधले । घरिं घरिं उत्सव-घोष चालले ॥
याचक जन जें जें ही मागति । प्रमुदित भूप देति तें त्यांप्रति ॥
सेवक सब वाजंत्री नाना । केले तुष्ट दान-सन्मानां ॥

**दो०-जोहारुनि आशीर्वचन देति गाति कीर्तीस ॥**
**तैं गुरु भूसूर-युत गृहीं गमन करिति नृपतीश ३५१॥**

जसें वसिष्ठ मुनी आज्ञापिति । लोक-वेद-विधि सादर साधिति ॥

राण्या भूसुरगर्दी पाहुनि । सादर उठति भाग्य अति जाणुनि
क्षालुनि चरणां स्नान घालविति । भूप पूजुनी भोजन वाढिति ॥
प्रेम–दान–आदर परिपोषित । आशिस देत जाति संतोषित ॥
बहुविध केली कौशिक–पूजा । नाथ ! धन्य मजसा ना दूजा ॥
किती प्रशंसा भूपति करिती । सपत्नीक पदरज शिरिं धरिती ॥
दिला वास वर निजगृहिं जाणुनि- । सेवूं राण्यांसह मन पाहुनि ॥
मग गुरुपद-पंकजां पूजती । प्रीति न थोडी मनीं, विनवती ॥

**दो०– वधूं समेत कुमार सब राण्यांसहित महीश ॥**
**घडि घडि वंदिति गुरुपदां देति अशीस मुनीश ॥३५२॥**

विनति करिति नृप अति अनुरागुनि । पुढतिं संपदा सब सुत ठेवुनि ॥
मुनिवर हक्क मागुनी घेती । बहुविध आशीर्वादां देती ॥
हृदयीं राखुनि सीतारामां । हर्षें गुरु गेले निजधामा ॥
विप्रवधूंना भूप आणविति । भूषण चीरें चारु देवविति ॥
सुवासिनिंस बोलावुनि घेती । भूषण वसन यथारुचि देती ॥
उचित मानकरि मागुन घेती । रुचि-अनुरूप महीपति देती ॥
प्रिय पाहुणे पूज्य जे गमले । नृपें यथोचित त्यां आदरले ॥
विवुध बघुनि रघुवीर-विवाहा । सुम वर्षुनी स्तवुनि उत्साहा ॥

**दो०–पिटुन नगारे निघति सुर निज निज पुरिं, सुखपूर्ण ॥**
**वदत परस्पर रामयश प्रेमा हृदय अपूर्ण ॥३५३॥**

सर्वपरीं सन्मानुनि सकलां । परमोत्साह भूपमनिं भरला ॥

राणीवसा तिथें मग शिरती । सह नववधू कुमारां बघती ॥
घेति मांडिवर समोद जेंव्हां । वदवे कुणा ? किती सुख तेंव्हां ॥
प्रेमें वधूंस अंकीं बसविति । घडि घडि हर्षित लाड चालविति ॥
बघुनि सोहळा मुद अंतःपुरिं । सकल-हृदयिं आनंद वास करि ॥
होई विवाह कसा नृप वदती । श्रवुनि सर्व हृदिं हर्षा भरती ॥
जनक राज गुण-सुशील महती । प्रीति रीति शोभन संपत्ती ॥
भूप भाटसे विविधा वर्णिति । करणी, राण्या प्रमुदित परिसति ॥

**दो०–स्नान स-सुत नृप करुनि गुरु, विप्र, आणविति जाति ॥**
**बहुपरिं करतां भोजना पंच घडी गत राति ॥३५४॥**

मंगल-गान करिति वर भामिनि । ही सुखमूल मनोहर यामिनि ॥
विडे सकल आचवतां पावति । स्रक् सुगंध भूषित छवि शोभति ॥
रामा निरखुन, आज्ञा घेती । शिर नमुनी जाती स्वनिकेतीं ॥
प्रेमा प्रमुद विनोद महत्ता । सुसमय समाज सुमनोहरता ॥
वर्णवे न शत वाणी-शेषां । वेद विरंचि महेश गणेशां– ॥
मग मी वर्णूं तरी कशापरि । भूमि–नाग कीं शिरीं धरा धरि ॥
नृप सर्वां देउनि बहुमाना । मृदुवचनें बोलवि राण्यांना ॥
वधू बालिका आल्या पर-घरिं । पक्ष्म लोचनां तशा जपा तरि ॥

**दो०–श्रान्त तनय निद्रावश जाउन निजवा त्यांस ॥**
**सांगुनि गत विश्राम गृहिं ध्यात रामचरणांस ॥३५५॥**

सुंदर सहज भूप वच ऐकुनि । जडित कनकमणि पलंग घालुनि ॥

सुभग सुरभि-पय-फेन-समाना । कोमल रुचिर चादरी नाना ॥
तक्के सुंदर घडे न वर्णन । स्रक् सुगंध मणि-मंदिरिं शोभन ॥
रत्नदीप अति चारु चांदवे । जाणे जो पाही, न सांगवे ॥
शेज रचुनि रुचि रामा उठविति । प्रेमानें मग पलंगिं निजविति ॥
कितिदां बंधूंनां आज्ञापित । ते मग निज निज शेजे निद्रित ॥
श्याम मंजु मृदु गात्रा बघती । प्रेमें सर्वहि माता म्हणति ॥
जातां मार्गी महाभयंकर । हत कशि बाळ ! ताडका दुर्धर ॥

**दो०–घोर निशाचर बिकट भट समरिं न गणति कुणास ।।**
**कसे स-सेना मारिले मारिच सुभुज खलांस ॥३५६॥**

धन्य ! मुनिकृपें तुमचीं सारीं । बाळ ! संकटें ईश निवारी ॥
दोघांनीं कृत मुनि-मख-रक्षण । प्राप्त गुरुकृपें विद्या तत्क्षण ॥
मुनि-वधु तरे चरणरजलागुनि । कीर्ति राहिली विश्वा व्यापुनि ॥
कमठ–पाठ–पवि–कूट–कठोर । भग्न भूपगणिं भवधनु घोर ॥
विश्व विजययश जानकि पावुनि । आलां भवना बंधु विवाहुनि ॥
अति मानुष तव कर्मे सगळीं । केवळ कौशिक–कृपेंच घडलीं ॥
आज सुफल जगिं जन्म आमचें । तात ! बघुनि विधुवदना तुमचें ॥
तुम्हां न बघतां गेले दिन जे । गणो विरंचि न जीवनिं गत ते ॥

**दो०–राम वदुनि वर नम्र वच तोषवती मातांस ॥**
**स्मरत शंभु-गुरु-विप्र-पद डोळा लागे त्यांस ॥३५७॥**

झोपेंतहि मुख फार मनोहर । सायं सोनकमल जणुं सुंदर ॥

करती जागर घरघर नारी । करिती मंगल-विनोद भारी ।।
पुरी विराजे राजे रजनी । राण्या म्हणति पहा कीं सजणी ।।
सह सुंदर वधु सासू निजती । शिरमणि जणुं उरिं फणी लपवती।।
प्रातःशुचिकाळीं प्रभु जागति । अरुण चूड वर बोलूं लागति ।।
मागध वंदि गाति गुण, भारी । ये जनगण जोहारा द्वारीं ।।
नमुनि विप्र सुर गुरु पितृ माते । आशिस मिळुनि मुदित ते भ्राते ।।
सादर जननी आनन बघती । ते सह नृपा द्वारिं मग निघती ।।

**दो०-करुनि शौच सब सहज शुचि पावन सरिता-स्नान ।।**
**नित्य कर्म कृत, पितृनिकट चौघे येति सुजाण ।।३५८।।**

## नवाह पारायण, तृतीय विश्राम.

## अध्याय ३७ वा

भूप बघुनि पुत्रां हृदिं धरती । आज्ञां मिळतां सहर्ष बसती ।।
जमे सभा पाहुनि रामासी । मानुनि नयन-लाभ-सीमासी ।।
मग मुनि वसिष्ठ कौशिक आले । शुभासनीं बसविले नृपालें ।।
पूजुनि सपुत्र पायां प्रणमति । बघुनि राम युग-गुरु अनुरागति ।।
कुल गुरु धर्मेतिहास सांगति । भूप सकल राण्यांसह ऐकति ।।
मुनि-मन-अगम्य गाधिज-करणी । मुदित वसिष्ठ विविध विध वर्णी ।।
वामदेव वदले सत्र साचें । कलित कीर्ति लोकत्रयिं सांचे ।।

आनंदित तैं होति सकल जण । प्रमुदित अति परि राम सलक्ष्मण ॥

**दो०–मुद–मंगल–नित्योत्सवीं दिन–रजनी पळताति ॥**
**अयोध्येंत आनंद–भर अधिक अधिक अधिकाऽति॥३५९॥**

सुदिन बघुनि सोडिति कलकंकण । मोद विनोद सुमंगल वाण न ॥
पाहुनि नव नव सुख, सुर ईर्षति । जन्म अयोध्यें विधिसी मागति ॥
प्रतिदिन कौशिक जाऊं पाहति । प्रेमळ राम-विनतिनें राहति ॥
दिन दिन शतगुण भूपति-भाव । वानिति बघुनि महामुनिराव ॥
आज्ञा मागत, नृप अनुरागति । पुढें उभे पुत्रांसह राहति ॥
नाथ ! संपदा अपली सारी । मी सेवक समेत सुत नारी ॥
कृपा सदा बाळांवर ठेवा । देत रहा मज दर्शन-मेवा ॥
म्हणुनि असे नृप स-पुत्र-भार्या । पडति पायिं वच ये न वदाया ॥
आशिस विविध विप्र दे निघतां । प्रीति रीति ना येई वदतां ॥
प्रेमें राम अनुज अनुसरती । पोचवुनी आज्ञेनें फिरती ॥

**दो०–रामरूप भूपति–भक्ति लग्नोत्सव आनंद ॥**
**मनि वाखाणित चालले मुदित गाधि कुलचंद ॥३६०॥**

ज्ञानी कुलगुरु वामदेव अपि । वानिति गाधिजकथेस पुनरपि ॥
मुनि यश परिसुनि राव निज मनीं । अपला पुण्यप्रभाव वर्णी ॥
आज्ञा होता पुरजन फिरले । तनयांसह नृप भवनीं शिरले ॥
राम-विवाह गाति सर्वत्र । त्रिभुवनिं पसरे सुयश पवित्र ॥
राम येति घरिं यदा विवाहुनि । पुरिं आनंद वसति सब तैंहुनि ॥

प्रभु-विवाहिं जो अति उत्साहो । वर्णुं न शकति गिरा अहिनाहो ।।
कविकुलजीवन–पावन–कारक । सिता–राम–यश मंगल–दायक ।।
जाणुनि मी अल्पचि वाखाणीं । पावन करावया निज वाणी ।

छं०–करण्यास पावन निज गिरेला रामयश तुलसी वदे ।
रघुवीर चरित अपार वारिधि पारगत कवि कोणते ।।
उपवीत लग्नोत्सव सुमंगल श्रवुनि सादर गाति जे ।।
वैदेहि-राम अनुग्रहें सुख सर्वदा लभताति ते ।।१।।

सो०–सिय–रघुवीर–विवाह जे प्रेमें ऐकति गाति ।।
तयां सदा उत्साह मंगलायतन राम–यश ।।३६१ ।

**मास पारायण, द्वादश विश्राम.**

❖ ❖ ❖

इति श्रीमद्रामचरितमानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने
प्रथमः सोपानः

**बालकाण्डं समाप्तम्**

श्री रामचंद्रार्पितमस्तु

॥ श्रीरामाय नमः ॥

# श्रीरामचरितमानस

## ( मराठी )

### अयोध्याकाण्ड



# भरत–भेट



वळें धरिति उठवुनि हृदयिं भरता कृपा–निधान ।
राम–भरत–भेटिस बघुनि सकल भुलति तनुभान ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ श्रीजानकीपतये नमः ॥

# ॥ श्रीरामचरितमानस ॥

## ( मराठी )

## ॥ द्वितीय सोपान ॥

### ( अयोध्याकाण्ड )

❖ ❖ ❖

### अध्याय १ ला

### अनुवादक-कृत मंगलाचरण

पृथ्वी :-मुमूर्षुजन-दक्षिण-श्रुतिपुटेषु नामामृतम् ।
समर्पयति यो मुदा रघुपतीश-काशीपतिः ॥
हलाहल-विभक्षको दनुजदेव-संरक्षको ।
विराग-परिवर्धको भवहरो भवः पातु माम् ॥१॥

स्रग्धरा:-यत्प्रेमाम्भोधिपारं कथमपि गमने नैव शक्तो वसिष्ठः
सुप्रेम्णा निर्जितान्तर्वचनवशमभूद्यस्य वै रामचंद्रः ॥
यस्य प्रेमातिरेकाद्रूयवशमगमद्रामसाताऽप्यरण्ये ।
भावं वक्तुं विदेहःस्वयमपि भरतं नैव शक्तो नतोऽस्मि॥२॥

## मूळ मंगलाचरण

शा०वि:-यस्यांके च विभाति भूधर-सुता देवापगा मस्तके
भाले बालविधु-र्गले च गरलं यस्योरसि व्यालराट् ॥
सोऽयं भूतिविभूषणः सुरवरः सर्वाधिपः सर्वदा ।
शर्वः सर्वगतः शिवः शशिनिभः श्रीशंकरः पातु माम् ॥३॥
वंशस्थ:- प्रसन्नतां या न गताभिषेकत
तथा न मम्ले वनवास दुःखतः ।
मुखांबुजश्री रघुनन्दनस्य मे
सदाऽस्तु सा मञ्जुलमङ्गलप्रदा ॥४॥
इद्रवज्रा:-नीलांबुज-श्यामल कोमलांगं ।
सीता-समारोपित-वामभागम् ॥
पाणौ महासायकचारुचापं ।
नमामि रामं रघुवंश-नाथम् ॥५॥
दो०-श्रीगुरु-पादाम्बुज-रजें धुउन मुकुर मन फार ॥
वर्णूं रघुवर-विमल-यश जें दायक फल चार ॥म. १॥

जैंहुनि राम विवाहुनि आले । मुद मंगल उत्सव नव चाले ॥
भुवन चारदश भूधर भारी ! । वर्षति सुकृत-मेघ सुख-वारी ॥
ऋद्धि सिद्धि संपत् शुभ सरिता । अयोध्यांबुधीं येती भरिता ॥
मणिगण सुजाति पुर नारी नर । सर्वपरीं शुचि अमोल सुंदर ॥
कांहिं न वदवे नगर-विभूती । जणुं इतकिच विरंचि कर्तूती ॥
सकल सुखें पुरजनां समस्तां । रामचंद्र मुखचंद्र निरखतां ॥
सखि-साजणिसह माता मुदिता । बघुनि मनोरथ वल्ली फलिता ॥
राम-रूप-गुण-शिला स्वभावा । वर्णुनि परिसुनी प्रमोद रावा ॥

**दो०—स्तविति महेशा प्रार्थिती सकल हृदयिं अभिलाष ॥**
**विद्यमान नृपती करो युवराजा रामास ॥१॥**

एक समयिं सह सकल समाजा । राजसभे भ्राजे रघुराजा ॥
सकल-सुकृत-मूर्ति च नरनाहो । राम—सुयश परिसुनि सूत्साहो ॥
सर्वहि नृपति कृपा अभिलाषिति । प्रीति करिति लोकप रुचि राखिति॥
त्रिभुवनिं कोणी त्रिकाळि जगतीं । भूरिभाग्य दशरथ-सम नसती ॥
मंगलमूल राम सुत ज्यानां । जें वदाल तें थोडें त्यानां ॥
सहज घेइ नृप करिं मुकुराला । वदन बघुनि सम करि मुकुटाला ॥
श्रवण-समीप बघत सित केशां । जरठपणा जणुं करि उपदेशा ॥
दे युवराज्य नृपा रामाला । घे किं जन्म-जीवन-लाभाला ॥

**दो०—हा विचार मनिं करुनि नृप सुसमय सुदिन मिळून ॥**
**प्रेमें पुलकित तनु मुदित विनवि गुरुस जाऊन ॥२॥**

श्रृणु मुनिनायक भूप म्हणाले । राम सर्वपरिं लायक झाले ।।
सेवक सचिव सकल पुरवासी । जे आम्हां अरि मित्र उदासी ।।
प्रिय मज राम तसे सर्वांप्रत । प्रभु-आशीस् जणुं तनुधर शोभत ।।
विप्र सहित परिवारा स्वामी ! । स्नेह करिति अपणां-सम नामी ।।
जे गुरुचरण-रेणु शिरिं धरिती । ते जणुं सकल विभव वशकरिती ।।
मज सम हें अनुभविति न दूजे । प्राप्त सकल पावन-रज-पूजें ।।
मनिं अभिलाष एक मम आतां । अनुग्रहें तव पुरेल नाथा ! ।।
सहज-स्नेहें प्रसन्न मुनिवर – । दिसत, म्हणति 'आज्ञा द्या' नृपवर ।।

**सो०–राजन् ! अपलें नाम यश पुरवि सकल कांक्षांस ।।**
**फल-अनुगामी महिप–मणि तव मानसिं अभिलाष।।३।।**

सर्व परीं गुरु प्रसन्न कळुनी । वदले नृप हर्षित मृदु वचनीं ।।
करणें नाथ ! राम युवराजा । वदा कृपायुत 'सजवा साजा' ।।
मी असतां उत्सव हा व्हावा । लोकीं लोचन–लाभ लुटावा ।।
शिवें प्रभु कृपें सर्व पुरविलीं । हौस, एक ही मनीं राहिली ।।
मग न शोच तनु राहो जावो । तेणें पश्चात्ताप न पावों ।।
नृप-शुभ-वच मुनि-कानीं पडलें । मंगल-मोद-मूल मनिं रुचलें ।।
श्रृणु नृप ज्यास विमुख अनुतापति । यद्भजनाविण ताप न नाशति ।।
झाला तुमचा सुत तो स्वामी । राम पुनीत-प्रेम-अनुगामी ।।

**दो०–त्वरा करा न विलंब नृप सजवा सारा साज ।।**
**सुदिन सुमंगल तेंच जें राम होति युवराज ।।४।।**

आले मंदिरिं मुदित महीपति । सेवक सुमंत्र सचिवां आणति ॥
ते जय जीव वदुनि शिर नमिती । भूप सुमंगल वचना कथिती ॥
हें मत रुचेल जर पांचांला । अभिषेकणें मुदा रामाला ॥
मंत्री ती प्रिय परिसुनि वाणी । मुदित नवांकुरिं पडे कि पाणी ।
विनति सचिव करती जोडुनि कर । जगा जगत्पति ! कोटी वत्सर ॥
जग-मंगलकर विचार हितकर । नको विलंब किं करणें सत्वर ॥
श्रवुनि मुदित नृप, सचिवसुभाषा । वाढत लते मिळे कि सुशाखा ॥

**दो०-भूप कथिति मुनिराज जी आज्ञा देतिल कांहि ॥**
**राम-राज्य-अभिषेकि ती सत्वर पूर्ण करा हि ॥५॥**

म्हणति मुनीश मुदित मृदुवाणीं । आणा सर्व तीर्थ-वर-पाणी ॥
औषधि मूल फूल फल पानें । मंगल वस्तु कथिति अभिधानें ॥
चामर चर्म वसन नाना तीं । रोम पाट पट अगणित जाती ॥
मणिगण मंगल वस्तु अनेका । ज्या जगिं योग्य भूप-अभिषेकां ॥
वेदविहित सब वदुनि विधाना । म्हणति रचा पुरिं विविध वितानां ॥
सफल रसाल पूगफल केळी । लावा पथिं नगरीं शुभ मेळीं ॥
रचा मंजुमणि चौक सुचारू । सांगा शीघ्र सजा बाजारू ॥
पूजा गणपति गुरु कुलदेवा । करा सर्वपरिं भूसुर-सेवा ॥

**दो०-ध्वज पताक तोरण कलश सजा नाग रथ वाजि ॥**
**शिरिं धरुनी मुनिवर-वचन लागति सब निज काजि ॥६॥**

जें ज्यां कथिलें मुनीश्वरांनीं । पूर्विच जणुं तें केलें त्यानीं ॥

विप्र साधु सुर पूजी राजा । रामहिता करि मंगल काजां ।।
शोभन रामाभिषेक ऐकत । उत्सव–गजर नगरि शुभ चालत ।।
सीता राम शकुन अनुभवती । सुंदर मंगल अंगें स्फुरतीं ।।
प्रेमें पुलकित वदति परस्पर । सुचविति भरतागमना प्रियकर ।।
गत किति दिन वाटे चुकलेसें । शकुनीं वाटे प्रिय भेटेसे ।।
कोण जगीं प्रिय सम भरताही । हेंच शकुन फल दुसरें नाहीं ।।
रामा निशिदिन बंधु–सुचिंता । जशि अंडांची कासवि–चित्ता ।।

**दो०–परिसुनि मंगल परम तैं हर्षित राणि निवास ।।**
**खुलत बघुनि विधु-वृद्धि जणुं वारिधि वीचि-विलास ।।७।।**

जाउनि आधि वृत्त जिंहि कथिलें । वसन भूषणें भरि लाभले ।।
प्रेमें पुलकित मनिं अनुरागति । मंगल कलश सकल सजुं लागति ।।
रांगोळ्यांस सुमित्रा बहु भरि । अति सुंदर मणिमय नाना परि ।।
रामजननि आनंद–मग्न अति । दे दानां अणवुनि विप्रांप्रति ।।
ग्रामदेवि पूजुनि सुर–नागां । म्हणे देउं पुनरपि बलिभागां ।।
जेणें होइ राम–कल्याण । दया करुनि तें द्या वरदान ।।
गाति सुमंगल कोकिल–वचना । विधुवदना मृग–शावकनयना ।।

**दो०–कळत राम--अभिषेक, मनिं नर नारी हर्षून ।।**
**लागति मंगल साज सजुं विधि अनुकूल बघून ।।८।।**

वसिष्ठांस नरपति बोलाविति । रामधामिं उपदेशा लाविति ।।
गुर्वागमन कळत रघुनाथा । द्वारिं येति पदिं नमिती माथा ।।

सादर अर्घ्य देति गृहिं आणिति । षोडशपर्चारि पूजुनि सन्मानिति ।।
सीतेसह गुरुपद मग धरले । राम कमल-कर जोडुनि वदले ।।
सेवक-सदनीं स्वामि-आगमन । मगल-मूल अमंगल-भंजन ।।
प्रभु ! बोलावुनि दासा प्रीतीं- । उचित धाडणें कार्या, नीती ।।
प्रभुता त्यजुनि नाथ परि आले । स्नेहें, आज पूत गृह झालें ।।
आज्ञा द्यावी करिन तें देवा । लाभ सेवका स्वामी-सेवा ।।

**दो०-परिसुनि मुनि सुस्निग्ध वच प्रशंसि रघुवीरास ।।**
**हंस-वंश-अवतंस ! या कां न वदां वचनास ।।९।।**

राम शील गुण स्वभाव वानुनि । वदले प्रेमें पुलकांकित मुनि ।।
भूप करिति अभिषेक-सुसाजा । तुम्हां करूं इच्छिति युवराजा ।।
राम करा सब संयम आजीं । जर निभावि विधि कुशल कि काजीं
शिकवुनि गुरु नृपभवनिं निघाले । राम असे मनिं विस्मित झाले ।।
सवें जन्मलों बंधु चारिजण । खाणे निजणें बालकेलि पण ।।
कर्णवेध उपनयन विवाहां । सर्वं बरोबर कृत उत्साहां ।।
एक विमल कुलिं अनुचित हें किति । त्यजुनि बंधु मोठ्या अभिषेकिति ।।
प्रेमें प्रभु-परिताप सुशोभन । भक्त-मनाचें हरो कुटिलपण ।।

**दो०-लक्ष्मण अवसरिं येति त्या प्रेम-मग्न सानंद ।।**
**प्रियवचनें सन्मानिती रघकुल-कैरवचंद ।।१०।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २ रा

वाजति वाद्यें विविध विधानां । पुरीं प्रमोद जाइ वदला ना ॥
सकलहि भरतागमना प्रार्थति । झट येवोत नयनफल पावति ॥
हाटिं वाटिं उपपथिं घरिं दारीं । पुरुष परस्पर वदती नारी ॥
उद्यां मुहूर्त विलंब न फार किं । पुरविल विधि अभिलाषासार किं ॥
कांचन-सिंहासनिं सह सीते । बसतां राम, किं होइ मनीं तें ॥
उजाडेल कधिं सर्वहि म्हणती । देव कुचाळी विघ्न विनवती ॥
नगरोत्सव त्यां क्षण वघवेना । चोरा चांदणि रात्र रुचेना ॥
आवाहुनि शारदे विनवती । घडि घडि धरिती पाया पडती ॥

**दो०-अमची बघुनि विपत्ति अति आई ! अस कर आज ॥**
**जाति राम राज्या त्यजुनि वनिं, होइल सुरकाज ॥११॥**

पस्तावत उभि विनंति परिसुनि । हिमनिशि झाले मी सरोजवनिं ॥
प्रार्थिति पाहुनि देव पुन्हां ते । दोष न अल्प यांत तुज माते ! ॥
विस्मय हर्ष न मूळिं रघुरावा । तुज सव रामप्रभाव ठावा ॥
सुखदुःखें, कर्में जीवां तव । जा किं अयोध्ये देव-हितास्तव ॥
धृत पद कितिदां भीड घातली ।' विबुध नीचधी ' गणुनि चालली ॥
उच्चनिवास नीच कर्तूती । शकति न पाहुं पराविं विभूती ॥
कार्य पुढिल मग आणि मानसीं । कुशल कवी विनवितील मजसी ॥
दशरथ-पुरिं ये चित्तिं सहर्षा । दुःसह दुःखद जणूं ग्रहदशा ॥

**दो०-कैकयि-दासी मंदधी नाम मंथरा जीस ।।**
**अयश-पेटि तिज करि गिरा फिरवुनि जाइ मतीस ।।१२।।**

शृंगारित पुर बघत मंथरा । मंजुल मंगल उत्सव-गजरा ।।
पुसे जनां कीं उत्सव कसला । राम-तिलक ऐकुनि उर जळला ।।
कुमति कुजाति विचारा ती करि । रात्रिच होइ अकार्य कशापरि ।।
पाहुनि पोळें किराति कुटिला । कसें मिळे कीं चिंति युक्तिला ।।
भरतजननि-पासीं उदास गत । राणी हसत म्हणे कां दुश्चित ।।
देइ न उत्तर घेइं उसासू । नारिचरित करि ढाळी आंसू ।।
राणि हसे किं लांब तव जिभली । गमे लक्ष्मणें शिक्षा दिधली ।।
तरि न वदे दासी अति पापिण । श्वास सोडि जणुं काळी सापिण ।।

**दो०-सभय पुसे कां वदसि ना ? कुशल राम महिपाल ।।**
**लक्ष्मण भरत रिपुघ्न वद तैं कुबडी-उरि जाळ ।।१३।।**

कोण करी मज शिक्षा, कां वरं । माइ ! तोंड करुं कवणबळावर ।।
कोण कुशल रामाविण आज किं । ज्या जनेश करतो युवराज किं ।।
कौसल्येला अति उजवा विधि । पाहुन राहि न गर्व मनामधि ।।
जाउन कां न बघा सब शोभा- । पाहुन मम मन पावे क्षोभा ।।
पुत्र विदेशिं तुम्हांहि न चिंता । असे नाथ वश, तुम्हीं मानितां ।।
प्रिय बहु निद्रा गाद्यां गिर्द्यीं । नेणां भूप-कपट-चातुर्या ।।
प्रिय वच, परी मलिन मन जाणत । गप्प रहा, राणी दरडावत ।।
घरफोडे ! कधि असे वदसि जर । जीभ काडविन तव ओढुनि त्वरं ।।

**दो०–कुबडे काणे पांगळे कुटिल कुचाळचि खास ।।**
**स्त्री त्यांतहि दासी म्हणत भरतजननि करि हास ।।१४।।**

प्रियवादिनि बोललें तुला जरि । स्वप्निहि नहिं मज कोप तुझ्यावरि।।
सुदिन सुमंगल, दायक तो वरं । तुझें वचन होइल जेव्हां खरं ।।
स्वामी ज्येष्ठ बंधु लघु सेवक । हा दिनकर-कुलि शोभन दंडक ।।
राम तिलक जर सत्य सकाळीं । देउं माग वाटे तें आली ! ।।
कौसल्येसम माता सर्वहि । प्रिय रामाला स्वभाव सहजहि ।।
स्नेह विशेष करिति माझ्यावर । प्रेम–परीक्षा केली म्यां वरं ।।
विधि देइल जर जन्म कृपायुत । देवो सीता सून राम सुत ।।
राम मला प्रिय प्राणांहुनि तरं । त्यांस तिलक कां क्षोभ तुला वरं ।।

**दो०–भरतशपथ तुज सत्यवद छल–कपटा टाकून ।।**
**हर्षसमयिं विस्मय करिशि हेतु टाक सांगून ।।१५।।**

सकल एकदां आशा पुरली । अतां दुजी करुनी वदुं जिभली ।।
फोडाया शिर योग्य अभागें । भलें वदत अपणां कटु लागे ।।
वनवुनि सत्य असत्या वदते । ते प्रिय अपणां मी कटु गमतें ।।
तोंड पुजेपण मीहि करीन किं । ना तरि निशिदिन मौन धरीन किं
करुनि कुरूप विधी परवश करि । उप्त उगवतें दत्त मिळे परि ।।
नृप हो कोणि अम्हां का हानी । सुटुन दासिपण होणं किं राणी ।।
योग्य जाळण्या स्वभाव अमचा । बघण्या क्षम ना तोटा तुमचा ।।
वदलों म्हणुन अल्पसें काहीं । क्षमणें देवी ! चूक महा ही ।।

**दो०–गोड गूढ कपटी वचें, स्त्री तामसमति राणि ॥**
**सुरमाया–वश, वैरिणिसि सुहृद् प्रतीती मानि ॥१६॥**

घडि घडि सादर तिला विचारित । शबरी-गानिं मृगी जणुं मोहित ॥
जेंवि भावि तेवीं मति फिरली । घाव चुके न कि दासि हर्षली ॥
पुसा तुम्हीं भय वदण्या गमतें । घरफोडी मज दिलें नाम तें ॥
प्रचिति करुनि नव कुभांड रचते । पुर–साडेसाती तैं वदते ॥
सीता राम म्हणां प्रिय राणी । रामा प्रिय तुम्हि सत्यचि वाणी ॥
असे प्रथम; ते दिवस गत अतां । मित्र होति रिपु काळ बदलतां ॥
भानु कमल–कुल–पोषण–कर्ता । होइ जलाविण त्यां संहर्ता ॥
सवत बधे करुं तव उन्मूलन । अडवा, घालुन यत्न–सुकुंपण ॥

**दो०–निश्चित चि सौभाग्य बल निजवश मानां राव ॥**
**चित्त मलिन-मुख मधुर नृप अपला उजू स्वभाव ॥१७॥**

चतुर गभीर राम-माता ही । स्वार्थ साधि जैं सुसंधि पाही ॥
आजोळीं भरतास धाडले । राम जननिमति जाणां घडलें ॥
सकल सवति मज ठीक सेविती । पतिबल-गर्वित भरतजननि ती ॥
कौसल्ये मनिं तुम्हि बहु सलतां । कपट चतुर येइ न ओळखतां ॥
प्रेम नृपाचे फार तुम्हांवरि । पाहुं न शकते सवती-मत्सरिं ॥
कपट रचुनि भूपा वश वळवी । रामाभिषेक–लग्ना ठरवी ॥
या कुळिं उचित राम-अभिषेकहि । सर्वां रुचतो मला विशेषहि ॥
बघुनि भविष्य भयें चळचळतें । देवो दैव उलट तिज फळ तें ॥

**दो०–रचुनि कथा कोटी कुटिल कपटाचा करि बोध ।।**
**सवति कथा शत सांगुनी वाढवि मनीं विरोध ।।१८।।**

येइ भाविवश मनीं प्रतीती । पुन्हां घालुनी शपथ पुसे ती ।।
काय पुसां, तुम्हि अझुनि न जाणां । कळतें निज हित अहित पशूंना ।।
गत पंध्रा दिन सजिती साज कि । तुम्हां कळे मजपासुनि आज कि ।।
राज्यि नेसणें खाणें तुमचें । सत्य सांगणें चूक न अमचें ।।
मृषा रचुनि जर सांगुं आपणां । विधि करील आम्हां कि शासना
होति राम युवराज उद्यां जर । विपद्वीज विधि पेरि तुम्हां तर ।।
वज्रलेख वदुं संशय ना तिल । झालां भामिनि माशि दुधांतिल ।।
दास्या सूनु–समेत करा जर । अन्य उपाय न, घरीं रहा तर ।।

**दो०–कद्रू विनते तुम्हां तशि कौसल्या छळि जाण ।।**
**भरत बंदिगृह सेविती लक्ष्मण राम–दिवाण ।।१९।।**

ऐकत कटु वच कैकय-तनया । कांहि न वदवे सुकली सभया ।।
घाम सुटे कदली-सम कांपत । कुब्रडी रसने दशनीं चापत ।।
कपट कहाण्या किती किति वदे । राणिस बहु समजावि धीर दे ।।
कर्म फिरे प्रिय गमे कुचाळी । स्तवी बकिस मानुनी मराळी ।।
वद मंथरे खरें वच तव तों । उजवा नेत्र नित्य मम लवतो ।।
दुःस्वप्नें प्रतिरात्रीं पडतीं । मोहें केलीं तुज न उघड तीं ।।
काय करूं मी उजू स्वभावें । सखि ! नेणें कधि उजवें डावें ।।

**दो०–माझं चालतां अझुन कृत कोणा अहित न कांहि ।।**
**कवण अघ कि मज सकृत विधि दे दुःसह दुःखांहि ।। २०।।**

पितृगृहिं गाळिन जन्म हवा तरि । सवत दास्य ना घडं मरण जरि ।।
जगवि शत्रु–वश दैव जयाला । मरण बरें जगण्याहुन त्याला ।।
राणी वदे दीन वहु वचना । करि कुवडी स्त्रीमाया-रचना ।।
असं कसं म्हणां उणें मनि मानुनि । दुणें भाग्य सुख अपणां लागुनि ।।
जी अपलें अति अहित चिंतिते । तीच घेइ फळ पदरिं अंतिं तें ।।
कुमत कानि ये हें जैं स्वामिनि । भूक न दिवसा, नीज न यामिनि ।।
कथिति ठाम पुसतां गणकांनां । भरत होति नृप सत्यचि माना ।।
वदुं भामिनि जर करां उपाया । असति तुम्हां सेवावश राया ।।

**दो०–कूपिं पडेन हि म्हणसि तर त्यजुं पति पुत्र शकेन ।।**
**वदसि दुःख मम बघुनि अति स्वहिता कसं न करेन ।।२१**

घे कुवडी कैकइ-कबुलीला । लावि उपलिं उरिं कपट सुरीला ।।
कळे न राणिस निकट घात तो । वलि-पशु भक्षी हरित घास तो ।।
श्रवणिं वचन मृदु अंतिं भयानक । घालि मधांतुनि जणुं विष घातक ।।
शुद्ध असे किं न, वदली दासी । स्वामिनि कथित कथा मजपासी ।।
भूपापासीं ठेव दोन वर । मागा निववा हृदय आज वर ।।
सुता राज्य रामा वनवासा– । द्या, घ्या सकल सवति उल्हासा ।।
भूपति राम–शपथ जैं घेईल । तैं मागा मग वचन न टळतिल ।।
होइ अकाज आज निशि सरतां । मम बच माना प्राणां-परंतां ।।

**दो०–करि कुघात पापिण म्हणे जावें कोपगृहास ।।**
**सावध साधा सर्व, नच धरा सहज विश्वास ।। २२ ।।**

प्राणप्रिय गणि कुवडिस राणी । घडि घडि महा मतिस वाखाणी ।।
तुज सम मम हित नही संसारां । जात वहात देसि आधारा ।।
जरि विधि वांछा पुरवि सकाळीं । नेत्र-पुतळि तुज करीन आली ।।
दासीला देउनि वहु आदर । कैकइ कोपभवनिं गत सादर ।।
वीज विपत् वर्षा ऋतु किंकरि । कैकइ कुमतिच वने भूमि वरि ।।
पडत कपट जळ अंकुर फुटतो । वर युगदल फल अंति दुःख तो ।।
क्रोध साज सजुनी भुविं पडली । राज्य करत कुमतिनें ठकवली ।।
धामधूम पुरिं राज-निवासीं । कांहिं कुचाळि न कळे कुणासीं ।।

**दो०-प्रमुदित पुर नर नारि सब सजिति सुमंगल सारिं ।।**
**प्रविशति कोणी निघति जन दाटी राजद्वारिं ।।२३।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ३ रा

वाल सखे परिसुनि हृदिं हर्षति । वृंद वृंद जाती रामाप्रति ।।
प्रेम पाहुनी प्रभु आदरती । क्षेम कुशल मृदुवचनें पुसती ।।
प्रिय निरोप पावुनी परततां । गाति परस्पर राम-महत्ता ।।
कोण रघुविरा-सम संसारां । शीला स्नेहा निभावणारा ।।
भ्रमूं योनि जे जे कर्मानें । तिथें अम्हां ईशें हें देणें ।।
दास अम्हीं स्वामी सीतापति । हें नांदो नाते अंताप्रति ।।
अशि अभिलाषा पुरिं सर्वां हो ! । कैकयसुता-हृदयिं अति दाहो ।।
कोण न नासे मिळुनि कुसंगति । नाहिं चतुरता उरत नीचमतिं ।।

**दो०–सांज–समयिं सानंद नृप जाती कैकयि–गेंहि ॥**
**निष्ठुरतेप्रति गमन करि जणुं कीं स्नेह सुदेहि ॥२४॥**

परिसुनि कोपभवनिं भय राया–। सुके, टाकवे पुढें न पाया ॥
ज्याच्या भुजबलिं सुरपति राहति । कल पाहुन नरपति मन राखति ॥
तो सुकला स्त्री रुष्ट परिसुनी । घ्या प्रताप कामाचा बघुनी ॥
शूल कुलिश असि अंगि झेलती । ते रतिनाथ सुमन-शरिं झुरती ॥
प्रियेपाशिं नृप सुभीत येई । बघुनि दशा दुख दारुण होई ॥
जाड जीर्ण पट भूवरि पडली । विविध भूषणें फेकुन दिधलीं ॥
गमें कुमतिला कुवेष केवीं । जणुं भावी वैधव्या सुचवी ॥
जाउनि जवळ पुसे मृदुवाणीं । रुसलिस कां प्राणप्रिय राणी ॥

**छं०–कां रोष राणी? लावतां पति पाणि ती झिड्कारिते ।**
**जाणों सरोष भुजंग–भामिनि विषम–दृष्टीं निरखिते ॥**
**युग वासना रसना दशन वर मर्म–ठाया शोधिते ।**
**तुलसी, नृपति भवितव्यता–वश काम–कौतुक मानि तें ॥१॥**

**सो०–नृपति वदति बहु वार सुमुखि सुलोचनि पिकवचनि**
**कां हा कोप अपार सांग कि गजवर–गामिनि ॥२५॥**

प्रिये अहित तव कोण करी तरि । द्विशिर कोण, यम कुणा पाशिं धरि
रंक कोण वद करूं नरेशहि । कुणा नृपा वद देउं त्रिदेशहि ॥
मारुं शकेन हि अमरा तव अरि । कोण कीट पामर मानव तरि ॥
मत्स्वभाव जाणसी वरोरू । मन तव आनन-चंदि चकोरू ॥

प्रिये प्राणसुत सर्वहि मम जें। प्रजा सपरिजन तव वश समजे ।।
वदूं कांहि कपटें जरि तुजसी। भामिनि! राम शपथ शत मजसी
विहसुनि घे इच्छित तें मागुनि। गात्रि मनोहर भूषण घालुनि ।।
वेळ अवेळ पहा तरि कांहीं। प्रिये कुवेषा त्यज लवलाहीं ।।

**दो०-परिसुनि, चितुनि शपथ अति हसुनि उठे मति हीन ।।**
**सजि भूषण बघुनी नृगा पाश जणुं भिल्लीण ।। २६।।**

मग राजा मनि सुहृदचि मानुनि। मंजु मृदु वदे प्रेमें पुलकुनि ।।
भामिनि! तूं इच्छिसि तें झालें। नगरि घरोघर उत्सव चाले ।।
उद्यां करूं रामा युवराजा। सज कि सुलोचनि! मंगल-साजा ।।
हृदय कठोर परिसुनि भंगत। पक्व केस्तुडा धक्का लागत ।।
विहसुनि लपवी अशिहि तिडिक ते। चोर नारि जशि उघड न रडते ।।
नृपा कपट–चतुराइ न कळली। कोटि-कुटिल-मणि-गुरू-पढविली ।।
जरि नरेश अनि नीति–निपुणधी। नारि चरित्र अगाध चि जलधी ।।
मग वर कपटी स्नेह वाढवुनि। विहसुनि वदे नयन-मुख मुरडनि।।

**दो०–माग माग मज म्हणां प्रिय! दिलें घेतलें कांहि ।।**
**दिधलें जे वरदान युग तेंच मिळेल कि नाहिं ।।२७।।**

कळे मर्म नृप सस्मित सांगे। रुसणें भारी प्रिय तुजला गे! ।।
मागिनली कधि ठेव कि ठेउनि?। मी स्वभाव भोळा गत विसरुनि ।।
मिथ्या दोष अम्हां ना द्यावे। दोनच कां चारहि मागावे ।।
रघुकुल रीतिस कदा खंड ना। जावो प्राणहि वचन–भंग ना ।।

नहि असत्यसम पातक-पुंजा । गिरिसम होती कोटि किं गुंजा ।।
सत्यमूल सब सुकृत शोभती । वेद पुराणिं विदित मनु वदती ।।
त्यांत रामशपथा कृत नाना । स्नेह-सुकृत-सीमा रघुराणा ।।
कुमति हसुनि वच करवुनि गाढी । कुमत कुविहग-टोपि जणुं काढी ।।

**दो०–भूप-मनोरथ सुभग वन सुख सुविहंग-समाज ।।**
**जशि भिल्लिण सोडूं बघे वचन भयंकर बाज ।।२८।।**

## मास पारायण, त्रयोदश विश्राम

❖ ❖ ❖

### अध्याय ४ था

प्राणप्रिय ! मनिं रुचे मागते । एक वरें भरतास राज्य तें ।।
जोडुनि कर वर मागे दुसरा । नाथ ! मनोरथ पूर्ण मम करा ।।
तापस वेषिं विशेष उदासी । चौदा वर्षं राम वनवासी ।।
श्रवुनि वचन मृदु शोक भूप-मनिं । विकल कोकसे शशिकर लागुनि ।।
घाबरले वच नुमटे आननिं । श्येन झडपि जणुं लाव्या काननिं ।।
ये वैवर्ण्य फार नरपाला । जणूं वीज पडतां तरु ताला ।।
मस्तकिं हात मिटुनि युग लोचन । शोक शोक करि धरुनी हो ! तन ।।
मदिय मनोरथ सुरतरु फुलला । फळत करिणिनें कीं उन्मुळला ।।
पाडि अयोध्ये उजाड कैकयि । रोवी मेढ अचल विपदामयि ।।

**दो०–घडे काय कोण्या समयिं हत नारी-विश्वासिं ।।**
**योगसिद्धिफल-समयिं जशि यतिस अविद्या नाशि ।।२९**

असे मनोमनिं भूपति कुढती । बघुनि दशा, मनिं कुमति रुष्ट ती
नसे भरत कीं पुत्र आपला । काय आणली विकत तुम्हि मला ॥
मम वच शर-सम गमे मना जर । करुन विचार न कां वदलां तर ॥
द्या उत्तर अनुकूल किं नाहीं । सत्य संध तुम्हि रघुवंशीही ॥
वदुनि देउं वर भले न देणें । त्यजुनि सत्य जगिं अपयश घेणें ॥
स्तवुनि सत्य वर देतो म्हटलें । चणे फुटाणे घेइ वाटलें ? ॥
शिवि दधीचि बलि जें जें भापति । तनु धन तजुनि वचन पण पाळति ॥
वदे कैकयी अति कटु वचना । क्षतामधें जणुं घाली लवणा ॥

**दो०– धर्म धुरंधर धीर धरि उघडी नेत्रां राव ॥**
**शिर पिटि, घे श्वासा, म्हणे मर्मि मारि असि घाव ॥३०॥**

क्रोधें जळत पुढें बहु दिसली । जणूं रोप-तरवार उपसली ॥
मूठ कुबुद्धि धार निष्ठुरता । कुबडि-सहाणेवर पाजवतां ॥
लक्षि महीप कठोर कराला । सत्य किं घेइल मम जीवाला ॥
कठिण करुनि छाती नृप वदती । वाणी सविनय तिज आवडती ॥
प्रिये ! वदसि कसं भलत्या रीतीं । भीरु ! सोडुनी प्रचिती प्रीती ॥
भरत राम दोन्ही किं ममाक्षी । सत्य सांगतो शंकर साक्षी ॥
धाडिन नक्कि उदयिं दूतांतें । ऐकत येतिल वेगें भ्राते ॥
सुदिन बघुन सब साजा सजवूं । सोत्सव भरता राज्यीं बसवूं ॥

**दो०– राज्यलोभ रामा नसे भरतीं परमा प्रीति ॥**
**करुनि विचारा ज्येष्ठ लघु अनुसरलो नृपनीति ॥३१॥**

वदे स्वभावें राम-शपथ शत । राम जननि कधि कांहि न सांगत
मी कृत तुज पुसल्याविण सगळें । म्हणुन मनोरथ धुळीस मिळले ।।
रोष सोड, कर उत्सव-साजा । अल्पचि दिवसिं भरत युवराजा ।।
एकचि गोष्ट दुःखि मज पाडित । अडचणिचा वर दुसरा याचित ।।
अझुनि आँच ती उर जाळितसे । रुष परिहासिं कि खरोखर असे ।।
त्यज रुष वद कि राम-अपराधू । सकलहि वदति राम अति साधू ।।
तूंही स्तविशी करिशी स्नेहा । तव वच उपजवि मनिं संदेहा ।।
यत्स्वभाव अनुकूलहि अरिला । तो कि करी प्रतिकूल आइला ।।

**दो०–प्रिये हास रुष सोडुनी माग करुनि सुविवेक ।।**
**तर पाहिन डोळे भरुनि भरता नृपाभिषेक ।।३२।।**

वारि विहीन मीन तरि जगती । फणि मणिविण दिन दीन कंठती ।।
वदे स्वभावें छल न मना ही । जीवन मम रामाविण नाहीं ।।
प्रिये प्रवीण करुनि वच चिंतन । रामदर्शना अधीन जीवन ।।
परिसुनि मृदुवच कुमति अति जळे । जणुं अनलामधिं घृताहुति गळे ।।
म्हणे करा कि न कोटि उपायां । इथें न लागे अपली माया ।।
द्या कि अयश घ्या म्हणून नाहीं । बहु प्रपंच न रुचे मला ही ।।
राम साधु तुम्हि साधु शहाणे । रामजननि साध्वी सब जाणें ।।
चिंति कौसिला भलें मम जसें । देइन तिज विख्यात फळ तसें ।।

**दो०–मुनिवेषें जर उदयिं ना जातिल राम वनांत ।।**
**मम मरणहि तव अयश नृप समजा होय मनांत ।।३३।।**

कुटिल वदुनि असं तडकन् उठली । रोष तरंगिणि जणुं अति फुगलीं ।।
पाप–पहाडीं प्रगट जाहली । क्रोधजळें, वघवेना भरली ।।
युग वर तट, हट धार सुघोरा । कुबडी-वाक्प्रेरणाहि भोरा ।।
उलथी भूपरूप तरु–मूला । निघे विपद्वारिधि अनुकूला ।।
कळे नरेशा कथितचि साचें । नारिमिषं शिरिं मृत्यू नाचे ।।
वसवुनि विनवी धरून चरणां । तू दिनकर–कुल–कुठार बन ना ।।
माग अतांच देउं शिर तुजला । राम–वियोगें मार न मजला ।।
रामा राखि गमे तें तुज कर । तूं ना तर उरिं जळसि जन्मभर।।

**दो०–बघुनी व्याधि असाध्य नृप पडे धरणिं पिटि माथ ।।**
**परम आर्त बोलत वचन राम राम रघुनाथ ।।३४।।**

व्याकुळ राव शिथिलता अंगां । जणुं करि करिणि कल्पतरु-भंगा ।।
कंठ सुके मुखिं येई न वाणी । जणुं पाठीन दीन विण पाणी ।।
तैं कैकइ कटु कठोर वदते । जणुं क्षतामधि विषा घालते ।।
होतें अंति असें करणें जर । वदला 'माग' वळें कवणें तर ।।
सकृत किं होति उभय भूपाला । खदखद हसत फुगविणें गालां ।।
म्हणवोनी दाता हि कृपणपण । क्षेम कुशल साधतां शूरपण ।।
मोडा वचना, धीर धरा वा । अबला सम ना शोक करावा ।।
तनु ललना सुत धरणि धाम धन । उक्त सत्यसंधा गणना तृण ।।

**दो०–श्रवुनि मर्म वच नृप म्हणे वद, न दोष तव कांहिं ।।**
**पिशाच्चसा लागून तुज काळ वदवि मम पाहिं ।।३५।।**

भरत न होउं इच्छि मुळि नृपती । विधिवश जीविं वसे तव कुमती ॥
हें मम पापाचें फळ पिकलें । म्हणुन अवेळीं दैव कि फिरलें ॥
पुन्हां स्ववश पुरि वसेल शोभन । राम सकल गुणनिधिचें शासन ॥
करितिल बंधु राम सेवा किल । राम महत्ता त्रिलोक गातिल ॥
तुझा कलंक नि पस्तावा मम । मरुन नष्ट कधिं होइ न उपशम ॥
आतां कर जे रुचें तव मना । जा येथुनि बस लपवुनि वदना ॥
विनवुं जुळुन कर, जगेन जोंवर । नको पुन्हां वदुं कांहीं तोंवर ॥
मग पस्तावसि अंति अभागी । गाय मारिसी वादी लागीं ॥

**दो०–पडे भूप बहु विनवुनी कां करिशी अवसान ॥**
**कपट–पटु न कांहीं वदे जागवि जणूं मसाण ॥३६॥**

राम राम मुखि भूप विकळ तो । जणुं विहंग विण पंख विवळतो ॥
विनविति मनिं कीं न उजाडावें । रामा कोणि न हें कळवावें ॥
रघुकुल-गुरु रवि! करा न उदया । शूळ उठेल, बघुनि, पुरि, हृदयां ॥
नृपप्रीति कैकयी–कठिणता । विधि विरचित अवधीच उभयता ॥
झाली प्रभात विलपत नृपती । द्वारिं वेणु–वीणादि वाजती ॥
पढति भाट गुण गाती गायक । श्रवुनि नृपा जणुं लागति सायक ॥
रुचति न तसे सकल मंगलगण । जशि सहगमनिं सतीस विभूषण ॥
त्या रात्रीं कुणि शयन न केलें । रामदर्शनोत्सवा भुकेले ॥

**दो०–द्वारिं दाटि सेवक सचिव म्हणति उदय पाहून ॥**
**कारण काय विशेष कीं उठले नृप न अजून ॥३७॥**

# अध्याय ५ वा

चौथे प्रहरिं रोज नृप जागति । विस्मय वाटे आज अम्हां अति ।।
जा सुमंत्र! जागवा कि जाउनि । करुं कार्या आज्ञेतें पावुनि ।।
राजभवनिं मग सुमंत्र शिरले । दिसत भयाण जात घाबरले ।।
बघत्रे ना जणुं गिळुं ये धावत । विपद-विषाद-वास जणुं भासत ।।
पुसतां उत्तर कोणि न देई । जाइ गृहीं ज्या नृप-कैकेई ।।
जय जिव वदुनि वसे शिर नमुनी । बघुनि भूपगति गेला सुकुनी ।।
शोक-विकल महिं विवर्ण पडले । कमळ समूळचि जणूं उपटलें ।।
सभय सचिव पुसुं शकत कांहिना । अशुभमयी वदली शुभहीना ।।

**दो०-रात्रि न निद्रा नृपतिला हेतु विदित जगदीश ।।**
**राम राम रटतां उदय, वदे न मर्म महीश ।।३८।।**

रामा सत्वर घेऊनि येणें । समाचार मग येउनि पुसणें ।।
बघुनि भूपकल सचिव निघाले । राणि कांहि करि कुचाळि कळलें ।।
शोक विकल पथि पडे न पाउल । सांगति रामा काय किं राउळ ।।
धीर धरुनि मग गेले द्वारीं । पुसती, पाहुन उदास, सारीं ।।
समाधान करुनी लोकांचें । जाति भवनिं रघुकुलतिलकांचे ।।
राम सुमंत्रा येता पाहुनि । आदर देति पित्यासम मानुनि ।।
निरखुनि मुख राजाज्ञा सांगुनि । जाई रघुकुल-दीपा घेउनि ।।
जाति राम सह सचिव कसेसे । जो बघतो तो विकल होतसे ।।

**दो०-जाणिं बघति रघुवंशमणि अति नृपतिचा कुसाज ।।**
**बघुनि सिंहिणिस पतित जणुं सभय वृद्ध गजराज ।।३९।।**

सुकले अधर जळत सब अंग । जणूं दीन मणिहीन भुजंग ।।
सरुष समीप दिसे कैकेई । मृत्यु घडी जणुं मोजुन घेई ।।
राम कारुणिक मृदू स्वभावें । प्रथम दृष्ट दुख कानिं न ठावें ।।
धरिति धीर जाणुनि समयाला । माते वदति मधुर वचनाला ।।
तात-दुःख-कारण वद माते । करुनि उपाय निवारूं त्यातें ।।
राम पहा हें एकच कारण । राजस्नेह तुम्हांवर पार न ।।
होते युग वर मजला दिधले । रुचले मनिं तें मी मागितले ।।
ऐकुनि करिति भूप मनिं शोचा । त्यजुं न शकति तुमच्या संकोचा ।।

**दो०- सुतस्नेह इथं वचन तिथं संकटिं पतित नरेश ।।**
**शक्य तराज्ञा धरा शिरिं कठिण निवारा क्लेश ।।४०।।**

निधडक बसुनि वचन कटु वदते । श्रवत कठिणता अति विव्हळते ।।
वचन विविध शर जीभ कमानहि । जणुं महीप मृदु लक्ष्य समानहि ।।
जणुं कठोरपण वीर-कलेवर - । धरुनि धनुर्विद्या च शिके वर ।।
सकल कथा रघुपतिला सांगे । बसुनी निष्ठुरता जणुं आंगें ।।
स्मित मनिं करुनि भानुकुल भानू । राम सहज आनंद निधानू ।।
वदले वचन विगत सब दूषण । मृदु मंजुल जणुं वाणि-विभूषण ।।
श्रुणु जननी तो सुत वहु भागी । जो पितृ-मातृ वचनिं अनुरागी ।।
तनय मातृपितृ तोषविणारा । दुर्लभ जननि ! सकल संसारा ।।

**दो०–मुनिगण–मिलन विशेषि वन मजसि परम हितकारि।**
**पित्राज्ञा स्यांतहि तुजसि जननी ! संमत भारि ।।४१।।**

राज्य मिळे प्राणप्रिय भरता। विधि अनुकूल आज मज पुरता ।।
काजि अशाहि न जाइन वनिं जर। प्रथम गणा मज मूढ जनीं तर ।।
त्यजि सुरतरु सेवी जेपाळा। त्यजुनि अमृत मागतो विषाला ।।
तेहि न चुकति संधि अशि मिळुनी। माते मनिं बघ विचार करुनी ।।
अंव एक अति दुःख मला हें। अति विव्हळ नरनायक पाहें ।।
अल्पास्तव अति दुःख पित्यातें। येइ न चित्तीं प्रतीति माते ! ।।
राव धीर गुण–उदधि अगाधू। घडे कांहिं मम महापराधू ।।
वदति न काहि राव मज जास्तव। शपथ तुजसि मम सांग किं वास्तव ।।

**दो०–सहज सरल रघुवर–वचन कुटिल मानि कुमती हि।।**
**जाइ जळू जळि वक्रगति सलिल समान जरीहि ।।४२।।**

हर्षे राणि राम–कल पाहुनि। बोले कपटी स्नेहा दावुनि ।।
तुमची शपथ नि भरत–आण कीं। हेतु न मज माहीत आणखी ।।
तुम्हि न तात अपराधा लायक। जननी-जनक-बंधु-सुखदायक ।।
राम सत्य जें कांहीं वदतां। तुम्हि पितृ-मातृ-वचन-रत असतां ।।
तनु कुरवंडि, पित्या समजावा। वार्धकिं अकीर्ति-लाभ न व्हावा ।।
दे जें सुकृत तुम्हांसम तनया। उचित न करणें अनादर तया ।।
कुमुखि दिसति शुभ वचनें कैसी। मगधिं गयादिक तीर्थें जैसीं ।।
मातृवचनं सब रामा रुचलीं। जशि सुरसरिगत सलिलं तव भलीं ।।

**दो०-गत मूर्च्छा रामा स्मरत वळले नृपति कुशीस ।।**
**रामागमन वदे सचिव करी उचित विनतीस ।।४३।।**

अवनिप परिसुनि राम पदार्पण । धरिति धीर मग उघडिति लोचन
नृपा सचिव संभाळुनि बसविति । चरणिं पडत रामा नृप निरखिति।।
स्नेह विकल लाविति हृदयाला । गत मणि फणिला जणूं मिळाला ।
नृप रामाला निरखित राहति । लोचनिं वारी प्रवाह वाहति ।।
शोक-विवश वदवे ना कांहीं । घडि घडि आलिंगिति हृदया ही।।
भूपति विनवीती विधिला मनिं । कीं रघुनाथ न जावें काननिं ।।
स्मरुनि महेशा प्रार्थिति नृपती । ऐका सदाशिवा मम विनती ।।
आशुतोष तुम्हि लहरी दाते । जाणुनि दीन हरा विपदांतें ।।

**दो०-प्रेरक तुम्हि सर्वांतरीं द्या अशि मति रामास ।।**
**त्यजुनि वचन मम राहि गृहिं त्यजि शीलस्नेहास ।।४४।।**

अपयश मिळो सुयश जगिं जावो । मिळो नर्क वा स्वर्ग न पावो ।।
दुःसह दुःख सकल मज देणें । रामा नेत्रां आड न नेणें ।।
असें चिंति मनिं राव न बोले । पिप्पल-पत्रासम मन डोले ।।
रघुपति पिया प्रेमवश पाहुनि । माता पुनरपि वदेल जाणुनि ।।
देशकाल अवसर अनुसारें । वदले वचन विनीत विचारें ।।
वदतो कांहीं करुनि धृष्टता । गणुनि बालपण क्षमणें ताता ! ।।
अति लघु काजीं दुःखी बनलां । प्रथमच कां न कळविलें मजला ।।
दशा बघुनि पुसलें मातेतें । तनु शीतल परिसुनि वार्तेतें ।।

**दो०–मंगल–समयीं स्नेहवश शोक नसावा तात ।।**
**आज्ञा द्यावी मुदित मज, प्रभु पुलकित होतात ।।४५।।**

धन्य जन्म जगतीतळिं त्याचें । प्रमुदित पिता चरित्रें ज्याचें ।।
करतळिं चारी पदार्थ त्यातें । प्राणप्रिय ताताम्बा ज्यातें ।।
जन्म सफलता आज्ञा-पालन– । करुनीं येइन द्या अनुशासन ।।
येतो मी मात्राज्ञा मागुनि । मग जाईन वना पदिं वंदुनि ।।
राम वदुनि असं करिती गमना । देति शोकवश उत्तर नृप ना ।।
वृत्त तीक्ष्ण अति नगरिं पसरले । इंगळी–विष जणुं देहीं चढलें ।।
परिसुनि विकल सकल नर नारी । वेलि विटप दव बघुनि किं भारी ।।
कळे जिथें ज्या तो शिर पिटतो । थोर विपाद धीर अति सुटतो ।।

**दो०–मुखं सुकतीं स्रवती नयन उर अपुरा शोकास ।।**
**नगरिं करुणरस-कटक करि चाल पिटुन डंकास ।।४६।।**

विधिनें असुनी मेळ विघडिला । जिथं तिथं देति शिव्य कैकइला ।।
सुचे कुमति या काय पापिणिस । घर शाकारुनि लावं अग्निस ।।
स्वकरिं नयन काढुनि बघुं बघते । सुधा त्यजुनि विष चखुं पाहते ।।
कुटिल कठोर कुवुद्धि अभागिनि । होइ आग रघुवंशवेणु-वनिं ।।
शाखे वसुनी वुंधा छाटी । सुखीं शोकथाटा बहु थाटी ।।
सदा राम हिजला प्राणां परि । कवण हेतु धरि कुटिलपणा तरि ।।
स्त्री-स्वभाव वदती कवि सत्य चि । विविधा कपट अगाध आम्य चि ।।
प्रतिबिंबहि निज करीं घेववे । परि नारी-गति कधि न जाणवे ।।

**दो०–काय न वन्हिस जाळवे राहि सागरिं न काय ॥**
**काय न करि अबला प्रबल कोणा काळ न खाय ॥४७॥**

विधी ऐकवुनि काय ऐकवी । काय दाखवुनि काय चाखवी ॥
एक म्हणति नहि नृपें कृत भलें । वर विचारविण कुमतिस दिधले ॥
होति हटें सब दुःखा भाजन । वश अबले, गत जणूं ज्ञान गुण ॥
धर्म परम जे सुज्ञ जाणती । ते दोष न भूपास लावती ॥
हरिश्चंद्र–शिबि-दधीचि–चरितें । एक दुजाला होती कथितें ॥
एक म्हणति गें भरत–संमती । उदासीन कुणि ऐकुनि असती ॥
मिटुन कान करि,चाविति रसने । एक म्हणति हें असत्य वदणें ॥
वदतां असें नास सुकृतांसी । प्राणप्रियहि राम भरतासी ॥

**दो०–स्रवेचंद्र जरि अनलकण विषसम होइ सुधा हि ॥**
**स्वप्नि न कधि करिती भरत रामाविरुद्ध कांहि ॥४८॥**

एक विधात्या देती दूषण । सुधा दाखवुनि दे विष उल्बण ॥
तंव खळळ पुरिं सशोक सर्वहि । दुसह दाह हृदिं, गत उत्साह हि ॥
कुलमान्य वृद्धा द्विज–नारी । ज्या ज्या कैकइला प्रिय भारी ॥
स्तवुनि शीला प्रबोधुं लागति । वचन बाणसम तिजला वाटति ॥
'प्रिय भरत रामासम माला' । सदा वदा नी विदित जगाला ॥
रामि हज तुम्हि करतां स्नेहा । काय गुन्हा देतां वनगेहा ॥
कधिहं न सवतीमत्सर करितां । देशा प्रीती प्रतीति विदिता ॥
कौस्या करि काय त्रिघाडा । ज्यास्तव वज्र तुम्हीं पुरिं पाडा ॥

**दो०–सीता सोडि कि पतिपदां त्यजि न कि लक्ष्मण धाम ।।**
**पुरि राज्य कि भोगिति भरत नृप कि जगति विण राम ।।४९**

या सुविचारें रोषा त्यजणें । शोक–कलंक–कोठि ना बनणें ।।
भरत अवश्य करा युवराजा । रामा कानन वत्रणे काजा ? ।।
राम नसति मुळि राज्यबुभुक्षू । धर्मधुरीण वेषयरस–रुक्षू ।।
भवनि न राम वसो गुरु गेहां । दुसरा वर मागुन घेणें हा ।।
जर मानां ना वचन आमचें । करि लागेल न कांहीं तुमचे ।।
जर असेल केला परिहास कि । प्रगट करुनि सांगावे त्यास कि ।।
राम–सदृश सुत योग्य कानना ! । श्रवुनि काय जन म्हणति आपणां ।।
शीघ्र उठा त्या करा उपाया । शोक–कलंका शक्त पुसाया ।।

**छं०–करुनी उपाय कलंक शोकां नाशि जो कुळ पाळणें ।**
**वळवा हटें वनि जात रामा गोष्ट दुसरि न काढणें।।**
**दिन भानुविण कीं प्राणविण तन चंद्रविण जशि यामिनी ।।**
**तुलसी प्रभूविण तशि अयोध्या जाणणें मनि भामिनं।।१।।**
**सो०–सखी करिति उपदेश श्रवणि मधुर परिणामि हित ।।**
**कानि न घे लवलेश कुटिल कुबडिनें प्रबोधित ।।५।।**

न वदे, भारि दिसे रुसलेली । वघे मृगिस वाघीण भुकेली ।।
व्याधि असाध्य समजुनी त्यजती । म्हणत 'मंदमति अभागि' फिरती ।।
वुडविलि दैवें राज्य करित ही । हिनें कृत तसें कुणी करि नहि ।।
विलपति यापरि पुर–नर–नारी । देति कुचालिस गालिहि भारी।।

श्वास घेति जळती विषमज्वरिं । रामाविण जीवन–आशा तरि ।।
विपुल वियोगें प्रजा विव्हळत । जणुं जलचर-गण पाणी आटत ।।
विषादास वश नर नारी अति । गत गोस्वामि राम मातेप्रति ।।
मुखें प्रसन्न मनीं सुत्साहित । गत चिंता 'नृप नाहिं न राखित'

**दो०–नव गजेंद्र रघुवीर मन राज्य अलान–समान ।।**
**सुटलें जाणुनि गमन वनिं हृदि आनंद महान ।।५१।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ६ वा

रघुकुल–तिलक जोडुनी हातां । मुदित मातृपदिं ठेविति माथा ।।
दे आशीर्वच धरि हृदयासी । ओवाळी भूषण–वसनांसी ।।
वारंवार माय मुख चुंबित । स्नेह-नीर नयनीं तनु पुलकित ।।
घे मांडीवर दे आलिंगन । झरे प्रेमरस पयोदिं शोभन ।।
प्रेमा प्रमोद नाहिं वर्णवत । रंक धनद–पदवी जणुं पावत ।।
निरखुनि सादर सुंदर वदना । वदली माय मधुर मृदु वचना ।।
वदा तात ! कुरवंडि कलेवर । कधिं शुभ मुहूर्त मुदमंगल-कर ।।
सुकृत–शील–सुख–सीमा परमा । जन्मलाभ अवधी कि निरुपमा ।।

**दो०–तो वांछिति नर नारि सब या प्रकारिं अत्यार्ति ।।**
**जशि चातक चातकि तृषित वृष्टि शारदी स्वाति। ५२।।**

पिडा टळो स्नाना कर सत्वर । गोड घास खा दोन कि रुचिकर ।।
वडिलांजवळ जाइ मग वाळा । तनु कुरवंडि उशिर वहु झाला ।।

मातृवचां ऐकुनि अनुकूलां । जणूं स्नेह–सुरतरुचे फूलां ॥
श्रीमूलां अति सुख–सुरसांना । बघुनि राम-मन-अलि भुलला ना॥
धर्म–धुरीण धर्मगति जाणुनि । सांगति माते अति मृदु बोलुनि ॥
देति तात मज काननराज्य । कार्य बहुत मम तेथें प्राज्य ॥
माते दे आज्ञा मुदिता मनिं । मग मुदमंगल जातां काननिं ॥
चुकुनि न घावरि हो स्नेहास्तव । अंब देइ आनंद कृपा तव ॥

**दो०–वर्ष चार दश वसुनि वनिं पाळुनि पितृवचनास ॥**
**येइन पाहिन पाय मीं म्लान करी न मनास ॥५३॥**

रघुवर-वचनें मधुर विनम्रहि । सलति मातृहृदिं जशि बाणाग्रहि॥
सुके घावरुनि वचनें शीतल । पडत यवासिं जसें वर्षाजल ॥
वदवेना मुळिं हृदय-विषादा । श्रवुनि मृगी जणुं केसरि-नादा ॥
सजल नयन तन थरथर कापे । खाउनि गढुळि मीन जणुं धापे ॥
धीर धरुनि सुत मुखा न्यहाळी । माता गद्गद-कंठ म्हणाली ॥
प्राणप्रिय तूं बाळ ! पित्या तंव । मुदित नित्य पाहुनि चरितां तव॥
राज्य अर्पण्या शुभ दिन काढिति । वनिं कोण्या अपराधें धाडिति ॥
सांग वासरा ! मजसि निदानू । कोण भानुकुळिं होइ कृशानू ॥

**दो०–बघुनि रामकल सचिवसुत कारण सब समजावि ॥**
**ऐकुनि राही मूकशी कशी दशा वर्णावि ।५४॥**

जा म्हणवे ना राखुं न शकते । दारुण दाहिं उभयपरिं जळते ॥
लिहित चंद्र राहू लिहिला ही । विधि गति वाम सदा सकलां ही॥

धर्मस्नेह घेति घेरुनि मति । झाली साप चिचुंदरिची गति ॥
राखिन पुत्र करुनि जर आग्रह । धर्महानि नी बंधू विग्रह ॥
म्हणू वनीं जा तरि अति हानी । संकट–चिंता–व्याकुळ राणी ॥
स्त्री–धर्मा समजुनी शहाणी । राम भरत सुत-युग सम मानी ॥
राममाय ती स्वभाव–सरला । वदे धरुनि भारी धीराला ॥
धन्य बाळ! करिशी कीं इष्ट चि । सर्वधर्मिं पित्राज्ञा श्रेष्ठ चि ॥

**दो०–राज्य देउं वदुनी दिलें वन, मज दुःख न लेश ॥**
**तुजविण भरत-नृपां प्रजे दुःसह होती क्लेश ॥५५॥**

जर केवळ पित्राज्ञा ताता । जा न, जाणुनी श्रेष्ठा माता ॥
मायबाप जर कथिती जावें । वन किं अयोध्याशत समजावें ॥
बाप माय वनदेव नि देवी ।.खग मृग चरणसरोरुह–सेवी ॥
नृपां उचित वनवासहि अंतीं । विलोकुनी वय वाटे खंती ॥
बहुभागी वन अभागिणि पुरी । रघुकुळ-टिळका त्यजा जिस पुरी ॥
न्या मजला संगें सुत ! म्हणु जर । हृदिं संदेह होइ तुमच्या तर ॥
पुत्र ! परम तुम्हि प्रिय सर्वांचे । प्राणां प्राणहि जीव जिवांचे ॥
ते तुम्हि म्हणां जाउं माते वनिं । श्रवुनि, बसुनि मी पस्तावे मनिं ॥

**दो०–या विचारिं करितें न हट मिथ्या स्नेह धरून ॥**
**मान मातृनातें, मला जाउं नको विसरून ॥५६॥**

गोस्वामी तव देव–पितर–गण । पक्ष्म नयन इव करोत रक्षण ॥
जल अवधी प्रिय परिजन मीन । तुम्हि करुणाकर धर्म–धुरीण ॥

जाणुनि हें त्या करा उपाया । जितां सकल याल कि भेटाया ।।
लिंबलोण करुं, सुखें कि जा वनि । जन परिजन पुर अनाथ वनवुनि
आज सुकृतफल सकलांचे गत । झाला काल कराल चि विपरित ।।
विविधा विलपुनि चिकटे चरणां । परम अभागिनि मानि आपणां ।।
भरे दाह हृदिं दुःसह दारुण । विपुल विलाप न करवे वर्णन ।।
उठवुनि राम हृदयिं तिज धरती । मृदु वचनें व्रहु सांत्वन करिती ।।

**दो०–वृत्त परिसुनी ते समयिं सीता विकल उठून ।।**
**गता, सासुपदकमलिं शिर, नमुनि बसे, वंदून ।।५७।।**

सासू मृदु आशीर्वच वदली । 'अति सुकुमारी' बघुनि विकळली
सीता विनतमुखी चिंता मनिं । पतिप्रेम सुपुनीत रूपखनि ।।
जीवननाथ जाउं वनिं वघती । कोण बरोबर जाइल सुकृती ? ।।
प्राण सतनु कीं प्राण एकले । विधि कर्तृत्व न कांहिं आकळे ।।
चारु चरणनखिं धरणी उकरित । नूपुर-मुखर मधुर कवि वर्णित ।।
जणूं प्रेमवश विनती करिती । सीतापद आम्हां ना त्यजिती ।।
मंजुल लोचनिं अश्रु ढाळते । वघुनि माय रामास सांगते ।।
वाळ ! सिता वघ अति सुकुमारी । सासु–सासरा–परिजन प्यारी ।।

**दो०–पिता जनक भूपाल मणि श्वशुर भानुकुल–भानु ।**
**पति रविकुल-कैरव विपिन-विधु गुण-रूप-निधानु ।।५८।।**

पुत्र–वधू प्रिय मला लाभली । रूपराशि गुण–शील–आगळी ।।
नयनपुतळिशी प्रीति वाढवुनि । प्राण ठेवुं जानकिवर लावुनि ।।

कल्पवेलि सम विविधा लालन- । केलें स्नेहजलें प्रतिपालन ॥
विर्धा वाम जंव फुलते फळते । काय होय परिणाम न कळतें ॥
अंक पलंग पीठ झोपाळा । त्यजुन कठिण भुविं दे न पदाला ॥
जिवनमुळीसम जपत राहतें । 'दीपवात सार' हि ना कथितें ॥
ती सिय जाउं बघत वनिं साथ । आज्ञा काय असे रघुनाथ ! ॥
चंद्र किरण रस-रसिक चकोरी । कशि निज नयनी निरखि तमोरी ॥

**दो०-करि केसरि निशिचर चरति दुष्ट जंतु वनिं भूरि ॥**
**विष वाटिकें खुले कि सुत शुभ संजीवनि सूरि ॥५९॥**

भिल्ल कोळि-कन्याच कानना । रचि विरंचि सुख विषयिं विदित ना
उपल-जंतुशा स्वभावकठिना । तयां क्लेश वनिं वाटे कधिं ना ॥
तापस वनिता वा वन-योग्या । तपासाठिं ज्या त्यजिती भोग्यां ॥
केविं वसेल तात ! वनिं सीता । चित्रलिखित कपि बघुनिहि भीता ॥
सुरसर सुभग-वनज-वन-चारी । डबक्या जोगि कि हंसकुमारी ॥
हें मनिं घेउनि, आज्ञा जैसी । जानकीस मी शिकविन तैसी ॥
सिता राहि गृहिं वदली अंबा । तर मज देइल बहु अवलंबा ॥
या जणुं शील स्नेह-सुधाखनि । मातृवचां प्रिय रघुविर परिसुनि ॥

**दो०-वदुनि विवेकी प्रिय वचन करिति मातृ-परितोष ॥**
**बोधुं लागले जानकिसि प्रगटुनि वन-गुण-दोष ॥६०॥**

## मास पारायण, चतुर्दश विश्राम

❖ ❖ ❖

# अध्याय ७ वा

वदण्या माते समोर लाजति । साजे समया समजुनि बोलति ।।
राजकुमारि सांगुं ऐकावें । भलतें कांहीं मनी न घ्यावें ।।
तुमच्या मम कुशला इच्छा जर । अमचें वचनें गृहीं रहा तर ।।
मम आज्ञा सासूशुश्रूषण । अवघें भामिनि भवनिं भलेपण ।।
याहुनि धर्म अधिक ना दूजा । सादर – सासु – सासरा – पूजा ।।
जैं जैं स्मृति मम ये मातेला । प्रेम विकल होई भ्रम मतिला ।।
तैं सांगुनि तुम्हि कथा पुराणी । सुंदरि ! समजावा मृदुवाणीं ।।
वदतो सहज शपथ शत मजला । सुमुखि राखुं मातेस्तव तुजला ।।

**दो०–श्रुति–गुरु–संमत–धर्मफल मिळे विनाही क्लेश ।।**
**हट्टें बहु संकट सहति गालव नहुष नरेश ।।६१।।**

मी लवकर पाळुनि पितृवाणीं । येइन सुमुखी ऐक शहाणी ।।
वेळ न लागे दिवसां जाया । श्रुणु सुंदरि अमचे वचना या ।।
प्रेमें हट्ट कराल कि वामे । तर पावाल दुःख परिणामें ।।
कानन कठिण भयंकर भारी । घोर घर्म हिम वारा वारी ।।
कुश कंटक कंकर पथि नाना । चालणें हि अनवाणी जाणा ।।
तुमचे चरण कमल मृदु सुंदर । मार्ग अगम्य महीधर दुर्धर ।।
दऱ्या गुहा नद नद्या नि निर्झर । दुर्गम अगाध बघणें दुष्कर ।।
व्याघ्र भल्ल वृक–करी–केसरी । गर्जनिं नुरते धैर्य अंतरीं ।।

**दो०–भूमि शयन, वल्कल वसन, अशन कंद फल मूल ।।**
**तीं किं सदा प्रति दिन मिळति सर्व समयिं अनुकूल ।।६२।।**

निशिचर मनुजाहारि विचरती । कपटवेष नानाविध करती ।।
लागे डोंगरिचें अति पाणी । विपिन-विपत्ति न वदवत वाणी ।।
व्याल कराल विहग वन घोर हि । निशिचर-निकर नारि-नर चोर हि
डरति धीर गहना स्मरतां मनिं । तुम्हीं स्वभाव भीरु मृगलोचनि ।।
हंस गमनि ! तुम्हि वना योग्य ना । श्रवुनि देति मज जन अपयश ना ।।
मानस सलिल सुधें प्रतिपालित । जगे मराली कीं लवणाब्धित ।।
नवरसाल–वनिं विहरणशीला । शोभे का रवि-विपिनिं कोकिळा ।।
रहा भवनिं या करुनि विचारा । चंद्रवदनि वन दुःख पसारा ।।

**दो०–सहज सुहृद गुरु धनी वच जे न शिरीं धरतात ।।**
**ते पस्तावति पोटभर कधिं न टळे हितघात ।।६३।।**

पतिवच मृदुल मनोहर ऐकुन । सजल ललित सीतेचे लोचन ।।
दाहति शीतल वचनें तीला । शरदचद निशि जशि कोकीला ।।
वदवे ना विव्हळ वैदेही । स्वामी शुचि तजुं बघती स्नेही ।।
वारि विलोचनिं बळेंचि वारी । धीर धरुनि उरिं अवनिकुमारी ।।
नमुनि सासुपदिं करयुग जोडी । क्षमा देवि ! अति अविनय खोडी।।
मला प्राणपति तें उपदेशित । ज्यामधिं माझें होइ परमहित ।।
करुनि विचारां गमे मम मना । पतिवियोगसम विश्वि दुःख ना ।।

**दो०–प्राणनाथ करुणायतन सुंदर सुखद सुजाण ।।**
**तुम्हि रघुकुल कुमुदेंदुविण सुरपुर नर्क-समान ।।६४।।**

माता पिता स्वसा प्रिय बंधू। प्रिय परिवार सुहृद संबंधू ।।
सासु सासरा गुरु सहकारी। सुत सुंदर सुशील सुखकारी ।।
नाथ! पतिविना स्नेह नि नातें। तापद तरणिहुनी स्त्रीला तें ।।
तन धन धाम धरणि नृप सत्ता। पतिविण सर्वचि शोक इयत्ता ।।
भोग रोगसम भूषण भारहि। यम–यातना सदृश संसारहि ।।
प्राणनाथ! अपणांविण जगतीं। कोणि सुखद कांहीं मज नसती ।।
देह जिवाविण जलविण सरिता। नाथ! तशिच पुरुषाविण वनिता ।।
प्रभु! सुख सकल तुम्हांसह असतां। शरद विमल विधु-वदन निरखतां ।।

**दो०–खग मृग परिजन, नगर वन, वल्कल विमल दुकूल ।।**
**नाथ साथ सुरसदन–सम पर्णकुटी सुखमूल ।।६५।।**

वन-सुर-देवि उदार सदा अति। सासु–सासऱ्यांसम सांभाळति ।।
कुश किसलय मय शय्या सुंदर। प्रभुसह मदन शयन सम सुखकर ।।
कंद मूल फल अमृत सुभोजन। अवध-सौध शत सम पर्वतगण ।।
प्रभु-पद-पद्मां पळ पळ पाहिन। जशि कोकी प्रमुदित दिनिं राहिन ।।
नाथ! कथित बहु वन दुःखानां। बहु भय विषाद परितापानां ।।
तीं प्रभु–वियोग–लेशासम नहि। होति कृपानिधि सर्व मिळूनहि ।।
हें जाणुनी सुजाण–शिरोमणि। टाकुं नका मजला न्या हो! वनिं ।।
काय करूं बहु विनती स्वामी। करुणामय हृदयान्तर्यामी ।।

**दो०–ठेवा पुरिं जर अवधि वरि राहति वाटे प्राण ।।**
**दीन बंधु सुंदर सुखद शीलस्नेह निधान ।।६६।।**

हार न खाइन मार्गीं चालत । घडि घडि चरण-सरोजां पाहत ।।
सर्वपरीं प्रियदास्य करीन हि । सगळे श्रम पथजनित हरीनहि ।।
प्रक्षाळिन पद तरुतळि बसुनी । घालिन वारा मुदित होउनी ।।
श्यामल देहीं श्रमकण दिसतां । क्लेश कुठें प्रिय पतिस निरखतां ।।
सम महिवरि तृण पल्लव घालिल । पाय रात्रभर दासी दाबिल ।।
वारंवार मूर्ति मृदु बघतां । लागेना मज वात-तप्तता ।।
प्रभुसंगें मज पाहि कुणि कसा । सिंह-वधूला क्रोष्टु शश जसा ।।
मी सुकुमारि नाथ वन जोगे । तुम्हां उचित तप मज सुख भोगें ।।

**दो०-श्रवुनि वचन असं कठिण जर उर न भग्न मम होत ।।**
**प्रभु वियोग-दुःखा विषम प्राण नीच साहोत ।।६७।।**

वदुनि विकल अति सीता झाली । वचन-वियोग न साहूं शकली ।।
रघुपति जाणति बघुनि दशा कीं । हटें ठेवितां प्राण न राखी ।।
वदति कृपालु भानुकुल नाथ किं । सोडुनि शोक चला वनि साथ किं ।।
नव्हें विषादा वेळ आजची । शीघ्र तयारि करा गमनाची ।।
प्रिय भाषणें प्रिये समजावति । माते नमती आशिस् पावति ।।
प्रजादुःख हर ये हो ! सत्वर । निष्ठुर आइस विसरुं नको वरं ।।
विधे ! दशा मम पुन्हां टळे का । नयन मनोहर युगल दिसे का ।।
बाळ ! सुवेळ सुदिन कैं येइल । जननि जिवंत वदन विधु पाहिल ।।

**दो०-पुन्हां वदुनि हे वत्स ! बा ! रघुपति रघुवर लाल ! ।।**
**बाहुनि कैं हृदि धरुनि, तनु हर्षें निरखिन बाळ ।।६८।।**

स्नेह-सभीत बघुनि निज आई। विव्हळ भारी वचन न येई ।।
प्रबाधिती तिज राम परोपरि। स्नेह समयिंचा वर्णवेल तरि ? ।।
मग जानकि धरि सासुपदांतें। पहा अभागि परम मी माते ।।
सेवा समयिं दैव वनिं धाडि। करुनी भग्न मनोरथगाडी ।।
त्यजा क्षोभ परि कृपा त्यजा ना। कर्म कठिण मम दोष जरा ना ।।
सासू व्याकुळ ऐकुनि वचनां। दशा कशापरिं वदवे वदना ।।
वारंवार हृदयिं तिज घेई। धैर्यें शिकवण आशिस देई ।।
सदा अचल सौभाग्य असो तव। गंगा–यमुना–जल वाहे जंव ।।

**दो०–सीते आशीर्वाद दे शिकवण सासू फार ।।**
**निघे नमुनि पदपद्मिं शिर प्रेमें अति बहुवार ।।६९।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ८ वा

समाचार जैं लक्ष्मण पावति। उठुनि विकल,मुख उदास धावति।।
तनु सकंप पुलकित जल नयनां। प्रेमाऽधीर धरति अति चरणां ।।
तिष्ठति बघत, न वदवे काहीं। मीन दीन जणुं बाह्य जला हीं ।।
काय होय विधि ! संचित झालें। सकल सुकृत सुख अमचें पळलें ।।
मला काय रघुनाथ सांगतिल। ठेविति भवनिं किं वनिं ये म्हणतिल
राम बघति बंधुस कर जोडुनि। उभा, देह–घर–काडी मोडुनि ।।
वदले वचन राम नयनागर। शील–स्नेहार्जव–सुख–सागर ।।
प्रेमें बाळ ! न कातर होई। परिणामीं मुद समजुनि हृदईं ।।

**दो०–माय–बाप–गुरु–धनी–वच सहज मान्य करतात ।।**
**जन्मलाभ ते लुटिति जगिं व्यर्थ न तर जगतात ।।७०।।**

जाणुनि बंधु ! वचन ऐकावें । माता–तात–पदां सेवावे ।।
भवनिं भरत रिपुसूदन नाहीं । राव वृद्ध मम दुःख मना ही ।।
घेउनि गेलो तुम्हांस वनिं जर । होइ अयोध्या अनाथ अति तर ।।
गुरु पितरौ परिजन परिवारा । गांजिल दुःसह दुःखपसारा ।।
रहा करा सकलां परितोष हि । ना तर तात घडे बहु दोषहि ।।
जिथें प्रजा प्रिय दुःखी भारी । तो नृप खचित निरय–अधिकारी ।।
रहा तात या नीति–विचारीं । ऐकत लक्ष्मण विव्हळ भारी ।।
सुकवी शीतल वचन तयाला । तुहिनपात कीं तामरसाला ।।

**दो०–उत्तर ये ना प्रेमवश व्याकुळ धरले पाय ।।**
**नाथ ! दास मी स्वामि तुम्हि त्यजता काय उपाय ।७१।।**

मज गोस्वामि ! दिली शुभ शिकवण । कातरतें मम गमे कठिण पण ।।
नरवर धीर धर्मधुर–धारी । निगम–नीतिचे ते अधिकारी ।।
प्रभूस्नेहिं शिशु मी प्रतिपालित । मंदर मेरु कि मराल उचलित ।।
गुरु पितृमाय न कुणि मज ठावे । नाथ ! विश्वसा, वदें स्वभावें ।।
जगिं जितकीं स्नेहादिक नातीं । प्रीती प्रचिती श्रुति निज गाती ।।
सर्व एक तुम्हि मजला स्वामी ! । दीनबंधु हृदयांतर्यामी ।।
धर्म नीति शिकवणें तयाला । कीर्ति भूति सुगती प्रिय ज्याला ।।
मनतनवचनें पदिं रत झाला । कृपा सिंधु कीं त्यजणें त्याला ।।

**दो०–करुणासिंधु सुबंधु–वच परिसुनि मृदुल विनीत ।।**
**प्रभु समजाविति धरुनि हृदिं बघुनी स्नेह-सुभीत ।।७२।।**

घ्यावा जननी निरोप जाउनि । चला बंधु ! वनिं वेगें येउनि ।।
मुदित परिसुनी रघुवर–वाणी । झाला लाभ महा गत हानी ।।
आले जननिकडे हर्षित–मन । अंध पुन्हां पावे जणुं लोचन ।।
जाउनि नत शिर जननि–पदांसी । मन रघुनंदन–जानकि पाशीं ।।
माता, बघुनि उदास, विचारी । लक्ष्मण कथा निवेदिति सारी ।।
घाबरली वच कठोर परिसुनि । मृगी जणू दव चहुदिशि निरखुनि ।।
लक्ष्मण लक्षिति घडे अनर्थ हि । स्नेहविवश ही अकार्य करिल हि ।।
आज्ञा घण्या सभय धजति ना । जा वनि सवें म्हणे कि म्हणे 'ना' ।।

**दो०–स्मरुनि सुमित्रा राम सिता-रूप-सुशील-सुभाव ।।**
**नृपस्नेह, मस्तक पिटी पापिण साधी डाव ।।७३।।**

कुसमय जाणुनि धैर्या धरते । सहज सुहृद मृदु वचना वदते ।।
बाळ ! तुझी माता वैदेही । पिता राम सर्वस्त्रीं स्नेही ।।
अवध तिथें जिथं राम–निवास । तिथें दिवस जिथं रवि–प्रकाश ।।
सिता राम जर जाति वना ही । अयोध्येंत तव काम च नाहीं ।।
गुरु पितरी स्वामी सुर बांधव । प्राणांसम सव सेव्यचि वास्तव ।।
जीवन जीवा प्राणां प्रिय ही । सकल–सखा निस्वार्थि रामही ।।
पूजनीय जे प्रिय अति जितके । मान्य राम–नात्याने तितके ।।
हे जाणुनि वनिं संगें जा हो ! । घेइ बाळ जगिं जीवन–लाहो ।।

**दो०—भूरि-भाग्य-भाजन बनसि मज सह, टळो पिडाहि ॥**
**कीं तव मन करि रामपदि ठाव छलादि विनाहि ॥७४॥**

पुत्रवती युवती जगिं तीच किं । रघुपति भक्त जिचा सुत होत किं॥
न तरि वांझ वरि विते वृथा ते । रामविमुख सुत मानि हितातें ॥
राम जाति वनिं तुमचें भाग्य हि । ताता ! काहीं कारण नान्य हि ॥
सकल-सुकृत-फल हेंच महान हि । स्नेह राम सीतापदिं सहज हि ॥
लोभ—मोह -मद—ईर्षा—रोषां । स्वप्निंहि होउं नका वश दोषां ॥
दूर सर्वपरि विकार ठेवा । मन तन वचनीं करणें सेवा ॥
तुम्हां सुलभ वनिं सकलाराम । माय—बाप सह सीताराम ॥
राम वनीं पावति ना क्लेशहि । सुत तें करणें हा उपदेशहि ॥

**छं०—उपदेश हा कि तुम्हांमुळें सुख राम सीता पावती ।**
**प्रिय मातृ पितृ परिवार पुर—सुख याद कानंनि विसरती ॥**
**तुलसी प्रभुंसि उपदेश आज्ञा देइ आशीर्वाद हा—।**
**रति नित्य अविरल अमल सियरघुवीरपदिं हो नव महा ॥१॥**

**सो०—मातृचरणिं वंदून निघति शीघ्र साशंक मनि ॥**
**वागुर दृढ तोडून जणूं पळे मृग भाग्यवश । ७५॥**

जानकिनाथ तिथें गत लक्ष्मण । प्रिय संगतिनें होति मुदित-मन ॥
राम सितापद सुंदर नमले । तयां सवें नृपमंदिरिं वळले ॥
वदति परस्पर पुर—नर—नारी । विधि हरि जुळवुनि सुयोग भारी ॥
कृश तनु दुःखी उदास वदनें । जणूं विकल माशा मध—हरणें ॥

कर चोळिति शिर पिटती रडती । जणुं विण पंख विहग विव्हळती ॥
खूपच गर्दी राजद्वारीं । वर्णवे न तो विषाद भारी ॥
वसविति भूपा सचिव उठवुनी । आले राम असें प्रिय वदुनी ॥
सीतेसह युग तनय निरखले । व्याकुळ भारि भूमिपति वनले ॥

**दो०–सीतेसह सुत सुभग युग बघ बघुनी व्याकूळ ॥**
**स्नेह–विवश बहु वार त्यां हृदयिं धरिति राऊळ ॥७६॥**

बोलुं न शकवे नृप विव्हळती । शोकजनित दाहें हृदिं जळती ॥
अति अनुरागें पदिं शिर नमती । आज्ञा रघुविर उठुनि मागती ॥
तात आशिषा आज्ञा दीजे । हर्ष-समयिं कां विषाद कीजे ॥
प्रिय-प्रेमवश घडे प्रमादू । तैं यशनाश जगीं अपवादू ॥
स्नेहें, श्रवुनि उठुनि, नरनाहू । वसविति धरुनी रघुपति-बाहू ॥
ऐका तात ! तुम्हां मुनि म्हणती । राम चराचरनायक असती ॥
शुभ वा अशुभ कर्म–अनुसारें । ईश देइ फल हृदय–विचारें ॥
कर्म करी जो त्या फळं मिळती । निगम-नीति अशि सगळे वदती ॥

**दो०–कोणि एक अपराध करि भोगी दुजा फळास ॥**
**अति विचित्र भगवंत–गति जगीं कळे कोणास ॥७७॥**

घरिं रामा राखाया राया । त्यजुनी छल बहु करी उपायां ॥
नाहिं रहात, रामकल जाणे । धर्म--धुरंधर धीर शहाणे ॥
मग नृप सीते हृदयीं घेई । प्रेमें बहु उपदेशा देई ॥
बहु वन–दुःखें दुःसह सांगति । सासु–सासरा–पितृसुख वानति ॥

रामचरणिं अनुरक्त सितामन । शुभ न गमे गृह विषम न कानन
इतर सकल सीते समजाविति । विपिन-विपत्ती विशेष वानिति ॥
सचिव-नारि गुरुनारि शहाणी । स्नेहानें सांगति मृदुवाणीं ॥
वनगमनाज्ञा तुम्हांस तों ना । श्वशुर–सासु-गुरु-वचना माना ॥

**दो०–शिकवण शीतल मधुर मृदु हित, न रुचे सीतेस ॥**
**शरच्चंद्र–कर लागतां जणुं कोकीला क्लेश ॥७८॥**

सिता न दे संकोचें उत्तर । रुष्ट उठे तैं कैकई सत्वर ॥
मुनिपट–भूषण–भाजन आणी । ठेउनि पुढें वदे मृदुवाणीं ॥
नृपा प्राण–प्रिय तुम्हि रघुवीरू । शील स्नेह न सोडिति भीरू ॥
सुकृत सुयश परलोक हि भंगति । तुम्हां न तरि वनिं जा कधिं सांगति
करा विचारें रुचे तुम्हां तें । जननी–वचनें सुख रामातें ॥
भूपा वचन बाण सम लागे । प्राण निघून न जाति अभागे ॥
लोक विकल मूर्छित नरराणा । करणें काय सुचे कोणा ना ॥
त्वरित राम मुनिवेषा करुनी । निघति जनक जननिस शिरनमुनी ॥

**दो०–वनिता बंधु समेत वन साज सजुनि सामान ॥**
**नमुनि विप्र गुरुपदां प्रभु निघति हरुनि जनभान ॥७९॥**

निघुनि वसिष्ठद्वारिं थांबलें । लोक विरह दव-दग्ध पाहिले ॥
प्रिय वचनीं सकलां समजाविति । विप्रगणां रघुवीर आणविति ॥
गुरुकरिं वर्षासनें देवविति । आदर-दान-विनय-वश वळविति ॥
याचक दान–मान–संतोषित । प्रेमें पूत मित्र परितोषित ॥

दासि दास बोलावुनि नंतर । सोंपुनि गुरुसि वदति जोडुनि कर ।।
गोस्वामी ! सकलां सांभाळा । प्रेमें जनक-जननि-सम पाळा ।।
वारंवार जुळुनि युग पाणी । सर्वां राम वदति मृदु वाणीं ।।
सर्वपरीं ते मम हितकारी । जे भूपा देती सुख भारी ।।

**दो०–मम विरहें माता सकल होति न दुःखें दीन ।।**
**तोचि उपाय करा सकल पुरजन महा प्रवीण ।।८०।।**

असें राम सकलां समजाविति । गुरु-पद-पद्मिं हर्पि शिर नमविति
प्रार्थुनि गणपति–गौरि–गिरीशां । निघति रघुपति मिळत आशिषां ।।
राम निघत अति विषाद झाला । आर्त-नाद दुःसह कानांला ।।
कुशकुन लंकें, पुरिं अतिशोकहि । हर्ष–विषाद–विवश सुरलोकहि ।।
मूर्छा विगत नृपति मग जागति । सुमंत्रास बोलावुनि सांगति ।।
जाति राम वनिं प्राण न जाती । तनुमधिं कोण्या सुखा रहाती ।।
व्यथा बलवती याहुन कोणति । प्राण तनुस ज्या दुःखें सोडति ।।
धीर धरुनि मग वदले नरपति । सखे ! सरथ जा सवें शीघ्र अति ।।

**दो०–अति सुकुमार कुमार युग जनक सुता सुकुमार ।।**
**रथिं बसवुनि वन दावुनी आणा वासरिं चार ।।८१।।**

धीर बंधु युग जर ना परतति । सत्यसंध रघुराज दृढव्रति ।।
सांगा कर जोडुन मम विनतिसि । प्रभु धाडा मिथिलेश किशोरिसि ।।
सीता भीत यदा वन बघतां । सांगा निरोप अवसर मिळतां ।।
श्वशुर सासु संदेश कि धाडति । मुली परत ये क्लेश वनीं अति ।।

माहेरीं कधि कधींहि सासरिं। रुचे तुम्हाला तिथें रहा तरि ।।
यापरिं करा उपायां नाना। ये तर अवलंबन या प्राणां ।।
ना तर शेवट मरण मला ही। जैं विधि वाम, न निजवश काहीं ।।
आणुनि दावि राम सिय लक्ष्मण। वदुनि पडति मूर्छित नृप तत्क्षण ।।

**दो०--आज्ञा मिळतां नमुनि शिर रथ सुवेग सजतात ।।**
**सीतेसह युग बंधु जिथं बहिर्नगर जातात ।।८२।।**

मग सुमंत्र नृप–वचन सांगुनी। रथिं चढविति रामास विनवुनी ।।
बसुनि सितेसह रथि दो भ्राते। निघति नमुनि मनिं अयोध्येस ते ।।
जात राम, पुरि अनाथ पाहति–। लोक विकल सब मागें धावति ।।
कृपासिंधु बहुपरिं समजावति। फिरती प्रेमें परतुनि धावति ।।
दिसे अयोध्या भीषण भारी। काळरात्र कीं जणुं अंधारी ।।
घोर जंतु सम पुर–नर नारी। बघुनि परस्पर भितात भारी ।।
जणुं भूतें परिजन मसाण घर। मित्र सुहृद सुत जणुं यम किंकर ।।
बागांमधि तरु वेलि कोमजति। नदी तलाव न मुळीं पाहवति ।।

**दो०–हयगज अगणित केलिमृग पुरपशु चातक मोर ।।**
**पिक रथांग शुक सारिका सारस हंस चकोर ।।८३।।**

रामवियोग–विकल सब तिष्ठति। जिथं तिथं चित्रलिखित जणुं वाटति
नगर सफल वन गव्हर भारी। खग मृग विपुल सकल नर नारी ।।
विधि करि किरातिनी कैकइला। दव दुःसह दश दिशीं लाविला ।।
सहुं न शकति रघुवर–विरहानळ। लोक सकल पळुं लागति विव्हळ ।।

सकल विचार करति सुख नाहीं । विना राम लक्ष्मण सीता ही ॥
जिथें राम तिथं सव सुखसाधन । विण रघुवीर अयोध्यें काम न ॥
जाति सवें हा निश्चय ठरवुनि । सुर दुर्लभ-सुख-सदनां सोडुनि ॥
राम-चरण-पंकजें प्रिय जया । विषय-भोग कीं करिति वश तयां ॥

**दो०-बाल वृद्ध टाकुनि गृहां जाति लोक सब साथ ॥**
**करिति वास तमसा तटीं प्रथम दिवसि रघुनाथ ॥८४॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ९ वा

प्रजा प्रेमवश रघुपति पाहति । सदय हृदयिं अति दुःखा पावति ॥
करुणामय रघुनाथ हृषिकपति । शीघ्र परावी पीडा पावति ॥
प्रेमळ मृदु सुंदर वोलोनी । लोकां राम वहुत सांगोनी ॥
वहुत धर्म उपदेशा करती । प्रेमी जन फिरवितां न फिरती ॥
शीला स्नेहा ये न सोडतां । अडचणींत रघुराजा पडतां ॥
श्रमवश लोक शोकवश निद्रित । सुरमायें कांहींसे मोहित ॥
यामिनियाम यदा युग टळले । प्रेमें राम सुमंत्रा वदले ॥
रथा हांकणें ठेवुनि माग न । सुटण्या दुसरा उपाय तात न ॥

**दो०-सिता राम लक्ष्मण रथीं शंभुस नमिति चढून ॥**
**सचिव शीघ्र रथ चालवी माग न मुळि ठेवून ॥८५॥**

जागृत सगळे लोक सकाळां । गत रघुनाथ ओरडा झाला ॥
रथ मागास न कोठें पावति । राम राम ! हा! चहुंदिशिं धावति ॥

जणुं जलधींत जहाज बुडालें । वणिज लोक विव्हळ अति झाले ।।
करिति एकमेकां उपदेशा । रामें त्यक्त जाणुनी क्लेशां ।।
निंदिति अपणां स्तविती मीनां । धिग् जगणें रघुवीर विहीनां ।।
प्रिय वियोग विधिनें जर निर्मित । मरण मागतां कां नहि अर्पित ।।
करतां अशा प्रलाप–कलापां । येति अयोध्यें अति परितापां ।।
विषम वियोग दशा वदवे ना । राखिति अवधी–आशे प्राणां ।।

**दो०–रामदर्शना व्रतादिक करुं लागति नर नारि ।**
**जणूं कोक कोकी कमल दीन विहीन तमारि ।।८६।।**

सिता सचिवसह लक्ष्मण रघुपति । शृंगवेरपुर समीप पोंचति ।।
उतरति राम देवसरि देखत । हर्षति अति करतात दण्डवत ।।
लक्ष्मण मंत्री; सीता प्रणमत । सर्वां सहित राम सुख पावत ।।
गंगा सब मुद–मंगल-मूला । सब सुख करणि हरणि सब शूलां ।।
सांगत विविधा कथा प्रसंगां । राम विलोकिति गांग तरंगां ।।
सचिवा अनुजा प्रियेसि सांगति । विबुध नदी-महती अधिका अति ।।
करतां स्नान पथ–श्रम हरले । शुचि जल पितां मुदें मन भरलें ।।
स्मरतां ज्यास सरे श्रमभारहि । त्यां श्रम लौकिक हा व्यवहारहि ।।

**दो०–शुद्ध सच्चिदानंदमय कंद भानुकुल–केतु ।।**
**मनुज सदृश करिती चरित संसृतिसागर सेतु ।।८७।।**

कळतां वृत्त निषाद गुहाला । मुदित बोलवी प्रिय सुहृदांला ।।
फल मूलादि भेट घे फार हि । निघे भेटुं हृदिं हर्ष अपारहि ।।

भेट समर्पुनि करि दण्डवत । प्रेमें प्रभुसि राहि अति निरखत ॥
सहज-स्नेह-विवश रघुराजहि । वसवुनि निकट विचारिति कुशलहि
नाथ ! कुशल पद-पंकज दिसतां । असें भाग्यभाजन जन गणतां ॥
देव ! आपलें धरणि धाम धन । परिवारासह मी हि नीच जन ॥
कृपा करुनि पद पुरास लावा । या महती जनिं धन्य म्हणावा ॥
सत्य वदसि वा सख्या सुजाणा । ताताज्ञा परि मजला आना ॥

**दो०-वर्ष चार दश वास वनि मुनिचें व्रत आहार ॥**
**ग्राम वास अनुचित, गुहा ऐकुनि दुःख अपार ॥८८॥**

राम सिता लक्ष्मण छवि बघती । प्रेमें ग्राम नारि नर वदती- ॥
मायबाप ते वद सखि कैसे । जे धाडिति वनि बालक ऐसे ॥
कोणि म्हणति कृत भले नृप भला । लोचन लाभ कि विधिनें दिधला ॥
तैं निषादपति मनि अनुमानें । तरु शिंशपा मनोहर जाणे ॥
ने रघुनाथा दाखवि ठावा । म्हणती राम छान अति वा ! वा !
पुरजन जोहारुनि घरिं आले । रघुवर संध्येलागिं निघाले ॥
करि तयार गुह शयना सुंदर । कुश किसलयमय मृदुल मनोहर ॥
शुचि फल मूल मधुर मृदु जाणुनि । द्रोणीं भरुनि ठेवि जल आणुनि ॥

**दो०-सिता-सचिव-बंधू सहित खाति मूल फल कंद ॥**
**रघुकुल मणि निजती चरण दावि बंधु सुख कंद ॥८९॥**

अनुज उठे कळतां 'प्रभु निजले' । 'निजा' वचनिं मृदु सचिवा वदले ॥
जरा दूर शर सज्य शरासनि । जागत राहि वसुनि वीरासनि ॥

गुह रक्षक विश्वासू आणी । प्रेमें अति, बहु ठेवि ठिकाणीं ॥
स्वयें लक्ष्मणां समीप बसलां । कटि भाती शर चापिं चढविला ॥
प्रभुला निद्रित बघुनि निषादहि । बने प्रेमवश हृदयिं विषादहि ॥
वपु पुलके जल लोचनिं वाहे । प्रेमें लक्ष्मणास म्हणताहे ॥
भूप–भवन तों सहज सुशोभन । समता पावे सुरेंद्र–सद्म न ॥
रचित रत्नमणि रुचिर वंगले । जणूं स्वकरिं रतिपतिनें सजले ॥

**दो०–शुचि सुविचित्र सुभोगमय सुमन सुगधि सुवास ॥**
**मंजु मंच मणि दीप जिथं वाण न काँहि सुखास ॥९०॥**

गाद्या गिरद्या विविध वसनवर । क्षीरफेन–मृदु विशद मनोहर ॥
सीता राम रोज तिथं निजती । निज छवि रतिमनोज–मद हरती ॥
सिताराम ते तृणशयनावरि । श्रांत वसनविण बघवत ना तरि ॥
मायवाप पुरजन पुरवासी । सखे सुशील सुदास सुदासी ॥
जपती ज्यांना प्राणां परते । स्वामि राम निजले भूवर ते ॥
पिता जनक विश्रुत प्रभाव हि । श्वशुर सुरेशसखा रघुराव हि ॥
रामचंद्र पति ती वैदेही । सुप्त महिं, न विधि वाम कुणाही ॥
सीता रघुवीर किं जोगीं वन । कर्म–प्रधान वदति सत्य जन ॥

**दो०–कैकय नंदिनि मंदधी करि कटु कुटिलपणास ॥**
**दे रघुनंदन जानकिस सुख समयीं दुःखास ॥९१॥**

रवि–कुल–विटप–कुठारी झाली । कुमति विश्व सब दुःखीं घाली ॥
होइ निषादा भारि विषादहि । सिताराम पाहुनि निद्रित महिं ॥

लक्ष्मण वदति मधुर मृदु वाणी । ज्ञान–विराग–भक्तिरस-खाणी ॥
कोणि कुणा सुख दुःख न दाता । निज कृत कर्मभोग ते भ्राता ॥
योग वियोग भोग शुभ मंद हि । शत्रु मित्र मधले भ्रम–बंध हि ॥
जन्म मरण जोंवर जग–जालहि । संपद् त्रिपत् कर्म नी काल हि ॥
धरणि धाम धन पुर परिवारहि । स्वर्ग नर्क जितका व्यवहार हि ॥
श्राव्य, दृश्य मंतव्य हि कांहि । मोह मूल परमार्थें नाहीं ॥

**दो०–स्वप्नीं होइ भिकारि नृप होइ रंक नाकेश ॥**
**जागत लाभ न हानि लव तसा प्रपंच अशेष ॥९२॥**

अशा विचारें रोष नसावा । वृथा दोष कोणा ना द्यावा ॥
सर्व हि मोहनिशें निजणारे । दिसतीं स्वप्नें किती प्रकारें ॥
या जग यामिनिं जागति योगी । परमार्थि जे प्रपंच वियोगी ॥
जाणा तैंच जीव जगिं जागा । पावे विषय विलासिं विरागा ॥
ज्ञान होइ मोह भ्रम भंगहि । तैं रघुनाथ चरणिं अनुराग हि ॥
हाच परम परमार्थ सखे ! हो ! । रामपदीं मन तनुवाक्–स्नेहो ॥
ब्रह्म राम परमार्थ रूप ही– । व्यक्त न अनुपम नादि अलक्ष्यहि॥
भेदातीत नित्य अविकारी । नेति नेति जें वेद पुकारी ॥

**दो०–भक्त भूमि भूसुर सुरभि सुरहित राम कृपाल ॥**
**नर तनुधर करिती चरित श्रवण नुरवि जगजाल ॥९३॥**

**मास पारायण, पंचदश विश्राम.**

❖ ❖ ❖

## अध्याय १० वा

सखे मोह असं समजुनि सोडा । रति रघुवीर-सितापदिं जोडा ॥
होय पहाट राम-गुण गातां । जागे जगमंगल सुख-दाता ॥
शौचा स्नाना राम आटपति । शुचि सुजाण वट-दुग्ध मागवति ॥
अनुजासहित जटा शिरिं वळल्या । सचिव-नेत्रिं जलधारा गळल्या ॥
हृदयिं दाह अति उदास वदनें । वदति जुळुनि कर सुदीन वचनें ॥
नाथ ! म्हणाले कोशलनाथ किं । जा रथ घेउनि सह रघुनाथ किं ॥
दाखवूनि वन गंगे स्नपवुनि । उभय बंधुना आणा परतुनि ॥
लक्ष्मण रामा सीते आणा । हरुनी संशय संकोचांना ॥

**दो०–हें नृप वदले, स्वामि जें म्हणतिल करीन तेंवि ॥**
**विनवुनि पायीं पडुनि रडुं लागे बालक जेंवि ॥९४॥**

कृपा करुनि करणें तें ताता । कीं न अयोध्या होइ अनाथा ॥
राम सुमंत्रा उठवुनि बोधित । तात धर्ममत तुम्हि सब शोधित ॥
शिबि दधीचि हरिचंद नरेश । धर्मास्तव किति सहती क्लेश ॥
रंतिदेव बलि सुज्ञ भूपती । सहुनि कष्ट किति धर्म राखती ॥
धर्म न दुसरा जगिं सत्यासम । वानिति वेद पुराणें आगम ॥
झाला सुलभ धर्म मज तो कीं । त्यजत अयश पसरे त्रय लोकीं ॥
संभावितास अपयश लाहो । मरण कोटिसम दारुण दाहो ॥
तुम्हां तात बहु काय सांगुं वरं । पाप-लाभ देतां प्रत्युत्तर ॥

**दो०–पितृपद धरुनी कोटि नति सांगा जोडुनि हात ।।**
**चिंता कसली ही जरा करूं नका मम तात ।।९५।।**

तुम्हि तर पितृसम अति हित मातें । तात विनविते जुळुनि करांतें ।।
तें कर्तव्य सर्वपरि तुमचें । पित्या होइ शुच-दुःख न अमचें ।।
हा रघुनाथ–सचिव संवादू । श्रवुनि सपरिजन विकल निषादू।।
वचन कांहि कटु लक्ष्मण वदती । प्रभु अति अनुचित गणुनि वर्जती
संकोचुनी शपथ निज घालुनि । अनुज निरोप न वदणें जाउनि ।।
नृप–संदेश सचिव मग सांगति । वनीं क्लेश सीते न साहवति ।।
सीतेनें घरिं परतुन यावें । असें तुम्हीं रघुवरा करावें ।।
नतर पूर्ण अवलंब–विहीना । मज जगवे न जलाविण मीना ।।

**दो०–सुख सासरिं माहेरिं सब, जसें जिथें मन मानि ।।**
**सीता राहि सुखेन तशि जोंवर विपत्ति-हानि ।।९६।।**

विनति नृपें केली ज्या रीतीं । वदवे ना ती आर्ती प्रीती ।।
श्रवुनि कृपानिधि पितृसंदेशा । सीतें करिति बहुत उपदेशा ।।
श्वशुर सासु गुरु नी प्रिय परिजन- । कष्ट, जाल तर होति निवारण ।।
वदे श्रवुनि पतिवच वैदेही । पहा प्राणपति परमस्नेही ।।
प्रभु करुणामय परम विवेकी । छाया देहा त्यजुनि वसे कीं ?।।
प्रभा जाइ कुठं भानुस सांडुनि । कुठें चंद्रिका चंद्रा टाकुनि ।।
विनवुनि पतिला प्रेममय असें । सचिवा सुंदर वचन वदतसे ।।
श्वशुर–पित्यांसम तुम्हि हितकारी । प्रत्युत्तरणें अनुचित भारी ।।

**दो०–ज्ञाल्यें सन्मुख आर्तिवश अनुचित गणा न तात ।।**
**आर्यपुत्र–पद–कमलविण नातीं व्यर्त जगांत ।।९७।।**

मज पितृवैभव विलास दिसले । नृपकिरीट पदपीठिं लागले ।।
सुखनिधान मम तातगृह असें । चुकुनि न मनिं पतिहीन रुचतसे।।
सम्राट् श्वशुरहि कोसलराव । भुवनिं चतुर्दश प्रगट प्रभाव ।।
पुढें येउनी सुरपति नेती । आसन सिंहासनार्ध देती ।।
असे श्वशुर कोसला निवासू । प्रिय परिवार मातृसम सासू ।।
विण रघुपति-पद-पद्म परागहि । स्वप्निंहि कुणि मज सुखद गमे नहि।।
दुर्गम पथवन भूमि महीधर । करि केसरि अपार सरिता सर ।।
कोळि किरात कुरंग विहंगहि । मला प्राणपति सह सब सुखदहि ।।

**दो०–श्वशुर–सासु-पद धरुनि मम अशी विनति सांगावि ।।**
**चिंता मम न करावि मुळि मी वनिं सुखी स्वभावि ।।९८।।**

प्राणनाथ–संगें प्रिय देवर । वीर धुरीण तूण–कार्मुकधर ।।
दुःख न मजला श्रम न पथश्रम । चिंता चुकुन न करा जरा मम ।।
श्रवुनि सचिव सिय-शीतल-वाणी । होइ विकल जणुं फणि मणि-हानीं।।
कान न ऐकति नेत्रिं दिसेना । व्याकुळ अति वाणिस वदवेना ।।
राम बहुविधा प्रबोध करिती । होइ न छाती शीतल तरि ती ।।
नेण्या कृत बहु यत्न बरोबर । रघुनंदन देती उचितोत्तर ।।
रामाज्ञा कुणि मोडुं न शकती । कठिण कर्मगति नसे स्ववश ती ।।
सानुज-राम-सिता-पदिं नमुनी । फिरे वणिज इव मूळ गमवुनी ।।

**दो०–रथ हाकी हय हेषती रामा बघुन बघून ।।**
**बघुनि निषाद विषण्ण शिर पिटिती पस्तावून ।।९९।।**

यद्विरहें पशु विव्हळ ऐसे । प्रजा माय पितृ जगतिल कैसें ।।
सचिवा राम जबरिनें धाडति । आपण मग सुरसरि तटि पावति ।।
मागति नाव न नाविक आणित । म्हणें मर्म मज तुमचें माहित ।।
चरण–कमल–रज जन वदताहे । मानुष–करणि कांहि मुळि आहे ।।
स्पर्शत होइ शिला स्त्री सुंदर । काष्ठ न दगडाहुनी कठिणतर ।।
तरणिहि मुनि–गृहिणीच होय कीं । नाव उडे मम काय सोय कीं ।।
परिवारा सब हिनें पाळतो । कावाड न मुळि अन्य जाणतो ।।
जाणें असलें प्रभो पार जर । सांगा मज पदपद्म धुण्या तर ।।

**छं०–पद-कमल धुउनी नावि चढविन नाथ उतराई-विणें ।।**
**मज राम आपलि आण दशरथ शपथ सत्यचि बोलणें ।।**
**जरि तीर लक्ष्मण मारि ही जों धुइन अपले पाय ना ।।**
**तोंवरीं तुलसी–दास–नाथ कृपालु नेइन पार ना ।।१।।**

**सो०–नाविक–वच जैं कानि प्रेमळ वेड वाकडें ।।**
**विहसति करुणाखाणि बघुनि बंधु–जानकिकडे ।।१००।।**

कृपासिंधु वदले स्मित करुनी । तें कर नाव कि जाइ न उडुनी ।।
आण जला धू शीघ्र पदांला । पार ने किं बहु उशीर झाला ।।
एकवार यन्नामा स्मरती । नर अपार भवसागर तरती ।।
विनविति कोळ्या करुणाकर ते । ज्यांच्या त्रिपदां विश्व न पुरतें ।।

पदनख निरखुनि सुरसरि हर्षित । प्रभुवचनें मोहें मति कर्षित ॥
नाविक रामाज्ञेला पाउनि । काथ्वटभर ये पाणी घेउनि ॥
अति मोदें उसळत अनुरागें । प्रक्षाळूं पदसरोज लागे ॥
स्तविती वर्षुनि सुम सुर सगळे । पुण्यपुंज कुणि असा नाढळे ॥

**दो०—क्षालुनि पद, जलपान करि स्वयें सहित परिवार ॥**
**तारुनि पितरां प्रभुस मग नेई प्रमुदित पार ॥१०१॥**

उभीं उतरुनी सुरसरि रेतीं । सिता राम गुह अनुज समेतीं ॥
नाविक उतरुनि करी दंडवत । दिलें न याला प्रभु संकोचित ॥
सीता पतिमन सुजाणणारी । मणि मुद्रिका काढि मुद भारी ॥
घे उतराई कृपाल वदले । विकल नाविकें चरणां धरले ॥
नाथ! आज मज काय न लाभत । दोष दुःख दारिद्रय-दाव गत ॥
केली मी बहुकाळ मजूरी । आज देइ विधि भलि भरपूरीं ॥
नको अतां प्रभु कांही मजला । तुझ्या अनुग्रहिं दीनदयाला ॥
द्याल परत येतां जें कांहीं । तो प्रसाद मी धरिन शिरांही ॥

**दो०—प्रभु लक्ष्मण सीता बहू कथिति न नाविक घेत ॥**
**देति निरोप कृपायतन भक्ति विमल वर देत ॥१०२॥**

करुनी रघुकुल—नाथ मज्जना । पार्थिव पूजुनि करिती नमना ॥
कर जोडुनि मग सीता विनवी । गंगे माइ ! मनोरथ पुरवी ॥
पति—दीरांसह येतां मागें- । कुशल; करिन कीं तव पूजा गे ॥
प्रेमळ सीता—विनति ऐकली । विमल जलीं वर वाणि जाहली ॥

श्रुणु रघुवीर–प्रिया वैदेही । कोण न महिमा तव जाणे ही ॥
लोकप होति विलोकनिं तव नर । तुज सेविति सब सिद्धि बद्धकर ॥
तुम्हि आम्हां जें वहुत विनविलें । कृपा करुनि मज महत्व दिधलें ॥
तदपि देवि मी आशिस देतें । सफल व्हावया निज वाचेतें ॥

**दो०–प्राणनाथ दीरासहित कुशल कोसले याल ॥**
**पुरतिल सब मनकामना सुयश जगीं पसराल ॥१०३॥**

श्रवुनि गांगवच मंगल–मूल हि । सीते मुद गंगा अनुकूल हि ॥
प्रभु मग म्हणति गुहा, घरिं जावें । सुकलें मुख उर दाहा पावे ॥
वदे दीन गुह जोडुनि हातां । श्रुणु रघुकुलमणि विनंति आतां ॥
नाथ ! साथ राहिन पथ दाविन । करिन चरण–सेवाहि चार दिन ॥
ज्या वनिं जाउनि राहति रघुपति । पर्णकुटी मी करिन चारु अति ॥
तैं कथितिल रघुवीर मज जसें । आण आपली करिन मी तसें ॥
राम बघुनि तत्स्नेह सहज तो । नेति सवें अति होइ मुदित तो ॥
गुहें ज्ञातिजन सकल बाहिले । परितोषुनि त्यां परत धाडिले ॥

**दो०–स्मरुनी प्रभु गणपति–शिवां गंगें नमुनि शिरास ॥**
**सखा अनुज सीते सहित गत रघुनाथ वनास ॥१०४॥**

त्या दिनिं होइ विटपतळिं वसती । लक्ष्मण सखा सोइ सब करती ॥
प्रातःकृत्यां रघुपति उरकुनि । तीर्थराज बघती प्रभु जाउनि ॥
श्रद्धा स्त्री प्रिय, सत्य सचिव वर । मित्र माधवा समान हितकर ॥
चारि पदार्थ–पूर्ण भंडारू । पुण्यप्रदेश देश सुचारू ॥

क्षेत्र दुर्ग गड गाढ सुशोभन । प्रतिपक्षी स्वप्नींहि पावति न ।।
तीर्थ सकल सेना वरवीरहि । कलुप-अनीक-दलन रणधीर हि ।।
संगम सिंहासन अति शोभन । अक्षयवट छत्रहि मुनि-मोहन ।।
चामर यामुन–गांग–तरंग । बघत दुःख-दारिद्र्यां भंग ।।

**दो०–सेविति सुकृती साधु शुचि पावति सब मन काम ।।**
**बंदी वेदपुराणं–गण गाती सुगुणग्राम ।।१०५।।**

वदवे कुणा प्रयाग प्रभाव । कलुष–पुंज–कुंजर मृगराव ।।
असा तीर्थपति पाहुनि सुंदर । सुख पावति रघुवर सुख सागर ।।
सीते अनुजा गुहास सांगत । स्वमुखें तीर्थराज महिमा अति ।।
प्रणमुनि बघत बघत वनबागां । वदति महात्म्यां अति अनुरागां ।।
असे येउनी त्रिवेणि पाहति । स्मरतां सकल सुमंगलदा अति ।।
मोदें स्नान करुनि शिवपूजन । केलें सविधि तीर्थ-देवार्चन ।।
प्रभू भरद्वाजाप्रति येती । करत दंडवत मुनि उरिं धरिती ।।
मुनि-मनिं मोद, न जरा सांगवत । ब्रह्मानंद–राशि जणुं पावत ।।

**दो०–देति अशीस मुनीश. हृदिं अति मुद असं जाणून ।।**
**लोचन-गोचर-सुकृत-फल करि विधि जणुं आणून ।।१०६।।**

आसन दिधलें कुशला पुसुनी । प्रेमें पूरित केलें पुजुनी ।।
कंद मूल फल अंकुर सुंदर । दे आणुनि मुनि जणूं अमृत वर ।।
सीता-लक्ष्मण-जन-सह शुभ अति । अति रुचि राम मूल फल भक्षति ।।
राम गतश्रम सुखी जाहले । भरद्वाज मृदु वचन बोलले ।।

आज सुफल तप तीर्थे त्यागहि । आज सुफल जप योग विरागहि ।।
सुफल सकल शुभ-साधन-साज । राम तुम्हां अवलोकत आज ।।
लाभ-सीम सुख-सीम न दुसरी । दर्शनिं तुमच्या आस सब पुरी ।।
अतां कृपेनें वर हा द्यावा । स्नेह सहज पद-सरसिजिं व्हावा ।।

**दो०–त्यजुनी तनुवाङ्मनें छल जोंवरि तुझा न दास ।।**
**स्वप्निंहि तोंवरि सुख नसे कोटि साधनें भास ।।१०७।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ११ वा

श्रवुनि राम मुनिवच संकुचती । भावभक्ति आनंदें तृप्ती ।।
मग रघुवर मुनि-सुयश सुशोभन । बहुविध सकलां करिति निवेदन ।।
तो मोठा तो सबगुणगण-घर । ज्या मुनीश तुम्हि देतां आदर ।।
मुनि रघुवीर परस्पर नमती । वचनाऽगोचर सुख अनुभवती ।।
कळत वृत्त हें प्रयागवासी । बटु तापस मुनि सिद्ध उदासी ।।
येति भरद्वाजाश्रमिं सादर । बघण्या दशरथ सुतांस सुंदर ।।
राम करिति नमना सर्वांना । मोद होइ जैं लाभ लोचनां ।।
आशीस् देति परम सुख मिळतां । जाती वाखाणित सुंदरता ।।

**दो०–राम करुनि विश्राम निशि स्नान उदयिं तीर्थांत ।।**
**सिता बंधुजन सह मुदित मुनिस निघतात ।।१०८।।**

राम मुनिस वदले प्रेमानें । जावें नाथ ! कवण मार्गानें ।।
मुनि मनिं विहसुनि रामा म्हणती । सुगम मार्ग सब तुम्हांस असती ।।

सवें द्यावया शिष्य बाहले । श्रवुनि मुदित पन्नास ठाकले ॥
प्रेम अपार रामिं सर्वांसी । सकल वदति पथ विदित अम्हांसी ॥
मुनिनें सवें चार वटु दिधले । जिहिं वहुजन्मि सुकृत सब केलें ॥
प्रणमुनि ऋषी आज्ञेस पावले । प्रमुदित मन रघुराज चालले ॥
जाति यदा ते गांवावरुनी । नर नारी छबि वघति धाउनी ॥
होति सनाथ जन्म फल पाउनि । दुःखी फिरति सवें मन धाडुनि ॥

**दो०–विनवुनि बटुनां फिरविले जाति पूर्ण–मनकाम ॥**
**उतरुनि यमुना स्नान कृत जळि शरीरशा श्याम ॥१०९॥**

तीरवासि नरनारी ऐकत । निज निज काजां विसरुनि धावत
लक्ष्मण–राम–सिता–सुंदरते– । वघतां वानिति भाग्य–महत्ते ॥
वाटे अति लालसा मनासी । लाजति नांव गांव पुसण्यासी ॥
वयोवृद्ध त्यांमधें सुज्ञ जे । राम ओळखिति युक्ति करुन ते ॥
वदति कथा सब ते सकलांसीं । पित्राज्ञें चालले वनासी ॥
श्रवुनि विषादें सब पस्तावति । राणी राय न भलें आचरति ॥
त्या समयीं ये एक तपस्वी । सुंदर, लघु वय अति तेजस्वी ॥
कवि–अलक्ष–गति वेष विरागी । मन-कृति-वचनिं राम-अनुरागी ॥

**दो०–सजल नयन, तनुं पुलक, निज इष्ट देव जाणून ॥**
**दशा न वदवे धरणितळि पडला दंड बनून ॥११०॥**

प्रेमें राम धरिति उरिं पुलकत । परम रंक जणुं परीस पावत ॥
जणूं प्रेम परमार्थ उभयही । भेटति तनुधर म्हणति सर्वही ॥

मग लक्ष्मण-पायां तो पडला। प्रेमभरानें धरुनि उठवला ।।
मग सीतापदरज धरि शीर्षा। जननि गणुनि शिशु दे आशीषा ।।
करि निषादपति तया दंडवत। रामस्नेहि गणुनि मुद भेटत ।।
पीत नेत्रपुटिं रूप-सुधेला। मुदित मिळत मिष्टान्न भुकेला ।।
माय बाप ते वद सखि कैसे। जे धाडिति वनि बालक ऐसे ।।
राम–सिता–लक्ष्मण–छवि बघती। स्नेह-विकल नर नारी बनती ।।

**दो०–मग रघुवीर अनेक–विध शिकवण देति सख्यास ।।**
**रामाज्ञा शिरि धरुनि तो करि भवना गमनास ।।१११।।**

सिता राम लक्ष्मण कर जुळती। पुन्हां नमन यमुनेला करती ।।
बंधु मुदित सीतेसह निघती। रवि तनुजेची वर्णित महती ।।
पथि जातां बहु पथिक भेटती। भावां बघुनीं प्रेमें म्हणती ।।
राजचिन्ह सब अंगीं तुमचे। बघुनि दुःख अति हृदयिं आमचें ।।
अनवाणी चालतां हि वाटें। आम्हां ज्योतिष खोटें वाटे ।।
पथ दुर्गम गिरि कानन भारी। त्यांत सवें नारी सुकुमारी ।।
करि केसरि वृक बघवेना वन। येउं सवें जर द्या अनुशासन ।।
जेथें जाणें तिथें पोचवुनि। येउं परत शिर तुम्हांस नमवुनि ।।

**दो०–प्रेमें विनवित असें, जल नेत्रि, गात्र पुलकीत ।।**
**कृपासिंधु त्यां फिरविती मृदु वचनें सुविनीत ।।११२।।**

जे पुर गांव पथीं त्या असती। त्या अहि–सुर–पुर सेर्षा स्तवती ।।
सुकृति कवण घडि वसवी पावन। धन्य पुण्यमय परम सुशोभन ।।

चालत राम जिथें पदिं जाती । त्यां समान अमरावति ना ती ॥
पुण्यपुंज पथ–निकट निवासी । तयां प्रशंसिति सुरपुरवासी ॥
डोळे भरुन बघति जे रामा । सीता लक्ष्मण सह घनशामा ॥
ज्या सरिं सरितिं राम अवगाहति । तयां देव–सर–सरिता वानति ॥
प्रभु ज्या तरुतळिं जाउनि वसति । तया कल्पतरु महान म्हणती ॥
राम–पदांबुज–पराग लागत । भूमि भूरि निज भाग्या मानत ॥

**दो०–छाय करिति घन विबुध सुम वर्षोनी स्तवितात ॥**
**निरखत गिरि वन विहग मृग मार्गि राम जातात ॥११३॥**

लक्ष्मण सीते सहित रघुपती । जैं जैं गांवा वरुनी जाती ॥
ऐकत बाल वृद्ध नारी नर । जाति काज गृह विसरुनि सत्वर ॥
राम–सिता–लक्ष्मण-छवि बघती । मिळे नयनफळ सौख्य पावती ॥
सजल विलोचन पुलक शरीरां । सर्वहि मग्न बघत युगवीरां ॥
दशा तयांची नाहिं वर्णवत । सुरमणिरास रंक जणुं पावत ॥
बाहुनि दे शिकवण कोणा कुणि । लोचन–लाभ लुटा जा या क्षणिं ॥
रामा बघत कुणी अनुरागति । निरखत संगें जाऊं लागति ॥
कोणि नेत्रपथिं छवि उरिं अणुनी । होति शिथिल-तन-मन-वरवचनीं ॥

**दो०-एक बघुनि वट छाय भलि मृदु तृण पल्लव घालि ॥**
**श्रम घडिभर हरणें म्हणे जाल अतां कि सकाळि ॥११४॥**

एक कलशभर पाणि आणती । भरणें चूळ नाथ ! मृदु म्हणती ॥
प्रीति बघुनि अति परिसुनि वाक् प्रिय । राम कृपालु सुशीलहि अतिशय ॥
जाणुनि मनीं श्रमित सीतेसी । घडिभर थांबति वटछायेसी ॥

मुदित नारिनर देखति शोभे । अनुपमरूपि नयन मन लोभे ।।
टकमक सब शोभति चौफेरहि । रामचंद्र-मुख-चंद चकोरहि ।।
तरुण-तमालवर्ण तनु शोभत । देखत कोटि-मदन-मन मोहत ।।
दामिनि-भा लक्ष्मण अति सुंदर । नख-शिख सुभग मनातें रुचिकर ।।
मुनिपट कटि कसले तूणीरहि । धृत कर-कमलिं रुचिर धनु तीरहि।।

**दो०–जटा–मुकुट मस्तकिं सुभग उर-भुज-नयन विशाल ।।**
**शरत्पर्व-विधु-वदनिं वर लसे स्वेदकण–जाल ।।११५।।**

ना वर्णवे मनोहर जोडी । शोभा बहुत बुद्धि मम थोडी ।।
लक्ष्मण – राम– सिता– सुंदरते । बघति चित्त-मन-मति लावुन ते ।।
प्रेम-पिपासू थक्क नारि नर । जणूं मृगी मृग बघुनि दीप वर ।।
ग्राम नारि जाती सीते-प्रति । स्नेहें अति पुसण्या संकोचति ।।
घडि घडि सकल करिति पदिं नमना । सहज सरल मृदु वदल्या वचनां ।।
राजकुमारी ! विनंति करितों । स्त्रीस्वभाव, पुसण्या घाबरतों ।।
स्वामिनि ! अविनय तरी क्षमावा । ग्राम्य गणुनि ना रोष धरावा ।।
राजकुमर युग सहज सुशोभन । यद् द्युतिनें द्युति मरकत कांचन ।।

**दो०–श्यामल गौर किशोर वर सुंदर सुषमा–क्षेत्र ।।**
**शरद–शर्वरीनाथ मुख शरत्सरोरुह नेत्र ।।११६।।**

## मास पारायण, षोडश विश्राम.

## नवाह्न पारायण, चतुर्थ विश्राम.

❖ ❖ ❖

# अध्याय १२ वा

कोटि मनोजां लाजविणारे । सुमुखि कोण हे तव, वद सारें ।।
प्रेमळ मंजुळ वचनां परिसत । मनिं सस्मित सीता संकोचत ।।
तयां विलोकुनि विलोकि धरणी । उभयीं संकोचित वरवर्णी ।।
प्रेमें लाजुनि मृग-शिशुनयनी । वदली मधुर वचन पिकवचनी ।।
सहज सुशील गौर तनु सुंदर । लक्ष्मण नाम सान मम देवर ।।
वदन विधुस मग पदरें झांकुनि । प्रिय पति निरखुनि भृकुटि वाकवुनि
खंजन-मंजुल वक्र-अपांगें । तयां खुणेनें निजपति सांगे ।।
मुदित गांवच्या अवघ्या युवती । रायराशि जणुं रंकांच लुटती ।।

**दो०-प्रेमें अति सीते नमुनि देति विविध आशीस ।।**
**सदा सुवासिनि व्हा तुम्हीं जों धरि शेष महीस ।।११७।।**

पतिला प्रिय पार्वतिसम व्हावें । प्रेम अम्हांवर उणें नसावें ।।
कर जोडुन बहु करूं विनवणी । पुन्हां भूषवा जर पथ चरणीं ।।
द्या दर्शन जाणुनि निज दासी । कळे सिते त्या प्रेम-पिपासी ।।
वचनिं मधुर मृदु बहु परितोषित । जणुं कौमुदि कुमुदिनींस पोषित ।।
तैं रघुवर-कल वघुनि लक्ष्मणें । पुसला पंथ जनां मृदु वचनें ।।
ऐकत दुःखी सब नर नारी । पुलकित वपू विलोचनिं वारी ।।
चित्त उदास मोद मनिं नुरला । जणुं दिधला निधि विधिनें हरला ।।
जाणुनि 'कर्म' धरुनि धीराला । सांगति ठरवुनि सुगम पथाला ।।

**दो०—लक्ष्मण जानकि सहित तें गमन करिति रघुनाथ ॥**
**प्रियवचनें फिरवुनि सकल मनां सवें नेतात ॥११८॥**

नारी नर विव्हळ फिरतां अति । देती दोष मनीं दैवाप्रति ॥
सहित विषाद परस्पर वदती । विधिकृति सगळ्या उलट्या असती
निष्ठुर निरंकूश निःशंकी— । अति, जो करि शशि सरुज कलंकी
रूख कल्पतरु सागर खारा । तो पाठवि वनिं राजकुमारां ॥
यांस धाडले जर वनवासा । वृथा निर्मि विधि भोगविलासां ॥
पथि जाणें अनवाणी यांनां । रचि विरंचि जगिं वृथाचि यानां ॥
हे महिं पडती कुशपर्णांवर । सुभग शेज विधि निर्मी का तर ॥
तरुतळिं वास यांस जर दिधला । धवल धाम रचरचुनी श्रमला ॥

**दो०—हे जर मुनिपटधरजटिल सुंदर अति सुकुमार ॥**
**नानाविध भूषण वसन सृजी वृथा विधि फार ॥११९॥**

कंद मूळ फळ हे जर खाती । खाद्य सुधादि जगांत वृथा तीं ॥
कोणि म्हणति हे स्वभाव सुंदर । स्वयें प्रगटले नहिं विधिकृत बरं ॥
जितके वेद वदे विधि—निर्मित । श्रवण-नयन-मन-गोचर वर्णित ॥
धुंडुनि पहा भुवनिं दशचारी । असे पुरुष कोठें अशि नारी ॥
यांस बघुनि विधि मनिं अनुरागें । यांसम दुसरें निर्मूं लागे ॥
बहुत करी श्रम परि न साधलें । त्या ईर्षे या वनीं धाडले ॥
कोणि म्हणति अम्हि बहु न जाणतों । धन्य आपणां परम मानतों ॥
पुण्यपुंज आम्हीं गणुं तेही । जे बघती बघतिल दिसले ही ॥

**दो०-अशि वचनें प्रिय बोलतां लोटे लोचनि नीर ॥**
**कशीं कठिण पथिं चालती अति सुकुमार शरीर ॥१२०॥**

नारी स्नेह-विकल अति बनल्या । सायं कोकी समान दिसल्या ॥
मृदु पदकमल कठिण पथ गणुनी । वदति वचन मृदु हृदिं गहिंवरुनी ॥
कोमल लाल पाउलें लागत । निज हृदयांसम महि संकोचत ॥
दिधलें जर जगदीशें यां वन । का प्रसूनमय केला मार्ग न ॥
विधि देइल जर जें मागावें । सखि यांनां लोचनिं ठेवावें ॥
जे नर नारि न अवसरिं आले । त्यांना सीताराम न दिसले ॥
परिसुनि सुरूप विव्हळ पुसती । गेले अतां कोठवर असती ॥
धावत जाउनि समर्थ बघती । सुफलित जन्म मुदित अति वळती ॥

**दो०-अबला बालक वृद्ध, कर चोळति हळहळतात ॥**
**असे प्रेमवश जन, जिथें जिथें राम जातात ॥१२१॥**

गावों-गांवि असा आनंदू । बघुनि भानुकुल-कैरव चंदू ॥
कांहि समाचारास ऐकती । ते नृप-राणिस दोष लावती ॥
भला म्हणति अति कुणि नरनाहो । देइ अम्हां जो लोचन लाहो ॥
कथिति परस्पर पुरूष बाया । स्नेहल सुंदर सरल कथा या- ॥
पितरौ धन्य जयां हे झाले । धन्य नगर जेथुनि हे आले ॥
धन्य देश वन शैल गांव ते । जिथं जिथं जाती धन्य ठाव ते ॥
रचुनि विरंचि तया सुख पावे । हे स्नेही ज्याचे सर्वस्वें ॥
पथिक राम-लक्ष्मण-सुकथेनें । मार्ग सकल भरलेहि काननें ॥

**दो०–ऐसे रघुकुल–कमल–रवि मार्गजनां सुख देत ।।**
**बघत जाति वन जानकी सौमित्री समवेत ।।१२२।।**

पुढें राम लक्ष्मण माघारीं । तापस वेषिं विराजति भारी ।।
मधें सिता शोभतसे कैसी । ब्रह्म-जिवांमधिं माया जैसी ।।
पुन्हां वदें छवि जशि मनिं वसते । जणुं मधु-मदनमधें रति लसते ।।
पुन्हां देउं उपमा हृदिं शोधित । जणुं बुध-विधुमधिं रोहिणि शोभित
प्रभुपद–चिन्हयुगांमधि सीता । चालत पथिं पद टाकि सुभीता ।।
सीता–राम–पदांकां राखुनि । लक्ष्मण चालति उजवीं घालुनि ।।
राम–सिता–लक्ष्मण–सुप्रीती । वाचातीता वदूं कशी ती ।।
मग्न विहग मृग रूप विलोकुनि । राम पथिक ने चित्ता चोरुनि ।।

**दो०–सिते सहित दो प्रिय पथिक दिसले बंधु जयांस ।।**
**भवपथ दुर्गम मुदित तिहिं अश्रम नीत लयास ।।१२३।।**

❖ ❖ ❖

## अध्याय १३ वा

ज्या स्वप्निंहि कधि आज मनीं जर । पथिक बंधु सीता वसती तर ।।
रामधाम-पथ तयास फावे । जो कोणी मुनि विरळा पावे ।।
सीता श्रान्त दिसत रघुवीरा । बघुनि निकटवट शीतल नीरा ।।
कंदमूल फल खाउनि रघुवर । वसुनि निघति उदयीं स्नानोत्तर ।।
निरखत वन सर पर्वत सुंदर । वाल्मिकि आश्रमिं आले प्रभुवर ।।
राम बघति मुनि-वास सुशोभन । सुंदर गिरि कानन जल पावन ।।

सरीं सरोज विटप वनिं फुलले । गुंजति मंजु मधुप रस-भुलले ।।
खग मृग बहु कोलाहल करती । विरहित वैर मुदित मन चरती ।।

**दो०-शुचि सुंदर आश्रम बघुनि हर्ष राजिवाक्षास ।।**
**श्रवुनि रघुवरागमन मुनि पुढें येति नेण्यास ।।१२४ ।।**

रामें मुनिस दण्डवत नमलें । आशीर्वाद विप्रवर वदले ।।
बघुनि राम-छवि लोचन निवले । सन्मानुनि आश्रमीं आणले ।।
प्राणप्रिय अतिथी मुनि पावति । कंदमूल फल मधुर मागवति ।।
सीता अनुज राम फळ भक्षिति । तैं मुनि रुचिर आश्रमा अर्पिति ।।
वाल्मीकी मनिं अति आनंदित । मंगल मूर्तिस नयनी निरखत ।।
रघुपति तदा जुळुनि कर-कमलें । श्रवण-सुखद वचना या वदले ।।
तुम्हीं त्रिकालदर्शि मुनिनाथा । विश्व बदरसम तुमचे हातां ।।
तैं प्रभु सगळा प्रसंग वानित । ज्या प्रकारिं राणी वन अर्पित ।।

**दो०-तात वचन नी मातृहित भाउ भरतसा भूप ।।**
**प्रभु दर्शन मज हा मम पुण्यप्रभाव खूप ।।१२५।।**

बघुनि पाय मुनिराय आपले । अमचें सकलहि सुकृत सुफळलें ।।
अतां जिथें प्रभु आज्ञा देतिल । मुनि उद्वेग न कोणि पावतिल ।।
ज्या कारण मुनि तपी कष्टती । ते नरेश–विण पावक जळती ।।
मंगलमूल विप्र–परितोषू । जाळि कोटिकुळ भूसुर-रोषू ।।
असं मनिं जाणुनि थळ सांगावें । सह सौमित्रि सिता जिथ जावें ।।
तिथें रुचिर रचुनी तृणशाला । कांहि काळ करूं वास कृपाला ।।

सहज सरल रघुवर वच परिसुनि । साधु साधु वदले ज्ञानी मुनि ।।
कसे न वदां असं रघुकुल केतू । पालक सतत तुम्हीं श्रुति-सेतू ।।

**छं०-श्रुति-सेतु-पालक राम तुम्हि जगदीश माया जानकी ।**
**जग निर्मि जी पाळी हरी करुणानिधी-कल बघुन कीं ।।**
**जो अमितशीर्ष अहीश महिधर लक्ष्मणहि अगजगधनी ।**
**सुरकाजि जातां नृपति तनुधर दलन खल निशिचर-अनी ।।१**

**सो०-रामा तवस्वरूप वचनाऽगोचर बुद्धि-पर ।।**
**व्यक्त न अकथ अपार नेति नेति वदती निगम ।।१२६ ।।**

विश्व दृश्य आपण बघणारे । विधि हरि शंभुस नाचविणारे ।।
मर्म न तुमचें त्यांसहि कळतें । तुम्हां जाणतिल अन्य कवण ते ।।
तो जाणे ज्या जाणूं देतां । तुम्हिच होइ तो तुम्हां जाणतां ।।
तुमचे कृपें तुम्हां रघुनन्दन । जाणति भक्त भक्त-उर-चंदन ।।
चिदानंदमय अपली काया । विगत विकार कळे अधिकाऱ्या ।।
धृत नरतनू संत-सुर-काजा । कृति वच जशि कीं प्राकृत राजा।।
राम ! चरित तव ऐकुनि पाहुनि । सुख बुधांस जड जाती मोहुनि ।।
योग्य चि तुमचें वचन वागणें । सोंगा योग्य किं नटें नाचणें ।।

**दो०-राहुं कुठें पुसलेंत मज संकोच किं पुसण्यास ।।**
**जिथें नसां तें वदा स्थळ मग सांगूं स्थानास ।।१२७।**

ऐकुनि वचना प्रेमरसमया । राम संकुचित, सस्मित हृदया ।।
हसुनि पुन्हां वाल्मीकी वदले । वचन सुमधुर सुधारस-भरलें ।।

राम अतां श्रुणु सांगुं निकेतन । तिथें वसा सह सीता लक्ष्मण ॥
श्रवण जयांचे समान अर्णव । नाना सरिता सुभग कथा तव ॥
भरति निरंतर पूर्ण न होती । त्यांचें हृदय तुम्हां शुभ वसती ॥
लोचन चातक करुनी राखति । जे दर्शन–जलधर अभिलाषति ॥
सर सरिता सागरीं निरादर । रूप–विंदुजल मिळत सुखाकर ॥
त्यांचे हृदय सदन सुखदायक । बसा स-सीतानुज रघुनायक ॥

**दो०–यश तुमचें मानस विमल हंसिनि जिव्हा ज्याचि ॥**
**मुक्ताफळ गुणगण टिपी राम रहा हृदिं त्याचि ॥१२८॥**

प्रभू-प्रसाद सुभग शुचि वासा । घेइ सदा सादर यन्नासा ॥
तुम्हां निवेदित भोजन करिति । प्रभू-प्रसाद वसन मणि धरिती ॥
बघत विप्र गुरु सुर शिर नमतें । प्रेमें बहु करुनी विनतीतें ॥
कर नित करिति रामपद-पूजा । राम-भरंवसा हृदिं ना दूजा ॥
रामतीर्थि पदिं चालत जाती । राम करा मनिं त्यांच्या वसती ॥
मंत्रराज तव नित्यचि जपती । परिवारासह तुम्हां पूजती ॥
करिति होम तर्पण विधि नाना । विप्रां भोजन देति सुदानां ॥
मनिं गुरु अधिक तुम्हांहुन जाणति । सर्वभावि सेविति सन्मानति ॥

**दो०–सर्व करुनि रति रामपदिं मागति एक फळा हि ॥**
**तन्मन–मंदिरिं रहा युग रघुनन्दन सीता हि ॥१२९॥**

काम कोप मद मान न मोहहि । क्षोभ न लोभ राग ना द्रोहहि ॥
ज्यामधि कपट दंभ नहि माया । त्यांचे हृदयिं रहा रघुराया ॥

सर्वां प्रिय हितकर सर्वांही । सम सुख दुःख स्तुति निंदाही ॥
वदति विचारिं खऱ्या प्रिय वचना । स्वाप जागृतीं शरण आपणां ॥
तुमच्याविण दुसरी गति नाहीं । राम रहा हृदयीं त्यांच्याही ॥
जननी-सम जाणति परनारी । परधन विषाहुनी विष भारी ॥
हर्षति पाहुनि परसंपत्ती । दुःखी बहु पर बघुनि विपत्ती ॥
प्राणप्रिय तुम्हि राम जयांला । त्यांचें मन शुभ सदन तुम्हांला ॥

**दो०–स्वामि सखा पितृ माय गुरु तुम्हिच तात ! सब ज्यांस**
**तन्मनमंदिरिं करा सह सीते सानुज वास ॥१३०॥**

अवगुण तजुनि सबगुणां ग्रहती । विप्र-धेनु-हित संकट सहती ॥
नीति निपुण आदर्श जगाला । तन्मन-शुभ निज सदन तुम्हांला ॥
गुण तुमचे समजे निज दोषां । ज्या तुमचा सर्वस्वि भरोसा ॥
रामभक्त वाटती प्रिय जया । वसा ससीता त्याचे हृदयां ॥
जात गोत धन धर्म महत्ता । प्रिय परिवार सुखद गृह सत्ता ॥
जो त्यजि सकल तुम्हां हृदयीं धरि । त्याचे हृदिं रघुराज रहा तरि ॥
स्वर्ग नर्क अपवर्ग समानहि । बघे सर्व थळिं धृत धनुबाण हि ॥
किंकर तुमचा मनकृति वचनें । राम ! हृदीं त्या डेरा करणें ॥

**दो०–नको कधिंहि कांहीं जया तवपदिं सहजीं स्नेह ॥**
**वसा निरंतर तया मनिं तें अपलें निज गेह ॥१३१॥**

अशि भवनें मुनिवरें दाविलीं । प्रेमळ वचनें रामा रुचलीं ॥
मुनि म्हणती श्रुणु रवि-कुलनायक । आश्रम सांगुं समयिं सुखदायक ॥

चित्रकूट गिरिं करणें वसती । सब सुख सोइ तुम्हां तिथं असती ॥
शैल सुशोभन कानन चारू । करि केसरि मृग विहग विहारू ॥
नदी पुनीत पुराणीं वानित । अत्री–प्रिया तपें निज आणित ॥
सुरधुनि–धार नांव मंदाकिनि । जी सब पातक-पोतक-डाकिनि ॥
अत्रि आदि मुनिवर बहु वसती । जप तप योग करित तनु कसती ॥
श्रमां सफल सकलांच्या करणें । चलणें राम गिरिहि गौरविणें ॥

**दो०–चित्रकूट महिमा अमित महामुनी कथितात ॥**
**येउनि बंधू सिते सह नदी–स्नान करितात ॥१३२॥**

राम म्हणति लक्ष्मण ! शुभ घाट । करा कुठें तरि निवास-थाट ॥
दिसे लक्ष्मणा पय–तटिं उत्तर । फिरला धनुसम चौदिशि निर्झर ॥
सरिता ज्या, शर शम दम दानहि । सकल कलुष कलि सावज भिन्नहि
चित्रकूट जणुं अचल शिकारी । नेम चुकेना, समोर मारी ॥
वदुनि दाखवीं स्थाना लक्ष्मण । बघुन सुखी झाले रघुवर–मन ॥
रमे राम मन देव जाणती । स्थपति नायका सह सुर निघती ॥
कोळि–किरात–वेषिं ये सुरगण । रचिति पर्णतृण-गृहांस शोभन ॥
वर्णवती न मंजु युग शाला । एक ललित लघु एक विशाला ॥

**दो०–सह लक्ष्मण जानकी प्रभु राजति रुचिर गृहांत ॥**
**शोभे मुनिवेषीं जणूं मदन स–रति–ऋतुनाथ ॥१३३॥**

## मास पारायण, सप्तदश विश्राम.

❖ ❖ ❖

# अध्याय १४ वा

अमर नाग किन्नर दिक्पाल । चित्रकूटिं आले तत्काल ।।
राम करिति नमना सर्वांना । मुदित देव जैं लाभ लोचनां ।।
सुमनें वर्षुनि देव-समाज । म्हणति नाथ अम्हि सनाथ आज ।।
त्रिनवुनि दु:सह दु:खें वदले । हर्षित निज निज सदना वळले ।।
चित्रकूटिं वसले रघुनंदन । कळे वृत्त ते येती मुनिगण ।।
येतां बघुनि मुदित मुनिवृंद । करिति दण्डवत रघुकुलचंद ।।
मुनी रघुवरा हृदयीं घेती । सुफल व्हावया आशिस देती ।।
रामसितालक्ष्मण–छवि देखति । साधन सकल सफल निज लेखति।।

**दो०–योग्य मान देउनी प्रभु बोळविती मुनिवृंद ।।**
**करिति योग जप याग तप निजाश्रमीं स्वच्छंद ।।१३४।।**

कोळि-किरातां वृत्त मिळालें । हर्षति जणुं नवनिधि घरिं आले ।।
भरुनी कंदमूलफल द्रोणें । निघति रंक जणुं लुटण्या सोनें ।।
त्यांत आधि जिहिं बंधु पाहिले । अपर तया पथिं पुसत चालले ।।
श्रवत कथित रघुवीर–रुचिरता । रघुराजा सब बघति पोचतां ।।
भेट पुढें ठेउनि जोहारति । अति अनुरागें प्रभुला पाहति ।।
जिथें तिथें स्थित चित्रिं कि दिसले । तनु पुलकित लोचनिं जल झरलें ।।
स्नेहमग्न सब, राम ओळखति । प्रिय वचनें सकलां सन्मानति ।।
पुन: पुन्हां प्रभुला जोहारुनि । वचन विनीत वदति कर जोडुनि ।।

**दो०–नाथ सनाथ अतां अम्हीं सब, दिसतां प्रभु–पाय ॥**
**अमच्या भाग्यें आगमन अपलें कोसलराय ॥१३५॥**

धन्य धरणि पथ पर्वत कानन । जेथें कृत तुम्हि नाथ पदार्पण ॥
धन्य विहग मृग काननचारी । सफल जन्म तव–दर्शनिं सारीं ॥
आम्हि सपरिजन धन्यचि सगळे । रूप नेत्रभर दिसले अपलें ॥
कृत निवास चितुनि शुभ ठावा । सकल ऋतूंत इथें सुख पावां ॥
आम्हीं सेवा करूं सर्वपरि । ठेउं दूर अहि वाघ सिंह करि ॥
दुर्गम वन गिरि गुहा कंदरा । विदित अम्हां प्रभु कोन कोपरा ॥
ठायि ठायि बहु शिकार करवूं । सर निर्झर जलठाय दाखवूं ॥
नाथ ! दास अम्हि सम परिवारा । आज्ञापित संकोचा न धरा ॥

**दो०–वेद–वचन–मुनिमन- अगम ते प्रभु करुणावास ॥**
**भिल्लवचन परिसति जसे जनक बालवचनास ॥१३६॥**

प्रेम चि केवल रामा प्यारे । जाणणार घ्या जाणुनि सारे ॥
मग रामें वनचर सब तोषित । मृदुवचनीं प्रेमें परिपोषित ॥
बोळविले, शिर नमवुनि निघती । श्रवत कथित प्रभुगुण गृहिं येती ॥
असे उभय बंधू सह सीतें । वसति विपिनि सुर-मुनि-सुखदाते ॥
जैं येउनि राहति रघुनायक । तैं पासुन वन मंगलदायक ॥
नानाविध तरु फुलले फळले । मंजु लता–मंडप वर बनले ॥
सुर विटपां–सम सहज सुशोभन । आलें जणुं सोडून विबुध–वन ॥
गुंजति मधुकर मंजु कदंबक । त्रिविध वायु वाहें सुखदायक ॥

**दो०–नीलकंठ कलकंठ शुक चातक चक्र चकोर ।।**
**बोलति बहुविध विहगबहु श्रवण–सुखद मनचोर।।१३७।।**

कपि केसरि करि किरी कुरंगें । विगत वैर विहरति सब संगें ।।
मृगये फिरत राम छवि निरखति । कुरग–कदंब अधिक आनंदति ।।
विवुध विपिन जितकीं जगिं असती । बघुनि रामवन सेर्षा स्तवती ।।
सुरसरि सरस्वती रविकन्या । मेकल दुहिता, गोदा, धन्या ।।
सब सर सिंधु नदी नद नाना । मंदाकिनिचे करिती गाना ।।
उदय–अस्त–पर्वत कैलासहि । मंदर मेरु सकल सुर–वासहि ।।
शैल हिमाचल आदिक जितके । चित्रकूट यश गाती तितके ।।
विंध्य मुदित, मनिं सुख ना मावे । विपुल महत्त्व विनाश्रम पावे ।।

**दो०–चित्रकूटचे विहग मृग वेलि–विटप–तृण–जाति ।।**
**पुण्यपुंज सब धन्य असं वदति देव दिन राति ।।१३८।।**

❖ ❖ ❖

## अध्याय १५ वा

नयनवंत रघुवरास पाहुनि । होति विशोक जन्म-फल पावुनि ।।
चरणरजें अचरां सुख भारी । झाले परम पदा अधिकारी ।।
गिरिकानन तें स्वभाव–शोभन । मंगलमय अति पावन–पावन ।।
महिमा त्याचा वदवे कैसा । जिथें करिति सुखसिंधु निवासा ।।
क्षीराब्धीस अयोध्ये त्यागुनि । सिताराम जिथं राहति येउनि ।।
वन–सुषमा ना करवे वर्णन । जरि शत सहस्त्र सहस्त्र-आनन ।।

तीं मज वर्णुं कशी तरि येई । पल्वल-कमठ कि मंदर घेई ॥
सेविति लक्ष्मण तनमनवाणीं । शील-स्नेह कोण वाखाणी ॥

**दो०–सिताराम–पद बघ बघुनि अपणांवरती स्नेह ॥**
**स्वप्नि न लक्ष्मण चित्ति कधि बंधु मातृ पितृ गेह ॥१३९॥**

सुखी सिता रामासह राही । पुर परिजन गृह अठवण नाहीं ॥
प्रिय विधुवदना पळ पळ निरखित । जणूं चकोर-कुमारी प्रमुदित ॥
पतीस्नेह नव वाढत पाही । कोकी दिनि तशि हर्षित राही ॥
सियमन रामचरणिं अनुरागे । अमित-अयोध्याप्रिय वन लागे ॥
पर्णकुटी प्रिय प्रियतम–संगें । प्रिय परिवार विहंग कुरंगें ॥
श्वशुर–सासुसम मुनिवर–दंपति । अशन मूल फल कंद सुधा अति ॥
नाथ–साथ तृणशय्या सुंदर । मदन-शयन शत समान सुखकर ॥
जिच्या विलोकनिं लोकप होती । विषय-विलास कि तिला मोहिती॥

**दो०–स्मरतां रामा त्यजति जन तृणसम विषयविलास ॥**
**राम प्रिया जगजननि सिय विस्मय इथें कशास ॥१४०॥**

जशि सीता लक्ष्मण सुख लभतीं । तेंच करिति रघुनाथ बोलती ॥
कथिति पुरातन कथा कहाणी । श्रवणि बंधु सीता सुखखाणी ॥
जैं जैं राम अयोध्ये स्मरती । तैं तैं जलें विलोचन भरती ॥
स्मरुनि मातृ पितृ परिजन भावां । भरतस्नेह सुशील सुसेवा ॥
कृपासिंधु दुःखा प्रभु पावति । धरिति धीर ही वेळ न, जाणति ॥
बघुनि, बंधु सीता व्याकुळती । जेंवि तनुस छाया अनुसरती ॥

त्यांची दशा बघुनि रघुनन्दन । धीर कृपाल भक्त–उर–चंदन ।।
सांगुं लागले कथा पुनीता । श्रवणिं सुखावति लक्ष्मण सीता ।।

**दो०–राम बंधु–सीते सहित शोभति पर्णकुटींत ।।**
**शची जयंतासह जसे वासव अमरपुरींत ।।१४१।।**

प्रभु सीता लक्ष्मणास रक्षति । बुबुळांना पापण्या जशा अति ।।
सेविति बंधु सिता रघुवीरा । नर अविवेकी जसा शरीरां ।।
प्रभु वनि असे वसति सुखि भारी । खग–मृग सुर-तापस-हितकारी ।।
रामगमन वनि शोभन कथिलें । ऐका सचिव जसे पुरि आले ।।
प्रभुस पोचवुनि निषाद फिरला । येतां सचिव सहित रथ दिसला ।।
मंत्री विकल बघूनि निषाद । वदवे ना किती होइ विषाद ।।
राम राम! सिय! लक्ष्मण! वदला । सचिव विकल अति महिवरि पडला
बघुनि दक्षिणे हय खिकाळति । पंखांविण जणुं विहग विव्हळति ।।

**दो०–तृण न चरति ना पिती जळ ढाळिति लोचन वारि ।।**
**पाहुनि रघुवर–वाजि, सब व्याकुळ निषाद भारि ।।१४२।।**

धैर्य धरुनि तैं वदे निषादू । सोडा अतां सुमंत्र विषादू ।।
तुम्हि पंडित परमार्थि शहाणे । गणुनि वाम विधि धीरा धरणें ।।
विविध कथा मृदु वचने सांगुनि । रथीं बसविले उचलुनि आणुनि ।।
शोक–शिथिल रथ हांकूं शकत न । रघुवर विरह–दुःख हृदि दारुण ।।
पथि न चालती हय तडफडले । जणुं वनमृग रथि अणुनि जोडले ।।
ठेपाळति मग मागें पाहति । रामवियोगिं विकल पीडा अति ।।

'राम सिता लक्ष्मण' जे वदती। त्यां प्रेमें खिकाळत बघती ॥
वाजि विरहगति केवीं वदणें। मणिविण फणी विकळ तशि गणणें ॥

**दो०–होई निषाद विषाद वश बघुनि सचिव-तुरगांस ॥**
**धाडि तदा सूतासवें चौघां सुसेवकांस ॥१४३।**

सूता पोंचवुनी गुह फिरला। विरह-विषाद न जाई वदला ॥
घेउनि रथ पुरिं निषाद निघती। क्षणोक्षणीं अति विषण्ण बनती ॥
चिंति सचिव दुःखाकुल दीन। धिग् जीवन रघुवीर–विहीन ॥
अंतिं न राही अधम शरीर। घेइ न यश वियोगिं रघुवीर ॥
झाले प्राण अयश-अघ-भाजन। तरी न जाती काय किं कारण? ॥
अहह ! मंद मन अवसर चुकलें। हृदय अझुन तरि कां नहि फुटले ॥
हात चोळि, शिर पिटि पस्तावत। जणूं कृपण धनराशि गमावत ॥
वाणा बांधुनि सुवीर म्हणवुनि। सुभट जाइ जणुं पळुनि रणांतुनि ॥

**दो०–विप्र विवेकी वेदविद संमत साधु सुजाति ॥**
**जसा सुरा चुकुनी पितां सचिवा ताप तसाऽति ॥१४४॥**

स्त्री कुलीन जशि साध्वी ज्ञानी। पति देवता कर्म-मन-वाणीं ॥
राहि कर्मवश सोडुनि नाहो। तसा सचिव हृदिं दारुण दाहो ॥
सजल विलोचन दृष्टि हि थोडी। कान न ऐकति बुध्दी हि सोडी ॥
शुष्क ओष्ठ मुखि बसली लाटी। जिव न जाइ,उरिं अवधि कपाटीं ॥
बघवत ना तो विवर्ण भारी। माता पित्यां जणूं कीं मारी ॥

हानी-ग्लानी चित्ता व्यापी । यमपुरिचा पंथिकसा पापी ।।
शब्द न उमटे मनिं पस्तावे । जाउन नगरीं काय पहावें ।।
रामरहित रथ बघतिल जेही । संकोचति मज बघतां तेही ।।

**दो०–धावुनि पुसतिल जैं मला विकल नगर-नर-नारि ।।**
**उत्तर देणें त्यांस मी घालुनि उरिं पवि भारि ।।१४५।।**

पुसतिल दीन दु:खि सब माता । काय तया मी सांगुं विधाता ! ।।
यदा विचारिल लक्ष्मण-आई । सांगुं निरोप काय सुखदाई ।।
राम-जननि जैं येइ धाउनी । जशी धेनु नव वत्सा स्मरुनी ।।
पुसतां वदणें मी तीतें ही । गत वनिं राम बंधु वैदेही ।।
जो विचारि त्या उत्तर देणें । जाउनि नगरिं हेंच सुख घेणें ।।
जैं पुसतिल नृप दु:खी दीन । यज्जीवन रघुनाथाधीन ।।
उत्तर देऊं कुठुन मुख आणुनि । आलों कुशल कुमार पोचवुनि ।।
लक्ष्मणसिता-राम संदेश । श्रवुनि तजिति तनु-तृण हि नरेश ।।

**दो०–हृदय न भंगत पंकसें अटतां प्रियतम नीर ।।**
**वाटे विधिनें दिलें मज हें यातनाशरीर ।।१४६।।**

पश्चात्तापा करत पथिं असे । तमसातटिं रथ शीघ्र येतसे ।।
विनवुनि दिला निरोप निषादां । गत पदिं वंदुनि विकल विषादां ।।
सचिव संकुचित शिरण्या नगरीं । जणुं गुरु-गो-ब्राह्मणांस मारी ।।
बसुनि विटपतळिं दिवसा गाळी । संधि सापडे संध्याकाळीं ।।
शिरे अयोध्येमधिं अंधारीं । घुसे सदनिं रथ ठेउनि दारीं ।।

जयां जयां हें वृत्त मिळालें । नृपद्वारिं रथ बघण्या आले ॥
रथ ओळखति, विकल हय दिसती । गात्रं गरमिं गारांसम गळती ॥
नगर नारिनर विव्हळ तैसे । निघटत नीर मीनगण जैसे ॥

**दो०—ऐकुनि सचिवागमन सब व्याकुळ राणीवास ।**
**भवन भयद वाटे तया जणुं कीं प्रेतनिवास ॥१४७॥**

राण्या सब अति आर्त विचारति । उत्तर ये न विकल वाचा अति ॥
कान न ऐकति नयनिं न दिसतहि । वदा कुठें नृप ज्या त्या पुसतहि ॥
दासी बघुनी विकल सचिवासी । कौसल्यागृहिं नेती त्यासी ॥
जात सुमंत्रा दिसले राजे । अमृत-रहित जणुं इदु विराजे ॥
भूषण आसन शयन न कांहीं । पतित मलिन अति भूमितळा ही
घेत उसासे असे शोचती । स्वर्गातुनि जणुं पतित ययाती ॥
घडि घडि शोकें भरती छाती । पतित जळुनि छद जणु संपाती ॥
राम राम हे रामा ! स्नेही– । वदति राम लक्ष्मण वैदेही ॥

**दो०—बघुनि, सचिव जय जिव वदुनि करि दण्डवत् प्रणाम ॥**
**परिसुनि उठले विकल नृप वद सुमंत्र कुठं राम ॥१४८॥**

भूप सुमंत्रा हृदयीं धरती । बुडत कांहिं जणुं अधार लभती ॥
स्नेहें सन्निध घेति वसवुनी । पुसती नृपति येइ जल नयनीं ॥
राम-कुशल वद मित्रा स्नेही । कुठं रघुपति लक्ष्मण वैदेही ॥
परत आणले कीं गेले वनिं । ऐकुनि वारी सचिव-विलोचनिं ॥
शोकाकुल 'वद' म्हणति नरेश । सिता-राम-लक्ष्मण-संदेश ॥

रामरूपगुण–शिला स्वभावा । स्मरुनी स्मरुनि शोक हृदिं रावा ॥
राज्य देउं सांगुन दिधलें वन । ऐकुनि हर्ष–विषाद–रहित मन ॥
त्या-सुत-विरहें गेले प्राण न । महा पापि मज समान आन न ॥

**दो०–राम सिता लक्ष्मण जिथें पोचवि मज तेथेंच ॥**
**सखे! प्राण जाऊं बघति ना तर, सांगुं खरेंच ॥१४९॥**

घडि घडि राव वदति सचिवा गा । प्रियतम-सुत- संदेशां सांगा ॥
सखे युक्ति ती करि तरि बरवी । सीता लक्ष्मण राम दाखवी ॥
सचिव स-धीर वदे मृदुवाणी । महाराज ! पंडित नी ज्ञानी ॥
वीर सुधीर धुरंधर देवा । साधुसमाज सदा तुम्हि सेवां ॥
जन्म-मरण सुखदुःखें भोगहि । विरह लाभहानी प्रिय योगहि ॥
स्वामी ! कालकर्मवश घडती । बलपूर्वक जशि रात्र दिवस तीं ॥
सुखि हर्षति जड दुःखीं रडती । धीर मनीं उभयां सम गणती ॥
धीरा धरा विवेक-विचारीं । त्यजा शोक, सकलां हितकारी ! ॥

**दो०–प्रथम वास तमसातटीं गंगातीरिं दुजाहि ॥**
**स्नान करुनि जलपान, दो वीर वसति सीताहि ॥१५०॥**

सेवा बहुत निषादें केली । शृंगवेरिं ती रजनी गेली ॥
मग सकाळि वटपय मागवती । जटामुकुट निज शिरीं बनवती ॥
रामसखा मग नाव मागवति । प्रिये चढवुनी चढले रघुपति ॥
लक्ष्मण कार्मुकि बाण लावुनी । चढले प्रभू-आज्ञेस पावुनी ॥
मजला विकल बघुनि रघुवीर । वदले मधुर वचन धृत-धीर ॥

तात ! नमन तातास वदावें । घडि घडि पद-पंकजा धरावें ।।
पाय धरुनि मम विनति वदावी । मम चिंता नच तात करावी ।।
पथि वनिं मंगल कुशल आमचें । कृपा–अनुग्रह–पुण्यें तुमचें ।।

**छं०–तुमचे कृपेनें तात काननिं जात सुख पावेन मी ।**
**पाळूनि आज्ञा कुशल, बघण्या पाय, येइन फिरुन मी ।।**
**जननी सकल सांत्वूनि बहु पदिं नमुनि करुनी विनवणी ।**
**तुलसी करा तो यत्न जेणें कुशल राहति पुरधनी ।।१।।**

**सो०–वदा गुरुस संदेश धरुनि पद्मपद वार बहु ।।**
**करा असा उपदेश मज न शोचति कि अवधपति ।।१५१।।**

पुरजन परिजन सकलां प्रार्थुनि । सांगा मम विनती समजाउनि ।।
सर्वपरीं तें मम हितकारी । जे भूपा देती सुख भारी ।।
येतां सांगा निरोप भरता । नीति न सोडा राज्य पावता ।।
पाळा प्रजा कर्म-मन-वाणीं । सेवा जाणुनि सम सब जननी ।।
रक्ष अंतवरि बंधु ! बंधुपण । सेवुनि माता तात नि सज्जन ।।
असे सर्वदा जपा नृपानां । कीं कधि करिति न मम चिंता ना ।।
वदले कांहीं कठोर लक्ष्मण । राम मला विनविति त्या वर्जुन ।।
वारंवार शपथ निज घालुनि । बंधु-बाल-वच वदा न जाउनि ।।

**दो–नमुनि काहिं वदुं लागतां स्नेह–शिथिल वैदेहि ।।**
**स्थगित वचन लोचन सजल फुलले पुलकहि देहि ।।१५२।।**

तों रघुवर-कल जाणुनि, होडी । पार जावया नाविक सोडी ।।

रघुकुलतिलक अशापरि जाती । बघत उभा पवि करुनी छाती ॥
कसे सांगु मी अपले क्लेशां । आणि जिवंत रामसंदेशा ॥
पुढें सचिव–वाचा ना चाले । हानी–ग्लानि–शोकवश झाले ॥
सूतवचन परिसत नरनाहो । महिं पडले उरिं दारुण दाहो ॥
तळमळ दारुण मोह मनाला । बाधी गढुळी जणुं मीनाला ॥
करत विलापा राण्या रडती । कशि वदवे विपदा अति जड ती ॥
श्रवुनि विलाप दुःख दुःखाला । धैर्याचाही धीर पळाला ॥

**दो०–राउळि आक्रोशा श्रवुनि पुरिं कोलाहल घोर ॥**
**विपुल–विहगवनि पतित जणुं रात्रीं कुलिश कठोर ॥१५३॥**

प्राण–कंठगत झाले राउळ । व्याळ विना मणि जाणों व्याकुळ ॥
विकल इंद्रियें सगळीं भारी । जणुं सरिं सरसिजवन विण वारी ॥
क्षीण नृपति कौसल्ये भासत । जाणे रविकुल–रवी मावळत ॥
रामजननि उरिं धरि धीराला । बोले समयोचित वचनाला ॥
नाथ ! समजुनी करा विचार किं । राम–वियोग पयोधि अपार किं ॥
तारु अयोध्या नाविक आपण । पांथिक बसले सगळे प्रियजन ॥
धीर धरा तर पावूं पारा । ना तर बुडूं सहित परिवारा ॥
मनीं धरा प्रिय ! जर मम विनती । राम नि लक्ष्मण सिता भेटती ॥

**दो०–प्रियावचें मृदु बघति नृप उघडुनि विलोचनांस ॥**
**म्लान मीन तडफडत जणुं शिपत शीत जलास ॥१५४॥**

उठुनि बसति धृतधीर भूपवर । वद सुमंत्र कुठं राम कृपाकर ॥

लक्ष्मण कुठे राम सुस्नेही । प्रिय सुतवधू कुठे वैंदेही ॥
भूप विकल वहुविधा विलपती । युग-सम होइ, न सरत रात्र ती ॥
अंध–तापसी–शाप आठवत । कथा सकल कौसल्ये सांगत ॥
होति विकल वर्णित इतिहासा । रामरहित धिग् जीवन–आशा ॥
ठेउनि काय, काय तो करणें । जेणें प्रेमपण न मम पुरणें ॥
रघुनन्दन हा ! प्राणवासरा । तुजविण जगलों फार वासरां ॥
हा जानकि! लक्ष्मण! हा रघुवर! । तात चित्त–चातक घन हितकर ॥

**दो०–राम राम राम ! हि वदुनि राम राम हें राम ॥**
**रघुवर विरहें त्यजुनि तनु नृप गांठति सुरधाम ॥१५५॥**

❖ ❖ ❖

## अध्याय १६ वा

पावति दशरथ जिवन-मरण-फल । ब्रह्मांडें वहु भरि यश निर्मल ॥
जगत राम–विधुवदन विलोकित । राम–वियोगें मरण सुशोभित ॥
शोकाकुल सव राण्या रडती । रुप शील वल तेज वानती ॥
विविधपरीं वहु विलाप करती । वारंवार धरतिवर पडती ॥
विलपति विकल दास नी दासी । घरोघरीं रडती पुरवासी ॥
आज अस्तला रविकुलभानू । धर्म-अवधि गुण–रूप–निधानू ॥
देती सकल शिव्या कैकइला । नेत्रहीन जी करी धरणिला ॥
विलपत यापरि रात्र सरे ती । ज्ञानी सकल महामुनि येती ॥

**दो०–मग वसिष्ठ समयोचितां सांगुनि इतिहासांस ।।**
**निज–ज्ञानतेजें हरति सकलांच्या शोकास ।।१५६।।**

तेल–तरीमधिं नृपतनु ठेवुनि । सांगितलें दूतां बोलावुनि ।।
भरतापाशि पळत तुम्हि जाही । सांगुं नका नृपवृत्त कुणाही ।।
जा इतकेंच वदा भरताप्रति । युग बंधुंस गुरु नेण्या धाडति ।।
दूत धावले आज्ञा ऐकत । वरवाजिस वरवेगिं लाजवित ।।
अयोध्येंस जैं अनर्थ चाले । तैंहुनि कुशकुन भरता झाले ।।
रात्रि भयानक पाहे स्वप्नां । जागत करि कटु कोटि कल्पना ।।
ब्राह्मण भोजन बहु, दिनि दानां । करि अभिषेक शिवां विध नाना ।।
प्रार्थुनि मनि मागतात शंभुसि । कुशल मातृ-पितृ-परिजन-बंधुंसि।।

**दो०–भरत सचित असे मनि तोंच दूत येतात ।।**
**गुर्वाज्ञा ऐकत नमुनि गणेशास निघतात ।।१५७।।**

हय समीर–वेगानें हाकित । विकट नद्या गिरि वन ओलांडित
चिंता अति मनि काहिं रुचेना । उडुनिच जावें मनीं भावना ।।
एक निमेष जाइ सम वत्सर । असे निकट पुरि आले सत्वर ।।
नगरिं शिरत किति कुशकुन घडती। काक कुठायीं कटु ओरडती ।।
खर कोल्हे प्रतिकूल ओरडति । श्रवुनि भरत मनि शूल तदा अति
श्रीहत वन बागा सर सरिता । नगरी भारि भयाण निरखितां ।।
खग मृग हय गज नाहीं बघवत । राम वियोग–कुरोगें मृतवत ।।
नगरनारिनर विषण्ण भारी । जणुं सब हरले संपत् सारी ।।

**दो०-पुरजन भेटति वदति ना हळुच नमुनि जातात ॥**
**भरत कुशल पुसुं शकति ना भय विषाद चित्तांत ॥१५८॥**

हाटां वाटां वघवत नाहीं । व्यापि पुरिस जणुं दव दिशि दाही ॥
श्रवुनि 'येत सुत' कैकय नंदिनि । हर्षे रविकुल जलरुह-चांदिणि ॥
आरति सजुनि मुदित ये धावत । द्वारिंच भेटुनि ने भवनाप्रत ॥
भरता परिजन दुःखी दिसले । जणूं वनजवन तुहिनें सुकलें ॥
कैकयी हर्षित वचतनमनि । जणुं दव लावुनि मुदित किरातिनि
बघुनि सचिंत उदास सुतासी । पुसे "कुशल अमचे पितृवासीं" ॥
भरतें सकल कुशल सांगितलें । क्षेम कुशल निज कुलास पुसलें ॥
कुठें तात वद माता सकलहि । सिता कुठें. प्रिय राम-लक्ष्मणहि ॥

**दो०-श्रवुनी प्रेमळ सुतवचन नेत्रिं कपट-जल आणि ॥**
**भरत-कर्ण-मन-शूलसम वदे पापिणी वाणि ॥१५९॥**

तात ! गोष्ट मी सकल जुळवली । साह्य मंथरा विचारि वनली ॥
कार्य बिघडवी मधें विधि जरा । गेले भूपति सुरपति नगरा ॥
भरत ऐकतां विवश विषादा । सभय करी जणुं केसरि-नादा ॥
तात तात हा ! तात पुकारी । पतित भूतळीं व्याकुळ भारी ॥
जातां पाहुं न शकलो तुजला । सोंपविला रामासि न मजला ॥
धीर धरुनि सावरुनीं उठले । पितृमृति-हेतु माइ ! वद वदले ।
सुत-वच ऐकुनि कैकयि कथिते । चिरुनि मर्म जणुं विषा घालिते ।
अथ पासुनि इति अपली करणी । कुटिल कठोर मुदित-मन वर्णी ॥

**दो०–भरता विसरे पितृमरण श्रवत राम–वनवास ।।**
**जाणुनि आपण हेतु हृदि स्तब्ध धरुनि मौनास ।।१६०।।**

पाहुनि विकल सुता समजावी । क्षतावरी क्षारा जणुं लावी ।।
शोचनीय नहिं नृपति तात हे । भुक्त भोग, यश-सुकृत-संग्रहें ।।
जगतां सकल जन्म-फल पार्वति । अंति अमर पति सदना गांठति ।।
अशा विचारें शोक सोडणें । सह समाज पुर-राज्य भोगणें ।।
राजकुमार सभय अति ऐकत । पिकलेल्या क्षति इंगळ लागत ।।
सोडि उसासे हृदयिं धीर धरि । पापिणि कृत कुलनाश सर्वपरि ।।
होति दुष्ट अगि तुज इच्छा जर । कां मज जन्मतां न वधला तर ।।
तरु तोडुनि शाखेस शिंपिलें । मीन जगविण्या नीर उसपलें ।।

**दो०–हंसवंश दशरथ जनक भाऊ लक्ष्मण राम ।।**
**झालिस जननी जवनि तूं स्ववश न जैं विधि वाम ।।१६१।।**

कुमति ! कुमत हृदिं यदा ठरवले । खंड खंड कां हृदय न फुटलें ।।
वर मागत मनिं शूळ न उठले । जीभ झडुनि मुखिं किडे न पडले ।।
नृपें प्रतीति तुझी कशि धरिली । मरणकाळिं विधिनें मति हरिली ।।
नारि-हृदय-गति नुमजे विधिही । सकल कपट-अघ-अवगुण-खनिही ।।
सरल सुशील धर्मरत भूपति । ते केवीं स्त्रीस्वभाव जाणति ।।
जीव जंतु जगिं कोण असा ही । प्राणप्रिय रघुनाथ न ज्या ही ।।
तुज ते राम शत्रु अति गमले । कोण सत्य तूं वद मज काळे ! ।।
असशिल ती अस मुखिं मसि लाउनि । डोळ्यांआड उठुनि बस जाउनि ।।

**दो०—राम-विरोधिनि-पोटचा विधि उपजवि मजला हि ॥**
**कोण पातकी मज सम वदूं वृथा तुज कांहि ॥१६२॥**

श्रवुनि शत्रुहा मातृकुटिलता । क्रोधें जळे परी परवशता ॥
कुबडि तिथें त्या समयिं ठाकली । विविध विभूषणिं वसनीं नटली ॥
रुष्ट लक्ष्मणानुज तिज पाहुनि । जळत अनल घृत-आहुति पावुनि ॥
तडकन् कुब्रडा लाथ लावली । करत पुकार तोंडघशि पडली ॥
कुब्ड भंगले कपाळ फुटलें । दशन पडुनि मुख रुधिरा स्त्रवलें ॥
हाय ! दैव ! मी काय बुडवलें । इष्ट करत फळ अनिष्ट मिळलें ॥
बघे रिपुघ्न किं खोटि नखशिखां । फरपटवी धर धरुनि तच्छिखा ॥
भरत दयानिधि तिला सोडवति । उभय बंधु गत कौसल्येप्रति ॥

**दो०—म्लान मलिनवसना विकल कृशतनु सुदुःखभारिं ॥**
**कनक-कल्पवरलता वनिं जाणों शुष्क तुषारिं ॥१६३॥**

माता भरता बघत धावली । घेरि येइ मूर्च्छित महिं पडली ॥
बघत भरत अतिशय विव्हळला । पडे पायिं तनुभान विसरला ॥
माते ! दाखव तात कुठें ते— । बंधु रामलक्ष्मण सह सीते ॥
जगीं जन्मली कइकइ कां ही । जन्मे तरि कां वांझ न राही ॥
ती प्रसवे मज स्वकुल—कलंका । अपयश पात्रा प्रियद्रोहका ॥
त्रिभुवनिं मजसा कोण अभागी । तव गति अशि माते! ज्यालागीं ॥
पिता स्वर्गिं, रघुवर वनिं, केतू— । मी केवळ सब अनर्थ—हेतू ॥
धिग् मजला वेणू—वन—दहना । दोष-दुःख-अति दाह-भाजना ॥

**दो०–भरतवचन मृदु परिसुनी उठे सावरुनि माय ॥**
**घे उठवुनि हृदयीं तया नेत्रांतुनि जल जाय ॥१६४॥**

उजू स्वभाव माय हृदिं घेई– । प्रेमें, राम परत जणुं येई ।
मग लक्ष्मण-लघु-बंधुसि भेटत । शोक हृदीं स्नेहहि ना मावत ॥
बघुनी स्वभाव सर्वहि म्हणती । कां न असें, अशि राममाय ती ॥
घे निजांकि माता भरताला । अश्रु पुसुनि मृदु वदली वाळा ! ॥
वा ! अझुनिहि धर धीर वासरा । शोक सोड हा कुसुमयि न बरा ॥
नको मानुं मनिं हानीग्लानी । काल-कर्म-गति अघटित गणुनी ॥
द्यावा दोष न कुणाहि ताता ! । सर्वस्वीं मज वाम विधाता ॥
या दुःखांतहि मला जगवि तो । न कळे अझुनिहि काय वांछितो ॥

**दो०–पित्राज्ञें भूषण वसन त्यजुनि तात ! रघुवीर ॥**
**हर्ष विषाद न जरा हृदिं नेसति वल्कल-चीर ॥१६५॥**

राग रोष ना, प्रसन्न आनन । सकलां विविधपरीं परितोषुन ॥
जात वना सीता गत संगीं । राहि न रामचरण-अनुरागी ॥
श्रवत उठुनि गत लक्ष्मण साथ हि । राहि न यत्न करिन रघुनाथ हि ॥
तैं रघुपति सर्वां शिर नमती । लघुबंधूसीतेसह निघती ॥
गत वनिं राम नि सीता लक्ष्मण । गेल्यें ना, पाठविले प्राण न ॥
हें घडलें देखत नयनां या । त्यजि न अभागि जीव तरि काया
लाज न मज मत्प्रेम पहातां । रामसदृश सुत मी तन्माता ॥
जिवन मरण नृप नीट समजले । हृदय कुलिशशत-सम मम घडलें ।

**दो०–परिसुनि कौसल्या-वचन भरत नि राणीवास ।।**
**व्याकुळ विलपति, राजगृह जाणों शोक निवास ।।१६६।।**

विलपति विकल भरत दो भ्राते । कौसल्या धरिते हृदयातें ।।
नानापरिं करि भरत–सांत्वना । किति विवेकमय सांगुनि वचनां ।।
भरत सांत्विती सब मातांना । वदुनि कथा निगमागम नाना ।।
छल विहीन शुचि सरल सुवाणी । भरत बोलले जोडुनि पाणी ।।
जें अघ माय बाप सुत मारुनि । गो गोष्ठ कि भूसुर पुर जाळुनि ।।
जें अघ नारी बालक मारुनि । मित्र महीपति यां विष घालुनि ।।
जीं पातक उपपातक असतीं । कर्म वचन मन-भव कवि वदती ।।
तीं पापें विधि देवो मातें । हें मत जर मज संमत माते ! ।।

**दो०–जे सोडुनि हरिहरचरण भजति घोर भूतांहि ।।**
**तद्गति विधि दे जननि मत जर हें मान्य मला हि ।।१६७।।**

वेद विक्रयी धर्मदुही जे । पिशुन पराविं पाप वदती ते ।।
कुटिल कलीप्रिय कपटी क्रोधी । वेद–विदूषक विश्व–विरोधी ।।
लंपट लोभि लोलुपाचारी । जे परधनकामी परदारी ।।
त्यांची घोर गती मी पावें । जर माते ! मातें हें ठावें ।।
जे नहिं साधु संग–अनुरागी । पथ परमार्थ–विमूख अभागी ।।
नरतनु मिळुनि न हरिला भजती । हरिहर–सुयशा प्रिय न मानती ।।
श्रुतिपथ तजुनि वाम पथ धरती । वंचक वेषें जगां ठकवती ।।
त्यांची गति मज देवो शंकर । जननि ! भेद हा मी जाणें जर ।।

**दो०–सत्य भरत वच सहज ऋजु परिसुनि वदली माय ।।**
**तात! रामप्रिय तूं सदा असशि वचन-मन-काय ।। १६८ ।।**

प्राण राम प्राणाहुनि तुजला । प्रिय तूं प्राणांहुनि रघुपतिला ।।
विधु विषवर्षा करि हिम आगी । होति वारिचर वारि-विरागी ।।
ज्ञान न नाशी जरि मोहासी । तूं रामा प्रतिकूल न होसी ।।
' तुज हें संमत ' जे जगिं म्हणती । ते स्वप्निं न सुख सुगति पावती ।।
वदुनि असें त्या हृदयीं धरले । स्त्रवती स्तन पय, नेत्र सजळले ।।
यापरिं करितां विलाप भारी । वसल्या सरली रात्रच सारी ।।
वामदेव तैं वसिष्ठ आले । अणविति सचिव महाजन सगळे ।।
मुनि वहु उपदेशिति भरताला । वदुनि उचित परमार्थ वचांला ।।

**दो०–तात! धीर हृदिं धरुनि कर समयोचित जें, आज ।।**
**गुरुवचनें उठूनी भरत करण्या सांगति साज ।। १६९ ।।**

वेद विदित नृप तनुला स्नपविति । परम विचित्र विमाना सजविति ।।
विनवि भरत मातांना राखत । सकल दर्शनाभिलाषि राहत ।।
आले चंदन–अगरु–भार किति । वस्तु सुगंधी रुचिर नसे मिति ।।
चिता शरयुतटिं रचुनि सजवली । जणुं सुरपुर–सोपान शोभली ।।
दाह क्रिया सविधि सव केली । स्नानें करुनि तिलांजलि दिधली ।।
श्रुति–स्मृती अनुसार पुराणां । भरत करति दशगात्र–विधानां ।।
आज्ञा देति जिथें जशि मुनिवर । तिथें तसें कृत सर्व अमित वर ।।
होतिं विशुद्ध देति वहु दानां । धेनु वाजि गज वाहन नाना ।।

**दो०–सिंहासन भूषण वसन अन्न धरणि धन धाम ॥**
**भरत भूसुरां देति ते झाले प्रपूर्ण काम ॥१७०॥**

❖ ❖ ❖

## अध्याय १७ वा

करणि पितृहिता कृत जशि भरतें । लाखमुखोंहि न ती सांगवते ॥
वघुनि दिवस शुभ मुनिवर आले । सचिव महाजन सकल अणविले ॥
राजसभें वसले सव जाउनि । भरत सबंधु घेति बोलावुनि ॥
भरता निकट वसिष्ठ वसविती । नीति–धर्ममय वचन बोलती ॥
मुनिवर वदले प्रथम कथेसी । कैकयि–करणी कुटिल करि जशी ॥
नृप–धर्मव्रत सत्य हि वानिति । त्यजुन तनुस जे प्रेम निभाविति ॥
वदत राम–गुण–शिला–स्वभावा । लोचनिं सजल पुलक मुनिरावा ॥
लक्ष्मण–सिता प्रीति मग वानुनि । स्नेहिं शोकिं वुडले ज्ञानी मुनि ॥

**दो०–पहा भरत भावी प्रबल कथित विकल मुनिनाथिं ॥**
**हानि लाभ जीवन मरण यश अपयश विधिहातिं ।१७१॥**

हें जाणुनि कोणा द्या दोषा । वृथा कुणावर करणें रोषा ॥
तात ! विचार करुनि मनिं पाही । शोचनीय नृप दशरथ नाहीं ॥
शोच्य विप्र जो वेद–विहीन । त्यजुनी स्वधर्म विषयीं लीन ॥
शोच्य नृपति जो नीति न जाणत । प्रजा प्राणशी प्रिय ना वाटत ॥
वैश्य कृपण धनवान शोच्य तो । जो न अतिथि-शिव-भक्ति जाणतो॥
शूद्र विप्र–अपमानि शोच्य तो । मानी ज्ञानगर्वि बहु वदतो ॥

शोचनीय पतिवंचक नारी । कुटिल कलहरत इच्छाचारी ।।
ब्रह्मचर्य जो व्रत ना पाळी । शोच्य कि बटु गुर्वाज्ञा टाळी ।।

**दो०-शोच्य गृहीं जो मोहवश कर्मपथाला त्यागि ।।**
**शोच्यहि यती प्रपंच-रत जो न विवेकि विरागि ।।१७२।।**

वानप्रस्थहि शोका-जोगा । त्यजुनि तपा ज्या आवड भोगां ।।
पिशुन शोच्य, विण हेतू क्रोधी । जननि जनक गुरु बंधु विरोधी ।।
शोच्य सर्वपरि पर-अपकारी । निजतनुपोषक निर्दय भारी ।।
सर्वपरीं अति शोच्य सतत तो । जो त्यजुनी छल हरिस न भजतो ।।
शोचनीय नहिं कोसलरावहि । भुवनि चतुर्दश प्रगट प्रभावहि ।।
झाला ना, होणें ना, नाहीं । भूप भरत, सम तव जनकाही ।।
विधिहरिहर सुरनाथ दिशापति । दशरथ गुणगाथा सव वानति ।।

**दो०-तन्महती कशि वर्णवे तात ! सांग कोणास ।।**
**राम लक्ष्मण नि तुम्हि उभय, असे सूनु शुचि ज्यांस ।।१७३।।**

सर्वपरीं भूपति बहुभागी । वृथा खेद करणें त्यां-लागीं ।।
त्यजा शोक हें ऐकुनि समजुनि । पाळा राजाज्ञा शिरिं मानुनि ।।
नृपें राज्यपद दिलें तुम्हांला । सत्य करावें पितृवचनाला ।।
त्यक्त राम ज्या वचनालागीं । त्यक्त शरीर राम-विरहागीं ।।
वचन नृपां प्रिय, प्रिय त्यां प्राण न । करा तात पितृ-वच-परिपालन ।।
करा धरुनि शिरिं भूपाज्ञेला । यांत भलेपण सर्व तुम्हांला ।।
परशुराम मानुनि पित्राज्ञा । वधिति जननि विश्रुत लोकांना ।।

दिलें ययातिस यौवन तनये । पित्राज्ञें त्यां अयश अघ न ये ॥

**दो०–अनुचित उचित विचारविण पितृवचना करतात ॥**
**जगिं सुख-सुयशा पात्र ते अमरपुरीं वसतात ॥१४७॥**

सत्य अवश्य भूप वच करणें । पाळा प्रजा शोक परिहरणें ॥
नृप सुरपुरिं पावति परितोषा । सुकृत सुयश पावाल न दोषा ॥
वेद–विदित संमत सर्वांसी । पिता देइ तो करि राज्यासी ॥
करा राज्य कीं ग्लानी टाकुनि । माना मम वचना हित जाणुनि ॥
श्रवुनि, राम–वैदेहि सुखावति । पंडित कोणि न अनुचित ठरवति
कौसल्यादि सकल माता ही । प्रजा–सुखें पावती सुखाही ॥
तव मर्मा रामाच्या जाणति । भले सर्वपरिं तुम्हि, ते मानति ॥
येतां राम राज्य सोंपावें । स्नेहें सुंदर पद सेवावे ॥

**दो०–कराच गुर्वाज्ञा कथिति सचिव जोडुनी हात ॥**
**रघुपति येतां उचित जें तें करणें तैं तात ॥१७५॥**

कौसल्या धरि धीर म्हणे हे ! । पुत्र, पथ्य गुर्वाज्ञा आहे ॥
ती आदरणें हितकर मानुनि । त्यजणें खेद कालगति जाणुनि ॥
वनिं रघुपति सुरपुरिं नरराणा । तूं तर कातर असा सुजाणा ॥
प्रजा सचिव सब माता परिजन । सकलां बाळ ! तूंच अवलंबन ॥
बघुनि वाम विधि काळ कठोर । तनु ओवाळि माय, धर धीर ॥
गुर्वाज्ञा शिरिं धरुनी आचर । प्रजे पाळि, परिजन दुःखा हर ॥
गुरुचें वचन सचिव-अनुमोदन । श्रुत भरतें जणुं हृदया चंदन ॥

वरती श्रुता मातृ-मृदु-वाणी । स्नेह शील ऋजुता-रस-खाणी ।।

छं०—रस-खाणि सरला मातृवाणी भरत परिसुनि विव्हळे ।
लोचन सरोजें स्रवति सिंचति विरह अंकुर नव जळें ।।
बघुनी दशा ती समयि त्या सब देहभाना विसरती ।
सुस्नेह सीमा सहज, तुलसी आदरें सब वानती ।।१।।

सो०—भरत कराब्ज जुळून धीर धुरंधर धीर धरि ।।
वचन अमृति घोळून सकलां उचितोत्तर देति ।।१७६।।

## मास पारायण, अष्टादश विश्राम.

❖ ❖ ❖

## अध्याय १८ वा

गुरुनीं कृत उपदेश शुभ मला । प्रजा सचिव संमत तो सकलां ।।
आई आज्ञपि समुचित गणुनी । इच्छितोच करण्या शिरिं धरुनी ।।
गुरुपितृ-मातृ-स्वामि—हित-वचनें । मुदित मनें शुभ जाणुनि करणें ।।
उचित किं अनुचित करत विचारा । धर्मनाश, शिरिं पातक भारा ।।
तुम्हि तर द्यां ऋजु उपदेशा, जो । करिल भलें मम आचरतां तो ।।
जरि हें मी जाणतों नीटसें । परि परितोष न जीविं होतसे ।।
अतां विनति मम ऐकुन घेणें । मग मज-जोगी शिकवण देणें ।।
क्षमा ! देत उत्तर अपराधू । आर्त-दोष--गुण गणति न साधू ।।

**दो०–सिताराम वनि नाकि नृप म्हणां राज्य कर तात ! ॥**
**समजां मम हित होइ कीं महा कार्य निज यांत ? ॥१७७॥**

सीतापति–सेवें अमचें हित । तें तों जननि कुटिलतेनें हृत ॥
मी विवरुनि पाहिलें मनां ही । अन्य उपायीं हित मम नाहीं ॥
शोक–समाज राज्य का गणना । दृष्टि राम-सिय-लक्ष्मण-पद ना ॥
वृथा वसनविण भूषण भारहि । वृथा विरतिविण ब्रह्मविचारहि ॥
सरुज शरीर वृथा वहु भोगहि । विण हरिभक्ति वृथा जप योगहि ॥
वृथा जिवाविण काया सुंदर । वृथा सर्व माझें विण रघुवर ॥
आज्ञा द्या जातों रामाप्रति । हा सिद्धांत एक हित मम अति ॥
मज नृप करुनी स्वहित वांछितां । तें स्नेहज-जडता-वश कथितां ॥

**दो०–कैकयीसुत कुटिल मति राम विमुख गत लाज ॥**
**तुम्हि वांछां सुख मोह वश मज अधमा द्या राज्य ॥१७८॥**

सत्य वदें विश्वासा धरिजे । धर्मशील नरनाथ पाहिजे ॥
हटें द्याल मज राज्यां जेव्हां । रसा रसातळिं जाइल तेव्हां ॥
पापनिवास कोण कीं मजसा । ज्यास्तव सिताराम वनवासा ॥
रायें रामा कानन दिधलें । विरहिं अमरपुरिं जाउनि वसले ॥
मी शठ सकल अनर्थां कारण । गोष्टि ऐकतों वसुनि सचेतन ॥
विण रघुवीर बघुनि आवासा । जगले प्राण सहुनि उपहासा ॥
राम–पुनीत विषय–रस–रुक्ष । लोलुप भूमी भोग–बुभुक्षू ॥
किती वदूं मी हृदय–कठिणता । कुलिशा लाजवि मिळवि महत्ता ॥

**दो०—कार्य कठिण कारणाहुनि माझा दोष न लेश ॥**
**उपल-अस्थि-हुनि लोह-पवि कठिण कराल विशेष ॥१७९**

कैकेयी-भव-तनु-अनुरागें । पामर पुरते प्राण अभागे ॥
प्रियविरहीं प्रिय मला प्राण जर । पुढें दिसेल कळेल फार, तर ॥
लक्ष्मण-राम-सिते वन दिधलें । स्वर्गि पाठवुनि पतिहित केलें ॥
घे वैधव्या अयशा आपण । प्रजे शोक-संताप समर्पण ॥
दे सुख सुयश सुराज्य मला तरि । कैकयि सर्वांचे कार्या करि ॥
याहुनि भलें काय मम आतां । त्यावर अभिषेका करुं वघतां ॥
जन्मुनि कैकइ जठरिं जगामधिं । काहि न मजला अनुचित यामधिं
विधि रचि सगळचा मम योगाला । प्रजा पंच मग साह्य कशाला ॥

**दो०—ग्रहगृहीत नी वातवश त्यांतहि इंगळीमार ॥**
**त्यास पाजणें वारुणी वदा काय उपचार ॥१८०॥**

कैकयिसूनु-योग्य जगिं जें ही । चतुर विरंचि मला दे ते ही ॥
दशरथतनय राम—लघु—भाऊ । दिला विधीनें वृथा प्रभाऊ ॥
तुम्हि म्हणतां कर राज्यारोहण । राजाज्ञा ती सर्वां शोभन ॥
उत्तर कैसें कोणा द्यावें । रुचें जयां जें सुखें म्हणावें ॥
मी नि कुमाता यां वाचोनी । कोण म्हणति कृत भले म्हणोनी ॥
मजविण सचराचरांत कोणहि । ज्या प्राणप्रिय सिताराम नहि ॥
हानि परम लाभ चि सब मानां । दुर्दिन माझे दोष कुणा ना ॥
प्रेम-शील—संशयवश आहां । उचित सर्व जें सब वदताहां ॥

**दो०–रामसाय अति सरलधी प्रेमा मजवरि भारि ॥**
**वदे स्वभावें स्नेह वश बघुनि दीनता सारि ॥१८१॥**

जग जाणें गुरु विवेक सागर । त्यांस बदरसम विश्व करावर ॥
तिलक-साज मज सजती तेही । जैं विधि विमुख, विमुख अवघेही ।
या जगिं विना राम सीता ही । कोणि म्हणेना 'मम मत नाहीं' ॥
सुखें सहिन ऐकेन हि कानीं । अंति पंक कीं जेथें पाणी ॥
भय न मज कि जग म्हणेल खोटा । परलोकाचा नसे दुखोटा ॥
एकच दुःसह दाह मनाला । दुख मजमुळें सितारामांला ॥
जीवन-लाभ भला लुटि लक्ष्मण । त्यजि सब लावी रामचरणिं मन ॥
मम जन्मच रघुनाथ–वनास्तव । कां अभागि पस्तावुं अवास्तव ॥

**दो०–माझी दारुण दीनता वदुं सकलां नमुं पाइं ॥**
**ना दिसतां रघुनाथपद उरजळजळ ना जाइ ॥१८२॥**

अन्य उपाय न सुचे मला तर । जिविचें विदित कुणा विण रघुवर ॥
एकचि निश्चित दिसे मनासी । कीं प्रभातिं चलतो प्रभुपासीं ॥
यद्यपि मी वाइट अपराधी । जरी मजमुळें सर्व उपाधी ॥
तदपि शरण सन्मुख जैं बघतिल । क्षमुनि सकल वहु कृपा वर्षतिल ॥
शील भीड अति ऋजू स्वभाव । कृपा-स्नेह-सद्मचि रघुराव ॥
रिपु-अहितहि कधिं राम नाचरति । मी शिशु सेवक जरी वाम अति ॥
तुम्हिहि पंच मानुनि मम हित पर । द्या निरोप आशीर्वच सुंदर ॥
जेणें श्रवुनि विनति जन गणुनी । येति राम नृपधानिं परतुनी ॥

**दो०-जन्म कुमाता जठरिं जरि मी शठ दोषि सदा हि ॥**
**त्यजिति न मज रघुवीर निज गणुनी. प्रतिति मलाहि ॥१८३॥**

भरत-वचन सकलां प्रिय गमलें । राम-स्नेह सुधें पाकवलें ॥
लोक वियोग-विषम-विषिं जळतां । जागति मंत्र सबीज ऐकतां ॥
माय सचिव गुरु पुर नर-नारी । स्नेहें विकल सकल तैं भारी ॥
मानिति भरता फार, वदति ही । साक्षात् राम प्रेम-मूर्ति ही ॥
तात भरत कां वदां न ऐसें । तुम्हि रामप्रिय असां प्राणसे ॥
जो पामर अगल्या मति जडतें । लादि तुम्हांवर जननि-कुटिल ते ।।
तो शठ पूर्वज कोटि समेतां । वसे कल्पशत नरक-निकेतां ॥
अहि-अघ-अवगुण मणि ना ग्रहतो । हरि विष दुःख अधनता दहतो ॥

**दो०-चला च वनिं रामाकडे भरत ! मंत्र शुभ फार ॥**
**दिला शोकसागरिं बुडत सकला तुम्हि आधार ॥१८४॥**

मोद मनिं न थोडा सर्वांनां । घनस्वनें चातक-मोरांनां ॥
चलणें उदयिं कळत शुभ निर्णय । होति भरत सकलां प्राणप्रिय ॥
नमुनि मुनिंसि भरता शिर नमवुनि । सकल निघति घरिं निरोप घेउनि
धन्य भरत जीवन या जगतीं । शीला स्नेहा वानित वळती ॥
कथिति परस्पर सुकार्य झालें । गमन तयारिस सकल लागले ॥
गेह-रक्षणा ज्यांस राखिती । त्यां वाटे जणुं गळां कापिती ॥
'रहा म्हणा न कुणां' कुणि सांगत । जीवन-लाभ न कुणां आवडत ॥

**दो०-जळो संपदा सदन सुख सुहृद बंधु पितृ माय ॥**
**रामपदोन्मुख होत जीं करिति न मुदा सहाय ॥१८५॥**

सजिति घरोघर वाहन नाना। हर्ष कि उदयीं करूं प्रयाणा ॥
भरत जाइ घरिं करी विचारा। पुरिं हय गज गृह खजिना सारा ॥
असे सकल रघुपति-संपत्ती। त्यजुन जाउं जर विना यत्न ती ॥
तर परिणामिं भलेंपण मम ना। स्वामीद्रोह अघाग्रणि गणना ॥
करी स्वामिहित सेवक तोहि। कोटि दोष कुणि मज देवो ही ॥
तैं शुचि सेवक बोलवि ते ही। स्वप्निं न चळले स्वधर्मि जे हीं ॥
मर्म धर्म सब उत्तम कथिलें। जे ज्या लायक तिथें राखिले ॥
करुनि यत्न सव रक्षक ठेवति। गेले भरत राम-मातेप्रति ॥

**दो०-जाणुनि जननी आर्त सब भरतें स्नेहसुजाण ॥**
**कथिल्या सजण्या पालख्या मेणे सौख्यद यान ॥१८६॥**

चक्र-चक्रि-सम पुरनर-नारी। वांछिति उदय आर्त उरिं भारी ॥
जागत रजनी सरली सगळी। भरत सुज्ञ सचिवां घे जवळी ॥
घ्या अभिषेक-वस्तु सब सांगति। पटतां रामा मुनि अभिषेकति ॥
चला शीघ्र; ते नमुनि परतले। त्वरें तुरगरथ नाग सजविले ॥
अरुंधती नी अग्नि ससाजहि। प्रथम रथीं निघती मुनिराजहि ॥
नाना वाहनिं विप्र-संहती। सकल तेजतप-निधान निघती ॥
लोक सकल सज-सजुनी यानां। चित्रकूटिं करिति ही प्रयाणा ॥
शिबिका सुभग, न जाति वानल्या। त्यांत सकल राण्याहि चालल्या ॥

**दो०-सोंपुनि पुर शुचि सेवकां, सकलां पाठवितात ॥**
**स्मरुनि राम-सीता-चरण भरत बंधु चलतात ॥१८७॥**

राम-दर्शनोत्सुक नर नारी । जाति करिणि करि वघुनि किं वारी ।।
सीताराम वनीं मनिं जाणत । भरत बंधुसह जाती चालत ।।
वघुनी स्नेह लोक अनुरागति । त्यजुनि वाजि गजरथ, पदिं चालति
ठेववि डोली जाउनि जवळीं । राम-माय मृदु वचना वदली ।।
सांगे ऐक रथीं वस बाळा ! । प्रिय परिवार दुःखि बघ झाला ।।
चालति तुम्हि चालतां सकल जन । सकल शोक कृश चलण्या शक्त न।।
वचन धरुनि शिरिं चरणां नमुनी । बंधु उभय जाती रथि बसुनी ।।
प्रथम दिनीं तमसा-तटिं वासा । करिति गोमतीं दुजा निवासा ।।

**दो०-पय-अहार, फल अशन कुणि नक्ताशन करतात-।।**
**व्रत नेमां, रामास्तव भोगादी त्यजतात ।।१८८।।**

❖ ❖ ❖

## अध्याय १९ वा

वसुनि सई-तटिं उदयिं निघाले । शृंगवेरपुर-समीप आले ।।
समाचार सब मिळे निषादा । हृदयिं विचार करी सविषादा ।।
कारण कवण भरत वनिं जाती । कांहि कपट वसतें तरि छातीं ।।
कपट-भाव जर मनांत नसतां । तर कां कटका सवें आणता ।।
मनिं कीं सानुज राम वधावे । सुखें अकंटक राज्य करावें ।।
भरत न राजनीति मनिं आणी । तदा कलंक अतां जिव-हानी ।।
रण-झुंजार सुरासुर मिळती । रामा समरिं न कोणि जिंकती ।।
विस्मय काय भरत असं करती । नहि विषवल्लि अमृतफळ फळती ।।

**दो०-गुह विचार हा ज्ञातिला, व्हा सावध, सांगून ॥**
**घ्या क्षेपणि बुडवा तरणि घ्या घाटां अडवून ॥ १८९ ॥**

व्हा सुसज्ज सब अडवा घाटां । रणमरणा सब करा कि थाटा ॥
भरतासवें लढूं रणरंगां । जगतां उतरुं न देणें गंगा ॥
रणीं मरण वरि गंगातीरहि । रामकाजि, पळभंगु शरीरहि ॥
मी जन नीच भरत नृप भाऊ । असें मरण बहु भाग्यें पाऊं ॥
स्वामिकाजि रण घोर करीनहि । चौदा भुवन यशें धवळीन हि ॥
प्राणां अर्पिन रघुनाथास्तव । मुद-मोदक मम दो हातां तंव ॥
ज्याची साधु समाजि न गणना । स्थान रामभक्तांत ज्यास ना ॥
वृथा जगे जगिं तो भूभारहि । जननी-यौवन-विटप-कुठारहि ॥

**दो०-विगत-विषाद निषाद पति लोकिं भरुनि उत्साह ॥**
**स्मरुनि राम मागे त्वरें तूण धनू सन्नाह ॥१९०॥**

बंधु ! शीघ्र साजां सजधावे । आज्ञा ऐकुनि कुणि न डरावें ॥
भले नाथ ! हर्षें सब म्हणती । एकमेकिं आवेश चढवती ॥
जाति निषादा नमुनि चहुंकडे । शूर सकल, रणि युद्ध आवडे ॥
स्मरुनि रामपद-पद्म-उपानह । भात्या कसिति धनुकल्या ज्यांसह
कवच देहिं शिरिं टोप घालती । भाले बरच्या परशु घासती ॥
कुणि असि फरी-निपुण जे असती । जणुं महि सोडुनि गगनीं उडती ॥
निज निज टोळी साजा सजवुनि । गुह राजा जोहारिति जाउनि ॥
बघत सुभट सब लायक जाणे । सन्मानी सकलां नांवानें ॥

**दो०–बंधु ! काज मम आज अति घालुं नका धोक्यांत ।।**
**'वीर अधीर न व्हा' सकल आवेशें म्हणतात ।।१९१।।**

राम–प्रताप तवबल आजीं । कटक अभट-घोटक करुं आजीं ।।
प्राण देहिं तों फिरूं न चरणीं । रुंड–मुंड–मय करूं मेदिनी ।।
भव्य बघुनि गुह भट–समुदाया । आज्ञा दे रणढोल पिटाया ।।
तोंच वामदिशिं कोणि शिंकला । म्हणति शकुन पटु समर जिंकला ।।
शकुन–विचारें जरठ म्हणे कीं । भेटा भरता युद्ध नव्हे कीं ।।
भरत जाति रामा विनवाया । शकुन सांगतो विग्रह वाया ।।
तैं गुह म्हणे वृद्ध–वच बरवें । सहसा करुनि मूढ पस्तावें ।।
भरत–भाव–शीला ना कळतां । अति हितहानी नेणुनि लढतां ।।

**दो०–धरा घाट भट ! मिळुनि सब भेटूं जाणूं मर्म ।।**
**बघुनि मित्र-अरि-मध्य-गति करुं तसें मग कर्म ।।१९२।।**

स्नेह सुशीलें ये आकळतां । प्रीति वैर ना लपति लपवतां ।।
वस्तु भेटिच्या मग सजुं लागति । कंद मूल फल खग मृग मागति ।।
मीन पीन पाठीन पुरातन । पाटया-भर-भर आणिति बहुजन ।।
भेट जमवुनी भेटुं निघाले । मंगल–मूल शकुन शुभ झाले ।।
बघुन दुरून नाम निज सांगुन । कृत मुनिवरा दंडवत् प्रणमुन ।।
देति अशीस् राम प्रिय जाणुनि । मुनि भरतास कथिति समजाउनि।।
त्यजि रथ 'रामसखा' हें ऐकत । प्रेमभरें, उतरुनि, गत चालत ।।
गांव जात गुह नांवहि सांगत । जोहारी मस्तक महिं लागत ।।

**दो०–करत दंडवत बघुनि त्या भरत घेति हृदयासि ॥**
**लक्ष्मण–भेटचि होइ जणुं, मन न पुरे प्रेमासि ॥१९३॥**

भरत तया सुप्रीतिं भेटती । प्रेमरीति जन सेर्षा स्तवती ।
धन्यवाद नभि मंगल मूलहि । त्या स्तवुनी सुरवर्षति फूलंहि ॥
लोकिं वेदिं जो नीच सर्वपरिं । छायास्पर्शे स्नान वदति तरि ॥
रामबंधु लघु त्या कवटाळित– । भेटत, पुलकिं गात्र परिपूरित ॥
राम वदत जे जांभइ देती । पापपुंज त्यांपुढें न येती ॥
या तर रामें हृदयिं कवळला । कुलसमेत जग–पावन केला ॥
कर्मनाशि जल सुरसरिं पडतें । तया मस्तकीं कोण न धरतें ॥
जपतां उलटें नाम वाल्मिकी । बने ब्रह्मसम विदित लोकिं कीं ॥

**दो०–श्वपच शबर खस यवन जड पामर कोळि किरात ॥**
**राम वदत पावन परम होति भुवनि विख्यात ॥१९४॥**

हें युगिं युगिं चाले विस्मय ना । देति महति रघुवीर न कवणा ॥
रामनाम-महिमा सुर वानति । श्रवुनि अयोध्याजन सुख पावति
रामसख्या भेटुनि सुप्रेमां । कुशल सुमंगल पुसिलें क्षेमा ॥
भरत-शील-सुस्नेहा पाही । होई तदा निषाद विदेही ॥
लाज स्नेह मोद-भर आला । भरता टकमक बघत राहिला ॥
धीर धरुन मग वंदि पदांनां । प्रेमें विनवी जुळुनि करांनां ॥
कुशल-मूल पद-पंकज दिसलें । मी त्रिकाळि मम कुशल लेखलें ॥
प्रभु ! परमानुग्रहें अतां तव । सहित कोटिकुल मंगल मम तंव ॥

**दो०–मम करणी कुल समजुनी प्रभु महिमा जाणून ।।**
**जो न भजे रघुवीर पद तो विधिवंचित पूर्ण ।।१९५।।**

कपटी कातर कुमति कुजाती । लोकीं वेदिं बाह्य सब रीतीं ।।
रामें अपला जेव्हां गणलों । तैहुनि भुवनभूषण चि झालों ।।
प्रीति बघुनि ऐकुनि शुभ विनती । भरत-बंधु लघु तया भेंटती ।।
नाम निषाद सुवचनीं सांगत । राण्यांनां सादर जोहारत ।।
आशिस देति गणुनि सम लक्ष्मण । सुखीं जीव ! शतलक्ष शरद्गण ।।
पुर नर नारी गुहा न्यहाळुनि । सुखी होति जणुं लक्ष्मण पाहुनि ।।
म्हणति लब्ध या जीवन लाहू । रामभद्र भेटति निज बाहूं ।।
निज भाग्य स्तुति निषाद ऐकुनि । प्रमुदित चित्तें जाई घेउनि ।।

**दो०–खुणवि सेवकां सकल गत स्वामि–हेतु जाणून ।।**
**गृहिं तरुतळि सरबाग वनिं वास रचिति जाऊन ।।१९६।।**

शृंगवेर पुर भरता दिसतां । ये सर्वांगीं स्नेह-शिथिलता ।।
शोभति जात निषादाधारीं । जणुं अनुराग–विनय वपुधारीं ।।
असे भरत सब सेना संगे । जाति बघति जगपावन गंगे ।।
करिति राम–घाटाला प्रणमन । रामभेट जणुं होइ मग्न मन ।।
करिती प्रणमन पुरनरनारी । सुखी ब्रह्ममय बघुनी वारी ।।
स्नान करुनि कर जोडुनि मागति । रामचंद्र-चरणीं प्रेमा अति ।।
भरत वदति सुरसरि तव रेणू । सकल सुखद सेवक सुरधेनू ।।
जोडुन कर वर हाच मागतो । सितारामपदिं स्नेह सहज तो ।।

**दो०–असें स्नान करुनी भरत गुर्वाज्ञा घेतात ॥**
**माता स्नाता बघुनि सब तंबूंसह जातात ॥१९७॥**

जिथें तिथें जन तंबू देती। भरत शोध सर्वांचा घेती ॥
कृत गुरु-सेवा, आज्ञा घेती। बंधु राममातेप्रति येती ॥
चेपुनि पाय वदुनि मृदु वाणी। जननिस सकल भरत सन्मानी ॥
जननी-सेवा भावा सोंपवि। निषादास मग आपण बोलवि ॥
जाती घालुनि मित्र-करीं कर। स्नेह न थोडा शिथिल कलेवर ॥
मित्र ! मला तें स्थान दाखवा। जरा नयनं-मन जळजळ निववा ॥
सिता-राम-लक्ष्मण जिथं निजले। वदतां-नेत्र-कोंनि जल भरले ॥
भरत-वचन ऐकुन, सविषादू। नेई तेथें त्वरित निषादू ॥

**दो०–रघुवर शुचि शिंशपातळिं जिथें करिति विश्राम ॥**
**स्नेहें अति सादर भरत करि दंडवत् प्रणाम ॥१९८॥**

सुंदर कुश-शयनास पाहिलें। प्रदक्षिणा घालुनि मग नमिलें ॥
चरण-रेख-रज नेत्रां लावत। प्रीति-अधिकता नाहीं वदवत ॥
दोनचार कांचनकण दिसले। ठेविति शिरिं, सीतेसम गणले ॥
सजल विलोचन हृदयीं ग्लानी। मित्रा वदले वचन सुवाणीं ॥
श्रीहत सिता विरहिं द्युति हीनहि। जशीं नगर नरनारि मलीनहि ॥
पिता जनक तुलना कोणाशीं। करतलि भोगयोगजगिं ज्यांसी ॥
श्वशुर भानुकुल भानु भूपती। अमरावति पति हेवा करती ॥
प्राणनाथ तो प्रभु रघुनंदन। राम महतीनें वड्यां वडेपण ॥

**दो०–पतिव्रता–स्त्री शिरोमणि सीता–शेज बघून ।।**
**हृदय न कंपुनि फुटत हर! कठिण फार पविहून ।।१९९।।**

लालन–योग्य चारु लघु लक्ष्मण । असा त्रिकाळि न बंधु सुलक्षण ।।
प्रिय पुरजनां लाडका पितरां । प्राणप्रिय सीता–रघुवीरां ।।
कोमल मूर्ती मृदू स्वभावहि । देहा माहित गरम हवा नहिं ।।
ते विपत्ति अवघ्या वनिं साहति । कोटि कुलिश या हृदया लाजति ।।
रामें जन्मुनि कृत जग भास्वर । रूप–शील–सुख–सबगुण–सागर ।।
पुरजन परिजन गुरु पितृ माता । रामस्वभाव सब–सुख–दाता ।।
वैरीही रामाला स्तवती । 'भाषण-भेट-विनयिं मन हरती' ।।
कोटि शारदा अनंत शेषा । न वर्णवे प्रभु–गुण–गण–लेशा ।।

**दो०–सुखस्वरूप रघुवंशमणि मंगल–मोद–निधान ।।**
**ते कुशशय्ये झोपती विधिगति अति बलवान ।।२००।।**

रामकानिं कधि दुःख न पडलें । जीवनतरु–सम राजा जपले ।।
अक्षां पक्ष्म मणिस फणि जेवीं । जपति जननि सब दिननिशि तेवीं ।।
ते वनिं अतां फिरति पदचारी । कंद–मूल–फल–फूलाहारी ।।
धिक् कैकयी अमंगल–मूला । प्राणप्रियतमिं जी प्रतिकूला ।।
धिग् धिग् मी अघसिंधु अभागी । हे उत्पात सर्व ज्यालागीं ।।
कुल–कलंक मज सृजी विधाता । स्वामी द्रोही करी कुमाता ।।
तैं प्रेमें समजावि निषादू । नाथ ! करां कां वृथा विषादू ।।
तुम्हि रामा प्रिय तुम्हांस रामहि । हा सारांश दोषि विधि वामहि ।।

**छं०–कीं वाम विधिची कठिण करणी जननिला करि बावळी।**
**त्या रात्रि घडि घडि आदरें प्रभु करिति कीं स्तुति आपुली ।।**
**प्रियतम न तुलसी कोणि अपणांहून रामा शपथ कीं ।।**
**परिणामि मंगल जाणुनी मनि धैर्य धरणें नाथ ! कीं ।।१।।**
**सो०–अंतर्यामीं राम प्रेम भीड करुणायतन ।।**
**चला करा विश्राम या विचारि दृढ करुनि मन ।।२०१।।**

श्रवुनि सखा वच धरुनी धीरा । निघती स्मरत वासि रघुवीरा ।।
हें कळतांच नगर–नर नारी । निघति बघाया आतुर भारी ।।
प्रदक्षिणा मग नमना करिती । कँकड़ला अति दोष लाविती ।।
नेत्र अश्रुनीं भरून येती । वाम विधात्या दूषण देती ।।
भरतस्नेहा कोणि वानती । स्नेह निभावति नृप कुणि म्हणती ।।
निंदिति अपणां स्तविति निषादा । कोण वदेल विमोह–विषादा ।।
लोक अशापरि रात्रीं जागति । उदयीं नावा चालू लागति ।।
चढविति गुरुसि सुनावें शोभन । नव्याहि नौकामध्यें मातृगण ।।
चार घडित गत सव तीराला । उतरुनि भरत घेति शोधाला ।।

**दो०–नित्यकर्म कृत मातृपदिं नमुनि गुरुसि वंदून ।।**
**ठेउनि पुढें निषादगण कटक दिलें धाडून ।।२०२।।**

करिति निषादनाथ पथदर्शन । मातृ–पालख्या दिधल्या धाडुन ।।
धाडिति लघुबंधुला बरोबर । गमन करिति विप्रांसह गुरुवर ।।
स्वतां नमन सुर सरिला करती । लक्ष्मण-सीतारामां स्मरती ।।

पायीं चालत भरत चालले । कोतवाल संगें चालवलें ॥
कथिति सुसेवक वारंवार कि । नाथ हयावर व्हावें स्वार कि ॥
पायि पायि राम तर गेले । आम्हांस्तव रथ हय गज केले ॥
उचित मला जाणें कीं मस्तकिं । सेवक–धर्म कठोर समस्ति कि ॥
परिमुनि मृदु वच बघुनि भरतगति । म्लानि करिति सगळे सेवक अति ॥

**दो०–तिसरे प्रहरीं भरत मग प्रयागांत शिरतात ॥**
**राम राम सीता ! वदत भारी प्रेम–भरांत ॥२०३॥**

फोड झळकती पायीं कैसे । पंकज–कोषीं दवकण जैसे ॥
आले भरत कि पायीं आजीं । श्रवत विषादहि सकल समाजीं ॥
झालीं स्नानें शोधीं कळलें । तैं येउनी त्रिवेणिस नमलें ॥
सविधि सितासित नीरीं स्नाती । दान मान विप्रांना देती ॥
बघतां श्यामल-धवल तरंगां । भरत बद्धकर पुलकहि अंगां ॥
सकल कामदा सुतीर्थरावा ! । वेदीं जगिं विश्रुत–प्रभावा ॥
भीक मागुं सोडुनी स्वधर्मा । आर्त कोणत्या करि न कुकर्मा ॥
हें जाणुनी सुजाण सुदानी । सफल करिति जगिं याचकवाणी ॥

**दो०–अर्थ न धर्म न काम रुचि नको गतिहि निर्वाण ॥**
**जन्म जन्म रति रामपदिं हें वरदान न आन ॥२०४॥**

मला कुटिल जरि राम समजले । स्वामि-गुरूद्रोही जग वदलें ॥
सीताराम चरण-रति अनुपम । तुझ्या कृपें वाढो अनुदिन मम ॥
न करो स्मरणा जलद जन्मभर । जल याचत पवि वर्षो प्रस्तर ॥

चातक-घोष घटे तर दूषण। प्रेम वाढतां सर्व भलेपण ।।
कनक-तेज जसं वाढे दाहें। प्रियतमचरणनेम निर्वाहें ।।
श्रवुनि भरतवच, मधें त्रिवेणी। होइ सुमंगलदा मृदु वाणी ।।
तात भरत तुम्हि सबविधि साधू। रामचरण-अनुराग अगाधू ।।
करतां ग्लानी मनीं व्यर्थ ही। प्रिय रामा कुणि तुम्हांसम नहीं ।।

**दो०-श्रवुनि हर्ष हृदिं पुलक तनुं वेणिवचन अनुकूल ।।**
**भरत धन्य म्हणतात सुर हर्षित वर्षति फूल ।।२०५।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २० वा

प्रमुदित होति तीर्थपति-वासी। वैखानस बटु गृहीं उदासी-।।
मिळुनी म्हणती दहा पंधरा। भरत-शील नी स्नेह शुचि खरा ।।
श्रवत भरत शुभ राम-गुणांसी। आले भरद्वाज-मुनिपाशी ।।
करत दंडवत मुनिवर बघती। मूर्तिमंत निज भाग्य समजती ।।
धाउनि हृदयी धरले उठवुनि। केले कृतार्थ आशिस देउनि ।।
आसन दिलें नमुनि शिर वसती। जणुं संकोच-गृहीं घुसुं बघती ।।
अति चिंता कांहीं पुसतिल मुनि। वदति शील संकोचा लक्षुनि ।।
भरत अम्हां सव वृत्त मिळालें। विधि-करणीशि इलाज न चाले ।।

**दो०-तुम्हीं ग्लानि मनिं नका करुं मायकरणि चिंतून ।।**
**तात! न कैकइ दोषि गत गिरा मतिस फिरवून ।।२०६।।**

हें ही भलें म्हणे ना कोणी । लोक-वेद बुध-संमत दोनी ।।
तुमचें तात विमल यश गातिल । महती लोकहि वेद पावतिल ।।
श्रुति-जन-संमत, म्हणति सकल तो । राज्य करी ज्या पिता अर्पितो ।।
नृप सत्यव्रत तुम्हां आणते । राज्य धर्म सुख महति अर्पिते ।।
राम-गमन वनि अनर्थ मूल हि । तेणें सकल जगाला शूल हि ।।
तें भावीवश, राणि अडाणी । करि कुचाळि, अनुतापा मानी ।।
तुमचा त्यांत अल्प अपराधू– । म्हणे अधम तो मूर्ख असाधू ।।
करतहि राज्य न दोष लागता । रामहि संतोषते ऐकतां ।।

**दो०–भलें फार कृत भरत हें योग्यचि मत तव ठायि ।।**
**सकल सुमंगल मूल जगिं प्रेम च रघुवर-पायि।।२०७**

तें धन जीवन तुमचे प्राणहि । भूरिभाग्य सम तुम्हां कि आनहि।।
तात ! यांत तव नवल न कांहीं । दशरथसुत, लघु राम-बंधुहि ।।
पहा भरत ! रघुवरमनिं कांहीं । प्रेमपात्र कुणि तुम्हांसम नहीं ।।
सिताराम लक्ष्मण सुप्रीतीं । वर्णित तुम्हां रात्र सरली ती ।।
स्नानीं मर्महि कळे प्रयागीं । मग्न होति तुमचे अनुरागीं ।।
प्रेम तुम्हांवर तसं रामाचें । सुख जीवनिं जगिं जसं मूर्खांचें ।।
ही रघुवीर-महत्ता ना अति । प्रणत-कुटुंबा पालक रघुपति ।।
मम मत हेंच कि भरत ! तुम्हीं तर । रामस्नेह चि जणूं देहधर ।।

**दो०–भरत तुम्हांस कलंक हा अम्हां जगा उपदेश ।।**
**रामभक्तिरस-सिद्धि-हित हा शुभ समय गणेश।।२०८।।**

तात ! विमल विधु नवीन यश तर । रघुवर-किंकर चकार कैरव ।।
उदित सदा कधि अस्त न जाइल । क्षय नहिं,जगनभि वाढत राहिल ।।
लोक–कोक सुप्रीती करतिल । प्रभु प्रतापरवि न छवि हरतिल ।।
निशिदिनि सुखद सदा सर्वांप्रति । ग्रासिल ना राहू कैकयिकृति ।।
पूर्ण राम–सुप्रेम–पियूषें । गुरु–अपमान अदूषित रोषें ।।
भक्त अतां प्या अमृत पोटभर । केली सुलभ सुधें वसुधेवर ।।
भूप भगीरथ गंगे आणी– । स्मरतां सकल सुमंगल-खाणी ।।
दशरथ-गुणगण-वर्णन न घडे । त्यांसम जगिं नहिं अधिक कुणिकडे ।।

**दो०–यशप्रेमा–संकोच–वच प्रगट राम येऊन ।।**
**मननेत्रीं ज्यां बघत हर कधि ना तृप्त अजून ।।२०९।।**

तुम्हीं कीर्ति विधु अनुपम केला । राम प्रेम जिथें मृग वसला ।।
तात वृथा ग्लानी मनिं करतां । करिं परीस दारिद्र्या डरतां ।।
आम्हीं भरत असत्य न वदतों । उदासीन तापस वनिं वसतों ।।
सकल साधना सुफल सुशोभन । लक्ष्मण राम नि सीता दर्शन ।।
त्या फळास फळ दर्शन तुमचें । सवें प्रयागा सुभाग्य अमचें ।।
भरत धन्य ! जग यशें जिंकलें । वदुनी प्रेममग्न मुनि झाले ।।
ऐकुनि वचन सभासद हर्षति । साधु ! साधु ! सुर सुमनें वर्षति ।।
'धन्य धन्य' वाक् नभीं प्रयागीं । ऐकुनि भरत बुडति अनुरागीं ।।

**दो०–सिताराम हृदिं तनुं पुलक नेत्र–सरोरुहिं पाणि ।।**
**नमन करुनि मुनि–मंडळा वदले गद्गद वाणि ।।२१०।।**

तीर्थराज नी मुनी–समाज । सत्यहि शपथ अतीव अकाज ॥
येथें कांहीं बनवुन वदतां । त्यासम अधिक न पाप, अधमता ॥
तुम्हि सर्वज्ञ वदें सद्भावें । अंतर्यामि रघुवरा ठावें ॥
मातृ कृतीचा मज न दुखोटा । दुःख न मनिं, मानिल जग खोटा ॥
भय न, नाश जरि परलोकाचा । मज न शोक ही पितृमरणाचा ॥
सुकृत सुयश सव भुवनि शोभलें । सुत सम लक्ष्मण राम लाभले ॥
त्यक्त रामविरहीं तनु नश्वर । भूपति-शोका कुठला अवसर ॥
राम सिता लक्ष्मण अनवाणीं । पायि फिरति मुनिवेषि वनि वनीं ॥

**दो०–अजिन वसन फल अशन, महि शयनहि तृणपर्णांत ॥**
**सहति वसुनि तरुतळि सतत आतप वर्षा वात ॥२११॥**

दुःख दाह हा जाळि उर सदा । भूक न दिनिं, निशि निद्रा न कदा ॥
कुरोगास या औषध नाहीं । मनिं सोधलें सकल विश्वा ही ॥
मातृ कुमत अघमूल सुतार । करि वाकस मम हिता तयार ॥
कलि कुकाष्ठ घे करुनि कुयंत्रा । गाडि म्हणुन कटु अवधि कुमंत्रा ॥
सजि मजसाठीं अशा कु-थाटा । नाशि जगा करि वारा वाटा ॥
राम परततां कुरोग नासे । अन्य उपायि अयोध्या न वसे ॥
श्रवुनि भरत-वच मुनि सुख पावति । सकलहि नानापरीं प्रशंसति ॥
शोक विशेष न करणें ताता । दुःखें टळति रामपद दिसतां ॥

**दो०–सांत्वुनि मुनि वदले, अतिथि प्रेमप्रिय तुम्हि व्हा हि ॥**
**कंद फूल फल देउं अम्हि तें घ्या करुनि कृपा हि ॥२१२॥**

ऐकुनि भरता चिंता हृदयीं । पडे कठिण संकोच कु–समयीं ॥
पुन्हां गुरु–गिरा–गुरुता जाणुनि । कर जोडुनि वदले पद वंदुनि ॥
पालन आज्ञा धरुनी माथां । परम धर्म हा अमचा नाथा ! ॥
भरत-वचन रुचलें मुनि-हृदया । निकट घेति शुचि सेवक शिष्यां ॥
भरतातिथ्य असे कीं करणें । कंदमूल फल जाउन अणणें ॥
भलें नाथ ! वदुनी पद वंदित, । गेले निज निज काजीं प्रमुदित ॥
मुनि-शुच 'अतिथि थोर निमंत्रित । जसा देव तसं पूजन समुचित' ॥
श्रवुनी ऋद्धि. अणिमादिहि आल्या । स्वामी आज्ञा द्या, करुं वदल्या ॥

**दो०–रामविरह विव्हळ भरत सानुज सहित समाज ॥**
**पाहुणचारें हरा श्रम म्हणति मुदित मुनिराज ॥२१३॥**

ऋद्धि सिद्धि, मुनिवच शिरिं धरती । महाभाग्य आपलें समजती ॥
सिद्धि समूह परस्पर कथिती । राम-बंधु लघु अतुलित अतिथी ॥
मुनि-पद नमुनि असें करुं आज । होइ सुखी सब राजसमाज ॥
भवनें रुचिर रचित मग नाना । पाहुनि वाटे लाज विमानां ॥
भोग विभूति भूरि गृहिं भरली । अमरां हाव बघुनि ते सुटली ॥
दास दासि सामग्री घेउनि । जपत राहती रुचि अवलोकुनि ॥
सिद्ध करिति सब सिद्धि पळांतहि । तें सुख सुरपुरिं ना स्वप्नांतहि ॥
प्रथम निवास दिले सर्वांला । सुंदर सुखद रुचे जो ज्याला ॥

**दो०–भरता परिजन–सह दिले ऋषि आज्ञे–अनुसार ॥**
**मुनी तपबलें कृत विभव विधि विस्मायक फार ॥२१४॥**

मुनी प्रभावा भरत विलोकत । सकल लोक लोकप लघु वाटत ॥
सुख-सामग्री कोण कशि वानी । वघतां विसरति विरती ज्ञानी ॥
आसन शयन सुवसन वितानां । वन वाटिका विहग मृग नाना ॥
सुरभि फूल फल मधुर सुधेसम । विमल जलाशय विविधा अनुपम ॥
अशन-पान शुचि अमृताऽमृतसें । जन पाहुन लाजति साधकसे ॥
सुरसुरभी सुरतरु सर्वांना । पाहुन लालुच इंद्र-शचीना ॥
ऋतुपति, वारा त्रिविधा वाहत । चारि पदार्थ सुलभ सर्वांप्रत ॥
स्त्रक् चंदन वनितादिक भोगहि । वघुनि हर्षविस्मय-वश लोकहि ॥

**दो०–चक्रि चक्र संपद् भरत मुनि–शासन गारोडि ।**
**त्या निशि आश्रमि पंजरीं रात्र सरे तों कोंडि ॥२१५॥**

## मास पारायण, एकोनविंश विश्राम.

❖ ❖ ❖

## अध्याय २१ वा

तीर्थराजि तैं स्नाना करुनी । सहित समाज मुनिस शिर नमुनी ॥
आज्ञा आशीर्वच शिरिं धरिति । करुन दंडवत बहुत विनविति ॥
पथ-कुशलां सव लोकां घेउनि । निघति चित्रकूटीं मन देउनि ॥
धृत आधारा रामसखा-कर । चालति जणुं अणुराग देहधर ॥
शिरिं छाया ना पायिं पायतण । प्रेम नेम–धर्म–व्रति कपट न ॥
लक्ष्मण–राम–सिता-पथ-काहणि । पुसती सख्या वदति मृदु भाषणि ॥

राम-वास-थळ-विटपां पाहत । उरिं अनुराग न रोधुनि राहत ॥
बघुनि दशा सुर वर्षति फूल । महि मृदु मार्ग हि मंगल मूल ॥

**दो०-करित जाति छाया जलद सुखद वहत वर वात ॥**
**पथ न होइ रामा तसा जैसा भरता जात ॥२१६॥**

पथिं जड चेतन जिव बहु नाना । ज्यां बघती प्रभु दिसले ज्यानां ॥
ते सब परम पदा अधिकारी । भरत बघत गत भवरुज भारी ॥
ही महती भरता बहु नाहीं । राम मनीं स्मरती ज्यानां ही ॥
'राम' जगीं एकदां हि वदती । तेहि तरुन नर तारक बनती ॥
रामप्रिय लघु बंधुस भरतां । कां न बने पथ मंगलदाता ॥
सिद्ध साधु मुनिवर असं म्हणती । भरता निरखुनि हृदिं मुद भरती ॥
महिमा बघुनि सुरेशा शोचहि । भल्या भलें जग नीचा नीच हि ॥
गुरुस म्हणें करणें प्रभू तैसें । राम भरत भेटति ना जैसें ॥

**दो०-प्रभु संकोची प्रेमवश प्रेम-पयोनिधि भाइ ॥**
**छल शोधुनि यत्ना करा सर्व साधलें जाइ ॥२१७॥**

सस्मित सुरगुरु परिसुनि वचना । गणिति अलोचन सहस्त्रनयना ॥
मायापति-सेवकासि माया । करत उलटते ती सुरराया ॥
तैं कृत कांहि रामरुचि बघुनी । हानि अतां कीं कुचाळि करुनी ॥
श्रुणु सुरेश रघुपती-स्वभावहि । निज अपराधें क्रोध कदा नहि ॥
भक्तांच्या अपराधा करती । राम-रोष-पावकिं ते जळती ॥
लोकीं वेदिं विदित इतिहास । हा महिमा जाणति दुर्वास ॥

कोण भरत-सम रामस्नेही । जग जपि राम, राम जपि ज्यांही

**दो०–मनिंहि न आणा अमरपति रघुवर–भक्त–अकाज ।।**
**अयश लोकिं परलोकिं अक शोका दिन दिन माज ।।२१८।।**

श्रुणु सुरेश मम उपदेशाला । परम-प्रिय सेवक रामाला ।।
सेवक-सेवें राम सुखावति । सेवक वैरें वैर करिति अति ।।
यदपि समान हि राग रोष ना । पाप पुण्य गुण दोष घेत ना ।।
कर्म-प्रधान विश्वा राखित । जो करि जसें तसें फळ चाखित ।।
तदपि करिति सम विषम विहारा । भक्त–अभक्त–हृदय–अनुसारां ।।
अगुण अलेप अमान एकरस । राम सगुण ते भक्त-प्रेमवश ।।
राम सदा सेवक-रुचि राखिति । वेद पुराण साधु सुर साक्षिति ।।
मनिं जाणुनि हें त्यजा कुटिलपण । प्रीति भरतपदिं करा सुशोभन ।।

**दो०–रामभक्त परहित–निरत–परदुख–दुखी दयाल ।।**
**भक्त–शिरोमणि भरत तों त्यां न भिणें सुरपाल ।।२१९।।**

सत्यसंध प्रभु सुरहितकारी । भरत हि रामाज्ञा-अनुसारी ।।
स्वार्थ विवश तुम्हि विकल जाहलां । भरत दोष नहिं तुम्हीं मोहलां ।।
परिसुनि सुरवर गुरुवर-वाणी । प्रमुदित झाले गेली ग्लानी ।।
हर्षुनि सुमनें वर्षुनि सुरपति । भरताचा सुस्वभाव वानति ।।
असे भरत पथिं चालत जाती । बघुनि सिद्ध मुनि सर्पा स्तविती ।।
'राम' म्हणुनि जैं श्वासा घेती । प्रेमा पूर चारि दिशि येती ।।
द्रवती परिसुनि पवि पाषाणहि । पुरवासी प्रेमा वदवत नहिं ।।

मध्यें वमुनी यमुने आले । निरखुनि नीर नयनिं जल भरलें ।।

**दो०–रघुवर वर्ण बघून वर वारि समेत समाज ।।**
**बुडत विरह–वारिधीमधिं धरिति विवेक जहाज ।।२२०।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २२ वा

यमुना तटिं त्या दिवसिं राहती । यथासमय सुख सकल पावती ।।
घाट घाटिच्या तरणि न गणना । रात्रि येति करुं कसें वर्णना ।।
उदयीं एका खेपें उतरति । राम-सखा सेवेनें तोषति ।।
स्नान करुनि यमुने शिर नमती । सहित निषादा भ्राते निघती ।।
उत्तम वाहनिं मुनिवर पुढतीं । मागे राजसमाजहि निघती ।।
त्यां मागें दो भ्राते चालति । भूषण वसन साधि अति घालति
सेवक सुहृद सचिवसुत साथ हि । लक्ष्मण सिते स्मरत रघुनाथहि ।।
रामवास–विश्राम जिथं जिथें । प्रेमें प्रणमन करिति पथिं तिथें ।।

**दो०–त्यजुनि काम गृह नारि नर श्रवुनि येति धावून ।।**
**छवि बघुनी स्नेहहि, मुदित जन्मफला पावून ।।२२१।।**

प्रेमें वदति परस्पर काहीं । दिसति राम लक्ष्मण सखि! नाहीं ?
वय वपु वर्ण रूप सखि ! सारखि । स्नेहशील सम, समान चाल कि ।।
वेष न तो सीता नहि संगीं । पुढें कटक चाले चतुरंगी ।।
अप्रसन्न मुख मानस–खेदें । सखि ! संदेह येत या भेदें ।।

तर्क तिचा स्त्रीगण-मन मानी । म्हणति सकल तुज सम न शहाणी ॥
खरें म्हणसि तूं, तिज सन्मानी । दुजी, वदे मृदु मधुरा वाणी ॥
प्रेमें सब सांगते प्रसंगा । जो करि राम-राज्य-रस-भंगा ॥
भरता पुन्हां प्रशंसूं लागे । शील-स्नेह-सुभाव सुभागें ॥

**दो०-त्यजुनि राज्य पितृदत्ततें पायिं पायिं फळ खात ॥**
**जाती विनवूं रघुवरा कुणि सम भरत जगांत ॥२२२॥**

भरत भक्ति आचरण बंधुपण । श्रवण कथन हरि दु:खें दूषण ॥
सखि ! थोडें जितकें सांगावें । रामबंधु कां असे नसावे ॥
आम्हीं सानुज भरत-विलोकनिं । गणलों गेलों धन्य युवति जनिं ॥
परिसुनि गुण शोचति गति वधुनी । योग्य न सुत कीं कैकयि जननी ॥
राणिस दोष नसे कुणि सांगति । विधि करि सर्व, अम्हां उजवा अति
आम्हि कुठें श्रुतिजनविधि-हीना । तुच्छ नारि कुल-कर्म-मलीना ॥
वसुं कुनारि कुस्थळि कुग्रामीं । दर्शन कुठें पुण्य-परिणामी ॥
विस्मय मोद असा प्रतिगावा । जणुं मरूंत सुर-तरु उगवावा ॥

**दो०-होत भरत-दर्शन खुललें पथ-जन-भाग्य कि आज ॥**
**जणूं सुलभ सिंहलजनां भाग्यें प्रयाग राज ॥२२३॥**

निजगुण सहित रामगुण-गाथा । श्रवत जाति चिंतित रघुनाथा ॥
तीर्थी मुनि-आश्रम-सुरधामां । स्नान करिति पाहुनी प्रणामां ॥
मनोमनीं या वरास मागति । सीताराम-चरण-कमलां रति ॥
भेटति भिल्ल कोळि वनवासी । वैखानस बटु यती उदासी ॥

नमुनि पुसति ज्या त्या कुठलेही–। वर्नि लक्ष्मण राम नि वैदही ।।
ते प्रभु–समाचार सब कथिती । भरता बघुनि जन्मफळ लुटिती ।।
जे कुणि वदले कुशल बघितले । प्रिय राम नि लक्ष्मण सम गणले ।।
असे पुसति सकलांस सुवाणीं । श्रवति रामवनवास-कहाणी ।।

**दो०–त्या दिनि वसुनि,सकाळि ही स्मरुनि निघति रघुनाथ**
**रामदर्शना लालची भरता सम सब साथ ।।२२४।।**

मंगल शकुन होति सकलांना । स्फुरण सुखद भुज विलोचनानां ।।
सह समाज भरता उत्साहो । दिसतिल राम जाइ दुख दाहो ।।
करिति मनोरथ जें ज्यां सुचति । स्नेह-सुरा-उन्मत्त चालती ।।
शिथिल अंग पदपथि लटपटती । प्रेमें विव्हळ वचनें वदती ।।
रामसखा त्या समयि दाखवित । शैल-शिरोमणि सहज सुशोभित ।।
तया समीप पयस्विनि-तीरा । सीते सहित वास दो वीरां ।।
बघुनि करिति दण्डवत् प्रणामा । मुखि जय जानकि जीवन रामा ।।
बुडे प्रेमि नृपसमाज या परि । जणुं रघुराज गमन नगरा करि ।।

**दो०–प्रेम भरतमनि तें जसें वदवे ना शेषास ।।**
**कवि-अगम्य जस ब्रह्मसुख मी-मम-मलिन जनास ।।२२५।।**

रामस्नेह–शिथिल सगळे जरि । दोन कोसगत अस्त होय तरि ।।
बसले स्थल जल बघुनि; उजाडत । रघुनाथप्रेमें गमना कृत ।।
राम पहाटें उठले तिकडे । सीता सांगे स्वप्न तिज पडे ।।
सहित समाज भरत आले जणुं । नाथ वियोगज-ताप- तप्त-तनु ।।

दुःखी दीन उदास हि सारीं । सासू दिसल्या कशाच भारी ।।
स्वप्न ऐकुनी सजल विलोचन– । होति शोचवश शोच विमोचन ।।
स्वप्न वरें हें लक्ष्मण ! नाहीं ! । अशुभ खबर कुणि देइल कांही ।।
स्नान बंधुसह करुनी पूजिति– । त्रिपुरारिस साधुंस सन्मानिति ।।

**छं०–मानूनि सुरमुनि नमुनि बसले उत्तरेला बघति जैं ।**
**नभि धूळ खग मृग भूरि पळुनी भीत आश्रमिं येति तैं ।।**
**तुलसी उठोनी बघुनि, कारण काय चिंतिति चकित जों ।**
**सब खबर कोळी भिल्ल येउनि सांगती प्रभुलाहि तों ।।१।।**

**सो०–श्रवुनि सुमंगल वाणि प्रमुदित मन तन पुलक युत ।।**
**तुलसी स्नेहज पाणि शरद–सरोरुह विलोचनिं ।।२२६।।**

पुनरपि चिंता सीतारमणा । कारण कवण भरत-आगमना ।।
कोणि येइ सांगे कर जोडी । संगि चमू चतुरंगि न थोडी ।।
राम सचिंत अती जैं ऐकति । इथ पितृवच इथ बंधुभीड अति।।
स्मरती स्वभाव भरताचा जैं । न मिळे स्थिरता प्रभुचित्ता तैं ।।
समाधान मनिं असें जाणतां । भरत वचनिं मम साधु,जाणता ।।
प्रभुहृदिं खळबळ लक्ष्मण लक्षिति । नीति विचार समयसम सांगति ।।
स्वामि कांहि वदुं तुम्हीं न पुसतां । समयीं धृष्ट, न दासधृष्टता ।।
स्वामी तुम्हि सर्वज्ञ-शिरोमणि । सेवक वदतो जें वाटें मनिं ।।

**दो०–नाथ सुहृद अति सरलधी शील–स्नेह–निधान ।।**
**प्रीति सर्वि विश्वास, सब जाणां आत्मसमान ।।२२७।।**

विषयि जीव जैं प्रभुता पावति । मूढ मोहवश हाती प्रगटति ।।
भरत नीतिरत साधु जाणते । प्रभुपदरत हें विश्व जाणतें ।।
तेही आज राजपद पावुनि । निघति धर्ममर्यादा सांडुनि ।।
कुटिल कुबंधु कुसमय साधुनि । वनीं राम एकाकी जाणुनि ।।
करुनि कुमंत्रा साजा साजति । राज्य अकंटक करण्या धावति ।।
कोटि रीति कल्पुनी कुटिलता । कटक जमवुनी येति उभयता ।।
जर नसती मनिं कपट-कुचाळी । कुणा रुचे रथ-वाजि गजाली ।।
कोण दोष दे वृथाच भरता । माजे जगचि राजपद मिळतां ।।

**दो०-शशि गुरु-तल्पग नहुष नृप करी भूसुरां यान ।।**
**विमुख लोक वेदां बने अधम किं वेन समान ।।२२८।।**

दशशत भुज सुरपती त्रिशंकू । कुणा राज्यमद दे न कलंकू ।।
भरत करति या उचित उपावा । रिपु-रिण-लेश न कधिं उरवावा ।।
वरें परंतु न भरतें हें कृत । बघुनि राम असहाय अनादृत ।।
समजेलचि परि विशेष आजीं । सरुष राममुख बघतां आजीं ।।
इतकें वदत नीतिरस भुलला । रणरसविटप पुलकमिषिं फुलला ।।
प्रभु-पद वंदुनि रज शिरिं लावत । वदले सत्य सहज बल सांगत ।।
अनुचित माझें माना नाथ ! न । भरत नाल्प करि अपलें पूजन ।।
किति सोसावें तोंड दावुनी । नाथ साथ धनु हातीं असुनी ।।

**दो०-क्षात्र जाति रघुकुळि जनन रामानुग म्हणतात ।।**
**नीच धूळि सम कोण, शिरिं चढेहि देतां लाथ ।।२२९।।**

उठुनि जुळुनि कर आज्ञा मागे । जणूं वीररस निद्रित जागे ॥
बांधि जटा शिरिं कसि कटिं भाता । सज्य शरासन सायक हातां ॥
आज रामसेवक यश घेतो । धडा समरिं भरताला देतो ॥
राम-निरादर-फळ पावोत कि । रणशय्ये दोघे झोपोत कि ॥
भला योग सब समाज आला । करतो प्रगट पूर्व-रोषाला ॥
करि निकरा मृगराज निर्दळी । जसा ससाणा लाव्यां कवळी ॥
तसा सानुज ससैन्य भरता । तुडवुनि मारिन रणीं खेळतां ॥
येतिल साह्या शंकर रणिं जरि । राम शपथ मारीन राम-अरि ॥

**दो०–रुष्ट तप्त लक्ष्मण बघुनि सत्य शपथ ऐकून ॥**
**सभय लोक सब लोकपति पाहति पळूं भिऊन ॥२३०॥**

जग भयमग्न, होइ नभवाणी । लक्ष्मण-भुजबल बहु वाखाणी ॥
तव प्रतापा तथा प्रभावा । जाणे कोण, कोणि वर्णावा ॥
अनुचित उचित कार्य कीं बघती । समजुनि करिति बरें त्यां म्हणती ॥
सहसा करुनी मग पस्तावति । ते ना बुध, बुध वेदहि सांगति ॥
श्रवुनि सुरवचा लक्ष्मण लाजति । राम-सिता सादर सन्मानति ॥
तात कथित तुम्हि नीती सुंदर । बंधो ! नृपमद इतरिं कठिणतर ॥
चढे पिउनि मद भूपां त्यां ही । साधुसभा जिहिं सेवित नाहीं ॥
भला भरतसा लक्ष्मण ! कोणी । विधी-प्रपंचीं दृष्ट न कानीं ॥

**दो०–होइ न भरता राज्यमद विधि हरिहर पदिं जात ॥**
**नासत कांजी सीकरें क्षीर सिंधु कधिं तात ! ॥२३१॥**

तिमिर तरुण तरणिला गिळोही । गगन मेघिं एकत्र मिळो ही ।।
गोपद–जळीं बुडो घटयोनी । क्षमा सहज जरि सांडी क्षोणी ।।
मशक–फुंकरें मेरु उडे जरि । नृपमद भरता कधि न जडे तरि ।।
लक्ष्मण तुझी शपथ पितृ-आण । शुचि सु-बंधु नहिं भरत समान ।।
सुगुण दूध अवगुण जल ताता । मिळवुनि रचो प्रपंच विधाता ।।
भरत हंस रविवंश–तडागां । जन्मुनि कृत गुण-दोष-विभागां ।।
पय गुण घे त्यजि अवगुण वारी । स्वयशें कृत जग भास्वर भारी ।।
वदत भरत गुण शिला स्वभावहि । प्रेम-पयोधि मग्न रघुराव हि ।।

**दो०–श्रवुनि विबुध रघुवर वचन पाहुनि भरतीं स्नेह ।।**
**स्तविती सकल कि रामसा प्रभु कुणि कृपा-सुगेह ।।२३२।।**

होता ना जगिं भरत जन्म जर । कोण धरणि धरि सकल धर्मधुर ।।
भरत गुण-कथा कविकुल-गम्य न । कळे कुणा रघुनाथ तुम्हांविण ।।
लक्ष्मण राम सिता सुरवचनें । सुख पावति अति शक्य न वदणें ।।
इथें भरत सह सर्वहि मंडळि । स्नान करिति मंदाकिनि शुचि जळि
लोकां सरिते समीप ठेउनि । माता-गुरु-सचिवाज्ञा घेउनि ।।
निघति जिथें सीता रघराऊ । साथ-निषाद नाथ लघु भाऊ ।।
जननी करणी समजुनि लाजति । कोटि कुतर्क मनीं करुं लागति ।।
राम सिता लक्ष्मण मम नांवा । श्रवुनि न जाती त्यजुनि कि ठावा ।।

**दो०–मातृमतीं मज मानुनी थोडें जें करतील ।।**
**क्षमुनि दोष अघ, आदरति स्वताकडे बघतील ।।२३३।।**

त्यागिति जरि मन मलिन समजुनी । जरि सन्मानिति सेवक गणुनी ॥
राम–उपानह सुशरण मजला । स्वामि राम शुभ दोष जनाला ॥
जगीं मीन चातक यश-भाजन । प्रेम नेम निज नव पटु पावन ॥
असें म्हणत मनि मार्गी जातां । गात्रीं लज्जा–स्नेह–शिथिलता ॥
दोष मातृकृत त्या जणुं फिरवित । धीर भक्ति बल चाहुंरि चालत ॥
स्मरतां स्वभाव रघुनाथाचा । त्वरें पाय पथि पडतो त्यांचा ॥
भरत–दशा त्या समयीं तैसी । जल अलिगति जल-ओघीं जैसी ॥
बघतां स्नेह खेद भरताचा । होइ निषाद हि विदेह साचा ॥

**दो०–होति शकुन शुभ ऐकुनी चिंतुनि वदे निषाद ॥**
**शोक नाश होइल हरुष परि परिणामि विषाद ॥२३४॥**

सेवक–वचन सत्य सब जाणति । निकट आश्रमा जाउनि पोचती ॥
भरत बघत गिरि समूह कानन । क्षुधित मुदित जणुं मिळत सुभोजन ॥
प्रजा जणूं ईती भय दुःखित । मारी, ग्रह, तापत्रय पीडित ॥
जात सुराज–सुदेशिं सुखावे । होइ भरतगति तशी स्वभावें ॥
राम वसति वनि संपत् भ्राजे । सुखी प्रजा जणुं मिळत सुराजे ॥
सचिव विराग विवेक नरेशहि । विपिन सुशोभन पावन देशहि ॥
भट यम नियम शैल नृपधानी । शांति सुमति, शुचि सुंदर राणीं ॥
उत्तम नृप सर्वांग–सुपूरित । रामपदाश्रित मन उत्साहित ॥

**दो०–जिंकुनि मोह महीप दल सहित विवेक भुपाल ॥**
**करत अकंटक राज्य पुरि सुख संपदा सुकाळ ॥२३५॥**

वन- सुदेशि मुनिवास किती तरि । जणुं पुर नगर गांव खेडीं वरि ॥
विपुल विचित्र विहग मृग नाना । प्रजा समाज, न शक्ति वर्णना ॥
गेंडे वाघ महिष किरि हरि करि । वृष, बघुनी स्तुति कोण किती करि ॥
त्यजुनि वैर विचरतात संगें । जणुं सर्वत्र चमू चतुरंगें ॥
निर्झर झरति मत्त गज गाजति । जणूं नगारे नाना वाजति ॥
चक चकोर चातक शुक पिक गण । कूजति मंजु मराल मुदित-मन ॥
अलिगण गाती नाचति केकी । जणुं सुराज्यि मंगल सब लोकीं ॥
वेलि विटप तृण सफल सफूलहि । सब समाज मुद-मंगल-मूलहि ॥

**दो०—रामशैल—शोभा बघुनि भरत हृदयि सुप्रेम ॥**
**तापस तपफल मिळुनि सुखि जसा संपतां नेम ॥२३६॥**

## मास पारायण, विसावा विश्राम.

## नवाह्न पारायणे पञ्चमो विश्रामः

❖ ❖ ❖

## अध्याय २३ वा

नाविक धावत उंच चढोनी । सांगे भरता भुज उचलोनी ॥
नाथ पहा विटपांस विशालां । पाकरि जंबु रसाल तमालां ॥
त्या तरुवरांमधें वट शोभित । मंजु विशाल बघुनि मन मोहित ॥
नील सघन पल्लव फल लालहि । सुखद दाट छाया त्रय कालहि ॥
जणुं कीं, तिमिर अरुणमय राशी । विधि रचि संकलुनी सुपमेसी ॥

सरिते सन्निध तरु हे स्वामी । रघुवर पर्णकुटी तिथं नामी ॥
तुलसी तरुवर विविध सुलक्षण । रोपित सीतें कुठें हि लक्ष्मण ॥
वट छाये वेदिका विरचिली । सुंदर सीतेनें कर-कमलीं ॥

**दो०-वसुनि समुनिगण नित्य तिथं सीता राम सुजाण ॥**
**श्रवति कथा इतिहास सब आगम निगम पुराण ॥२३७॥**

श्रवुनि सखावच विटप विलोकत । भरत-विलोचनिं वारी वाहत ॥
प्रणति करित दो बंधु चालती । प्रीति वदत लाजते भारती ॥
हर्षति निरखत राम-पदांका । जणूं लाभला परीस रंका ॥
रज शिरिं हृदया नयनां लावति । रघुवर भेटीसम सुख पावति ॥
बघुनि भरत-गति अकथ अतीवहि । प्रेममग्न मृग खग जड जीवहि ॥
प्रेम विवश मित्रहि पथ भूले । वदुनि सुपथ सुर वर्षति फूलें ॥
बघुनि सिद्ध साधक अनुरागति । स्नेह सहज तो प्रशंसु लागति ॥
भरत भाव भूतळिं नसता जर । कोण करत चर अचर,अचर चर ॥

**दो०-प्रेम अमृत मंदर विरह भरत पयोधि गभीर ॥**
**काढि मथुनि सुर साधु हित कृपासिंधु रघुवीर ॥२३८॥**

सखा समेत मनोहर युगला । झाडित लक्ष्मण बघूं न शकला ॥
भरत बघे प्रभु-आश्रम पावन । सकल सुमंगलसदन सुशोभन ॥
प्रविशत दुःख न दाव न राहे । जणुं योगी परमार्था लाहे ॥
दिसे प्रभुपुढें लक्ष्मण भरता । पुसतां अनुरागानें वदतां ॥
शिरीं जटा, कटि मुनिपट बद्धहि । तूण शर करीं स्कंधीं चापहि ॥

वेदीवर मुनि साधु समाज। सीते सह राजति रघुराज ॥
वल्कल वसन जटिल तनु शाम हि। जणुं मुनिवेष करुनि रति-काम हि ॥
करकमलीं धनु सायक फिरवित। हृज्ज्वर हरती हसुनी निरखित ॥

**दो०–लसति मंजु मुनि मंडला-मधें सिता रघुचंद ॥**
**ज्ञानसभें जणुं धृततनू भक्ति सच्चिदानंद ॥२३९॥**

सानुज सखासमेत मग्न मन। विस्मृत हर्षशोक सुखदुख–गण ॥
पाहि नाथ ! प्रभु पाहि बोलले। छडीसमान महीवर पडले ॥
प्रेमळ वचना ओळखि लक्ष्मण। जाणे करत भरत कीं प्रणमन ॥
बंधूस्नेह सरस अति इकडे। सेवा प्रबल फार परि तिकडे ॥
भेटुं न उपेक्षणा करु शकती। लक्ष्मण-मन-गति सुकवि सांगती ॥
राहि भार घालुनि सेवेवरि। उंच पतंग कि ओढि खेळकरि ॥
प्रेमें वदति नमुनि महिं माथा। 'प्रणमन भरत करत रघुनाथा !' ॥
उठति राम तैं प्रेमाधीर हि। तूण कुठें पट कार्मुक तीर हि ॥

**दो०–बळें धरिति उठवुनि हृदयि भरता कृपा–निधान ॥**
**राम-भरत-भेटिस बघुनि सकल भुलति तनुभान ॥२४०॥**

प्रीति भेटिची केविं वानणें। कविकुल–अगम कर्म–मन–वचनें ॥
प्रेमें परम पूर्ण दो भाई। मन मति चित्त अहं ही जाई ॥
वदा प्रगट सुप्रेम कोण करि। कोण्या छाये कवि–मति अनुसरि ॥
कविस अर्थ–अक्षर–बल साचें। नट अनुतालगतिहि कीं नाचे ॥
स्नेह अगम रघुवर–भरतांचा। स्पर्श न विधि-हरि-हर-चित्तांचा ॥

तो मी कुमति कशापरि वदणें । निघे सुराग कि हरळि-तंतुनें ।।
बघुनी रघुवर-भरत-भेट कीं । सुरगण सभय, भरे उरिं धडकी ।।
सुरगुरु समजाविति, जड जागति । सुमन वर्षुनी प्रशंसुं लागति ।।

**दो०–राम रिपुघ्ना भेटती प्रेमें नावाड्यास ।।**
**प्रणमत लक्ष्मण भेटती भावें भरत तयास ।।२४१।।**

लक्ष्मण हौसें अनुजा भेटति । निषादास मग हृदिं कवटाळति ।।
नमिति भरत शत्रुघ्न मुनिगणां । मुदित मिळुनि इष्टाशीर्वचनां ।।
सानुज भरत परम अनुरागां । शिरिं धरि सीता चरण-परागां ।।
कितिदां प्रणाम करतां उठवी । शिरिं करकमला ठेउनि बसवी ।।
सीता दे आशिस मनिं कांहीं । स्नेह-मग्न तनुभान न राही ।।
अनुकूला अति पाहुनि सीता । भीती स्वकल्पिता गत चिंता ।।
कुणि न कांहिं वदले कुणि पुसलें । प्रेमभरें मन गतिला मुकलें ।।
नावाडी त्या समयिं धीर धरि । कर जुळुनी प्रणमुनी विनति करि ।।

**दो०–नाथ ! साथ मुनिनाथ कीं माता सब पुरलोक ।।**
**सेवक सेनप सचिव, सब आले विकल वियोग ।।२४२।।**

श्रवुनि शीलनिधि गुरु-आगमना । सितेपासिं ठेउनि रिपुदमना ।।
चलति सवेग राम तात्काळहि । धीर धर्मधुर दीन दयाळ हि ।।
गुरुस बघुन सानुज अनुरागति । नमन दण्डवत् प्रभु करुं लागति ।।
मुनिवर धावुनि हृदयीं धरती । प्रेमभरें उभयांस भेटती ।।
पुलकित नाविक नामा वदला । दुरुन दण्डवत् प्रणाम केला ।।

रामसख्या ऋषि बळें भेटले । प्रेम लुठत महिं जणुं आवरलें ।।
रघुपति–भक्ति सुमंगल–मूला । वानिति नभिं सुर वर्षति फूलां ।।
नसे नीच अति असा कुणि महीं । थोर न जगिं कुणि वसिष्ठ समही ।।

**दो०–बघत लक्ष्मणाहुनि अधिक प्रेमें या मुनिराव––।।**
**भेटति; सीतापति भजनिं प्रगट प्रताप प्रभाव ।।२४३।।**

आर्त लोक सब कळे सुजाणा । रामा करुणाकर भगवाना ।।
ज्या ज्या भावें जे अभिलाषिति । त्यांची रुची तशी तशि पुरविति ।।
सानुज सकलां पळांत भेटुन । दुःखद दाह दूर कृत दारुण ।।
हें महत्व रामा बहु नाहीं । रवि घटिं कोटि एक कीं राही ।।
भेटुनि गुहा परम अनुरागां । पुरजन वानिति सर्व सु–भागा ।।
रामा माता दुःखी दिसल्या । जणुं सुवेलि-अवली हिमिं सुकल्या ।।
आधि राम कैकईस भेटति । भावभक्ति-ऋजुतें भिजविति मति।।
पाया पडुनी तिजला सांत्विति । दोष काल-विधि-कर्मा लाविति ।।

**दो०–मातानां सब भेटले कृत सांत्वन परितोष ।।**
**अंब ईश्वराधीन जग द्यावा कुणा न दोष ।।२४४।।**

गुरुपत्नी–पद बंधु वंदती । सहित सवें ज्या ब्राह्मणि असती ।।
गंगा–गौरीसम सन्मानति । मुदित वचनिं मृदु आशिस अर्पंती ।।
बसले नमुनि सुमित्रे, अंकां । जणुं भेटे संपद् अति रंका ।।
पडति बंधु युग जननी–पायां । प्रेमें व्याकुळ त्यांच्या काया ।।
प्रेमें अति अंबा हृदिं धरते । चक्षू-स्नेहज–सलिलिं न्हाणते ।।

त्या-समयींचा हर्ष विषाद । वदवे कविस किं मूका स्वाद ॥
जननिस सानुज भेटुनि रघुपति । 'करा पदार्पण' गुरुला विनवति ॥
पुरजन मुनीश–आज्ञा पावुनि । उतरुं लागले स्थलजल पाहुनि ॥

**दो०–विप्र सचिव माता गुरु निवडक जन, घेतात ॥**
**रघुपति-लक्ष्मण-भरत शुचि आश्रमास जातात ॥२४५॥**

ये सीता नमि मुनिवर-चरणां । लभे उचित इष्टाशीर्वचना ॥
गुरुपत्निस मुनिनारीं सहिता । भेटे. प्रेम न येई वदतां ॥
पृथक् वंदि सीता सर्वांना । पावे प्रिय आशीर्वादानां ॥
बघे सासुनां सुकुमारी जैं । सीता भीता नेत्र मिटी तैं ॥
वधिक-करीं पडल्या किं मराली । काय दैव ही करी कुचाळी ? ॥
त्या अति दुःखि, बघुनि सीतेतें । सहणें दैव साहवी जें तें ॥
जनक-सुता मग धरते धीर । नील नलिन-नयनीं ये नीर ॥
जाउन भेटे सकल सासुनां । तैं पृथ्वीवर पसरे करुणा ॥

**दो०–भेटे पाया पडुनि. अति प्रेमें प्रत्येकीस ॥**
**चिर सौभाग्या भोगसी. प्रेमें मनिं आशीस ॥२४६॥**

स्नेह-विकल सीता सव राण्या । ज्ञानी गुरु त्या सांगति बसण्या ॥
सांगुनि जगगति मायिक मुनिवर । कथिति काहि परमार्थ-कथा वर ॥
नृप-गमना सुर–पुरास वदले । अति दुःखी रघुनाथ जाहले ॥
स्नेह निजहि मृतिकारण जाणति । धीर धुरंधर विकल होति अति ॥
परिसुनि कुलिश कठिण कटु भाषण । विलपति लक्ष्मण सिता राणिगण

लोक शोक विव्हळ अति सगळे । भूप मरण जणुं आजच घडलें ॥
पुनरपि रामा सांत्विति मुनिवर । स्नाति जनांसह सरिते सुंदर ॥
प्रभु दिनिं त्या व्रत निर्जल करती । मुनि वचनिंहि जल कुणि न सेवती

**दो०–उदयीं रघुनंदना जशि आज्ञा देति मुनीश ॥**
**श्रद्धा भक्ती आदरें सकल करिति जगदीश ॥२४७।**

क्रिया कृता जैशी श्रुति सरणी । तैं पुनीत पातक तम तरणी ॥
यस्य नाम पावक अघतूला । तत्स्मृति सकल सुमंगल-मूला ॥
शुद्धि तया सज्जन मत ऐसें । तीर्थाविाहन गंगें जैसें ॥
शुद्ध होउनी दिन दो क्रमले । राम गुरूनां प्रेमें वदले ॥
नाथ ! लोक सब दुःखी भारी । कंदमूल फल-नीराहारी ॥
सानुज भरत सचिव मातांतें । बघतां मज पळ युगसम जातें ॥
सह समाज पुरिं वरें पदार्पण । नृप अमरावति येथें आपण ॥
बहुत कथित हें करुनि धृष्टते । स्वामी करतिल गमें इष्ट तें ॥

**दो०–धर्मसेतु करुणायतन कां न वदा असं राम ॥**
**घेति दुःखि जन दोन दिन मुखदर्शन विश्राम ॥२४८॥**

श्रवुनि रामवच सभय समाज । जणुं जलनिधिमधि विकल जहाज ।
श्रवुनि गुरुगिरा मंगल मूल । झाला जणुं मारुत अनुकुल ॥
स्नाती त्रिकाळिं पयपावन जळि । जया बघत अघसंघ पळापळि ॥
मंगलमूर्ति नेत्रि भर भरुनी । निरखिति मुदित नमन कर-करुनि
रामशैल-वन बघण्या जाती । दुःख न जिथें सकल सुख हातीं ॥

निर्झर नीर सुधेसम वाहति । त्रिविध ताप-हा त्रिविध सदागति
विटप वेलि तृण अगणित जाती । पल्लव-पुष्प-फळें विविधा तीं ॥
सुंदर शिला सुखद तरुछाया । कोणा वन-छवि ये वर्णाया ॥

**दो०-सरीं सरोरुह जलविहग कूजति गुंजति भृंग ॥**
**विगत-वैर विहरति विपिनिं मृग बहुरंगि विहंग ॥२४९॥**

कोळि किरात भिल्ल वनवासी । मध शुचि सुंदर रुचिर सुधासी ॥
भरुनी पर्णपुटीं बहु सुंदर । कंद मूल फल जुडचा हि अंकुर ॥
देति विनति नति सकलां करुनी । स्वाद नाम-गुण-भेद सांगुनी ।
देति लोक बहु मोल, न घेती । रामशपथ, परतवीत देती ॥
स्नेह-मग्न मृदु वचनें म्हणती । प्रेम ओळखुनि साधु मानती ॥
आम्हि नीच, अति सुकृती आपण । रामकृपेनें घडलें दर्शन ॥
अम्हां सुदुर्लभ अपलें दर्शन । जशि मरु धरणि देवधुनि पावन ॥
रामकृपाळु निषाद-दयाघन । प्रजा असावि राजसम, परिजन ॥

**दो०-म्हणुनी स्नेहा बघुनि, व्हा विण संकोच कृपाल ॥**
**आम्हां करण्या कृतार्थ कि फलतृण अंकुर घ्याल ॥२५०॥**

प्रिय पाहुणे तुम्हीं वनिं आला । सेवे योग्य न भाग्य अम्हांला ॥
द्यावें काय तुम्हां जी ! स्वामी ! । इंधन-पत्र-मित्र तों आम्ही ॥
ही अमची अति मोठी सेवा । वस्त्र पात्र कीं चोरुं न देवा ! ॥
अम्हि जड जीव जीव-गण-घाती । कुटिल कुचाली कुमति कुजाती ॥
पाप करत रात्री दिन जात हि । नहि कटि पट नहि खांचा भरतहि॥

स्वप्नीं कधि कोणा रुचि धर्मा । हा रघुनंदन-दर्शन महिमा ।।
जिथुनी प्रभुपदपद्म पाहिलें । दुःसह दुःख न दोष राहिले ।।
श्रवत वचन पुरजन अनुरागति । त्यांचे भाग्या वानूं लागति ।।

**छं०-स्तवुं भाग्य लागति सकल वचनें सानुरागें सांगती ।।**
**ती रीति सीतारामचरणीं स्नेह बघुनि सुखावती ।।**
**स्नेहास निज नर नारि निंदिति ऐकुनी भिल्लिणि-गिरे ।।**
**तुलसी कृपा रघुवंशमणिची लोह घे पेटचा तरे ।।१।।**

**सो०-चहुदिशि वनिं फिरतात प्रमुदित अनुदिन लोक सब ।।**
**जसे पीन होतात प्रथम-पाउसीं शिखी प्लव ।।२५१।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २४ वा

प्रेम मग्न अति पुर नारी नर । निमिषासम सरती ते वासर ।।
प्रतिसासू सीता घे वेषा । सादर सेवि तया अविशेषां ।।
जाणति राम कुणि न मर्मा या । सीता मायेमधि सब माया ।।
सीता सेवे-वश त्या सर्वहि । सुखी, देति शिकवण आशिसहि ।।
बघुनि सरल सीते दो भावां । राणिस कुटिल पुरा पस्तावा ।।
अवनि-यमां मागत कैकेई । महि न ठाव विधि मरण न देई ।।
लोकिं हि वेदिं विदित, कवि सांगति । राम विमुख थळ नर्कि न पावति ।।
हा संशय मनिं सर्वांना ही । राम येति विधि! नगरिं किं नाहीं ।।

**दो०–निशि न नीज ना भूक दिनिं भरत विकल शुचि शोचि**
**नीच चिखलिं अडकत जसा मीन सलिल-संकोचिं ।।२५२।।**

जननिमिषें करि काळ कुचाळी । ईति भीति जशि पिकतां साळी ।।
होइ कसें रामा अभिषेचन । मजसि आकळे उपाय एक न ।।
गुरुवच मानुनि अवश्य फिरतिल । बघुनि रामरुचि परि गुरु वदतिल
मातृवचनिं रघुराज परतती । रामजननि कधि करिल हट्ट ती! ।।
मी अनुचर मम पाड काय ही । वाम विधी आणिक कुसमय ही ।।
हट्ट धरिन तरि परम कुकर्म हि । हर गिरिहुनि गुरु सेवक–धर्महि ।।
एकहि युक्ति न मनांत टिकली । चिंता करतां रात्र संपली ।।
स्नान करोनी प्रभुला प्रणमति । वसतां, ऋषि बोलावूं धाडति ।।

**दो०-गुरुपद–कमलीं प्रणमुनी आज्ञेनें बसतात ।।**
**विप्र महाजन सचिव सब सभासदहि जमतात ।।२५३।**

वदले मुनिवर समय ओळखुनि । सभ्य, भरत घ्या सुजाण ऐकुनि ।।
धर्म धुरीण भानुकुल-भानू । राजा, स्ववश, राम, भगवानू ।।
सत्यसंध, पाते श्रुतिसेतू । राम जन्म जग–मंगल–हेतू ।।
गुरु–पितृ–मातृ–वचन–अनुसारी । खलदलदलन देवहितकारी ।।
नीति–प्रीति–परमार्थी–स्वार्थी । कुणि न रामसम जाणि यथार्थी ।
विधि हरि हर शशि रवि दिक्पाळां । माये जीवां कर्मा काळा– ।।
अहिपा महिपां प्रभुता जिनकी । योगसिद्धि निगमादिगदित कीं ।।
पहा विचार करून मनासी । रामाज्ञाच शिरीं सर्वांसी ।।

**दो०-रामाज्ञा रुचि राखणें हितकर हें आम्हांस ।।**
**अतां सुज्ञ समजुनि करा संमत जें सर्वांस ।।२५४।।**

सकलां सुखद राम-अभिषेकहि । मंगल-मोद-मूल पथ एक हि ।।
येतिल कसे नगरिं रघुरावहि । समजुनि सांगा करूं उपावहि ।।
सादर परिसुनि मुनिवर-भाषित । नय-परमार्थें स्वार्थें मिश्रित ।।
उत्तर येना स्तंभित सगळे । भरतें शिर नमुनी कर जुळले ।।
भूप भानुकुळि झाले कितितरि । जे एकाहुनि थोर एक जरि ।।
जन्म-हेतु सकलां पितृ-मातां । कर्म-शुभाशुभ देइ विधाता ।।
करि कल्याण दलुनि दुःखाला । असा अशीस विदित जगिं अपला ।।
स्वामि तेच जे विधिगति बाधिति । निश्चय केल्या कोण किं टाळिति ।।

**दो०-पुसतां अतां उपाय मज हें मम अभाग्य भूरि ।।**
**परिसुनि वचनां स्नेहमय गुरु अनुराग-सुपूरिं ।।२५५।।**

रामकृपेंच तात तें सत्य हि । सिद्धि रामविमुखा स्वप्निंहि नहि ।।
एक वदन संकोच वाटतो । त्यजिति अर्ध वुध सर्व जात तों ।।
दोघे भ्राते तुम्हीं वना जा । फिरवुं सिता-लक्ष्मण-रघुराजा ।।
श्रवुनि सुवच दो बंधू हर्षित । झाल्या काया प्रमोद पूरित ।।
प्रमुदित मन तन तेजें भ्राजे । नृप सजीव जणुं राम हि राजे ।।
लाभ जनां बहु हानि अल्प ती । सम सुख-दुःखी राण्या रडती ।।
वदति भरत मुनि-वचना करतां । जग जीवां फळ इष्ट समस्तां ।।
करिन काननीं वास जन्मभर । याहुन अधिक न मजला सुखपर ।।

**दो०–रामसिता हृदयस्थही तुम्हि सर्वज्ञ सुजाण ॥**
**नाथ! कथित जर खरेंच कि निजवच करा प्रमाण ॥२५६॥**

ऐकुनि वचना स्नेहा पाहुनि। होति विदेही सकलसभा मुनि ॥
भरत-महा-महिमा जलराशी । मुनि-मति उभी तटीं अबलाशी ॥
पार जावया उपाय पाही। नाव तराफा जहाज नाहीं ॥
वर्णि कोण नर भरत-महत्ता। सर शुक्तित ये सिंधु कि भरता ॥
प्रिय मुनि मना भरत अति झाले। सह समाज रामाप्रति आले ॥
प्रभुनीं प्रणमुनि दिलें शुभासन। वसति मिळत सब मुनि-अनुशासन ॥
वदले मुनिवर वचन विचारें। देश-काल-अवसर-अनुसारें ॥
पहा राम! सर्वज्ञ सुजाण हि। धर्म-नीति-गुण-बोध-निधान हि ॥

**दो०–सकल हृदंतरिं वसतसां जाणां भाव कुभाव ॥**
**पुरजन–जननीं–भरत–हित होण्या वदा उपाव ॥२५७॥**

आर्त कधीं न विचारें वदतो। डाव जुगाऱ्या अपला दिसतो ॥
श्रुत मुनिवचन वदति रघुराव कि। नाथ आपले हाति उपाव कि ॥
सर्वां हित तुमची रुचि रक्षण। आज्ञा करतां, मोदें पालन ॥
होइल आज्ञा प्रथम मला जी। शिरिं धरुनी ती पाळिन राजीं ॥
पुढें जया प्रभु जसें सांगतिल। तसें सर्वपरिं सर्व वागतिल ॥
रामकथित तुम्हि सत्य, वदति मुनि। भरतस्नेह विचार नुरवि मनिं ॥
यास्तव पुनः पुन्हां वदतो, अति–। भरत भक्तिवश झाली मम मति ॥
मम मत राखुनि भरत रुचीला। जें कराल, शुभ, शिव साक्षीला ॥

**दो०–भरत विनति घ्या ऐकुनी सादर करा विचार ॥**
**करा साधुमत–लोकमत–नृपनय–निगम–सुसार ॥२५८॥**

गुरु–अनुराग पाहुनी भरतीं । राम–हृदयिं आनंदा भरती ॥
जाणुनि भरता धर्मधुरंधर । तन मन वच निजसेवक सुंदर ॥
वदले गुरुवचना अनुकूल हि । वचन मंजु मृदु मंगलमूल हि ॥
नाथ–शपथ आणहि पितृचरणीं । भ्राता भरत समान न भुवनीं ॥
जे गुरु–पद–अंबुज–अनुरागी । लोक–वेद–मति ते बहु भागी ।
अपलें इतकें प्रेम जयावर । कोण वदेल भरतभाग्या वर ॥
बघुनि बंधु लघु, मति संकुचते– । वदत मुखावर भरत–महत्ते ॥
भरत म्हणति तें करत चांगलें । राम वदुनि हें स्तब्ध राहले ॥

**दो०–वदले मुनि भरता तदा त्यज संकोचा तात ॥**
**कृपांबुधी बंधुला प्रिय सांग कि जें हृदयांत ॥२५९।**

❖ ❖ ❖

## अध्याय २५ वा

परिसुनि मुनिवच बघुनि राममन । गुरू-स्वामि अनुकूल पूर्ण, पण– ॥
अपल्या शिरिं सब जाणुनि भारहि । वदूं शकति ना करिति विचारहि ॥
पुलकित वपू सभेमधि उठले । स्नेह नीर नीरजाक्षि भरलें ॥
मुनिनाथें वक्तव्य कथित मम । काय सांगु त्याहुनि अधिकोत्तम ॥
प्रभुचा स्वभाव मी जाणतसें । अपराध्याही कोप कधि नसे ॥
कृपा स्नेह मजवरी विशेषहि । खेळतही कधि दिसे न रोषहि ॥

आशिशुपण मी त्यक्त न संगा । कधि करिती ना मम मन भंगा ।।
अनुभविली प्रभु कृपारीत कीं । खेळि दिली मज हारि जीत की ।।

**दो०-स्नेह-भीड-वश मी हि कधि सम्मुख वदलों नाहिं ।।**
**दर्शन-तृप्ति न अझुन ही प्रेम-तृषित नेत्रां हि ।।२६०।।**

विधिस न बघवे प्रेमा सुंदर । पाडी नीच जननिमिषिं अंतर ।।
हें हि वदत मज बरें न दिसतें । कोण साधु शुचि झाला स्वमतें ।।
माय मंद मी साधु सुचाली । मनिं अस आणित कोटि कुचाली ।।
कोद्रव कणिस सुशालि फळे कीं । कालव शुक्तित मोति मिळे कीं ।।
स्वप्निं हि कोणा दोष न लेशहि । मम अभाग्य-सिंधू च अगाध हि ।।
नेणुनि निज अघ परिणामांना । जननिस दाह कुशब्दिं दिला ना ! ।।
हरलों सोधुन हृदयिं सर्वपरिं । मम हितकर एकचि उरलें तरि ।।
सिताराम मत्स्वामी, प्रभु गुरु । गमे होइ परिणामीं हित पुरु ।।

**दो०–साधुसभें प्रभु गुरु निकट तीर्थि वदें सद्भाव ।।**
**प्रेम कपट सत्यानृता जाणति मुनि रघुराव ।।२६१।।**

भूपति मृत पाळुनी प्रेम-पण । जननि कुमति साक्षीस भुवनगण ।।
पाहवती ना व्याकुळ माता । पुरवासी ज्वरिं दुःसह जळतां ।।
मीच कि सकल-अनर्थ-मुळाशीं । श्रवुनि कळुनि हें सहुं शूलांसी ।।
ऐकुनि कीं रघुनाथ गत वना । मुनिवेषें सह सिता लक्ष्मणा ।।
पद-त्राण-विण चालत पायीं । शंकर साक्षि जगें या घायीं ! ।।
बघुनि निषादाचे सुस्नेहा । कुलिश-कठिण उर भग्न नव्हे हा ।।

अतां येत सब नेत्रि दिसे घड । सर्व साहवी जीव जगुनि जड ।।
पथि इंगळया साविणि, ज्या पाहुनि । देति रोष विष विषमहि टाकुनि ।।

**दो०-दो रघुनन्दन ते सिता अहित जिचे चित्तास ।।**
**त्यजुनि तिचा सुत विधि कुणा दे दुःसह दुःखास ।।२६२।।**

भरत-सुवाणि विकल अति ऐकत । आर्ती प्रीति विनय नय संयुत ।।
शोकमग्न तळमळे सभा तीं । जगूं कमलवन कीं हिमपातीं ।।
बहुविध कथा पुरातन सांगुनि । भरता प्रबोधिती ज्ञानी मुनि ।।
वदले उचित वचन रघुनंद हि । दिनकर कुल कैरव-वन-चंद हि ।।
ग्लानी तात वृथा करता अति । जाणुनि ईशाधीन जीव गति ।।
मम मत कीं त्रिभुवनीं त्रिकाळीं । पुण्यश्लोक तात तव-खालीं ।।
मनि आणिति कुटिलता तुम्हांवर । करिति लोक ते घाता इह पर ।।
दोष जननिवर जड ते ठेवित । जिहि गुरु साधुसभा नहि सेवित।।

**दो०-मिटे पाप संसार सब, अखिल अमंगल नाश ।।**
**लोकिं सुयश परलोकि सुख स्मरतां तव नामास ।।२६३।।**

सहज सत्य वदुं साक्षी शंकर । भरत राहि महि तुम्हि राखां तर।।
व्यर्थ कुतर्क नका करुं ताता । प्रेम वैर ना लपति लपवतां ।।
मुनिगण निकट विहगमृग जमती । बाधक वधिक विलोकुनि पळती ।।
कळे हिताहित पशुपक्ष्या तंव । ज्ञानगुणागर तर तनु मानव ।।
तात तुम्हां मी नीट जाणतों । काय करूं पडलें संकट तों ।।
नृपें त्यजुनि मज सत्य पाळिलें । प्रेम-पणास्तव तनुला त्यजिलें ।।

कष्ट मना तद्वचन भंगतां। त्याहुनि तव संकोच–अधिकता ॥
त्यांत दिली गुरुनीं आज्ञा ही। करु अवश्य जें म्हणाल काहीं ॥

**दो०–भीड सोडुनी मुदित मन सांगा करुं तें आज ॥**
**सत्यसंध रघुवर–वचन परिसुनि सुखी समाज ॥२६४॥**

सुरगण–सहित सभय सुरराजहि। शोचति होउं बघे किं अकाज हि ॥
परी न करवे उपाय काहीं। मनें शरणगत सब रामाही ॥
चिंतुनि पुन्हां परस्पर म्हणती। भक्त भक्ति वश रघुपति असती ॥
स्मरतां अंबरिषा दुर्वासा। सुर–सुरपतिची परम–निराशा ॥
सहती सुर बहुकाळ दुःख जंव। प्रल्हादें प्रगटित नरहरि तंव ॥
वदति पिटुनि शिर लागति कानां। सुरगति अतां भरतकरिं जाणां ॥
आन उपाय न दिसतो देवां। मानिति राम–सुसेवक–सेवा ॥
प्रेमें स्मरा हृदयि भरता तरि। जो गुणशीलें वश रामा करि ॥

**दो०–परिसुनि सुरमत सुरगुरु वदति तुम्ही बहुभाग ॥**
**सकल सुमंगल–मूल जगिं भरत चरणिं अनुराग ॥२६५॥**

सीतापति – सेवक – पदसेवन। कामधेनुशत समान शोभन ॥
भरत–भक्ति तुमचें मनिं आली। साधि कार्य विधि, चिंता कसली ॥
पहा भरत–महिमा सुरराजा। स्वभावतांच विवश रघुराजा ॥
देव न भीति मना स्थिर करणें। भरत राम–पडछाया गणणें ॥
सुरचिंता सुरगुरु मत ऐकति। अंतर्यामी प्रभु संकोचति ॥
निजशिरिं भार भरत मनिं जाणति। हृदिं अनुमानें बहु करुं लागति ॥

निश्चय केला मनीं विचारें। रामाज्ञेंतचि मम हित सारें ॥
निज पण मोडुनी ममपण राखति। स्नेह कृपा मजवरी अहा! अति ॥

**दो०–करिति अनुग्रह अमित अति बहुविध सीतानाथ ॥**
**प्रणमुनि मग वदले भरत जुळुनि जलज युग हात ॥२६६॥**

अतां काय वदुं वदवूं स्वामी। कृपा-अंबुनिधि अंतर्यामी ॥
गुरू प्रसन्न नाथ अनुकूल हि। नुरति मलिन मन-कल्पित शूल हि॥
स्वभयें भीत नसुनि चिंता मुळि। दिनकर दोष न देव! दिशाभूलि ॥
मम अभाग्य नी जननि कुटिलता। विधिगति विषमहि काल कठिणता॥
सकल करुनि पण घाला घालिति। प्रणतपाल पण प्रभु निज पाळिति ॥
ही नव रीति न अपली कांहीं। वेदि विदित जनिं गुप्त हि नाहीं ॥
जगत अहित, हित स्वामिच साचे। भले भलेपणिं होइ कुणाचे ? ॥
देव तरूसा स्वभाव देवा ! । समुख विमुख न कधि कोणा वा ॥

**दो०–निकट जाति जाणून तरु छाया शुच शमवीच ॥**
**मागत अभिमत लभत जगिं रावरंक शुचि नीच ॥२६७॥**

बघुनि नाथ-गुरु-अति सुस्नेहा। गत तळमळ, थळ नहिं संदेहा ॥
तेंचि करा करुणाकर आतां। क्षोभ न हो प्रभुचित्ति जनहिता ॥
जो स्वामिस संकोचिं पाडतो। स्वहित इच्छि, मतिनीच दास तो।
सेवक हित तों स्वामी-सेवा–। करणें, त्यजुनि सकल सुख-हेवा ॥
स्वार्थ नाथ फिरतां सर्वांचे। आज्ञा-पालन कोटि हिताचें ॥

हें स्वार्थ नि परमार्थ हि सार । फल सब सुकृत सुगति-शृंगार ॥
देव एक मम विनति ऐकणें । उचित गमे तें नंतर करणें ॥
तिलक-साज आणिला सकल ही । प्रभो ! मान्य तर करा सुफल ही ॥

**दो०–सानुज धाडुनि विपिनि मज करणें सकल सनाथ ॥**
**नातर फिरवा बंधु युग चलतो मी प्रभुसाथ ॥२६८॥**

नातर बंधु तिघे वनि जातिल । सीतेसह रघुराजा फिरतिल ॥
प्रभुमन जेणें प्रसन्न व्हावें । करुणा सागर तेंच करावें ॥
देव दिला मम शिरिं अति भारहि । मजला नीति न धर्म विचारहि ॥
स्वार्थास्तव सगळें मी वदतों । आर्ताचें मनि विवेक नसतो ॥
दे उत्तर ऐकुन आज्ञेला । तो सेवक लाजवि लाजेला ॥
तो मी अवगुण-उदधि-अगाधू । स्वामी स्नेहें वानिति साधू ॥
अतां कृपालु मला तें रुचतें । ज्यांत नाथ मन नहि संकुचतें ॥
प्रभुपद-शपथ वदें सद्भावें । विश्व-सुमंगल एक उपावें ॥

**दो०–सुप्रसन्न संकोचविण प्रभु जें ज्या कथितील ॥**
**तें करितिल शिरिं धरुनि सब विघ्नपेंच सुटतील ॥२६९॥**

भरत वचन शुचि परिसुनि हर्षति । 'साधु साधु' सुर सुमनें वर्षति ॥
अडचणींत कोसलपुरवासी । प्रमुदित मन तापस वनवासी ॥
चुप रघुनाथ बसति संकोची । प्रभुगति बघुनि सभा सब शोची ॥
जनकदूत ते अवसरिं ठाकति । श्रवुनि वसिष्ठ शीघ्र बोलावति ॥
प्रणमुनि जेव्हां रामा पाहति । दिसता वेष दुःख अति पावति ॥

दूतां मुनिवर झाले पुसतें । वदा विदेह–भूप–कुशला तें ॥
तैं संकोचुनि महिं शिर नमवुनि । वदले चर-वर करांस जुळवुनि ॥
स्वामी सादर पुसतां आपण । नाथ ! होय तें कुशला कारण ॥

**दो०–नातर कोसलनाथ सह गता कुशलता नाथ ! ॥**
**मिथिलाऽयोध्या फार, जग झालें सकल अनाथ ॥२७०॥**

कोसलपतिगति जनकजनिं कळे । लोक शोकवश होति बावळे ॥
दिसले तदा विदेह जयांसी । नाम सत्य वाटे न तयांसी ॥
राणि-कुचाळि कळत नरपाला । सुचे न मणिविण जेवीं व्याला ॥
भरत राज्य रघुवर–वनवासहि । मिथिलेश्वर-हृदिं भीति विषादहि ॥
नृपति पुसति बुध सचिव समाजीं। सांगा उचित काय तें आजीं ॥
पेंच उभयपरिं बघत कोशले । चला रहा वा कुणि न बोलले ॥
धरुनि धीर नृपती सुविचारी । धाडिति चार चतुर चर नगरीं ॥
भरत सुभाव कुभाव पहावे । न कळों देतां सत्वर यावे ॥

**दो०–गत नगरींचर भरतगति कृति जाणून बघून ॥**
**चित्रकूटिं निघतां भरत हेर जाति परतून ॥२७१॥**

दूत येउनी भरत-कृती गति । जनक-समाजिं यथामति वर्णिति ॥
तैं गुरु परिजन सचिव महीपति । स्नेह शोकवश विकल सकल अति॥
धीर धरुनि भरता वाखाणिति । सुभटां दरोग्यांस बोलाविति ॥
घर-पुर देशिं सुरक्षक राखुनि । हय गज रथ बहु याने साजुनि ॥
द्विघटि साधुनी शीघ्र निघाले । कृत विश्राम न पथिं महिपालें ॥

स्नान पहाटे प्रयागिं उरकति । निघुनि उतरुं यमुना सब लागांते ।
आम्हां खबरिस धाडिति नाथा । असें म्हणुनि महिं नमिती माथा ।
सहा सात सह किरात धाडिति । चरां परत मुनि नाथ पाठविति ।।

**दो०–जनकागमना ऐकुनी हर्षित अवधसमाज ।।**

**रघुनंदन संकोचती अति सचिंत सुरराज ।।२७२।।**

ग्लानिगलित कुटिला कैकेई । सांगे कोणां, दूषण देई ? ।।
असें गणुनि मनिं मुदित नारिनर । राहुं चार दिन होइ फार बरं ।।
अशापरीं तो वासर सरला । प्रात: स्नाना समाज वळला ।।
स्नान करुनि पूजिति नर नारी । गणपति गौरि पुरारि तमारी- ।।
रमारमण चरणां मग वंदुनि । विनविति सांजलि, पदरां पसरुनि
राजाराम जानकी राणी । अवध मोद अवधी नृप-धानी ।।
स्ववश वसो सुखि सहित समाजा । राम करोत भरत युवराजा ।।
सकलां या सुखसुधें सिंचणें । जीवन-लाभ देव जगिं देणें ।।

**दो०–गुरु समाज बंधूं सहित रामराज्य नगरांत–।।**

**होवो असतां राम नृप अयोध्येंत देहांत ।।२७३।**

❖ ❖ ❖

## अध्याय २६ वा

श्रवुनी स्नेहल पुरजन-वाणी । निंदिति योग-विरागां ज्ञानी ।।
नित्यकर्म यापरीं करुनि जन । रामाला प्रणमति पुलकित तन ।।
उच्च नीच मध्यम नर नारी । घेती दर्शन यथाधिकारी ।।

सावधान सकलां सन्मानिति । सकलहि कृपानिधाना वानिति ॥
रघुवर-वाणा आवालकपण । प्रीति ओळखुनि नीति सुरक्षण ॥
राम-शील-संकोच सागरहि । सुमुख सुलोचन ऋजू स्वभावहि ॥
वदत राम-गुण-गण अनुरागति । निज भाग्यां सगळे स्तवुं लागति ॥
पुण्य-पुंज आम्हांसम थोडे । ज्यांस राम मानिति 'मम' कोडें ॥

**दो०-प्रेम मग्न त्या समयिं सब; श्रवुनि येत मिथिलेश ॥**
**सभे सहित सत्वर उठति रविकुल-कमल दिनेश ॥२७४॥**

वंधु सचिव गुरु पुरजन साथ । पुढें गमन करिती रघुनाथ ॥
गिरिवर बघति जनकपति जेव्हां । नमन करुनि सोडिति रथ तेव्हां ॥
रामदर्शनोत्साह-लालसें । कुणा पथश्रम कष्ट लव नसे ॥
मन तिथं जिथं रघुवर वैदेही । विण मन तन सुखदुःख कसेंही ॥
येताहेत असे मिथिलापति । सहित समाजा प्रेममस्त मति ॥
आले जवळ बघुनि अनुरागति । सादर भेटुं परस्पर लागति ॥
करिति जनक मुनिजनपदिं वंदन । प्रणमन करिति ऋषिस रघुनंदन ॥
राम वंधुसह भेटुनि राजा । घेउनि जाति समेत समाजा ॥

**दो०-आश्रम सागर शांतरस पूरित पावन पाथ ॥**
**सेना जणुं करुणासरित नेति सवें रघुनाथ ॥२७५॥**

ज्ञान-विराग तटां बुडवी ती । शोकवचन नद नाले मिळती ॥
शोक-उसासे समीर-लाटा । पाडिति धैर्य विटपवर काठां ॥
विषम विषाद धार फोंफावत । भ्रम भय भंवरे चक्र न गणवत ॥

नाविक वुध विद्या बडि नावहि । नाहिं लोटवत अटकळ मुळि नहिं ।।
वनचर कोळि किरात विचारे । थकित पथिक हरुनी मनि सारे ।।
आश्रम-उदधि मिळे जैं पोचुनि । व्याकुळ उठे सिंधु कीं क्षोभुनि ।।
शोकाकुल युग राजसमाज हि । ज्ञान न राही धीर न लाजहि ।।
नृपगुणरूप-शील वाखाणति । रडति शोकसागरिं अवगाहति ।।

**छं०–बुडतात शोक समुद्रि शोचति नारि नर विव्हळ महा ।**
**बहु दोष देत सरोष बोलति वाम विधि करि काय हा! ।।**
**सुर सिद्ध तापस योगि मुनि गति विदेहाची बघुनिया ।।**
**तुलसी न कोणि समर्थ जो तरुं शके स्नेह नदीस या ।।१।।**

**सो०–करिति अमित उपदेश मुनिवर लोकां जिथ तिथें ।।**
**धरणें धीर नरेश वदति विदेहा रामगुरु ।।२७६।।**

यज्ज्ञानार्कें भवनिशि नासत । वचन-किरणिं मुनि कमल विकासत ।।
तयां समीप कि मोह नि ममता । ही सियरामस्नेह–महत्ता ।।
विषयी साधक सिद्ध-ज्ञानी । त्रिविध जीव जगतीं श्रुति वानी ।।
रामस्नेह रसाळ मनाचा । साधुसभें अति आदर त्याचा ।।
राम–प्रेमविण शोभे ज्ञान न । कर्णधारविण जसं जलवाहन ।।
विदेहास मुनि वहु समजावति । रामघाटिं सर्वहि अवगाहति ।।
सकल शोक-संकुल नर नारी । तो वासर सरला विण वारी ।।
करिति न पशु खग मृग आहारा । प्रिय परिवारा काय विचारा ।।

**दो०–निमिनृप-रघुनृप-संघ युग करिती प्रातः स्नान ।।**
**बसले सब वट-विटप-तळि कृशतनु चित्तें म्लान ।।२७७।।**

जे महिसुर दशरथ–पुर–वासी । जे मिथलापति–नगर–निवासी ।।
हंस–वंश–गुरु, जनक–पुरोहित । जिहिं जगपथ-परमार्थ हि शोधित।।
करुं लागति उपदेश अनेक हि । सहित धर्म नय विरति विवेकहि ।।
कौशिक कथा पुरातन सांगति । बहु, मृदुवचनिं सभे समजावति ।।
मग रघुनाथ कौशिका सांगति । नाथ काल निर्जल सब राहति ।।
रघुपति उचित वदति मुनि वदले । प्रहर आजही अडीच टळले ।।
ऋषि-रुचि बघुनि वदति मिथिलापति । इथें अन्नखाणें अनुचित अति ।।
भलें भूप-वच सकलां रुचलें । आज्ञेनें स्नानास चालले ।।

**दो०–त्या समयीं फल-फूल-दल-मूलां किती प्रकार ।।**
**वनचर पुष्कळ आणिती भरुनि कावडी भार ।।२७८।।**

रामकृपें गिरि कामद वनती । अवलोकत खेदा अपहरती ।।
सर–सरिता–वन–भूमि–विभागां । जणूं पूर मोदा अनुरागा ।।
वेलि विटप सब फुलती फळती । खग मृग अलि अनुकूल बोलती ।।
तदा अधिक उत्साह वनाला । त्रिविध समीर सुखद सर्वांला ।।
वदवत मूळि च मनोहरता नहिं । जनका पाहुणचार कि करि महि ।।
तैं स्नाना कर करुनि सर्वजण । घेउनि राम–जनक–मुनि–शासन ।।
बघ बघुनी तरुवर अनुरागति । पुरजन तरुतळिं उतरूं लागति ।।
दल फल विविध मूल कंदानां । पावन सुंदर सुधा–समानां–।।

**दो०–सादर सर्वां रामगुरु धाडिति बहु तात्काळ ।।**
**पुजुनि पितर सुर अतिथि गुरु करुं लागले फराळ ।।२७९।।**

यापरिं चार संपले वासर । रामा निरखुनि सुखी नारि नर ।।
आवड उभय समाज-मना ही । वरें गमन रामाविण नाही ।।
सितारामां सवें वास वनिं । कोटि अमरपुर समान सुखखनि ।।
त्यजुनि राम लक्ष्मण वैदेही । ज्यां प्रिय गृह विधिवंचित ते ही ।।
होइ दैव उजवें पुरतें जैं । राम समीप वास विपिनीं तैं ।।
मज्जन मंदाकिनीं त्रिकालां । राम दृष्टि मुद-मंगल-माला ।।
अटन रामगिरि वन तापस थळ । अशन अमृत-सम कंदमूल फल ।।
सुख संयुत संवत हे चवदा । क्षणसम होति, न कळति गत कदा।।

**दो०-सुखा योग्य या जन न सब भाग्य कुठें म्हणतात ।।**
**स्वभावें चि अनुरक्त उभ समुदय रामपदांत ।।२८०।।**

यापरिं सकल मनोरथ करती । प्रेमळ वच परिसत मन हरतीं ।।
सीता-माता धाडी ज्यांसी । आल्या सुसमय बघुनी दासी ।।
सिता-सासुनां अवसर, कळलें । जनकांत:पुर आलें सगळें ।।
कौसल्या सादर सन्मानुनि । दे आसन समयोचित आणुनि ।।
स्नेह-शील-संपूर्ण उभयता । द्रवति कठिण पवि बघत ऐकतां।।
पुलक, शिथिल तनु सजल विलोचन । कुरतडती महि करती क्रंदन ।।
राम-सिता-प्रीतीच्या मूर्ती । जणुं करुणा बहु वेषिं विलपती ।।
म्हणे सुनयना विधिमति कुटिला । क्षीरफेन पविघणें किं कुटिला ।।

**दो०-कानिं सुधा दिसतें गरळ करणी सकल कराल ।।**
**काक घुबड बक चहुंकडे मानसिं मात्र मराल ।।२८१।।**

शोकें वदली देवि सुमित्रा । विधिगति अति विपरीत विचित्रा ।।
तो सृजि पाळी मग करि होळी । बालकेलि-सम, विधमति भोळी ।।
म्हणे कौसिला दोष कुणा नहि । कर्में सुखदुःखें क्षति लाभ हि ।।
कठिण कर्मगति जाणि विधाता । जो शुभ अशुभ, सकलफल दाता ।।
ईश्वर–आज्ञा शिरिं सर्वांचे । सृष्टी-स्थिति लय-विष-अमृताचे ।।
देवि मोहवश शोक विफळ हा । विधी प्रपंच अनादि अटळ हा ।।
मनिं आणुनि नृप जीवन मरणें । निज हित हानि बघुनि सखि रडणें ।।
म्हणे सुनयना सत्य सुवाणी । सुकृति अवधि कोसलपति-राणी ।।

**दो०–लक्ष्मण सीता राम वनिं गत न अशुभ, शुभ अंति ।।**
**म्हणे कौसिला गहिंवरुनि भरतविषयिं मज खंति ।।२८२।।**

ईशकृपें तव आशिषिं भारी । सुत सुतवधू देवसरि वारी ।।
राम-शपथ घेतली कधीं नहि । सद्भावें वदुं ती घेऊन हि ।।
भरत-शील-गुण-विनय-महत्ता । श्रद्धाभक्ति भलाइ बंधुता ।।
वदत शारदा–मतिहि कचरते । सागर शिंपी कधिं किं उपसते ।।
जाणें सदा भरत कुलदीपक । कितिदां वदले मज नृपनायक ।।
कसें कनक मणि पारखि लाभत । स्वभावें चि नर समयिं परीक्षित ।।
अनुचित आज असें मम भाषण । शोकीं स्नेहीं अल्प चतुरपण ।।
श्रवुनि पूत गंगेसम वाणी । स्नेह-विकल झाल्या सब राणी ।।

**दो०–वदे सधीरा कौसला श्रुणु देवी मिथिलेशि ।।**
**तुम्हा ज्ञाननिधि–वल्लभे कोण काय उपदेशि ।।२८३।।**

राणि ! नृपानां सुसंधि साधुनि । अपत्यापरि सांगा समजाउनि ॥
फिरवा लक्ष्मण जाति भरत वनिं । जर हें मत मानेल भूप मनिं ॥
तर सुयत्न करणें सुविचारीं । मज चिंता भरताची भारी ॥
स्नेह सुगूढ भरत मनिं राही । राहत दिसत भलें मज नाहीं ॥
बघुनि सुभाव सुवाणी सरला– । ऐकुनि, मग्न करुणरसिं सकला ॥
गगनिं सुमन झड धन्यधन्य रव । स्नेह-शिथिल मुनि योगसिद्ध तंव ॥
राणिवसा सब थक्क बघतसे । धरुनि सुमित्रा धीर वदतसे ॥
देवि नाडियुग यामिनि टळली । प्रेमें राममाय तैं उठली ॥

**दो०–यावें लवकर अतां सखि ! वदली युत सद्भाव ॥**
**अम्हां अतां तों ईशगति साह्य किं मिथिला राव ॥२८४॥**

स्नेह बघुनि वच नम्र ऐकुनी । जनक राणिपद पावन धरुनी- ॥
वदे देवि ! तव उचित विनति ही । दशरथगृहिणी रामजननि ही ॥
प्रभु निज नीचासिहि आदरती । अग्नि धूम्र शिरिं गिरि तृण धरती ॥
सेवक राजे तन मन वाणीं । साह्य सदैव महेश–भवानी ॥
अपणां कोण सहायक लायक । दीप कि शोभे भानु सहायक ॥
राम वनीं करुनी सुरकार्यहि । करिति अचल कोसलपुरिं राज्यहि ॥
रामभुजबळें अमर नाग नर । वसतिल निज निज लोकिं सुखी वर ॥
पूर्विच भाकति याज्ञवल्क्य, तें । मुनि-वच देवि मुधा ना ठरतें ॥

**दो०–मग नमुनी प्रेमें अति सीतेस्तव विनवून ॥**
**आज्ञा सीता-माय घे स-सिता जाइ निघून ॥२८५॥**

प्रिय परिजनांस मग वैदेही । भेटे ज्यां त्यां योग्य जसें ही ॥
बघुनि जानकिस तापसवेषीं । व्याकुळ सकळ विषाद विशेषीं ॥
जनक रामगुरु-आज्ञा घेउनि । निघति बघति सीते तळि येउनि ॥
जनक धरिति हृदि जानकि, जाणुनि । प्रेमा प्राणां पावन पाहुणि ॥
उरिं अनुराग–अंबुधी उसळे । जणूं प्रयाग नृपति-मन बनलें ॥
सीता–स्नेह दिसे वट वाढत । राम–प्रेम शिशू वर शोभत ॥
मुनि चिरजीवी ज्ञान विकल जणु । पावे बुडत बाल-अवलंबनु ॥
मोह मग्न नहि कधि विदेह-मति । रघुवर-सिता-स्नेह-महिमा अति ॥

**दो०–सीता पितर-प्रेमवश विकल भुले तनु-भान ॥**
**धरणि सुता धीरा-धरी समय-सुधर्म-सुजाण ॥२८६॥**

दिसतां सीता तापस वेषीं । पित्या प्रेम परितोष विशेषीं ॥
पुत्रि पवित्रीकृत कुल उभयहि । सुयश-धवल-जग वदती सकलहि ॥
जिकुनि सुरसरि तुझी कीर्ति सरि । कोटी ब्रह्मांडीं गमना करि ॥
करी प्रथित गंगा त्रिस्थानां । ही करि साधु–समाजां नाना ॥
स्नेहें सत्य पिता शुभ वदले । सीते संकोचें जणुं गिळलें ॥
माता पिता पुन्हां हृदि घेती । सदुपदेश शुभ आशिस देती ॥
वदे न सीता मनिं संकोचित । रात्रि राहणें इथें कि अनुचित ॥
राणि ओळखुनि सांगे रावा । हृदयीं शीला स्तवी स्वभावा ॥

**दो०–सीते कितिदां भेटुनि बोळविती सन्मानि ॥**
**सांगे सुसमयिं भरतगति राणि शहाणि सुवाणि ॥२८७॥**

❖ ❖ ❖

## अध्याय २७ वा

श्रवुनि भूप भरत व्यवहारा । कनकिं सुगंध सुधें शशिसार ।।
मिटले सजल नयन पुलकित तन । वर्णुं लागले सुयश मुदितमन ।।
ऐक सुसावध सुमुखि सुलोचनि । भरतकथा भवबंध-विमोचनि ।।
धर्मि नृपनयीं ब्रह्मविचारीं । यथामती मी प्रवेशकारी ।।
कशी भरत-महिमा मम मति ती- । वर्णि, शिवे छाये न छलें ती ।।
विधि गणपति शिव शेष शारदा । कवि कोविद वुध मति विशारदां
भरत चरित कीर्ती कर्तूती । धर्म शील गुण विमल विभूती ।।
समजत ऐकत सुख सकलांतरि । शुचि गंगे रुचि सुधे निरादरि ।

**दो०-निरवधि गुग निरुपमपुरुष भरत भरतसम नान ।।**
**गणा सुमेरु किं शेर-सम कवि कुल लजायमान ।।२८८।।**

वर्णुं न शकति कोणि वरवर्णी । जशि जलहीन मीनगति धरणीं ।।
अमित भरत-महिमा श्रुणु राणी । जाणति राम, न वदवे वाणीं ।।
प्रेमें भरतानुभाव वानुनि । नृप वदले स्त्रीमन-रुचि जाणुनि ।।
फिरतिल लक्ष्मण, जाति भरत वनि । हितकर सर्वां रुचे सर्वमनि ।।
देवी परंतु रघुवर-भरतीं । प्रीती प्रतीति ना तर्कवती ।।
भरत अवधि ही स्नेहा ममते । राम तरी कीं सीमा समते ।।
स्वार्थ सकल परमार्थ सुखानां । आणिति भरत मनीं स्वप्नां ना ।।
स्नेह रामपदिं सिद्धी साधन । हें मज दिसे भरत-मत-लक्षण ।।

**दो०-चुकुनिहि भरत न टाळिती मनेंहि रामाज्ञेस ॥**
**शोक नसावा स्नेहवश वदले विकल नरेश ॥२८९॥**

राम-भरत-गुण गणतां प्रीतीं । उभयां निमिषासम रजनी ती ।
राज-समाज उदयिं युग जागति । स्नान करुनि सुर पूजूं लागति ॥
स्नाति जाति गुरुकडे रघुपती । नमुनि चरणिं कल पाहुनि वदति ॥
नाथ ! भरत माता पुरवासी । शोकाकुल दुःखी वनवासीं ॥
सहित समाज राव मिथिलापति । वहु दिन झाले क्लेशां साहति ॥
उचित गमे तें करणें आतां । नाथ ! सर्वहित अपले हातां ॥
वदुनि असे रघुराज संकुचति । प्रकृति शील पाहुनि मुनि पुलकति ॥
राम तुम्हांविण सब सुख, उभयां । राज समाजां समान निरया ॥

**दो०-प्राणां प्राणहि जिवा जिव सुखास सुख तुम्हि राम ॥**
**त्यजुनि तुम्हां ज्या रुचे गृह तात तयां विधि वाम ॥२९०॥**

जळो कर्म सुख धर्महि साधन । जिथें राम-पद-पंकज-भाव न ॥
योग कुयोग, बोध अज्ञानहि । रामप्रेम न जिथें प्रधानहि ॥
दुःखि तुम्हांविण सुखी तुम्हांस्तव । ज्यां मनिं जें तें जाणां वास्तव ॥
अपली आज्ञा सकलां मस्तकिं । विदित कृपाला गती समस्त किं ॥
आपण लावा स्वाश्रमिं पायां । स्नेह-शिथिल झाले मुनिराया ॥
प्रणमुनि राम आश्रमा परतति । (ऋषि सधीर आले जनकाप्रति) ॥
रामवचन गुरु नृपां निवेदित । स्नेह-सुशीलें सहज सुशोभित ॥
महाराज तें अतां करावें । धर्म-सहित हित सर्वां व्हावें ॥

**दो०–ज्ञान निधान सुजाण शुचि-धर्म-धीर नरपाल ।।**
**या समयिं न कोणी, तुम्हीं संकट शमवुं शकाल ।।२९१।**

परिसुनि वचन जनक अनुरागति । ज्ञान-विराग विरागि, बघत गति।।
स्नेह-शिथिल चिंतिति चित्तांहीं । आलों इथें भलें कृत नाहीं ।।
रायें वनिं रामास घाडिले । प्रियप्रेम आपलें पाळिलें ।।
आम्हि वनांतुनि धाडुं वनातें । प्रमुदित परतूं ज्ञान महत्तें ।।
द्विज तापस मुनि परिसुनि बघती- । प्रेमें व्याकुळ विशेष बनती ।।
धरिति धीर नृप समजुनि समया । भरता-प्रति गत सह समुदाया ।।
भरत पुढें येउनि त्यां नेती । समयोचित शुभ आसन देती ।।
तात भरत ! वदले निमिराव किं । तुम्हां विदित रघुविर स्वभाव किं।।

**दो०–राम सत्यव्रत धर्मरत स्नेहि सुशील कृपाल ।।**
**संकोचें संकट सहति सांगुं जसें किं म्हणाल ।।२९२।।**

परिसुनि लोचन सजल, पुलकुनी । वदले भरत धीर अति धरुनी ।।
प्रभू ! पूज्य पितृसे प्रिय आपण । कुलगुरु सम हित माय न बाप न
कौशिकादि मुनि सचिव समाजीं । ज्ञान अंबुनिधि आपण आजीं ।।
शिशु सेवक आज्ञा-अनुगामी । जाणुनि शिकवण मज द्या स्वामी ।।
या स्थळिं समाजि आपण पुसतां । मौन मलिन मी वदत मूर्खता ।।
लघु मुखिं मोठा घास घेतसें । क्षमा ! बघुनि विधिवाम मज असे
निगमागम वदतात पुराणें । सेवाधर्म कठिण जग जाणें ।।
स्वामि-धर्म नी स्वार्थ विरोधहि । वैर अंध, ना प्रेमीं बोधहि ।।

**दो०–प्रभुरुचि धर्मव्रत जतन, परवश मज जाणून ॥**
**सकलां संमत सकलहित करणें प्रेम बघून ॥२९३॥**

श्रवुनि वचन पाहुनी स्वभाव । सह समाज वाखाणिति राव ॥
सुगम अगम मृदु मंजु कठोरहि । अर्थ अमित अति अल्प अक्षरहि ॥
जरि मुख मुकुरिं मुकुर निज पाणीं । घेववे न तशि अद्‌भुत वाणी ॥
भूप भरत मुनि सहित समाजा । गत जिथं विबुध-कुमुद उडुराजा॥
लोक शोक विव्हळ हें कळतां । जणूं मीनगण नवजल येतां ॥
देव आधिं कुलगुरु-गति पाहति । बघुनि विदेहस्नेह अधिक अति ॥
रामभक्तिमय भरत निरखले । स्वार्थी सुर हरले घावरले ॥
राम-प्रेममयीच जन दिसले । लेख शोचवश अलेख बनले ॥

**दो०–स्नेह–भीड–वश राम ही म्हणति खिन्न सुरराज ॥**
**रचा प्रपंचा पंचमति झालें न तर अकाज ॥२९४॥**

स्मरुनी प्रार्थिति देव शारदे । देवि ! पाहि ! सुर शरण थार दे ॥
फिरव भरतमति रचुनी माया । पाल विबुधकुल, कर छल छाया ॥
देवि सुज्ञ सुर-विनंति ऐकुनि । वदे स्वार्थ-जड विबुधां जाणुनि ॥
मला म्हणां किं भरतमति फेरव । नेत्रि सहस्त्र न मेरु दिसे तव ॥
विधि हरिहर-माया सुप्रबला । भरत-मतिस बघुं शके न अबला॥
ती मति फिरवा म्हणतां मातें । चोरि चंद्रिका कधि चंद्रातें ॥
वसति भरत हृदिं राम नि सीता । तिमिर किं जिथें प्रकाशे सविता ॥
वदुनि शारदा गत विधिलोकां । सुरां विकलता जशि निशि कोकां ॥

**दो०–स्वार्थी विबुध मलीन मन करिति कुमंत्र कुथाट ।।**
**सृजिति कपट-मायें प्रबल भ्रम-भयार्ति–उच्चाट ।।२९५।।**

करुनि कपट सुरपति चिंता करि । कार्यहानि वा सिद्धि भरत-करिं ।।
जाति जनक रघुनाथ समीप । त्यां सन्मानिति रविकुल दीप ।।
समय-समाज-धर्म-अविरोधें । कथिलें तैं रघुवंश पुरोधें ।।
जनक-भरत-संवाद निवेदित । सुंदर भरत-भाषणा वर्णित ।।
तात, राम जशि आज्ञा होईल । मत माझें कि सर्व तें करतिल ।।
तैं रघुनाथ जोडुनी पाणी । वदले सत्य सरळ मृदु वाणी ।।
तुम्हि मिथिलापति अमुनि उपस्थित । मी सांगणें सर्वपरिं अनुचित ।।
आपण राजे आज्ञा देती । शपथ आपली सत्य शिरीं ती ।।

**दो०–श्रवुनि शपथ ही मुनि जनक लज्जित सभे समेत ।।**
**सकल विलोकिति भरतमुख उत्तर देउं न येत ।।२९६।।**

सभा संकुचित दिसतां सारी । रामबंधु धरि धीरा भारी ।।
कुसमय बघुनी स्नेह सांवरी । विंध्यवृद्धि जशि घटज आवरी ।।
शोक कनक लोचन, धी क्षोणी– । हरी; विमल गुणगण जगयोनी ।।
भरतविवेकवराह विशाळ हि । अनायास उद्धरि तात्काळ हि ।।
सर्वांना प्रणमुनि कर जोडिति । राम राव गुरु साधुंस विनविति ।।
क्षमा आज मम अनुचित करणें । वदत कठोर वचन मृदु वदनें ।।
रुचिर शारदे हृदयीं स्मरली । ये मानसांतुनी मुख-कमलीं ।।
विमल विवेक-धर्म-नय-शाली । भरत-भारती मंजु मराली ।।

**दो०–बघुनि विवेक–विलोचनीं स्नेहें शिथिल समाज ॥**
**करुनि नमन वदले भरत स्मरुनि सिता रघुराज ॥२९७॥**

प्रभु ! पितरी गुरु सुहृद स्वामी । पूज्य परम हित अंतर्यामी ॥
सरल सुसाहिब शीलनिधान हि । प्रणत पाल सर्वज्ञ सुजाण हि ॥
सुसमर्थ हि शरणागत–हितकर । गुणग्राहि सब अवगुण-अघ-हर ॥
अगणांसम आपण सुस्वामी । स्वामीद्रोहि जगीं मजसा मी ॥
प्रभु–पितृ वचना मोहें लंघुनि । आलों इथें समाजा सजवुनि ॥
जगि सज्जन खल उच्च नीचही । अमृत अमरपद गरल मृत्य ही ॥
रामाज्ञा मोडील मनां ही । दर्शनि कानि कुठें कधि नाहीं ॥
कृता धृष्टता ती मी देवा । स्नेहें प्रभु मानिती सुसेवा ॥

**दो०–नाथ कृपें नि भलाइनें केलें मम हित फार ॥**
**भूषण सम दूषण सकल सुयश चारु दिशि चार ॥२९८॥**

अपली रीति सुवाणा महती । जगत-विदित निगमागम वदती ॥
क्रूर कुटिल खल कुमति कलंकी । नीच निशील निरीश निशंकी ॥
तेही सम्मुख शरण परिसतां । सकृत् प्रणमतां अपले करतां ॥
दोष दिसुनि कधि मनि न आणितां । श्रवुनि गुणां संतांत वानितां ॥
स्वामि कोण दासांस रक्षतो । स्वयें सकल साजां जो सजतो ॥
निज करणी स्वप्नीं ना स्मरतां । जनसंकोच शोच मनि धरतां ॥
असा स्वामि नहि दुसरा कोणी । वदें करुनि पण भुज उचलोनी ॥
पाठ-निपुण पोपट पशु नाचे । गुण गति वश पाठका नटाचे ॥

**दो०—जनां सुधारुनि गौरवुनि केले साधु किरीट ॥**
**पाळिल कोण कृपालु विण ब्रीदावलि निज नीट ॥२९९॥**

स्नेहशोकिं कीं बाल चपलतां । आलों लंघुन वचन तत्त्वता ॥
तरी ब्रीद निज कृपालु बघुनी । घेति सकल मम गोड मानुनी ॥
पाय सुमंगल—मूल पाहिले । स्वामि सहज अनुकूल जाणिलें ॥
भाग्यहि कळलें महत्समाजीं । चूक महा, स्वामी अति राजी ॥
कृपा—अनुग्रह सांग पूर्ण ही । केला, सकल कृपाल अधिकही ॥
स्वामि लाड मम सव पुरवीले । स्वाभाविक सुजनतें सुशीलें ॥
नाथ फार मी कृता धृष्ठता । स्वामि—समाज—भीड ना धरता ॥
अविनय विनय यथारुचि वदणें । गणुनि आर्त अति देवा क्षमणें ॥

**दो०—सज्ञ सुहृत् स्वामी पुढे बहु वदणें अति दोष ॥**
**द्यावि देव आज्ञा अतां ती करि मज निर्दोष ॥३००॥**

❖ ❖ ❖

## अध्याय २८ वा

प्रभु—पद—पद्म—पराग—शपथ जी । सत्य-सुकृत-सुख-सीमा शुभ ती ॥
ती घेउनी वदतो हृदयीं ची— । रुचि जागृति—निद्रा—स्वप्नींची ॥
सहजें स्नेहें स्वामी—सेवा । स्वार्थ—चारफल—छल-विण देवा !
आज्ञेसम न सुसाहिब—सेवा । तो प्रसाद जन लाभो देवा ॥
वदत असें प्रेमाकुल भारी । पुलक शरीरिं विलोचनिं वारी ॥
व्याकुळ धरिती प्रभु—पद-कमला । स्नेहसमय तो जाइ न वदला ॥

सन्मानुनी कृपाब्धि सुवाणीं । बसविति समीप धरुनी पाणी ॥
श्रवुनि विनति पाहुनी स्वभावहि । स्नेहें शिथिल सभा रघुरावहि ॥

**छं०–स्नेहें शिथिल रघुराज साधु समाज मुनि मिथिलापती ।**
**चित्तांत वानिति भरत–भक्ती–बंधुता–महिमा अती ॥**
**भरता प्रशंसिति विबुध वर्षति सुमन मानसिं मलिन से ।**
**तुलसी विकल सब लोक ऐकुनि संकुचति निशि नलिनसे ।**

**सो०–देखुनि दुःखी दीन दो समाजि सब नारि नर ॥**
**मघवा महा मलीन मृत मारुनि मंगल बघत ॥३०१॥**

कपट–कुचाल–सीम–सुरराजहि । पर–हानी प्रिय अपलें काजहि ॥
काकसमान पाकरिपु–रीती । छली मलीन, न कुठें प्रतीती ॥
कुमतें प्रथमचि कपट संकलित । तें उच्चाटन सब शिरिं घालित ॥
सुरमायें सब लोक विमोहित । अतिशय रामप्रेम न विरहित ॥
नाहीं स्थिर मन, भय उच्चाटनिं । क्षण वनरुचि घर रुचे दुजे क्षणिं ॥
द्विधा मनोगति लोक दुःखि अति । सरित सिंधु-संगमिं जणुं जलगति ॥
दुश्चित तोष न कुठें पावती । कुणी कुणास न मर्म सांगती ॥
बघुनि हसति हृदिं कृपानिधान । श्वान युवा मघवान समान ॥

**दो०–भरत जनक मुनिजन सचिव ज्ञानि साधु वाचून ॥**
**ग्रासि देवमाया जनां यथायोग्य पाहून ॥३०२॥**

दिसले कृपाब्धिला जन विव्हळ । स्नेहें निज भारी सुरपति–छळ ॥
सभा भूप गुरु महिसुर मंत्री– । मतिला भरतसुभक्ति नियंत्री ॥

रामा निरखिति चित्रि लिखितसे । संकोचति वदण्या शिक्षितसे ॥
भरत-विनति नति प्रीति महत्ता । श्रवणि सुखद वर्णनीं कठिणता ॥
ज्यांच्या वघुनि भक्ति लवलेशा । प्रेम-मग्नता मुनि-मिथिलेशां ॥
तन्महिमा किं वर्णवे तुलसिसि । भक्तिस्वभाव उल्हसि सुमतिसि ॥
स्वयें सान महिमा गुरु जाणत । कविकुलसेतू मानुनि लाजत ॥
वदुं न शके गुण रुची अपरिमित । मति गति वालवचन सम कुंठित ॥

**दो०–भरत-विमल-यश-विमल विधु सुमति चकोर-कुमारि ॥**
**उदित विमल जन-हृदय-नभि टकमक पाही भारि ॥३०३॥**

भरत स्वभाव निगमां सुगम न । कवि! लघुमतिचें क्षमा चपलपण ॥
वदत भरत-सद्भावा ऐकत । सितारामपदि कोण नव्हें रत ॥
भरतां स्मरतां रामप्रेम न- । सुलभ जया, त्यासम जगिं वाम न ॥
वघुनि दयाल दशा सकलांची । राम सुज्ञ जाणुनि जन जिविंची ॥
धर्म-धुरीण धीर नय–नागर । सत्य–स्नेह–शील–सुख–सागर ॥
देश काल–गति वघुनि समाजा । नीती–प्रीति–पाल रघुराजा ॥
वचन वोलले गिरा–सारसें । हित-परिणामि कानिं शशिरससें ॥
तात भरत तुम्हि धर्मधुरीण हि । लोक वेदवित् प्रेमीं प्रविण हि ॥

**दो०–कर्म–वचन–मानस- विमल तुम्हीं तुम्हां सम तात ॥**
**गुरु–समाजि लघुबंधुगुण कुसमयिं कीं कथितात ? ॥३०४॥**

जाणां तात तरणिकुल–रीती । सत्यसंध–पितृ–कीर्ती–प्रीती ॥
गुरुजन लाज समाजहि समया । मित्र-शत्रु नी मध्यम–हृदया ॥

जाणा तुम्हि सकलांचें कर्मां । स्वीय मदीय परमहित धर्मां ॥
मजसि भरंवसा तुमचा भारी । तदपि सांगुं अवसर-अनुसारीं ॥
तात तातविण दशा आपली । पूर्ण गुरुकृपें मात्र वाचली ॥
न तों प्रजा परिजन परिवारा । होता नाश अम्हांसह सारा ॥
जर अकाळि मावळे दिनेश । वदा कुणां जगिं नव्हती क्लेश ॥
हा उत्पात तसा विधि विरचित । मुनि मिथिलेश्वर सर्व वाचवित ॥

**दो०—राज्य काज सब लाज पत धर्म धरणि धन धाम ॥**
**गुरु—महिमा पाळिल सकल शुभ होइल परिणाम ॥३०५॥**

सहित समाजा तुमचा अमचा । गृहिं वनिं पाता प्रसाद गुरुचा ॥
गुरु-पितृ—माता—स्वामि—निदेश । सकल—धर्म—धरणी—धर शेष ॥
तें तुम्हि करुनि मजहि करुं द्यावें । तात ! तरणिकुल-पालक व्हावें ॥
सिद्धिद एक साधका सर्वांहि । कीर्ती सुगति भूतिमय वेणि हि ॥
या विचारिं अति संकट सहणें । सुखी प्रजे परिवारा करणें ॥
मम विपत्ति सर्वांत विभक्ता । तुम्हां अवधिभर फार कठिणता॥
तुम्हि मृदु कळतहि कठिण सांगतो । अनुचित ना मम, कठिण काळ तों
संकटिं करिति सुबंधु सहाया । करचि वारितो अशनी-घायां ॥

**दो०—सेवक कर—पद- नयनसे स्वामी मुखा समान ॥**
**प्रीति रीति तुलसी श्रवुनि सुकवि करिति तद्गान ॥३०६॥**

श्रवुनि सभा सब रघुवर-भाषित । प्रेमपयोधि—सुधेमधिं मिश्रित ॥
स्नेह समाधित शिथिल लोक ते । बघुनि शारदा मौना धरते ॥

भरता प्राप्त परम-परितोष कि। सम्मुख नाथ विमुख दोष कि।।
मुख प्रसन्न मन विषाद मिटला। गिरा-प्रसाद कि मूका मिळला।।
प्रेमें पुन्हां प्रणाम करोनी। वदति पाणिपंकजां जुळोनी।।
साथ-गमन सुख नाथ! लाभलो। जगिं जन्माचा लाभ पावलो।।
द्याल कृपाल अतां जें शासन। सादर शिरसा करीन पालन।।
द्या कांहीं अवलंबन देवा। लंघिन अवधि करुनि यत्सेवा।।

**दो०–देव! देव–अभिषेचना संमतिनें गुरुराय।।**
**तीर्थ सलिल सब आणिलें आज्ञा द्या करुं काय।।३०७।।**

महा मनोरथ एक मना ही। भय–संकोचें वदवत नाहीं।।
तात वदा प्रभु वदले जेव्हां। स्नेहें वदति वचन शुभ तेव्हां।।
चित्रकूट शुचि तीर्थे स्थळ वन। खग मृत सर सरि निर्झर गिरिगण।।
प्रभू चरणांकित अवनि विशेषें। जर आज्ञा पाहीन अशेषें।।
अत्रिशासना अवश्य घेणें। तात त्रिगतभय काननिं फिरणें।।
मुनीकृपें मंगलदायक वन। बंधो! पावन परम सुशोभन।।
ऋषिनायक सांगतील जेथें। तीर्थ-सलिल ठेवावें तेथें।।
प्रभुवच परिसुनि भरत सुखावति। मुनिपदकमलिं मुदित शिर लावति

**दो०–भरत राम संवाद सब परिसुनि मंगल-मूल।।**
**स्वार्थि सकल सुर वानुनी वर्षति सुरतरु-फूल।।३०८।।**

धन्य भरत, गोस्वामि राम जय। देव बळें वदतात हर्षमय।।
मुनि मिथिलेश्वर सकल सभा ही। श्रवुनि भरत–वचना उत्साही।।

भरत–राम–गुणगण सु-स्नेह । स्तविती पुलकित नृपति विदेह ।।
दास-स्वामी स्वभाव शोभन । प्रेम नेम अति-पावन-पावन ।।
जे ते वर्णु यथामति लागति । सचिव सभासद सब अनुरागति ।।
ऐकुनि राम-भरत संवादा । युग समाज वश हर्ष-विषादां ।।
रामजननि सम दुःख-सुखां गणि । वर्णि रामगुण राण्या सांत्वनि ।।
कोणि गाति रघुवीर महत्ता । कोणि वर्णिती भरत सुजनता ।।

**दो०–वदले भरता अत्रि कीं शैल-समीप सुकूप ।।**
**तिथें तीर्थजल ठेवुं शुचि अनुपम अमृत अमूप ।।३०९।।**

भरत अत्रि-अनुशासन पावुनि । जलपात्रें सब देती धाडुनि ।।
आपण अनुज-अत्रि-मुनि-साधूं । सहित गत जिथें कूप अगाधूं ।।
पावन पाथ पुण्यथळिं राखति । प्रेमें मुदित अत्रि असं भाषति–।।
सिद्ध स्थळ हें तात अनादी । काळें लुप्त विदित ना अगदीं ।।
सेवक जैं स्थळ सरस विलोकिति । सुजलासाठिं कूप हा खोदिति ।।
विधिवश घडे विश्व-उपकार हि । सुगम अगम अति धर्म-विचारहि
भरतकूप म्हणतील अतां जन । झाला तीर्थ जलें अति पावन ।।
प्रेमें मज्जति नेमें प्राणी । होतिल विमल कर्म-मन-वाणीं ।।

**दो०–वदत कूप-महिमा सकल गत जथें रघुराव ।।**
**अत्रि निवेदिति रघुवरा तीर्थीं पुण्यप्रभाव ।।३१०।।**

वदत धर्म-इतिहासां प्रीती । उजाडले गत रात्र सुखीं ती ।।
सानुज भरत कर्म निज उरकुनि । राम-अत्रि-गुरु-आज्ञा पावुनि ।।

सहित समाज, साज साधे ते । जाति रामवनि पदि फिरण्यातें ॥
मृदु चरणीं अनवाणी चालत । महि मृदु होइ मनीं संकोचत ॥
कुश कंटक कंकर कटु-कुहिली । कुसळ कठोर कुवस्तु लपविली ॥
महि मृदु मंजुल मार्गा करुनि । त्रिविध वायु सुखदायि होउनी ॥
सुर सुम वर्षुनि घन छायेनें । तरु फल फूलें तृण मृदुतेनें ॥
मृग निरखुनि खग सुंदर बोलुनि । सेविति सव रामप्रिय जाणुनि ॥

**दो०–जृंभत वदतां राम सब सिद्धि सुलभ कोणांहि ॥**
**प्राणप्रिय रामा भरत त्यांस नवल हें नाहि ॥३११॥**

विपिनीं फिरत भरत या रीतीं । प्रेम नेम मुनि बघुनि लाजती ॥
पुण्य जलाशय भूमि विभागां । खग मृग तरु तृण गिरी वन बागा-॥
चारु विचित्र पवित्र विशेष हि । पुसति भरत पाहुनि सव दिव्य हि ॥
ऐकुनि मुदित कथिति ऋषिराव । हेतु नाम गुण पुण्य-प्रभाव ॥
कुठें निमज्जन कुठें प्रणाम हि । कुठें विलोकत मनि अभिराम हि ॥
कुठें मिळत मुनि-आज्ञा बसती । सीतेसह दो भावां स्मरती ॥
स्नेह सुसेवा स्वभाव बघती । प्रमुदित वनसुर आशिस देती ॥
प्रहर अडिच दिन जातां फिरती । प्रभुपद-कमलां येउनि बघती ॥

**दो०–क्षेत्र तीर्थ सब पाहिलीं भरतें पांच दिनांत ॥**
**श्रवणि कथनि हरिहर–सुयश गेला दिन ये रात ॥३१२॥**

❖ ❖ ❖

## अध्याय २९ वा

प्रातः स्नान करुनि जन जमती । भरत भूमिसुर तिरहुति-नृपती ।।
शुभ दिन आज मनामधिं जाणति । राम कृपाल वदत संकोचति ।।
गुरु-नृप-भरत-सभे अवलोकति । राम संकुचुनि अवनि विलोकति ।।
शीला स्तवुनि सभा सब चिंती । कुणि न रामसम भिडस्त नृपती ।।
भरत सुजाण रामरुचि बघुनी । प्रेमें उठले सुधीर धरुनी ।।
वदति जुळुनि कर करुनि दंडवत । नाथ रुची मम सकल पूर्णकृत ।।
कष्ट वहुत मज-मुळें चि सकलां । आपण नाना दुःखीं पडलां ।।
आज्ञा द्यावी अतां स्वाभिवर । जाउन सेविन अवध अवधिभर ।।

**दो०–ज्या उपायिं पद पुन्हां जन पाहिल दीनदयाल ।।**
**तो अवधीस्तव शिकविणें कोसलपाल कृपाल ।।३१३।।**

प्रभो ! प्रजा सब पुरजन परिजन । स्नेहीं शुचि सब सरस आप्तपण ।।
अपणांस्तव भवदाव हि सुखकर । प्रभुविण वृथा परमपद दुष्कर ।।
स्वामी जाणुनि गति सकलांची । रुचि राहणि लालसा जनाची ।।
प्रणतपाल सकलांही पाळिति । दोन्हिकडे प्रभु सकल निभाविति ।।
असा सर्व मज भूरि भरंवसा । करत विचारा शोच न लवसा ।।
नाथ कृपा आणी मम आर्ती । उभय, बळें मज धीट बनवती ।।
स्वामि हरुनि या अति दोषाला । विना भीड शिकवा दासाला ।।
भरत-विनतिला सभा प्रशंसी । क्षीर–नीर–विवरणगति हंसी ।।

**दो०– दीनबधु हें बंधुवच श्रवुनि दीन छलहीन ।।**
**देशकाल-समयोचित ववले प्रभू प्रवीण ।।३१४।।**

तुमची तात ! माझि सकलांची । चिंता गुरु, नृप या गृह-वनिची ।।
शिरावरी गुरु मुनि मिथिलेशहि । स्वप्निहि अम्हां तुम्हां ना क्लेश हि
मम तुमचा हि परम पुरुषार्थ । स्वार्थ सुधर्म सुयश परमार्थ ।।
दोघांनी पित्राज्ञा पालन । भलें वेदिं जनिं नृपां भलेपण ।।
स्वामि-मातृ-पितृ-गुरु-वच पाळिति । चालत कुपथिंहि पाय न घसरति।।
या विचारिं चिंता सव सांडुनि । पाळा पुरी अवधिभर जाउनि ।।
देश कोष परिजन परिवार हि । यांचा गुरुपदरजिं सव भारहि ।।
तुम्हि मुनि-मातृ-सचिव-वच पाळा । मही प्रजा नगरी सांभाळा ।।

**दो०–मुख्य मुखासम पाहिजे खाण्या पिण्यास एक ।।**
**पाळि पोषि अंगां सकल तुलसी सहित विवेक ।।३१५।।**

इतकें राजधर्म-सर्वस्वही । गुप्त मनोरथ जसे मनांतहि ।।
वंधुस केला प्रवोध वहुपरिं । विण आधार, न तोष शांति परि ।।
भरत शील गुरु सचिव समाज । लज्जा–स्नेह–विवश रघुराज ।।
प्रभु परि कृपें खडावा देति । सादर भरत धरुनि शिरिं घेती ।।
करुणा निधिचें चरणपीठ जें । प्रजा–प्राण–यामीक धीट तें ।।
भरत स्नेह–रत्न संपुट तें । जीव यतनिं जणु अक्षर युग तें ।।
कुल-कपाट, कर कुशल कर्मि तें । विमल नयन सेवा-सुधर्मि तें ।।
भरतां मुद अवलंब लाभतां । सुख जसं सीताराम राहतां ।।

**दो०—मागति आज्ञा नमुनि पदिं राम धरिति हृदयासि ।।**
**सुरपति उच्चाटित जनां कुटिल कठिण समयासि ।।३१६।।**

ती कुचाळि सर्वांनां उत्तम— । जीवनि जीवा अवधि-आस सम ।।
न नर सिता-प्रभु-लक्ष्मण-विरहीं । मरते हाय ! कुरोगि सर्वही ।।
रामकृपेनें संकट टळलीं । गुणद साह्य सुर-धाडचि ठरली ।।
कवळिति भाउ भुजानीं भरता । रामप्रेम—रस न ये वदतां ।।
तन-मन-वचनीं प्रेमा भरती । धीर-धुरंधर धीरा त्यजती ।।
वारिज लोचन वारी मोचति । वघुनि दशा सुर सभा दुःखि अति।।
मुनि गुरु धीर-धुरीण जनकसे । ज्ञानानलि मन कसित कनकसें ।।
जे विधिनें निर्लेपचि सृजलें । पद्म-पत्र सम जग—जलि जगलें ।।

**दो०—तेहि बघुनि रघुवर-भरत-प्रीत्यनुपमा अपार ।।**
**होति मग्न तनमन-वचनि सहित विराग विचार ।।३१७।।**

जिथें जनक गुरु मति गति कुंठित । प्राकृत-प्रीती वदणें अनुचित ।।
रघुवर—भरत वियोग वर्णतां । कवि कठोर, जन म्हणति ऐकतां ।।
तो लज्जा-रस अकथ सुवाचें । स्नेह समयिचा स्मरुनि संकुचे ।।
रघुवर-भरता भेटुनि सांत्विति । रिपुदमना हर्षित हृदि कवळिति ।
सेवक सचिव भरतमत बघुनी । लागति निज निज कार्जि- जाउनी
ऐकुनि दारुण दुःख समाजां । गमनाच्या सजिती सव साजां ।।
युगवंधू प्रभुपदीं प्रणमुनी । निघति शिरीं रामाज्ञा धरुनी ।।
मुनि तापस वनदेवां विनवुनि । पुनः पुन्हां सन्माना देउनि ।।

**दो०–लक्ष्मणास भेटति; नमुनि शिरिं सीतापद-धूळ ।।**
**निघती प्रेमळ आशिषा श्रवुनि सुमंगल-मूळ ।।३१८।।**

सानुज राम नृपा शिर नमती । नाना विध करती स्तुति विनती ।
देव ! दयेनें सुदुःखि झाला– । सहित समाजो कानिंन आला ।।
पुरिं वळणें आशीस देउनी । गमन करिति नृप धीरा धरुनी ।।
मुनि महिदेव साधु सन्मानुनि । बोळविले हरिहर सम जाणुनि ।।
सासु–समीप वधु युग जाउनि । वंदुनि वळले आशिस पावुनि ।।
कौशिक वामदेव जावाली । पुरजन परिजन सचिव सुचाली ।।
उचित विनंति करोनी वंदन । बोळविती सानुज रघुनंदन ।।
श्रेष्ठ मध्य लघु नारि नरांना । कृपानिधी धाडिति सन्मानां ।।

**दो०–भरत-मातृपदिं नमुनि प्रभु स्नेहें शुचि भेटून ।।**
**बोळविती मेणा सजुनि लज्जा शुच निरसून ।।३१९।।**

सीता परिजन-पितरां भेटुनि । पूत-पति-प्रेमा ये परतुनि ।।
प्रणमि सासुनां भेटति सकलां । प्रीति-कथनिं उल्हास न कविला ।।
शिकवण अभिमत आशिस घेई । स्नेहीं उभय मग्न ती होई ।।
रघुपति मेणे रुचिर मागविति । समजाउनि मातानां बसविति ।।
घडि घडि दोघे मिळुनी भेटति । स्नेहें सम जननींस पोंचवति ।।
सजुनि वाजि गज वाहन नाना । भरत-भूप-दळ करी प्रयाणा ।।
हृदयिं राम सीता सह लक्ष्मण । जाती सगळे लोक अचेतन ।।
वृप हय गज पशु हृदय-भंगले । परवश मारुनि मना चालले ।।

**दो०—गुरु गुरुनारिस नमुनि प्रभु लक्ष्मण सिता-समेत ॥**
**परतुनि हर्षविषादयुत पर्ण—निकेतीं येत ॥३२०॥**

सन्मानें धाडिला निषादा । जाइ भरुनि हृदिं विरहविषादा ॥
कोळि किरातादिकां फिरविले । घडि घडि जोहारुनी परतले ॥
प्रभुसिय लक्ष्मण वटतळिं बसती । प्रिय परिजन-विरहें व्याकुळती ॥
भरत-स्नेह-सुशील-सुवाणी । प्रिये हि अनुजा वदति वानुनी ॥
मनवचकर्मीं प्रतिती प्रीती । प्रभु निजमुखें प्रेमवश गाती ॥
त्या अवसरिं खग मृग जल जलचर । चित्रकूटचे म्लान चराचर ॥
विबुध बघून दशा रघुपतिची । कथिति सुमन वर्षुनि गति घरची ।
प्रभुनी नमुनि दिलें आश्वासन । फिरले प्रमुदित, मनिं भय शास न ॥

**दो०—सानुज सह सीते प्रभु राजति पर्ण-कुटीरिं ॥**
**भक्ती ज्ञान विराग जणुं सह शोभती शरीरिं ॥३२१।**

मुनी भरत गुरु भूप विप्रकुळ । रामविरहि जन सगळे व्याकुळ ॥
गणिती प्रभुगुण-गणां मनानें । सब चुपचाप जाति मार्गानें ॥
यमुना उतरुनि समाज नेला । तो वासर विण भोजन गेला ॥
गंगा उतरुनि वस्ती दुसरी । रामसखा सुखसोयि सब करी ॥
सई उतरुनी स्नान गोमतीं । चौथे दिवसिं अयोध्ये येती ॥
जनक चार वासर पुरिं राहति । राज्य-कार्य सब साजां पाहति ॥
राज्य सचिव-गुरु-भरतां सोंपुनि । जाती मिथिले समाज घेउनि ॥
नगर-नारि-नर गुरु-वचनानीं । वसती सुखें राम-नृप--धानी ॥

**दो०—रामदर्शना सर्वजन करिति नेम उपवास ॥**
**त्यागिति भूषण-भोग-सुख जगवी अवधी-आस ॥३२२॥**

भरत सुसेवक सचिवां बोधिति । आज्ञें निज निज कार्यीं लागति ॥
बोलावुनि लघु बंधु शिकविती । सकल मातृसेवा सोपविती ॥
भूसुर अणवुनि भरत जुळुनि कर । नमुनी प्रार्थिति विनयानें वर ॥
कार्यि शुभाशुभ उच्च कि नीच हि । आज्ञा द्यावि विना संकोचहि ॥
प्रजा नि पुरजन परिजन अणविति । समाधानयुत सुखांत वसविति ॥
सानुज मग गुरुगेहिं पोचले । करुनि दण्डवत करयुग जुळले ॥
जर आज्ञा राहीन सुनेमें । तनु पुलकुनि मुनि वदले प्रेमें ॥
समजां वदां करां तुम्हि जें ही । धर्मसार जगि होइल तेंही ॥

**दो०—शिक्षा आशीर्वच महा मिळत दिवस बघवीति ॥**
**निरुपाधी प्रभु पादुका सिंहासनि बसवीति ॥३२३॥**

राममातृ-गुरु-पदि शिर ठेउनि । प्रभुपदपीठ-अनुज्ञा घेउनि ॥
नंदि गांवि कृत पर्ण-कुटीर । निवसति धर्म-धुरंधर धीर ॥
जटाजूट शिरिं, मुनिपटधारी । खणुनि मही घालिति कुश-हतरीं ॥
अशन वसन पात्रें व्रत-नेमां । प्रेमें करिति कठिण ऋषिधर्मा ॥
भूषण वसन भोग सुख भूरी । वचतनमनि तृणसम कृत दूरी ॥
अवधराज्य सुरराजा ईर्षित । धनद कळत दशरथधन लज्जित ॥
त्या पुरि वसती भरत अ-रागें । जसा चंचरिक चंपक बागें ॥
रमाविलास, राम-अनुरागीं । त्यजिति वमनसम जन बहुभागी ॥

**दो०–रामप्रेमास्पद भरत बडे न या करतूति ।।**
**चातका हंसां प्रशंसिति टेक-विवेक-विभूति ।।३२४।**

दिन दिन होई शरीर दुबळें । घटे मेद, बल मुख छवि न ढळे ।।
रामप्रेमपण तु नव पीन हि । वृद्धि धर्मदल, मन न मलीनहि ।।
जसं जल आटे शरत्प्रकाशत । विलसति वेतस वनज विकासत ।।
शम दम संयम नियम उपासहिं । भगण, भरत-हृद् विमलाकाशहि ।।
ध्रुव विश्वास अवधि राकासी । स्वामी-स्मृति सुर-वीथि विकासी ।।
रामप्रेम अचलविधु दोष न । सहित समाज नित्य अति शोभन ।।
भरतभाव राहणि कर्तूती । भक्ति विरति गुण विमल विभूती ।।
वर्णत सकल सुकवि संकोचति । कुंठित शेष-गणेश-गिरा-गति ।।

**दो०–प्रभू खडावा सदार्चिति हृदयिं न मावे प्रीति ।।**
**घे-घेउनि आज्ञा करिति राज्यकार्य बहुरीति ।।३२५।।**

पुलकित, हृदिं सीता–रघुवीर । जीभ नाम जपि लोचनिं नीर ।।
लक्ष्मण राम सिता वनिं वसती । भवनीं भरत तपें तनु कसती ।।
बघुनि उभय दिशि वदति सर्व जन । भरत कि सर्वपरीं स्तुतिभाजन ।।
ऐकुनि नेमां साधु संकुचित । दशा बघुनि मुनिराज हि लज्जित।।
भरताचरण पुनीत परम ही । मधुर मंजु मुद-मंगल-कर ही ।।
हरण कठिण कलि कलुषें क्लेशहि । महा मोह तमि दलन दिनेशहि ।।
पापपुंज–कुंजर मृगराजा । शमन सकल संताप–समाजा ।।
जन–रंजन भंजन भवभार हि । रामस्नेहिं सुधाकर सार हि ।।

छं०–श्रीराम–सीता–प्रेम–पीयुष–मय न जन्मत भरत कीं ।।
व्रत विषम शम दम नियम यम मुनि-मन-अगम कुणि करत कीं
दारिद्र्य दूषण दंभ दुःखानल सुयशर्मिषि हरत कीं ।
कलिकालि तुलसीं-सम शठां कुणि राम-संमुख करत कीं ।।१।।

सो०–भरतचरित युत नेम तुलसी सादर जे श्रवति ।।
सिताराम-पदि होइ नक्कि भवरस विरति ।।३२६।।

मास पारायण, एकविसावा विश्राम.

❖ ❖ ❖

इति श्रीमद्रामचरितमानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने
द्वितीयः सोपानः

अयोध्याकांडं समाप्तम्
जय जय रघुवीर समर्थ

ॐ ॐ ॐ

॥ श्रीरामाय नमः ॥


# श्रीरामचरितमानस

## ( मराठी )

### अरण्यकाण्ड



## रामध्यानमग्न सुतीक्ष्ण



प्रेमभक्ति अविरल मुनि पावत । तरुमागें लपुनी प्रभु पाहत ।।
प्रीती अति रघुवीर विलोकति । भवभय हारक हृदयीं प्रगटति ।।
मार्गिच अचल बनुनि मुनि बसले । देहिं पुलक फणसासम उठले ।।

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ श्रीजानकीपतये नमः ॥

# ॥ श्रीरामचरितमानस ॥

## ( मराठी )

## ॥ तृतीय सोपान ॥

### ( अरण्यकाण्ड )

❖ ❖ ❖

### अध्याय १ ला

### अनुवादक-कृत मंगलाचरण

शा० वि०-वामे यस्य शरासनं सुरुचिरं बाणः करे दक्षिणे ।
पृष्ठे यस्य विभाति भूमितनया तत्पृष्ठतो लक्ष्मणः ॥
वृक्षत्वक्कृतनिर्मलाम्बरधरो यो वै जटाजूटधृग्- ।
भक्तानामभयप्रदो रघुवरो नः पातु कान्तारगः ॥१॥

पृथ्वी०–गुरोश्चरणमानसं सुविमलं सुमुक्त–प्रदम् ।
पदं परमहंसगं परमपावनं पूरितम् ।।
निजात्मसुखवारिणा भवभयाग्नि–निःसारिणा ।
त्रितापदववारिणा जनिनिवारिणा पातु माम् ।।२।।

## मूळ मंगलाचरण

शा०वि० –मूलन्धर्मतरोर्विवेकजलधेः पूर्णेन्दुमानन्ददम् ।
वैराग्याम्बुजभास्करं ह्यघघनध्वान्तापहन्तापहम् ।।
मोहाम्भोधरपूगपाटनाविधौ स्वःसम्भवं शङ्करं ।।
वन्दे ब्रह्मकुलं कलङ्कशमनं श्रीरामभूपप्रियम् ।।३।।
शा० वि०– सान्द्रानन्द-पयोद-सौभगतनुं पीताम्बरं सुन्दरं ।
पाणौ बाण–शरासनं कटिलसत्तूणीरभारं वरम् ।।
राजीवायत–लोचनं धृतजटाजूटेन संशोभितम् ।
सीतालक्ष्मणसंयुतं पथिगतं रामाभिरामं भजे ।।४।।
सो०–उमे ! रामगुण गूढ पंडित मुनि पावति विरति ।
पावति मोह विमूढ जे हरिविमुख, न धर्मरति ।।मं।।

पुर–नर–भरत–प्रीती वर्णित । अनुपम मति अनुरूप सुशोभित ।।
आतां प्रभुचरिता अति पावन । श्रुणु, कृत वनिं सुर नर मुनि भावन
रुचिर एकदां सुमनं जमविलीं । स्वकरिं भूपणें रामें रचिलीं ।।
प्रभु घालुनि सीतेला सादर । बसले स्फटिक शिलेवरि सुंदर ।।

काकरूप सुरपतिसुत धरतो । शठ रघुपति बल पाहूं बघतो ॥
पिपीलिका जशि सागरठावा । महा-मंदमति म्हणते ध्यावा ॥
पळे चरणिं चोंचुनि सीतेप्रति । कारण-काक हि मूढ मंदमति ॥
स्रवे रुधिर रघुनायक जाणति । कुशधनुवरि सायक संधानिति ॥

**दो०-अति कृपालु रघुनायक संतत दीनीं स्नेह ॥**
**त्यासी छलकरि येउनी मूर्ख हि अवगुण-गेह ॥१॥**

सुटे ब्रह्मशर मंत्रे प्रेरित । वायस सभय सुटे पळ काढित ॥
जाइ धरुनि निजरूप पित्यासी । राखि न राम विमुख तनयासी ॥
अति सभीत मनिं होइ निराशा । यथा चक्रभयिं ऋषि दुर्वासा ॥
ब्रह्मधामिं शिवपुरिं सब लोकीं । श्रमित फिरे व्याकुळ भय शोकीं ॥
कोणि तया बस असें वदेना । रामद्रोह्या कोणि रक्षि ना ॥
पितृ यम माता मृत्यु समाना । सुधा विष बने श्रुणु हरियाना ॥
करी मित्र शतशत्रू-करणी । त्याला विबुधनदी वैतरणी ॥
अनलाहुनि जग तप्त तयाला । जो रघुवीर विमुख कुणि झाला ॥
नारद देखति विकल जयंता । येइ दया कोमलमन-संता ॥
तत्क्षण रामापाशिं पाठवित । 'त्राहि ! प्रणतहित' म्हण कि पुकारित॥
आतुर सभय जाइ धरि पाय हि । पाहि पाहि दयाल रघुराज हि ॥
प्रभुता अतुलित बल अतुलित ही । अति मतिमंदा विदित मज नही ॥
निजकृत-कर्मज फळ मी ल्यालों । पाहि अतां प्रभु शरण रिघालों ॥
श्रवुनि कृपाल आर्त अति वाणी । त्यजिति करुनि एकाक्ष भवानी! ॥

सो०-करी द्रोह मोहून जरी तयाचा वध उचित ॥
प्रभु सोडिती द्रवून कुणि कृपाल रघुवीर सम ॥२॥

वसुनि चित्रकुटिं रघुपति नाना । करिती श्रुति-पीयुष चरितानां ॥
असें राम मग मनिं अनुमानिति । होइल गर्दि सकल मज जाणिति ॥
मुनिगण-निरोप घेते झाले । भ्राते सीते सहित निघाले ॥
अत्रि-आश्रमा प्रभु जैं गेले । श्रवत महामुनि हर्षित झाले ॥
वपु पुलकित मुनि उठुनि धावले । बघुनि शीघ्रगति राम पावले ॥
करत दंडवत मुनि उरिं धरिती । प्रेमजलें उभयां स्नपवीती ॥
बघुन रामछवि लोचन निवले । स्वाश्रमिं सादर तदा आणले ॥
पूजन करुनि वचन शुभ वदले । दिलें मूल फल प्रभुमनिं रुचलें ।

सो०-प्रभु आसनिं आसीन नेत्र भरुनि शोभा बघुनि ॥
मुनिवर अती प्रवीण स्तुती करिति पाणी जुळुनि ॥३॥

छं०-प्रमाणिका०-नमामि भक्त-वत्सलं । कृपालु शील कोमलं ।
भजामि ते पदांबुजं । अकामिनां स्वधामदं ॥
निकाम श्याम सुंदरं । भवाम्बुनाथ-मंदरं ॥
प्रफुल्ल कंज-लोचनं । मदादि दोष मोचनं ॥
प्रलंब बाहु विक्रमं । प्रभोऽप्रमेय वैभवं ॥
निषंग चाप सायकं । धरं त्रिलोक नायकं ॥
दिनेश वंश मंडनं । महेश चाप खंडनं ॥
मुनींद्र संत रंजनं । सुरारि वृंद भंजनं ॥

मनोज--वैरि--वंदितं । अजादि--देव--सेवितं ॥
विशुद्ध-बोध-विग्रहं । समस्त-दूषणापहं ॥
नमामि इंदिरा-पतिं । सुखाकरं सतां गतिं ॥
भजे सशक्ति सानुजं । शची-पति-प्रियानुजं ॥
त्वदंघ्रि-मूल ये नराः । भजंति हीन-मत्सराः ॥
पतंति नो भवार्णवे । वितर्क-वीचि-संकुले ॥
विविक्त-वासिनः सदा । भजंति मुक्तये मुदा ॥
निरस्य इंद्रियादिकं । प्रयांति ते गतिं स्व-कं ॥
तमेकमद्भुतं प्रभुं । निरीहमीश्वरं विभुं ॥
जगद्गुरुं च शाश्वतं । तुरीयमेव केवलं ॥
भजामि भाववल्लभं । कुयोगिनां सुदुर्लभं ॥
स्वभक्त कल्प-पादपं । समं सुसेव्यमन्वहं ॥
अनूप-रूप-भूपतिं । नतोऽहमुर्विजा-पतिं ॥
प्रसीद मे नमामि ते । पदाब्ज-भक्ति देहि मे ॥
पठंति ये स्तवं इदं । नरादरेण ते पदं ॥
व्रजंति नात्र संशयं । त्वदीय भक्ति संयुताः ॥
दो०-विनति करुनि मुनि नमुनि शिर वदती जोडुनि हात ॥
कधीं बुद्धि मम ना त्यजो चरण-सरोरुह नाथ ॥४॥
अनसूया-पद धरुनी सीता । मग भेटली सुशील विनीता ॥
सुखा समृद्धी ऋषिपत्नीमनि । बसवि निकट] आशीर्वच देउनि ॥

लेववि वसनें दिव्य विभूषण। नित्य अमल तीं सुंदर नूतन ॥
ऋषिवधु वदुनि वाणि मृदु सरसा। वर्णि मिषें स्त्री-धर्म अल्पसा ॥
माता पिता बंधु हितकारी। सकल मितप्रद राजकुमारी ! ॥
वैदेही ! अमित-द भर्ता ही। अधम नारि जी सेवित नाहीं ॥
धैर्य धर्म सन्मित्र नि नारी। आपत्कालिं परीक्षित चारी ॥
वृद्ध रोगवश निर्धन जडमति। अंध बधिर कोपिष्ट दीन अति ॥
करि अशाहि पतिच्या अपमाना। नारि भोगि यमलोकिं यातना ॥
हें व्रत एक धर्म हा नेम हि। पतिपर्दि तनुमनवचनें प्रेम हि ॥
पतिव्रता हि चतुर्विध जगतीं। वेद पुराण संत सब वदती ॥
भाव उत्तमे मनीं असा ही। स्वप्निंहि अन्य पुरुष जगिं नाहीं ॥
मध्यम परपति भाविति तैसे। भ्राता पिता पुत्र निज जैसे ॥
धर्मविचारिं बघुनि कुल राहे। स्त्री निकृष्ट ती श्रुति वदताहे ॥
भयें राहि अवसर मिळतां ना। अधम नारि ती जगांत जाणा ॥
पतिवंचक परपति रति करते। रौरव नर्कि कल्पशत पडते ॥
क्षणिक सुखा जन्मांतरि कोटी। दुःख न समजे ती अति खोटी ॥
मिळवि परमगति नारी श्रमविण। धर्म पतिव्रत पाळी छलविण ॥
पतिस विरोधी जिथें जन्मते। तरुणपणीं ती विधवा बनते ॥

**सो०-सहज अपावन नारि पति-सेवें शुभ गति मिळवि ॥**
**यश गाती श्रुति चारि अजुनि तुलसिका प्रिय हरिसि॥५ रा॥**
**श्रुणु सीते तव नाम स्मरुनि पतिव्रत करिति वधु ॥**
**प्राणप्रिय तुज राम कथा जगहिता मी कथित ॥ ५ म ॥**

श्रवुनि परम सुख जानकि पावे । तिच्या चरणिं शिर नमवी भावें ।।
कृपानिधान मुनिस मग विनवति । जाउं अनुज्ञें अन्य वनाप्रति ।।
कृपा मजवरी संतत करणें । दास समजुनी, प्रीति न तजणें ।।
धर्मधुरंधर प्रभुवच परिसुनि । प्रेमानें वदले ज्ञानी मुनि ।।
यत्कृपेसि अज शिव सनकादि हि । वांछिति परमार्थवादि सर्वहि ।।
राम ! अकामप्रिय आपण ते । दीन बंधु मृदु-वचना वदते ।।
श्रीचातुरी अतां मज कळली । त्यजुनि देवगण तुम्हांस भजली ।।
ज्यांसम अतिशय कोणी नाहीं । शील असें कां नसेल त्यांही ।।
कसें सांगु 'जा आतां स्वामी' । वदा नाथ तुम्हि अंतर्यामीं ।।
प्रभुला मग मुनि धीर विलोकित । लोचनिं जल वाहे वपु पुलकित ।।

**छं०—वपु पुलकिं फुलली प्रेमपूरित नयन मुखकंजीं स्थित ।**
**मन-बुद्धि-गुण-गो-पर बघें मी प्रभुलि जप तप किति कृत? ।।**
**जपयोग धर्म-समूहिं मनुजा भक्ति अनुपम मिळतसे ।**
**रघुवीर चरित पुनीत निशिदिन दास तुलसी गातसे ।।१।।**

**दो०—कलिमल-शमन दमन मना राम सुयश सुखमूल ।।**
**सादर ऐकति जे तयां राम राहि अनुकूल ।। ६ रा ।।**

**सो०—कठिण काल मल रास ज्ञान न धर्म न योग जप ।।**
**सांडुनि सर्व हि आस भजति राम ते चतुर नर ।। ६ म ।।**

मुनिपद-कमलीं नमुनी शीर्ष । चालति वनिं सुरनर-मुनि-ईश ।।
पुढें राम लक्ष्मण माघारीं । मुनिवर-वेष शोभतो भारी ।।

मध्यें श्री शोभतसे कैसी । ब्रह्म-जिवामधिं माया जैसी ।।
सरिता वन गिरि घाटहि अवघड । पति जाणुनि देतात वाट घड ।।
जाती जिथें देव रघुराया । तेथें करिति गगनि घन छाया ।।
असुर विराध दिसे, पथि जातां । येत करिति रघुवीर निपाता ।।
त्वरित रुचिर रूपासि पावला । दुःखि बघुनि निज-धामि धाडला।।
येति निकट मग मुनि-शरभंगा । सुंदर अनुज जानकी संगा ।।

**दो०–बघुनि राम-मुख-पंकजा मुनिवर-लोचन-भृंग ।।**
**करिति पान आदरें अति, धन्य जन्म शरभंग ।।७।।**

वदले मुनि रघुवीर ! कृपाला । शंकर–मानस–राजमराला ।।
निघति चि होतो विरंचि-सदना । राम वनीं येतिल ये कानां ।।
होतो वाट बघत दिनराती । बघुनि अतां प्रभु निवली छाती ।।
नाथ ! सकल साधन मी हीन । कृता कृपा गणुनी जन दीन ।।
देव ! न हा उपकार मज करा । जनमन चोरा ! स्वपण कृत खरा।।
तोंवर दीन-हितार्थ रहावें । जों तनु तजुनि तुम्हां न मिळावें ।।
योग यज्ञ जप तप कृत देई– । प्रभुसि भक्तिवर मागुन घेई ।।
मग शरभंग मुनी शर रचती । हृदयिं संग सब सोडुन बसती ।।

**दो०–सानुज सह सीते प्रभो नील जलदसे श्याम ।।**
**वसा सगुण रूपें सतत मम हृदयीं श्रीराम ।।८।।**

मग योगाग्नित देह जाळला । राम कृपें वैकुंठा गेला ।।
परि हरिलीन न झाला मुनिवर । आधि घेतला भेदभक्ति वर ।।

ऋषि निकाय मुनिवर-गति बघती । हृदयिं विशेष सुखा ये भरती ॥
स्तुति करिती मुनिवृंद बहु तदा । प्रणतहिता जय करुणा-कंदा ॥
मग रघुनाथ पुढें वनि निघती । मुनिवर निकर सवें बहु चलती ॥
अस्थिराशि रघुराया दिसती । येइ दया अति, मुनींस पुसती ॥
जाणुनीहि कां पुसतां स्वामी । सर्वदर्शि तुम्हि अंतर्यामी ॥
निशिचरगण भक्षित मुनि सगळे । तैं रघुवीरनेत्रिं जल भरलें ॥

**दो०—निशिचर-हीन करीन महि पण कृत भुज उचलून ॥**
**सकल मुनींना सुख दिलें तदाश्रमीं जाऊन ॥९॥**

❖ ❖ ❖

## अध्याय २ रा

मुनि अगस्तिचा शिष्य सुजाण हि । भगवंतीं रति सुतीक्ष्ण नाम हि ॥
राम-सुसेवक कृति-मन-वचनीं । अन्य देव आशा ना स्वपनीं ॥
प्रभु-आगमन खबर जैं पावे । करत मनोरथ आतुर धावे ॥
हे विधि ! दीनबंधु रघुराया । करिति कि मजशा शठा दया या ॥
सानुज मजला राम हृदयपति । निजसेवका तसे कधि भेटति ॥
मनीं भरंवसा मम दृढ नाहीं । ज्ञान विरति भक्ति न मनि काहीं ॥
सत्संग न जप योग न याग न । चरण-सरोजीं दृढ अनुराग न ॥
एक हि बाणा कृपा निधाना । प्रिय तो ज्यातें गति ना आना ॥
होतिल सुफल आज मम लोचन । बघुन वदन-पंकज भव मोचन ॥

प्रेमपूरिं मुनि बुडले ज्ञानी । वदवे ना ती दशा भवानी ॥
पंथ दशा विदिशा समजे ना । कोण कुठें मी जात कळेना ॥
मागें वळे पुन्हां कधि फिरतो । कधि गुणगानीं नृत्या करतो ॥
प्रेमभक्ति अविरल मुनि पावत । तरुमागें लपुनी प्रभु पाहत ॥
प्रीती अति रघुवीर विलोकति । भवभय हारक हृदयीं प्रगटति ॥
मार्गिच अचल बनुनि मुनि बसले । देहिं पुलक फणसासम उठले ॥
तदा निकट रघुनाथ ठाकले । बघुनि दशा निजजन मनिं रुचले ॥
राम जागविति बहुपरिं मुनिला । ध्यान सुखें येत न जागृतिला ॥
राम भूपरूपा मग लपविति । हृदयिं चतुर्भुज रूप दाखविति ॥
तदा धावरुनि उठले मुनिवर । व्याकुळ जैसा मणिविण फणिवर ॥
बघुनी पुढें श्यामतनु–रामा । सीता अनुज सहित सुखधामा ॥
पडति छडीसम मग चरणांवर । प्रेममग्न बहु सभाग्य मुनिवर ॥
धरुनि दीर्घभुजिं घेति उचलुनी । प्रेमें अति ठेविति हृदिं धरुनी ॥
मुनिला भेटत कृपाल शोभत । कनकतरुंस जणुं तमाल भेटत ॥
रामवदन मुनिं बघत राहिले । भासत जणुं चित्रांत काढले ॥

**दो०–तें हृदिं धरुनी धीर मुनि घडि घडि धरी पदास ॥**
**प्रभुला पूजी विविध परिं, आणुनि निजाश्रमास ॥२१॥**

वदे मुनी प्रभु ऐक विनंती । स्तुति तुझी मी करुं कोण्यारीतीं ॥
महिमा अमित अल्प माझी मति । जशि रविसंमुख खद्योतद्युति ॥
श्याम तामरस–दाम शरीरं । जटामुकुट वसनं मुनिचीरं ॥

पाणिं चाप शर कटिं तूणीरं । नौमि सर्वदा श्रीरघुवीरं ॥
मोह–गहन–घन–दहन कृशानु: । संत–सरोरुह–कानन–भानु: ॥
निशिचर–करि–वरुथ मृगराज: । त्रातु सदा नो भवखग बाज: ॥
अरुण नयन राजीव सुवेषं । सीता नयन–चकोर निशेशं ॥
हर हृद मानस राज मरालं । नौमि राम उर बाहु विशालं ॥
संशय–सर्पाशिन–उरगाद: । शमन सुकर्कश–तर्क–विषाद: ॥
भवभंजन रंजन सुर यूथ: । त्रातु सदा नो कृपावरूथ: ॥
निर्गुण–सगुण–विषम–सम–रूपं । ज्ञान–गिरा–गोतीतमनूपं ॥
अमलमखिलमनवद्यमपारं । नौमि राम भंजन महिभारं ॥
भक्त–कल्पपादप आराम: । तर्जन कोप लोभ मद काम: ॥
अति नागर भवसागर–सेतु: । त्रातु सदा दिनकर-कुल-केतु: ॥
अतुलित दो: प्रताप बलधाम: । कलिमल विपुल विभंजन नाम: ॥
धर्म–वर्म नर्मद गुण-ग्राम: । संतत शं तनोतु मम राम: ॥
विरज जरी व्यापक अविनाशी । सकल-हृदींहि निरंतर वासी ॥
श्रीसह सानुज तरी खरारी । वसो हृदयिं मम काननचारी ॥
जाणोत चि जाणति जे स्वामी । सगुण अगुण हृदयांतर्यामी ॥
कोसलपति राजीव नयन जो । करो राम मम हृदयिं अयन तो ॥
त्यजो न हा अभिमान चुकुन मति । कीं सेवक मी मम रघुपति पति ॥
परिसुनि मुनिवच रामा रुचले । हर्षें पुन्हां हृदयिं मुनि धरले ॥
असें प्रसन्न परम मी जाणुनि । मागसि तो वर देइन तुज मुनि ॥
कधिं न याच्लिा वर मुनि वदले । काय सत्य वा मिथ्या न कळे ॥

तुम्हां गमे रघुराजा ! लायक । तो द्या मजसि दास सुखदायक! ॥
अविरल भक्ति विरति विज्ञान । होशि सकल-गुण-बोध निधान ॥
प्रभु ! जो वर मज दिला पावला । आतां द्या जो मला भावला ॥

**दो०–सानुज सह जानकी प्रभु ! चाप बाण धर राम ॥**
**हृदय-गगनि मम इंदुसे संतत वसा निकाम ॥११॥**

तदा तथास्तु रमापति वदती । घटज ऋषिकडे हर्षित निघती ॥
बहुत दिवस गुरु-दर्शन नाहीं । किति दिन या आश्रमि आल्याही ॥
निघें गुरुकडे प्रभुसह आतां । तुमचेवर उपकार न नाथा ? ॥
बघुनि कृपानिधि मुनिचतुराई । घेति सवें विहसुनि दो भाई ॥
मार्गि कथित अनुपम निजभक्ती । मुनि–आश्रमि सुरभूप पोंचती ॥
त्वरें निकट गुरु सुतीक्ष्ण गेले । करुनि दंडवत वदते झाले ॥
नाथ कोसलाधीश कुमार । भेटूं आले जगदाधार ॥
राम अनुज समेत वैदेही । निशिदिनिं देव जप्तसां जे ही ॥
श्रवत अगस्ती उठुनि धावले । हरिस बघुनि जल लोचनिं भरलें ॥
पडति बंधुयुग मुनि–पद–कमळीं । प्रेमें अति ऋषि हृदयीं कवळीं ॥
पुसे ज्ञानि मुनि कुशला सादर । आणुनि बसवीले आसनिं वर ॥
मग बहुपरिं करुनी प्रभु-पूजा । भाग्यवंत मजसम नहिं दूजा ॥
जितके तिथें अपर मुनिवृंद । हर्षति सकल बघुनि सुखकंद ॥

**दो०–मुनि समूहिं बसलेले सर्वांसही समोर ॥**
**विलोकिती शरदेंदुला जणूं निकाय चकोर ॥१२॥**

मग रघुवीर मुनीशा सांगति । प्रभु ! न गुप्त कांहीं अपणांप्रति ।।
जाणां कारण मम आगमना । तात ! नको सांगणें आपणां ।।
मंत्र अतां प्रभु मज तो देणें । मुनीद्रोहि मी मारिन जेणें ।।
प्रभुवच परिसुनि करिती स्मित मुनि । पुसलें नाथ काय मज जाणुनि ।।
भजनबळें अपल्याच अघारी । जाणें महिमा तव तिळभारीं ।।
माया तव, तरु विशाल उंबर । अमित फळें ब्रह्मांडें त्यांवर ।।
जीव चराचर जंतुसमान हि । आंत वसति जाणति ना आन हि ।।
भक्षक कठिण कराल तयां जो । काळ सदा तव भीत भया तो ।।
ते तुम्हि सकल लोकपति-नायक । पुसतां मजला मनुजा लायक ।।
कृपानिकेता मागूं वर हा । श्रीसह सानुज हृदयिं मम रहा ।।
अविरल भक्ति विरति सत्संगा । द्या पदकमलीं प्रीति अभंगा ।।
जरिहि ब्रह्म अखंड अनंतहि । अनुभव-गम्य भजति जें संतहि ।।
असें रूप तव जाणुं वानुं जरि । सगुण रूपिं पळपळ मनि रति तरि।
महती दासां सदा देतसां । म्हणुनी मज रघुराज पुसतसां ।।
परम मनोहर ठिकाण ठावें । पावन पंचवटी प्रभु ! नांवें ।।
प्रभु दंडक वन पावन करणें । मुनिवर-शाप उग्र कीं हरणें ।।
रघुकुलराया तेथ वसावें । दयाछत्र मुनि-निकरिं धरावें ।।
राम घेति मुनि-निरोप निघती । निकट पंचवटि शीघ्र पोंचती ।।

**दो०-होइ गृध्रपति भेट तैं विविधा प्रीति करून ।।**
**प्रभु गोवतटिं राहिले पर्णकुटी बांधून ।।१३।।**

तिथें राम जैं निवास करती । सुखी होति मुनि भया विसरती ॥
छवि पूरित गिरि सर सरिता वन । होती प्रतिदिन अतिशय शोभन ॥
खग-मृग-गण आनंदें नांदति । मधुप मधुर गुंजत छवि पावति ॥
वर्णु न शकति वना अहिराजे । जिथें प्रगट रघुराज विराजे ॥
सुखें एकदां प्रभु आसीन । लक्ष्मण वचन वदति छलहीन ॥
सुरनर मुनि अग जगता स्वामी । प्रभुभावेंचि होय पुसतां मी ॥
वदा तें कि समजाउनि देवा । करिन तजुनि सब पदरज-सेवा ॥
सांगा ज्ञान विराग हि माया । भक्ति हि जीनें करां प्रभु दया ॥

**दो०–जीवेश्वर भेद हि सकल, सांगा समजाऊन ॥**
**पदरति जेणें उद्भवे भ्रम शुच मोह नुरून ॥१४॥**

तात समासि सांगु समजाउनि । ऐका मति मन चित्त लाउनि ॥
मी माझें तूं तुझें चि माया । करते जी वश जीव निकाया ॥
गो गोचर जोंवर मन जातें । समजा सकल वंधु! माया ते ॥
ऐका वदें तिचे भेदानां । विद्या अपर अविद्य जाणा ॥
एक दुष्ट जी सुदुःखरूपी । जी वश जीव पडें भवकूपीं ॥
एक रची जग गुण वश जीतें । प्रभू प्रेरिता, स्वबल न तीतें ॥
ज्ञान जिथें मानादिक नाहीं । ब्रह्म समान सकलजग पाही ॥
म्हणति तात ! तो परम विरागी । तृण सम सिद्धी त्रिगुणां त्यागी ॥

**दो०–माया ईश न आपणा जाणे, म्हणती जीव ।**
**बंध-मोक्षदहि सर्वपर मायाप्रेरक शीव ॥१५॥**

विरतिस धर्म योग दे ज्ञाना । ज्ञान मोक्ष दे श्रुति करि गाना ।।
वेगें जिनें द्रवें मी भाई । ती मम भक्ति भक्त-सुखदाई ।।
ती स्वतंत्र अवलंब आन नहि । ज्ञान अधीन तिच्या विज्ञान हि ।।
भक्ति तात अनुपम सुखमूलहि । मिळते संत यदा अनुकूल हि ।।
भक्ति साधनें सांगुं वर्णुनी । सुगम पथें मज पावे प्राणी ।।
प्रथम विप्रपदिं परमा प्रीती । स्व-स्व कर्मि निरती श्रुतिरीतीं ।।
याचें फल कीं विषय-विराग हि । मग मम धर्मि होइ अनुराग हि ।।
श्रवणादिक नव भक्ति दृढावति । मनि ममलीला रति अति पावति ।।
संतचरण-पंकजि सुप्रेमा । मन-तन वचन-भजन दृढ नेमां ।।
माय वाप गुरु बंधु देव पति । सकल मला जाणुनि दृढ सेवति ।।
मम गुण गातां तनू पुलकते । गद्गद गिरा नयनजल गळतें ।।
काम आदि मद दंभ न ज्याला । तात निरंतर वश मी त्याला ।।

**दो०–वचन कर्म मन मम गति भजन करिति निष्काम ।।**
**हृदयकमलिं त्यांचे सदा करतों मी विश्राम ।।१६ ।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ३ रा

भक्तियोग परिसुनी सुखी अति । लक्ष्मण शीर्षा प्रभुपदिं नमवति ।।
गेले कांहि दिवस या रीतीं । विरती ज्ञान कथित गुण नीती ।।
शूर्पणखा जी रावण-भगिनी । दुष्ट हृदय दारुण जशि अहिनी ।।
पंचवटिस एके दिनि आली । रघुनि कुमारां विकल जहाली ।।

भ्राता पिता पुत्र उरगारी । पुरुष मनोहर निरखत नारी ।।
होइ विकल नावरूं शके मन । जसा द्रवे रविमणि रवि पाहुन ।।
रुचिर रूप धरि ये प्रभुपासी । स्मित बहु करुनि वदे वचनासी ।।
पुरुष तुम्हांसम नारि न मजसम । विधि विचारि रचि हा योगोत्तम ।।
मम अनुरूप पुरुष बघतां ही । सोधुनि लोकत्रयांत नाहीं ।।
म्हणुन कुमारी असे आजवरि । तुम्हां न्यहाळुनि तोष कांहि तरि ।।
सिते बघत वदले प्रभु बाई ! । असे कुमार कि मम लघु भाई ।।
ये; रिपुभगिनी जाणुनि लक्ष्मण । प्रभुसि बघत मृदु वदले तत्क्षण ।।
श्रुणु सुंदरि मी सेवक यांचा । पराधीन, नहि तुला सुखाचा ।।
प्रभु समर्थ कोसलपुर-राजे । जें करतिल तें त्यां सब साजे ।।
दास इच्छि सुख मान भिकारी । व्यसनी धन सुगती व्यभिचारी ।।
लोभि इच्छि यश चार गुमानी । बघति काढुं नभदुध हे प्राणी ।।
फिरुनी आली रामनिकट ती । प्रभु लक्ष्मणाकडे पाठवती ।।
लक्ष्मण वदले वरील तुज तो । तृण तोडुनि टाकील लाज जो ।।
चिडुनि जाइ मग रामा प्रती । प्रगटी भेसुर रूपा अती ।।
सीते सभय बघुनि रघुराजा । बोधिति खूण करोनी अनुजा ।।

**दो०—लक्ष्मण तिज सुलाघवे, करि विण नासा कान ।।**
**तिचें करीं रावणा जणुं दिधलें कीं आव्हान ।।१७।।**

नाक-कान-विण विक्राळा अति । गेरुपाट जणुं शैलीं वाहति ।।
उप-खर दूषण विलपत पळली । धिक् पौरुष बल बंधो ! वदली ।।

सांगे सगळे पुसतां तेणें । श्रवुनि जमवि यातुधान सेने ॥
धावति निशिचर–निकर–वरूथ । जणुं सपक्ष कज्जलगिरि–यूथ ॥
नाना वाहन नानाकार हि । नानायुध–धर घोर अपार हि ॥
अश्रुति-नासा अशुभरूप ती– । शूर्पणखा ते ठेविति पुढतीं ॥
होती अशकुन भीतिद मिति ना । मृत्यु विवश झुंडी मानिति ना ॥
गर्जति तर्जति गगनीं उडती । बघुनि कटक भट भारि हर्षती ॥
धरा बंधु दो जिते कुणि म्हणे । वधा धरुनि कुणि नारिस हरणें ॥
धूलिपूर्ण नभमंडल बने । राम बाहुनी अनुजा म्हणे ॥
जा गिरि कंदरिं जानकि घेउनि । निशिचर कटक घोर ये चालुनि ॥
प्रभुवच 'सावध रहा' श्रवण करि । जाई श्रीसह चापबाण करिं ॥
राम बघुनि रिपुदल ये चालुनि । चढवि कठिण कोदंडा विहसुनि ॥

**छं०-कोदंड चढवुनि कठिण, बांधित शिरिं जटा शोभति कसे ।**
**मरकत गिरीवर लढत दामिनि कोटिसह अहि युग जसे ॥**
**कटिं कसुनि तूण विशाल भुजिं धृत चाप विशिखा घासुनी ।**
**मृगराज कीं प्रभु निरखितो गजराज यूथां पाहुनी ॥१॥**

**सो०–आले त्वरा करून धरा धरा धावत सुभट ॥**
**एका यथा बघून बाल-रविसि घेरिति बनुज ॥१८॥**

प्रभुस बघुनि शर सोडुं न शकती । निशिचर भट सब चकित निरखति ।
बाहुनि सचिव वदति खर-दूषण । हा कुणि नृपबालक नरभूषण ॥
नाग असुर सुर नर मुनि जितके । दृष्ट विजित अम्हि हत वा कितके ।

एका, जन्मामध्यें हि नाहीं। कुठें पाहिली सुंदरता ही ॥
केली भगिनी यदपि विरूपहि। अनुपम पुरुष वधा लायक नहि ॥
द्या सत्वर निज नारि गोपिता। भवनि जिते जा बंधु उभयता ॥
माझे वचन तया सांगावे। शीघ्र तदुत्तर ऐकुनि यावें ॥
वदले रामा दूत जाउनी। श्रवुनि राम वदले स्मित करुनी ॥
क्षत्रिय अम्हि मृगया वनि करतों। तुमच्या सम खलमृगां धुंडतों ॥
रिपु बलवंत हि बघुन न डरतों। काळासिहि करुं सकृत् समर तों ॥
यद्यपि मनुज दनुज कुल दालक। मुनिपालक खलनाशक बालक ॥
बळ नसेल तर घरास जा ना। मी न मारि कधि रण विमुखानां ॥
रणि येउनि कां कपट चतुरता। रिपुवर कृपा परम कातरता ! ॥
त्वरित जाउनी दूत कळवती। परिसुनि खर दूषण अति जळती ॥

**छं०–उर जळत वदले धरा, धावति विकट भट रजनीचर।**
**शर चाप तोमर शक्ति शूल कृपाण परशु गदा धर ॥**
**प्रभु आधि करिति कठोर धनु टंकार घोर भयंकर ॥**
**तें बधिर विव्हळ यातुधान, न शुद्धि राहे तिळभर ॥१॥**

**दो०–होऊनि सावध धावले जाणुनि सबल अराति ॥**
**रिपु रामावर वर्षती अस्त्र शस्त्र बहु जाति ॥१९।रा**
**तोडुनि त्यांचीं आयुधें तीं तिळसम रघुवीर ॥**
**ताणुनि आश्रुति कार्मुका मग सोडिति निज तीर ॥१९म**

**छं.–मग जाति बाण कराल। फुं–करत बहु कीं व्याल ॥**

रणिं कोपले श्रीराम । शर सुटति निशित निकाम ॥
पाहोनि खरतर तीर । पळतात निशिचर वीर ॥
त्रय रुष्ट वदती भाइ । पळुनी रणांतुनि जाइ ॥
करि मारुं आम्हीं त्यास । फिरले हि देहिं उदास ॥
विविधायुधें हि अपार । करतात संमुख मार ॥
रिपु रुष्ट अति पाहून । प्रभु धनुषि शर लावून ॥
बहु सोडिती नाराच । तोडीति विकट पिशाच ॥
कर पाद उर भुज शीस । पडुं लागलीं धरणीस ॥
चीत्-करति लागत बाण । धड पडति कुधर समान ॥
भट तुटति तनु शत खंड । तरि उठति कृत पाखड ॥
नभि उडति बहु भज मुंड । विण मौलि धावति रुंड ॥
खग कंक काक शृगाल । कट्-कटति काठण कराल ॥
छं०-कट्-कटति कोल्हे प्रेत भूत पिशाच्च खर्परि सांचती ॥
वेताळ वीर कपाल ताला धरिति योगिणि नाचती ॥
रघुवीर-मार्गण चंड खंडित वीर-बाहू-उर-शिरां ।
सर्वत्र पडती उठति लढती रटति धर धर भयगिरा ॥१॥
अंत्रांसि घेवुनि उडति गृध्र पिशाच्च करि धृत धावती ॥
संग्राम-पुर-वासी पतंगां बालबहु जणुं उडवती ॥
मारून पडले वक्ष-फुटले विव्हळत भट कण्हत रें ।
पाहूनि निज दळ विकळ भट खर धावले त्रिशिरा त्वरें॥२॥

शर शक्ति शूल कृपाण तोमर परशु एके क्षणि किती।
संक्रुद्ध निशिचर रणीं श्रीरघुवीरिं अगणित फेकिती॥
प्रभु निमिषि रिपु-शस्त्रास्त्र खंडुनि सोडि घोषुनि सायकां।
उरिं विशिख दशदश घोर मारिति सर्व निशिचर-नायकां॥३॥
महिं पडति उठती लढति, मरति न करति माया भट अती।
सुरसभय रिपु चौदा हजारहिं एकटे कोसलपती।
प्रभु बघुनी मुनि सुर सभय, मायानाथ कौतुक करि असें।
बघुनी परस्पर राम रिपुदल समर करुनी मरतसे॥४॥
दो०–राम राम म्हणतां मरति पावति पद निर्वाण॥
क्षणि उपाय करुनि रिपू मारिति कृपानिधान॥२०रा॥
हर्षित वर्षति सुमन सुर दुंदुभि-रव गगनांत॥
स्तुति कर करुनी सकल गत रुचिर गगनयानांत॥२०म॥

❖ ❖ ❖

## अध्याय ४ था

जैं रिपु रणिं रघुनाथें जितले। सकल अमर नर मुनि भय सरलें॥
लक्ष्मण सीते घेउनि आले। प्रभुपदिं पडत हर्षि हृदिं धरले॥
सीता श्याम मृदुल तनु बघते–। प्रेमें परम, न तृप्त नयन ते॥
वसुनि पंचवटिं श्रीरघुनायक। करिति चरित सुर-मुनि-सुखदायक॥
बघुनी खरदूषणादि–फन्ना। शूर्पणखा गत चिथवि रावणा॥
क्रोधें अति बोले वचनासी। देश-कोष-शुद्धि च भुललासी॥

करिसि पान निजसी दिनरातीं । शुद्धि न तिळ, तव शिरीं अराती ॥
राज्य नीतिविण धर्माविण धन । हरिस सुकर्म न करतां अर्पण ॥
येइ विवेक न विद्या शिकुनी । श्रम फल पढुनी करुनि पावुनि ॥
भूप कुमंत्रें यति संगानें । मानें ज्ञान हि लज्जा पानें ॥
प्रीती प्रणयाविण गुणि मदें । नाशति शीघ्र असें नय वदे ॥

**सो०–रिपु रुज पावक पाप प्रभु अहि समजा सान न ॥**
**वदुनी, विविध विलाप करित करी ती रोदन ॥२१ रा॥**
**दो०–सभेमधें व्याकुळ पडे रडे मोकलुनि धाय ॥**
**तूं जिवंत दशमुख असुनि अशि मम गति हें काय ॥२१ म॥**

व्याकुळ उठति सभासद ऐकुनि । धरुनि बाहु बसविति समजाउनि ॥
वद तव वृत्त वदे लंकापति । नाक कान तव कोण कि कापति ॥
कोशल नृप–दशरथ-सुत असती । पुरुषसिंह वनिं मृगये अटती ॥
मज समजुनि ये त्यांची करणी । रहित निशाचर करतिल धरणी ॥
त्याचें भुजबळ दशमुख ! पावुनि । अभय बनुनि काननिं विचरति मुनि ।
दिसण्या बालक काळचि जाणा । परम धीर धन्वी गुण नाना ॥
अतुलित बली प्रतापी भ्राते । खलवधरत सुरमुनि–सुखदाते ॥
शोभाधाम राम ते नामां । एक सवें त्यांचे स्त्री श्यामा ॥
विधि बनवी अशि रुपराशि वर । ओंवाळा रतिकोटि तिचे वर ॥
छिन्न तदनुजें श्रुति मम नासा । श्रवुनि बहिण तव कृत परिहासा ॥
खर–दूपण ऐकुनी पुकारिति । त्यां कटकासह ते क्षणिं मारिति ॥

खर-दूषण-तिशिरा-मरणातें । श्रवुनि देहिं दव दशाननातें ॥

**दो०– शूर्पणखे समजाउनी, बहु वानी स्वबलास ॥**
**चिंताकुल गेला गृहीं नीज न निशि ये त्यास ॥ २२ ॥**

सुरनर-असुर-नाग-विहगांमधि । सम मम अनुचर कुणि न जगामधि
मजशा खरदूषण बलवानां । कोण वधील विना भगवाना ॥
सुर-रंजन भंजन महिभारा । जर भगवंतें धृत अवतारा ॥
जाउन वैर हठें तर करतो । प्रभुशरिं प्राण तजुनि भव तरतो ॥
भजन घडेना तामस तनुनें । मंत्रचि हा दृढ मन-वच वपुनें ॥
जर नररूप भूप सुत कोणी । हरिन नारि रणिं जिंकुनि दोनी ॥
निघे एकटा बसुनि रथावर । जिथें वसे मारिच तटिं सागर ॥
इथें राम जशि युक्ति योजती । ऐक उभे शुभ कथा आज ती ॥

**दो०–लक्ष्मण जंव गेले वनीं आणुं मूल फल कंद ॥**
**वदले जनक-सुतेला हसुनि कृपा-सुखवृंद ॥२३॥**

पहा प्रिये व्रत रुचिर सुशीले । काहिं करीन ललित नरलीले ॥
पावकांत तुम्हि करा निवासा । जों मी करिन निशाचर-नाशा ॥
राम युक्ति जैं वदले सगळी । प्रभुपद हृदिं धरि राही अनलीं ॥
ठेवी प्रतिबिंबा निज सीता । तशी सुशील-रूप सुविनीता ॥
लक्ष्मणही हें मर्म न जाणति । चरित काहिं जें भगवान् विरचति॥
गत दशमुख मारीचापासीं । नमी स्वार्थरत नीच शिरासी ॥
नमन नीचकृत दुःखद फारहि । सम अंकुश धनु अहि मार्जारहि ॥

भयदा दुष्टाची प्रिय वाणी । अकाळिचीं जशि फुलें भवानी ! ।।

**दो०– करि पूजा मारीच तें सादर विचारि तात ।।**
**व्यग्रचित्त कां एकटे लगबगिनें आलांत ।।२४।।**

कथा सकल त्या दशाननानें । कथित दुर्भगें अति अभिमानें ।।
तुम्हीं कपटमृग व्हा छलकारी । जेणें आणुं हरुनि नृपनारी ।।
तो वदला ऐका दशकंधर । ते नररूप चराचर-ईश्वर ।।
त्यांसीं तात न वैर करावें । मारि मरावें जगवि जगावें ।।
मुनि मरव रक्षणि कुमार ठाकति । फलविण शर मज रघुपति मारति।।
आलों शत योजनें क्षणामधिं । वैर बरें ना त्यांच्याशीं कधिं ।।
कीटभृंगसम मग गति मातें । जिथें तिथें दिसती दो भ्राते ।।
जरि नर तरि अति तात शूर ते । वैर तयांसि न पडेल पुरतें ।।

**दो०–वधुनि ताटका सुभुज जे खंडिति हर-कोदंड ।।**
**वधिति तिशिर-खर-दूषणां नर कि असा बलिवंड ?।।२५**

गृहिं जावें कुल-कुशल-विचारीं । ऐकुनि जळत शिव्या दे भारी ।।
गुरु सम मूढ करसि मज वोधा । बोल, कोण जगिं मज सम योधा ।।
करि मारीच हृदयिं अनुमाना । नव विरोधिं कल्याण कुणा ना ।।
शस्त्री मर्मी प्रभु शठ धनी । वैद्य वंदि कवि बल्लव गुणी ।।
उभयपरीं पाही निज मरणा । चिंत्ति शरण रघुनायक-चरणां ।।
वधिल अभागी देतां उत्तर । कां न मरूं लागत रघुपति-शर ।।
चिंतुनि असें दशानन संगा– । निघे रामपदिं प्रीति अभंगा ।।

मनीं हर्ष अति तयास दावि न । स्नेही परम आज मी पाहिन ॥

**छं०-प्रियतम परम निज बधुनि लोचन सुफलुनी सुखि होइ मी**
**श्रीसहित अनुजा सह कृपानिधि-चरणि मन लावीन मी ॥**
**निर्वाणदायी क्रोध ज्यांचा भक्ति अवशा वश करी ॥**
**निज पाणि शर संधूनि तो मज वधिल सुख सागर हरि ॥१॥**

**दो०—मम मागे धरुं धावतां धरुनि शरासन बाण ॥**
**प्रभु पाहिन फिर-फिरुनि मी धन्य न मज सम आन ॥२६॥**

त्या वन-निकटिं दशानन आला । तैं मारीच कपट-मृग झाला ॥
अति विचित्र ना जाइ वर्णिला । कनक देह मणि-खचित बनविला ॥
सीता परम रुचिर मृग पाहत । अंग अंग सुमनोहर भासत ॥
श्रुणु देवा रघुवीर कृपाकर । चर्म मृगाचें या अति सुंदर ॥
सत्यसंध या वधुनि चर्म तें । प्रभु आणा वैदेही वदते ॥
रघुपति जाणुनि सर्व कारणा । उठति हर्षि सुर-कार्य-साधना ॥
मृगा बघुनि कटिं परिकर बांधिति । करतलि चाप रुचिर शर लाविति॥
लक्ष्मणास तैं प्रभु समजाविति । बंधु! निशाचर फिरति विपिनिं किति
संरक्षी सीतेला भारी । मति-विवेक-बल-समय-विचारीं ॥
प्रभुस बघुनि मृग जाई पळुनी । धावति राम शरासन सजुनी ॥
निगम नेति, शिव ध्यानिं न पावति । मायामृग—मागें ते धावति ॥
कधीं निकट कधि सुदूर पळतो । कधीं प्रगटतो लपतो खळ तो ॥
प्रगटत लपत करत छल भूरी । घेउन गेला प्रभुला दूरीं ॥

मारिति राम कठिण शर लक्षुनि । पडे धरणिवर घोर पुकारुनि ।।
प्रथम घेइ तो लक्ष्मण–नामा । स्मरे मनामधि नंतर रामा ।।
स्वतनू प्रगटी प्राणां त्यजतां । स्नेहें रामा हृदयीं स्मरतां ।।
तदंतरीचें प्रेम जाणुनी । मुनि-दुर्लभ गति दिधली प्रभुनी ।।

**दो०–विपुल फुलें सुर वर्षती प्रभुगुणगाथा गात ।।**
**निजपद असुरा अर्पिलें दीनबंधु रघुनाथ ।।२७।।**

खल हृत, शीघ्र फिरति रघुवीर । शोभे धनु करिं कटि तूणीर ।।
आर्त गिरा जैं ऐके सीता । वदे लक्ष्मणा अतिशय भीता ।।
जा सत्वर अति विपदीं भ्राते । लक्ष्मण हसुनि म्हणे श्रुणु माते !।।
भृकुटि-विलासिं सृष्टिलय घडतो । स्वप्निंहि संकटिं तो कधि पडतो ।।
मर्म वचन जैं सीता वदलें– । प्रेरित हरि लक्ष्मण–मन ढळलें ।।
बनदिग्देवां सोंपवि तिजला । रावण-शशि-राहू प्रति वळला ।।
शून्य संधि दशकंधर पाहे । यति वेषें सन्निध येताहे ।।
ज्याच्या भयें सुरासुर डरती । निशिं न नीज, दिनिं अन्न न गिळती ।।
दशशिर तो श्वानासम भुरटा । जाइ चहुंकडे बघत भामटा ।।
असा कुपंथि पद देत खगेश्वर !। नुरे तेज तनु-मति-बल तिळभर ।।
वदुनि कथा नानाविध शोभन । प्रीति नीति भय दावि विलोभन ।।
सीता वदे यती तुम्हि असतां– । स्वामी, तुम्हि वच खलसें वदतां ।।
तैं रावण निजरूप दाखवी । होइ सभय जैं नाम ऐकवी ।।
धरुन धीर दृढ सीता वदते । थांब खला प्रभु आले बघ ते ।।

क्षुद्र ससा इच्छी हरिवधुसी । निशिचर नाथ ! कालवश अससी ।।
श्रवुनि वचन दशशीस कोपला । मनिं पद नमुनी मानि सुखाला ।।

**दो०—क्रोधवंत रावण तिला रथिं बसवुनि तैं घेइ ।।**
**निघे तातडीं नभिं, भयें रथ न हांकतां येइ ।।२८।।**

हा ! जगदेकवीर रघुराया । काय गुन्हा कि दया विसराया ।।
संकट-हरण शरण–सुख-दायक । हा ! रघुकुल–सरोज–दिननायक ।।
हा ! लक्ष्मण तुम्हि पात्र न दोषा । फळ आलें कीं मत्कृत रोषा ।।
विविध विलापां करि वैदेही । भूरिकृपा-प्रभु दूरीं स्नेही ।।
प्रभुस कोण मम विपत्ति कथितो । पुरोडाश खर खाउं पाहतो ।।
सीता-विलाप परिसुनि भारी । होति चराचर दुःखी सारीं ।।
श्रवुनि गृध्रपति गिरा आर्त ती । रघुकुलतिलक नारि ओळखती ।।
अधम निशिचरें नेल्नि जातसे । म्लेंछ जशी कपिलेस नेतसे ।।
सीते पुत्रि न मनीं भया धर । मी करतो बध नाश निशाचर ।।
धावे क्रोधवंत खग तेवीं । सुटे पर्वतावर पवि जेवीं ।।
रे रे दुष्टा कां न थांबसी । निर्भय जासि, न मजसि जाणसी ।।
येतां बघुनि कृतांत समाना । करि दशकंठ वळुनि अनुमाना ।।
कीं मैनाक कि असेल खगपति । मम बल तो जाणतो सहित पति ।।
ओळखि 'जरठ जटायु असे हा'। मम करतीर्थी त्यागिल देहा ।।
श्रवुनि गृध्र सुक्रोधें धावे । सांगुं रावणा तें ऐकावें ।।
त्यज जानकी, कुशल घरिं जा वर । असें बहुभुजा घडेल ना तर ।।

रामरोष अति भीषण पावक। होईल सकल शलभकुल तावक ।।
उत्तर दे न दशानन योधा। धावे गृध्र करुनि तैं क्रोधा ।।
धरि कच विरथ करी गत महीं। सीते ठेवि फिरे गृध्रही ।।
चोची मारुनि वर्ष्म विदारी। मूर्छित घटिका एक सुरारी ।।
तैं संक्रुद्ध निशाचर चिडला। खड्ग घोर अति काढुनि भिडला ।।
छेदि पंख खग पडला धरणीं। स्मरत राम, कृत अद्भुत करणी ।।
पुन्हां रथामधि सीते घालुनि। निघे उताविळ अति भय पाउनि ।।
जात विलाप करत नभि सीता। व्याध विवश जणुं हरिणी भीता ।।
गिरिवर वसलेले कपि पाहुनि। हरि हरि म्हणुनि देइ पट टाकुनि ।।
ऐसा सीते घेउनि गेला। राखि अशोक-वनांत तियेला ।।

**दो०-हरला तो खल बहुविधा प्रीति भीति दावून ।।**
**मग अशोक पादपतळीं राखी यत्न करून ।।२९रा ।।**

## नवाह्न पारायणे षष्ठो विश्रामः

❖ ❖ ❖

## अध्याय ५ वा

**दो०- कपट-कुरंगा-संगि गत पळत जसे श्रीराम ।।**
**सीता हृदि धरि रूप तें जपत राहि हरिनाम ।।२९म ।।**

रघुपति अनुजा येतां पाहति। चिंता बाह्य विशेषें दावति ।।
त्यजुनि एकली जनकसुतेसी-। तात वचन मम मोडुन येसी ।।

फिरति निशाचर निकर काननीं । सिता न आश्रमिं गमे मम मनीं ।।
धरि पदकमल अनुज कर जोडी । म्हणे नाथ ! मम कांहि न खोडी ।।
प्रभु गेले अनुजासह तेथें । गोदावरि–तटिं आश्रम जेथें ।।
बघुन जानकीविहीन आश्रम । व्याकुळले प्राकृत दीनासम ।।
हा गुणखाणि जानकी सीते । व्रत–सुशील–छवि–नेम पुनीते ।।
लक्ष्मण नानापरिं समजावित । लता–तरूनां जाति विचारित ।।
मधुकर–गण हो ! पशुपक्षी हो !। दिसली सीता हरिणाक्षी हो ? ।।
शुक कपोत खंजन मृग मीन । मधुप निकर कोकिला प्रवीण ।।
कुंदकळी दाडिम दामिनी । कमलशरदशशि अहि भामिनी ।।
वरुणपाश मनसिजधनु हंसा– । गज-हरि-कानीं निज प्रशंसा ।।
श्रीफल कांचन–कदली हर्षति । भय न लाज लव मनांत धरती ।।
श्रुणु जानकि ! तुजविण हे सगळे । प्रमुदित राजपदीं जणुं चढले ।।
स्पर्धा सोसे कशी तुला ही । प्रिये शीघ्र कां प्रगटत नाहीं ।।
शोधित विलपति ऐसे स्वामी । जणूं महा विरही अति कामी ।।
राम अवाप्तकाम सुखराशी । मनुज चरित करि अज अविनाशी ।।
सम्मुख पतित गृध्रपति वदती । स्मरत रामपदिं चिन्हें असतीं ।।

**दो०–कर सरोज शिरिं लाविती अति रघुवीर कृपाल ।।**
**बघुनि राम-छवि धाम-मुख गत पीडा सब हाल ।।३०।।**

वदे गृध्र करि धीरा धारण । राम ! ऐकणें भव–भय–भंजन ।।
नाथ ! दशमुखें ही गति केली । खळें जानकी हरुनी नेली ।।

प्रभु ! तो गत घेउन दक्षिण दिशि । होती ती विलपत अति कुररिशि ।।
प्रभो ! राखिले प्राण दर्शना । जाउं वघति कीं कृपानिधाना ।।
राम म्हणति ताता ! तनु ठेवा । सस्मित मुख खग वदला देवा ! ।।
ज्यांचें नाम मरत मुखि ये जरि । मुक्त अधमही वेद वदे तरि ।।
ते लोचन–गोचर मम संमुख । नाथ ! ठेवुं तनु मिळवुं कवण सुख ।।
सजल नयन रघुराजा सांगति । तात पावलां निजकर्में गति ।।
परहित मनि वसतें ज्यांच्या ही । त्यांस कांहि जगि दुर्लभ नाहीं ।।
त्यजुनि तात तनु जा मम धामा । देउं काय तुज पूरित–कामा ।।

**दो०–सीताहरण तात नच वदा पित्या जाऊन ।।**
**मी जर राम दशास्य तें वदे सकुल येऊन ।।३१।।**

त्यजुनि गृध्रतनु धरि हरिरूपा । पीतांबर भूषणां अनूपां ।।
श्याम गात्र विशाल भुज चारी । स्तुती करी लोचनिं बहु वारी ।।

**छं०–जय राम अनुपम रूप निर्गुण सगुण गुण-चालक खरे**
**दशशीस बाहु प्रचंड खंडण चंड शर, मंडण धरे ।।**
**पाथोद-गात्र, सरोज मुख, राजीव-आयत लोचनं ।**
**नित नौमि राम कृपाल बाहु विशाल भवभयमोचनं ।।१।।**
**बलमप्रमेयमनादिमजमव्यक्तमेकमगोचरं ।**
**गोविंद गोपर द्वंद्वहर विज्ञानघन धरणीधरं ।।**
**जे राममंत्र जपंति संत अनंत जनमन–रंजनं ।**
**नित नौमि राम अकाम-प्रिय कामादि-खलदलगंजनं ।।२।।**

ज्या श्रुति निरंजन विरज अज ही ब्रह्म विभु वाखाणती ।
जें ध्यान विरतीज्ञान-योगानेंकि कधिं मुनि पावती ।।
तें प्रगट करुणाकंद शोभावृंद अगजग मोहती ।
मम हृदय-पंकज-भृंग, अंगि अनंग बहु छवि शोभती ।।३।।
जो अगम सुगम हि सहज निर्मल असम सम शीतल सदा ।
बघती जया योगी सुयत्नें करित मन गो वश सदा ।।
तो राम रमानिवास संतत दास-वश तिभुवन धनी ।
मम वसतु हृदि तो शमन संसृति कीर्ति ज्याची पावनी ।।४।।

दो०-मागुनि अविरल भक्तिवर गृध्र गाठि हरि-धाम ।।
त्याची क्रिया यथोचित स्वकरें करिती राम ।।३२।।

कोमल मन अति दीन दयालू । कारण विण रघुनाथ कृपालू ।।
गृध्र अधम खग आमिष भागी । गति दिधली जी याचिति योगी ।।
ऐक उमे ते लोक अभागी । त्यजुनि हरिस विषयीं अनुरागी ।।
मग सीते सोधित दो भ्राते । जाति विलोकित सघन वनातें ।।
लता विटप-संकुल घन कानन । बहु खग मृग वृक गज पंचानन ।।
येतां पंथि कबंधा वधला । सकल शाप वार्ता तो वदला ।।
शाप मला दिधला दुर्वासें । अघ तें प्रभुपद-दर्शनि नासे ।।
श्रुणु गंधर्वा तुला सांगतो । ब्रह्मकुलद्रोहि न मज रुचतो ।।

दो०-त्यजुनि कपट तनमनवचनिं जो भूसुर सेवील ।।
मी विधि शिव सुर सर्व ही त्याला वश होतील ।।३३।।

शापिति ताडिति परुष भाषती । विप्र पूज्य असं संत सांगती ।।
विप्र पूज्य गुण-शील-विहीन हि । ज्ञानि गुणगणीं निपुण शूद्र नहि ।।
सांगति निजधर्मा समजाउनि । स्वपदीं प्रीति बघुनि भावे मनिं ।।
नमुनी रघुपति पद-कमलांला । निज गति पावुनि नभीं निघाला ।।
देउनि राम उदार तया गति । पद शबरी आश्रमास लावति ।।
शबरी बघुनि राम घरिं आले । स्मरुनी मुनिवचना मनिं भरले ।।
सरसिज लोचन भुजा विशाला । जटा मुकुट शिरिं उरिं वनमाला ।।
श्याम गौर सुंदर दो भाई । शबरीं चिकटुनि पडली पायीं ।।
प्रेम मग्न मुखि वचन यंत ना । घडि घडि नमि शिर सरसिज चरणां
जल घे प्रक्षाळी पद सादर । मग बसवीले आसनिं सुंदर ।।

**दो०-कंद मूल फल सुरस अति दे रामा आणून ।।**
**प्रेमानें प्रभु खाती पुन्हां पुन्हां वानून ।।३४।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ६ वा

पुढें उभी जोडुनि युग कर ती । प्रभुस निरखितां प्रीतिस भरती ।।
स्तुती करूं तव केविं खरारी । अधम जाति मी जडमति भारी ।।
अधर्मीं अधम अधम अति नारी । त्यांतहि मी मतिमंद अघारी ! ।।
रघुपति म्हणती भामिनि ! वदतो । एक भक्तिनातें च मानतो ।।
जात पात कुल धर्म महत्ता । धन बल परिजन सुगुण चतुरता ।।

भक्तिहीन नर शोभे कैसा । दिसे वारिविण वारिद जैसा ।।
नवधा भक्ति सांगु तुज शबरी । श्रुणु सावध धर हृदयिं दृढ बरी ।।
प्रथम भक्ति संतांची संगति । दुसरी कथा श्रवणिं मम अति रति।।

**दो०–गुरु-पद-पंकज सेवा तिसरी भक्ति अमान ।।**
**चौथि भक्ति मम गुणगण त्यजुनि कपट करि गान ।।३५।।**

दृढ विश्वासें मंत्र जाप मम । भजन पांचवें श्रुति–कथितोत्तम ।।
शम–दमशील विरति वहुकर्मी– । षष्ठ, सतत रत सज्जन–धर्मी ।।
सप्तम सम, मम मय जग पाही । मजहुनि अधिक मानि संतांही ।।
अष्टम यथालाभि संतोषी । स्वप्नि न जाइ दृष्टि परदोषीं ।।
नवम सरल सर्वासीं, छल नहि । मम चि भरंवसा खेद न हर्षहि ।।
एक ही नवांमधें ज्यांपासीं । कुणिहि नारिनर चर अचरासी ।।
तो प्रिय भामिनि अतिशय मजला । भक्ती दृढ तुजमाजीं सकला ।।
योगि–वृंद–दुर्लभ गति जीहि । झाली सुलभ आज तुज तीहि ।।
मम दर्शन फल अनुपम परम हि । लभे जीव निज सहज स्वरूप हि ।।
जनकसुता–शोधा भामिनी । जाणसि वद करिवरगामिनी ।।
पंपासरिं रघुराज जाल जर । सुग्रिव सख्य घडेल तिथें तर ।।
तो सांगेल देव रघुवीरा । सव, जाणुनि पुसतां मतिधीरा ।।
पुनः पुन्हां प्रभुपदिं शिर ठेउनि । प्रेमें सकल कथेला सांगुनि ।।

**छं०–वदुनी कथा धरि पाद-पंकज हृदयिं, हरिमुख बघत ती**
**त्यजि योग-पावकिं देह, हरि-पदिं लीन, जियुन न परतती ।।**

**नर ! विविध कर्म अधर्म बहुमत शोकदायी त्याग रे।**
**तुलसी सुविश्वासें मनीं धर रामपदिं अनुराग रे ॥१॥**

**दो०–जाति हीन अघ जन्म महि कृता मुक्त अशि नारि ॥**
**विसरुनि ऐशा प्रभुस मन जड ! सुख इच्छिसि भारि ॥३६॥**

सोडुनि निघति राम तें विपिन हि। अतुल बली नर केसरि उभय हि ॥
प्रभु विरही इव करिति विषादा। वदत अनेक कथा संवादां ॥
पहा लक्ष्मणा कानन शोभा। दिसत कुणा मनि न करी क्षोभा ॥
हे खगमृग सह नारीवृंदां। फिरति करित जणुं माझी निंदा ॥
मृग-निकाय मज पाहुनि पांगति। भय न तुम्हाला मृगी कि सांगति ॥
लुटा मोद तुम्हि पावुनि मृगजनि। भ्रमति कनकमृग शोधित हे वनि ॥
करी करिणिनां संगे घेती। जणुं मजला हा धडाच देती ॥
शास्त्र सुचिंतित पुन्हां पहावें। भूप सुसेवित वश न गणावे ॥
राखा स्त्री हृदयामधि तरि ही। युवती शास्त्र नृपति वश नाहीं ॥
तात वसंता बघ शोभामय। प्रियाहीन मी मज उपजवि भय ॥

**दो०–विरह विकल बलहीन मज अति एकल जाणून ॥**
**सहित विपिन मधुकर खग येइ मदन चालून ॥३७रा॥**
**बघुनि बंधुसह दूत गत सांगे, ऐकुनि मात।**
**फटका थोपवि देइ तळ कामदेव जणुं तात ! ॥३७म॥**

लता पसरल्या विटपिं विशालीं। जणुं वनि विविधा वितान घाली ॥
ध्वजा पताका कदलि ताल वर। बघुनि न मोहे जो हि धीर नर ॥

विविध जाति फुलले तरु नाना । जणुं बहु शरधर सजुनी वाणा ।।
कुठें कुठें तरु रुचिर विराजति । सुटे सुटे भट जणुं बहु राहति ।।
कोकिल कूजति करी मत्तसे । ढेक महोख उंट खेचर–से ।।
मोर चकोर कीर वर वाजी । पारावत मराल सब ताजी ।।
तित्तिर लावक पदचर यूथ । कोण वर्णि किति मदन–वरूथ ।।
रथ गिरि–शिला नगारे निर्झर । चातक भाट गाति गुण सुस्वर ।।
मधुकर–मुखर भेरि बहु सणया । त्रिविध वायु ये वकील समया ।।
चतुरंगिणी चमू सह घेतो । देत जनां आव्हान फिरे तो ।।
लक्ष्मण ! काम चमूला बघती । राहति धीर जगीं तन्महती ।।
याचें एक परम बल नारी । तींतुन बचे सुभट तो भारी ।।

**दो०–प्रबल तात अति तीन खल काम क्रोध नि लोभ ।।**
**मुनि विज्ञानधाम मनिं करिती निमिषें क्षोभ ।।३८ रा।।**

**दो०–लोभा इच्छा दंभ बल कामा केवल नारि ।।**
**क्रोधा बल परुषाक्षरें मुनिवर वदति विचारि ।।३८ म।।**

गुणातीत चर–अचरा स्वामी । राम उमे ! सर्वांतर्यामी ।।
कामीजन–दीनतेसि दाविति । धीरांचे मनिं विरति दृढाविति ।।
क्रोध मनोज लोभ मद माया । सुटति सकल जैं राम करि दया ।।
इंद्रजालि तो भुलतो ना नर । तो नट असे प्रसन्न जयावर ।।
उमे ! सांगतो तुज अनुभव मम । सत् हरिभजन जगत् स्वप्नासम ।।
प्रभु मग जाति सरोवर–तीरा । पंपा नाम सुभग गंभीरा ।।

संत हृदय-सम निर्मल वारी । घाट सुवद्ध मनोहर चारी ।।
जिथें तिथें जल पिति किति मृगकुल । जणुं उदारगृह याचक-संकुल ।।

**दो०–कमलिनि सघन आड जल वेगें न कळें मर्म ।।**
**मायाछन्न न दिसुं शके निर्गुण जेवीं ब्रह्म ।।३९ रा।।**
**सुखी मीन सब एक रस अती अगाध जलांत ।।**
**यथा धर्मशीलांचे, दिन सुखयुत जातात ।।३९ म।।**

विविध वर्ण विकसित सरसिज अति । भृंगवृंद मृदुमंजुल गुंजति ।।
जलकुक्कुट कलहंसहि बोलति । प्रभुस विलोकुनि जणूं प्रशंसति ।।
चक्रवाक बक खग समुदाया– । बघणें शक्य, न ये वर्णाया ।।
सुंदर–खग–गण–गिरा मनोहर । जात पथिक बोलावत सादर ।।
सर-समीप मुनि-सदनें भ्राजति । चहुं दिशि कानन-विटप विराजति ।।
चंपक वकुल कदंब तमाल हि । पाटल पनस पलाश रसालहि ।।
नव पल्लव कुसुमित तरु नाना । चंचरीक–मंडल करि गाना ।।
शीतल मंद सुगंधि वात, तो । सहज मनोहर सतत वाहतो ।।
कुहू कुहू ध्वनि कोकिल करती । श्रवुनि सुरस मुनिध्यान विसरती ।।

**दो०–फलभारें तरु लोंबले भूस भेटुं येतात ।।**
**पर–उपकारी जसे नर विभवलाभि नमतात ।।४०।।**

राम पाहूनी रुचिर सरा अति । करुनी स्नान परम सुख पावति ।।
पाहुनि सुंदर तरुवर – छाया । बसले अनुजा सह रघुराया ।।
पुन्हां तिथें सब सुर मुनि आले । स्तुती करुनि निज धामां गेले ।।

वसले परम प्रसन्न कृपाल । सांगत अनुजा कथा रसाल ।।
विरहवंत भगवंत पाहिले । नारद मन बहु शोकें भरलें ।।
अंगिकारुनी माझ्या शापा । सोशिति राम भारि बहु तापा ।।
जाउनि ऐशा प्रभुस पहावे । पुन्हां असा अवसर ना फावे ।।
असें म्हणुनि करिं वीणा घेती । प्रभु सुखि बसले, तिकडे निघती ।।
गात रामचरिता मृदु वाणीं । प्रेमें विविध परीं वाखाणी ।।
करत दंडवत घेति उचलुनी । ठेविति वाढवेळ हृदिं धरुनी ।।
स्वागत, पुसुनी समीप बसविति । लक्ष्मण सादर चरणां क्षालिति ।।

**दो०-नानाविध विनती करुनि प्रभू प्रसन्न बघून ।।**
**नारद वचना बोलले पाणि-सरोज जुळून ।।४१।।**

## अध्याय ७ वा

पहा उदार सहज रघुनायक । सुंदर अगम सुगम वरदायक ।।
द्या वर एक मागतो स्वामी । जरी जाणतां अंतर्यामी ।।
मत्स्वभाव मुनि तुम्हां ठाउका । कांहि कधीं भक्तांसि लपवुं कां ।।
प्रिय अशि वस्तु हि मला कोणती । मागुं शका ना मुनि आपण ती ।।
जना अदेय नसे मम कांहीं । त्यजा न हा विश्वास कदा ही ।।
तैं नारद वदले हर्षित मन । हा वर मागुं करुनि उद्धटपण ।।
प्रभुच्या नामां जरी अनेकां । श्रुति सांगे एकाहुनि एका ।।
'राम' सकल नामांहुनि अधिकहि । असो नाथ ! अघखगगण-वधिकहि

**दो०–राका-रजनी भक्ति तव रामनाम तो सोम ॥**
**अपर नाम उडुगण विमल वसो भक्तहृद्व्योम ॥४२रा॥**
**एवमस्तु वदले मुनिसि कृपासिंधु रघुनाथ ॥**
**तैं नारद अति हर्षुनी प्रभुपदि नमिती माथ ॥४२ म ॥**

सुप्रसन्न रघुनाथा पाहति । नारद पुन्हां वचन मृदु भाषति ॥
राम ! यदा प्रेरुनि निज माया । मला मोहिला प्रभु रघुराया ॥
तदा लग्न मी करूं पाहिलें । कारण कवण कि करूं नहि दिलें॥
श्रुणु मुनि हर्षे तुला सांगतो । त्यजुनि भरंवसा सब मज भजतो ॥
त्यास सदा मी रक्षीं ताता ! । जशी बालका जपते माता ॥
धरुं अहि अनल वत्स शिशु जाई । निवारते न कळत जशि आई ॥
प्रौढ होत त्या माय सुतावरि । प्रीति करी, पूर्वी सम ना परि ॥
प्रौढ तनय सम मजला ज्ञानी । वालक सुत सम दास अमानी ॥
मम बल भक्तां, स्वबल तयानां । काम कोप हे रिपु उभयानां ॥
हें जाणुनि पंडित मज भजती । ज्ञान लाभिहि न भक्ती त्यजती ॥

**दो०–काम कोप लोभादि मद प्रबल मोहदल भारि ॥**
**त्यांत सुदारुण-दुःखदा माया रूपी नारि ॥४३॥**

श्रुणु मुनि ! पुराण वेद व संत । म्हणति मोहवनिं नारि वसंत ॥
जप तप नेम जलाशय भारी । ग्रीष्म बनुनि शोषी त्यां नारी ॥
काम कोप मद मत्सर भेकां । स्त्री वर्षा हर्षा दे एका ॥
दुर्वासना कुमुद–निकुरंबक । त्या स्त्री शरद सदा सुखदायक ॥

धर्म सकल सरसिज–वृंदा ही । अधम सौख्यदा स्त्री हिम दाही ।।
ममता यवासगण पालवतो । नारि शिशिरऋतु जैं वावरतो ।।
अघ-उलूक संघा सुखकारी । नारि निविड रजनी अंधारी ।।
मति बल शील सत्य सत्र मीन । नारी गळ वर्णिती प्रवीण ।।

**दो०–अवगुण मूलहि शूलदा प्रमदा सुदुःख–खाण ।।**
**हें जाणुनि मी निवारण केलें मुनि ! मनिं जाण ।।४४।।**

परिसुनि रघुपति वचन सुशोभन । मुनि तनु पुलकित सजल विलोचन
वदा कुणा प्रभुची अशि रीती । दासांवर ममता नी प्रीती ।।
प्रभु न असा, भ्रम त्यजुनि भजति जे । ज्ञानरंक जडमति अभागि ते ।।
मग म्हणती सादर मुनि नारद । पहा राम ! विज्ञान विशारद ।।
हे रघुवीरा संत–लक्षणां । वदा नाथ ! भव-भीति-भंजना ।।
श्रुणु मुनि संत–गुणांनां वदतो । ज्यांस्तव मी त्यांना वश असतो ।।
षड्विकार जित अनघ अकाम हि । अचल अकिंचन शुचि सुखधाम हि
अमित बोध अनीह मितभोगी । सत्यसार कवि कोविद योगी ।।
सावधान, मानद, मद नाहीं । धीर धर्मगति–निपुण पुरा ही ।।

**दो०–गुणागार संसार–दुख–रहित विगत संदेह ।।**
**मम पद-सरसिज विना प्रिय त्यां नहि गेह न देह ।।४५।।**

स्वगुण कानिं पडतां संकोचति । अन्य गुणां परिसत बहु हर्षति ।।
सम शीतल, ना त्यागिति नीती । सहज सरल सकलांसी प्रीती ।।
व्रत-जप तप दम संयम नेम हि । गुरु-गोविंद-विप्र-पदिं प्रेम हिं ।।

दया क्षमा मैत्री श्रद्धा अनि । मुदिता, मम पदिं निष्कपटा रति ।।
विरति विवेक विनय विज्ञानी । बोध यथार्तहि वेद-पुराणीं ।।
दंभ मान मद कधीं न करती । चुकुनि कुमार्गी पाय न धरती ।।
गाति सदा मम लीला ऐकति । निर्हेतुक सहजा परहित-रति ।।
श्रुणु मुनि साधूंचे गुण जितके । वदुं ना शकति गिरा श्रुति तितके ।।

छं०-वदुं शकति शेष न शारदा पदपद्म नारद धरितसे ।
किति दीनबंधु कृपाल मुखिं निज भक्तगुण वदले असे ।।
शिर नमुनि वारंवार चरणीं ब्रह्मपुरिं नारद गत ।
ते धन्य तुलसी दास आस विहाय हरिरंगीं रत ।।

दो०-रावणारि-यश पावन ऐकति जे गातात ।।
विण जप-योग-विराग, दृढ रामभक्ति लभतात ।।४६ रा।।

दो०-दीपशिखेसम युवति तनु होइ न मना पतंग ।।
काम-मदां त्यज, राम भज, संतत कर सत्संग ।।४६ म।।

मास पारायण, बाविसावा विश्राम.

इति श्रीमद्रामचरितमानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने
तृतीयः सोपानः
अरण्यकाण्डं समाप्तम्
जय जय रघुवीर समर्थ

# सीतावस्त्रप्रदान



राम राम हा राम ओरडत । अम्हां बघुनि दे टाकुनि निज पट। ।
मागति राम शीघ्र ते देती । पट उरिं धरुनि शोक अति करिती ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

# ॥ श्रीरामचरितमानस ॥

## ( मराठी )

## ॥ चतुर्थः सोपानः ॥

## ( किष्किन्धाकाण्ड )

❖ ❖ ❖

### अध्याय १ ला

### अनुवादक-कृत मंगलाचरण

स्रग्धरा-वैदेहीं मार्गमाणः प्रतितरुकुरग जानकीं मन्यमानो ।
गाढाश्लेषं च दत्त्वा वितरति सुगतिं दुर्लभां मुक्तिरूपाम् ॥
दत्ते शोकप्रलापैः स्वहितपथरतां कामरूपे विरक्ति ।
कामान्धानां चरित्रं जनिमृतिभयदं दर्शयन् पातु रामः ॥१॥

पृथ्वी-महाभयनिवारकं कलिमलौघ-संदाहकं ।
त्रिताप कुमुदातपं हरिपदाब्ज-संदर्शकम् ॥
भ्रमादितम-हारकं निजसुखप्रभा-भास्करं ।
स्मरारि-सुखदायकं मनुज रामनाम स्मर ॥२॥

## मूळ मंगलाचरण

शा० वि०–कुन्देन्दीवर-सुन्दरावतिबलौ विज्ञान धामावुभौ ।
शोभाढ्यौ वरधन्विनौ श्रुतिनुतौ गोविप्रवृंद-प्रियौ ।।
मायामानुषरूपिणौ रघुवरौ सद्धर्मवर्मौ हितौ ।
सीतान्वेषणतत्परौ पथिगतौ भक्तिप्रदौ तौ हि नः ।।३।।
ब्रह्माम्भोधि–समुद्भवं कलिमल प्रध्वंसनं चाव्ययं ।
श्रीमच्छंभु-मुखेन्दु-सुंदरवरे संशोभितं सर्वदा ।।
संसारामयभेषजं सुखकरं श्रीजानकीजीवनं ।
धन्यास्ते कृतिनः पिबन्ति सततं श्रीरामनामामृतम् ।।४।।
सो०–कळुनि मुक्तिजनि-भूहि ज्ञान-खाणि अघ-हानिकर ।।
वास उमा शम्भूहि ती काशी कशि सेव्य न ।। मं० १।।
जळत सकल सुर-वृंद विषम गरल जिहि पान कृत ।।
त्यां न भजसि मन मंद कुणि कृपालु शंकर सदृश ।। म०२।।

रघुराया मग पुढें चालले । ऋष्यमूक गिरि निकट पातले ।।
वास समंत्रि तिथें सुग्रीवा । बघतां येत अतुल-बल-सीवां ।।
म्हणे सुभीत ऐक हनुमाना ! । पुरुष युगल बल-रूप-निधानां ।।
बघ बा ! जाउनि बटुरूपें तूं ! । कळव खुणें, जाणुनि तद्धेतू ।।
प्रेषित वालि, मलिन मन ते, तर । त्यजिन शैल पळ काढिन सत्वर ।।
विप्ररूप कपि, जाइ घेउनी । पुसे असें मग मस्तक नमुनी ।।
कोण तुम्हीं तनु शाम गौर वर । फिरा वीर वनि भूपरूप-धर ।।

कठिण भूमि कोमल पद-गामी । कवण हेतु वनिं विचरां स्वामी ॥
मृदुल मनोहर सुंदर जरि वपु । सहतां दुःसह वनिं वातातपु ॥
तुम्हि कीं त्रय देवांतुनि कोणी । नर नारायण तुम्हि कीं दोनी ॥

**दो०–जग कारण तारण भव भंजन धरणीभार ॥**
**कीं तुम्हि अखिल-भुवनपति धरा मनुज अवतार ॥१॥**

कोसलेश दशरथ-सुत जन्मुनि । वनि आलों पितृवचना मानुनि ॥
बंधू, नाम राम नी लक्ष्मण । सवें नारि सुकुमारि सुशोभन ॥
इथें निशिचरें हृत वैदेही । विप्र ! फिरूं शोधित तीतें ही ॥
वदलों आम्हीं चरित्र अमचें । सांगा विप्र कथेसी तुमचे ॥
प्रभु ओळखि पडला धरि चरणां । तें सुख उमे वर्णु ये कवणा ॥
पुलकित तनु ये वचन न वदना । बघत रुचिर वेषाची रचना ॥
स्तुती करी मग सुधीर धरुनी । हर्ष हृदयिं निजनाथ जाणुनी ॥
स्वामी ! पुसिलें म्यां न्यायें मम । तुम्हिही पुसतां कसें नरासम ॥
फिरतो भूलत वश मायें तव । मी प्रभु ओळखले ना यास्तव ॥

**दो०–एक मीं मंद मोहवश कुटिल-हृदय अज्ञान ॥**
**त्यांत मला प्रभु भुलविती दीनबंधु भगवान ॥२॥**

नाथ दोष मम जरि बहु असती । प्रभु न सेवका चुकुन भुलवती ॥
नाथ जीव तव मायें मोहित । केवळ तुमच्या कृपेंचि मोचित ॥
त्यांत शपथ रघुवीर सांगतो । कांहि न साधन भजन जाणतो ॥
सेवक सुत पति-मातृ-भरोशीं । वसति निश्चित तयां प्रभु पोशी ॥

वदुनि असें व्याकुळ पदिं पडला । प्रगटि निज तनू प्रेमें भरला ॥
तैं रघुपति उठवुनि हृदिं धरिती । निज लोचनजल-सेंकिं निववितो ॥
श्रुणु कपि मानुं नको मनिं ऊणें । तूं प्रिय मजला लक्ष्मण दूणें ॥
समदर्शी मज म्हणति सकल ही । प्रिय मज अनन्य-गति सेवक ही ॥

**दो–तो अनन्य ज्याची अशी मति न ढळे हनुमंत ॥**
**मी सेवक, सचराचर रूपें प्रभु भगवंत ॥३॥**

बघुनि पवनसुत पति अनुकूल । हर्षित हृदिं हरले सब शूल ॥
नाथ ! शैलिं या कपिपति राहे । तो सुग्रीव दास तव आहे ॥
नाथ ! तयाशीं मैत्री कीजे । दीन गणुनि त्या अभय करीजे ॥
तो सीतेच्या शोधा करविल । चहुं दिशि मर्कट कोटि पाठविल ॥
यापरि सकल कथा समजाउनि । घे उभयां पाठीवर चढवुनि ॥
जैं सुग्रीव पाहि रामासी । अतिशय धन्य मानि जन्मासी ॥
नमुनि चरणिं शिर भेटे सादर । तया भेटले सानुज रघुवर ॥
कपि करि मनिं विचार या रीतीं । करितिल विधि मजशीं हे प्रीती ॥

**दो०–दोहिं कडिल हनुमंत तैं सकल कथा सांगून ॥**
**ठेउन पावक साक्षि दे दृढा प्रीति सांधून ॥४॥**

प्रीति जडलि अंतर अणु नुरलें । लक्ष्मण रामचरित सब वदले ॥
सांगे सुगल नयनिं बहु वारी । मिळे नाथ मिथिलेश कुमारी ॥
इथें समंत्री एके वारा । बसलो होतो करित विचारा ॥
गगन पंथि जातां मज दिसली । अतिशय विलपत परवश पडली ॥

राम राम हा राम ! ओरडत । आम्हां बघुनि दे टाकुनि निज पट ॥
मागति राम शीघ्र ते देती । पट उरिं धरुनि शोक अति करिती।
म्हणे सुगल ऐका रघुवीर । त्यजा शोक मनि धरा सुधीर ॥
करिन सुसेवा सर्व तऱ्हेनें । येउनि भेटे जानकि जेणें ॥

**दो०–श्रवुनि सखावच हर्षे कृपासिंधु बलशीव ॥**
**कारण कवण वसा वनि सांगा मज सुग्रीव ॥५॥**

नाथ वालि मी दोघे भाई । प्रीती होति न वदली जाई ॥
मयसुत नांव जया मायावी । आला तो प्रभु ! अमचे गावीं ॥
अर्धरात्रि पुर दारिं गर्जला । वाली रिपुबल साहुं न शकला ॥
धावे वालि, बघुनि तो पळला । बंधुसंग मग मीही धरला ॥
गिरिवर–गुहेमधें तो शिरला । तदा वालि मजला हें वदला ॥
एक पक्ष मम वाट पाहणें । आलों नातर मृतचि जाणणे ॥
तिथें मासभर वास खरारी ! । रुधिर-धार तैं वाहे भारी ॥
वाली हत मज वधील येउनि । पळ काढिला शिळा मी लाउनि ॥
स्वामिरहित पुर मंत्री पाहति । मला राज्य जबरीनें अर्पति ॥
त्या मारुनि घरिं वालि परतला । वैर धरी मनि बघतां मजला ॥
रिपुसम मज मारी अति भारी । हरुनि घेइ सर्वस्वहि नारी ॥
त्याचें भय रघुवीर कृपाला । भ्रमवि विकल मज भुवनीं सकला
इथें शापवश येउं शके ना । तदपि भीति मन मम विसरेना ॥
सेवक–दुःखे दीनदयाला । स्फुरुं लागति युग भुजा विशाला ॥

**दो०–श्रुणु सुग्रीवा वालिला एकचि शरें वधीन ॥**

**ब्रह्मरुद्रपदिं शरण जरि प्राण देहिं राही न ॥६॥**

मित्र दुःख ज्यां न दुःखकारि। तयां विलोकत पातक भारी ॥
दुःखगिरी निज रज सम जाणत। मित्र दुःख रज सुमेरु वाटत ॥
ज्यांस अशी मति सहज न असते। मैत्री करती कशास शठ ते ॥
कुपथ निवारुनि सुपथिं चालवी। प्रगटुनि गुण अवगुणांस लपवी ॥
देत घेत मनिं शंका न धरी। बल-अनुमानें सदा हित करी ॥
विपदीं स्नेहा शतपट करती। संत मित्रगुण हे श्रुति वदती ॥
पुढें वदति मृदु दाविति ममता। मागें अहित हि मनीं कुटिलता ॥
सर्पगतीसम चित्त जयांचें। अशां कुमित्रां त्यजत हिताचें ॥
सेवक शठ, नृप कृपण, कुनारी। कपटी मित्र शूलसम चारी ॥
सखे ! सोड शुच मदिय बळावर। साधिन कार्य तुझीं सत्र सत्वर ॥
म्हणे सुगल ऐका रघुवीर। वालि महाबल अति रणधीर ॥
दुंदुभि-अस्थी ताल दाखवित। अनायास रघुनाथें उडवित ॥
बघुनि अमित बल वाढे प्रीती। वधितिल वालिस अशी प्रतीती ॥
वारंवार नमी पदिं शीसा। प्रभु जाणुनि मनिं हर्ष कपीशा ॥
उपजे ज्ञान वचन मग बोले। नाथ कृपें मम मन चि अलोलें ॥
महती सुख परिवार संपदा। सोडुन सब सेवीन प्रभुपदां ॥
हीं सब रामभक्तिला बाधक। वदति संत तव पद आराधक ॥
शत्रु मित्र सुख दुःखें जगतीं। मायाकृत, परमार्थें नसती ॥

वालि परमहित जहा प्रसादां । भेट राम तव शमन विषादा ।।
स्वप्नीं होई युद्ध जयासी । जागृति जाणत लाज मनासी ।।
अतां कृपा प्रभु अशी करावी । निशिदिन भजनिं, तजुनि सब, जावीं
परिसुनि विरतियुता कपि-वाणी । विहसुनि राम वदति धनुपाणी ।।
जें वदलात सत्य सब आहे । नव्हे वचन मम मित्र ! मृषा हें ।।
नट मर्कट इव जगा नाचविति । राम, खगेश ! वेद हें वर्णिति ।।
सुग्रीवा रघुनाथ घेउनी । निघति चाप सायक करिं धरुनी ।।
रघुपति देति सुकंठा धाडुनि । निकट जाइ गर्जे बल पाउनि ।।
ऐकत धावे क्रोधें वाली । स्त्री कर धरि पद समजुत घाली ।।
श्रुणु पति भेटति जे सुग्रीवा । ते दो बंधु तेज-बल-शीवा ।।
कोसलेश सुत राम नि लक्ष्मण । जिंकुं शकति काळा रणिं तत्क्षण ।।

**दो०-प्रिये भीरु ! तो म्हणे श्रुणु समदर्शी रघुनाथ ।**
**मला कदाचित वधिति जरि तरि होईन सनाथ ।।७।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २ रा

चले वदुनि हें अति अभिमानी । तृण समान सुग्रीवा मानी ।।
भिडले उभय वालि अति तर्जे । मारुनि मुष्टि महाध्वनि गर्जे ।।
तैं सुग्रीव विकल अति पळला । मुष्टि-मार वज्रासम गमला ।।
कथित किं मी रघुवीर कृपाल हि । बंधु न हा साक्षात् मम काळ हि ।।

एकरूप तुम्हि भाउ भासलां । भ्रम पडुनी मी त्या न मारिला ॥
सुगल देहिं लाविता कराला । पीडा जाउनि कुलिश जहाला ॥
गळां घालुनी प्रसून-माला । धाडिति देउनि बला विशाला ॥
मग बहुपरि ते लढूं लागती । विटपांश्रयिं रघुराज पाहती ॥

**दो०—बहु छल बल सुग्रीव करि कचला मनीं भिऊन ॥**
**मारिति वालिस राम तैं हृदयीं शर ताणून ॥८॥**

पडे विकल महिं सायक लागुनि । उठुनि बसे प्रभु समोर पाहुनि ॥
श्याम गात्र शिरिं जटा बांधिले । अरुण नयन शर चाप सज्जिले ॥
घडि घडि बघुनि चित्त पदिं लाउनि । सुफल जन्म गणि प्रभुस ओळखुनि
प्रीति हृदयिं मुखि कठोर वचनें । निरखुनि रामाकडे मग म्हणे ॥
स्वामी धर्मास्तव अवतरलां । व्याधासम मारलात मजला ॥
मी वैरी, प्रिय सुकंठ गमला । दोष कोण नाथ ! किं मज वधला।
अनुजवधू भगिनी सुतनारी । श्रुणु शठ कन्या सम या चारी ॥
यांस कुदृष्टीनें जो पाही । वधतां त्यास जरा अघ नाहीं ॥
मूढ धरिशि तूं अति अभिमाना । नारीमंत्र न घेशी कानां ॥
मम भुजबल आश्रित तो कळुनी । मारूं बघसि अधम अभिमानी ॥

**दो०—राम पहा ! स्वामीपुढें युक्ति न चले मदीय ॥**
**प्रभु ! अझुनि हि मी पापी अंतीं गती त्वदीय ॥९॥**

श्रवत राम अति कोमलवाणी । वालि-शिरीं स्पर्शति निजपाणी ॥
अचल करूं तनु राखा प्राणां । वालि म्हणे श्रुणु कृपानिधाना ॥

जन्म जन्म मुनि झिजति साधनीं। अंतीं राम न येइ आननीं ॥
नाम बळें ज्या शंकर काशीं। दे सकलां सम गति अविनाशी ॥
मम लोचन-गोचर आला तो। योग पुन्हां प्रभु ! असा कि येतो ॥
छं०-तो नयन गोचर यद्गुणां श्रुति नेति नित्यहि वानती।
मन-पवन-जय, गो निरस करुनी ध्यान, मुनि कधि पावती।
प्रभु बघुनि मज अभिमान वश अति, वदति तनु राखी तरी
तो कवण शठ हटि छाटि सुरतरु बाभळिस कुंपण करी ॥१
छं०-आतां कृपेनें मज पहा, द्या नाथ जो वर मागतो।
ज्या योनि कर्मं जन्म तेथे राम पद-अनुराग तो ॥
प्रभु ! तनय मम सम विनय बल कल्याणदा ! हा स्वीकरा।
करिं धरुनि सुरनरनाथ ! अपला दास अंगद हा करा ॥२॥
दो०-रामपदीं प्रीतिनें दृढ वाली त्यजि देहास ॥
सुमन-माळ जशि कंठिची कळत न गळत गजास ॥१०॥
वालिस राम धामिं निज धाडति। सकल नगरजन विव्हळ धावति ॥
तारा विविधा करी विलपना। सुटले कुंतल तनू-भान ना ॥
तारा विकल दिसत रघुराया। दिधले ज्ञान निरसली माया ॥
क्षितिजल पावक गगन समीर। पंच-रचित अति अधम शरीर ॥
प्रगट पुढें तनु ती निद्रित तव। जीव नित्य रडसी कोणास्तव ॥
उपजे ज्ञान चरणिं मग नमुनी। परम भक्ति वर घेइ मागुनी ॥
दारुनारि सम सबजीवांप्रति। उमे ! राम गोस्वामि नाचवति ॥

तैं सुग्रीवा आज्ञा दिधली । क्रिया मृताची सविधि साधली ॥
राम कथिति अनुजा समजाउनि । सुग्रीवास राज्य द्या जाउनि ॥
रघुपति चरणीं मस्तक नमलें । रघुनाथाज्ञें सकल चालले ॥

**दो०-लक्ष्मण बोलावी त्वरें पुरजन विप्रसमाज ॥**

**राज्य सुग्रिवा अर्पिलें अंगद कृत युवराज ॥११॥**

उमे रामसम-हित जगतांतहि । गुरु पितृ माय न बंधू प्रभु नहि ॥
सुर नर मुनि सर्वांची रीती । स्वार्थास्तव सब करिती प्रीती ॥
वालिभयें व्याकुळ दिनराती । तनु सव्रण चिंताज्वर छातीं ॥
तो सुकंठ केला कपिराव । अति कृपालु रघुविर-स्वभाव ॥
कळुनिहि अशा प्रभुस परिहरती । विपज्जालि नर कां ना पडती ॥
मग सुगला बोलावुनि अणविति । नानाविध नृपनीती शिकविति ॥
प्रभु वदले श्रुणु सुगल हरीश्वर । पुरि न जाउं दश चारहि वत्सर ॥
ग्रीष्म विगत वर्षाऋतु आला । निकट निवास करिन शैलाला ॥
अंगद सहित राज्य तुम्हि करणें । संतत मनि मम कार्या स्मरणें ॥
भवनीं जैं सुग्रीव परतले । गिरीं प्रवर्षण राम हि वसले ॥

**दो०-देव ठेवती गिरिगुहा पूर्विच रुचिर करून ॥**

**राम कृपानिधि काहि दिन वसतिल हें जाणून ॥१२॥**

## अध्याय ३ रा

सुंदर वन कुसुमित अति शोभे । गुंजति मधुप–निकर मधुलोभें ॥
कंद मूल फल पत्र सुशोभित । झालीं विपुल यदा प्रभु आगत ॥
शैल मनोहर अनुपम बघती । अनुजासह सुरभूप राहती ॥
मधुकर-खग-मृग-तनु सुर धरती– । सिद्ध मुनी प्रभुसेवा करती ॥
मंगलरूप बने वन तैं तें । करिति निवास रमापति जैं तें ॥
स्फटिक-शिले अति शुभ्र सुशोभन । सुखासीन बंधू दोघेजण ॥
अनुजा सांगत कथा अनेका । भक्ति विरति नृपनीति विवेका ॥
वर्षाकाल–मेघिं नभ भरले । गर्जनि वाटति फार चांगले ॥

**दो०–पहा लक्ष्मणा मोरगण नाचति जलद बघून ।**
**जसा विरति रत मुदित गृहिं हरिभक्ता पाहून ॥१३॥**

घन घुड् घुड् गर्जति नभिं घोर । प्रियाहीन मम मनिं भय थोर ॥
दामिनि चमक न घनांत राही । प्रीति खलाची स्थिर जशि नाहीं ॥
वर्षति वारिद भूवरि लोंवुनि । जसे नमति बुध विद्या पावुनि ॥
बिंदुघात गिरि सोसति तैसे । संत सहति खल वचनें जैसे ॥
क्षुद्र नद्या भरुनी फोफावति । अल्पधनें हि जसे खल माजति ॥
भूवर पडतां पाणि गढुळलें । जणुं मायेनें जीव वेष्टले ॥
जल सांचुनि सर हळुहळु भरती । जसे सुगुण सज्जनांत जमती ॥
सरिता जल जलनिधिमधिं जावुनि । होइ अचल जिव इव हरि पावुनि ॥

**दो०–हरित भूमि तृण-संकुला नुमजति कुठेंहि पंथ ॥**
**पाखंडी वादें जसे गुप्त होति सद्ग्रंथ ॥१४॥**

दर्दुर–रव चहुंदिशीं रम्य तो । बटु समुदाय वेद जणुं पढतो ।
नव–पल्लव–युत विटप अनेक । साधक मन जसं मिळत विवेक ।
अर्क यवासा अपत्र बनले । जसे सुराज्यि खलोद्यम सरले ।
धूळ मिळेना कुठेंहि सोधित । क्रोध जसा धर्माला पळवित ।।
खुले सस्य–संपन्न मही कशि । उपकाऱ्याची संपत्ती जशि ॥
निशि तमि घन खद्योत विराजति । जणुं दांभिक गण बहु संमीलति ॥
फुटुनि बांध अतिवृष्टि वाहती । स्त्रिया स्वतंत्रा जशा विघडती ॥
चतुर शेतकरि कृषी खुरपती । मान मदादि जसे बुध तजती ॥
चक्रवाक, खग दृष्टि न पडती । धर्म जसे कलि येतां पळती ॥
ऊषरि वर्षत उगवे तृण ना । जशि हरिजन हृदि काम निपज ना ॥
विविध जंतु संकुल भू भ्राजे । प्रजे भरति जशि मिळत सुराजे ॥
स्थगित पथिक ठिकठिकाणि नाना । जशि इंद्रियें निपज जैं ज्ञाना ॥

**दो०–कधीं प्रभंजन विलंधि ने जियें तियें मेघांस ॥**
**जशा कुपुत्र उपजतां कुल-सद्धर्म-विनाश ॥१५ रा ॥**
**कधि दिवसा तम निबिड कधि प्रगट पळांत पतंग ॥**
**ज्ञान जाइ उपजे जसें मिळत कुसंग सुसंग॥१५ म॥**

वर्षा विगत, शरद ऋतु आला । पहा लक्ष्मणा परम शोभला ॥
फुलुनि काश महि अखिला झाकवि । जणुं निज वार्धक वर्षा दाखवि ॥

उदित अगस्ति पंथ जल शोषे। जसा लोभ शोषे संतोषें ॥
सरितासरि जल विमल शोभतें। जसें संत मन अ–मदमोह तें ॥
हळु हळु सुके सरितसर–पाणी। जेवीं ममता त्यजती ज्ञानी ॥
शरद जाणुनी आले खंजन। फळति सुकृत जशि सुसमयि शोभन ॥
पंक न रेणु रुचिर अशि धरणी। जशि नय निपुण नृपाची करणी ॥
होति विकल जल आटत मीन। अवुध कुटुंबि जसा धनहीन ॥
विमल निरभ्र रुचिर आकाश। हरिजन इव सांडुनि सव आस ॥
वृष्टि शारदी तुरळक थोडी। जशि मम भक्ति एक कुणि जोडी॥

**दो०–निघात मुदित पुर तजुनि नृप तापस वणिज भिकारी ॥**
**त्यजिति जसे श्रम. मिळत हरि-भक्ति आश्रमी चारि ॥१६॥**

सुखी मीन जे अगाध नीरां। जशि हरिशरणा बाधा न जरा ॥
कमल फुलुनि सर कसें खुलतसें। ब्रह्म अगुण जें सगुण होतसे ॥
गुंजति मधुकर मुखर अनूपम। सुंदर खग रव विविध मनोरम ॥
दु:खि कोक मनिं निशा निरखुनी। खल इव पर–संपत्ती बघुनी ॥
चातक रटत तृषा अति आहे। जसा शिवद्रोहिं न सुख लाहे ॥
निशिशशि शरदातपा निवारी। जसें संत-दर्शन अघ वारी ॥
विधुस चकोर–कदंवक पाहुनि। निरखिति हरिजन इव हरि पावुनि॥
मशकां दंशां हिमत्रास हरि। द्विजद्रोह कुळनाश जसा करि ॥

**दो०–जीव जाल महिं राहि ते शरदागमनें जाय ॥**
**जाति मिळत सद्गुरु जसे भ्रम-संशय-समुदाय ॥१७॥**

वर्षा गत निर्मल ऋतु आला । सीता-शोध न तात ! लागला ॥
शोध एकदां कसाहि जाणिन । काळच जिंकुनि निमिषीं आणिन ॥
असो कुठें, जर जिवंत जाणिन । यत्नां करुनि तात तिज आणिन ॥
सुग्रीवहि मम न करी स्मरणा । पावे राज्य कोष पुर ललना ॥
मी वाली वधिला ज्या बाणें । मारूं मूढहि उद्यां तयानें ॥
नाश यत्कृपें मद-मोहांसी । उमे ! स्वप्नि कीं क्रोध तयांसी ॥
या चरिता ज्ञानी मुनि जाणति । जे रघुवीर चरणिं रति मानिति ॥
प्रभु सक्रोध जाणती लक्ष्मण । चढवुनि चाप करी धृत मार्गण ॥

**दो०-समजाविति अनुजा तैं रघुपति करुणाशीव ॥**
**भय दावुनि या घेउनी तात सखा सुग्रीव ॥१८॥**

इथें पवनसुत चित्ति चिंतिती । रामकार्य सुग्रीव टाळिती ॥
जाउनि निकट चरणिं शिर लाविति । चारि तऱ्हानीं त्या समजाविति ॥
श्रवुनि सुकंठ परमभय मानी । ज्ञाना मम हरलें विषयानीं ॥
अतां मरुतसुत ! दूतवरूथ । धाडा जिथं जिथं वानरयूथ ॥
सांगा पक्षामधि न परतती । ते मम हस्तें वधिले जाती ॥
हनुमान् बोलावुनि दूतांनां । देति बहुत सकलां सन्माना ॥
प्रीति नीति भीतिस दाखवती । चरणिं नमुनि शिर सगळे निघती ॥
या अवसरि लक्ष्मण पुरि शिरले । क्रोध बघुनि कपि चहुदिशि पळले ॥

**दो०-तैं चढवुनि धनु म्हणति पुर जाळुनि करतो क्षार ॥**
**तैं व्याकुळ पाहुनि नगर आला वालिकुमार ॥१९॥**

करी विनंती पदिं शिर नमुनी । लक्ष्मण दे अभया भुज उचलुनि ॥
'लक्ष्मण सकोप' कानीं पडलें । अति भय-विव्हळ कपीश वदले ॥
श्रुणु हनुमंत सवें ने तारा । विनवोनी समजावि कुमारा ॥
हनुमान् तारे समेत जाती । नमुनि पदीं प्रभु-सुयशा गाती ॥
विनवुनि मग मंदिरास आणुनि । मंचीं बसवि पदां प्रक्षाळुनि ॥
कपिपतिनें शिर चरणिं ठेवलें । त्या लक्ष्मण भुजिं धरुनि भेटले ॥
नाथ ! विषयसम मद ना काहीं । मुनिमन मोहित करी क्षणां ही ॥
श्रवुनि विनीत वचन सुख पावती । त्या लक्ष्मण विविधा समजावति ॥
पवन तनय सब कथा निवेदित । जसे दूत समुदायां प्रेषित ॥

**दो०-हर्षुनि सुग्रिव चालले अंगदादि कपि साथ ॥**
**पुढे करुनि रामानुजा येति जिथें रघुनाथ ॥२०॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ४ था

पदिं शिर नमुनि वदे, कर जोडी । नाथ ! नसे मम काहिहि खोडी ॥
देवा प्रबला अति तव माया । सुटे, करा तुम्हि राम जर दया ॥
सुर नर मुनि वश विषयां स्वामी । मी पामर पशु कपि अति कामी ॥
नारि-नयन-शर जया न लागे । क्रोध घोर तम निशि जो जागे ॥
लोभ-पाश ज्या गळां बद्ध ना । तो नर रघुराया ! सम अपणां ॥
हा गुण साधना करुनि न लाभत । तुमचे कृपें कुणी कुणि पावत ॥

तेव्हां हसुनी वदले रघुपति । प्रिय तुम्हि बंधु भरत सम मज अति ॥
अतां यत्न मन लाउन करणें । जेणें सीता शोध पावणें ॥

**दो०-अशी चर्चा चालतां आले वानर-यूथ ॥**
**विविध वर्ण दाही दिशां दिसती कीश-वरूथ ॥२१॥**

दृष्ट उभे म्यां कीश कटक तें । मूर्खचि ते 'करुं गणना' म्हणते॥
येति रामपदिं मस्तक नमती । वघुनि वदन सब सनाथ बनती ॥
एक असा कपि चमूंत नाहीं । रामें कुशल न पुसलें ज्यां ही ।
प्रभुस यांत ना लव नवलाव हि । व्यापक विश्वरूप रघुराव हि ॥
ठायिच थांवति आज्ञा पावुनि । त्यां सुग्रिव सांगत समजावुनि ॥
रामकार्य उपकारहि मजवर । चहूंकडे जा वरूथ वानर ॥
जाउनि जनकसुते शोधावें । बंधू ! मास दिवसिं परतावें ॥
येति गतावधि शुद्धि विना जे । भाग पडे वधविणें मला ते ॥

**दो०-श्रवत वचन जेथें तिथें करिती कपी प्रयाण ॥**
**तैं सुग्रिव बोलावी अंगद नल हनुमान ॥२२॥**

ऐंका नीलांगद हनुमान हि । जांववंत मतिधीर सुजाणहि ॥
मिळुनि सुभट सब दक्षिणि जावें । सर्वां सीतावृत्त पुसावें ॥
मन तन वचनिं यत्न योजावे । रामचंद्र कार्या साधावें ॥
पाठि पोटिं रवि वन्हि सेवणें । स्वामिस छलविण जिवभावानें ॥
माया त्यजुनि सेव्य परलोकहि । मिटति सकल भवसंभव शोकहि ॥
वंधू ! फळ हें देहा धरुनी । राम भजावा कामा त्यजुनी ॥

तोचि गुणज्ञहि तो बहुभागी । जो रघुवीर चरणिं अनुरागी ।।
आज्ञा घेति पायिं शिर नमती । निघती हर्षें स्मरत रघुपती ।।
पवनतनय शिर नमवि शेवटीं । जाणुनि कार्यी प्रभु घे निकटीं ।।
पाणि सरोरुह मस्तकिं लावुनि । कर मुद्रिका दिली जन जाणुनि ।।
विविधा सीता–सांत्वन करणें । वदुनि विरह बल वेगें वळणें ।।
वाटत जन्म सुफल हनुमाना । निघति धरुनि हृदिं कृपानिधाना।।
प्रभु जरि जाणति सर्वहि वार्ते । राजनीति राखिति सुरपाते ।।

**दो०–जाति सकल वन धुंडित सर, सरि गिरी गुहेस ।।**
**रामकार्यि मन लीन ते विसरति तनु-ममतेस ।।२३।।**

कोठें कुणि जैं निशिचर भेटे । प्राण घेति एकैक चपेटें ।।
नानापरि गिरि कानन हेरिति । कुणि मुनि दिसतां त्या सब घेरिति।।
लागुनि तृषा अती व्याकुळले । जळ न मिळे घन गहनीं भुलले ।।
मनिं हनुमानें कृत अनुमाना । मरूं बघति सब विण जलपाना ।।
चौदिशिं निरखि चढुनि गिरिशिखरीं । कौतुक एक लक्षि भू–विवरीं ।।
चक्रवाक बक मल्लक उडती । खग बहुतेकहि मधें प्रविशती ।।
येइ पवनसुत पर्वत उतरुनि । ने सकलां दे विवर दाखवुनि ।।
हनुमंताला पुढें ठेउनी । शिरले विवरिं विलंब न करुनी ।।

**दो०–दिसे जात उपवन वर सर विकसित बहुकंज ।।**
**तिथें एक मंदिरिं रुचिर स्थिता नारि तपपुंज ।।२४।।**

त्यानीं दुरुनी प्रणाम कृत तिज । पुसत वृत्तांतही कथित निज ।।

तंव ती म्हणे करा जलपाना । सुंदर सुरस फळें खा नाना ।।
करुनी स्नान मधुर फळ खाती । निकट तिचे चालत सव जाती ।।
निज कथेसि सांगुन ती वदते । अतां निकट रघुपति मी जातें ।।
मिटा नयन जा त्यजुनी विवरा । सीता मिळेल चिंता न करा ।।
मिटुनि नयन जैं उघडति वीरहि । सागर-तीरिं उभें ते सर्वहि ।।
मग ती रघुनाथाप्रति जाई । जाउनि नमि शिर सरसिज-पायीं ।
नाना रीतीं करी स्तवन ती । प्रभु देती अनपायिनि भक्ती ।।

**दो०-बदरीवनि ती गत, शिरीं धरुनी प्रभुआज्ञेस ।।**
**धरुनि हृदयिं रामांघ्रियुग वंदिति ज्यांस अजेश ।।२५।।**

इथें चिंतिती कपी मनां ही । मुदत संपली कार्य न काहीं ।।
विचारिती सव मिळुनि परस्परिं । काय करावें विना शोध तरि ।।
सजल नयन मग अंगद वदला । उभय रीतिनें मृत्यु अम्हांला ।।
लागे सीता शोध न येथें । कपिपति मारिल जातां तेथें ।।
तात-वधोत्तर मजहि मारिता । रक्षिति राम, न तदुपकारिता ।।
अंगद घडि घडि सांगे सकलां । आलें मरण, न संशय उरला ।।
अंगद वच ऐकुनि कपि-वीरां । वदवे ना, ढाळिति वहु नीरा ।।
शोक-मग्न पळभर होत ते । होति सकल हें मग बोलते ।।
सीता शोध घेतल्यावीण । युवराजा जाउं ना प्रवीण ! ।।
वदुनि लवण सागर-तटिं वळले । दर्भ पसरुनी कपि सव बसले ।।
अंगद दुःख बघुनि ऋक्षेश । वदे कथा उपदेश विशेष ।।

तात ! न रामाला नर माना । ब्रह्म अजित अज निर्गुण जाणा ।।
अम्हि सब सेवक अति बहुभागी । ब्रह्मि सगुण संतत अनुरागी ।।

**दो०–प्रभु अवतरती स्वेच्छया सुर-गो-द्विज-महिसाठिं ।।**
**सगुणापोसक राहती त्यजुनि मोक्ष सब पाठिं ।।२६।।**

यापरिं विविध कथा वदताती । गिरि कंदरिं ऐके संपाती ।।
ये बाहेर बघे बहु कीशें । मज आहार दिला जगदीशें ।।
आज समस्तां भक्षण करतों । दिन बहु गत भक्ष्याविण मरतों ।।
प्राप्त पोटभर कधि न अहार । आज देइ विधि एकच वार ।।
श्रवणिं गृध्रवच पडत सभय तें । अतां सत्य आम्हीं मृत गमतें ।।
कपि सब उठले गृध्रा बघतां । जांबवता मनिं विशेष चिंता ।।
करुनि विचारा अंगद वदला । धन्य जटायू सम न जाहला ।।
देह राम-कार्यार्थी त्यागी । हरिपुरिं जाइ परम बहुभागी ।।
परिसुनि हर्ष–शोक–युत भाषण । आला सन्निध सभय कीशगण ।।
अभय करुनि त्यां जाउनि पुसले । सकल कथा ते नयास वदले ।।
श्रवुनि बंधुकरणी संपाती । वर्णी विविधा रघुपति–महती ।।

**दो० मज घेउनि जा सिंधुतटिं देउं तिलांजलि त्यास ।।**
**करिन वचन साह्या, मिळे करां जिच्या शोधास ।।२७।।**

अनुजक्रिया कृतार्णवतीरा । स्वकथा कथित म्हणं कपिवीरां ।।
आम्हि बंधु दो ऐन यौवनीं । उडत निकट रवि गेलों गगनीं ।।

तेज न साहुं शके तो वळला । मी अभिमानी भानु गाठला ।।
दग्ध पंख अति तेज अपार । महि पडलो चीत्कारत घोर ।।
ज्यांस नाम चंद्रमा एक मुनि । त्यांस दया ये मजला पाहुनि ।।
मज उपदेशुनि बहुधा ज्ञाना । हृत मम देहजनित अभिमाना ।।
त्रेतीं ब्रह्म मनुज तनु धरिलहि । निशिचरपति तन्नारिस हरिलहि ।।
तच्छोधा प्रभु दूत धाडतिल । भेटत तूं त्या पुनीत होशिल ।।
फुटतिल पंख नको करुं चिंता । त्यांस दाखवुनि दे तूं सीता ।।
खरी ठरे मुनिवाणी आजहि । ऐकुन वचन करा प्रभुकाजहि ।।
लंका त्रिकूट गिरिवर आहे । रावण सहज अशंकित राहे ।।
तेथें अशोक-उपवनि राहे- । सीता बसुनि शोकरत आहे ।।

**दो०—मी बघतों तुम्हि नाहीं दृष्टि अमित गृध्रांस ।।**
**वृद्ध असें, करतो न तर कांहीं साह्य तुम्हांस ।।२८।।**

जो लंघिल शत—योजन सागर । तो करि रामकार्य मति—आगर ।।
मजला बघुनि धरा मनि धीरहि । रामकृपें कसं होइ शरीरहि ।।
पापिहि ज्याच्या नामा स्मरती । अति अपार भवसागर तरती ।।
तुम्हि तद्दूत तजुनि कातर्या । राम धरुनि हृदि करा उपाया ।।
गरुड ! गृध्र हें वदुनि उडे जैं । कपिगण सब विस्मयीं बुडे तैं ।।
निज निज बल सब सांगूं लागति । पार जावया संशय सांगति ।।
झालों जरठ म्हणे ऋक्षेश । देहिं न अतां प्रथम-बल-लेश ।।
यदा त्रिविक्रम होति खरारी । तदा तरुण मी बलवान् भारी ।।

**दो–प्रभु बलिबंधनिं वाढले ती तनु वर्णिल कोण ।**
**प्रदक्षिणा कृत सात मीं धावत घटिमधिं दोन ॥२९।**

जाइन लंघुनि अंगद सांगे । परि फिरतां संशय मनिं लागे ॥
म्हणे जांववान् तुम्हि सब लायक । पाठवुं केवीं सर्वां नायक ।।
म्हणे ऋक्षपति शृणु हनुमाना । बससि मूक कां तूं बलवाना ॥
पवनतनय वल पवन समान हि । मति-विवेक-विज्ञान–निधान हि ॥
कठिण कोण जगिं कार्य असें कीं । तात ! तुला जें ना करवे कीं ॥
तुझा रामकार्यां अवतार । ऐकत होइ पर्वताकार ॥
कनकवर्ण तनु, तेज विराजे । कीं जणुं अपर गिरींचे राजे ॥
सिंहनाद करि वारंवारां । लंघिन जलनिधि सलील खारा ॥
सहित सहायहि रावण मारिन । उपटुनि येथें त्रिकूट आणिन ॥
जांववंत मी पुसतो तुजसी । करा योग्य उपदेशा मजसी ॥
जाउनि इतकें तात करावें । सीते बघुनि वृत्त आणावें ॥
स्वभुज वळे मग राजिवलोचन । सर्वे कपिचमू कौतुक-कारण ॥

**छं०–कपि–कटक संगें वधुनि निशिचर राम सीते आणिती**
**त्रैलोक–पावन सुयश सुर मुनि नारदादिक वानिती ॥**
**जें श्रवत गातहि वदत समजत परम पद नर लभतसे ।**
**रघुवीर-पद–पाथोज मधुकर दास तुलसी गातसे ॥१॥**
**दो०–भव भेषज रघुनाथ यश जे ऐकति नर नारि ॥**
**त्यांचें सर्व मनोरथां सिद्ध करी त्रिपुरारि ॥३० रा ।**

सो०-नीलोत्पल तनु शाम काम-कोटि शोभा अधिक ॥
ऐका तद्‌गुण-ग्राम यस्य नाम अघ खग वधिक ॥३०म॥

मास पारायण, तेविसावा विश्राम.

❖ ❖ ❖

इति श्रीमद्रामचरित-मानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने
चतुर्थ सोपानः

किष्किंधा काण्डं समाप्तम्

श्री रामचंद्रार्पितमस्तु
जय जय रघुवीर समर्थ

॥ श्रीरामाय नमः ॥

# श्रीरामचरितमानस

## ( मराठी )

## सुन्दरकाण्ड



# बिभीषण-सखा-उपायकथन



कथित सखे चांगल्या उपाया । करूं होइ जरि दैव सहाया ॥

।। श्रीगणेशायनमः ।।

।। श्रीसरस्वत्यै नमः ।।

।। श्रीगुरुभ्यो नमः ।।

।। श्रीजानकीवल्लभाय नमः।।

।। श्री अंजनीनंदनाय नमः ।।

# ।। श्रीरामचरितमानस ।।

## ( मराठी )

## ।। पञ्चमः सोपानः ।।

## ( सुन्दरकाण्ड )

❖ ❖ ❖

### अध्याय १ ला

### अनुवादक-कृत मंगलाचरण

स्रग्धरा :–उत्तीर्णं यस्य नैव प्रभवति भवितुं रामचंद्रः स्वयं तं-।
भक्तानामग्रगण्यं खलगणगहन-ध्वंसकं वायुसूनुम् ।।
संसाराम्भोधिपारे गमनकृतमतिः प्राप्नुयाद्यत्सहायं ।
वन्देऽहं वानराणां मरणभयहरं आञ्जनेयं कपीशम् ।।१।।

आर्या:—यदनुग्रह—भानुकैरर्दृश्यं सर्वं त्वदृश्यतां नीतम् ॥
तं ब्रह्मविद्वरिष्ठं केवलचिन्मूर्तिरूपगुरुमीडे ॥२॥

## मूळ मंगलाचरण

शा० वि०—शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं निर्वाण-शान्तिप्रदं ।
ब्रह्माशंभुफणींद्रसेव्यमनिशं वेदान्तवेद्यं विभुम् ॥
रामाख्यं जगदीश्वरं सुरगुरुं मायामनुष्यं हरिं ।
वन्देऽहं करुणाकरं रघुवरं भूपालचूडामणिम् ॥३॥

व० ति०—नान्या स्पृहा रघुपते हृदयेऽस्मदीये ।
सत्यं वदामि च भवानखिलान्तरात्मा ॥
भक्तिं प्रयच्छ रघुपुंगव निर्भरां मे ।
कामादि-दोष-रहितं कुरु मानसं च ॥४॥

मालिनी०—अतुलितबलधामं स्वर्णशैलाभदेहं ।
दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यं
सकलगुणनिधानं वानराणामधीशं ।
रघुपति-प्रियभक्तं वातजातं नमामि ॥५॥

जांबवंत—वच रुचिर परिसतां । रुचलें अति चित्तीं हनुमंता ॥
तोंवर बंधू ! वाट मम पहा । कंद मूल फल खात दुख सहा ॥
जों येइन पाहुन सीतेसी । होइ काज, मज हर्ष विशेषीं ॥
असं सांगुनि सर्वां नमि माथा । हर्षित निघे ध्यात रघुनाथा ॥

एक सिंधुतटिं भूधर सुंदर । उडुनी चढे सलील तयावर ॥
कितिदां तरि रघुवीरा स्मरला । पवनतनयबल भारि उसळला ॥
हनुमान् दे ज्या शैलि पदांला । तो तत्क्षण गेला पाताळा ॥
जैसा अमोघ रघुपति-वाण । त्याच तऱ्हें गेला हनुमान ॥
जलनिधि रघुपति-दूत-विचारीं । मैनाका तूं हो श्रमहारी ॥

**दो०- हनुमान कर लावी त्याला करी प्रणाम ॥**
**रामकार्य केल्या विना कुठला मज विश्राम ॥ १ ॥**

देव पवनसुत जातां पाहुनि । जाणुं बुद्धिबल विशेष वांछुनि ॥
सुरसा नाम सर्प-जननीतें- । पाठविती; येउनि ती वदते- ॥
देव देति मज आज अहार । ऐकत वदला पवन-कुमार ॥
रामकार्य मी करून येइन । सीता शुद्धी प्रभुला देइन ॥
येउन तव वदनांत शिरेनहि । माइ ! जाउं दे वदतो सत्यहि ॥
कुण्याहि यत्नें जाउं देइना । हनुमान् वदला मला ग्रससि ना ॥
योजन भर ती वक्त्रा पसरी । निज तनु कपि ही द्विगुण विस्तरी ॥
षोडश योजन ती करि आनन । होइ पवनसुत वत्तिस तत्क्षण ॥
वाढवि सुरसा मुखा जसजसें । द्विगुण रूप दाखवी कपि तसें ॥
ती शत योजन वदन निज करी । अति लघुरूपा पवनसुत धरी ॥
मुखि शिरूनि वाहेर निसटला । आज्ञा मागे नमी शिर तिला ॥
प्रेषित मजसि सुरांनीं ज्यास्तव । कळलें मति-बल-मर्म मला तव ॥

**दो०-रामकार्य साधाल सब तुम्हि बल-बुद्धि-निधान ॥**
**आशिस देउन गेली हर्षित गत हनुमान ॥ २ ॥**

वसे सिंधुमधि एक निशाचरि । ती मायेनें नभग खगां धरि ।।
जीव जंतु जे उडती गगनीं । पडछाया जळि पडती बघुनी ।।
छाया धरते, उडुं न शकति ते । सदा गगनचर असे भक्षिते ।।
हनुमंतासि तसा छल ती करि । कपि जाणें तत्कपट शीघ्र परि ।।
तिज मारुनि मारुतसुत वीर । गत वारिधी–पार मतिधीर ।।
जाउन तिथें बघें वन शोभे । गुंजति चंचरीक मधु–लोभें ।।
नाना तरु फल फुल सुशोभन । खगमृग वृंदां बघत रमे मन ।।
पुढें एक गिरि विशाल पाहुनि । त्यावर निर्भय चढला धाउनि ।।
उमे ! कपिसि हें अधिक न काई । प्रभू प्रताप हि काळा खाई ।।
गिरिवर चढता लंका देखे । वदवे ना अति दुर्ग विशेषें ।।
अति उत्तुंग समुद्र सभोंवति । कनककोट भा परमा पाडति ।।

**छं०–कनक–कोट विचित्र मणिकृत सुंदरायतनें घनें ।**
**चौव्हाट हाट सुवाट वीथी चारु पुर बहुपरि बने ।।**
**गज वाजि खेचर–निकर पदचर रथ वरूथ न गणवती ।**
**बहुरूप निशिचर-यूथ अतिबल वर्णि कटकें कवण तीं ।।१।।**
**वन बाग उपवन वाटिका सर कूप वापी शोभती ।**
**नर–नाग–सुर–गंधर्व–कन्यारूपि मुनि मन मोहती ।।**
**सम शैल मल्ल विशाल तनु कोठें बली अति गर्जती ।**
**नाना अखाडीं भिडति बहुपरि एकमेकां तर्जती ।।२।।**
**अति झटुनि भट कोटी विकट तनु नगर चौदिशि रक्षिती**
**कोठें महिष नर धेनु खर अज खल निशाचर भक्षिती ।।**

यांच्या कथेसी कांहि तुलसीदास यास्तव कथित कीं।
रघुवीर-शर-तीर्थी त्यजुनि तनु पावतिल गति सत्य कीं ॥३

**दो०–पुररक्षक बहु पाहुनी कपि चिंती चित्तांत ॥**
**अति लघुरूपा घेउनी शिरूं रात्रि नगरांत ॥३॥**

मशक-समान रूप कपि धरी। लंके निघे स्मरुनि नरहरी ॥
निशिचरि एका नाम लंकिनी। म्हणे जासि मज अपमानुनी ॥
जाणसि ना शठ मर्म माझें। तस्कर तितके माझें खाजें ॥
मारी मुष्टि महा कपि बळें। रुधिर वमत धरणीं कोसळे ॥
उठे सावरुनि मग ती लंका। जोडुनि पाणी विनवि सशंका ॥
ब्रह्मा वर रावणास देउनि। गत विरंचि मज लक्षण सांगुनि ॥
विकल होसि तूं कपिच्या मारें। तदा समज हत निशिचर सारे ॥
तात! पुण्य मम अती बहूत। दृष्ट नेत्रिं रामाचा दूत ॥

**दो०–स्वर्ग–मोक्ष–सुख घालितां एका तुलांगि तात! ॥**
**सकल मिळुनि ना तोलवे सुख लव–सत्संगांत ॥४॥**

शिरुनि नगरिं करिजे सब काजां। हृदिं राखुनि कोसलपुर-राजा ॥
गरल सुधा अरि करिति मित्रता। गोपद सिंधु अनल शीतलता ॥
गरुड! सुमेरु रेणुसा त्यासी। राम कृपायुत बघती ज्यासी ॥
हनुमान् अति लघुरूपा धरुनी। पुरिं शिरला भगवंता स्मरुनी ॥
प्रति मंदिरिं मंदिरिं करि शोधा। बघे चहुंकडे अगणित योधां ॥
शिरे दशानन–मंदिर पाही। तें अति विचित्र वदवत नाहीं ॥

दिसे करित तो मंदिरिं शयना । दिसे न वैदेही कपि–नयनां ॥
भवन एक मग रम्य पाहिलें । तिथें भिन्न हरि मंदिर दिसलें ॥

**दो०–रामायुध–अंकित गृह छवि वदली ना जाय ॥**
**नव तुलसीवन, हर्षला बघुनि तिथें कपिराय ॥५॥**

❖ ❖ ❖

## अध्याय २ रा

लंका निशिचर-निकर-निवासहि । येथें कुठला सज्जन–वासहि ॥
चित्तीं तर्क करूं कपि लागे । त्या समयींच विभीषण जागे ॥
राम राम तो स्मरूं लागला । हृदिं कपि हर्षित सज्जन कळला ॥
करुं मुद्दाम परिचया यासी । साधु न हानि करिति कार्यासी ॥
ऐकवि वचना विप्र बनोनी । श्रवत विभीषण येति उठोनी ॥
कुशला पुसलें प्रणाम करुनी । विप्र वदा निज कथा वर्णुनी ॥
कीं तुम्हि कोणी हरिदासांत । गमे प्रीति अति मम हृदयांत ॥
कीं तुम्हि राम दीन-अनुरागी । आलां करण्या मज वहु भागी ॥

**दो०–मग हनुमान् सब सांगती रामकथा निजनाम ॥**
**श्रवत पुलक तनु युगलिं मन स्मरुनि मग्न गुणग्राम ॥६॥**

पहा पवनसुत अमचि राहणी । जंवीं जीभ विचारी दशनीं ॥
तात ! अनाथ गणुनि कधि मजवरि। कृपा भानुकुलनाथ करिति तरि ॥
तामस तनु अणु साधन नाहीं । प्रीति न पदसरसिज मनिं काहीं॥

अतां भरंवसा मज हनुमंता । विण हरिकृपें भेट नहिं संता ।।
कृत रघुवीरें कृपावलोकन । दिलें स्वयें तैं तुम्हि मज दर्शन ।।
ऐका त्रिभीषणा प्रभु-रीती । सदा सेवकीं करिती प्रीती ।।
वदा कवण मी परम कुलीन हि । कपि चंचल सब रीती हीन हि ।।
नाम आमचें घेति सकाळीं । त्यां त्यादिनि न अहार कपाळीं ।।

**दो०–असा अधम मी श्रुणु सखे ! मजवर ही रघुवीर ।।**
**करिति कृपा; स्मरतां गुण, भरे विलोचनि नीर ।।७।।**

असे स्वामि समजुनिहि विसरती । फिरति कां न ते दुःखी बनती ।।
असे रामगुण-गणांस सांगत । अनिर्वाच्य विश्रामा पावत ।।
कथा बिभीषण मग वदतसे । तेथें जनकसुता जशि वसे ।।
ऐक म्हणाला हनुमान् भ्राता ! । पाहुं इच्छितो जानकि माता ।।
युक्ति विभीषण सगळी सांगे । निघे पवनसुत निरोप मागे ।।
धरि तें रूप जाइ मग तेथें । सिता राहि वनि अशोक जेथें ।।
बघुनि मनांत चि करी प्रणाम । बसल्या निघुनि जाति निशि याम ।।
एक जटा वेणी शिरिं, कृश तन । जपते हृदयीं रघुपति गुण-गण ।।

**दो०–निजपदिं नयनां लाउनी राम चरणिं मन लीन ।।**
**परम दुःखि तैं पवनसुत दिसे जानकी दीन ।।८।।**

तरु पल्लविं बसलेला लपुनी । करि विचार 'करुं काय तरि' मनीं ।।
त्या अवसरिं ये तेथें रावण । सवें विभूषित बहु ललनागण ।।
बहुपरि खल सीते समजावी । साम-दाम-भय-भेदां दावी ।।

रावण म्हणे समुखि सुज्ञे ! श्रुणु । मंदोदरी आदि राणी-गणु: ।।
तव अनुचरी करिन मम हा पण । एक वार मजकडे पहा पण ।।
तृण धरि आड वदे वैदेही । स्मरुनि अवधपति परमस्नेही ।।
श्रुणु दशमुख खद्योत उजेडें । कधीं तरी नलिनी कीं उघडे ।।
मनि असं समज म्हणे जानकी । खल न शुद्धि रघुवीर बाण कीं ।।
शठ शून्यीं मज हरुनि आणली । अधम निलज्ज लाज तुज नुरली ।।

**दो०-खद्योता सम आपणां राम भानु ऐकून ।।**
**श्रवुनि परुषवच काढि असि वदला अति कोपून ।।९।।**

सीते त्वां कृत मम अपमाना । कापिन तव शिर कठिण कृपाणां ।।
ना तर सपदि मान मम वाणी । सुमुखि ! न तर बध जीवन-हानी।।
श्याम सरोजदाम-सम सुंदर । प्रभु-भुज करिकर सम दशकंधर ।।
तो भुज कंठिं किं तव असि घोरा । श्रुणु हा प्रमाण पण शठ ! चोरा।।
चंद्रहास हर मम परितापं । रघुपति विरह अनल संजातं ।।
शीतल निशित वहसि वर धारा । म्हणे सिता हर मम दुखभारा ।।
मारुं धावला बोलां ऐकुनि । नय मयसुता वदे समजाउनि ।।
वदे आणवुनि निशिचरि सकला । जा भिववा सीतेस बहु छळा ।।
जर वच मासा माजीं मानि न । तर मी काढुन कृपाण मारिन ।।

**दो०-गत भवनीं दशकंधर इथें पिशाचिनि-वृंद ।।**
**सीते भीती दाखविति धरिति रूप बहु मंद ।।१०।।**

त्रिजटा नाम राक्षसी एका । राम-चरण-रत निपुण विवेका ।।

स्वप्न सांगते सकलां घेउनि । स्वहिता साधा सीते सेवुनि ।।
लंका कपिनें स्वप्नि जाळली । यातुधान सेनाहि मारली ।।
खरारुढ नग्न हि दशशीस । मुंडित शिर खंडित भुज वीस ।।
ऐसा दक्षिण दिशि गत रावण । जणुं लंका लाभला बिभीषण ।।
पुरि फिरली रघुवीर-द्वाही । प्रभु-बोलाविति सीतेला ही ।।
वदतें मी हें स्वप्न वजाउन । सत्य ठरेल कि जात चार दिन ।।
परिसुनि वचना त्या सब भिती । जनकसुतेचे पदिं वंदिती ।।

**दो०-जिथें तिथें त्या गत, तदा चिंता सिता-मनास ।।**
**मारिल निशिचर नीच मज एक लोटतां मास ।।११।।**

वदली त्रिजटे जुळुनि करांतें । मला विपत्संगिणि तूं माते ।।
त्यजितें तनु कर यत्न शीघ्रतां । दुःसह विरह न सह्य मज अतां ।।
काष्ठ आण रच चिता सजवुनी । माते मग दे अनल लावुनी ।।
प्रीति सत्य मम कर कि सुजाण । कोण शूल वच करि कीं श्रवण ।।
परिसत वचन चरण धरि सांतवि । प्रभू-प्रताप सुयशबल ऐकवि ।।
सुकुमारी निशि मिळे अनल ना । असें वदुनि ती गत निज भवना ।।
सीता वदे विधी प्रतिकूल हि । अग्नि मिळेल न मिटेल शूलहि ।।
दिसतो प्रगट गगनि अंगारे । अवनि येति कुणि एक न तारे ।।
स्रवत न पावकमय शशि आगी । जणुं जाणुनि मजला हतभागी ।।
ऐक विनति मम विटप अशोका । सत्य नाम कर हर मम शोका ।।
नूतन किसलय अनल समान हि । दे अग्नी कर तनू-निदान हि ।।

बघुनि परम विरहाकुल सीते । तो क्षण गत कल्पसा कपीतें ॥

**दो०–कपि मनिं करुनि विचार टाकुनि दे मुद्रिका तंव ॥**
**जणुं अशोक अंगार दे, हर्षित घे उठुनि करिं ॥१२॥**

तंव दिसली मुद्रिका मनोहर । रामनाम–अंकित अति सुंदर ॥
निरखि मुद्रिके जाणुनि चकिता । हर्ष विषादें व्याकुळ चित्ता ॥
जिंकिल कोण अजय रघुपतिसी । माया बनवुं शके ना ऐसी ॥
सीता मनिं करि विचार नाना । हनुमान् मधुर बोलला वचना ॥
रामचंद्र–गुण वर्णूं लागे । ऐकतांच सीतादुख भंगे ॥
श्रुति मन लावुनि ऐकूं लागे । अर्थ पासुनी कथा सब सांगे ॥
श्रवणामृत कुणि कथा सुशोभन । वर्णी तरि कां होई प्रगट न ॥
तैं हनुमंत निकट गत चालत । वळुनि बसे मन झालें विस्मित ॥
रामदूत मी जननि जानकी । सत्य शपथ करुणा निधान कीं ॥
ही मुद्रा मी आइ ! आणिली । रामें ओळख तुम्हां धाडिली ॥
वद नर–वानर–संगति कैसी । कथित कथा मग घडली जैसी ॥

**दो०–प्रेमळ कपिवच परिसुनी उपजे मनिं विश्वास ॥**
**जाणे मन-तन-वचनिं हा कृपासिंधुचा दास ॥१३॥**

प्रीति-वाढ अति, जाणुनि हरिजन । वपु पुलकांकित सजल विलोचन ॥
बुडत विरहवारिधिं हनुमान ! । मज झालास तात ! जलयान ॥
पिडा टळो ! वद कुशला आतां । सानुज सुख निधि खरारि, ताता !
कोमल चित्त कृपाळू रघुवर । कवण हेतु कपि ! बनले निष्ठुर ॥

ब्रीद सहज, सेवक–सुखदायक । स्मरण करिति कधितरि रघुनायक ?।।
तात ! नयन मम कधि तरि शीतल । होति बघुनि मृदु गात्रां श्यामल ।।
वचन न येइ नयनिं ये वारी । अहह नाथ ! मी विस्मृत भारी ।।
बघुनि परम विरहाकुल सीता । वदला कपि मृदुवचा विनीता ।।
आई ! प्रभू कुशल सानुज, बरं । तव दुःखें दुःखी सुकृपागर ।।
मनिं माते माना ना ऊणें । रामप्रेम तुम्हांवर दूणें ।।

**दो०–रघुपति–संदेशा अतां आई ! ऐक सधीर ।।**
**वदतां कपि गद्गद बने भरे विलोचनिं नीर ।।१४।।**

कथिति राम, ' सीते तव विरहें । वळले मज विपरीत सकल हे ! ।।
नव तरु किसलय जणूं कृशानू । काळ निशेसम निशि, शशि भानू ।।
कुवलय-विपिन कुंतवन होती । जलद तप्त तेला जणुं ओती ।।
हित होते ते करिती पीडन । अहिश्वाससा त्रिविध समीकरण' ।।
दुःख सांगता कांहिं आटतें । कुणां सांगुं हे कोण जाणते ।।
तुझें नि माझें प्रेम-तत्व तें । प्रिये मना एका मम कळते ।।
तें मन राहि सदा तुजपासीं । यांत समज तूं प्रीतिरसासी ।।
प्रभु-निरोप परिसत वैदेही । प्रेममग्न, तनुभान नुरेही ।।
हृदि धर धीर म्हणे कपि माते ! । स्मर किं राम सेवक-सुखदाते ।।
आण मनीं प्रभुता रघुपतिची । त्यज मम वचनिं भीरुता मनिंची ।।

**दो०–निशिचर निकर पतंग सम रघुपति–बाण कृशान ।।**
**जननी ! हृदयीं धीर धर दग्ध निशाचर जाण ।।१५।।**

जर किं शोध रघुवीर पावते । रघुराजा ना वेळ लावते ।।
राम–बाण–रवि–उदयिं जानकी । कुठें तमघटा यातुधान कीं ।।
अतां आइ ! मी घेउन जातों । रामशपथ, ना प्रभु-आज्ञा तों ।।
काहिं दिवस जननी ! धर धीरा । घडे सकपि येणें रघुवीरा ।।
निशाचरां मारुनि तुज नेतिल । त्रिजगिं नारदादिक यश गातिल ।।
असती सुत तुज सम सव मर्कट ! । अति वलवंत कि यातुधान भट ।।
माझे हृदयिं परम संदेह । श्रवुनी प्रगटी कपि निज देह ।।
कनक–भूधराकार शरीर । समर–भयंकर अति बल वीर ।।
सीते मनीं भरंवसा आला । मग लघुरूप पवनसुत झाला ।।

**दो०–श्रुणु माते ! शाखा मृगा नहि बलबुद्धि विशाल**
**प्रभू प्रतापें खगपतिसि खाइल सुलघू व्याल ।। १६ ।।**

मनिं सुतोष परिसुनि कपि-भाषित । भक्ति तेज-बल-प्रताप-मिश्रित ।।
रामप्रिय जाणुनि आशिस दे । हो ताता ! बल-शील-निधि वदे ।।
अजर अमर गुणनिधि सुत होशिल। वहुत कृपा रघुनायक करतिल ।।
करिति कृपाप्रभु. परिसति कान । प्रेमीं गाढ मग्न हनुमान ।।
वारंवार नमुनि शिर चरणां । वदे कीश कर जोडुनि वचना ।।
मी माते ! आतां कृतकृत्यहि । आशिष तव अमोघ विख्यातहि ।।
श्रुणु माते मज भारी भूक– । लागे बघुनि रुचिर-फल-रूख ।।
श्रुणु सुत कानन–रक्षण-कारी । परम–सुभट-रजनीचर भारी ।।
त्यांचें भय माते मज नाहीं । जर सुख वाटे तुझ्या मना ही ।।

**दो०—बघुनि बुद्धि बल–निपुण कपि म्हणे जानकी जाइ ।।**
**रघुपति–पद हृदयीं धरुनि तात ! मधुर फळ खाइ ।।१७।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ३ रा

निघे नमुनि शिर शिरला बागे । खाइ फळें तरु तोडूं लागे ।।
तिथें सुरक्षक भट वहु असती । कांहीं हत, गत कांहि कळवती ।।
नाथ एक आला कपि भारी । तो अशोक वाटिके विदारी ।।
फळें भक्षुनी विटप उपटले । रक्षक मर्दुनि महीं टाकले ।।
तैं रावण पाठवि भट नाना । हनुमान् गर्जे वघुनि तयांनां ।।
कपिनें सगळे निशिचर ते हत । जाति अर्धमृत काहि पुकारत ।।
मग धाडी तो अक्षकुमारा । घेउनि सुभटां निघे अपारां ।।
येत वघे घे विटपा तर्जे । त्यास निपाति महाध्वनि गर्जे ।।

**दो०हत किति मर्दित किति, करी मिळवुनि धुळीस चूर ।।**
**गत कांहीं वदले प्रभु मर्कट अतिबल शूर ।। १८ ।।**

श्रुत सुतवध लंकेश कोपला । मेघनाद बलवंत धाडला ।।
मारुं नको त्या बांध, सुता ! हे ! । पाहूं तरि कपि कुठला आहे ।।
निघे इंद्रजित योद्धा अतुलित । क्रुद्ध बंधुनिधना आकर्णित ।।
कपि बघुनी दारुण भट आला । कट्कटुनी गर्जून धावला ।।
उपटि तरुसि अति विशाल एका । विरथ करी लंकेश्वर–लेका ।।

किती महाभट त्याचे संगा। कपि धर धरुनि मर्दि निज अंगा ॥
त्यांस निपातुनि भिडे तयासी। युग गजपति कि करिति युद्धासी ॥
मुष्टी मारुनि विटपीं चढला। क्षणभर निशिचर मूर्छित पडला॥
उठुनी तो करि बहुविध माया। जिंकुं न शके प्रभंजन-तनया ॥

**दो० ब्रह्मास्त्रा तो योजी कपि मनि करी विचार ॥**
**ब्रह्म शरा जर मानुं ना महिमा-हानि अपार ॥१९॥**

ब्रह्मबाण कपिला तो भारी। पडत पडत कटका संहारी ॥
तो पाहे कपि मूर्छित पडला। नागपाशि बांधुनि ने त्याला ॥
श्रुणु यन्नामा जपुनि भवानी। भव बंधन नर तोडी ज्ञानी ॥
बंधनिं कीं तद्दूत सांपडे। प्रभुकार्यार्थी स्वयें कपि पडे ॥
कळत 'बद्धकपि' निशिचर धावति। कौतुक पाहुं सभें सब पावति ॥
कपि गत दशमुख सभेस पाही। प्रभुता अति वदवे ना कांहीं ॥
जोडुनि कर सुर विनीत दिक्पति। भृकुटी सकल सुभीत विलोकति ॥
बघुनी प्रताप कीश न शंकित। जसा अहिगणीं गरुड अशंकित ॥

**दो०—कपिला पाहुनि दशानन हसे वदुनि दुर्वाद ॥**
**स्मरे पुत्रवध तो, तदा उपजे हृदयि विषाद ॥२०॥**

'कपि तूं कोण' पुसे लंकेश्वर। बळें कुणाच्या नाशित वन वर ॥
नाहिं ऐकला का कधि मजसी। अति अशंक शठ तूं मज दिससी ॥
हत निशिचर कोण्या अपराधा। वद शठ तव ना प्राणां बाधा ॥
श्रुणु रावण विध्यंड-निकाया। यद्बल पावुनि विरची माया ॥

बळें जयाच्या विधि हरि ईश । पालति सृजति हरति दशशीस ॥
यस्य बळें दशशतमुख धरि शिरिं । अंडकोश समेत कानन गिरि ॥
धरि जो विविध देह सुरपाता । शठां तुम्हांसम शिक्षा दाता ॥
हर कोदंड कठिण जो भंजन– । करि तुजसह नृपदलमद-गंजन ॥
खर दूषण नी त्रिशिरा वाली । वधिले सब अतुलित बलशाली ॥

**दो०–ज्याचया बल–लवलेशिं तूं विजित चराचर सारि ॥**
**तद्दूत चि मी, त्वां हृता ज्यांची प्रिय अति नारि ॥२१**

प्रभुता विदित असे तव मजसी । झालि लढाइ सहस्त्रभुजाशीं ॥
समरिं वालिशी सुयश लाभलें । परिसुनि कपिवच हसुनि टाळलें ॥
प्रभू! क्षुधित अति कृत फल भक्षण । कपी–स्वभावें विटप–विभंजन ॥
सर्वां प्रिय तनु परमा स्वामी । मारिति मजला कुमार्ग गामी ॥
मज मारिति जे त्यां मी वधले । तुमच्या तनये मग किं बांधले ॥
बंधनिं मजला लाज न कांहीं । प्रभुच्या मम करणें कार्या ही ॥
विनति करूं कर जोडून रावण । ऐका, त्यजुनि मान मम शिकवण ॥
स्वकुल विचार पहा तुम्हि करुनी । भजा भक्तभयहा भ्रम तजुनी ॥
ज्याच्या भयें काळ अति डरतो । जो सुर असुर चराचर गिळतो ॥
वैर तयासी कधिहि न कीजे । मम वचनें जानकी देइजे ॥

**दो०–प्रणतपाल रघुनायक खररिपु करुणागार ॥**
**जात शरण राखिती प्रभु विसरुनि गुन्हे अपार ॥२२॥**

रामचरण पंकज उरिं धरणें । लंका-राज्य अचल तुम्हि करणें ॥

ऋषि पुलस्ति यश विमल मृगांकीं । तुम्हीं कलंक हि बनूं नका कीं, ।।
राम नाम विण शोभे न गिरा । त्यजुनि मोह मद कर किं विचारा।।
वसनहीन शोभे न, सुरारी ! । सव भूषणभूषित वर नारी ।।
रामविमुख संपत्ती सत्ता । असली नसली प्राप्त सम गता ।।
सजलमूल नसती ज्या सरिता । शीघ्र सुकति त्या वर्षा सरतां ।।
सांगु ऐक दशकंठ ! पणासी । त्राता कुणि न रामविमुखासी ।।
शंभु सहस्र विष्णु चतुरानन । रामद्रोह्या रक्षूं शकत न ।।

**दो०–मोहमूल बहु शूलद त्यागा तम अभिमान ।।**
**भजा राम रघुनायक कृपा सिंधु भगवान ।।२३।।**

जरि कपि वदला वाणी अति हित । भक्ति–विवेक–विरति-नय-मिश्रित
वदला विहसुनि महाभिमानी । मिळे अम्हां कपि गुरु सुज्ञानी ।।
मृत्यु निकट रे खल ! तव आला । अधमा शिकवूं लागसि माला ।।
वदला हनुमान् होइल उलटचि । तुला मतिभ्रम दिसतो प्रगटचि ।।
कपिवचनें अति चिडला रावण । शीघ्र हरां कां मूढ प्राण न ।।
ऐकत निशिचर मारुं धावले । सचिवां सहित विभीषण आले ।।
नमुनी शिर करि विनति बहूता । नीति विरुद्ध, न वधणें दूता ।।
दंड दुजा प्रभु ! कांहि करावा । वदले सगळे मंत्र भला, वा ! ।।
ऐकत हसुनि वदे दशकंधर । धाडा अंगा भंगुनि वांदर ।।

**दो०–कपि ममता पुच्छावरी स्पष्ट सांगु सकलांस ।।**
**तैल युक्त पट बांधुनी द्या लावुनि अनलास ।।२४।।**

पुच्छहीन कपि तेथें जाइल । शठ मग निजनाथाला आणिल ॥
वर्णित अतिशय महत्व ज्यांचे । पाहिन पुरुषार्था मी त्यांचे ॥
परिसुनि वचना कपि मनिं सस्मित । साह्य शारदा मज मी जाणत ॥
राक्षस ऐकुनि रावण-वचना । मूढ लागले करुं ती रचना ॥
पुरीं उरे न वसन घृत तेल हि । वाढे पुच्छ करी कपि खेळ हि ॥
कौतुकार्थ जमले पुरवासी । मारिति लाथा अति उपहासीं ॥
पिटती टाळ्या ढोल वाजविति । धिंड नगरिं, पुच्छा प्रज्वाळिति ॥
भडकत पावक हनुमान् बघतो । त्वरित परम लघु रूपा धरतो ॥
सुटुनि चढे कपि कनकाट्टारीं । अति भयभीत निशाचर नारी ॥

**दो०-प्रेरित हरि सुटले तदा मरुत ऊनपन्नास ॥**
**साट्टहास कपि गर्जे वाढे स्पर्शं नभास ॥२५॥**

देह विशाल परम हलका, तो- । मंदिरिं मंदिरिं धावत चढतो ॥
जळे नगर जनता विव्हळ अति । ज्वाळा कोटी कराल भडकति ॥
आक्रोशति माते हा! ताता । कोण अम्हां या समयीं त्राता ॥
आम्हीं कथित किं कपि न म्हणोनी ! । वानररूपें सुर तरि कोणी ॥
साधु-अवज्ञेचें फळ ऐसें । जळे अनाथाचें पुर जैसें ॥
एका निमिषीं नगर जाळिलें । एक बिभीषण-भवन राखिलें ॥
त्यांचा दूत सृजिति अनला जे । म्हणुनी ना तो गिरिजे ! भाजे ॥
उलट सुलट सब लंके जाळी ।उडी सागरी नंतर घालीं ॥

**दो०-पुच्छा विझवुनि हरी श्रम पुन्हा सान होऊन ॥**
**जानकि सन्मुख राही उभा पाणि जोडून ॥२६॥**

आई ! मज दे कांहि खूण तरि । देति जशी रघुनायक मम करिं ॥
चूडामणि काढुनि मग देई । हर्षित पवन तनय करिं घेई ॥
तात ! सांग मम असा प्रणाम । सर्वपरीं प्रभु पूरित काम ॥
दीन दयाळू ब्रीद आठवा । संकट भारि नाथ मम हटवा ॥
सांग शक्रसुत-कथंस बापा ! । प्रभुस निवेद किं शरप्रतापा ॥
नाथ येति जर मासामधि ना । तर मग जिवंत मज पावति ना ॥
प्राण कसे कपि ! राखुं वद अतां । जातो तात ! तुम्हींही म्हणतां ॥
शीतल झाली बघुनि तुज छाती । पुन्हां तेच दिन मज त्या राती ॥

**दो०—जनकसुते समजाउनी देउनि बहु धीरास ॥**
**नमुनि कमलपदि कपि निघे रामाप्रति जाण्यास ॥२७॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ४ था

जात महाध्वनि गर्जे भारी । स्रवति गर्भ तैं निशिचर नारी ॥
आला पारहि सिंधु लंघुनी । शद्व किल किला वानर- कानीं ॥
हर्षति सर्व बघुनि हनुमाना । कपि नव जन्म म्हणति झाला ना ।
मुख प्रसन्न तनु तेजें भ्राजे । साधि रामचंद्राचीं काजे ॥
भेटुनि होति सुखी सब भारी । मरत मीन मिळतां जसं वारी ॥
निघती हर्षित रघुपति पाशीं । पुसत वदत नव इतिहासासी ॥
सकलहि ते मग मधुवनि जाती । अंगद संमत मधु फल खाती ॥
जेव्हां रक्षक वर्जुं लागले । मुष्टिमार मिळतां सब पळले ॥

**दो०–जाउनि वदी देति सब वन उजाडि युवराज ॥**
**हर्ष सुकंठा, येति कपि कीं करुनी प्रभुकाज ॥२८॥**

सीता-शोधा जर न पावते । मधुवन-फळें कि खाऊं शकते ॥
मनिं यापरिं करि विचार राजा । तों आले कपि सहित समाजा ॥
येति सकल शिर नमविति पायां । भेटे प्रेमें अति कपिराया ॥
पुसलें कुशल कुशल बघुं पायां । रामकृपें कृत विशेष कार्यी ॥
नाथ ! करी कार्या हनुमानहि । रक्षित सकल कपींचे प्राणहि ॥
भेटे पुन्हां सुकंठ तयाला । कपिसह रघुपतिकडे निघाला ॥
रामें कपिनां येत विलोकित । कृतकार्यहि मनिं विशेष हर्षित ॥
स्फटिक शिळे दो बंधू बसले । कपि सब जाउनि पाया पडले ॥

**दो०–भेटति सकलां प्रेमें रघुपति करुणापुंज ।**
**पुसति कुशल नाथा अतां कुशल बघुनि पदकंज ॥२९॥**

म्हणे जांबवान् श्रृणु रघुराया । ज्यावर करतां नाथ तुम्हि दया ॥
त्यास सदा शुभ कुशल निरंतर । सुर नर मुनी प्रसन्न तयावर ॥
तो विजयी विनयी गुण सागर । त्रिभुवनिं सुयश तयाचें भास्वर ॥
प्रभूकृपें झालें सब काज । जन्म आमचे सुफलहि आज ॥
नाथ पवनसुत-कृत-जी करणी । ती न वर्णवे सहस्त्रवदनीं ॥
पवनतनयकृत सुंदर चरितें । जांबवंत सांगति रघुपतितें ॥
श्रवत कृपानिधि मनिं अति रुचले । मग हर्षें हनुमान् हृदिं धरले ॥
वदा तात कशि तरी जानकी । राहे रक्षी निज प्राण कीं ॥

**दो०–नाम पाहरा रात दिन तुमचें ध्यान कपाट ॥**
**लोचन निजपदिं यंत्रिलें जाण्या प्राण कि वाट ? ॥३०॥**

निघतां चूडामणि मज दिधला । घेउनि रघुपतिनीं हृदिं धरला ॥
नाथ! युगल लोचनिं भरि वारी । वदली कांहीं जनक कुमारी ॥
अनुजासह धरुनी प्रभुचरणां । दीनबंधु प्रणतार्ती–हरणा ॥
मन–तन–वचनें पदिं अनुरक्ता । नाथ ! कवण अपराधें त्यक्ता ॥
अवगुण एकच मान्य मम मना । प्राण न करिति वियोगें गमना ॥
गुन्हा नाथ ! नेत्रांचा सगळा । प्राणां जातां करिति अडथळा ॥
विरहवन्हि, तनु तूल, समीर– । श्वासहि, जळतें क्षणें शरीर ॥
वर्षति नेत्र जला स्वहिताला । तनु न जाळवे विरहदवाला ॥
सीता–विपदा अती विशाला । बरें न वदणें, दीनदयाला ॥

**दो०–निमिष निमिष करुणा निधे प्रभो कल्पसें गाळि ॥**
**स्वभुजबळें खळ-दळ वधुनि चला आणुं तात्काळि ॥३१॥**

श्रवुनि सिता दुःखां सुख–अयना । जल भरलें प्रभु-राजिव-नयना ॥
मम गति तनुमनवचनें ज्यासी । शिवे स्वप्निं कधि विपत्ति त्यासी ॥
म्हणे हनू प्रभु ! तीच विपत्ती । स्मरण भजन तव यदा न घडती ॥
प्रभो ! निशाचर कथा काय ती । रिपु जिंकुनि जानकी आणती ॥
ऐक कपे ! तुज सम उपकारी । नहि कुणि सुर-नर-मुनि-तनुधारी ॥
करुं तव केवी प्रत्युपकारा । मम मन कुंठित करित विचारा ॥
श्रुणु सुत ! अनृण तुझा मी नाहीं । करुनि विचारा बघत मनां ही ॥

पुनः पुन्हां सुरपाल विलोकति- । कपिस, नेत्रिं जल तनु पुलकित अति

**दो०–प्रभु–वच परिसुनि बघे मुख तनु हर्षित हनुमंत ।।**
**प्रेमाकुल पायां पडे त्राहि ! त्राहि! भगवंत ।।३२।।**

पुनः पुन्हां प्रभु उठवूं पाहत । प्रेम मग्न उठुं नये चि वाटत ।।
प्रभु-कर-पंकज कपिचे शीर्षां । स्मरत दशा उन्मनि गौरीशा ।।
सावधान मन करुनी शंकर । लागति सांगुं कथा अति सुंदर ।।
प्रभु उठवुनि कपिला हृदि धरिती । परम निकट कर धरुनि बसविती
वद कपि रावण-पालित लंका । दुर्ग जाळिली कशि अति बंका ।।
प्रभू प्रसन्न बघुनि हनुमान । वदला वचन विगत-अभिमान ।।
मोठा शाखामृग पुरुषार्थ हि । शाखे शाखे उडती व्यर्थ हि ।।
लंघुनि सिंधु कनकपूर होळी । निशिचर-गण-वध वन खांडोळी ।।
तो प्रताप रघुपति तव अवघा । प्रभुता नाथ ! न अल्प मम बघा ।।

**दो०–प्रभु त्या दुर्गम कांहि ना ज्याला तुम्हि अनुकूल ।।**
**प्रभावें हि तव जाळिल वडवाग्निस खलु तूल ।।३३।**

नाथ भक्ति अति सुखदायिनी । करुनि कृपा द्या अनपायिनी ।।
परिसुनि परम सरल कपि-वाणी । प्रभु वदले कि तथास्तु भवानी! ।।
कळला राम स्वभावही ज्या । उमे भजनविण नान्य रुचे त्या ।।
हा संवाद हृदयिं ज्या वसला । तो रघुपति पद भक्ति पावला ।।
प्रभुवच कानिं, वदति कपि वृंद । जय जय जय कृपालु सुखकंद ।।
मग रघुपति बोलावुनि कपिपति । 'करा प्रयाण-तयारी' सांगति ।।

अतां उशीर कशास करावा। शीघ्र हुकूम कपींनां द्यावा ।।
कौतुक बघुन सुमन बहु वर्षुन। नभि सुर भवना निघती हर्षुन ।।

**दो०—कपि पति वेगें बोलवी आले:यूथप—यूथ ।।**
**नानावर्ण अतुल बल वानर भल्ल वरूथ ।।३४।।**

प्रभुपद—पंकजि नमिती शीर्ष। गर्जति भल्ल महाबल कीश ।।
निरखुनि राम सकल कपि सेने। बघती राजीवाक्ष कृपेनें ।।
रामकृपें बळ मिळत कपींद्र। होती पक्षयुत जणूं गिरींद्र ।।
करिति राम हर्षुनी प्रयाणा। होति शकुन सुंदर शुभ नाना ।।
सव मंगलमय ज्याची कीर्ती। तया प्रयाणिं शकुन ही नीती ।।
वैदेही प्रभु—प्रयाण जाणत। वामांगें स्फुरुनी जणुं सांगत ।।
शकुन जानकिस जो जो झाला। तो तो अशकुन दशाननाला ।।
निघे कटक कुणि वर्णुं कि शकती। अगणित वानर रीस गर्जति ।।
नख आयुध गिरि पादप धारी। जाति गगनमहिं इच्छा चारी ।।
केसरिनाद ऋक्ष कपि करती। डगमगती दिग्गज चीत्करती ।।

**छं०—चीत्करति दिग्गज कंप भू, गिरिलोल,, सागर खळबळे।**
**मनिं हर्षयुत गंधर्व सुर मुनि नाग किनर दुख टळे ।।**
**कट्कटति मर्कट विकट भट बहु कोटि कोटी धावती।**
**जयराम प्रबल प्रताप कोसलनाथ गुणगण वानती ।।१।।**
**सहुं शकत भार न फार अहिपति वार फारहि मोहतो।**
**धरि दशनिं कितिवां कमठ-पृष्ठ कठोर केवीं शोभतो ।।**

रघुवीर रुचिर प्रयाण प्रस्थिति जाणुनी अति शोभना।
जणुं कमठ-खर्परिं सर्पराज कि लिहित अविचल पावना ॥२

दो०–असे कृपानिधि उतरले जाउन सागर-तीरिं ॥
जिथें तिथें फळं भक्षिलीं भल्ल विपुल कपि वीरिं ॥३५॥

❖ ❖ ❖

## अध्याय ५ वा

तिथें निशाचर वसति स-शंके। कपि जाळुन गेल्यावर लंके ॥
निज निज गृहिं सब विचार करती। नसे निशाचर–कुळा धडगती ॥
वर्णवे न यद्दूत–बलातें। काय होय भलं पुरिं येतां ते ॥
दूतिमुखें पुरजनोक्ति कळली। मंदोदरी अधिक विव्हळली ॥
रहसि जुळुनि कर पति पदिं पडली। वदली वाक्य नीति रस-भरलीं ॥
कान्त ! वैर हरिशीं परिहरणें। मम शब्दां अति हित हृदिं धरणें ॥
यद्दूतें कृत करणी स्मर ती। निशिचर–गृहिणी गर्भा स्रवती ॥
तत्स्त्री निज सचिवां बोलावुनि। प्रिय! हित इच्छा तर द्या धाडुनि॥
दुःखद तव कुल–कमल–वनासी। आली सीता शीत निशा–सी ॥
ऐका नाथ ! विना सीतार्पण। तव हित करिति न शिव चतुरानन ॥

दो०–राम बाण अहिगण सदृश निशिचर समूह भेक ॥
जों ग्रसतो ना तों करा यत्न सोडुनी टेक ॥३६॥

शठ ऐकुनी तिची ती वाणी। विहसे विश्वविदित अभिमानी ॥

भित्रा नारी स्वभाव साचें । मंगलात भय मन अतिकाचें ।।
मर्कट कटक भार जर येइल । खाति विचारे निशिचर जगतिल।।
कापति लोकप ज्याच्या त्रासें । त्याची नारि सभय, बहु हासें ।।
वदुनि हसुनि आलिंगुनि तिजला । ममता अधिका सभे चालला ।।
चिंता चित्तीं मंदोदरिला । विधि विपरीत वळे निज पतिला।।
वसे सभें अशि खबर मिळाली । सिंधु पार सेना सब आली ।।
पुसे 'सचिव ! मत उचित वदावें' । ते सब हसले स्वस्थ वसावें ।।
विजिन सुरासुर तैं श्रम नाहीं । नर वानर या किंमत कांहीं ।।

**दो०–सचिव वैद्य गुरु हे प्रिय लोभ–भयें वदतील ।।**
**राज्य धर्म तनु तीन तरी सत्वर विनाशतील ।।३७।।**

तोच रावणा योग मिळाला । घालिति किति कानीं स्तुति माला ।।
जाणुनि समय बिभीषण आला । भ्रातृचरणिं शिर नमिता झाला ।।
वसे निजासनिं पुनरपि वंदुनि । वदे वचन अनुशासन पावुनि ।।
जर कृपाल मज पुसिली वार्ता । वदतो हिता यथामति ताता ! ।।
जो कांक्षी कुणि निज कल्याणां । सुयश सुमति शुभ गति सुख नाना ।।
तो स्वामी ! परनारि–मुखानां । त्यजो चतुर्थि चंद्र सम जाणां ।।
धनी चतुर्दश भुवनांचा ही । भूत–द्रोहें टिकत किं नाहीं ।।
गुणसागर नागर नर असला । तिळ लोभें कुणि म्हणति नच भला

**दो०–काम कोप मद लोभ सब नाथा ! नरका पंथ ।।**
**सोडुनि सब रघुवीर ही भजा भजति ज्यां संत ।।३८।।**

तात ! राम ना नरभूपाळ हि । भुवनेश्वर काळाचा काळ हि ॥
ब्रह्म अनामय अज भगवंत । व्यापक अजित अनादि अनंत ॥
गो–द्विज–धेनु–देव-हितकारी । कृपासिंधु मानुष-तनुधारी ॥
जन रंजन खलगण भंजक ते । बंधू वेदधर्मरक्षक ते ॥
त्यजुनि वैर नमणें त्यां माथा । प्रणतार्ती–भंजन रघुनाथा ॥
द्यावी प्रभुस नाथ ! वैदेही । भजा राम निर्हेतू स्नेही ॥
प्रभु ना त्यजिति शरण जो गेला । जगद्द्रोह–अघ जरि केलेला ॥
नाम जयाचें त्रितापनाशन । प्रभु तो प्रगट समज मनि रावण ॥

**दो०–नमितो वारंवार पद विनवितसें दशशीस ॥**
**मान मोह मद टाकुनी भजा कोसलाधीश ॥ ३९रा ॥**
**मुनि पुलस्ति कळवीति मज शिष्यमुखें ही मात ॥**
**प्रभुस कथित मी शीघ्र ती सुसमय पावुनि तात ॥३९म॥**

सचिव माल्यवान् चतुर वयस्कर । अति सुख मानी श्रवुनि वचन वर
तात अनुज तव नीति-विभूषण । धरा मनीं जें कथित बिभीषण ॥
रिपु-उत्कर्ष कथिति शठ दोनी । दूर करां, न असे का कोणी ? ॥
माल्यवंत निज गृहा परतला । मग कर जुळुनि बिभीषण वदला ॥
सुमति कुमति सर्वांतरिं वसती । नाथ ! पुराण निगम हे वदती-॥
सुमति तिथें संपत्ती नाना । कुमति तिथें किं विपत्ति निदानां ॥
तव हृदिं कुमति वसे उलटी, तरि । अहिता हित मानितां मित्र अरि ॥
काळरात्र निशिचर वंशाप्रति । सीतेवर त्या प्रीति करां अति ॥

**दो०–तात धरुनि पद मागतो मम राखा प्रेमास ॥**
**द्या सीता रामा, अहित तुमचें होइ न खास ॥४०॥**

श्रुति पुराण बुध संमत वाणी । वदला बिभिषण नीती वानी ॥
श्रवत दशानन रोषें उठला । मृत्यु निकट ये अतां तुज खला ॥
जगसि सदा शठ मीच जगवला । रिपुचा पक्ष मूढ तुज रुचला ॥
वदसि न खल! जगिं कोण असाही । मी भुजबळें विजित जो नाहीं ॥
मम पुरिं वसुनि तापसीं प्रीती । शठ मिळ जा त्यां सांग कि नीती ॥
वदुनि असें करि पद–प्रहारां । अनुज धरी पद वारंवारां ॥
हीच उमे संतांची महती । अपकारां करतां हित करती ॥
भलें पित्यासम मला मारलें । राम भजत हित नाथ आपलें ॥
सचिवां सहित गगनपथिं जाऊनि । वदे असे सर्वांस बजाउनि ॥

**दो०–राम सत्यसंकल्प प्रभु सभा तुझी वश काल ॥**
**शरण रघुविरा जात मी दोष न आतां द्याल ॥४१॥**

गत हें वदुनि बिभीषण जेव्हां । आयुहीन सब झालें तेव्हां ॥
साधु–अवज्ञा त्वरित भवानी । करी अखिल कल्याणां हानी ॥
रावण बिभीषणा जैं त्यागी । तैंच होइ गत विभव अभागी ॥
हर्षित रघुपतिकडे निघाला । मनीं करित किति मनोरथांला ॥
निरखिन जाउन चरणाब्जांनां । अरुण मृदुल सेवक–सुखदांना ॥
पद लागत तरली ऋषिनारी । जे दंडकवन पावनकारी ॥
जें पद जनक सुता हृदिं धरते । कपट कुरंगा–संगिं धावते ॥

हर-उरसरिं सरोज पद जेही। अहो भाग्य मी पाहिन तेही ॥

**दो०-मन ज्या पद-पादुकांमधिं राहि भरत लाऊन ॥**
**ते पद आज बघेन या नेत्रिं अतां जाऊन ॥४२॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ६ वा

प्रेमें यापरिं करित विचारा। येइ सपदि या सागर-पारा ॥
येतां बिभीषणा कपि पाहति। शत्रु-दूत कुणि विशेष जाणति ॥
त्या रोखुनि ते कपीश्वराप्रति। येउनि समाचार सब सांगति ॥
श्रुणु रघुराजा वदला सुग्रिव। ये दशकंठ-बंधु भेटीस्तव ॥
प्रभु वदले कीं सखे काय मत। ऐका नरपति कपीश सांगत ॥
निशिचर माया न ये कळोनी। कामरूप कां येइ धरोनी ॥
अपला भेद घेउं शठ आला। मम मत बांधुन ठेउं तयाला ॥
सखे! नीति मत तुमचें उत्तम। शरणागत-भयहारी पण मम ॥
या प्रभुवचें हर्ष हनुमंता। शरणागत-वत्सल भगवंता! ॥

**दो०-शरणागतास जे त्यजिति निज अनहित मानून ॥**
**ते नर पामर पापमय हानि त्यांस देखून ॥४३॥**

कोटि विप्रवध पाप जया हां। येतां शरण न त्यजूं तया ही ॥
सम्मुख होइ जीव मम जंव्हां। जन्म कोटि अघ नासति तेव्हां ॥

सहज शील कीं हें पाप्यांचे । सदा वावडें मम भजनाचें ।।
दुष्ट हृदय सत्यच असता जर । मम सम्मुख येता तो का तर ।।
निर्मल मन जन तो मज पावे । मला कपट छल छिद्र न भावे ।।
भेद घेउं धाडी दशशीस हि । तरि न कांहि भय हानि कपीशहि
सखे ! निशाचर जगांत जितके । लक्ष्मण मारिल निमिषीं तितके ।।
शरण सभीत असे जर आला । प्राणां सम रक्षीन तयाला ।।

**दो०–उभयपरीं त्या आणणें हसले कृपानिकेत ।।**
**जय कृपालु ! कपि चालले अंगद हनू समेत ।।४४।।**

सादर करुनि पुढें त्या वानर । चलति जिथें रघुपति करुणाकर ।।
दिसले दुरुनी दोघे भ्राते । नयनानंद दान जे दाते ।।
मग छविधाम राम जैं पाहे । पक्ष्म न हालति थबकुन राहे ।।
भुज विशाल कंजारुण लोचन । श्यामल वपू प्रणत-भय मोचन ।।
सिंह अंस आयत उर शोभत । आनन अमित मदन-मन मोहत ।।
गात्रिं पुलक अति नयनीं नीर । बोले मृदु, मनिं धरुनी धीर ।।
नाथ ! दशमुखाचा मी भ्राता । निशिचरवंशि जन्म सुरपाता ! ।।
सहज अघप्रिय तामस देह । जसा उलूकां तिमिरीं स्नेह ।

**दो०–प्रभु ! आलो ऐकुनि सुयश भव–भी–भंजन धीर ! ।।**
**त्राही त्राही आर्तिहर शरण-सुखद रघुवीर ।।४५।।**

वदुनि दंडवत करीत, देखुनि । उठति जवें प्रभु विशेष हर्षुनि ।।
श्रवुनि दीन वच प्रभुमनिं भरला । धरुनि विशाल भुजीं हृदिं धरला ।।

सानुज भेटुनि समीप बसविति । भक्तभीतिहर तया विचारिति ॥
वद लंकेश सहित परिवार हि । कुशल कुठायीं तुमचा वास हि ॥
खल मंडलिं दिनरात वसतसां । सखे धर्म निर्वाह तरि कसां ॥
मी जाणें तुमची सब रीती । अति नय निपुण, न रुचे अनीती ॥
भला वास नरकीं तरि ताता ! । दुष्टसंग देवो न विधाता ॥
पद बघुनीहि कुशल रघुराया । जैं जन जाणुनि करा तुम्हि दया ॥

**दो०–तोंवरि जीवा कुशल नहि स्वप्नि मना विश्राम ॥**
**जों न राम भजतो त्यजुनि शोकधाम जो काम ॥४६॥**

हृदयि वसति खल नाना तोंवर । लोभ मोह मद मान नि मत्सर– ॥
जों हृदयीं वसति न रघुनायक । तूण कटीं धृत कार्मुक सायक ॥
ममता तरुण तमी अंधारी । द्वेष राग घुवडां सुखकारी ॥
तोंवर जीवांचे मनिं राही । प्रभुचा प्रताप-रवि जों नाहीं ॥
अतां कुशल, य भारि संपलें । बघुनि राम तुमचीं पद-कमलें ॥
तुम्हीं कृपाल जया अनुकूल । व्यापिति त्या न तीन भवशूल ॥
अती स्वभाव अधम, मी निशिचर । कृत न कधीं शुभ आचरणा तर ॥
मुनीध्यानिं यद्रूप न येतें । मज हृदि धरती प्रभु हर्षे ते ॥

**दो०–अहो भाग्य मम अमित, अति राम ! कृपा–सुखपुंज ॥**
**दिसले नयनिं विरंचि-शिव–सेव्य युगल पदकंज ॥४७॥**

श्रुणु निज सांगूं स्वभाव सखया । जाणति भुशुंडि शिव गिरितनया ॥
चराचरा द्रोही नर असुनी । येइ सभय मज शरण लक्षुनी ॥

त्यजुनि मोहमद विविध छलासी । सद्य साधुसम करतो त्यासी ॥
जननी जनक बंधु सुत नारी । तन धन भवन सुहृद परिवारी ॥
जी ममता ते धागे जमवुनि । वळुनि दोरी, मन मम पदिं जखडुनि
समदर्शी इच्छा मुळि नाहीं । हर्ष शोक भय मनिं नहि कांहीं ॥
हे सज्जन हृदिं वसति मम कसे । लोभी-हृदयीं वसे धन जसें ॥
संत समान तुम्हां प्रिय मातें । प्रार्थुनि इतरिं न धरुं देहातें ॥

**दो०–सगुणोपासक परहितीं निरत नीति दृढ नेम ॥**
**नर ते प्राणांसम मला द्विजपदिं ज्यांचे प्रेम ॥४८॥**

श्रुणु तुजमधिं सब गुण लंकापति । तुम्हीं त्यामुळें मजला प्रिय अति ॥
रामवचन ऐकुन कपि-यूथ । सकल वदति जय कृपा-वरुथ ॥
प्रभुवचनास विभीषण ऐकत । तृप्त नव्हे, श्रवणामृत वाटत ॥
पद-अंबुज धृत वारंवारा । हृदयिं राहि ना प्रीति अपारा ॥
ऐका देव अगजगत् स्वामी । प्रणतपाल हृदयांतर्यामी ॥
पूर्वि अल्प, इच्छा राहिली । प्रभुपद-प्रीति सरित वाहिली ॥
अतां स्वभक्ति कृपाल पावनी । द्यावि सदा शिव-मन-भावनी ॥
प्रभु तथास्तु वदुनी रणधीर । मागति सपदिं सिंधुचें नीर ॥
यदपि सखे तव इच्छा नाहीं । जगिं दर्शन मम अमोघ पाही ॥
तया राम नृपतिलका करती । अमित सुमन नभिं देव वर्षती ॥

**दो०–रावण–कोप कृशानु, निज श्वास समीर, प्रचंड ॥**
**जळत बिभीषण राखिला दिधलें राज्य अखंड ॥४९ रा ॥**

**दो०–जो संपत् शिव रावणा देति देत दश-माथ ॥**
**बिभीषणा तो भूति दे संकोचें रघुनाथ ॥ ४९ म ॥**

त्यजुनि असा प्रभु भजती आना । ते नर पशु विण पुच्छ-विषाणा ॥
निज जन जाणुनि केला अपला । कपिनां प्रभुचा स्वभाव रुचला ॥
मग सर्वज्ञ सर्व–उर–वासी । सर्व रूप सब रहित उदासी ॥
वदति वचन नीति-प्रतिपालक । कारणमनुज दनुजकुलघातक ॥
श्रुणु कपीश वीर हि लंकापति । तरणें केविं गभीर अपांपति ॥
संकुल उरग मकर झष नाना । अति अगाध अति दुस्तर जाणा ॥
मग लंकेश वदे रघुनायक । कोटि सिंधु शोषक तव सायक ॥
तरी नीतिचें असें सांगणें । कीं जाउन सागरा प्रार्थणें ॥

**दो०–प्रभु तुमचा कुलगुरु जलधि चिंतुनि कथिल उपाय ॥**
**अनायास कपि भल्ल चमु सागर तरुन जाय ॥५०॥**

कथित सखे चांगल्या उपाया । करूं होइ जर दैव सहाया ॥
लक्ष्मणास हा मंत्र न भावे । रामवचें अति दुःखा पावे ॥
नाथ ! कोण तो दैव–भरोसा । सिंधु शोषणें आणुनि रोषा ॥
दैवचि गति कीं भ्याड मनाची । दैव दैव ओरड अलसांची ॥
परिसत हसुनि वदति रघुवीर । करूं असेंच मनि धरणें धीर ॥
प्रभु अनुजा यापरि समजाउनि । सिंधुनिकट रघुराजा जाउनि ॥
प्रथम नमन केलें शिर नमुनी । मग बसले तटि दर्भ पसरुनी ॥

येइ विभीषण जैं प्रभुपासीं । पाठि धाडि रावण हेरासी ॥

**दो०–सकल चरित बघती ते धरुनि कपट-कपि-देह ॥**
**प्रभुगुण हृदिं वाखाणती प्रणतावरतीं स्नेह ॥५१॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ७ वा

राम स्वभाव वानिति उघडहि । प्रेमें अति, विसरुनि निज कपटहि ॥
तैं रिपुहेर कपींनां कळलें । बांधुनि सब कपिपतिशि आणले ॥
सुग्रिव वदला ऐका वानर । धाडा भंगुनि अंगनिशाचर ॥
आज्ञा ऐकुनि वानर धावति । बांधुनि कटकिं धिंड सब काढति ॥
नानापरिं कपि हाणिति झोडिति । दीन वचनिं विनवितां न सोडिति ॥
हरतिल अमच्या नाका–कानां । कोशलपतिची आण तयानां ॥
श्रवुनि निकट त्यां लक्ष्मण अणविति । शीघ्र, दया ये, हसुनि सोडविति
द्या रावण-करिं पत्र वदा त्या– । लक्ष्मण वचन वाच कुलघात्या ॥

**दो०–मम संदेश उदार त्या मूढ–कानिं घालाल ॥**
**भेट सिता देउनि न तर तुमचा आला काळ ॥५२॥**

त्वरें नमुनि लक्ष्मणपदिं माथा । निघति दूत वर्णित गुणगाथा ।
वदत रामयश लंके आले । रावणपदिं शिर नमते झालें ॥
दशमुख विहसुनि विचारि वृत्ता । वदसि न शुक आपली कुशलता ॥
सांग वृत्त मग विभीषणाचें । मरण निकट अति आलें ज्याचें ॥

राज्य करत शठ लंके त्यागी । यवकीटक होईल अभागी ॥
मग वद रीस कीश कटकें, तीं । प्रेरित कठीण काळें येतीं ॥
त्यांचें जीवन–रक्षणकर्ता । होइ चित्तमृदु तटिनी भर्ता ॥
तापस वार्ता वद मग सारी । ज्यांचे हृदयिं भीति मम भारी ॥

**दो०–झाली भेट कि गत मम ऐकुनि सुयश अपार ॥**
**वदसि न रिपुबल तेजबल चकित चित्त तव फार ॥५३॥**

नाथ कृपेनें पुसलें जेवीं । त्यजुनि कोप वच माना तेवीं ॥
जाइ अनुज तुमचा भेटे जैं । राज्य टिळक त्या कृत रामें तैं ॥
रावण चर अम्हि पडतां कानां । बांधुनि दुःख देति कपि नाना ॥
श्रवण नासिका कापूं लागति । राम शपथ घालूं तैं त्यागति ॥
पुसिली नाथ राम सेना जी । मुखीं कोटि शत वदवेना ती ॥
विविध-वर्ण कपि भल्ल सैन्य वर । विकटानन हि विशाल भयंकर ॥
जो पुर जाळी वधि तव तनया । सकल कपी मधि अल्प बल तया ॥
अमित नाम भट कठिण कराल हि। अमित नाग बल विपुल विशालही

**दो०–द्विविद मयंद नील नल अंगद गद विकटासि ॥**
**दधिमुख केसरि निशठ शठ जांबवंत बलरासि ॥५४॥**

सुग्रीवासम हे कपि जाणा । असे कोटि किति अगणित नाना ॥
रामकृपें बल अतुल तयानां । तृण सम गणती त्रय लोकानां ॥
असें श्रवणिं आलें दशकंधर । अठरा पद्मे यूथप वांदर ॥
नाथ ! कटकिं कपि ऐसा नाहीं । जो ना जिंकिल रणीं तुम्हांही ॥

परम रुष्ट सब चोळिति हात हि । परि आज्ञा देति न रघुनाथ हि ॥
व्याल झषांसह शोषूं सागर । भरूं भूधरीं विशाल ना तर ॥
मर्दुनि धुळीं मिळवुं दशशीसा । मी श्रुत असें वदत सब कीशां ॥
गर्जति तर्जति सहज अशंक हि । ग्रासूं बघति जणूं लंकेसहि ॥

**दो०–सहज शूर कपि भल्ल सब त्यांत शिरीं प्रभु राम ॥**
**जिंकिति रावण काळ ही कोटि करुनि संग्राम ॥५५॥**

रामतेज वल बुद्धि–विपुलता । शेष लक्षही थकतिल वदतां ॥
एकचि शर शोषिल शत सागर । तव भावास पुसति नयनागर ॥
मानुनि तद्वच जलनिधिपासी । मागति पंथ कृपा चित्तासी ॥
श्रवत वचन विहसे दशशीस । अशि मति तरि सहाय कृत कीश ॥
सहज भीरुचीं मानुनि वचनें । वारिधिपाशीं धरलें धरणें ॥
मूढ ! मृषा महती कां गासी । पावूं रिपुबल मति–ठावासि ॥
सचिव सभीत विभीषण ज्यासी । विजय विभूति कुठुनि जगिं त्यासी
दूत-रोष खलवचें वाढला । समय बघुनि काढी पत्राला ॥
या पत्रा देई रामानुज । नाथ वाचवुनि उर निववा निज ॥
विहसुनि वाम करीं घे रावण । सचिवाकरविं करवि शठ वाचन ॥

**दो०-शठ शब्दीं मन रिझवुनी कर न कुळाचा घात ॥**
**राम विरोधि न जगसि विधि-हरिहर शरणहि जात ॥५६रा**

**दो०– त्यजुन मान हो अनुजसा प्रभु-पद-पंकज भृंग ॥**
**कीं हो रामशरानलीं खल ! कुल सहित पतंग ॥५६म॥**

श्रवत सभय मनिं, सस्मित आनन । सांगतसे सर्वांस दशानन ॥
भुवीं पतित, करिं नभा जसा धरि । लघुतापस वाग्विलास हा करि ॥
नाथ ! म्हणे शुक सत्य चि वाणी । समजा, त्यजुनी प्रकृति अभिमानी
मम वच ऐका त्यजुनि क्रोधा । त्यजा नाथ तुम्हि राम-विरोधा ॥
अति कोमल रघुविरस्वभाव । जरी अखिल भुवनांचे राव ॥
भेटत तुम्हीं कृपा प्रभु करतिल । एकहि अपराध न मनिं धरतिल ॥
जनक सुता रघुनाथा द्यावी । प्रभु मम विनति इतकि ऐकावी ॥
यदा वदे द्यावी वैदेही । शठ लत्ते ताडी त्यातेंही ॥
चरणिं नमुनि शिर गत तो तिथें । कृपासिंधु रघुनायक जिथें ॥
प्रणमुनि कथा निवेदी अपली । रामकृपेनें निजगति मिळली ॥
कुंभज-ऋषि-शापें किं भवानी । राक्षस बनला मुनि जो ज्ञानी ॥
घडि घडि वंदुनि राम-पदांला । गेला मुनि मग निजाश्रमाला ॥

**दो०–विनति जलधि जड मानिना जरि गेले दिन तीन ॥**
**वदले राम सकोप तैं प्रीति न भीतीवीण ॥५७॥**

लक्ष्मण आण शरासन सायक । सिंधु शोषितो विशिखें पावक ॥
शठा विनति कुटिलाशीं प्रीती । सहज कृपण त्या सुंदर नीती ॥
ममता–निरता ज्ञान–कहाणी । अति लोभ्यास विरति वाखाणी ॥
क्रोध्या शम काम्या हरिकथा । उप्त बीज ऊषरिं फळ यथा ॥
कथुनि चाप रघुपतिंनिं चढवलें । हें मत लक्ष्मण–मना अवडलें ॥
प्रभु संधानिति शरा कराला । उदधि-उदरिं उठल्या तों ज्वाळा ॥

मकर उरग झष वृंद विव्हळत । जळति जंतु, ज जलनिधि जाणत ॥
कनक पात्रि भरि मणि गण नाना । विप्ररूप ये त्यजुनी माना ॥

**दो०–कोटि यत्नि शिंपा कदलि कापुनि फळते तीच ॥**
**श्रुणु खगेश मानि न विनति धाकें नमती नीच ॥५८॥**

सभय सिंधुनें प्रभुपद धरले । क्षमा नाथ ! अवगुण मम सगळे ॥
गगन समीर अनल जल धरणी । यांची नाथ ! सहज जड करणी ॥
त्वां प्रेरित मायेनें निर्मित । सृष्टि हेतु सद्ग्रंथीं वर्णित ॥
प्रभु-आज्ञा ज्या जैसी आहे । तसें वागतां तो सुख लाहे ॥
प्रभो ! उचित मज केलें शासन । मर्यादा तरि निर्मित आपण ॥
ढोल गवार शूद्र पशु नारी । हे सब ताडनास अधिकारी ॥
प्रभू प्रतापें सुकेन मी जरि । जाइ कटक, नहि मम महती तरि ॥
प्रभु-आज्ञा श्रुति वदति अभंगा । करिन शीघ्र जें आपण सांगा ॥

**दो०–वच सुनम्र परिसुनि वदति सस्मित कृपा-अगार ॥**
**तात उपाय असा वदा उतरे कपिदळ पार ॥५९॥**

नाथ ! नील नल कपि भावांला । बाल्यीं ऋषि-आशीस मिळाला ॥
त्यांच्या स्पर्शें सागरिं गिरिवर । तव प्रतापें तरति जलावर ॥
प्रभुची प्रभुता मी हृदिं धरुनी । साह्य यथाबल पाहिन करुनी ॥
नाथ ! बांधवा पयोनिधि असा । कीं त्रिभुवन या गाइल सुयशा ॥
या शरिं मग उत्तर-तट-वासी । वधा नाथ खल नर अघरासी ॥
सागर पीडा कृपालु जाणति । शीघ्र राम रणधीर निवारति ॥

भारि राम-बल पौरुष पाहुनि । सुखी पयोनिधि होई हर्षुनि ।।
कथिले प्रभुला चरित्र सगळें । प्रणमुनि पदीं पयोधि परतले ।।

छं०—निज भवनि गत, मत सिंधुचें श्री रघुपतीनां मानले।
हें चरित कलिमल हर, यथामति तुलसिदासें गाइलें ।।
सुख-भवन, संशय-शमन, दमन विषाद रघुपति गुणगणां।
गा त्यजुनि आशा सब भरंवसा ऐक संतत शठ मना ।।१।।

दो०—सकल सुमंगलदायक रघुनायक-गुण-गान ।।
सादर ऐकति तरति ते भवनिधि विण जलयान ।।६०।।


मास पारायण, चोविसावा विश्राम.

❖ ❖ ❖

इति श्रीमद्रामचरितमानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने
पंचमः सोपानः

सुन्दरकाण्डं समाप्तम्
जय जय रघुवीर समर्थ

# रामरथारोहण



तेजपुंज रथ अनुपम दिव्यहि। हर्षित चढति अयोध्या-भूपहि॥

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभाय नमः॥

# ॥ श्रीरामचरितमानस ॥

## ( मराठी )

## ॥ षष्ठः सोपानः ॥

## ( लंकाकाण्ड )

❖ ❖ ❖

### अध्याय १ ला

### अनुवादक-कृत मंगलाचरण

अहं दशास्यं घटकर्णमोहं कामाभ्रनादं परिवारयुक्तान् ।
हत्वा रिपून् मैथिलराजपुत्र्या शान्त्या समेतोऽभयदोऽस्तु रामः ॥१॥

पृथ्वी०-निपीय मनुजोऽमृतं यदि भवेद्विमुक्तो रुज-।
स्तथापि न निवारयेज्जनिभयं प्रपञ्चं हि तत् ॥

महद्भूयनिवारकं गुरुपदाब्ज निर्णेजनं ।
सुपुण्यधन-तोषित-प्रभुकृपांकितैर्लभ्यते ॥२॥

## मूळ मंगलाचरण

स्रग्धरा–रामं कामारि-सेव्यं भवभयहरणं काल-मत्तेभ-सिंहम्
योगीन्द्रं ज्ञानगम्यं गुणनिधिमजितं निर्गुणं निर्विकारम् ॥
मायातीतं सुरेशं खलवध निरतं ब्रह्मवृन्दैकदेवं ।
वन्दे कन्दावदातं सरसिजनयनं देवमुर्वीशरूपम् ॥३॥

शा० वि०–शंखेन्द्वाभमतीवसुंदर-तनुं शार्दूलचर्माम्बरं ।
कालव्यालकराल-भूषणधरं गंगाशशांकप्रियम् ॥
काशीश कलिकल्मषौघशमनं कल्याणकल्पद्रुमं ।
नौमीड्यं गिरिजापतिं गुणनिधिं कन्दर्पहं शंकरम् ॥४॥

श्लोक०–यो ददाति सतां शंभुः कैवल्यमपि दुर्लभम् ।
खलानां दण्डकृद्योऽसौ शंकरः शं तनोतु मे ॥५॥

दो०–लव निमेष परमाणु युग वर्ष कल्प शर चंड ॥
भजसि न मन रामास त्या काल यस्य कोदंड । मं दो. १॥

सो०–श्रवुनि सिंधुवच राम अणवुनि सचिवां प्रभु म्हणति ॥
काय विलंबा काम रचा सेतु कटकें तरति ॥मं. सो. १॥
पहा भानुकुलकेतु वदे जांबवान् जुळुनि कर ॥
नाथ! नाम तव सेतु चढुनी भवनिधि तरति नर ॥मं. सो. २

हा लघु जलधि तरत किति वारहि । श्रवुनि वदे मग पवन कुमारहि ।।
प्रभु प्रताप वडवानल भारी । शोषी प्रथम पयोनिधि-वारी ।।
तव-रिपु-नारि-रुदन-जलधारा । त्यानीं भरुनि होय मग खारा ।।
पवनतनय-अत्युक्तिस परिसति । रघुपतिकडे बघुनि कपि हर्षति ।।
अणवि जांबवान् दो भावांसी । वदे कथा सब नल नीलांसी ।।
प्रभूप्रतापा स्मरुनि मनां ही । सेतू करा प्रयास न काहीं ।।
मग बोलावुनि चे कपि निकरां । ऐका विनती सकल मम जरा ।।
रामचरण-पंकजा उरिं धरा । एक कौतुका भल्ल कपि करा ।।
धावा मर्कट विकट वरूथ । आणा विटप-गिरींचे यूथ ।।
गत कपि भल्ल करित तैं हूं हा । जय रघुवीर प्रताप समूहा ।।

**दो०– गिरि पादप उत्तुंग अति घेति सलील तुकून ।।**
**आणुनि देती, नील नल रचिति सेतु घेऊन ।।१।।**

गिरि विशाल कपि आणुन देती । चेंडु जसे नलनीलहि घेती ।।
बघुनि सेतु अति सुंदर रचना । विहसुनि वदति कृपानिधि वचना
परम रम्य उत्तम ही धरणी । महिमा अमित कोण किति वर्णी ।।
करिन इथें शंभू–स्थापना । माझे हृदयिं परम कल्पना ।।
तै कपीश बहु दूत धाडिती । सकल मुनिवरां घेउन येती ।।
स्थापुनि लिंग सविधि कृत पूजा । प्रिय मज शिवसम नाहीं दूजा ।।
शिवद्रोहि मम भक्त म्हणवतो । स्वप्निहि तो नर मज न पावतो ।।
शंकर-विमुख भक्ति मम वांछति । तो हि नारकी मूढ अल्पमति ।।

**दो०–मद्द्रोही, प्रिय शंभु ज्यां शिवद्रोहि मम दास ॥**
**ते नर करती कल्पभर नरकीं घोर निवास ॥२॥**

जे रामेश्वर-दर्शन करतिल । त्यजतां तनु मम लोकीं जातिल ॥
जे गंगाजल आणुनि घालति । ते सायुज्यमुक्ति नर पावति ॥
निष्कामहि निष्कपट सेवितिल । शंकर त्यांस भक्ति मम देतिल ॥
मम कृत सेतु-दर्शना करतिल । ते अश्रम भवसागर तरतिल ॥
रामवचन सकलां मनिं रुचलें । मुनिवर निज निज आश्रमिं आले ॥
गिरिजे रघुपतिची ही रीती । संतत करिती प्रणतीं प्रीती ॥
सेतु बद्ध नागर नल नीलें । रामकृपें यश जगिं उजळीलें ॥
आपण बुडुनी दुजां बुडवती । उपल जहाजा सम ते बनती ॥
महिमा हा न जलधिचा म्हणती । कपिकृति ना, न उपलगुण गणती ॥

**दो०–श्री रघुवीर प्रतापहिं तारि जलधि पाषाण ॥**
**मतिमंदचि रामा त्यजुनि भजति वृथा प्रभु आन ॥३॥**

बद्ध सेतु अति सुदृढ बनवला । बघुनि कृपानिधिचें मनिं भरला ॥
चाले कटक न वदले जाय । गर्जति मर्कट भट समुदाय ॥
सेतुबंध तटिं रघुपति चढती । सिंधु विपुलता कृपालु बघती ॥
देखाया प्रभु करुणा कंद । प्रगट होति सब जलचर-वृंद ॥
मकर नक्र झष नाना व्यालहि । शत योजन तन परम विशालहि ॥
कांहि असे गिळतीहि अशांनां । तेहि घावरति परी दुजानां ॥
प्रभुस बघति, ना हटति हटवले । सर्व सुखी बहु मनीं हर्षले ॥

त्यांच्या आड, न दिसते वारी । मग्न बघुनि हरिरूपा भारी ।।
कटक निघे प्रभु आज्ञा मिळतां । कोण वर्णि कपिकटक–विपुलता ।।

**दो०–सेतुबंधि गर्दी अति कपि नभपंथि उडतात ।।**
**चढ चढुनी जलचरांवरि अपर पार जातात ।।४।।**

उभय बंधु हें कौतुक बघती । विहसति रघुपति कृपालु निघती।।
उतरलेहि रघुवीर ससेना । कपि यूथप दाटी वदवेना ।।
तळ देती प्रभु पार सागरा । आज्ञा दिधली सकल कपिवरां ।।
खा जाउनि फल मूल सुशोभन । श्रवत धावले भल्ल कीशगण ।।
सब तरु फळले रामालागुनि । कालगती ऋतु कुऋतू त्यागुनि ।।
खाति मधुर फळ विटपां हलविति । लंके सम्मुख शिरवरें फेंकिति ।।
फिरत कुठें जैं निशिचर निरखिति । घेरिति सगळे नाच नाचविति ।।
दशनीं कापुनि नाकां कानां । प्रभुयश वदवुनि सोडिति त्यानां।।
ज्यांचे नासा कर्ण कापले । ते जाउनि रावणास वदले ।।
श्रवणीं पडतां वारिधि-बंधन । दशमुखि उद्गारला व्याकुळुन ।।

**दो०–बद्ध नीरनिधि व्ननिधि जलधि सिंधु वारीश ।।**
**सत्य ? तोयनिधि कंपति उदधि पयोधि नदीश ।।५।।**

व्याकुळता मग अपली बघुनि । विहसुनि जाइ गृहीं भय भुलुनी ।।
मंदोदरि ऐके प्रभु आला । सिंधु कौतुकें बद्ध करविला ।।
पतिस धरुनि कर निज गृहि आणी। बोले परम मनोहर वाणी ।।
पसरी पदर पदीं शिर नमुनी । प्रिय ! ऐका वच कोप टाकुनी ।।

नाथ ! वैर तों त्यासी करणें । वुद्धि-वळें ज्या शक्य जिकणें ॥
तुम्हि-रघुपति-मधि अंतर कैसे । खलु खद्योत-दिनकरीं जैसें ॥
अतिवल मधु-कैटभ जो मारी । महावीर दितिसुत संहारी ॥
वलि बांधुनि दशशतभुज वधला । तो भूभार-हरण अवतरला ॥
त्यासि विरोध नका करूं नाथा । जीव काल कर्म ज्या हातां ॥

**दो०–रामा सोपुनि जानकी नमुनि कमलपदि माथ ॥**
**सुता राज्य अर्पुनि भजा जाउनि वनि रघुनाथ ॥६॥**

नाथ ! दीन दयाळु रघुराजहि । जातां शरण, न खाई वाघहि ॥
केले सगळ्या कर्तव्याला । विजित सुरासुर चरांचरांला ॥
संत वदति अशि नीति दशानन । वृद्ध नृपें सेवावें कानन ॥
तिथें करा तद्भजना भर्ता ! । जो कर्ता धर्ता संहर्ता ॥
रघुविर तो अनुरागी प्रणतां । नाथ भजा त्यागुनि सब ममता ॥
मुनिवर यत्न करिति ज्या लागीं । त्यजुनि राज्य नृप होति विरागी ॥
तो कोसलाधीश रघुराया । आला करण्या तुझ्यावर दया ॥
प्रिय जर माना माझी शिकवण । त्रिभुवनिं भरे सुयश अति पावन ॥

**दो०–विनवत नयनीं नीर ये धरि पद कंपत काय ॥**
**नाथ भजा रघुनाथ हि मम सौभाग्य चिराय ॥७॥**

तैं रावण उठवुनी मय सुते । खल वदूं लागे अपल्या प्रभुते ॥
श्रुणु तूं प्रिये ? वृथा भय धरसी । कोण वीर जगिं समान मजसी ॥
वरुण कुवेर पवन यम कालां । विजित भुजवळें सब दिक्पालां ॥

देव दनुज नर सव वश मजला । कवण हेतु भय उपजं तुजला ।।
समजाउनि नानापरिं तिजला । सभेमाजि मग जाउन बसला ।।
कळलें मंदोदरि हृदयाला । कालविवश अभिमान किं झाला ।।
येउनि सभे पुसे सचिवांसी । युद्ध कशापरि करणें रिपुशी ।।
सचिव वदति कीं निशिचरपाला । प्रभु ! पुसणें बहुवार कशाला ?।।
वदा कवण भय करूं विचार । अमचा नरकपिभल्ल अहार ।।

**दो०-तें प्रहस्त ऐकुनि सकल बोले करयुग जोडि ।।**
**नीतिविरोध न करा प्रभु मंत्र्यां मति अति थोडि ।।८।।**

वदति सचिव शठ तोंडपुजे अति । नाथ ! न पुरें पडे या पद्धतिं ।।
लंघुनि सिंधु एक कपि आला । स्मरति सकल मनिं तच्चरिताला ।
तैं न भूक मुळि तुम्हां कुणाला । जाळित पुर कां धरुन न खाल्ला ।।
श्रवणिं सुखद अंतीं दुःखद जें । मत सचिवानीं प्रभुस कथित तें ।।
बांधविला जिंहि वारिधि हेलां । सेनेसह उतरले सुवेला ।।
म्हणे 'मनुज तो 'खाऊ' म्हणती । गाल फुगवुनी वृथा वल्गती ।।
श्रुणु मम वचन तात ! अति सादर । समजुं नका मनिं मजला कातर ।।
प्रिय वाणी जे ऐकति, वदती । ऐसे जगिं नर निकाय असती ।।
वचन परम हित कर्णकठोर हि । श्रोते वक्ते प्रभु नर अल्पहि ।।
प्रथम धाड दूतां श्रुणु नीती । सीता देउनि करणें प्रीती ।।

**दो०-नारी मिळतां जाति जर तर न वाढवा वैर ।।**
**ना तर सम्मुख करा रणिं झुंझ तात कीं स्वैर ।।९।।**

प्रभु जर हें मम मत मानवलें। तर जगि सुयश उभयपरि अपलें ॥
म्हणे रुष्ट दशकण्ठ सुतासी। शिकवि कोण अशि मति शठ! तुजसी
इतक्यांतचि उरिं संशय होई। वेणुमूळि सुत जात धमोई ॥
परिसुनि पितृवच खर अति घोर। जाई भवनिं वच वदुनि कठोर ॥
मत हितकर तुज रुचे न तैसें। कालवशा कटु भेषन जैसें ॥
संध्या-समय वघुनि दशशीस। जाइ भवनिं निरखत भुज वीस ॥
लंका शिखरावर आगार। तिथें अखाडा विचित्र फार ॥
जाइ बसे त्या मंदिरिं रावण। गावुं लागले किंनर गुणगण ॥
वाजति पखवाज टाळ वीणा। नृत्य करिति अप्सरा प्रवीणा ॥

**दो०-सुनासीर-शत सदृश तो संतत करी विलास ॥**
**प्रबल परम रिपु शिरीं जरि तरी न चिंता त्रास ॥१०॥**

इथें सुवेल शैलिं रघुवीर। उतरति सचमू गर्दी फार ॥
शिखर एक अति तुंग बघोनी। परम रम्य, सम शुभ्रा क्षोणी ॥
तरु किसलय बहु सुमनें शोभन। रुचिर विरचिती स्वकरें लक्ष्मण।
मृदुल मृगाजिन रुचिर तयावर। त्या आसनिं आसीन कृपाकर ॥
प्रभुचें शिर कपिपति-उत्संगीं। चाप निषंग वाम-दक्षांगीं ॥
युग करकमलिं निरीक्षित बाणां। वदे मंत्र लंकेश्वर कानां ॥
महाभाग्य अंगद-हनुमानां। चरण कमल चेपिति परि नाना ॥
मागें लक्ष्मण कृत-वीरासन। कटिं निषंग करिं बाण शरासन ॥

**दो०-ऐसे कृपा-रूप-गुण-धाम राम आसीन ॥**
**धन्य मनुज या ध्यानिं जे असति सदा लयलीन ॥११रा॥**

**दो०-पूर्व दिशे प्रभु पाहतां दिसला उदित मयंक ॥**
**वदति पहा सकलहि शशिसि मृगपति सदृश अशंक ॥११म॥**

पूर्वदिशा–गिरिगुहा–निवासी । परम प्रताप-तेज-बल-राशी ॥
मत्त–नाग–तमकुंभ–विदारी । शशि केसरी गगन-वनचारी ॥
नभि विकीर्ण मुक्ताफल तारा । निशा-सुंदरी करि शृंगारा ॥
प्रभु वदले शशिमधि मेचकता । कसली, सांगा तुम्हीं निज मता ॥
ऐका रघुपति सुकंठ सांगत । शशिमधि तों भूछाया प्रगटत ॥
मारी राहु शशिस कुणी वदला । काळा डाग हृदयिं तो पडला ॥
कोणि म्हणे विधि रति वदनाला । रचि तेव्हां हरि शशिसाराला ॥
छिद्र इंदु-उरि दिसे प्रगट तें । त्यांतुन नभपडछाया दिसते ॥
प्रभु वदले विष शशिचा बंधुहि । प्रिय अति निज हृदयीं त्या ठेविहि ॥
विषसंयुत कर–निकर पसरतो । विरहवंत नर नारि जाळतो ॥

**दो०–ऐका प्रभु हनुमान् म्हणे शशि तुमचा प्रिय दास ॥**
**विधु हृदि तव मूर्ती वसे तो मेचकताऽऽभास ॥१२रा॥**

## नवाह पारायण, सप्तम विश्राम.

❖ ❖ ❖

## अध्याय २ रा

**दो–पवनतनयवच ऐकुनी विहसति राम सुजाण ॥**
**अवलोकुनि दक्षिणे प्रभु वदले कृपा निधान ॥१२ म॥**

वध किं विभीषण दक्षिण आशे । घन घमंड दामिनी विलासे ॥
मधुर मधुर गर्जति घन घोर । उपल वृष्टि होवो न कठोर ॥
म्हणे विभीषण पहा कृपाला । नाहीं तडित न वारिद-माला ॥
लंका-शिखरावर आगार । जलसा तिथें बघे दशकंधर ॥
छत्र मेघडंबरी शिरावर । जणुं अति काळी जलदघटा वर ॥
ताटंकें मंदोदरि-कानीं । प्रभु ! त्या जणुं चमकती दामिनी ॥
टाळ-मृदंग वाजती अनुपम । मधुर मधुर रव तो सुरसत्तम ॥
प्रभु सस्मित जाणुनि अभिमान हि । सज्य चापकृत शरसंधान हि ॥

**दो०-छत्र मुकुट ताटंक तैं तोडी एकचि बाण ॥**
**सर्वां देखत पतित महि कुणा न मर्मज्ञान ॥१३रा॥**

**दो०-लीला करुनी रामशर य आश्चर्यी निषंग ॥**
**रावण सभा सशंक सब बघुनि महा रसभंग ॥१३म॥**

भूमिकंप नहि नसे प्रभंजन । अस्त्र शस्त्र बघती न विलोचन ॥
निज निज चित्तीं सचिंत सारी । अशकुन होइ भयंकर भारी ॥
सभय सभा देखुनी दशानन । विहसुनि करि युक्तीनें भाषण ॥
शिरंहि गळत संतत शुभ ज्याला । मुकुट पडुनि कीं अशकुन त्याला ॥
निजा निजा निज निज गृहिं जाउनि । गेले भवनि सकल शिर नमवुनि
मंदोदरी उरिं चिंता बसली । कर्णफुलें ज्जैं महिवरि पडलीं ॥
सजल विलोचन युग कर जोडी । म्हणे प्राणपति ! विनंति थोडी ॥
कांत ! राम वैरा परिहरणें । समजुनि मनुज, हट न मनि धरणें ॥

**दो०-विश्वरूप रघुवंश-मणि धरा वचनि विश्वास ॥**
**लोक-कल्पना वेद करि ज्याच्या प्रत्यंगास ॥१४॥**

पद पाताल शीर्ष अज-धामहि । अंगि इतर लोकां विश्रामहि ॥
भृकुटि-विलासच काल भयंकर । कच घनमाला नयन दिवाकर ॥
घ्राण यस्य अश्विनी कुमार । रजनी दिवस निमेष अपार ॥
श्रवण दिशा दश वेद चि वानी । श्वास मरुत निज ती श्रुति वाणी ॥
ओष्ठ लोभ यम दशन कराल । माया हास बाहु दिक्पाल ॥
आनन अनल अंबुपति जिव्हा । सृष्टि स्थिति संहार समीहा ॥
रोमराजि अठराहि वनस्पति । अस्थि शैल नस जाल नद्या अति
उदर उदधि अधगो यातना । प्रभु जगमय कां बहु कल्पना ॥

**दो०-अहंकार शिव, बुद्धि अज, मन शशि, चित्त महान ॥**
**मनुज वास सचराचर रूप राम भगवान ॥१५रा॥**
**दो०-अशा विचारें प्राणपति! त्यजुनी प्रभुवैरास ॥**
**प्रीति करा रघुवीर पदिं मम सौभाग्य न नास ॥१५म॥**

परिसुनि नारी वचन विहसला । अहो मोह महिमा बलि कसला! ॥
स्त्री स्वभाव सत्य चि कवि वदति । अवगुण आठ सदा हृदिं वसती ॥
साहस माया अनृत चपलता । भय अशौच अविवेक अदयता ॥
त्वां रिपुरूप गाइलें सगळें । अति विशाल भय मजसि घातलें ॥
प्रिये! मला वश सहज सकळ तें । तुझ्या प्रसादें आतां कळतें ॥
प्रिये चतुरता तुझी समजली । प्रभुता मम कथिलिस अशि सगळी ॥

मृगलोचनी ! गूढ तव वाणी । कळत सुखद ऐकत भयदानी ॥
ठसलें मंदोदरी मानसीं । होइ काळवश धीभ्रम पतिसी ॥

**दो०–करत विनोद असा बहु उजाडतां दशकंध ॥**
**सहज अशंक लंकपति गत सभेंत मद–अंध ॥१६रा॥**

**सो०–फुले फळे ना वेत यदपि सुधा वर्षति जलद ॥**
**मूर्खा ज्ञान न येत जरि गुरु मिळे विरंचि सम ॥१६म॥**

प्रातरिथें उठलें रघुराव । पुसलें मत बोलावुनि सचिव ॥
वदा शीघ्र करुं काय उपाया । वदे जांबवान् वंदुनि पायां ॥
श्रुणु सर्वज्ञ सकल-हृद्वासी । मति-बल-तेज–धर्म–गुण–राशी ॥
मंत्र सांगतो मति–अनुसारां । दूत धाडणें वालि कुमारा ॥
मंत्र रुचिर सब देती मान । वदति अंगदा कृपानिधान ॥
वालितनय मति बल गुण धामा । जा लंकेंत तात मम कामा ।
तुम्हां कासया बहुत वदावें । परम चतुर मज आहे ठावें ॥
रिपुहित अमचें कार्य घडावें । असें शत्रुशीं तुम्हीं वदावें ॥

**सो०–प्रभुपदिं ठेवी शीस शिरसा मानुनि वच, उठत ॥**
**तो गुणसागर ईश राम कृपा ज्यावर अपलि ॥१७रा॥**

**सो०–स्वयंसिद्ध सब काज प्रभुनीं आदर दिला मज ॥**
**अस चिंतुनि युवराज हर्षित, तनु पुलकित सहज ॥१७म॥**

नमुनि पदीं प्रभुला उरिं धरुनी । गेला अंगद सकलां नमुनी ॥
प्रभू प्रताप सहज उरिं निधडा । वालि–तनय रणपंडित गाढा ॥

पुरि शिरला तों रावण-वेटा । खेळत असतां गाठ अवचटां ॥
म्हणतां म्हणतां जुंपे भांडण । उभय अतुलवल वरी तरुणपण ॥
तो लत्ता अंगदा उगारी । भ्रमवि धरुन पद अपटुन मारी ॥
निशिचर निकर वघूनि भारि भट । ओरडुं शकति न, जाति पटापट ॥
कोणी कोणां मर्म न सांगति । त्याचा वध समजुनि चुप राहति ॥
कोलाहल नगरींत जहाला । जाळी लंके तो कपि आला ॥
नेणो अतां काय करि कर्ता । करिति विचार सभय अति चित्ता ॥
पुसल्या वाचुनि मार्ग दावती । ज्यांस विलोकि सुकुन ते जाती ॥

**दो०-सभाद्वारिं गेला मग स्मरुनि रामपद-कंज ॥**
**पाहि सभोंवति सिंहसा धीर वीर बलपुंज ॥१८॥**

त्वरें निशाचर एक पाठवी । समाचार रावणास कळवी ॥
श्रवत वदे विहसुनि दशशीस । या घेउनि कुठला तो कीश ॥
आज्ञा मिळत दूत बहु पळले । घेउनि कपिकुंजरास आले ॥
असा अंगदा दशमुख दिसला । सप्राणचि कज्जलगिरि बसला ॥
भुजा विटप शिर शृंगें जाणा । रोमावली लता जणुं नाना ॥
मुख नासिका नयन कानानां । गिरिकंदरा गुहा अनुमाना ॥
शिरे सभें, मनि कचला न जरा । वालि तनय अति बलवान जबरा ॥
कपिला बघूनि सभासद उठले । रावण हृदयीं विशेष खवळे ॥

**दो०-यथा मत्तगज-गणि शिरे पंचानन येऊन ॥**
**प्रभू प्रतापा स्मरुनि मनि बसे सभेंत नमून ॥१९॥**

❖ ❖ ❖

# अध्याय ३ रा

दशमुख म्हणे कोण तूं वांदर । मी रघवीर दूत दशकंधर ॥
होति मैत्रि मम जनकाची तव । आलो बाबा तव चि हितास्तव ॥
उत्तम कुल तुम्हि पुलस्ति पौत्रहि । पूजित विविधा विरंचि रुद्रहि ॥
वर पावुनि सब केलीं काजे । लोकपाल जित सर्वहि राजे ॥
नृप अभिमानें मोहें कीं बा । हरिली त्वां सीता जगदंबा ॥
शृणु आतां मम शुभ वचनाला । क्षमिती प्रभु तव अपराधांला ।
धरुनि दांति तृण कंठि कुठारी । परिजन सहित सवें निजनारी ॥
सादर जनकसुतेचे मागें । असे चला सब भीती त्यागें ॥

**दो०-प्रणतपाल रघुवंशमणि त्राहि अतां मज त्राहि ॥**
**आर्त गिरा ऐकतां प्रभु करितिल अभय तुलाहि ॥२०॥**

रे कपि पोत बोल संभाळुन । मूढा जाणसि मज सुर शत्रु न ॥
वद तव नाम हि तव जनकाचें । नातें मानुं कसें मित्राचें ॥
अंगद नाम तनय वालीचा । योग तयासि कधीं भेटीचा ? ॥
लाजे ऐकुनि अंगद-वच तें । वाली वानर होता स्मरतें ॥
अंगद तूंच वालिचा बालक । उपजसि वंशानल कुल घातक ॥
गर्भ न गळला वृथा जन्मसी । स्वमुखें तापस दूत म्हणविसी ॥
वालि कुशल कोठें वद आहे । विहसुनि अंगद असं वदताहे ॥
वालिकडे जा जातां दश दिन । कुशल विचार कि मित्रा भेटुन ।
रामविरोधें कसें कुशल तें । सर्व तोच तुज वदेल पुरतें ॥

श्रुणु शठ भेद होइ मनिं त्याचें । श्री रघुवीर हृदयिं नहिं ज्याचें ।।

**दो०–अम्हि कुलघातक सत्य तुम्हि कुलपालक दशशीस ।।**
**अंध हि बधिर न वदति अस नयन कान तुज वीस ।।२१।।**

शिव विरंचि सुर-मुनि-समुदाय । सेवुं इच्छिती ज्यांचे पाय ।।
होउन त्यांचा दूत बुडविलें– । कुळ, अशि मति तव हृदय न फुटलें
कपिची कठोर वाणी ऐकुनि । वदे दशानन नयन वटारुनि ।।
खल तव कठिण वचन सब सहतो । नीति धर्म मी जाणत असतो ।।
कपि वदला तव धर्म-शीलता । अम्हिही श्रुत परनारि चोरिता ।।
दृष्ट दूत–रक्षकता नयनीं । धर्मव्रतधारी भर बुडुनी ।।
नाककानविण भगिनी बघुनी । क्षमा कृता त्वां धर्म जाणुनी ।।
जगजाहिर तव धर्मशीलता । दर्शन अम्हांहि भाग्यें महता ।।

**दो०–जल्पुं नको जड जंतु कपि शठा पहा मम बाहु ।।**
**लोकपालबल विपुल शशि ग्रसन हेतु सब राहु ।।२२रा।।**
**दो०–मग नभसरिं मम करांनकर–कमलीं करतां वास ।।**
**शोभित होइ मराल इव शंभुसहित कैलास ।।२२म।।**

तुमच्या कटकामधि हे अंगद ! । कोण लढेल मजसि योद्धा वद ।।
प्रभु तव नारि–विरह–बलहीन । अनुज दुःखि तद्दुःखें दीन ।।
तुम्हि सुग्रीव कूलतरु दोही । अमचा अनुज भीरु अति तोही ।।
जांबवंत मंत्री अति वृद्ध । त्या किं अतां रणिं करवें युद्ध ।।
शिल्पिकर्म जाणति नलनील । हां ! कपि एक महाबलशील ।।

प्रथम येइ नगरा जो जाळी। ऐकुनि वदला कुमार वाली ॥
सत्य वचन वद निशिचर नाहा। खरेच कीं कपि करि पुरदाहा ॥
जाळि अल्प कपि रावणनगरी। कोण सत्य हें मानि वच तरी ॥
जो अति सुभट शंसिसी रावण!। तो सुग्रीवदूत साधारण ॥
चाले वहु तो वीर न ठरतो। आम्हि धाडुं घेण्यास खवर तो ॥

**दो०–सत्य नगर जाळी कपि प्रभु–आज्ञा च नसून ॥**
**फिरुन गत न सुगलाकडे राही सभय लपून ॥ २३ रा ।**
**सत्य वदसि दशकण्ठ सब श्रवुनि रोष मज नाहि ॥**
**कटकि न अमच्या कुणि तुजसि लढतां शोभे ज्याहि ॥२३म॥**
**प्रीति विरोध समां सवें करा असे हा न्याय ॥**
**जर मृगपति वधि बेडुकां बरें म्हणे कुणि काय ॥२३चं॥**
**दो०–लघुता रामाला जरी तुज वधणें अति दोष ॥**
**तदपि कठिण दशकण्ठ बघ क्षात्र जातिचा रोष ॥२३द्रा॥**
**वक्रोक्ती धनु वचन शर दाहि हृदय रिपु कीश ॥**
**प्रत्युत्तर सांडसें जणुं काढी भट दशशीस ॥ २३य ॥**
**हसुनि वदे दश मौलि तें कपिगुण मोठा एक ॥**
**जो प्रतिपाळी तद्धिता करी उपाय अनेक ॥ २३ नमः ॥**

धन्य कीश जो स्वामी काजा। जिथं तिथं नाचे पिऊन लाजा ॥
नाचुनि उडुनी जना रिझवितो। धर्म निपुण अति पतिहित करतो
स्वामिभक्त अंगद! तव जाती। प्रभुगुण कां न वदसि या रीती ॥

गुणग्राहि मी परम सुजाणहि । तव कटु रटन घेत कानीं नहि ॥
कपि वदला तव गुणग्रहणता । सत्य, पवनसुत झाला वदता ॥
वन भंगुनि सुत वधि जाळी पुरि । त्यानें कृत अपकार न मुळि तरि ॥
चिंतुनि तव तो स्वभाव सुंदर । कृता धृष्टता म्यां दशकंधर ॥
येतां दिसले जें कपि वदला । त्वेष रोष नहि लज्जा तुजला ॥
अशि मति म्हणुनिच बाप खादला । असें वदुनि दशशीस हासला ॥
बापा गिळुनी गिळतो तुजला । अतां काहि परि सुचलें मजला ॥
वालि-विमल-यश-भाजन जाणुन । तुला अधम अभिमानी मारुं न ॥
वद रावण रावण जगिं कितके । मी वदतो श्रुणु कळले जितके ॥
गत बलिजया एक पाताळां । ठेविति बांधुन शिशु हय शाळां
खेळति बालक जाती मारिति । येइ दया बलि तदा सोडविति ।
एक सहस्रभुजा आढळला । जंतु गणुनि धावुनी पकडला ॥
गमती खातर भवनिं आणिला । त्या पुलस्त्य मुनिनीं सोडविला ॥

**दो०—एक ववत संकोच मज, ठेवि वालि कक्षांत ॥**
**क्रोध तजुनि वद सत्य, तूं कुठला रावण यांत ॥२४॥**

श्रुणु शठ तो रावण बलवाला । हरगिरि जाणं यद्‌भुजलीला ॥
यत्शूरता उमापति जाणे । ज्यास पूजिलें शिरसुमनानें ॥
स्वकरें काढुनि निजशिरकमलें । अमित वार त्रिपुरारि पूजले ॥
भुजविक्रम जाणतात दिक्पति । अजुन टोचणी उरिं त्यांच्या अति
उरकाठिण्य दिग्गजां कळलें । जैं जैं त्यांस बळें आक्रमलें ॥

त्यांचे दंत कराल न रुपले- । उरिं लागतां मुळ्यासम तुटले ॥
जो चालत अशि डोले धरणी । चढत मत्त गज जशि लघु तरणी ॥
रावण तो श्रुत जगीं प्रतापी । श्रवणिं न आला मृषा प्रलापी ? ॥

**दो०–लघु म्हणसी त्या रावणा नरगुण करसी गान ॥**
**रे कपि बर्बर खर्व खल कळे तव अतां ज्ञान ॥२५॥**

अंगद सरुष वदे तैं वाणीं । संभाळुनि वद जड अभिमानी ॥
दशशतभुज–भुजगहन अगार । दहन अनल सम यस्य कुठार ॥
यस्य परशु-सागर–खर-धारां । बुडले नृप अगणित बहु वारां ॥
तो स्वगर्व ज्या बघतां त्यागी । तो कीं नर दशशीर्ष ! अभागी ! ॥
मूर्खा शठा ! मनुज कीं राम । नदी किं गंगा धन्वी काम ॥
पशु सुरधेनु कल्पतरु रूख । अन्न दान का रस पीयूख ॥
गरुड खग किं अहि सहस्त्र-आनन । चिंतामणि कां दगड दशानन ? ॥
श्रुणु मतिमंद लोक वैकुंठ । लाभ किं रघुपति–भक्ति अकुंठ ॥

**दो०–मान मथुनि तव सचमु, वन भंगुनि पुर जाळून ॥**
**शठ रे कपि हनुमान जो गत तव सुत मारून ॥२६॥**

श्रुणु रावण सोडुनि चातुर्या । भजसि न कृपासिंधु रघुवर्या ॥
रामद्रोहि खला जर बनशिल । ब्रह्मरुद्र तुज रक्षुं न शकतिल ॥
मूढ मृषा न वढाया तूं कर । रामवैर अशि करिल दशा बर ॥
तव शिरनिकर कपींचे पुढतीं । रामशरें धरणीवर पडतीं ॥
तीं तव शिरं कंदुक सम नाना । भल्ल कीश खेळति मैदानां ॥

जैं समरीं कोपति रघुनायक । सुटतिल अति कराल बहु सायक ॥
तैं करवे किं घमेंड अशी तुज । करुनि विचार उदार राम भज ॥
श्रवत वचन रावण जळफळे । जळत महानलिं जणुं घृत गळे ॥

**दो०–कुंभकर्णसम बंधु मम सुत विश्रुत शक्रारि ॥**
**जाणसि ना मम पराक्रम विजित चराचरसारिं ॥२७॥**

शठ ! शाखामृग साह्य जोडतां । सिंधुबद्ध इतकिच ही प्रभुता ॥
लंघिति खग अनेक वारीशा । शूर न होती ते श्रुणु कीशा ॥
बलजल पूरित मम भुजसागर । बुडले ज्यांत शूर बहु सुरनर ॥
वीस पयोधि अगाध अपार हि । कोण वीर जो पावे पारहि ॥
मी दिक्पतिकरिं नीर भरविलें । भूपसुयश खल मज ऐकविलें ॥
समर सुभट तव नाथ असे जर । ज्याचे गुण वर्णिसि वरचेवर ॥
दूत धाडि मग कोण्या काजें । रिपुशीं प्रीति करत ना लाजे ॥
हरगिरि–मथन निरख मम बाहु । शठ गा स्वामी स्तुति मग पाहूं ! ॥

**दो०–शूर कवण रावण सदृश स्वकरें कापुनि शीस ॥**
**हुत अति हर्षें अनलिं बहु-वार-साक्षि गौरीश ॥२८॥**

जळतां पाहूं यदा कपालां । विधिनें लिखित अंक मम भालां ॥
नरहस्तें वध अपला वाचीं । तैं हसलों विधिगिरा असाची ॥
स्मरुनि तेंहि मनिं भीति न मातें । भ्रमें जरठ विधि लिहि लेखातें ॥
अन्य वीरबल शठ मज पुढतीं । वदसी त्यजुनी लाज पत किती ॥
अंगद वदला जगीं लाजरा । रावण ! तुजसम कोणि न दुसरा ॥

लाजवंत सहज तूं स्वभावें। स्वमुखें निज–गुण–गान न ठावें ॥
शिर–गिरि–कथा मनीं राहिली। वीस वेळ यास्तव गाइली ॥
तें भुजबल तूं उरि रक्षित जैं। बलि-सहस्त्रभुज-वालि विजित तैं ॥
श्रृणु मति मंदा वद पुरतें रे। शूर किं नर छेदिल्या शिरें रे ॥
वीर न म्हणती इंद्रजालिला। स्वकरें कापि शरीरा सकला ॥

**दो०–जळति पतंग विमोहवश भार वाहि खरवृंद ॥**
**त्यानां शूर न म्हणति कुणि कर विचार मतिमंद ॥२९॥**

खल ! न वितंडावाद अतां कर। सोड मान मनि मम वचना धर ॥
दशमुख ! आलो ना दौत्यास्तव। प्रेषित रघुवीरें मज यास्तव ॥
वदले बहुवार कीं कृपाल। नहि गजारियश वधुनि शृगाल ॥
प्रभुचें वचन मनीं तें स्मरतो। शठ कठोर वचनां तव सहतो ॥
ना तर तव मुख–भंजन करुनी। नेतो सीते बळें उचलुनी ॥
कळलें तव बल अधम सुरारी। शून्यि हरुनि अणिली परनारी ॥
तूं निशिचरपति गर्व वहूत। मी रघुनायक-सेवक–दूत ॥
जर न राम–अपमाना डरतो। तुज देखत असं कौतुक करतो ॥

**दो०–तुज महिं अपटुनि चमु वधुनि तव गावा ध्वंसून ॥**
**तव युवतींसह जानकिसि जाइन शठ घेऊन ॥३०॥**

असें करिन तरि नसे महत्वहि। मृता मारणें नहि पुरुषत्वहि ॥
कौल कामवश कृपण विमूढहि। अति दरिद्र अयशी अति वृद्ध हि ॥
रोगी सदा सतत जो क्रोधी। विष्णु विमुख श्रुति-संत-विरोधी ॥

तनु पोषक निंदक अघ खाणी । जिवंत शवसम चौदा प्राणी ॥
हें जाणुनि खल वधतो ना तुज । अतां क्रोध उपजवूं नको मज ॥
तैं निशिचरपति कुपित बोलतो । ओठ चावि सव हात चोळतो ॥
रे कपि अधम अतां मरुं पाहसि । मोठा घास सान मुखि घालसि ॥
यस्य बळें जल्पसि कटु कपि जड । त्या प्रताप-बल-तेज-बुद्धि-रड ॥

**दो०—जाणुनि अगुण अमान त्या देइ पिता वनवास ॥**

**तें दुःखहि युवती-विरह निशिदिन माझा त्रास ॥३१रा॥**

**दो०—गर्व तुला ज्यांच्या बळें ऐसे मनुज अनेक ॥**

**खाति निशाचर दिन-निशीं त्यज जड ! हट अविवेक ॥३१म॥**

निंदी जें रामास दशानन । भडके क्रोध कपींद्र हुताशन ॥
हरिहर निंदा ऐकति कानां । गोहत्या सम पाप तयानां ॥
कट्कटून कपि कुंजर भारी । त्वेषें भुजदंडा महिं मारी ॥
डोलत धरणि सभासद खचले । पळत सुटति भय-मरुते ग्रसले ॥
पडत उठे अवरुनि दशकंधर । महिवर पतित मुकुट अति सुंदर ॥
घेउनि काहीं तो शिरिं टेकी । प्रभूकडे काहीं कपि फेकी ॥
येतां बघुनि मुकुट कपि पळती । हा हा ! दिवसा उल्का पडती ॥
कीं, क्रोधें रावणें फेकले । चार कुलिश अति जवें ठाकले ॥
प्रभु हसुनी म्हणती किं भिउं नका । राहु केतु ना कुलिश न उल्का ॥
हे दशकंठ किरीट किं असती । वालिसुतानें प्रेरित येती ॥

**दो०-उडुनि पवनसुत धरी करि ठेवी प्रभूसमीप ॥**
**कौतुक बघती भल्ल कपि द्युति सम वासरदीप ॥३२रा॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ४ था

**दो०-दशमुख तिकडे क्षोभला म्हणे क्रुद्ध सर्वांस ॥**
**धरा धरुनि मारा कपिसि अंगद करी स्मितास ॥३२म॥**

सुभट वधुनि ह्या वेगें धावा । खा कपि भल्ल जिथें तुम्हि पावा ॥
मर्कटहीन करा महि जा, ते । तापस जीत धरा दो भ्राते ॥
पुन्हा क्रुद्ध युवराजा बोलत । व्यर्थ वल्गसी लाज न वाटत ॥
कुलघात्या ! निज काप कंठ मर । बळ बघुनि न निर्लज्ज फुटे उर ॥
रे स्त्री चोरां कुमार्गगामी । खळ! मळराशि मंदमति कामी ॥
सन्निपाति जल्पसि दुर्वादां । असांसि कालवश खल मनुजादा ॥
याचें फळ तूं पुढें पावशिल । जैं कपिभल्ल चपेटा बसतिल ॥
राम मनुज हें वदतां वाणी । झडति न तव रसना अभिमानी ॥
गळतिल रसना संशय नाहीं । सहित मस्तकां रणांगणां ही ॥

**सो०-तो नर कीं दशशीस एक शरें जिंहि वालि हत ॥**
**लोचन अंधहि वीस धिक् तव जन्म कुजाति जड ॥३३रा॥**
**दो०-तव शोणिता पिपासु तृषित रामसायक निकर ॥**
**त्यजुं तुज कीं तो त्रासु कटुजल्पक निशिचर अधम ॥३३म॥**

मी तव दशन पाडण्या लायक । परि न मजसि आज्ञा रघुनायक ।।
असा रोष कीं मुख दश तोडूं । लंका उचलुनि समुद्रि गाडूं ।।
औदुंबर-फल सम तव लंका । मधें वसा तुम्हि जंतु न शंका ।।
मी वानर फळ खाण्या वार न । देती आज्ञा राम उदार न ।।
रावण हसला श्रवुनि युक्तिसि । मूढ कुठें अनृता अति शिकसी ।।
वालि न कधि जल्पला असें अति । होसी लवाड तापस-संगति ।।
वीस भुजा ! मी खरा लबाडहि । जर दश जिभा न उपटिन जाडहि
समजुनि रामप्रताप कोपीं । कपि सभेंत पण करि पद रोपी ।।
उचलुं शकसि शठ मम पायातें । फिरति राम मी हरली सीते ।।
ऐका सुभट दशानन वदला । अपटा कपि महिं धरुनि पदाला ।।
इंद्रजीत आदिक विविधा भट । हर्षित बलवान् उठले पटपट ।।
विलगुनि बळ बहु उपाय करुनी । पद न ढळे बसले शिर नमुनी ।।
पुन्हां उठुनि झटतात सुरारी । हले न कपिपद अशा प्रकारीं-।।
जेंवि कुयोगि नरां उरगारी । मोह त्रिटप उपटवे न भारी ।।

**दो०-कोटि सुभट घननादसम तें उठले हर्षून ।।**
**झटति, पद न हाले बसति खालि मान घालून ।।३४रा।।**
**भूमि न सोडी कपिचरण रिपुमद सोडी ठाय ।।**
**विघ्न कोटिनें नीतिला सोडि संतमन काय ।।३४म।।**

हरले सब मनिं कपि बल बघुनी । उठं स्वयें जैं कपि आव्हानी ।।
धरित पदा तो, वदला अंगद । तव उद्धार न धरुनी मम पद ।।

धरिशि न राम चरण शठ! जाउनि । श्रवुनि फिरे तो मनिं अति लाजुनि।
तेजोहत झाला श्री गता । नभिं मध्यान्हीं शशि पाहतां ।।
वसला सिंहासनिं शिर नमवुनि । जणूं सकल संपत्ती गमवुनि ।।
जगदात्मा प्राणाधिप राम हि । तद्विमुखा किं मिळे विश्राम हि ।।
उमे राम-भृकुटिच्या विलासें । विश्व उपजुनी पुनरपि नासे ।।
तृणा कुलिश कुलिशा करती तृण । तद्दूताचा टळे कसा पण ।।
कपि मग बहुविध नीती वानी । काळ निकट तो कैसी मानी ।।
रिपुमद मथुनी प्रभु यश गाउनि । निघे वालि-नृपसुत हें सांगुनि ।।
खेळवून रणि वधूं तुला ना । तोंच अतां वदुं महति वृथा ना ।।
कपिनें तत्सुत प्रथम मारला । कळतां रावण दुःख पावला ।।
यातुधान अंगदपण बघती । भय विव्हळ सब विशेष होती ।।

**दो०–रिपुबल धर्षुनि हर्षुनी वालितनय बलपुंज ।।**
**पुलकित तनु लोचन सजल धरी रामपद.कंज ।।३५रा।।**
**सांज बघुनि दशकंधर गेला भवनिं उदास ।।**
**रावणा मंदोदरि तैं समजावी स्वहितास ।।३५रा।।**

कांत ! विचारें त्यजा कुमतिसी । शोभे रण न तुम्हां रघुपतिसी ।।
रामानुज लघु रेघ काढतां । लंघवे न ती अशी शूरता ।।
प्रिय जिंकाल किं त्या संग्रामें । ज्याच्या दूतांची हीं कामें ।।
सिंधु सहज लंघुनि तव लंके– । आला कपि केसरी न शंके ।।
रक्षक वधुनी विपिन विनाशी । मारि तुझ्या देखत अक्षासी ।।

जाळुनि भस्म करी पुरि सकला । राहि कुठें बल गर्व आपला ॥
मृषा बढाया पति ना मारा । मम वचना मनि जरा विचारा ॥
पति रघुपतिस नृपति नच माना । अगजगनाथ अतुलबल जाणा ॥
इषू प्रताप विदित मारीचा । मानिलें न तद्वचना नीचा ! ॥
जनकसभें भूपांमधि अगणित । होतां तुम्हि बल विशाल अतुलित॥
भंगुनि धनुष्य वरि जानकिला । तदा करुनि रण कां न जिंकिला ॥
सुरपति-सुतबल अल्प समजला । जीवित ठेउनि नेत्र फोडला ॥
शूर्पणखेची दिसत दशा ती । नसे लाज तरि कशी मना ती ॥

**दो०–वधि विराध–खर–दूषणां मारि सलील कबंध ॥**
**एक शरें हत वाली त्या जाणा दशकंध ॥३६॥**

जे जलनाथ बांधविति हेलां । प्रभु उतरति सह दला सुवेला ॥
कारुणीक दिनकर-कुल-केतू । दून धाडिती तव हित-हेतू ॥
जो सभेंत तव बल मथि कसा । करियूथामधि मृगपति जसा ॥
अंगद हनुमान् ज्याचे अनुचर । रण झुंझार वीर अति दुर्धर ॥
त्याला प्रिय ! घडि घडि नर म्हणतां । मुधा मान ममता मद वहतां ॥
अहह ! कांत ! कृन राम-विरोध । काल विवश मनि नुपजे बोध ॥
काळ न दंडें कुणास वधतो । धर्महि बल मति विचार हरतो ॥
स्वामि ! काळ ज्या निकट येतसे । तो तुमच्या सारखा भ्रमतसे ॥

**दो०–सुत युग मेले दग्ध पुर आतां पुरे करा च ॥**
**कृपासिंधु रघुपति भजुनि नाथ विमल यश घ्या च ॥३७॥**

नारि वचन विशिखांसम ऐकुनि । उठुनि सभें गत पहाट जाणनि ।'
वसला सिंहासनि अति फुलुनी । अति अभिमानें भय सव भुलुनी ।।
इथें राम अंगदा वोलावित । येउनि शिर पदपंकजि नमवित ।।
अती आदरें समीप वसवुनि । वदति खरारी कृपाल विहसुनि ।।
वालितनय कौतुक अति मजला । तात सत्य वद विचारुं तुजला ।।
यातुधान-कुल-तिलक रावणा । भुजवल अतुल अशी जगिं गणना
तन्मुकुटां तुम्हि चार फेकले । सांगा तात कसे सांपडले ।।
श्रुणु सर्वज्ञा प्रणत-सुखघना । भूपति-गुण-ते चार मुकुट ना ।।
साम दान नी दंड विभेदहि । नृप हृदिं वसती वर्णिति वेद हि ।।
चरण नीति-धर्माचे चारू । येति नाथ पदिं करुनि विचारू ।।

**दो०-धर्महीन प्रभुपद-विमुख काल विवश दशशीस ।**
**त्या सोडुनि गुण आले पहा कोसलाधीश । ३८ रा ।।**
**परमचतुरता ऐकुनी विहसति राम उदार ।।**
**समाचार लंकेंतला सांगे वालिकुमार ।। ३८ म ।।**

## अध्याय ५ वा

रिपुचा समाचार जैं पावति । सचिवां राम निकट वोलावति ।।
चार विकट लंकेच्या द्वारां । कशि आक्रमणें करा विचारा ।।
तैं कपीश ऋक्षेश विभीषण । स्मरुनि हृदयिं दिनकरकुल-भूषण।।
करुनि विचारा मंत्र ठरविती । चारदळें कपिकटक वनविती ।।

यथायोग्य सेनापति केले । यूथप सत्र वोलावुनि नेले ॥
प्रभूप्रताप कथुनि समजावति । सिंहनाद करुनी कपि धावति ॥
हर्षित रामचरणिं शिर नमवति । वीर घेति गिरिशिखरें धावति ॥
गर्जति तर्जति भल्ल कपीश । जय रघुवीर कोसलाधीश ॥
जाणति परमदुर्ग अति लंका । प्रभूप्रतापें निघति, न शंका ॥
मेघघटां सम वेढा घालिति । डंके भेरी मुखें वाजविति ॥

**दो०–जयति राम जय लक्ष्मण जय कपीश सुग्रीव ॥**
**गर्जति सिंहनाद कपि भल्ल महा–बलशीव ।३९।**

कोलाहल लंकेमधिं भारी । दशमुख–कानिं महाहंकारी ॥
वानर–धीटपणास पहा तर । विहसुनि आणवि सैन्य निशाचर ॥
आले काळें प्रेरित वानर । माझे सगळे क्षुधित निशाचर ॥
असें म्हणुनि शठ अट्टहास करि । विधि आहार देई वसल्या घरिं ॥
सुभट सकल चारी दिशिं जावें । भल्ल कीश धरधरुनी खावे ॥
उमे ! असा रावण अभिमानी । जशि टिटवी निजते किं उताणी ॥
निघति निशाचर आज्ञा मागुनि । भिंडिपाल भाले करिं घेउनि ॥
तोमर मुग्दर परशू चड हिं । शूल कृपाण परिघ गिरिखंड हि ॥
शठ अरुणोपल निकरां पाहति । मांसाहारि जसे खग धावति ॥
चंचुभंग दुःखा नहिं जाणति । तमे मूर्ख नरभक्षक धावति ॥

**दो०–नानायुध शरचापधर यातुधान बलवीर ॥**
**चढले तट बुरुजांवरी कोटि कोटि रणधीर ॥४०॥**

दुर्ग तटांवर शोभति तैसे। मेरु शृंगि घन वसले जैसे ॥
डंके रणवाद्यें धडधडलीं। श्रवुनि भटां वीरश्री चढली ॥
वाजति भेरि तुतारि अफाट। कातर-उरिं तैं जाती फाट ॥
जातां वधति कपींच्या घट्टां। अति विशाल तनु भल्ल सुभट्टां ॥
धावति गणति न अवघड घाटां। फोडुनि गिरि करिं पाडिति वाटा॥
कटकटती कोटी भट गर्जति। दशनिं ओठ खाती अति तर्जंति ॥
रावण राम घोष युगठाईं। जयति जयति जय सुरू लढाई ॥
निशिचर शिखर-समूहां टाकिति। उडुनि धरिति कपि तेच झुगारिति

**छं०—गिरिखंड धरुनी चंड मर्कट भल्ल दुर्गीं टाकिती।**
**पद धरुनि फिरवुनि धरणिं अपटति पळति तैं पाचारिती॥**
**अति तरल तेजस्वी प्रतापी उडुनि दुर्गीं प्रविशले।**
**कपि भल्ल मंदिरिं चढुनि चौदिशि रामयश गाती भले॥१॥**

**दो०—एकैका धरुनी कपि घेउनि जाति पळून ॥**
**आपण वर भट खालति पडति धरणि येऊन ॥४१॥**

राम प्रताप प्रबल कपि-यूथ। मर्दिति निशिचर-सुभट-वरूथ ॥
दुर्गि चहुंकडे चढले वानर। जय रघुवीर प्रताप दिवाकर ॥
निशिचर निकर चहूं दिशि पळती। जसे प्रभंजनिं मेघ वितळती ॥
हाहाकार होइ पुरिं भारी। रडती आतुर बालक नारी ॥
देति जमुनि वहु शिव्या रावणा। राज्य करत पाचारि कि मरणा ॥
निजदल विचलित जैं ये कळुनी। फिरवि सुभट लंकेश खवळुनी ॥

जो रण विमुख कळे मम कानां । त्या मी वधिन कराल कृपाणां ।।
भक्षित सकल भुक्त भोगानां । रणांगणीं प्रिय मानां प्राणां ।।
श्रवुनि उग्र वच सब चळचळले । सुभट लाजले सकोप वळले ।।
सम्मुख मरण हि वीरा शोभा । ते त्यजिती प्राणांच्या लोभा ।।

**दो०–बहु आयुध धर सुभट सब लढती ललकारून ।।**
**व्याकुळ केले भल्ल कपि त्रिशुल परिघ मारून ।।४२।।**

पळू लागले भयातुर करी । पुढें जिंकितिल उमे ! यद्यपी ।।
कुठें म्हणे कुणि अंगद हनुमान् । कोठें व्दिविद नील नल बलवान् ।।
निज दळ विकळ कळे हनुमाना । पश्चिमव्दारिं तदा बलवाना ।।
तिथें लढे घननाद ससेना । व्दार अभेद्य दिसे भंगे ना ।।
क्रोध पवनसुत-मनिं अति आला । प्रबल वीर गर्जे सम काळा ।।
उडुनी लंका–दुर्गी पावे । घननादावर गिरिधर धावे ।।
रथ भंगुनि सूता निःपाती । लाथ मारि घननादा छातीं ।।
सूत दुजा त्या व्याकुळ जाणुनि । त्वरें नेइ सदनीं रथिं घालुनि ।।

**दो०–अंगद ऐके पवनसुत गत एकल दुर्गात ।।**
**रण झुंझार वालिसुत चढे उडुनि खेळांत ।।४३।।**

क्रुद्ध विरुद्ध युद्धि दो वांदर । स्मरुनी राम प्रताप सादर ।।
धाउनि चढले रावण–भवनां । करिति कोसलाधिश घोषणा ।।
धरुनि ढकलले कलशसह घरा । बघुनि होई लंकेश घाबरा ।।
करीं नारिगण बडविति छाती । प्राप्त अतां दो कपि उत्पाती ।।

कपि चेष्टानीं त्यांस दटाविति । रामचंद्र सुयशास ऐकविति ।।
घेउनि करिं कनकाचे स्तंभां । वदले करुं उत्पातारंभा ।।
गर्जुनि रिपुकटकामधिं पडले । मर्दुं लागले भारि भुजबळें ।।
लाथा कोणा कोणा थप्पड । राम भजाना घ्या फळ फक्कड ।।

**दो०–एक दुजावर मर्दिती तोडुनि फेकति मुंड ।।**
**पडति रावणा पुढतिं तीं फुटती जणुं दधिकुंड ।।४४।।**

महा महा जे प्रमुख सापडति । धरुनि पदां प्रभुपाशि झुगारति ।।
वदे बिभीषण त्यांच्या नामां । त्यांसहि राम देति निज धामा ।।
खल नराद विप्रामिष भोगी । पावति गति जी याचति योगी ।।
उमे ! राम मृदु–मन करुणाकर । मज रिपुभावें स्मरति निशाचर ।।
असें समजुनी देति परम गति । कोण कृपाल असा वद पार्वति ।।
श्रवुनि असे प्रभु, त्यजुनी भ्रम नर । -भजति न जडमति अभागि पामर
अंगद हनुमान् दुर्गीं शिरले । असें अयोध्याधीश बोलले ।।
लंकें कपियुग शोभति कैसे । मथिति सिंधु मंदर युग जैसे ।।

**दो०–मर्दुनि रिपुदळ भुजबळें बघुनि दिनाचा अंत ।।**
**उभय हि आले विनाश्रम उडुनि जिथें भगवंत ।।४५।।**

प्रभुपदकमलिं शीस तिहिं नमलें । बघुनि सुभट रघुपतिमनिं भरले ।।
रामकृपायुत बघती उभयां । परम सुखी ते श्रम गत विलया ।।
गेले अंगद हनुमान् कळलें । विविध भल्ल मर्कट सव वळले ।।
जैं प्रदोष बल कौणप पावति । दशमुख जयजय करीत धावती ।।

फिरले कपि रिपुदल पाहतां । भिडले भट करुनी कटकटां ॥
प्रबल युगल दल अति ललकारति । लढती सुभट, न जरा हि कचरति
महावीर निशिचर काळीं मुख । नानावर्ण विशाल वलीमुख ॥
सबल युगल दल समबल योद्धे । कौतुक करिति लढति सुक्रोधें ॥
प्रावृट्–शरद–पयोद न गणती । जणूं मारुतें प्रेरित लढती ॥
अनिप अकंपन सह अतिकाया । विचलत सैन्य निर्मिती माया ॥
होइ निमिषि अतिशय अंधार । रुधिर उपल बहुवृष्टी क्षार ॥

**दो०–बघुनि निबिड तम दशदिशीं कपदळि खळबळ फार ॥**
**कुणी कुणा बघुं शकति ना चहुँ दिशि करिति पुकार॥४६॥**

सकल मर्म रघुनायक जाणति । अंगद हनुमान् यां बोलावति ॥
वृत्त सकल तें कानि घातलें । कपि कुंजर तैं क्रुद्ध धावले ॥
हसुनि कृपानिधि चाप जोडिती । पावक सायक सपदि सोडती ॥
पडे प्रकाश कुठें तम नाहीं । ज्ञानोदयि कीं संशय राही ? ॥
भल्ल वलीमुख प्रकाश पावुनि । धावति हर्षें श्रम भय जाउनि ॥
हनूमान अंगद रणि गाजति । श्रवत हाक निशिचर पळ काढति॥
धरुनि पळपुटचा अपटिति धरणीं । करिति भल्ल कपि अद्भुत करणी॥
तंगडचा धरुनि समुद्रि झुगारिति । मकर उरग झष भरभर भक्षिति ॥

**दो०–किति हत किति घायाळ किति चढले दुर्गि पळून ॥**
**भल्ल वलीमुख गर्जती रिपुदळ बळ उधळून ॥४७॥**

निशा बघुनि कपि चारी अनी । आले जिथें कोसला–धनी ॥

राम कृपेनें निरखिति सकलां । तदा वानरांचा श्रम हरला ।।
तिथें दशमुखें सचिव जमविले । कथित सुभट जे गेले वधिले ।।
अर्ध कटक कपिनीं संहरलें । काय करावें सांगा सगळे ।।
माल्यवंत अति जरठ निशाचर । रावण–मातामह मंत्री वर ।।
वदला वचन नीति अति पावन । ऐका तात कांहि मम शिकवण ।।
जैंहुनि हरुनि आणली सीते । अशकुन वदवति ना होती ते ।।
यश ज्याचें श्रुति पुराण गाती । रामविमुख कुणि सुख न पावती ।।

**दो०–हिरण्याक्ष भावासहित मधु कैटभ बलवान ।।**
**ज्यानें हत अवतीर्ण तो कृपासिंधु भगवान ।।४८रा।।**

## मास पारायण, पंचविसावा विश्राम.

❖ ❖ ❖

## अध्याय ६ वा

**दो०–कालरूप खलवनदहन गुणाकार घनबोध ।।**
**शिव विरंचि ज्या सेविती त्यासी कॆवि विरोध ।।४८म।।**

वैर सोडुनी द्या वैदेही । भजा कृपानिधि परमस्नेही ।।
त्याचें वचन बाण सम लागे । जा कर काळें तोंड अभागें ।।
वृद्ध म्हणुन मारूं तुजला ना । तोंड न दाखव मम नयनाना ।।
तो निज मानसिं करि अनुमान किं । वधूं बघति या कृपानिधान किं ।।

तो गत उठुनि वदत दुर्वाद । तैं सकोप वदला घननाद ॥
कौतुक माझें सकाळि बघणें । फार करिन मी कशास वदणें ॥
या सुतवचें भरंवसा येई । प्रेमें त्यास मांडिवर घेइ ॥
होइ पहाट करीत विचारा । कपी रोधिती चारी द्वारां ॥
क्रुद्ध कपी अवघड गड वेढिति । कोलाहल लंकें वाढे किति ! ॥
निशिचर विविधायुधधर धावति । गडावरुन गिरिकूटां टाकति ॥

**छं०–ढकलीति भूधर शिखर कोटी विविध गोळे चालले ।**
**घड्घोष सम पविपात, गर्जति घन जणूं प्रलयीं बळें ।**
**मर्कट विकट भट भिडति विद्ध, न कचति तनु जर्जर इती ।**
**ते शैल पकडुनि दुर्गि फेकिति जागिं निशिचर हत किती ॥ १**

**दो०–मेघनाद ऐके यदा गड घेती वेढून ॥**
**वीर गडांतुनि उतरुनि चाले भेरि पिटून ॥४९॥**

कुठें कोसलाधिप दो भ्राते– । धन्वी ख्यात सकल लोकीं ते ॥
कुठें द्विविद नल निल सुग्रीव हि । अंगद हनूमंत बलशीव हि ॥
कुठें बिभीषण बंधूद्रोही । आज सकल वधतो हटिं तोही ॥
घोषुनि, कठिण बाण संधानी । क्रोधें अति कर्णांतां ताणी ॥
तो शरसमूह सोडूं लागत । जणुं सपक्ष बहु नाग चि धावत ॥
पडत चहुंकडे वानर दिसती । सम्मुख कुणि तैं होउं न शकती ॥
जिथें तिथें कपि भल्ल पळाले । युद्धेच्छेनें त्यांस सोडले ॥
रणीं भल्ल कपि असा न दिसला । प्राणशेष जो नाहि जाहला ॥

**दो०-सर्वां दश दश मारि शर महिं पडले कपि वीर ॥**
**सिंहनाद तें गर्जे मेघनाद बलधीर ॥५०॥**

बघुन पवनसुत कटकाव्याकुळ । धावे काळ जणूं क्रोधाकुळ ॥
महाशैल उत्पाटुनि सत्वर । टाकि सुरोषें घननादावर ॥
येत बघुनि गिरि तो नभिं पळला । सूत तुरग रथ चुरा जाह्ला ॥
बहुदां आव्हानित हनुमानें । येइ न निकट मर्म तो जाणे ।
रघुपति निकट जाइ घननाद । नानापरिं वदला दुर्वाद ॥
अस्त्र शस्त्र आयुध सब मारी । प्रभु छेदुनि कौतुकें निवारी ॥
बघुनी प्रताप जड चीताळे । करि नानाविध माया-चाळे ॥
करि गरुडासि जसा कुणि चाळा । भिववि दाखवुनि सर्पपिलाला ॥

**दो०-वश ज्याच्या माये प्रबल शिव विरंचि लघु थोर ।।**
**त्या निजमाया दाखवी दुर्मति निशिचर-पोर ।।५१॥**

वर्षि चढुनि नभिं वहु अंगारां । प्रगटति भूमींतुनि जलधारा ॥
विविध पिशाचें पिशाचिनी अति । मारा कापा बोलत नाचति ॥
विष्टा पूय रुधिर कच हाडां । वर्षी कधिं वहु पाडी दगडां ॥
वर्षि धूळ अंधारा करतो । दिसत न निज पसरला हि कर तो॥
व्याकुळ सब कपि माया बघतां । सर्वां मरण कि असें चालतां ॥
राम पाहुनी कौतुक हसले । झाले सभय सकल कपि कळलें ॥
एकचि बाणें हरली माया । जैसा दिनकर तिमिर निकाया ॥
कृपा दृष्टि कपि भल्ल विलोकित । प्रबल होति रणिं रहति न रोखित ॥

**दो०–रामाज्ञा मागून कपि वालिसुतादि समेत ।।**
**लक्ष्मण जाती क्रुद्ध, करिं बाण शरासन घेत ।।५२।।**

क्षतज–नयन उरबाहु विशाल । हिमगिरि निभ तनु किंचित लाल।।
इथें धाडि दशमुख सुभटानां । धावति अस्त्रशस्त्रधर नाना ।।
भूधर–नख विटपायुध धारी । धावति कीश रामजयकारी ।।
भिडति सर्व जोडीशी जोडी । उभयां जयकांक्षा ना थोडी ।।
मुष्टी लत्ता दशनीं कापिति । मारिति कपि जयशील दटाविति ।।
मार मार धर धर धर पकडा । शिरें तोडुनी बाहू उखडा ।।
असा ध्वनी व्यापी नवखंडें । धावति धरणीं रुंडें चंडें ।।
बघती कौतुक गगनीं सुरगण । कधिं आनंदित कधिं विषण्णमन ।।

**दो०–जमे रक्त खाड्यांमधें वरती धूळ उडून ।।**
**कीं अंगार ढिगांस जणुं राख ठेवि झाकून ।।५३।।**

जखमी वीर विराजति तैंसे । कुसुमित किंशुक तरुवर जैंसे ।।
लक्ष्मण मेघनाद दो योद्धे । लढति परस्पर भारी क्रोधें ।।
एक दुजा शक्त न जिकाया । निशिचर छल बल करि अन्याया।।
झाले क्रुद्ध अनंत मनामधिं । भग्न सरथ सारथी क्षणामधिं ।।
करतां नाना प्रहार शेपें । राक्षस उरे प्राण–अवशेषें ।।
रावणसुत करि मनिं अनुमाना । संकट घोर ! हरिल हा प्राणा ।।
वीरघातिनी शक्ती सोडत– । तेजपुंज लक्ष्मण–उरिं लागत ।।
शक्ति लागुनी पडतां मूर्च्छित । जाइ निकट तो भीती त्यागित ।।

**दो०–मेघनाद सम कोटि शत सुभट बघति उचलून ।।**
**जगदाधार शेष कसा उचले, जाति चिडून ।।५४।।**

श्रुणु गिरिजे क्रोधानल ज्याचा ।.करी दाह चौदा भुवनांचा ।।
कोण जिंकि संग्रामीं त्याला । सेविति सुर नर अग जग ज्याला ।।
हें कौतूहल कळे तया ही । राम कृपा करतात जया ही ।।
सांजवेळिं फिरल्या वाहिनी । गणूं लागले निज निज अनी ।।
व्यापी ब्रह्म अजित भुवनेश्वर । लक्ष्मण कुठें ? पुसति करुणाकर ।।
तों हनुमान घेउनी आले । अनुज बघुनि प्रभु सुदुःखि झाले ।।
म्हणे जांबवान् जाउनि आणा । लंकावासी वैद्य सुषेणा ।।
गेला हनुमान् लघु रूपानें । गृहासहित आणला क्षणानें ।।

**दो०–ये सुषण नमि मस्तका राम–सरोरुह पायि**
**कथित नाम गिरि औषधी आण पवन सुत ! जायि ।।५५।।**

रामचरणसरसिज उरिं राखुनि । निघे प्रभंजनसुत बल भाषुनि ।।
तिथें हेर करि मर्म निवेदन । कालनेमि–गृहि आला रावण ।।
दशमुख वदत, मर्म त्या कळे । कालनेमि शिर बहु पिटि बळें ।।
देखत तुम्हां नगर जो जाळी । तत्पथ कोण रोखि कधि काळीं ।।
रघुपति भजुनी स्वहित साधणें सोडा नाथ ! मृषा जल्पणें ।।
नीलकंज तनु सुंदर शामा । हृदयिं धरा लोचनाभिरामा ।।
मी तूं मम हि मूढता त्यागा । महा मोह निशि निजतां जागा ।।
कालव्याला भक्षक जोही । स्वप्नि समरिं जिकवे कि तोही ।।

**दो०-ऐकुनि दशमुख रुष्ट अति, तो मनिं करी विचार ।**
**रामदूत-करिं मरूं बरें हा खल रत मल भार ।।५६।।**

जाइ वदुनि पथि माया रचितो । सर मंदिर वर बाग बनवितो ।।
मारुत सुत पाही शुभ आश्रम । मुनि-आज्ञें जळ पिऊं पळे श्रम ।।
राक्षस तिथें कपटमुनि बसतां । मोहुं पाहि मायापति-दूता ।।
जाइ पवनसुत नमवी माथा । तो सांगे हि रामगुण-गाथा ।।
चालू रावण राम महारण । राम जिंकितिल संशय यांत न ।।
इथें बसुनि मी सगळें पाहें । ज्ञानदृष्टि-बल मज बहु आहे ।।
जल मागतां कमंडलु दे तो । म्हणे कपि, न मज पुरेल हें तों ।।
सरीं शीघ्र या करुनी स्नाना । दीक्षा देउं कि पावा ज्ञाना ।।

**दो०-सरिं शिरतां कपि पद धरी मकरी त्वरा करून-।।**
**-हुता दिव्य तनु धरुनि ती गत नभयानिं बसून ।।५७।।**

कपि ! तव दर्शन हरि मम पापा । तात ! दूर करि मुनिवर-शापा ।।
मुनि नाहीं हा ! घोर निशाचर । सत्य वचन मम मान्ना कपि! बरं।।
वदुनि असें अप्सरा गता जैं । निशिचर समीप कपि गेला तैं ।।
घ्या मुनि गुरु-दक्षिणा कपि म्हणे । मग आम्हांस मंत्र तुम्हि देणें ।।
शिरिं लांगूल लपेटुनि अपटी । प्रगटी निजतनु मरतां कपटी ।।
राम राम वदुनी त्यजि प्राण हि । श्रवुनि सहर्ष निघे हनुमान हि ।।
शैल बघत औषधी नोळखत । सहसा कपि घे उपटुनि पर्वत ।।
गिरि घेउनि निशि नभीं उडतसे । कपी अयोध्येवरी जातसे ।।

**दो०–बघतो भरत विशाल अति; निशिचर मनिं मानून ॥**
**फलविण शर मारिला, धनु आकर्णीं ताणून ॥५८॥**

पडला मूर्छित लागत सायक । म्हणतचि राम राम रघुनायक ॥
प्रिय वच्न ऐकुनि भरत धावले । अति सत्वर कपिपाशिं पावले ॥
विकल विलोकुनि कपि हृदिं धरिला । जागेना जरि बहु जागविला ॥
मुख उदास मनिं दुःखी भारी । वदत वचन लोचनिं ये वारी ॥
जो विधि राम-विमुख करि मातें । तो दे या दारुण दुखातें ॥
जर माझी मन-वाणी-कायां । प्रीति रामपदकमलिं अमाया ॥
हो श्रम-शूल-हीन कपि हा तर । रघुपति अनुकूलहि मजला जर ॥
श्रवत वचन कपि उठून बसला । जय कोसलाधीश जय वदला ॥

**सो०–कपिस हृदयिं धरतात पुलकित तनु लोचन सजल ॥**
**प्रीति न हृदयिं रहात स्मरुनि राम रघुकुल-तिलक ॥५९॥**

तात कुशल वद सुखनिधान कीं ? । सहित अनुज माता हि जानकी ॥
कपि सब चरित समासें सांगत । दुःखी भरत मनीं पस्तावत- ॥
अहह दैव ! कां जगीं जन्मलों । प्रभुच्या एकहि काजि न आलों ॥
कुसमय समजुनि धृत मनिं धीर । मग कपिला वदले बलवीर ॥
तात ! उशिर तुज होइ पोचतां । कार्यहानि कीं दिवस उगवतां ॥
मम सायकिं चढ शैल समेत । पोचवुं सन्निध कृपानिकेत ॥
तैं कपिमनिं उद्भव अभिमाना । मम भारें जावबे किं वाणा ॥
प्रभुचा प्रभाव मग मनिं आणी । वदे नमुनि पदिं जोडुनि पाणी ॥

**दो०-मनि प्रताप तव धरुनि प्रभु जाइन नाथ पळांत ।।**
**आज्ञा घेउनि नमुनि पदि हनूमंत जातात ।।६०था।।**
**भरत-बाहुबल-शील-गुण प्रभुपदि प्रीति अपार**
**जात मानसीं प्रशंसित घडि घडि पवन कुमार ।।६०।।**

तिथें राम-लक्ष्मणा निरखुनी । वदले वचन नरा अनुसरुनी ।।
अर्धी रात्र सरे कपि येइ न । राम धरिति हृदि अनुजा उचलुन।।
पाहुं न शकसि दुःखि मज अंमळ । सदा स्वभाव बंधु ! तव कोमळ ।।
मजसाठीं त्यजुनी पितृमाता । सहले वनि हिम-आतप-वातां ।।
कोठें अतां प्रेम तें बाळा ! । श्रवुनि नुठसि मम विकल वचांला।।
जरि वनि बंधु-वियोग जाणतो । पितृवचना त्याही न मानतो ।।
सुत धन नारि भवन परिवारहि । होति जाति जगिं वारंवार हि ।।
हें मनिं आणुनि जाग कि ताता । जगीं सहोदर न मिळे भ्राता ।।
यथा पंखविण खग अति दीन । मणि विण फणि करिवर करहीन ।।
तसें बंधु ! तुजविण मम जीवन । जर जड दैव जगवि मजसी क्षण ।।
जाउं अवधि कुठलें मुख घेउनि । स्त्रीसाठीं प्रिय बंधु गमावुनि ।।
जगिं सहतो अपयशहि हवें तर । स्त्री हानीं क्षति अधिक नव्हें वर।।
अतां कुयश नी शोक सुत तुझा । सहिल कठिण निष्ठुर उर माझा।।
निज जननीचा एक कुमार । तात तिथें तूं प्राणाधार ।।
सोपवि मजसि तुला कर धरुनी । बहुविध सुखद परम हित गणुनी ।।
जाउनि उत्तर काय देउं तिज । उठुनि कां न बा ! समजाविसि मज
बहुविध शोचति शोच विमोचन । स्रवत सलिल राजिवदल लोचन ।।

एक अखंड उमे ! जरि रघुपति । नरगति भक्त कृपाल दाखवति ॥

**सो०–प्रभूप्रलाप महान परिसुनि वानरगण विकल ॥**
**तों आला हनुमान करुणेमधि सम वीर–रस ॥६१॥**

हर्षि राम हनुमाना भेटति । प्रभू परम सुजाण कृतज्ञ अति ॥
वैद्यें सत्वर उपाय केले । लक्ष्मण हर्षित उठून बसले ।
प्रभु बंधुस हृदि धरुनि भेटले । भल्ल कीशगण सकल हर्षले ॥
मग वैद्या कपि पोचवि तैसा । प्रथम आणिला तयास जैसा ॥
कळे वृत्त हें दशाननाला । अति विषण्ण बहु पिटी शिरांला ॥
व्याकुळ घटकर्णाप्रती आला । नाना यत्नें जागवि त्याला ॥
जागे निशिचर कैसा दिसला । काळ देह धरुनि जणुं बसला ॥
कुंभकर्ण वदला कीं बावा ! । गेलीं सुकुनि मुखें तव कां बा ! ॥
वदे कथा सब तो अभिमानी । जैसी सीते हरुनी आणी ॥
तात ! कपीनीं निशिचर वधले । महा महा योध्दे संहरले ॥
दुर्मुख सुररिपु मनुजाहारी । भट अति काय अकंपन भारी ॥
अपर महोदर आदिक वीर । पडले सगळे रणि रणधीर ॥

**दो०–ऐकुनि दशकंधर वचन कुंभकर्ण सुम्लान ॥**
**जगदंबे चोरुनि, अतां शठ इच्छित कल्याण ॥६२॥**

कृत न बरें त्वां निशिचर राया । अतां जागवा कां मज वाया ॥
अजून तात ! सोडुन अभिमाना । भजा राम पावा कल्याणा ॥
दशशीर्षा ! मनुज कि रघुनायक । हनुमंता सम ज्याचे पाइक ॥

हाय ! बंधु ! अनिष्ट आचरिलें । प्रथमचि येउनि मज न कळविलें ।।
प्रभु ! विरोध केला त्या देवा । शिव विधि सुर करिती यत्सेवा ।।
कथिले ज्ञान नारदें मला । कथितों तुला समय लोटला ।।
भेट अतां कडकडून माला । जाउनि सुफल करिन नयनांला ।।
श्याम गात्र सरसीरुह लोचन । जाउन बघतो त्रिताप–मोचन ।।

**दो०–रामरूप–गुण आठवित प्रेम मग्न पळ एक ।।**
**मागवि रावण कोटि घट मदिरा महिष अनेक ।।६३।।**

खाउनि महिष करुनि मद-पान । गर्जे वज्राघात–समान ।।
कुंभकर्ण दुर्मद रणरंगे । निघे त्यजुनि गड सैन्य न संगें ।।
बघुन, बिभीषण समोर आला । पदिं शिर नमुनि नाम निज वदला ।।
अनुजा उठवुनि हृदयीं धरला । रघुपति भक्त जाणुनी रुचला ।।
तात ! लाथ मज रावण मारी । वदतां मंत्र परम हितकारी ।।
त्या दुःखें रघुपतिपदिं आलों । बघुनि दीन मी प्रभुमनिं रुचलों ।।
श्रुणु सुत ! असे कालवश रावण । मानि अतां किं परमहित शिकवण ।।
धन्य धन्य तूं धन्य बिभीषण । झालास किं निशिचर कुलभूषण ।।
बंधु वंश तूं केला भास्वर । भजुनि राम शोभा सुख सागर ।।

**दो०–तन मन वचनें त्यजुनि छल भज हं ! राम रणधीर ।।**
**जा; मज निजपर ना कळे, मीहि कालवश वीर ।।६४।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ७ वा

श्रवुनि बंधु वच निघे विभीषण । येइ जिथें त्रैलोक्य विभूषण ॥
नाथ ! भूधराकार–शरीर । कुंभकर्ण येतो रणधीर ॥
हें जेंव्हां कपिकर्णीं आले । किलकिलुनी वलवंत धावले ॥
पर्वत विटप पटापट उपटिति । कटकटुनी घटकर्णीं टाकिति ॥
कोटि कोटि गिरि-शिखरीं मारा । भल्ल कपी करिती प्रतिवारा ॥
डगे न मन, तन ज़राहि न ढळे । गजा मारितां जशी रुइफळें ॥
मारि मुष्टि तैं मारुत–सुत । पडे विकल महिं शिर वडवित
मग तो उठुनि मारि हनुमंता । मूर्छित पडला क्षण न लागतां ॥
मग महिं आदळि नलनीलानां । अपटि धरुनि चहुंकडे भटानां ॥
जाइ वलीमुख सैन्य पळोनी । अति भयभीत, समोर न कोणी ॥

**दो०–अंगदादि कपि मूर्छित करुनि सहित सुग्रीव ॥**
**खांकें घालुनि कपिपतिसि निघे अमित-बलशीव ॥६५**

उमे ! करिति रघुपति नरकेली । जसा गरुड खेळे अहिमेळीं ॥
भ्रूभंगें जो काळा खाई । शोभे कीं त्या अशी लढाई ॥
जगपावनि कीर्तिस विस्तरतिल । गा-गाउनि भवनिधि नर तरतिल
गत मूर्छा मारुत-सुत जागे । मग सुग्रीवा सोधूं लागे ॥
सुग्रीवहि शुद्धीवर आला । गळुन पडे, मृत वाटे त्याला ॥
दशनिं नासिका कान कापले । गर्जुनि गगनी गत त्या कळलें ॥
धरुनि चरण तो अपटि महिवरी । उठुनि सुलाघवि तो त्या मारी ॥

मग ये प्रभुपाशीं बलवान। जयति जयति जय कृपानिधान ।।
कळत नासिका कान छाटले। फिरे क्रुद्ध मनिं दुःख दाटलें ।।
सहज भीम ही श्रुति ना नासा। देखत कपिदळ धरि सुत्रासा ।।

**दो०–जय जय जय रघुवंशमणि धावति कपि हुप् हूप ।।**
**सर्व एकदां त्यावरी टाकिति गिरितरु खूप ।।६६।।**

कुंभकर्ण रण–रंगि विरुद्ध । जणूं काळ ये सन्मुख क्रुद्ध ।।
कोटिक कपि धर धरुनी खाई। टोळथवा गिरिगुहें कि जाई ।।
मर्दुनि देहि कोटि करि चुर्डा। कोटि पिळुनि करि धुळींत खुर्दा ।।
मुख कानां नाकाच्या वाटं। निसटुनि पळति भल्ल कपि लाटे ।।
रणमदमत्त निशाचर दर्पित। ग्रसिल विश्व, जणुं विधि या अर्पित
पळति सुभट वळती न वळवतां। नयनि दिसे ना ऐकति वदतां ।।
कुंभकर्ण कपि–फौजे उधळी। ऐकुनि निशिचर धाड धावली ।।
बघुनी राम विकल कपि कटकें। अरि अनीक नानाविध ठाके ।।

**दो०–अनुज सुकंठ बिभीषण! करा सैन्य–सांभाळ ।।**
**बघतो खलबल, बल वदति राजीवाक्ष कृपाळू ।।६७।।**

सज्य शाङ्‌र्ग करि कटि तूणीर। अरिदलदलनि जाति रघुवीर ।।
प्रभुनीं कार्मुक टणत्कारलें। घोर रवें रिपु–सैन्य बधिरलें ।।
सत्यसंध सोडिति शर लक्ष। काळ सर्प जणुं जाति सपक्ष ।।
जिथं तिथं जाति विपुल नाराच। छाटिति बहु भट विकट पिशाच ।।
तोडिति पद उर शिर भुजदंड। भट बहुतेक होति शतखंड ।।

मर्हि मूर्छित घायाळ हि पडती । सुभट सावरुनि उठुनी लढती ।।
लागत बाण जलद सम गाजति । बघुन कठिन शर बहु पळ काढति
धावति रुंडें प्रचंड मुंडहि । ध्वनि गर्जति धर धर धर मार हि

**दो०—प्रभु बाणांनीं क्षणामधि वधिले विकट पिशाच ।।**
**मग रघुवीर—निषंगि ते शिरले सब नाराच ।।६८।।**

कुंभकर्ण तैं चित्ति विचारी । क्षणिं हत राक्षस धाड किं सारी ।।
होई क्रुद्ध महाबल वीर । करि मृगनायक—नाद गभीर ।।
रोषें उपटुनि घेई भूधर । टाकि जिथें मर्कटभट बहुतर ।।
गिरि गुरु येत पाहिले प्रभुनीं । फोडुनि रजसम करिति शरानीं ।।
ओढुनि धनू कुपित रघुनायक । सोडिति अति कराल बहु सायक ।।
घुसुनि तनूंत निघुनि शिर फिरती । विजा जशा चमकुनि घनिं शिरती।
स्त्रवतें शोणित काळ्या तनुवर । गेरुपाट जणुं कज्जल—गिरिवर ।।
विकल बघुनि कपि भल्ल धावले । विहसे जैं कपि निकट ठाकले ।।

**दो०—महानद करि गर्जे कोटि कोटि धरि कीश ।।**
**मर्हि अपटी गजराज इव करी शपथ दशशीस ।।६९।।**

भल्ल वलीमुख पळति घाबरे । वृका विलोकुनि जशीं मेंढरें ।।
पळत सुटति कपि भल्ल भवानी । विकल पुकारित भयार्त—वाणीं ।।
हा राक्षस दुकाळ-सम आहे । कपिकुल-देशिं अतां पडुं पाहे ।।
कृपा—वारिधर राम खरारी ! । पाहि ! पाहि ! प्रणतार्ती हारी ।।
सकरुण वचन कळत भगवाना— । निघति स-सज्यशरासन-बाणा ।।

राम सैन्य निज मागें घालुनि । निघति महाबलशाली कोपुनि ।।
शत शर लाउनि धनू ताणलें । सुटले तीर शरीरीं शिरले ।।
धावे क्रुद्ध विद्ध शरवरीं । डोल धरे डगमग भूधरीं ।।
शैल एक उपटुनी घेत तो । रघुकुळ टिळक छाटिती भुज तो ।।
धावे वाम करीं गिरि घेउनि । प्रभु पाडिति महिं तो भुज छेदुनि ।।
छिन्न वाहु खल दिसला तैसा । पक्षहीन मंदर गिरि जैसा ।।
उग्र विलोकें प्रभुस विलोकी । गिळूं पाहतो जणूं त्रिलोकी ।।

**दो०-करुन घोर चीत्कार अति धावे मुख वासून ।।**
**गर्जनि सिद्ध सुर घाबरे हा हा ! हाय ! करून ।।७०।।**

सभय देव करुणानिधि जाणति । श्रुतिपर्यंत शरासन ताणति ।।
विशिख निकरिं निशिचरमुख भरती । तदपि महाबल पडे न धरतीं ।।
शरपूरितमुख सम्मुख धावे । काळतूण सजीव जणुं यावें ।।
प्रभु तैं क्रुद्ध तीव्र शर घेती । धडावरुनि शिर त्याचें हरती ।।
दशमुख सम्मुख शिर तें पडलें । मणिविण फणि तेवींच विव्हळे ।।
धसे धरा धड प्रचंड धावत । प्रभु दुरंवड कापुन तें टाकत ।।
जसे नभांतुनि भूधर पडले । तळिं निशिचर कपि भल्ल चिरडले।।
प्रभु-वदनीं तत्तेज समावत । सुर मुनि सकल अचंबा मानित ।।
वाजविती सुर दुंदुभि हर्षति । स्तुती करुनि बहु सुमनें वर्षति ।।
विनति करुनि सुर सकल परतले । देवर्षी त्या समयिं ठाकले ।।
गगनीं मुनि हरिगुणगण गाती । रुचिर वीर रस, प्रभुला रुचती ।।

शीघ्र वधा खल वदुनि गत मुनी । राम शोभले रण–अंगणी ॥

**छं०–संग्राम मंहि रघुपति विराजति अतुलबल कोसलधनी।**
**श्रमबिंदु मुखि राजीव लोचन अरुण, तनुं शोणित-कणी।**
**भुज युगलि फिरविति शर शरासन कीश रीस सभोंवती।**
**म्हणतसे तुलसी वर्णुं शकति न शेष छवि वदनीं अती ॥१॥**

**दो०–निशिचर अधम मलाकर त्यास दिलें निज धाम ॥**
**गिरिजे ! ते नर मंदमति भजति न जे श्रीराम ॥७१॥**

वळति उभय दळ गत दिनमणी । झाले सुभटां श्रम अति रणीं ॥
रामकृपें कपिदल–बल गाढें । जसा मिळत तृण कृशानु वाढे ॥
घटती निशिचर दिवसा रातीं । स्वमुखें वदत सुकृत जशि जाती ॥
दशकंधर बहु विलाप करतो । पुन: पुन्हां शिर उराशि धरतो ॥
रडति नारि करिं ऊर बडविती । तद्बल–तेजा विपुल वर्णिती ॥
मेघनाद ते अवसरिं आला । समजावी बहुपरीं पित्याला ॥
उद्यां बघा तुम्हि मम पुरुषार्थंहि । अतां बढाया मारुन नार्थं हि ॥
बल रथ अर्पित इष्ट दैवतें । बल न दाविलें तुम्हां तात तें ॥
यापरिं जल्पत रात्र संपली । कपिनीं द्वारें चारि रोधलीं ॥
वीर काळसम भल्ल कपि इथें । रजनीचर रणधीर अति तिथें ॥
लढति सुभट निज निज जयहेतू । समर वर्णवे ना खगकेतू ॥

**दो०–मेघनाद मायामय रथीं जाइ गगनांत ॥**
**साट्टहास गर्जे पडे धाक कीश कटकांत ॥७२॥**

शक्तिशूलतलवारिकृपाणां । अस्त्र शस्त्र कुलिशायुध नाना ॥
टाकी परशु परिघ पाषाणां । वर्षुं लागला असंख्य बाणां ॥
दाहि दिशा व्यापुन शर राहत । मघामेघ-झड जणुं बहु लागत ॥
धर धर मारा ध्वनि ये कानां । कोण मारि उमजे कोणा ना ।
गिरितरुधर कपि गगनीं धावति । तो न दिसे तैं दुःखी परतति ॥
अवघड घाट वाट गिरिकंदर । मायाबळें करी शर-पंजर ॥
जाति कुठें व्याकुळ अति वांदर । सुरपति बंदि पतित जणुं मंदर ॥
मारुतसुत-अंगद-नल-नीलां । व्याकुळ करी सकल बलशीलां ॥
मग लक्ष्मण सुग्रीव विभीषण । केले शर मारुन जर्जर-तन ॥
मग रघुपतिशी करी युद्ध तो । सोडी शर तो नाग लागतो ॥
व्यालपाशवश होति खरारी । स्ववश अनंत एक अविकारी ॥
नट इव कपट चरित करि नाना । भगवान् सदा स्वतंत्र हि जाणां ॥
प्रभु बांधुनि घे रण शोभेस्तव- । नागपाशि, भय देवानां तंव ॥

**दो०-यस्य नाम गिरिज ! जपुनि मुनि तोडिति भवपाश ॥**
**तो कि बंधनीं सापडे व्यापक विश्व-निवास ॥७३॥**

रामचरित्रा सगुण भवानी । तर्कवे न बुद्धी-बल-वाणीं ॥
अशा विचारें तज्ज्ञ विरत जे । त्यजुनि तर्क रामास भजति ते ॥
व्याकुळ करुनि कटक घननाद । झाला प्रगट वदे दुर्वाद ॥
म्हणे जांबवान खला ! थांबरे । श्रवुनि तया मनिं रोष अति भरे ॥
वृद्ध गणुनि शठ तुला सोडला । अधमा तूं आव्हानिसि मजला ॥

तदा त्रिशूल तरल तो मारत । जाववंत करि पकडुनि धावत ।।
घननादाच्या उरीं मारला । सुरघाती मूर्छित महिं पडला ।।
मग रोषें पद धरि भिरकावी । धरणि आदळी निजबळ दावी ।।
तो वरवळें मरे ना मारुनि । धरि पद दे लंकेत झुगारुनि ।।
इथें धाडि नारद गरुडाला । राम–समीर सर्पादि तो आला ।।

**दो०–खगपति सगळे खाई माया–नाग–वरूथ ।।**
**झाले माया–विगत सब हर्षति वानर–यूथ ।।७४ रा ।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ८ वा

**दो०–नख–गिरि–पादप–उपलधर धावतिःकपि कोपून ।।**
**फिरति तमीचर विकल तर चढले दुर्गि पळून ।।७४म।।**

मेघनाद मुर्छेतून उठला । पित्या पाहुनी फार लाजला ।।
शीघ्र जाइ गिरिवर–कंदरी । करूं अजय मख असं मनिं धरी ।।
वदे बिभीषण मंत्र–विचारा । ऐका प्रभु ! बल अतुल उदारा ।।
मेघनाद मख करत अपावन । खल मायावी सुर–संत्रासन ।।
जर कां तो प्रभु सिद्धिस जाइल । शीघ्र जिकणें अशक्य होइल ।।
ऐकुनि रघुपति अति सुख मानिति । अंगदादि बहु कपि बोलाविति ।।
सह लक्ष्मण सकलानीं जावें । मख विध्वंसन तुम्हीं करावें ।।
लक्ष्मण तुम्हि रणि मारा त्यातें । बघुनि सभय सुर सुदुःख मातें ।।

बल-मति-यत्नें तया मारणें। नाश निशाचर पावे जेणें ॥
जांववंत सुग्रीव बिभीषण। रहा चमूसह सर्वे तिघेजण ॥
जैं रघुवीर देति अनुशासन। कसुनि तूण कटि सज्य शरासन ॥
प्रभूप्रतापा उरिं रणधीर। धरुनि, वदे वच घनगंभीर ॥
त्यास वधुनि जर आज न येइन। रघुपति सेवक कधीं न म्हणविन ॥
साह्य करिति जरिं शंकर शतही। तरि मारिन रघुवीर शपथ ही ॥

**दो०-रघुपति चरणीं नमुनि शिर निघती त्वरें अनंत ॥**
**अंगद नील मयंद नल सर्वे सुभट हनुमंत ॥७५॥**

जाति वधति कपि बसलेला तो। रुधिर महिष आहुतींस देतो ॥
कपि करिती सब मखविध्वंसा। तरि न उठे करिति तैं प्रशंसा ॥
तरि न उठें तैं धरिति कचानां। पळति मारुनी बहु लाथानां ॥
घे त्रिशूल धावे कपि पळले। जिथं रामानुज तेथें आले ॥
अति कोपें प्रेरित जणुं आला। गर्जे घडि घडि घोर रवाला ॥
क्रुद्ध मरुतसुत अंगद धावति। त्रिशुळ मारि उरिं पाडि तयां क्षिति॥
प्रभुवर शूला प्रचंड सोडी। शरें अनंत दुखंड चि तोडी ॥
उठुनी मारुति अंगद मारति-। अति कोपें, त्या घाव न लागति ॥
वळति वीर रिपु मरे न मारें। लागे पाठि घोर चीत्कारें ॥
येतां क्रुद्ध वधुनि जणुं काळ। लक्ष्मण सोडिति विशिख कराल ॥
येतां पाहुनि पविसम बाणां। क्षणिं पावे खल अंतर्धाना ॥
विविध वेष धरि करी लढाई। कधीं प्रगट कधि लपून जाई ॥

वघुनि अजय रिपु सभीत कीश । क्रुद्ध परम तैं होनि अहीश ॥
लक्ष्मण मनिं हा निश्चय झाला । खेळविला मी बहु पाप्याला ॥
स्मरुनि कोसलापती–प्रतापा । शरसंधान करिति बहु दर्पी ॥
वाण सोडला उरांत शिरला । मरणसमयिं तो त्यजि कपटाला ॥

**दो०–वदुनि कुठें रामानुज राम कुठें, त्यजि प्राण ॥**
**वदति धन्य तव जननी, तैं अंगद हनुमान ।७६॥**

अनायास हनुमान उचलुनो । आला लंकाद्वारिं ठेउनी ॥
तो मृत ऐकुनि सुर गंधर्व । बसुनि विमानिं येति नभिं सर्व ॥
वर्षुनि सुम दुंदुभी वाजविति । श्रीरघुनाथ-विमल–यश वानिति ॥
जय अनंत जय जगदाधारा । प्रभु ! तुम्हि सर्व सुरां उद्धारां ॥
स्तुती करुनि सुर सिद्ध निघाले । लक्ष्मण कृपाब्धिपाशीं आले– ॥
सुतवध ऐके यदा दशानन । मूर्छित होइ पडे महिं तत्क्षण ॥
मंदोदरी रुदन करि भारी । उर बडवी बहुपरीं पुकारी ॥
नगरलोक शोकें व्याकुळती । दशमुख नीच सकल ही म्हणती ॥

**दो०–तैं दशकंठें विविध विधि सकळ सांत्विल्या नारि ॥**
**नश्वररूपचि सकल जग बघा हृदयिं सुविचारि ॥७७॥**

तया ज्ञान उपदेशी रावण । आपण मंद, कथा शुभ पावन ॥
पर–उपदेश–कुशल बहुतेक हि । जे आचरती नर बहु ते नहि ॥
निशा संपली उषा ठाकली । पुरद्वारिं कपि चमू लागली ॥
सुभट आणवुनि दशमुख बोले । रणिं सम्मुख ज्याचें मन डोले ॥

बरें तयानें अतां पळावें । बरें नव्हें कि विमुख रणि व्हावे ॥
मी कृत वैरा स्वभुज-बळावर । रिपु आक्रमि तर देइन उत्तर ॥
तदा मरुतवेगी रथ साजति । विविध लढाऊ बाजे वाजति ॥
निघति वीर सब अतुलित बली । कज्जल-वावटळ कि चालली ॥
अशकुन अमित होति ते कालीं । तो न गणीं भुज-बल-मद-शाली ॥

**छं०—अति गर्व गणि ना शकुन अशकुन गळति करिचीं शस्त्रही**
**भट पडति रथिचे, वाजि गज चिक्करत वळती पळत ही**
**गोमायु गृध्र कराल खर रव रडति कुक्कुर खर अती ।**
**जणुं कालदूत उलूक घूकति वचन परम भयाण तीं ॥१॥**

**दो०—त्या कि संपदा शकुन शुभ स्वप्निंहि मनि विश्राम ।**
**भूत-द्रोही मोहवश रामविमुख रत काम ॥७८।**

चाले निशिचर कटक अपारहि । चतुरंगिणी चमू बहु धारहि ॥
नानाविध यानें रथवाहन । ध्वजा पताका विचित्र पार न ॥
जाति मत्त गज यूथ न गणती । प्रावृट्-घन जणुं मरुतें पळती ॥
बाणा विचित्र वीर निकायां । समर शूर जाणति बहु माया ॥
अति विचित्र वाहिनी विराजत । वीर वसंत सैन्य जणुं साजत ॥
कटक चालतां दिग्गज डगती । क्षुब्ध पयोधि कुधर डगमगती ॥
रेणु उडुनि बहु रविला लपवी । स्थगित मरुत आकुळली पृथवी ॥
पणव निशाण घोर रव वाजति । प्रलय समयिंचें घन जणुं गाजति ॥
भेरि तुताऱ्या वाजति सणया । मारू राग सुखद भट-हृदया ॥

केसरिनाद वीर सब करती । निज निज बल पौरुष उच्चरती ॥
दशमुख म्हणे सुभट एकावें । तुम्हि कपि भल्ल थवे मर्दावे ॥
मी मारिन दो नृप-बंधूंसी । वदुनि सरपटत चालवि चमुसी ॥
यदा खबर ही कपी पावले । जय जय जय रघुवीर ! धावले ॥

**छं०–धावति विशाल कराल मर्कट भल्ल काल समान ते ।**
**जणुं पक्षयुत बहु उडति भूधर–वृंद नाना वर्ण ते ॥**
**नख–दशन- शैल-महा-द्रुमायुध सबल भीति न मानिती ।**
**जय राम रावण–मत्तगज–मृगराज सुयशा वानिती ॥**

**दो०–जयजयकारा करून ते निज निज जोड बघून ॥**
**लढति वीर रामा इथें रावण तिथें स्तवून ॥७९॥**

रावण रथीं विरथ रघुवीर । बघुन विभीषण होई अधीर ॥
प्रीति अधिक मन धरि संदेहा । वंदुनि चरणि वदे सुस्नेहां ॥
नाथ ! रथ न तनु पादत्राण । जिका कसा वीर बलवान ।।
सखे ऐकणें म्हणति कृपाकर । जयदायी स्यंदन दुसरा वरं ॥
त्या रथि चाकें शौर्य नि धैर्य हि । ध्वज पताक दृढ सत्य नि शीलहि ॥
वाजी बल विवेक दम परहित । क्षमा-कृपा-समता-रजु-योजित ॥
ईश-भजन सारथी सुजाण । विरति ढाल संतोष कृपाण ॥
दान परशु धी शक्ति प्रचंडहि । वर विज्ञान कठिण कोदंडहि ॥
अमल अचल मन तोण समान । शम यम नियम विविध विध बाण
कवच अभेद्य विप्र-गुरु-पूजा । यासम विजय-उपाय न दूजा ॥

सखे ! धर्ममय असा रथ जया । जिकण्यास रिपु कुठें नहिं तया ॥

**दो०–महा अजय संसार रिपु जिकुं शके तो वीर ॥**
**जयापाशि रथ असा दृढ ऐक सखे मति धीर ॥८० रा ॥**
**प्रभुवच परिसुनि बिभीषण हर्षित धरि पदकंज ॥**
**यामिषि कृत उपदेश मज राम ! कृपा-सुख पुंज ॥८०म॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ९ वा

**दो०–दशमुख ललकारी तिथें इथ अंगद हनुमान ॥**
**लढति निशाचर भल्ल कपि करुनी स्वप्रभु आण ॥८०चं ।**

सुर विधि आदि सिद्ध मुनि नाना । बघती रण नभिं बसुनि विमानां ॥
आम्हिहि उमे होतों त्यां–संगां । पाहत रामचरित रणरंगा ॥
रणरसमद चढला उभयानां । कपि जयशील रामबल त्यांनां ॥
एकैकासि लढति ललकारिति । एकैका मर्दुनि महिं पाडिति ॥
मारिति कापिति धरिति अपटिती । शिरें तोडुनी शिरें ताडिती ॥
उदर विदारिति बाहू उखळिति । धरुनि पाय महिं भटां आदळिति॥
निशिचर भटां भल्ल भुवि गाडिति । वर भरभर बहु वाळु टाकिति ॥
वीर वलीमुख युध्दि विरुद्ध । काळ विपुल जणुं दिसती क्रुद्ध ॥

**छं०–क्रुद्धचि कृतान्त समान कपि तनु गळत शोणित राजती॥**
**मर्दिति निशाचर-चमु-भटां बलवंत घनसे गाजती ॥**

देती चपेटा दांति तोडुनि लाथ हाणुनि चुंडिती ।
चीत्करति मर्कट भल्ल छलबल करिति खल रिपुनाशिती।। १
छं०–कुणि गाल फाडिति उर विदारिति कंठि अंत्रें घालती ।
प्रल्हाद पति जणुं विविध तनुधर समर अंगणि खळती ।।
धर मार पाड हि काप घोर गिरा गर्गनि भरली मही ।
जय राम जो तृण कुलिश करि, कुलिशास तृणकरि सहजही २
दो०–निज दल विचलित पाहुनी वीस भुजीं दशचाप ।।
निघे बसुनि रथिं दशानन फिरा फिरा दे ताप ।।८१।।
धावे क्रुद्ध परम दशकंधर । सम्मुख जाती हुप् हुप् वांदर ।।
उपल शैल बहु पादप उपटिति । एकावेळीं त्यावर टाकिति ।।
शैल वज्रदेहीं आदळती । खंड खंड ते तत्क्षणि फुटती ।।
न चळे, अचळ असे रथ थोपुनि । रण दुर्मद रावण अति कोपुनि ।।
कपिस चहुंकडे झडपुनि दपटी– । क्रोधें अति मर्दुनि महिं अपटी ।।
सुटले पळत भल्ल कपि नाना । त्राहि ! त्राहि ! अंगद हनुमाना !
स्वामि पाहि ! रघुवीरा पाहा ! । हा खळ खातो काळ जसा ही ।।
वधुनि सकल कपिनां पळतांही । लावी सायक कार्मुकि दाही ।।
छं०–शर निकर लक्षुनि सोडि उरगां समहि उडुनि लागती ।
शर धरणि अंबर भरुनि उरले विदिशि दिशि कपि धावती ।।
कोलाहलहि बहु विकल कपिलदल भल्ल बोलति धाव रे ।
रघुवीर करुणासिंधु आर्त सुबंधु जन-रक्षक हरे ।।१।।

**दो०–स्वदल विकल बघुनी कटीं कसुनि तूण धनु हातिं ।।**
**नमुनि रामपदिं मस्तका लक्ष्मण सकोप जाति ।। ८२ ।।**

रे खल कां कपि रीस मारसी । काळ तुझा मी विलोकि मजसी ।।
सोधित होतो तुज सुत घाती ! । आज मारुनी निवविन छाती ।।
वदुनि सोडि तो शरां प्रचंडा । लक्ष्मण करी सकल शतखंडा ।।
कोटि आयुधें रावण मारी । तिळ तिळ कापुनि सर्व निवारी ।।
निज नाराचीं तया प्रहारी । स्यंदन भंगुनि सूता मारी ।।
शतःशत शर दश भालिं मारले । व्याळ जणूं गिरिशृंगीं शिरले ।।
मग:शत शर मारिले उरावर । पडे धरणि तळिं शुद्धि न तिळभर ।।
उठे प्रबल मूर्छा जैं उडली । ब्रह्मदत्त शक्तीच सोडली ।।

**छं०–ती ब्रह्मदत्त प्रचंड शक्ति अनंत उरिं खरि लागतां ।**
**तो वीर मूर्छित, उचलि दशमुख अतुलबल महिमा गता।।**
**ब्रह्मांड भवन निवास ज्याचे एक शिरिं सम रजकणी ।**
**त्या उचलुं पाहे मूढ रावण उमज ना त्रिभुवन धनी।।१।।**

**दो०–बघुनि पवनसुत धावला बोलत वचन कठोर ।।**
**येतां कपिला मारि तो मुष्टिघात अति घोर ।। ८३ ।।**

जानु टेकि कपि महिं ना पडे । उठे सावरुनि रोषा चढे ।।
मुष्टी एक तया कपि मारी । पडे शैल जणुं पवी-प्रहारीं ।।
मूर्छा जाउनि जैं तो जागे । विपुल कपिबला प्रशंसु लागे ।।
धिग् धिग् मम पौरुष धिग् मजसी । सुर द्रोहि तूं अजून जगसी ।।

वदुनि लक्ष्मणा कपि ये घेउनि । दशमुख विस्मित झाला पाहुनि ॥
रघुविर वदति समज मनिं ताता । तूं कृतान्त-भक्षक सुरपाता ॥
ऐकुनि वचना कृपाल उठला । गेली नभिं ती शक्ति कराला ॥
मग कोदंड बाण घे धावे । रिपु सम्मुख अति सत्वर पावे ॥

**छं–सत्वर पुन्हां रथ भंगुनी हत सारथी व्याकुळ करी ।**
**दशकंठ महिं अति विकल पडला बाण शत लागत उरीं ॥**
**त्या घालुनी रथिं अन्य सारथि शीघ्र ने लंकेप्रती ।**
**रघुवीर बंधु प्रतापराशी प्रभुपदीं ये करि नती ॥ १ ॥**

**दो०–तिथें दशानन जागतां करूं लागला यज्ञ ॥**
**रामविरोधीं इच्छि जय शठहटवश अति अज्ञ ॥ ८४ ॥**

इथें बिभीषण खबर पावला । सपदि जाइ सांगे रघुपतिला ॥
नाथ ! एक करि रावण यागा । होतां सिद्ध न मरे अभागा ॥
धाडा नाथ ! शीघ्र भट वांदर । विध्वंसिति येइल दशकंधर ॥
प्रातः प्रभु सुभटानां धाडति । हनुमानादि अंगद सब धावति ॥
प्रविशति सहज उडुनि कपि लंका । शिरले रावण भवनिं न शंका ॥
यज्ञ करित जैं तो आढळला । सकल कपींस कोप अति चढला ॥
रण सोडुनि निर्लज्ज पळाला । करी इथें बगळा ध्यानाला ॥
वदुनी अंगद लाथा मारी । शठ न बघे स्वार्थीं रत भारी ॥

**छं०–जैं पाहिना, कपि कुपित दंतीं धरिति लाथा मारती ।**
**नारींस धरुनी केश ओढिति दीन विलपति त्या अती ॥**

मग उठुनि कुपित कृतान्तसम कपि धरुनि पायां उडवले।
संधींत या कपि नाशिती मख बघुनि मन अति कचरलें ॥१

दो०-मख विध्वंसुनि कुशलकपि आले रघुपति पाशि ॥
निघे निशाचर कुपित, न हि जीवन आशा त्यासि ॥८५॥

निघत होति अति अशुभ भयंकर। बसति गिधाडे उडुनि शिरावर ॥
होइ कालवश कुणा न गणतो। युद्ध निशाणें पिटा कि म्हणतो ॥
निघे तमीचर चमू महा ती। बहु गजरथ हय-भट पादाती ॥
प्रभु सम्मुख खल धावति तैसे। शलभसंघ अनलावर जैसे ॥
इकडे देवांनीं स्तुति केली। दारुण दुःखें यानें दिधली ॥
पुरे राम ! या खेळविणें ही। होते अति दुःखी वैदेही ॥
प्रभु सस्मित जैं सुर-वच कानां। मग रघुवीर निरीक्षिति बाणां ॥
जटाजूट मस्तकिं दृढ बांधति। कुसुमें ग्रथित मधें अति शोभति ॥
अरुण नयन तन मेघश्यामा। अखिल लोक लोचनाभिरामा ॥
कटितटिं परिकर कसुनि निषंगा। करिं कोदंड कठिण शारंगा ॥

छं०-करिं शार्ग सुंदर कटिं निषंग शिलीमुखाकर कसितसे।
भुजदंड पीन मनोहरायत उरिं धरासुर-पद लसे ॥
तुलसी वदे कीं प्रभु यदा शर चाप करिं निज फिरवती।
ब्रह्मांड दिग्गज कमठ अहि महि सिंधु भूधर कंपती ॥

दो०-हर्षित सुर शोभा बघुनि वर्षति सुमन अपार ॥
जयजय करुणानिधि छबि-बल-गुण-आगार ॥८६॥

या संधींत निशाचर अनी । येई टक्करत कोण कि गणी ॥
वघुनि जाति सम्मुख कपि भट्टां । प्रळय काळच्या जणुं घनघट्टा ॥
किति कृपाण तरवारि चमक्कति । जणुं दशदिशि दामिनी दमक्कति ॥
गज-रथ वाजी–स्वन कर्कश अति । जणूं वलाहक सुघोर गर्जति ॥
कपि-लांगूल विपुल नभि पसरति । जणूं इंद्रधनु सुंदर विलसति ॥
उडते धूळ जणूं जलधारा । वाण विंदुवृष्टीहि अपारा ॥
उभय हि करिती गिरीप्रहरां । वज्रपात जणुं वारंवारां ॥
रघुपति कुपित वाणझड लावति । निशिचर-निकर फार घायाळति ॥
लागत वाण वीर चीत्करती । जिथें तिथें महिं मूर्छित पडती ॥
स्रवति शैलि जणुं निर्झर भारी । शोणित-सरि कातर-भयकारी ॥

**छं०–कातर-भयंकर रुधिर-सरिता अति अपावन चालली ।**
**युग कूल दल, रथ रेति, भंवरे चक्र भयदा वाहली ॥**
**जलजंतु पदचर तुरग खर गज विविध यान न मोजवे ।**
**शर शक्ति तोमर सर्प, कार्मुक वीचि, ढाली कासवें ॥१॥**

**दो०–वीर पडति जणुं तीर तरु वाहे मज्जा फेन ॥**
**देखत कातर डरति अति सुभटांचे मनिं चैन ॥८७॥**

प्रत भुतें मज्जति वेताळ हि । प्रमथ महा झोटिंग कराल हि ॥
काक कंक भुज घेउनि पळती । एकैकांचे हिसकुनि गिळती ॥
कोणी म्हणति अशी स्वस्ताई ! । शठ तुमचें दारिद्रय न जाई ॥
पडले कण्हत विद्ध भट तटीं । पतित अर्ध जलि जणुं शेवटीं ॥

गृध्र तटीं आंतडि ओढती— । शांत, गळें जणुं झष पकडती ।।
भट वाहति बहु खग वर बसती । जणुं नदींत नौक्रीडा करती ।।
योगिणि रुधिर खर्परीं सांचति । भूतपिशाच वधू नभिं नाचति ।।
भटकपाल करताल वाजवति । चामुंडा गाती विविधा अति ।।
जंबुक-निकर तटातट तोडति । खाती हू ! हू ! दुजां दटावति ।।
कोटी रुंड मुंडविण डोल्लति । शिरें पतित महिं जयजय बोल्लती।।

**छं०–बोल्लती जयजय मुंड, रुंड प्रचंड शिरविण धावती ।**
**खग खर्परीं झडपूनि झुंझति सुभटभट बहु ढकलती ।।**
**वानर निशाचर–निकर मर्दिति रामबल-दर्पं युत ।**
**संग्राम-अंगणि सुभट निद्रित राम-शर-निकरें हृत ।। १ ।।**

**दो०–रावण हृदयि विचारी कृत निशिचर-संहार ।।**
**भल्ल कीश बहु, एक मी माया निर्मु अपार ।। ८८ ।।**

देवानां प्रभु पदचर दिसले । तदा सकल अति खिन्न जाहले ।।
तत्क्षणि सुरपति धाडि रथाला । हर्षित मातलि घेउन आला ।।
तेजपुंज रथिं अनुपम दिव्यहि । हर्षित चढति अयोध्या-भूपहि ।।
चंचल तुरग मनोहर चारी । अजर अमर मनसम गतिकारी ।।
रथारूढ रघुनाथां पाहुनि । कपि धावति बल विशेष पावुनि ।।
कपिमारा त्या असह्य भारी । तैं रावण माया विस्तारी ।।
त्या माये रघुवीर जाणती । लक्ष्मण कपि ती सत्य मानती ।।
दिसति कपीनां निशिचर—अनीं । सानुज अगणित कोसल धनी ।।

छं०—बहु रामलक्ष्मण बघुन कपिदल-भयें कल्पित गडबडे ।
जणुं चित्र-लिखित समेत लक्ष्मण बघत ठायिंच सब खडे ॥
चमु चकित बघुनी हसुनि लाविति चापि शर कोसलधनी ।
माया हरी हरि निमिषि, हर्षे सकल मर्कट-वाहिनी ॥१॥
दो०—बघुनि राम सर्वांकडे वदले वच गंभीर ॥
द्वंद्वयुद्ध सगळे पहा श्रमलां तुम्हि अति वीर ॥८९॥

❖ ❖ ❖

## अध्याय १० वा

तदा रथा रघुनाथ चालविति । विप्रचरण—पंकजिं शिर नमविति
तैं लंकेश रुष्ट अति झाला । गर्जत तर्जत सम्मुख आला ॥
जिंकलेत रणिं ज्या वीरांही । श्रुणु तापस मी त्यां सम नाहीं ॥
रावण नाम जगतिं यश भरलें । लोकप ज्याचे वंदीं पडले ॥
तुम्हि खर दूषण विराध मारां । वधा व्याध इव वालि बिचारा ॥
निशिचर—निकर सुभट संहरिले । कुंभकर्ण—घननादां वधिले ॥
याचे उट्टें काढिन आजीं । नृप! जर पळ काढसी न आजीं ॥
आज हवालि करुंच काळासी । कठिण रावणा सांपडलासी ॥
दुर्वच परिसुनि गणुनि कालवश । विहसुनि वदति कृपानिधान असं—
सत्य सत्य सब तव बा ! प्रभुता । जल्पुं नको दाखव पुरुषार्था ॥
छं०—बा! सुयश-नाश न कर किं जल्पुनि ऐक नीति करी क्षमा ।
संसारिं नर या त्रिविध पाटल-आम्र-पनसांचे समा ॥

कुणि फक्त सुमनद, एक फुलफळ, फळचि एकां लागती ।
कुणि वदति करति न, वदति करती कोणि करति, न भाषती ।। १

दो०—श्रवुनि राम वच विहसे शिकवित मजला ज्ञान ।।
केलें वैर न भय तदा अतां प्रिय गमे प्राण ।। ९० ।।

दुर्वच वदुनि रुष्ट दशकंधर । सोडुं लागला कुलिशांसम शर ।।
नानाकार शिलीमुख सुटले । दिशि विदिशीं नभि भूवर भरले ।।
पावक शर सोडिति रघुवीर । जळले क्षणीं निशाचर तीर ।।
सोडि तीव्र शक्ती अति चिडुनी । शरसंगें प्रभु लावि परतुनी ।।
चक्रें कोटी त्रिशूल मारी । प्रभु लीलेनें तोडि निवारी ।।
विफल होति रावण-शर तैसे । सकल खलाचे मनोरथ जसे ।।
रामसारथिस शत शर मारत । पतित महीं जय राम पुकारत ।।
राम कृपेनें सूता उठविति । प्रभु तैं भारी क्रोधा पावति ।।

छं०—जैं क्रुद्ध युद्धि विरुद्ध रघुपति तूणि बाण अधीर ते ।
कोदंड निस्वन चंड अति मनुजाद हृत भय-मारुतें ।।
मंदोदरी-उरि कंप कंपति कमठ गिरि भू संत्रसे ।
चीत्करति दिग्गज दशनि धृत महि, बघुनि कुतुकसुरां हसें ।। १

दो०—ताणुनि धनु आकर्ण जैं सोडिति विशिख कराल ।।
जाति राम-मार्गण गण झगझगीत कीं व्याल ।। ९१ ।।

जाति बाण जणुं सपक्ष उरगहि । प्रथम मारिले सारथि तुरगहि ।।
रथहि पताका केतु भंगले । गर्जे अति अंतर्बल थकलें ।।

शीघ्र अन्य रथिं बसे खवळला । शस्त्रास्त्रें बहु वर्षु लागला ॥
विफळ होति सब उद्यम त्याचे । परद्रोहरत जसे नराचे ॥
मग रावण दश शूलां धाडी । वाजि चारि मारुनि महिं पाडी ॥
उठवुनि तुरग रुष्ट रघुनायक । ओढुनि कार्मुक सोडिति सायक ॥
रावण-शिर-सरोज-वनचारी । गत रघुवीर शिलीमुख भारी ॥
दश दश शर दश भालिं मारले । जाति पार रुधिरौघ चालले ॥
स्रवत रुधिर धावे बलवान । करिति पुन्हां प्रभु शरसंधान ॥
तीस तीर रघुवीर सोडिती । शिरें भुजांसह महीं पाडिती ॥
कापत तत्क्षणिं नवीन होती । राम पुन्हां शिर भुजा छाटती ॥
प्रभु कितिदां कापिति शिरभुजा । छाटित झटिति फुटति नव दुजा ॥
प्रभु घडि घडि छाटिति भुजशीस । अति कौतुकी कोसलाधीश ॥
नभीं पसरती शिर बहु बाहू । असंख्यात जणुं केतू राहू ॥

**छं–जणुं राहु केतु अनेक, नभ-पथिं झरत शोणित धावती ।**
**रघुवीर तीर प्रचंड लागति भूमि येउं न पावती ॥**
**एकैक शरिं शिर-निकर छेदित उडत नभिं अशि शोभती ।**
**जणुं सरुष दिनकर कर निकरिं चहुंदिशिं विधुंतुद ओवती ॥१॥**

**दो०–प्रभु जशि जशि हरती शिरें तशि तशि होति अपार ॥**
**जसा विषय सेवित अधिक वाढे प्रतिदिन मार ॥९२॥**

दशमुख बघुनि शिरांची वाढ । विसरे मरण रोष यें गाढ ॥
मूढ महा अभिमानी गर्जुनि । धावे दाहि शरासन ताणुनि ॥

रणभूवर दशकंधर कोपी । वर्षी शर रघुपति-रथ लोपी ।।
घटकाभर रथ दृष्टि न पडला । जणूं धुक्यामधिं दिनकर दडला ।।
हाहाकार यदा सुर करती । तैं प्रभु कोपें कार्मुक घेती ।।
शरां निवारुनि रिपु-शिर कापती । ती दशदिशा गगन भू व्यापति ।।
छिन्न शिरें नभ मार्गि धावती । जय जय करुनी भय उपजवती ।।
लक्ष्मण कुठें सुकंठ कपीश्वर । रघुविर कुठें कोसलाधीश्वर ।।

**छं०-शिर राम कोठे वदत धावति, बघुनि कपि पळु लागती ।**
**मग हसुनि रघुकुलमणि शरानीं तीं शिरें सब वेधती ।।**
**शिर-मलिका धृत कालिका बहुवृंद वृंदें मिळुनियां ।**
**जणुं निघति नाहुनि रुधिर सरितें समर-वट पूजावया ।।१।।**

**दो०-क्रुद्ध होइ दशकंठ मग सोडी शक्ति प्रचंड ।।**
**जाइ बिभीषण सन्मुख जणुं काळाचा दंड ।।९३।।**

येतां बघुनि शक्ति अति भीषण । प्रणतार्तिभंजन माझा पण ।।
मागे करुनि बिभीषण सत्वर । राम घेति शक्ती अपणांवर ।।
क्षण मूर्छा शक्ती लागतां । प्रभुचा खेळ सुरां विकलता ।।
प्रभुला श्रम पाहुनी बिभीषण । धावे क्रुद्ध गदा करिं भीषण ।।
रे कुभाग्य शठ मंद कुबुद्धी ! । तूं सुर-नर-मुनि-नाग विरोधी ।।
शिरें आदरें शिवा वाहलीं । एकैकाचीं कोटि जाहलीं ।।
म्हणुन वाचसी खला ! आजवरि । अतां काळ नाचतो तुझ्या शिरिं ।।
रामविमुख इच्छिसी संपदा । शठ! असं म्हणुनि मारि उरिं गदा ।।

छं०-उरिं गदा मार कठोर घोर हि लागतां महिं कोसळे।
दशवदनि ओके रक्त, उठुनी रुष्ट धावे अति बळें ॥
ते लढति अतिबल मल्ल युद्धीं हाणि एक दुजास ही।
रघुवीर-बल दर्पित बिभीषण गणि न त्या पासंग ही ॥१॥
दो०-उभे बिभीषण रावणा सम्मुख कीं कधि पाहिं ॥
श्री रघुवीर-प्रभाव हा काळ हि लढे अतां हि ॥९४॥
दिसला श्रांत बिभीषण भारी। हनूमान धावे गिरिधारी ॥
करि-रथ-सारथि तुरंग घाता। मारी त्याच्या उरांत लाथा ॥
उभा असे, अति गात्रीं कंपन। गत जनपालाकडे बिभीषण ॥
कपिस मारि रावण पाचारुनि। नभीं उडे कपि पुच्छा पसरुनि ॥
धरुनि पुच्छ कपि सभेत उडाला। हनुमान् वळुनी त्यासी लढला ॥
गगनीं लढति युगल सम योद्धे। ताडी एक दुजाला क्रोधें ॥
शोभति नभि छलवल बहु करती। जणुं कज्जलगिरि सुमेरु लढती ॥
बुद्धि-वळें पाडित न पडे तो। मारुत सुत तैं प्रभुला स्मरतो ॥
छं०-रघुवीर चिंतुनि धीर कपि पाचारि हाणी रावणा।
महिं पडति उठती लढति, जयजय करिति सुर दोघांजणां ॥
हनुमंत संकट बघुनि मर्कट भल्ल कोपें धावले।
रणमत्त रावण सुभट सब मर्दी प्रचंडें भुजबळें ॥
दो०-तैं रघुवीरें प्रेरिले कपि धावले प्रचंड ॥
प्रबल कीश दल बघुनि तो प्रगट करी पाखंड ॥९५॥

अंतर्धान होइ पळ एक । मग खल रूपें प्रगटि अनेक ।।
रघुपति-कटकिं भल्ल कपि जितके । प्रगट चहुंकडे दशमुख तितके ।।
अगणित दशशीसां कपि बघती । भल्ल कीश दश दिशांस पळती ।।
पळती वानर धरति न धीरा । त्राहि! त्राहि! लक्ष्मण रघुवीरा! ।।
दशदिशि दौडति कोटी रावण । घोर कठोर गर्जती भीषण ।।
सुर सब सभय पळापळ धाई । अतां जयाशा त्यजा किं भाई ।।
सब सुर जिंकि एक दशकंधर । अतां अमित ! शोधा गिरिकंदर।।
शिव विरंचि मुनि उरले ज्ञानी । प्रभु महिमा जाणिला जयानीं ।।

**छं०—ज्यां विदित महिमा अभय राहति,**
**सत्य रिपु कपि मानिती ।**
**कपि भल्ल विचलित सकल भीत कृपालु पाहि! प्रार्थिती।।**
**हनुमंत अंगद नील नल रणशूर अतिबल लढत ते ।**
**मर्दिति दशानन कोटि कोटी कपट-भू-भट उदित ते ।।**

**दो०—सुर वानर बघुनी विकल हसति कोसलाधीश ।।**
**कार्मुकिं लावुनि एक शर हत सगळे दशशीस ।।९६।।**

प्रभु हरती माया एका क्षणि । नष्ट जसा तम उगवत दिनमणि ।।
रावण एक बघुनि सुर हर्षति । परतुनि सुमनें प्रभुवर वर्षति ।।
प्रभु भुज उचलुनि कपींस फिरविति। फिरुनी एक दुजांस पुकारिति ।।
प्रभु-बल-युत कपि भल्ल धावले । तरल तडक रणमहीं ठाकले ।।
स्तुति सुर करती बघुनी रावण । म्हणे किं मी या गमतो एक न? ।।

मारखाउ मम तुम्हीं शठ सदा । असें म्हणुनि गत कुपित नभि तदा
हाहाकार करत सुर पळती । कुठें जाल खल तुम्हि मज पुढतीं
बघुनि विकल सुर अंगद उडला । पाय पकडुनी पृथिविं पाडला ।।

**छं०–पाडी महीवर लाथ ताडी वालिसुत गत प्रभुकडे ।**
**दशकंठ सावध उठुनि घोर कठोर निःस्वनिं गडगडे ।।**
**दर्पें धनू सज्जूनि दश लावूनि शर अति वर्षतो ।**
**कृत सकल भट घायळ भयाकुळ बघुनि निजबळ हर्षतो ।।**

**दो०–तैं रघुपति दशकंधर-शीर्ष भुजा शर चाप ।।**
**छाटिति पुनरपि वाढती जसें तीर्थिकृत पाप ।। ९७ ।।**

रिपु–शिर–बाहू वृद्धि पाहिली । क्रुद्ध भल्ल-कपि दळें जाहली ।।
मूढ न भरत तुटत भुज-शीर्षंहि । धावति रुष्ट भल्ल भट कीशहि ।।
वालि तनय, मारुति नल-नील, । वानरपती, द्विविद बलशील ।।
विटप महीधर मारिति भारी । तेच धरुनि तो कपींस मारी ।।
कोणि नखें रिपुवपुस विदारुनि । पळति कोणि बहु लाथा मारुनि ।।
तों नलनील शिरांवर गेले । नखें ललाटां विदीर्ण केलें ।।
रुधिर बघुनि तो विषण्ण भारी । त्या धरण्या भुज पसरि सुरारी ।।
सापडति न, करांवर फिरती । जणुं युग मधुप कमल वनि चरती
रुष्ट उडुनि दोघांनां धरुनी । अपटित पळति भुजा मुरगळुनी ।।
मग सकोप दश धनु करि धरि तो । शर मारुनि कपि जर्जर करितो ।।
कृत मूर्छित हनुमदादि वांदर । हर्षे प्रदोष होतां निशिचर ।।

मूर्छित वघुनि सकल कपि वीर । जांववंत धावे रणधीर ॥
सर्वे मल्ल भूधर–तरु–धारी । पाचारुनि त्या हाणिति भारी ॥
ये रावणा क्रोध बलवाना । धरि पद महिं अपटी भट नाना ।
वघुनि भल्लपति निजदल–घात । क्रोधें मारि उरावर लाथ ॥

**छं०–उरिं लाथ-घात प्रचंड लागत विकळ विरथ पडे महीं ।**
**करिं वीस रीस धरूनि जणुं निशि कमलि मधुकर वसत ही ॥**
**मूर्छित बघे मग लाथ मारी भल्लपति ये प्रभु जिथें ।**
**बघनी निशा रथि घालुनी त्या सूत यत्न करी तिथें ॥१॥**

**दो०–मूर्छा उडतां भल्ल कपि सब आले प्रभुपाशि ॥**
**सभय सकल राक्षस अति घेरिति दशाननासि ॥९८॥**

## मास पारायण, पंचविसावा विश्राम.

❖ ❖ ❖

## अध्याय ११ वा

त्याच रात्रि जाउनि सीतेसी । त्रिजटा सांगे सकल कथेसी ॥
रिपुची शिरभुज–वृद्धि परिसली । सीता हृदयिं भीति संचरली ॥
मुख उदास उपजे मनिं चिंता । त्रिजटेला वदली मग सीता ॥
काय होय कां वदसि न माई । कसा मरेल विश्व–दुख–दाई ॥
रघुपति शरिं शिर तुटुनि न मरतो । विधि विपरीत चरित सब करतो
जगवी माझें अभाग्य त्यातें । हरिपदकमल–विरहि मज करि तें ॥

जें करि कपट-कनक-मृग खोटा । तेंच दैव दाखवि मज खोटा ।।
जो विधि दुःसह दुःखें सहवी । लक्ष्मणास कटु वचनें वदवी ।।
रघुपति-विरह सविष शर भारी । लक्षुनि मार वार बहु मारी ।।
दुःखि अशाहि जगवि जो प्राणां । तो त्या वाचवि विधिच दुजा ना ।।
बहुपरिं करि विलाप जानकी । स्मरुनी स्मरुनि कृपानिधान कीं ।।
त्रिजटा वदली राज कुमारी ! । उरिं शर लागत मरे सुरारी ।।
प्रभु न मारी उरिं शर, कारण कीं । त्याचे हृदयीं वसे जानकी ।।

छं०–तद्-हृदयिं जानकि-वास, जानकि-हृदयि माझा वास कीं
मम उदरिं भुवन अनेक लागत बाण सर्वां नाश कीं ।।
सीतेस हर्ष विषाद अति, बघुनी वदे त्रिजटा पहा ।
यापरिं मरे रिपु ऐक सुंदरि ! सोड कीं संशय महा ।।१।

दो०–कापित शिर होइल विकल तुटे तुझें तें ध्यान ।।
रावण हृदयीं तदा शर मारिति राम सुजाण ।।९९।।

यापरिं विविधा समजुत घाली । त्रिजटा मग निज गृहास गेली ।।
रामस्वभाव सीता स्मरतां । उपजे विरहव्यथाऽति चित्तां ।।
निन्दी इन्दुस निशे फार ती । युग सम होइ, न सरे रात्र ती ।।
करी विलापा मनामधिं किती । राम विरह दुःखी जानकि ती ।।
विरहदाह उरिं जैं अति झाला । वाम विलोचन बाहू स्फुरला ।।
समजुनि शकुन मनीं धरि धीर । की भेटति कृपाल रघुवीर ।।
इथें अर्धनिशि रावण जागे । सूता सरोष बोलूं लागे ।।

समर-विमुख शठ ! केला मजला । अधम मंदमति धिग् धिग् तुजला ।।
तो धरि पद समजावी त्याला । उजाडतां रथि बसुनि निघाला ।।
ऐकति दशमुख समरा येतो । कपिदळि खळबळ महा उडे तों ।।
जिथें तिथें गिरि विटपां उपटिति । दांत खात भट भारी धावति ।।

**छं०—गत रुष्ट मर्कट विकट भल्ल कराल धृत भूधर करीं ।**
**त्वेषें महा करतां प्रहारा पळति निशिचर भय उरीं ।।**
**उधळूनि दळ बळवंत मर्कट रावणा रणि घेरती ।**
**ताडुन चपेटा नखरिं फाडुनि वर्ष्म कृत विव्हळ अती ।।१।।**

**दो०—प्रबळ महा मर्कट बघुनि रावण करुनि विचार ।।**
**गुप्त होउनी तत्क्षणीं करि माया-विस्तार ।।१००।।**

छं०—जैं मांडि तो पाखंड । तैं प्रगट जंतू चंड ।।
वेताळ भूत पिशाच । करिं सज्य धनु नाराच ।।
योगीणि धृत करवाल । करिं अन्य मनुज कपाल ।।
कृत सद्य-शोणित-पान । बहु नृत्य करती गान ।।
धर मार घोषति घोर । चौफेर निःस्वन थोर ।।
जैं येति मुख वासून । तैं जाति कीश पळून ।।
ज्या भागिं मर्कट जाति । तिथं आग अति बघताति ।।
कपि भल्ल विव्हळ फार । मग वर्षि· वाळु अपार ।।
करि थक्क ठायिंच कीश । गर्जे महा दशशीस ।।
लक्ष्मण कपीश सुवीर । गतचेष्ट सर्व अधीर ।।

हा राम! हा रघुनाथ! भट म्हणत चोळिती हात ॥
बळ सर्व ऐसे झोडि। मग अन्य माया सोडि ॥
प्रगटी किती हनुमान। येतात धृत पाषाण ॥
बहु वृंद वृंदें येति। रामास वेढुनि घेति ॥
धर मार द्या न पळून। हुप् हूप पुच्छ तुकून ॥
दिशि दाहिं पुच्छें खूप। त्या-माजि कोसल-भूप ॥

**छं०-त्यां माजि कोसल भूप सुंदर शाम तनु शोभा महा।**
**बहु इंद्रधनुकृत रुचिर कुंपणि जणूं तुंग तमाल हा ॥**
**प्रभुला बघुनि सुर हर्ष खेदें वदति जय जय जय हरि !।**
**रघुवीर एक चि तीरिं कोपुनि निमिषिं सब माया हरी ॥१॥**

**छं०-कपि भल्ल मायामुक्त हर्षित विटप गिरिधर दौडती।**
**शर निकर वर्षुनि राम रावण-भुज-शिरें महिं पाडती ॥**
**श्रीराम-रावण-रणचरित्रा अमित कल्पें वानती—।**
**श्रुति शारदा शत शेष सुकविहि तदपि पार न पावती ॥२**

**दो०-तद्‍गुण वर्णी अल्पसे जडमति तुलसीदास ॥**
**यथा शक्ति माशी जशी आक्रमिते आकाश ॥१०१ रा॥**

**दो०-कापित शिर भुज वार बहु मरत न भट लंकेश ॥**
**क्रीडत प्रभु, सुर सिद्ध मुनि व्याकुळ बघुनि क्लेश ॥१०१ म॥**

छाटत वाढति दाहि शिरें ती। प्रतिलाभें जशि लोभा भरती ॥
रिपु न मरे श्रम विशेष पडती। राम बिभीषण-तोंडा बघती

उभे यदिच्छें काळहि मरतो । दासप्रीति परीक्षी प्रभु तो ॥
श्रृणु सर्वज्ञ चराचर-नायक । प्रणतपाल सुर-मुनि-सुखदायक ॥
नाभिकुंडि या पीयुष वसतें । नाथ ! रावणा जीवनबल तें ॥
श्रक्त कृपालु बिभीषण-वचना । हर्षि घेति करिं कराल बाणां ॥
नशकुन नाना होऊं लागति । शिवा श्वान खर रडति तदा अति ॥
बोलति खग अति जगार्ति हेतू । प्रगटति गगनीं जिथं तिथं केतू ॥
दारुण दाह दिशांनां दाही । रवि–उपराग पर्व नसतांही ॥
मंदोदरि–उर सकंप भारी । प्रतिमा ढाळिति लोचनवारी ॥

**छं–प्रतिमा रडति पविपात नभिं. अतिवात पृथ्वी डोलते ।**
**वर्षति बलाहक रुधिर कच रज अशुभ अति वदवे कि तें ? ॥**
**उत्पात अमित बघूनि नभिं सुर विकल जयजय बोलती ।**
**सुर सभय बघुनि कृपाल रघुपति कार्मुकीं शर जोडती ॥१॥**

**दो०–ताणुनि धनु आकर्ण ते सोडिति शर एक्तीस ॥**
**रघुनायक सायक निघति जाणों काळ–फणीश ॥१०२॥**

सायक एक नाभि-सर शोषी । दुजे लागले भुजशिरिं रोषीं ॥
घेउनि शिर भुज बाण चालले । महिं शिरभुजविण रुंड नाचलें ॥
धसे धरा धड प्रचंड धावत । प्रभु शर मारुनि दुखड कापत ॥
मरतां करी घोर रव गर्जुनि । कुठें राम रणिं मारुं पुकारुनि ॥
डोले मही पडत दशकंधर । क्षुब्ध सिंधु धुनि दिग्गज भूधर ॥
धरणि पडे दो खंड वाढवुनि । मर्कट-भल्ल समूहां चिर्डुनि ॥

मंदोदरीपुढें भुज शीस । ठेउनि शर गत जिथं जगदीश ।।
जाउनि सर्व निषंगीं प्रविशति । बघुनि देव दुंदुभी वाजविति ।।
प्रभु वदनीं तत्तेज समावत । बघुनि शंभु विधि हर्षा पावत ।।
जय जय रव भरला ब्रह्मांडां । जय रघुवीर प्रवल भुजदंडा ! ।।
वर्षति सुमन देव-मुनिवृंद । जय कृपाल जय जयति मुकुंद ।।

**छं०–जय कृपाकंद मुकुंद ! द्वंद्व-हरण शरण सुखदा प्रभो ।।**
**खल दल विदारण परम कारण कारुणीक सदा विभो ।।**
**सुर सुमन वर्षति हर्ष-संकुल दुंदुभी ध्वनि धम धमा ।।**
**संग्राम अंगणि राम-अंगि अनंग बहु छवि अनुपमा ।।१।।**

**छं०–शिरि जटा मुकुटिं सुपुष्प मधिमधि अति मनोहर राजती**
**जणुं नीलगिरिवर तडित पटल समेत तारे भ्राजती ।।**
**भुजदंडि शर कोदंड फिरविति रुधिर कण रुचि तनुवरी ।**
**जणुं अरुण चटक तमाल विटपीं विपुल बसले सुखभरीं ।।२।।**

**दो०–कृपादृष्टि वर्षुनी प्रभु करिति अभय सुरवृंद ।।**
**भल्ल-कीश-गण हर्षे जय सुखधाम मुकुंद ।।१०३।।**

❖ ❖ ❖

## अध्याय १२ वा

बघत पतिशिरें मंदोदरी । मूर्छित विकल पडे भूवरी ।।
धावति युवति करित आक्रंदन । तिज उठवुनि आल्या जिथं रावण

पतिगति बघती रडति विलपती । केश सुटति तनुभान विसरती ॥
नानापरि करिती उर–ताडन । रडतां करती प्रताप वर्णन ॥
नाथ ! बळें तव डोले धरणी । तेजहीन पावक शशि तरणी ॥
भार न शेष कमठ सहुं शकले । तें शरीर महि मातित पडलें ॥
वरुण कुबेर सुरेश समीर । कुणि रणि सन्मुख धृत नहि धीर
स्वामि! भुजबळें विजित काल यम । आज इथें पडलां अनाथ-सम ॥
तुमची प्रभुता विश्रुत जगतीं । सुत-परिजन-बल वर्णु न शकती ॥
रामविमुख हे हाल जाहले । रडण्या कोणी कुळि न राहले ॥
विधिनिर्मित सब तव वश नाथा । दिक्पति सभय नमिति नित माथा
शिर–भुज जंबुक खाति अतां ही । रामविमुख हें अनुचित नाहीं ॥
काळ विवश पति! कथित न मानां । अग जगनाथ मनुज तुम्हि जाणां ॥

**छं०–गणिला मनुजसम दनुजकाननदहन पावक हरि च जो ।**
**ज्या नमिति शिव विधि अमर ही प्रिय !**
**ना भजा करुणाब्धि तो ॥**
**आजन्म तव पापौघमय, रत परद्रोह तनू अयं ।**
**निजधाम दत्त तुम्हांहि नमितें ब्रह्म राम निरामयं ॥१॥**

**दो०–अहह ! नाथ रघुनाथ सम कृपासिंधु नहि आन ॥**
**योगिवृंददुर्लभगति देति तुला भगवान ॥१०४॥**

मंदोदरी–वचन आकर्णित । सुर मुनि सकल सिद्ध सुख मानित॥
अज महेश नारद सनकादी । जे मुनिवर परमार्थ सुवादी ॥

भरुन नयन रघुपतीं न्यहाळति । प्रेम–मग्न सगळे सुख पावति ।।
रुदन करत बघतां त्या नारी । जाइ विभीषण दुःखी भारी ।।
बघुनि बंधुगति दुःखी झाला । आज्ञा देती प्रभु अनुजाला ।।
लक्ष्मण करी बहुतपरिं सांत्वन । येई तदा प्रभुकडे बिभीषण ।।
कृपादृष्टिनें प्रभु त्या पाहुनि । वदलें क्रिया करा शुच सांडुनि ।।
क्रिया कृता प्रभु आज्ञा मानुनि । विधिवत देश काल मनिं जाणुनि ।।

**दो०–मंदोदरी आदि सब देति तिलांजलि त्यास ।।**
**भवनीं गत वर्णित मनिं रघुपति-गुण-वृंदांस ।।१०५।।**

येइं विभीषण नमीं पदाब्जां । कृपासिंधु बोलाविति अनुजा ।।
तुम्हि, कपीश अंगद नल नील । जांबवंत मारुति नयशील ।।
जा सब मिळुनि बिभीषण साथ । करा तिलक वदले रघुनाथ ।।
पितृवचनें येउं न नगरासी । धाडूं मजशा कपि–अनुजांसी ।।
प्रभुवचनें गत मंडळि सारी । करिति सकल अभिषेक तयारी ।।
सादर सिंहासनीं बसवुनी । केली स्तुति अभिषेका करुनी ।।
शिर नमिती जोडुनि कर सगळे । प्रभुपदिं बिभीषणासह वळले ।।
मग रघवीर कपिस बोलाविति । प्रिय वचनें सर्वांनां सुखविति ।।

**छं०–केले सुखी त्यां वाक्यसुधें तुमचे बळें रिपु मारले ।**
**पावे बिभीषण राज्य, जगतीं सुयश तुमचें पसरलें ।।**
**मज सहित शुभं ही कीर्ति तुमची गाति जे प्रेमें अती ।।**
**संसार सिंधु अपार पार हि अश्रमें नर पावती ।।१।।**

**दो०—प्रभुच्या वचना ऐकुनी तृप्त नव्हति कपि पुंज ॥**
**पुनः पुन्हां नमिती शिर सकल धरिति पदकंज ॥१०६॥**

प्रभु मग हनुमंता बोलावति । लंके जावे भगवान् सांगति ॥
समाचार जानकीस सांगुनि । तुम्हि परतावें कुशल विचारुनि ॥
हनूमान तैं नगरीं पावति । कळत निशिचरी निशिचर धावति॥
नानापरिनीं कपीस पूजिति । जनक सुता मग तया दाखविति ॥
केलें नमन दुरुन हनुमानें । रघुपति-दूत जानकी जाणे ॥
तात ! वदा प्रभु कृपानिकेत । कुशल अनुज कपि सैन्य समेत ॥
सकलहि कुशल कोशलाधीशा । माते ! समरिं विजित दशशीसा॥
पावे अविचल राज्य बिभीषण । हर्ष हृदयिं ऐकुनि कपि भाषण ॥

**छं०-अति हर्ष मनिं तनुं पुलक,लोचनिं जल,वदे घडि घडि रमा**
**मी देउं तुज कपि काय ? नहि जगिं किमपि या वाणी समा ॥**
**श्रुणु लब्ध माते ! अखिल मज जगराज्य आज न संशयं ।**
**रणिं विजित रिपु दल बंधु युत बघुनी कि राममनामयं॥१॥**
**दो०—श्रुणु सुत सद्गुण सकल तव हृदिं वसोत हनुमंत ॥**
**कोसलपति अनुकूल तुज सहित असोत अनंत ॥१०७॥**

तात! असा कर अतां कि यत्न हि । पाहिन नयनिं शाम-मृदु-गात्रहि ॥
मग हनुमान् आला रामासी । सांगे जनकसुता-कुशलासी ॥
श्रवुनि निरोप भानुकुलभूषण । बोलाविति युवराज बिभीषण ॥
मारुतसुता सर्वे तुम्हि जाउनि । सादर जनकसुते या घेउनि ॥

शीघ्र सकल गत जेथें सीता । सेविति सब निशिचरी विनीता ॥
त्यांस विभीषण वेगें शिकवी । नानापरिनीं स्नान घालवी ॥
नानाविध भूषणें घातलीं । सजवुनि शिविका रुचिर आणली ॥
हर्षे तींत बसे वैदेही । स्मरुनि राम सुखधाम स्नेही ॥
वेत्रपाणि रक्षक दिशि चारी । जाति सकल उल्हासें भारी ॥
दर्शनार्थ कपि भल्ल पातले । क्रोधें रक्षक वारुं लागले ॥
तैं रघुवीर म्हणति मम माना । सखे ! पायिं सीतेला आणा ॥
जननी-सम बघतिल कपि सगळे । स्वामि हसुनि रघुनाथ बोलले ॥
प्रभुवचनें कपि भल्ल हर्षती । गगनांतुनि सुर सुमन वर्षती ॥
सीता पूर्वी अनली रक्षित । अंत:साक्षी प्रगटवुं इच्छित ॥

**दो०—यास्तव करुणानिधि वदति कांहि तदा दुर्वाद ॥**
**यातुधानि सब ऐकुनी करु लागल्या विषाद ॥१०८॥**

प्रभुवचना शिरिं धरुनी सीता । वदली मनकृतिवचनपुनीता ॥
लक्ष्मण व्हा तुम्हि धर्मसहायक । वेगें प्रगट करा कीं पावक ॥
लक्ष्मण ऐकुनि सीता-भाषित । विरह-विवेक-धर्मरति-मिश्रित ॥
सजल विलोचन जुळुनि करांही । प्रभुस तोहि वदुं शके न काहीं ॥
बघुनि रामकल लक्ष्मण धावति । प्रगटुनि पावक काष्ठें आणति ॥
प्रबल बघुनि पावक वैदेही । हर्षित हृदि भय नहिं कसलें ही ॥
जर मनवचकृति मम हृदयाही । गति रघुवीर विना दुजि नाहीं ॥
गति सर्वांची सुविदित अनला । तो होवो श्रीखंड-सम मला ॥

छं०–श्रीखंडसम पावकि शिरे प्रभुला स्मरोनी मैथिली ।
जय कोसलेश महेशवंदितचरण रति निर्मल भली ।।
प्रतिबिब नी लौकिक कलंक प्रचंड पावकि दग्ध; तें–।
प्रभुचरित कोणि न जाणि, नभिं सुर-सिद्ध-मुनि बघतात ते ।।१
छं०–मग मूर्त पावक धरुनि कर मा सत्य वेद जनीं श्रुता ।
जेवीं पयोनिधि इंदिरा रामा समर्पी ती तथा ।।
ती राम-वाम-विभागिं राजत, रुचिर अति शोभा भली–।
नव-नील-नीरज-निकट जणुं कीं कनक-कमळाची कळी ।।२।।
दो०–वर्षति हर्षित सुमन सुर वाद्य-गजर गगनांत ।।
गाती किंनर सुरवधू नाचति नभयानांत ।।१०९रा।।
सहित जनकतनया प्रभु–शोभा अमित अपार ।।
मुदित भल्लकपि बघुनी जय रघुपति सुखसार ।१०९म।

❖ ❖ ❖

## अध्याय १३ वा

तैं रघुपति-अनुशासन पावुनि । मातली जाइ चरणिं शिर नमवुनि
देव सदा स्वार्थी ठाकले । वदति जणूं परमार्थी भलें ।।
दीनबंधू दयाल रघुराया । देव ! दयाकृत देवनिकायां ।।
जगद् द्रोहरत हा खल कामी । नष्ट अघें निज कुमार्गगामीं ।।
तुम्हि सम सदा ब्रम्ह अविनाशी । सदा एकरस सहज उदासी ।।
अकल अगुण अज अनघ अनामय । अजित अमोघ-शक्ति करुणामय ।।

मीन कमठ सूकर नरहरी। वामन परशुराम व्हा तरी ॥
जैं जैं दुःखे नाथ ! सुरानां। हरलीं तुम्हिच धरुनि तनु नाना ॥
सुरद्रोहि खल मलिन सतत हा। क्रोधी कामलोभ मद-रत हा ॥
तव पद पावे अधम शिरोमणि। वाटे हा विस्मय अमचे मनि ॥
आम्हि परम अधिकारि देवता। प्रभो ! स्वार्थरत भक्ति विस्मृता॥
संतत पतित अम्हीं भवनदीं। आतां पाहि! शरण प्रभु! पदीं ॥

**दो०–विनति करुनि सुर सिद्ध सब उभे जोडुनी हात ॥**
**प्रेमें अति पुलकित विधि पुन्हां स्तुती करतात॥११०॥**

तो०–जय राम सदा सुखधामहरे। रघुनायक सायक चाप करे
भव वारण-दारण सिंह ! प्रभो। गुणसागर नागर नाथ विभो ॥
तनु काम अनेक अनूप छवी। गुण वानिति सिद्ध मुनींद्र कवी
यश पावन, रावण नागवरा। खगनाथ यथा युत कोप धरां ॥
जन-रंजन भंजन शोक भयं। गत कोप सदा प्रभु बोधमयं ॥
अवतार उदार अपार-गुणं। महिभार विभंजन बोध-घनं ॥
अज सर्वग एक अनादि सदा। करुणाकर राम नमामि मुदा ॥
रघुवंश विभूषण दूषण-हा। कृत भूपति, दीन बिभीषण हा
गुण-बोध-निधान अमान अजं। नित राम नमामि विभुं विरजं
भुजदंड प्रचंड प्रताप बलं। खलवृंदनिकंद-महा-कुशलं ॥
विण कारण दीनदयाल हितं। छविधाम नमामि रमासहितं
भव तारण कारण-कार्य-परं। मनसंभव–दारुण-दोषहरं ॥

शरचाप मनोहर तूण धरं । जलजारुण-लोचन भूपवरं ।।
सुख मंदिर सुंदर मा-रमणं । मद-मार-मुधाममता-शमनं ।।
अनवद्य अखंड, न गोचर गो । जगरूप सदा जग होइ न गो ।।
इति वेद वदंति, न दंत-कथा । रवि आतप भिन्न अभिन्न यथा ।।
कृतकृत्य विभो सब वानर हे । निरखीति तवानन सादर हे ।।
धिग जीवन देव-शरीर हरे । तव भक्तिविना भवभूलि खरे ।।
तरि दीनदयाल दया करणें । मति माझी विभेदकरी हरणे ।।
विपरीत कृतीच जिनें करतो । सुख मानुनि दुःख सुखी फिरतो।।
खल-खंडन मंडन रम्य मही । पदपंकज सेव्य उमा-शिवही ।।
नृपनायक दे वरदानमिदं । चरणाबुज-प्रेम सदा शुभदा ।।

**दो०-कृता विनति चतुराननें प्रेम-सुपुलकित गात्र ।।**
**शोभासिंधु विलोकत लोचन-तृप्ति न मात्र ।।१११।।**

तेव्हां तेथें दशरथ आले । बघुनि तनय नयनीं जल भरलें ।।
प्रभु अनुजासह करिती नमना । दशरथ देती आशीर्वचना ।।
पुण्यप्रभाव तव सब ताता । विजित कि अजय निशाचर नाथा ।।
सुतवचनें प्रीती अति वाढे । सजल नयन रोमांचहि गाढे ।।
प्रेम पूर्विचें रघुपति जाणुनि । ज्ञान दिलें दृढ पित्या विलोकुनि ।।
उभे ! मुक्त दशरथ ना झाले । कारण, भेद भक्तिनें धाले ।।
सगुणोपासक मोक्ष न घेती । तयां राम निज भक्ती देती ।।
प्रभूला वारंवार वंदुनी । दशरथ जाति मुदित सुरसदनीं ।।

**दो०–प्रभु जानकि अनुजा सह कुशल कोसलाधीश ॥**
**शोभा निरखुनि हर्षुनी स्तुती करी सुर-ईश ॥११२॥**

छं०–जय राम शोभा–धाम । दायक प्रणत विश्राम ॥
धृत तूण वर–शर–चाप । भुजदंड प्रबल प्रताप ॥
जय दूषणारि खरारि । मर्दन निशाचर भारि ॥
हा दुष्ट वधिला–नाथ । कृत देव सर्व सनाथ ॥
जय हरण धरणी–भार । महिमा उदार अपार ॥
जय रावणारि कृपाल । कृत यातुधान निकाल ॥
लंकेश सुबल सुगर्व । कृत वश्य सुर गंधर्व ॥
मुनि सिद्ध नर खग नाग । कर धुउनि पाठी लाग ॥
परवैर–रत अति दुष्ट । पावे फला पापिष्ट ॥
ऐका हि दीन–दयाल । राजीव नयन विशाल ॥
होता मला स्वाभिमान । नहि कोणि मज किं समान ॥
बघतां अतां प्रभु–पाय । अति मान दुःखद जाय ॥
कुणि ब्रह्म निर्गुण ध्याति । अव्यक्त जें श्रुति गाति ॥
प्रिय मजसि कोसलभूप । श्रीराम सगुण सरूप ॥
वैदेहि बंधु समेत । मम हृदि करा किं निकेत ॥
मज जाणणें निज दास । दे भक्ति रमा–निवास ॥

**छं०–दे भक्ति रमानिवास भीति हरण शरण-सुखदायका ।**
**सुखधाम राम नमामि काम अनेक छबि रघुनायका ॥**

सुरवृंद-रंजन ! द्वंद्वभंजन मनुजतनु अतुलित बलं ।
ब्रह्मादि शंकर सेव्य राम नमामि करुणा-कोमलं ॥१॥

दो–करुनि कृपा–दृष्टी अतां आज्ञा द्यावि कृपाल ॥
काय करूं प्रिय वाक् श्रवुनि वदले दीन दयाल ॥११३॥

श्रुणु सुरपति अमचे रिस वानर । निशिचर-हत पडले रणभूवर ॥
तिहीं त्यक्त मजसाठीं प्राणां । जिववा सुज्ञ सुरेश तयानां ॥
ही प्रभुची वाणी, श्रुणु खगपति! । गूढ अती ज्ञानी मुनि जाणति ॥
त्रिभुवन जिववुं वधूं प्रभु शकती । केवळ शक्रा दिधली महती ॥
सुधा वर्षुनी कपि रिस जिववित । प्रभुपदिं आले उठुनी हर्षित ॥
सुधा वर्षली उभय दळांवर । भल्ल कपिच उठले न निशाचर ॥
त्यांचें रामाकार होइ मन । मुक्त सकल, सुटलें भवबंधन ॥
कीश रीस ते सुरांश सगळे । रघुपति इच्छे जिवंत उठले ॥
कोण राम सम दीन-हितंकर । केले मुक्त असंख्य निशाचर ॥
खल मलधाम कामरत रावण । पावे गति जी मुनिवर लभत न ॥

दो०–सुर सब गत वर्षुनि सुमन बसुनी रुचिर त्रिमानिं ।
सुसमय बघुनी प्रभुनिकट येति शंभु सुज्ञानि ॥११४रा॥

दो०–कर जुळुनी प्रेमें परम नलिन नयनिं ये वारि ।
पुलकित तनु गद्‌गद गिरा स्तुति करिती त्रिपुरारि ॥११४म॥

छं०–

मामभिरक्षय रघुकुलनायक । धृतवरचाप रुचिर करिं सायक

मोह महा घन-घटा प्रभंजन । संशय-विपिन अनल सुर रंजन
अगुण सगुण गुणमंदिर सुंदर । भ्रम तम महा प्रताप दिवाकर
काम कोप मद-गज पंचानन । वसां निरंतर जनमन कानन ।
विषय-मनोरथ-पुंज कंज-वन । प्रबल तुषार उदार पार मन ।।
भव वारिधिमंदश परमं दर । वारय तारय संसृति दुस्तर ।।
श्याम- गात्र राजीव-विलोचन । दीनबंधु प्रणातार्ति-विमोचन ।।
अनुज जानकी सहित निरंतर । वसा राम नृप मम उर अंतर ।
मुनिरंजन महिमंडल-मंडन । तुलसिदास-प्रभु भीति-विखंडन

**दो०—नाथ यदा कोसलपुरीं होइल तिलक तुम्हांस ।।**
**कृपासिंधु येईन मी बघुं उदार चरितास ।।११५।।**

करुनि विनंति शंभु जैं गेले । तैं प्रभुनिकट विभीषण आले ।।
पदिं शिर नमुनि वदति मृदु वाणीं । श्रुणु विनतीं प्रभु शारंग्पाणी ।।
सकुल सदल वधला प्रभु रावण । त्रिभुवनिं विस्तरलें यश पावन ।।
दीन मलीन हीन मति जाती— । मजवर केली विविध कृपा ती ।।
अतां दास गृह पुनीत करणें । करुनी स्नान रणश्रम हरणें ।।
बघुनि कोष मंदिर संपदा । द्यावी कृपालु कपीनां मुदा ।।
सर्वपरीं मज अपला करुनी । मग कोसल पुरि चला घेउनी ।।
ऐकत मृदु वच दीन-दयाल । सजल जाहले नयन विशाल ।।

**दो०—तुझे कोषगृह ममचि सब सत्य वदे श्रुणु भाइ ।।**
**भरतदशा स्मरतां मज निमिष कल्पसम जाइ ।।११६।।**

तापसवेष गात्र कृश सतत जपत मजला हि ॥
सखे यत्न कर विनवुं तुज सत्वर भेटूं त्या हि ॥ ११६ म ॥
जाइन सरतां अवधि जर वीर न भेटे जीत ॥
प्रभु बंधूप्रीती स्मरत घडि घडि तनु पुलकीत ॥११६ चं ॥
करा कल्पभर राज्य तुम्हि मजला स्मरा मनांत ॥
मग मम धामा जाल सब संत जिथें जातात ॥११६ द्र ॥

श्रवत विभीषण वच रामाचें । पद धरि हर्षि कृपाधामाचें ॥
हर्षित सगळी कपि सेना ती । प्रभुपद धरुनि विमल गुण गाती ॥
तदा बिभीषण भवनि परतले । मणिगणवसनीं विमान भरलें ॥
पुष्पक आणुनि पुढें ठेवलें । कृपासिंधु प्रभु हसुनि वोलले ॥
बसुनि विमानीं सखे विभिषण । नभि जाउनि वर्षा पट भूषण ॥
जाउनि गगनि विभीषण तत्क्षण । करित सकल मणि अंबर वर्षण ॥
जें ज्या रुचले तें ते घेती । कपि चाखुनि मणि टाकुनि देती ॥
हसति राम सीता सह लक्ष्मण । परम कौतुकी कृपानिकेतन ॥

दो०–ध्यानिं न पावात मुनि जया नेति वानिति वेद ॥
तेच कृपानिधि कपिसवें करिति अनेक विनोद ॥११७रा॥
उमे ! योग जप दान तप मख नाना व्रत नेम ॥
राम कृपा ना करिति जशि निर्मळ करतां प्रेम ॥११७म

भल्लुक कपि पट भूषण घेती । घालुनि रघुपतिपाशीं येती ॥
नानाविध बघुनी त्या कीशां । लोटे हंसें कोसलाधीशां ॥

करुनि दया निरखुनि समुदाया । वदले मृदुल वचन रघुराया ॥
तुमच्या बळें मारिला रावण । राज्यीं स्थापित सखा विभीषण ॥
आतां निज निज गृहिं तुम्हि जावें । स्मरा मजसि कोणा ना भ्यावें ॥
ऐकुनि हें प्रेमाकुल वानर । पाणी जोडुनि वदले सादर ॥
प्रभु जें बोलां तुम्हा शोभतें । ऐकुनि अमचें चित्त मोहतें ॥
दीन गणुनि कृत सनाथ कपिगण । त्रिलोकेश रघुनाथा ! आपण ॥
प्रभुवच ऐकुनि लाजे मरुं हरि । मशक करिति खगपति हित कधितरि?
बघुनि रामरुचि कीश भल्लुक हि । प्रेममग्न गृहकांक्षा त्यां नहिं ॥

**दो०–प्रभु–आज्ञें कपि भल्ल हृदिं रामरूप राखून ॥**
**हर्ष–खेद–युत चालले विविधविधा विनवून ॥११८रा ॥**
**कपिपति नील ऋक्षपति अंगद नल हनुमान ॥**
**सहित बिभीषण अपर जे यूथप कपि बलवान ॥११८म ॥**
**वदुं न शकति मुळि, प्रेमवश लोचनिं भरुनी नीर ॥**
**बघति राम मुख निरखुनी निर्निमेष कपि वीर ॥११८चंद्र॥**

प्रीति अती रघुराजा पाहुनि । सकलां घेति विमानीं बसवुनि ॥
मनीं विप्रचरणीं शिर नमिलें । उत्तर दिशे विमान निघाले ॥
निघतां विमान गलका भारी । जय रघुवीर वदति जय सारीं ॥
सिंहासन अति उच्च मनोहर । श्री समेत बसलेले प्रभु वर ॥
राजति राम सहित भामिनी । मेरु–शृंगि जणुं घन–दामिनी ॥
चाले रुचिर विमान सुसस्वर । हर्षित वर्षति सुमनें सुरवर ॥

त्रिविधा पवन परम सुखकारी । सागर-सर-सरि निर्मल वारी ॥
शकुन होति सर्वत्रहि सुंदर । सुप्रसन्न मन विमल दिगंबर ॥
रघुविर वदले सीते ! बघ रण । इंद्रजिता वधि इथेंच लक्ष्मण ॥
हनुमान् अंगद यांच्या मारें । पडले बघ रणिं निशिचर-भारे ॥
कुंभकर्ण रावण दो भाई । येथें हत सुरमुनि दुखदाई ॥

**दो०—इथें बद्ध सेतू पहा स्थापित शिव सुखधाम ॥**
**सीतेसहित कृपाब्धिनें कृत शंभुला प्रणाम ॥११९रा॥**

**दो०—कृपाब्धिनें वनि जिथं जिथें कृत वस्ती विश्राम ॥**
**सकल दाविलीं जानकिस सांगुनि तें तें नाम ॥११९म ॥**

येइ तिथें मग विमान सत्वर । दंडक वन जेथें अति सुंदर ॥
कुंभाजादि मुनिनायक नाना । जाति राम सकलांचे स्थानां ॥
आशीर्वाद सकल मुनि देती । चित्रकूटि जगदीश्वर येती ॥
सकल मुनींना तिथें तोषवुनि । तडक निघालें विमान तेथुनि ॥
रामजानकिस पुढें दाखवित । यमुना कलिमल हरणि सुशोभित॥
दिसत पुढें सुरनदी पुनीता । म्हणति राम कर नमना सीता! ॥
पहा प्रयागा तीर्थ—पतीतें । निरखत जन्म कोटि-अघ जातें ॥
परम पुनीता पहा त्रिवेणी । शोक हरणि हरिपदनि:श्रेणी ॥
पुरी अयोध्या बघ अति पावनि । त्रिविधताप-भवरोग-विनाशनि ॥

**दो०—करिति अयोध्ये कृपानिधि सहजानकी प्रणाम ॥**
**सजल नयन तनु पुलकिता घडि घडि हर्षित राम ।।१२०रा॥**

**प्रभु परतुनी त्रिवेणीं हर्षित केलें स्नान ।।**
**कपींसहित विप्रां बहु दिलें विविधविध दान ।।१२०म।।**

प्रभु हनुमंता वदति समजाउनि । अयोध्येंत बटुरुपें जाउनि ।।
भरता अमचें कुशल वदावें । समाचार घेउनि तुम्हि यावें ।।
शीघ्र पवनसुत जाते झाले । प्रभु भरद्वाजाश्रमिं आले ।।
मुनि नानापरि पूजन करुनी । देती आशीर्वादां स्तवुनी ।।
जोडुनि कर युग मुनिपदिं नमुनी । परत निघति प्रभु धिमानिं वसुनी।।
इथें श्रवत गुह कीं प्रभु आले । नाव, नाव कुठं ? लोक जमविले।।
यान येत तों सुरसरि लंघुनि । तटिं उतरे प्रभु=आज्ञा पावुनि ।।
तैं सीता पूजी सुरनदी— । बहुपरिं करि वंदन मग पदीं ।।
गंगा दे आशीस मुदित मन । सुंदरि तव सौभाग्या भंग न ।।
ऐकुनि गुह धावे प्रेमाकुल । आला निकट परम सुख संकुल ।।
प्रभुस विलोकुनि सह वैदेही । पडे अवनिं तनुभान नुरे ही ।।
प्रीति परम रघुराजा पाहुनि । हृदयीं धरिला हर्षे उठवुनि ।।

**छं०–निज हृदयिं धरिति कृपानिधान सुजाणराय रमापती ।**
**बसवून परम समीप पुसलें कुशल; करि तो सुविनती ।।**
**कीं कुशल पद पंकज बघून विरंचि शंकर सेव्य जे ।**
**सुखधाम पूरित काम राम नमामि राम नमामि ते ।।१।।**
**सबरीति अधम निषाद त्या हरि भरत सम हृदयीं धरी ।**
**मति मंद तुलसीदास तो प्रभु मोहवश विसरे तरी ।।**

हे रावणारि चरित्र पावन रामपदरति दे सदा ।।
कामादिहर विज्ञानकर सुरसिद्धमुनि गाती मुदा ।।२।।

दो०-जे रघुवीर-समर-जय-चरिता श्रवति सुजाण ।।
विजय विवेक विभूति त्यां नित्य देति भगवान ।।१२१रा।।

हा कलिकाल मलायतन मन! बघ करुन विचार ।।
श्री रघुनाथ-नामविण नाहि अन्य आधार ।।१२१म।।

मास पारायण, सत्ताविसावा विश्राम.

इति श्रीमद्रामचरित-मानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने

षष्ठः सोपानः

लंकाकाण्डं समाप्तम्

जय जय रघुवीर समर्थ

# दुःखी भरत व विप्रवेषी मारुती



दो०–रामविरह सागरिं असे मग्न भरत-मन होत ।
विप्ररुपधर पवनसुत तों आला जणुं पोत ।।
बसले दिसति कुशासनीं जटामुकुट कृशकाय ।
राम राम रघुपति जपत कमलनयनिं जल जाय ।।

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ श्रीजानकीपतये नमः ॥

# ॥ श्रीरामचरितमानस ॥

( मराठी )

---

## ॥ सप्तम सोपान ॥

( उत्तरकाण्ड )

❖ ❖ ❖

### अध्याय १ ला

### अनुवादक-कृत मंगलाचरण

स्त्र०—यो द्रष्टुं नैव शक्यःकथमपि मनसा चक्षुषा वा कदाचित्।
मिथ्यामायाऽऽवृतःसन् घनपटलगतो भास्करःखे दिवेव ॥
श्रीरामप्रेरितेन प्रबलगुरुकृपामारुतेनाऽऽहृतेऽस्मिन् ।
अज्ञानभ्रान्तिमेघे प्रगट इव भवेदात्मरूपः स रामः ॥ १ ॥

श्लोक–वैराग्यं लक्ष्मणं वन्दे विवेकं वायुनन्दनम्
शमादिषट्कं भरतं शत्रुघ्नंच मुमुक्षुता ।।२।।
पं०चामर–विदेहराजनन्दिनी निजात्मशान्ती–रूपिणी ।।
निजस्वरूपभद्रगांक–सुस्थितार्ति-हारिणी ।।
विमोहता–विशोकता–विरागताऽऽद्यलंकृता ।
ह्यनन्त–सौख्य–दिव्यदीप्ति–संयुता हि पातु माम् ।।३।।

## मूळ मंगलाचरण

स्र०-केकी-कण्ठाभनीलं सुरवर-विलसद्विप्रपादाब्ज-चिन्हम् ।
शोभाढ्यं पीतवस्त्रं सरसिजनयनं सर्वदासुप्रसन्नम् ।।
पाणौ नाराच–चापं कपिनिकर युतं बंधुनासेव्यमानम् ।
नौमीड्यं जानकीशं रघुवरमनिशं पुष्पकारूढरामम् ।।४।।
रथो०–कोसलेंद्र-पदकञ्ज-मंजुलौ कोमलावजमहेश-वन्दितौ ।
जानकीकरसरोजलालितौ चिन्तकस्य-मनभृंगसंगिनौ ।।
कुन्द-इंदु-दर-गौर-सुन्दरं अंबिकापतिमभीष्टसिद्धिदं ।।
कारुणीककलकंजलोचनं नौमि शंकरमनंगमोचनम् ।।५।।
दो०–उरे एक दिन अवधिचा आर्त अती पुर–लोक ।।
चिन्तिति सर्व हि नारिनर कृशतनु रामवियोग ।।मं१।।
शकुन होति सुन्दर सकल जन हर्षित चित्तांत्त ।।
नगर रम्य चौफेर जणुं सुचवी प्रभु येतात ।। मं.२।।

**दो०–माता कौसल्यादि सब अशा मुदित चित्तांत ।।**
**प्रभु आले श्री-अनुज-युत कोणि सांगु बघतात ।।मं३।।**
**भरत–नयन–भुज दक्षिण स्फुरती वारंवार ।।**
**हर्षति अति जाणुनि शकुन लागति करूं विचार ।।मं४।।**

राहि एक दिन अवधि अधार । जाणुनि दुःख मनास अपार ।।
नाथ न कां अद्याप परतले । कुटिल गणुनि कीं मला विसरले ।।
अहह ! धन्य लक्ष्मण वहुभागी । राम–पदारविन्द–अनुरागी ।।
कपटी कुटिल हि मी प्रभु जाणति । म्हणुन नाथ मज सवें न राखति ।
कृतीकडे प्रभु वघतिल मम जर । कल्पकोटि शत सुटका नच तर ।।
प्रभु जन-अवगुण मनीं न आणति । स्वभावेंच मृदु दीनवंधु अति ।।
हाच भरंवसा मना दृढ अती । होति शकुन शुभ राम भेटती ।।
प्राण राहि जर अवधि संपतां । कोण अधम जगतीं मज परता ।।

**दो०–रामविरह-सागरिं असें मग्न भरत–मन होत ।।**
**विप्र–रूप–धर पवनसुत तों आला जणुं पोत ।।१रा।।**
**बसले विसति कुशासनीं जटामुकुट कृशकाय ।।**
**राम राम रघुपति जपत कमलनयनि जलजाय ।।१म।।**

वघतां हनूमान अति हर्षे । पुलक गात्रि लोचनि जल वर्षे ।।
चित्तीं वहुतपरीं सुख मानी । वोले श्रवणसुधासम वाणी ।।
यद्विरहानें निशिदिन झुरतां । गुणगण–गाना संतत करतां ।।
रघुकुलतिलक सुजन–सुखदाते । प्राप्त कुशल मुनि–देवां त्राते ।।

रिपु रणिं विजित सुयश सुर गाती । सानुज सीता प्रभु येताती ॥
श्रवत वचन सब दुःखा विस्मृत । जसा तृषित पीयूषा पावत ॥
तात ! कोण तुम्हि कोठुन आलां । वचन मला प्रिय परम बोललां ॥
मारुतसुत मी आहे वानर । हनूमान मम नांव कृपाकर ! ॥
दीनबंधू रघुपतिचा किंकर । उठुनी भरत भेटले सादर ॥
भेटत हृदयीं प्रेम न मावत । तनु पुलकित लोचनिं जल धावत ॥
कपि तुज बघुनि दुःख सब मिटलें । आज मला प्रिय राम भेटले ॥
वारंवार विचारिति कुशला । बंधु ! काय मी देऊं तुजला ॥
या संदेशासम जगिं कांहीं । बघत करून विचारा नाहीं ॥
येइ न तव ऋण मला फेडतां । प्रभु चरिता मज सांग बघुं अतां ॥
तैं हनुमंत नमुनि पदिं माथा । वदे सकल रघुपति गुण गाथा ॥
वद कपि कधि कीं स्वामि कृपाघन । दासासम मम करिति आठवण ॥

छं०-निजदाससम रघुवंशमणि मम करिति अठवण कधि तरी
या भरतवचनें नम्र अति, कपि पुलकुनी चरणां धरी ॥
रघुवीर निजमुखि यस्य गुणगण गाति अगजग नाथ जे ।
होती न कां हि विनीत परम पुनीत सद्गुण-सिधु ते ॥१

दो०-प्राणप्रिय रामास तुम्हि सत्य वचन मम नाथ ! ॥
घडि घडि भेटति भरत तैं हर्ष न हृदयिं रहात ॥२रा ॥

सो०-भरतपदीं प्रणमून गत रामाप्रति शीघ्र कपि ॥
वदे कुशल जाऊन यांनि निघति प्रभु हर्ष युत ॥२म॥

मुदित भरत कोसलपुरिं वळले । गुरुसि वृत्त सगळें सांगितलें ।।
मग मंदिरिं कळविति वृत्तासी । येति कुशल रघुपति नगरासी ।।
ऐकुनि माता उठुनि धावती । प्रभु कुशला सब भरत सांगती ।।
समाचार पुरवासी पावति । नर नारी सब हर्षित धावति ।।
दधि दूर्वा रोचन फलफूल । नव तुलसी दल मंगलमूल ।।
हेमपात्रिं भरुनी भामिनी । गात निघति सिंधुर–गामिनी ।।
उठुनि जसे जे तसे धावले । बाल जरठ नहिं संगिं घेतले ।।
एक विचारिति दुजास काका ! । दिसले दयालु रघुराजा का ? ।।
प्रभु येती हें जाणुनि नगरी । होइ सकल–सौंदर्य-आगरी ।।
सुंदर वाहे त्रिविध समीर । होइ शरयु अति निर्मल नीर ।।

**दो०–हर्षित गुरु पुरजन अनुज भूसुर–वृंद–समेत ।।**
**प्रेमें अति निघती भरत सम्मुख कृपा निकेत ।।३रा।।**
**सौधीं चढुनी बहुतशा निरखिति गगनिं विमान ।।**
**दिसत, हर्ष अति, सुस्वरें करिति सुमंगल गान ।।३म।।**
**राकाशशि रघुपति बघुनि नगर-सिंधु हर्षात ।।**
**वाढे, कोलाहल किं करि नारितरंग-सहीत ।।३चंद्र।।**

इथें भानुकुल–कमल–दिवाकर । कपिस दाखवित नगर मनोहर ।।
श्रुणु कपीश अंगद लंकेश हि । पावन पुरी रुचिर हा देशहि ।।
यदपि सकल वैकुंठा वानति । वेद पुराण-विदित जगिं जाणति।।
प्रिय न अयोध्येसम मज तेंही । या मर्मा विरळा जाणे ही ।।

जन्मभूमि मम पुरी सुशोभन । शरयु उत्तरे वाहे पावन ॥
तीच्या स्नानें विना प्रयासां । मम समीप नर पावे वासा ॥
प्रिय अति मज येथले निवासी । मम धामदा पुरी सुखराशी ॥
मुदित कपी श्रवुनी प्रभु-वाणी । धन्य अयोध्या राम हि वानी ॥

**दो०-येतां पाहुनि लोक सब कृपासिंधु भगवान ॥**
**प्रभु पुरिजवळीं प्रेरिती उतरे खालिं विमान ॥ ४ रा ॥**
**त्या प्रभु उतरुनि सांगती तुम्हि जा धनदापाशि ॥**
**रामशासनें तें निवे हर्ष विरह अति त्याशि ॥ ४ म ॥**

आले भरता सवें सकल जन । श्रीरघुवीरवियोगें कृशतन ॥
वामदेव नी वसिष्ठ मुनिवर । दिसतां, प्रभु महिं ठेउनि धनुशर-
धाउनि धरिती गुरुपद जलरुह । अनुजा सह अति पुलकित तनुरुह ॥
भेटुनि कुशल मुनिवरें पुसलें । अमचे कुशल दयेनें अपले ॥
द्विजां सकल भेटुनि नत मस्तक । धर्म धुरंधर रघूकुल-नायक ॥
धरिति भरत तैं प्रभुपदपंकज । ज्यांस नमिति सुरमनि शंकर अज ॥
पडले महिं उठवतां न उठती । बळें कृपानिधि हृदयीं धरती ॥
श्याम गात्रिं रोमांच सुगाढे । नवराजीव-नयनिं जल वाढे ॥

**छं०-राजीव-लोचनिं पाझरे जल ललित पुलकावलि घनी ।**
**सुप्रीति अनुजा हृदयिं धरुनी भेटले त्रिभुवन-धनी ॥**
**प्रभु अनुज भेटत केविं शोभति मज न उपमा देउं ये ।**
**कीं प्रेम नी शृंगार भेटत सतनु त्यां सुषमा च ये ॥ १ ॥**

**छं–पुसती कृपानिधी कुशल भरता शब्द शीघ्र न उमटती**
**सुख तें शिवे ! श्रुणु वचन-मन-पर जाणती जे लाभती ॥**
**तै कुशल कोशलनाथ ! जाणुनि आर्त जन दर्शन दिलें ।**
**जैं बुडत विरहाब्धीं कृपालें धरुनि कर मज काढिलें ॥२॥**

**दो०–प्रभु शत्रुघ्ना भेटले हर्षें हृदयिं धरून ॥५॥**
**भेटति लक्ष्मणभरत अति प्रेममग्न होऊन ॥ ५ ॥**

भरतानुज लक्ष्मण मग भेटति । विरहज दुःसह दुःखें आटति ॥
सीताचरणिं भरत शिर नमविति । अनुज समेत, परम सुख पावति ॥
प्रभुस बघुनि हर्षित पुरवासी । गत वियोगविपदा प्रलयासी ॥
प्रेमातुर जाणुनि जन भारी । कौतुक करिति कृपाल खरारी ॥
तत्क्षणि अगणित रूपें प्रगटति । सकलां उचित कृपालू भेटति ॥
मग. रघुवीरें कृपावलोकीं । कृत सगळे नर नारि विशोकी ॥
भेंटति भगवान् न लागतां क्षण । उमे ! मर्म ना कळे कुणा पण ॥
रामें सर्वां असे सुखविले । शील गुणाकर पुढें चालले ॥
धावति माता कौसल्यादिक । बघुनि वत्स जणुं गो नवसूतिक ॥

**छं-जणुं धेनु नव शिशु तजुनि गृहिं परवश वनीं चरण्या गता**
**सूर्यास्ति नगरा स्रवत सड हुंकरित धावति कीं अतां ॥**
**प्रेमें सकल मातांस भेटुनि मृदु वचां प्रभु बोलले ।**
**गत विषम विपदा विरहभव; त्यां हर्ष सुख अति लाभलें ॥१॥**

**दो०-भेटे सुता सुमित्रा रत रामांघ्रि बघून ।।**
**रामा कैकइ भेटे हृदयिं फार लाजून ।।६रा।।**
**लक्ष्मण भेटुनि जननिनां हृष्ट अशीस मिळून ।।**
**भेटे घडि घडि कैकइस क्षोभ न मनिचा न्यून ।।६म।।**

भेटे सब सासुंस वैदेही । पाया पडुनि अति हर्षे ही ।।
देती आशिस कुशल विचारुन । असो अचल तुमचें अहेवपण ।।
सब रघुपति मुख-कमल विलोकिती । मंगल म्हणुन नयन जल रोधिति ।।
कनक पात्रि ओंवाळति आरति । प्रभु-गात्रां घडिघडी न्यहाळति ।।
नानाविध ओंवाळणि करती । परमानंद हर्ष उरिं भरती ।।
कौसल्या घडि घडि रघुवीरा । निरखी कृपासिंधु रणधीरा ।।
हृदयीं वारंवार विचारी । लंकापतिस कसा तरि मारी ? ।
अति सुकुमार युगल मम बाळ । राक्षस सुभट महाबळ काळ ।।

**दो०-लक्ष्मण नी सीतेसहित प्रभुस विलोकी माय ।।**
**परमानंदीं मग्न मन घडि घडि पुलके काय ।।७।।**

❖ ❖ ❖

## अध्याय २ रा

लंकापति कपीश नलनीलहि । जांबवंत अंगद शुभशीलहि ।।
हनुमदादि सब वानर वीर । धृत सुमनोहर मनुज शरीर ।।
भरत सुशीला स्नेहा नेमां । सादर सब वानिति सुप्रेमां ।।
पाहुनि पुरवासीजन-रीती । स्तविती सगळे प्रभुपद-प्रीती ।।

रघुपति बोलावुनी सरवायां। त्यां सांगती पडा मुनि-पायां ।।
गुरु वसिष्ठ कुल-पूज्य आमचे। रणि हत दनुज कृपेनें यांचे ।।
मुनि ! हे यहा सखे मम सगळे। समर सागरीं जहाज बनले ।।
मम हितार्थ इहि जन्म वेचला। भरताहुनि हे प्रिय बहु मजला ।।
श्रवुनि वचन सगळे मग्न ते। निमिष निमिष नव सुख उपजतें ।।

**दो०—मग कौसल्या चरणिं ते सगळे नमिती माथ ।।**
**हर्षित आशिस देइ, तुम्हि प्रिय मम सम रघुनाथ ।।८रा।।**
**सुमनवृष्टि-संकुल गगन निघति भवनि सुखकंद ।।**
**सौधीं चढुनी पाहती नगर-नारि-नर-वृंद ।।८म।।**

कांचन कलश विचित्र सजवले। घरोघरीं द्वारांत मांडले ।।
तोरण रुचिर पताका केतू। लोकीं विरचित मंगल-हेतू ।।
वीथि सुगंधें सकल शिंपिल्या। गजमणि रांगोळ्या बहु रचिल्या ।।
नाना-विधा सुमंगल साजति। हर्षें पुरि बहु डंके वाजति ।।
ठायि ठायि ओवाळति नारी। देति अशीस हर्षे हृदि भारी ।।
कनकपात्रि आरत्यांस नाना। सजुनि करिति युवती शुभ गाना ।।
करिति आरती आर्तिहराची। रघुकुल-कमल-विपिन-सूर्याची ।।
पुरशोभा मंगल संपत्ती। निगम शारदा शेष वानती ।।
बघुनि चरित हें तेहि चकितसे। उमे तस्य गुण वदति नर कसे ।।

**दो०—नारि कुमुदिनी अवध सर रघुपति विरह दिनेश-।।**
**अस्तंगत तें विकसती बघुनि राम राकेश ।। ९रा ।।**

**होति शकुन शुभ विविध विध वाजति गर्गनि निशाण ॥**
**पुरनरनारि-सनाथ-कर निर्घाति भवनि भगवान ॥ ९ म ॥**

लज्जित कैकेयी, प्रभु जाणति । प्रथम तिचें गृहि गेले पार्वति ! ॥
तिला प्रवोधुनि बहुसुख दिधलें । मग निजभवना हरि पद वळले ॥
कृपासिंधु मंदिरिं गत यदा । पुर नरनारि सुखी सब तदा ॥
गुरु वसिष्ट विप्रां वोलावति । आज सुदिन शुभ सकलाहि सांगति
द्विज हो ! हर्षें द्या अनुशासन । रामचंद्र भूपिति सिंहासन ॥
मुनि वसिष्ठ—वच परम सुशोभन । ऐकुन अगळे मुदित विप्रगण ॥
वचन मधुर बहु वदले ब्राम्हण । जग अभिराम राम-अभिषेचन ॥
मुनिवर वेळ न अतां लावणें । महाराज—अभिषेका करणें ॥

**दो०—सुमंत्रास मुनि कथिति तैं श्रवत मुदित जातात ॥**
**रथ अनेक बहु वाजि गज सत्वर ते सजतात ॥ १० रा ॥**
**धाडिति दूतां मंगल-वस्तु विविध अणण्यास ॥**
**हर्षें यति वसिष्ठ पदिं ते नमविती शिरास ॥ १० म ॥**

## नवाह पारायण, आठवा विश्राम.

❖ ❖ ❖

## अध्याय ३ रा

पुरी अयोध्या सजिली सुंदर । सुमनवृष्टिझड लाविति निर्जर ॥
वदति राम अणवुनि दासांला । प्रथम सख्यानां स्नानें घाला ॥

श्रवत वचन जिथं तिथं जन धावति। शीघ्र सुग्रिवादिकांस न्हाणिति ।।
बोलावुनि भरतास कृपाब्धी । स्वकरें उकलिति जटांस आधीं ।।
तिन्ही बंधुनां स्नानें घालति । भक्तवत्सलहि कृपालु रघुपति ।।
भरतभाग्य नी प्रभुकोमलता । शेष कोटिशत थकतिल वदतां ।।
स्वतां जटा निज राम उकलिती । गुरु–आज्ञेनें स्नाना करिती ।।
प्रभु सुस्नात भूषणें घालति । अंग अनंग बघुनि शत लाजति ।।

**दो०–सासू सादर जानकिस शीघ्र करिति सुस्नात ।।**
**दिव्य वसनं वर भूषणें प्रत्यंगीं सजतात ।। ११ रा ।।**
**राम–वाम–दिशि रूपगुण–खनि राजते रमा हि ।।**
**बघुनि मुदित सब माता गणुनि सुफल जन्मा हि ।। ११ म ।।**
**श्रुणु खगेश त्या अवसरीं ब्रह्मा शिव मुनि वृंद ।।**
**आले बसुनि विमानिं सब सुर बघण्या सुखकंद ।। ११ चंद्र ।।**

प्रभुस वघुनि मुनि मनिं अनुरागति । त्वरित दिव्य सिंहासन मागति ।।
रविसम तेज, न जाइ वर्णिलें । विप्रां राम नमुनि शिर बसले ।।
जनकसुतेसह रघुराजाला । बघुनी प्रहर्ष मुनि-निकराला ।।
वेदमंत्र तैं द्विज उच्चारिति । नभिं सुरमुनि जय जयति पुकारिति।
प्रथम तिलक मुनि वसिष्ठ करती । मग सब विप्रां देति अनुमती ।।
माता पुत्रा पाहुन हर्षंति । पुनःपुन्हां आरति ओवाळति ।।
विप्रां दान विविध विध दिधलें । याचक सकल अयाचक केले ।।
सिंहासनीं त्रिलोकी–स्वामी । देव वाजविति दुंदुभि नामी ।।

छं०-गंधर्व किंनर गाति, पुष्कळ दुंदुभी नभिं.वाजती ।
अप्सरा नाचति वृंद, परमानंद सुर मुनि पावती ।।
भरतादि अनुज बिभीषणांगद हनुमदादि सभोंवती ।।
धृत छत्रचमरें व्यजन धनु असि चर्म शक्ती शोभती ।। १ ।।
श्रीसहित दिनकर-वंश-भूषण काम बहु छबि शोभते ।
नव अंबुधर वर गात्रि अंबर पीत सुरमन मोहतें ।
मुकुटांगदादि विचित्र भूषण अंगिं अंगिं सुसज्ज; जे ।
अंभोज नयन विशाल उर भुज; निरखिती नर धन्य ते ।।२।।

**दो०-ती शोभा समाज सुख वदतां ये न खगेश ! ।।**
**शेष गिरा श्रुति वर्णिती तो रस जाणि महेश ।।१२रा।।**
**भिन्न भिन्न करुनी स्तुती सुर गत जिथें स्वधाम।।**
**बंदी वेषें वेद तें येति जिथें श्रीराम ।।१२म।।**
**देती प्रभु सर्वज्ञ. अति आदर कृपानिधान ।।**
**कोंण न जाण मर्म हें करुं लागति गुणगान ।।१२चं।।**

छं०-जय सगुण-निर्गुण-रूप, अनुपम रूप भूप-शिरोमणे ।।
दशकंठ, निशिचर चंड खल तम भुजबलें हत दिनमणे ।।
अवतार नर, संसार-भार हरून दुःख विनाश हे ।
जय प्रणतपाल दयाल हे प्रभु ! शक्तियुक्त नमामहे ।। १ ।।
तव विषम-माया-वश सुरासुर नाग नर अगजग हरे ।
भ्रमतात भवपथिं अमित, दिननिशिं काल-गुण-कर्मं, खरें- ।।

ज्यां नाथ! करुणायुत विलोकां त्रिविध ताप तयां न, हे!।
भवखेद-छेदन-दक्ष आम्हां रक्ष राम नमामहे ॥२।
जे ज्ञान-मान-विमत्त तव भवहरणि भक्ति न आद्रितो।
ते प्राप्त-सुर.दुर्लभ-पदादपि पडत आम्हां अढळती ॥
विश्वास-युत सब आस सांडुनि दास तव होती खरे।
तव जपुनि नामा श्रमविना भव तरति त्या स्मरतों हरे ॥३॥
जे चरण शिव-अज-पूज्य, रज शुभ लागतां मुनिवधु तरे।
नखनिर्गता मुनिवंदिता जग-पावनी सुरसरि, हरे ॥
ध्वज-कुलिश-अंकुश-कंज-युत वनिं फिरत कंटक-किण वरी।
पदकंज-युग्म मुकुंद राम रमेश भजतों अंतरीं।४॥
अव्यक्त-मूलमनादि तरु, चार त्वचा, श्रुति बोलती ॥
षट् स्कंद, शाखा पंचवीस, अनेक पानें, सुमन तीं ॥
फल युगलविध कटु मधुर, वल्ली आश्रिता ज्या एक है।
पल्लवत फूलत नित्य नव; संसार विटप नमामहे ॥५॥
जे ब्रह्म अजमद्वैतमनुभवगम्य मनपर ध्यायती।
वदुं जाणुं दे त्यां, नाथ आम्हीं गावुं कीर्तिच सगुण ती।
करुणानिधे प्रभु! सद्गुणाकर देव! हा वर मागतों।
मन-वचन-कर्म, विकार सोडुनि, तव पदीं अनुराग तों ॥६॥

**दो०-वेदानीं देखत सकल केली स्तुती उदार।**
**पावुनि अंतर्धान गत जेथें ब्रह्मागार ॥१३२॥**

**दो०–श्रुणु विनतासुत शंभु तें येति जियें रघुवीर ।**
**स्तुति करिती गद्गद्गिरें पूरित पुलक शरीर ।। १३ म ।।**

छंद० - ( तोटक)

जय राम रमारमणं शमनं । भव ताप-भयाकुल पाहि जनं ।।
अवधेश सुरेश रमेश विभो । शरणागत मागत पाहि प्रभो ।।
दशशीस विनाशनवीस भुजा । कृत दूरि महा महि भूरि रुजा ।।
रजनीचर-वृंद पतंग महा । शर पावक तेजि प्रचंड दहा ।
महिमंडल-मंडन चारुतरं । धृत सायक चाप निषंग-वरं ।
मद मोह महा ममता रजनी । तमपुंजदिवाकर तेज अनी ।।
मनजात किरात निपात करी । मृग लोक कुभोग-शरांनि उरीं।।
जहि नाथ अनाथ हि पाहि हरे । विषयाटवि पामर भूलभरे ।।
वहु रोग-वियोगि हि लोक हत । भवदंघ्रि-निरादर हा फळत ।।
भवसिंधु अगाधहि ते पडती । पद पंकजि प्रेम न जे करती ।।
अति दीन मलीन हि दुःखिसदा । पदपंकजि प्रीति न ज्यांस कदा
अवलंब कथा तुमच्या हि जयां । प्रिय संत अनंत सदैव त्यां ।।
मद मान न राग न लोभ कदा । सम मानति वैभव ते वेपदा
तव सेवक यास्तव होति मुदा । मुनि सांडिति योग-दुरास सदा
युत भक्ति निरंतर नेम तनें । पदपंकज सेविति शुद्ध मनें ।।
सम मान अनादर मानुनिया । सब संत सुखी फिरती जगि या
मुनि-मानस-पंकज-भृंग भजे । रघुवीर महा रणधीर अजे ।।
तव नाम जपामि नमामि हरी । भवरोग महागद मान-अरी ।।

गुणशील-कृपा-परमायतनं । प्रणमामि निरंतर मारमणं ॥
रघुनंद निकंदय द्वंद्व घनं । महिपाल विलोकय दीनजनं ॥

**दो०-पुनः पुन्हां मागतो वर हर्षें द्या श्रीरंग ॥**
**पदसरोज अनपायिनी भक्ति सदा सत्संग ॥ १४ रा ॥**
**शिव गा वर्णुनि रामगुण हर्षें कैलासास ॥**
**देवक्षि प्रभु कापतां सर्व-सुखप्रद वास ॥ १४ म ॥**

श्रुणु खगपति ! ही कथा पावनी । त्रिविध ताप भव-भय नाशनी ॥
या शुा महाराज-अभिषेका । श्रवत लभति नर विरति-विवेका॥
जे सकाम नर ऐकति गाती । पावति सुख विविधा संपत्ती ॥
सुरसुर्लभ-सुख भोगुनि जगतीं । अंतकाळि रघुपति-पुरि जाती ॥
मुक्त विरागी विषयी ऐकति । भक्ति सुगति नव वैभव पावति ॥
रामकथा वर्णिली यथामति । दुःख-दैन्य-भय-हरणी-खगपति ॥
विरतिविवेक-भक्ति-दृढ-करणी । मोह नदीतें सुंदर तरणी ॥
नित नव मंगल कोसलपुरीं । हर्षित असति वर्ग सब परीं ॥
प्रीति रामपदकंजि नित्य नव । सर्वां, वंदिति ज्या मुनि अज शिव
भिकाग्रांस वसनादिक नाना - । दिलीं विविध दानें विप्रानां ॥

**दो०-ब्रह्मानंदीं मग्न कपि प्रभुपदिं सर्वां प्रीत ॥**
**त्यां न कळति जातां दिवस महिने सहा व्यतीत ॥ १५ ॥**

विस्रत गृह, ना स्वप्नि आठवण । जसें परद्रोहास संत-मन ॥
बोलविति तैं सख्यां रघुपती । ते येउन सादर शिर नमती ॥

परम प्रीतिनें निकट बसविले । भक्त-सुखद मृदु वचन बोलले ।।
सेवा केली तुम्हीं मम अती । कशी मुखांवर वर्णूं महती ।।
त्यक्त मदर्थ सदन सौख्याला । प्रिय अति यास्तव तुम्हि मज झाला
अनुज राज्य वैभव वैदेही । परिजन सदनें काया स्नेही ।।
सगळे प्रिय न तुम्हांसम जाणा । मृषा न वदतो, हा मम बाणा ।।
सर्वां प्रिय सेवक ही नीती । दासांवर मम अधिका प्रीती ।।

**दो०–मित्र ! अतां जावें गृहीं भजा मला दृढनेम ।।**
**समजुनि सर्वग सर्वहित करा सदा सुप्रेम ।।१६।।**

प्रभुवच परिसुनि सब मग्नही । कोण अम्हि कुठें स्मृति ता नहीं ।।
कर जोडुनि टक लाउनि बघती । अति अनुरागें वदूं न शकती ।।
प्रेम परम त्यांचें प्रभु पाहति । ज्ञान विविध विधिनें उपशति ।।
प्रभु सम्मुख काहि न वदुं शकती । घडि घडि चरण सरोजां बघती ।।
प्रभु अणविति भूषण वसनानां । अनुपम सुंदर सुरंगि रना ।।
सुग्रीवाला प्रथम अर्पिलीं– । स्वकरें भरते त्यास घालीं ।।
प्रभु-आज्ञें लक्ष्मण लंकेशा । अर्पिति, रुचलीं भानुकुशा ।।
स्तब्ध बसे अंगद ना हालत । प्रभु बघुनी प्रीति, न बोलत ।।

**दो०–जांबवंत नीलादिकां आहेरिति रघुनाथ ।।**
**रामरूप हृदिं धरुनि सब जाति नमुनि पदिं माथ ।।१७अ।।**
**अंगद नमि शिर उठुनि, जल नयनि करास जुळून ।।**
**अति विनीत वच वदे जणुं प्रेमरसीं घोळून ।। १७म ।।**

श्रुणु सर्वज्ञ कृपा-सुख-सिंधो । दीन-दयाकर आर्त-सुबंधो ।।
मरतेवेळि नाथ ! गत वाली- । मज जैं प्रभु-पदरामधिं घाली ।।
स्मरुनी अशरणशरण-पणा निज । भक्त हितंकर ! त्यागुं नका मज ।।
तुम्हि माझे प्रभु गुरु पितृ माता । जाउं कुठें, त्यजुं पदजलजाता ।।
पहा विचारुनि तुम्हिच नृपोत्तम । प्रभुस तजुनि गृहिं काय काम मम ।।
बाला ज्ञान-बुद्धि-वल-हीना । रक्ष नाथ ! शरणागत-दीना ।।
सकल नीच गृह-सेवा करिन हि । पद पंकज पाहुनि भव तरिन हि ।।
वदुनि पडे चरणीं प्रभु ! पाही ! । नाथ ! अतां न वदा गृहिं जा ही ।।

**दो०-श्रवुनि नम्र अंगद वचन रघुपति करुणाशीव ।।**
**प्रभु उठवुनि हृदयीं धरिति सजल नयन राजीव ।।१८रा।।**
**निज उर-माला वसन मणि वालिसुता घालून ।।**
**बोळविती भगवंत मग विविधा समजावून ।।१८म।।**

भरत अनुज लक्ष्मण सांगातीं । भक्तकृतज्ञ पोचवूं जाती ।।
अंगदहृदयीं प्रेम न थोडें । बघे प्रभुकडे घडि घडि कोडें ।।
घडि घडि करि दण्डवत् प्रणाम । मनिं किं रहा म्हणतिल मज राम ।।
राम-विलोकन चाल बोलणें । स्मरत विषादहि हसत भेटणें ।।
प्रभुमत बघुनि विनति वहु करुनी । जाई हृदयिं पदपंकज धरुनी ।।
सादर सब कपिनां पोचवले । मग भावांसह भरत परतले ।।
तैं धरुनी सुग्रीव-पदानां । करि हनुमंत विनंती नाना ।।
काहीं दिन रघुपति-पद-सेवा । करुन बघेन चरण तव देवा ।।

पुण्य-पुंज तुम्हि पवन कुमारा ! । जाउन सेवा करुणागारा ।।
तेव्हां कपि सत्वर सगळे गत । श्रुणु हनुमंता वदे वालिसुत ।।

**दो०-प्रभुस दंडवत वदा, कर जुळुनि विनंति तुम्हांस ।।**
**घडोघडी मम आठवण देणें रघुनाथास ।। १९रा ।।**
**असें वदुनि गत वालिसुत परत येई हनुमंत ।।**
**प्रभुस वदे तत्प्रीति तैं मग्न होति भगवंत ।।१९म।।**
**कुलिशाहुनिहि कठोर अति कोमल कुसुमाहून ।।**
**राम-चित्त कीं खगेश्वर कोणा येइ कळून ।।१९चंद्र।।**

मग कृपाल अणविती निषादा । देति वस्त्रभूषणें-प्रसादा ।।
निज भवना जा स्मरण मम करा । मनकृतिवचनें धर्म अनुसरा ।।
मित्र ! बंधु मम तुम्हि सम भरतहि । येत जात जा नगरीं सततहि ।।
श्रवत वचन उपजे सुख भारी । पायिं पडे लोचनिं बहु वारी ।।
चरण-नलिन हृदिं धरि, ये भवना । सांगे प्रभू-स्वभाव परिजनां ।।
रघुपति चरित बघुनि पुर वासी । घडि घडि म्हणति धन्य सुखराशी
रामराज्यि वसता लोकत्रय । झाले हर्षित विगन-शोक-भय ।।
कोणि कुणासि न करिति शत्रूता । प्रभूप्रतापें गता विषमता ।।

**दो०-वर्णाश्रम निज निज-धर्म-निरत वेदपथि लोक-।।**
**वर्तति, पावति सदा सुख नहि भय रोग न शोक ।।२०।।**

दैहिक दैविक भौतिक ताप हि । रामराज्यि होति न कोणासहि ।।
प्रीति परस्पर सब नर करती । रत निजधर्मि यथा श्रुतिनीती ।।

चारी चरणि धर्म जगि राही– । पूर्ण सदा, स्वप्निहि अघ नाहीं ।।
रामभक्ति–रत नर नी नारी । सकल परमगतिचे अधिकारी ।।
अल्पमृत्यु नहि पीडा काहीं । सुंदर सकल विरुज काया ही ।।
कोणि न दुःखि दरिद्री दीन न । कोणि अबुद्ध न लक्षणहीन न ।।
सब निर्दंभ धर्मरत शुची । चतुर नारि नर सब गुण-रुची ।।
सब गुणज्ञ पंडित ही ज्ञानी । सकल कृतज्ञ धूर्त नहिं कोणी ।।

**दो०–रामराज्यि खगपती श्रुणु चराचरीं जगि काहि ।।**
**कालकर्म नी प्रकृति–गुण–कृत दुःख न कोणा हि ।।२१।।**

भूमि सप्त सागर मेखला । एक भूप रघुपति कोसला ।।
बहु भुवनें प्रतिरोमि जयासी । ही प्रभुता न विशेष तयासी ।।
तो प्रभु महिमा अमित समजता । हें वर्णत हीनता–विपुलता ।।
खगपति ! तो महिमा जे जाणिति । तेही चारिति या अनि रति मानिति
तो कळण्याचें फल लीला ही । मुनिवर संयमि कथिति महा ही ।।
राम राज्यि जी सुख संपदा । वर्णुं न शकति फणीश शारदा ।।
सब उदार सब पर-उपकारी । विप्र–चरण-सेवक नर नारी ।।
पुरुष एकपत्नी–व्रत–धारी । त्या मन-वच-कृति पति-हितकारी

**दो०–'भेद' नृत्य–नर्तक गणीं 'दंड' करीं संन्यासि ।।**
**रामचंद्र–राज्यीं श्रवणि 'जिका' शब्द मनासि ।।२२।।**

फुलती फळति सदा तरु कानन । संगें विहरति गज पंचानन ।।
सहज वैर मृग विहंग विसरति । प्रीति परस्पर सकल वाढविति ।।

कूजति विहगवृंद, मृग नाना । चरति लुटित मुद भीति जरा ना ।।
शीतल मंद सुगंधि गंधवह । भृंग गुंजती प्रसून रस वह ।।
लता विटप मागत मधु झरती । दुग्ध यथेष्टहि धेनू स्रवती ।।
सदा सस्य-संपन्ना धरणी । त्रेतायुगात कृतयुग-करणी ।।
गिरी विविध मणिखाणी प्रगटति । जाणुनि जगदात्मा जगभूपति ।।
सरिता सकल वहति वर वारी । स्वादु विमल शीतल सुखकारी ।।
सागर निज मर्यादा पाळति । टाकिति रत्न तटीं नर पावति ।।
सरसिज संकुल सकल तडागहि । सुप्रसन्न दशदिशा विभागहि ।।

**दो०–विधु निजकरिं करि पूर्ण महि रवि यथेष्ट तपतात ।।**
**वारिद याचित देति जल रामचंद्र–राज्यांत ।।२३।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ४ था

वाजिमेध कोटी प्रभुनी कृत । अगणित दानें द्विजांस अर्पित ।।
श्रुतिपथ–पालक धर्मधुरंधर । गुणातीत परि भोग पुरंदर ।।
राहि सदा पति अनुकुल सीता । शोभाखाण सुशील विनीता ।।
कृपासिंधुची प्रभुता जाणुनि । चरणकमल सेवी मन लावुनी ।।
जरी गृहीं सेवक सेवकिणी । विपुल सदा सेवाविधि गुणी ।।
स्वकरें गृह–परिचर्या करते । रामचंद्र–आज्ञा अनुसरते ।।
कृपासिंधु मानिति सुख जेणें । तें श्री करि सेवा विधि जाणे ।।
कौसल्यादि सासवा गेहीं । त्यास सेवि मद मान नसे ही ।।

उमा-रमा-ब्रह्माणि- वंदिता । जगदंबा संततमनिंदिता ॥

**दो०-इच्छिति कृपाकटाक्ष सुर परि न बघे ढुंकून ॥**
**रामपदाब्जीं ती रति करी स्वभाव तजून ॥२४॥**

सानुकूल बंधु सब सेवति । रामकमलपद-रति अधिका अति ॥
प्रभु मुखकमल विलोकत राहति । कधिं कृपालु मज सेवा सांगति ॥
राम बंधुंवर करिती प्रीती । शिकविति नानाविधा सुनीती ॥
सकल नगर जन हर्षित राहति । सुर-दुर्लभ सब भोगां भोगिति ॥
बसति अहर्निश विधीस विनवित । श्री रघुवीर चरणरति वांछित ॥
सीते सुंदर सुत दो झाले । लव कुश निगमागमीं गाइले ॥
उभय विजयि विनयी गुणमंदिर । प्रतिबिंब कि हरिचें अति सुंदर ॥
झाले दो दो सुत भावां प्रति । सकल रूप-गुण-शीलवंत अति ॥

**दो०-ज्ञान-गिरा-गोतीत अज माया-मन-गुण-पार ॥**
**तोचि सच्चिदानंदघन करि नर चरित उदार ॥२५॥**

करुनि सकाळिच शरयू-मज्जन । बसति सभेंत सवें द्विज सज्जन ॥
वेदपुराणां वसिष्ठ वर्णिति । ऐकति राम सकल जरि जाणिति ।
भोजन अनुजां समेत करती । बघुनि जननिनां ये सुख-भरती ॥
बंधु भरत शत्रुघ्न उपवना- । जाती घेउनि पवननंदना ॥
बसुन राम-गुण-कथांस पुसती । चिंतुनि हनुमान् सांगे सुमती ॥
श्रवुनि विमल गुण अति सुख पावति । पुनः पुन्हा सांगाया लावति ॥
घरोघरीं सांगती पुराणा । रामचरित पावन विध नाना ॥

नारी नरहि राम–गुण–गाना । करिति अहर्निश ज'त कळत ना ।।

**दो०– पुरि अयोध्यावासि जन–सुख संपदा समाज ।।**
**शेष सहस्त्र न वदुं शकति जिथें राम नृपराज ।।२६।।**

नारदादि सनकादि मुनीश्वर । दर्शनलागि कोसलाधीश्वर ।।
प्रतिदिन सकल अयोध्ये येती । बघुनी नगर, विराग ·विसरती ।।
गच्च्या जातरूप मणि विरचित । विविधरंगि फर्शिनें सुसज्जित ।।
पुर चौफेर कोट अति सुंदर । रचित रंगि वेरंगि वुरुज वर ।।
जणूं नवग्रह सेना महती । वनवुनि अमरावतिस वेढती ।।
महि वहुरंगी रत्नीं विरचित । नाचत मुनिवरमनहि विलोकित ।।
धवल धाम वरतीं नभ ·चुंविति । कळस जणूं रविशशिभा निंदिति।।
वहुमणि-रचित झरोके भ्राजति । घरोघरीं मणिदीप विराजति ।।

**छं–मणि–दीप राजति गृहें भ्राजति; देहली विद्रुम-कृता ।।**
**मणि खांब भिंति विरंचि-विरचित कनक मणि मरकत युता।।**
**सुंदर मनोहर मंदिरायत स्फटिक–अजिरें रुचिर तीं ।**
**प्रति दारि दारि कपाट हाटक खचित वज्रांहि वहुत तीं ।।१।।**

**दो०–चारु चित्रशाला गृहीं गृहीं लिखित सजवून ।**
**रामचरित तें बघत, मुनि–मना घेइ चोरून ।।२७।।**

सुमन-वटिका सगळे लाविति । नाना सायासीं वहु सजविति ।।
लता ललित सुंदर वहु जाती । सदा वसंता-समान फुलती ।।
गुंजति मधुकर मुखर मनोहर । मारुत सदा त्रिविध अति सुंदर ।।

नाना खगांस बालक पाळति । वदति मधुर उडतां बहु शोभति ॥
मोर हंस सारस पारावत । भवनांवर शोभा अति पावत ॥
जिथें तिथें पडती पडछाया । लागति कूजन नृत्य कराया ॥
पढविति शुक मैंनानां बालक । म्हणा राम रघुपति जनपालक ॥
राजद्वार सर्वपरि सुंदर । वीथि चौक बाजार मनोहर ॥

**छं०—बाजार सुंदर वर्णवेना वस्तु फुकट हि मिळतसे ।**
**नृप जेथ रमानिवास तेथिल संपदा वर्णिति कसे ?॥**
**बसले बजाज सराफ वाणी जणुं अनेक कुबेर ते ।**
**सच्चरित सुंदर सब सुखी अति नारि नर शिशु जरठ जे ॥१॥**

**दो०—वाहे शरयू उत्तरे निर्मल जल गंभीर ॥**
**घाट सुबद्ध मनोहर पंकहीन तत्तीर ॥२८॥**

दूर रुचिर तो स्वतंत्र घाट । जिथें पिती जल हय गज थाट ॥
अति जलघाट मनोहर नाना । तेथें पुरुष न करिती स्नाना ॥
राजघाट सब विधि सुंदर वर । मज्जति तिथें वर्ण चारी नर ॥
तीरिं तीरिं बहु देव मंदिरें । सभोंवतीं उपवनें सुंदरें ॥
कुठें कुठें नदितीरिं उदासी । वसति बोधरत मुनि संन्यासी ॥
तीरानें तुलसिका सुशोभन । वृंद वृंद बहु रोपित मुनिगण ॥
पुरशोभा ये जरा न वदतां । बहिर्नगरही परम रुचिरता ॥
पुरदर्शन नुरवी अघडाग हि । वन उपवन वापिका तडागहि— ॥

**छं०–निरुपम तडाग सुवापि कूप मनोहरायत शोभती ।**
**सोपान सुंदर नीर निर्मल बघुनि सुर मुनि मोहती ॥**
**बहुरंगि पंकज भृंग गुंजति विहग सुंदर बोलती ।**
**आराम रम्य पिकादि खग–रव पांथिकां जणुं बाहती ॥१॥**

**दो०–रमानाथ जिथ राजा तें कि वर्णिलें जाय ॥**
**अणिमादिक सुख संपदा करिति पुरी निज ठाय ॥२९॥**

जिथं तिथं नर रघुपति गुण गाती । बसुनि परस्पर हेंच शिकविती ॥
भजा प्रणत–प्रतिपालक रामा । शोभा–शील–रूप–गुण–धामा ॥
श्यामल गात्रा जलज–लोचना । पक्ष्म नयन इव दासत्राणा ॥
धृत–शर–रुचिर–चाप–तूणीरा । संत–कंजवन–रवि रणधीरा ॥
काल कराल–भुजग–विहगेश्वर । नमत राम अकाम–ममता–हर ॥
लोभ-मोह-मृगयुथ–किराता । मनसिज–करि–हरि, जन सुखदाता
संशय-शोक-निबिडतम-भानुसि । दनुज–गहन घन-दहन-कृशानुसि ॥
जनकसुतेसह रघुवीरासी । कां न भजा भवभीति–हरासी ॥
बहु वासनामशक हिमराशिस । सदा एकरस अज अविनाशिस ॥
मुनिरंजन भंजन महिभारा । दास तुलसिचे प्रभुस उदारा ॥

**दो०–नगरनारिनर यापरीं करिति रामगुणगान ॥**
**सानुकूल सकलां असति संतत कृपा निधान ॥३०॥**

जेंव्हां रामप्रताप दिनपति । प्रबल परम उदया ये खगपति ! ॥
तदा त्रिलोकीं प्रकाश भरला । सुख बहुतानां, शोक जाहला—॥

—ज्यांस शोक ते करतो वर्णन । प्रथम अविद्यानिशाविनाशन ।।
जिथें तिथें अघउलुकें लपलीं । कामकोपकैरव संकुचलीं ।।
प्रकृति काल गुण कर्मी नाना । कोठें सौख्य चकोरां या ना ।।
मोह मान मद मत्सर तस्कर । कुठें न चाले यांचें हुन्नर ।।
धर्मसरीं ज्ञान नि विज्ञान । हीं पंकजें विकसलीं भिन्न ।।
सुख संतोष विराग विवेक । विगत शोक हे कोक अनेक ।।

**दो०—हा प्रताप-रवि ज्याचे उरिं जैं करी प्रकाश ।।**
**मागिल वाढति कथित जे प्रथम पावती नाश ।।३१।।**

❖ ❖ ❖

## अध्याय ५ वा

राम एकदां बंधू संगति । पवनकुमारा सह जो प्रिय अति ।।
गत सुंदर उपवन बघुं जंव । सब तरु कुसुमित नव पल्लव ।।
समय गणुनि सनकादिक येती । तेजपुंज गुण शील शुभ अती ।।
ब्रह्मानंदि सदा लयलीन । बघतां बालक, बहुकालीन ।।
जणूं रूपधर चारी वेदहि । समदर्शी मुनि विगतविभेदहि ।।
दिशा वसन; हें व्यसन तयांप्रति । रघुपतिचरित कथिति तिथं ऐकति
होते हे सनकादि भवानी । मुनिवर कुंभज जेथें ज्ञानी ।।
रामकथा मुनिवर बहु वर्णी । ज्ञानयोनि अनला इव अरणी ।।

**दो०—करिति दंडवत राम, जें मुनि येतां दिसतात ।।**
**स्वागत पुसुनी पीतपट बसण्या प्रभु देतात ।।३२।।**

वंधू तिघें दंडवत् प्रणमति । सहित पवनसुत, सुख अति पावति ।
मुनि रघुपति छवि अतुल निरखती । मग्न होति मन रोधुं न शकती ।।
श्यामलगात्र सरोरुह-लोचन । सुंदरता-मंदिर भव-मोचन ।।
निर्निमेष टक लावुनि वघतीं । प्रभु कर जुळुनी मस्तक नमती ।।
त्यांची दशा दिसत रघुवीरा । स्रवति नयन जल पुलक शरीरा ।।
प्रभु मुनिवरां धरुनि कर वसविति । परम मनोहर वच उच्चारिति ।।
आज धन्य मी ऐका मुनिवर । तुमचें दर्शन अघराशी-हर ।।
वहुभाग्यें सत्संग लाभतो । विना श्रमहि भव भंग पावतो ।।

**दो०-संत-संग अपवर्ग-पथ कामी भवाब्धि-पंथ ।।**
**वदति संत कवि कोविद श्रुति पुराण सद्ग्रंथ ।।३३।।**

प्रभुवचनें हर्षित मुनि चारी । स्तुति करिती तनु पुलकित सारी ।।
जय भगवंत अनंत अनामय । अनघ अनेक एक करुणामय ।।
जय निर्गुण जय जय गुणसागर । सुखमंदिर सुंदर अति नागर ।।
जय इंदिरा-रमण जय भूधर । अनुपम अज अनादि शोभाकर ।।
ज्ञाननिधान अमानहि मानद । पावन सुयश पुराणवेद वद ।।
तज्ञ कृतज्ञ अज्ञता-भंजन । नाम अनेक अनाम निरंजन ।।
सर्व सर्वगत सर्वहृदालय । वससि, सदा आम्हां परिपालय ।
द्वंद्व-विपद् भवपाश विभंजय । वस हृदि, राम काम मद गंजय ।।

**दो०-परमानंद कृपायतन पूरक मनिचे काम ।।**
**प्रेमभक्ति अनपायिनी द्या आम्हां श्रीराम ।।३४।।**

द्यावि भक्ति रघुपति अति पावनि । त्रिविध ताप भवदर्प विनाशनि ।।
प्रणतकाम सुरधेनु कल्पतरु । व्हावें प्रसन्न द्या प्रभु हा वरु ।।
भववारिधि–कुंभज रघुनायक । सेवत सुलभ सकल–सुखदायक ।।
दारुण मनसिज –दुःख विदारय । दीन बंधु समता विस्तारय ।।
त्रास–आस–ईर्षादि निवारक । विनय-विवेक-विरति-विस्तारक ।।
भूपमौलिमणि मडण धरणी । देइ भक्ति संसृति–सरि–तरणी ।।
मुनि–मन–मानस–हंस निरंतर । चरणकमल वंदित अजशंकर ।।
रघुकुलकेतू श्रुतिपथरक्षक । प्रकृतिकालगुणकर्म–विभक्षक ।।
तारण तरण हरण सव दूषण । तुलसिदास प्रभु ! तिभुवन भूषण

**दो०–पुनः पुन्हां करुनी स्तुती प्रेमें शिर नमवून ।।**
**ब्रह्मभवनि सनकादि गत वर अति इष्ट मिळून ।।३५।।**

सनकादिक गत विधि लोकातें । रामचरणिं शिर नमिती भ्राते ।।
पुसण्या प्रभुस सकल संकोचति । सकल मरुतसुत मुख अवलोकति।।
एकुं इच्छिती प्रभु–मुख–वाणी । होइ सकल जेणें भ्रमहानी ।।
अंतर्यामी प्रभु सत्र जाणति । हनुमान् ! आहे काय ? विचारति।।
हनुमान् वदसा जुळुनि करांला । श्रुणु भगवंता दीन दयाला ।।
नाथ ! भरत पुसुं इच्छिति कांही । परि मनिं संकोचति पुसण्याही ।।
मत्स्वभाव कपि तुम्हीं जाणतां । कधिं निळ अंतर मजसी भरता ।।
ऐकुनि वचन भरत धरि चरणां । प्रभु ! ऐका प्रणतार्ती–हरणा ।।

**दो०–नाथ ! न मज संदेह मुळि स्वप्निंहि शोक न मोह ।।**
**केवळ तुमच्या कृपें प्रभु ! कृपानंद संदोह ।।३६।।**

करतो एक कृपाब्धि धिटाई । मी सेवक तुम्हि जन- सुखदाई ॥
संतांचा महिमा बहु रघुपति ! । वेद–पुराणें बहुविध सांगति ॥
स्वयें श्रीमुखें कथित महत्ता । प्रभू प्रीति त्यांवर, न इयत्ता ॥
ऐकुं इच्छितो त्यांचें लक्षण । कृपासिंधु ! गुण-बोध-विचक्षण ॥
संत असंत भेद निवडोनी । प्रणतपाल ! सांगा विवरोनी ॥
संत–लक्षणें श्रुणु बंधों, तीं– । अगणित, वेद–पुराणीं ख्याती ॥
संत–असंतांची अशि करणी । जशि कुठार चंदन आचरणीं ॥
बंधु ! चंदना कुठार तोडी । तरि दे निजगुण सुगंध–गोडी ॥

**दो०–यास्तव चढतो सुर–शिरीं प्रिय जगता श्रीखंड ॥**
**अनलि दाह, घणघाव मुखि, परशूला हा दंड ॥३७॥**

विषयिं अलंपट शील–गुणाकर । दुःखि दुःख बघतां सुखि सुख पर ॥
सम अभूतरिपु विमद विरागी । लोभामर्ष हर्ष–भी–त्यागी ॥
कोमल चित्त दया दीनांवर । त्रिविध भक्ति मम छलहीना वर ॥
मानद सकलां स्वयें अमानी । भरत ! प्राणसम मम ते प्राणी ॥
विगत काम मम नाम–परायण । शांति-विरति-विनति-मुदितायन ॥
शीतलता सरलता मइत्री । प्रीति विप्रपदिं धर्म–जनित्री ॥
ज्यांत तात हीं सकल लक्षणें । खरा सतत तो संत जाणणें ॥
शम दम नियम नीति ना सोडति । परुष वचन ना कधींहि बोलति ॥

**दो०–निंदा स्तुति ज्यां सम सदा ममता मम पदकंज ॥**
**प्राणप्रिय मज संत ते गुणमंदिर सुखपुंज ॥३८॥**

अतां असंत-स्वभाव ऐका । चुकुनहि संगति कधीं करुं नका ।।
त्यांचा संग सदा दुखदाई । कपिले नाशिति खटचाळ गायी ।।
ताप विशेष फार खल-चित्तीं । सदा बघुनि परसंपद् जळती ।।
जिथें कुठे परनिंदा ऐकति । हर्षति जणूं महानिधि पावति ।।
काम-कोप-मद-लोभ-परायण । निर्दय, कपटी कुटिल मलायन ।।
वैर अकारण सर्व-जणांसी । जो करि हित वा अहित तयासी ।।
खोटें खाणें खोटें घेणें । खोटें भोजन खोटें देणें ।।
वचन मधुर सम मयूर बोलति । हृदय कठोर महा अहि भक्षति ।।

**दो०-परद्रोहि परदार रत परधन पर-अपवाद ।।**
**ते नर पामर पापमय मनुजरूप मनुजाद ।।३९।।**

लोभ पांघरुण लोभ हांतरुण । शिस्नोदरपर यमपुर-भीति न ।।
कानिं कुणाची बढती पडतां । श्वास घेति जणुं हीव चि येतां ।।
जैं कोणाची बघति विपत्ती । सुखी होति जणुं विश्व-नरपती ।।
स्वार्थ-निरत परिवार विरोधी । लंपट काम लोभ सुक्रोधी ।।
माय बाप गुरु विप्र न मानिति । आपण पडुनि दुजानां पाडिति ।।
मोहें द्रोह परावा करती । संतसंग हरिकथा न रुचती ।।
अवगुण सिंधु मंदमति कामी । श्रुति दूषक परवित्तस्वामी ।।
विप्रद्रोह परांहुनि भारी । दंभ कपट हृदिं, सुवेषधारी ।।

**दो०-असे मनुज खल अधम, युगिं कृत नी त्रेता नाहिं ।।**
**द्वापरिं होतिल कांहि, बहु वृंदचि कलीयुगाहि ।।४०।।**

बंधु ! धर्म परहितसा नाहीं। परपीडे सम अधम न कांही ।।
सकल पुराणीं वेदीं निर्णित। कथित तात ! कोविद नर जाणत।।
नरतनु पावुनि परां पीडिती। सतत महा भवभया सोशिती ।।
मोहें पाप विविध आचरती। स्वार्थनिरत, परलोक नाशती ।।
कालरूप मी त्यानां भ्राता ! । शुभ नी अशुभ कर्मफल दाता ।।
हें जाणुनि जे परम शहाणे। मज भजती भवभीती-ज्ञानें ।।
त्यगिति कर्म शुभाशुभदायक। मज भजती सुर नर मुनिनायक ।।
संत–असंत गुणागुण कथिले। ते न पडति भवि जिंहि मनि धरिले

**दो०–तात ! ऐक माया–कृत गुण नी दोष अनेक ।।**
**गुण हा, उभय न पाहणें, त्यां बघणें अविवेक ।।४१।।**

श्रीमुख–वच ऐकत ते भ्राते। हर्षित, हृदि ना प्रेम रहातें ।।
स्तुती करिति अति वारंवार। हनूमान–हृदि हर्ष अपार।
रघुपति निज मंदिरिं गत तदा। असें चरित करिती नव सदा ।।
पुनः पुन्हां नारद मुनि येती। पावन राम चरित्रा गाती ।।
चरित नित्य नव पाहुनि जाती। कथा ब्रह्मलोकीं सव कथिती ।।
श्रवुनि विरंचि परम सुख पावति। तात ! गुणां गा पुनरपि, सांगति
वाखाणिति सनकादि नारदा। ब्रह्मनिरत मुनि जरी सर्वदा ।।
गुण परिसुनि विसरुनी समाधिहि। श्रवति परम सादर अधिकारि हि।।

**दो०–जिवन्मुक्त ही ब्रह्मपर, श्रवती त्यजुनी ध्यान।।**
**जे न धरिति हरिकथारति ते हृदयें पाषाण ।।४२।।**

बोलाविति रघुनाथ एकदा । गुरु आले द्विज नगरजन तदा ॥
गुरु मुनि बसले ब्राह्मण सज्जन । वदले वचन भक्त–भव भंजन ॥
ऐका पुरजन मम वचनासी । सांगुं न ममता धरुन मनासी ॥
ना अनीति ना सत्तें वदतो । ऐका करा रुचे जर मग तो ॥
सेवक तो प्रियतम मम तोही । मम अनुशासन मानी जो ही ॥
जर मी बंधु ! वदेन अनीती । मला निषेधा त्यजुनी भीती ॥
बहु भाग्यें मानुष तनु मिळली । सुर–दुर्लभ सद्ग्रंथि गाइली ॥
साधन–धाम दार मोक्षाचें । मिळुनि न मिळविति परलोका जे

**दो०–पावति दुःख परत्र ते शोचति शिर बडवीति ।**
**काळा कर्मा ईश्वरा वृथा दोष लावीति ॥४३॥**

या तनुचें फळ विषय न भाई । स्वर्गहि अल्प अंति दुखदाई ॥
नरतनु मिळुनि विषयिं मन देती । सुधा देति ते शठ विष घेती ॥
तया भला कधि म्हणे न कोणी । गुंजा घेइ परिस टाकोनी ॥
आकरिं चार लाख चौऱ्यायशीं । योनीं भ्रमे जीव अविनाशी ॥
फिरे सदा मायेनें प्रेरित । प्रकृती कालकर्म गुण–घेरित ॥
कधि तरि करुणेनें नरदेहीं– । धाडि ईश, विण हेतू स्नेही ॥
नरतनु भववारिधींत तारूं । सम्मुख मरुत कृपा मम चारू ॥
कर्णधार सद्गुरु दृढ नावे । दुर्लभ साज सुलभतें पावें ॥

**दो०–जो न तरे भवसिंधु नर पाहुनि यां सर्वांस ॥**
**तो कृतघ्न जडधी लभे गति जी आत्मघ्नास ॥४४॥**

सुख परलोक इथे वांछा जर । श्रवुनि धरा मम वच हृदिं दृढतर ।।
बंधू ! सुलभ सुखद हा मार्ग हि । वेद-पुराण कथित मम भक्ति हि ।।
ज्ञान अगम्य हि विघ्नें पार न । साधन कठिण मना आधार न ।।
करुनि कष्ट बहु मिळे कुणाला । भक्तिहीन तो प्रिय नहि मजला ।।
भक्ती स्वतंत्र सबसुखदानी । विण सत्संग न पावे प्राणी ।।
पुण्यपुंज विण भेट न संतां । सत्संगति करि संसृतिअंता ।।
पुण्य एक जगिं समान आन न । मन-कृति-वचनिं विप्रपद-पूजन ।।
देव मुनी ही प्रसन्न त्यावर । द्विजां सेवि जो त्यजुनि कपट नर ।।

**दो०–अन्य गुप्त मत एक तें कथितो जोडुनि हात ।।**
**शंकर–भजन विना नर भक्ति न मम लभतात ।।४५।।**

वदा भक्तिपथिं कुठें प्रयास हि । योग न जप तप मख उपवास हि ।।
सहज सरलता मनिं न कुटिलता । यथालाभ–संतुष्ट–चित्तता ।।
म्हणवि दास मम नर आशा करि । वदा कुठें विश्वास खरा तरि ।।
बहुत कशाला हवें विवरणें । मीं वश बंधु ! याच आचरणें– ।।
वैर न विग्रह भय ना आशा । सुखमय तया सदा दश आशा ।।
अनारंभ अनिकेत अमानी । अनघ अरोष दक्ष विज्ञानी ।।
प्रीति सदा सज्जन संसर्गी । तृण गणि विषय-नाक-अपवर्गी ।।
भक्तिपक्षि हठ शठता नाहीं । दूर सारतो दुस्तर्का ही ।।

**दो०–गुणग्रामिं मम नामिं रत गत ममता मद मोह ।।**
**जाणे त्याचें तोच सुख परानंद संदोह ।।४६।।**

श्रवुनि सुधासम वच रामाचें। सब पद धरिति कृपाधामाचे ॥
अमचे जनक बंधु गुरु जननी। कृपानिधी प्रिय प्राणांहूनी ॥
तन धन धाम राम हितकारक। सबपरि तुम्हि प्रणतार्ती हारक ॥
असें शिकविता कोणि नसेही। माता पिता स्वार्थरत तेही ॥
हेतु-रहित जगि जुग उपकारी। तुम्हि तुमचे सेवक असुरारी ॥
स्वार्थी मित्र सर्व जगि असती। स्वप्नीं प्रभू! परमार्थी नसती ॥
जन-वचना प्रेमार्द्र ऐकलें। हृदयीं श्रीरघुनाथ हर्षले ॥
आज्ञा घेउन जाति घरोघर। प्रभु-भाषण वर्णित अति सुंदर ॥

**दो०-उमे! अयोध्यावासि नर नारी कृतार्थ-रूप ॥**
**ब्रह्म सच्चिदानंदघन रघुपति जेथे भूप ॥४७॥**

❖ ❖ ❖

## अध्याय ६ वा

येति एकदां वसिष्ठ मुनिवर। जिथें राम सुखधाम मनोहर ॥
अति आदर रघुनायक देती। धुउनि पाय पादोदक घेती ॥
राम! कृपाब्धि काहिं मम विनती। ऐका, मुनि कर जोडुनि म्हणती ॥
वघ-वघुनी तुमच्या आचरणा। होइ मोह मम हृदयिं पार ना।
महिमा अमित, न वेदां कळतो। भगवन्! मज कीं वर्णवेल तो ॥
धंदा पौरोहित्य मंद अति। वेद पुराणें स्मृतीहि निंदति ॥
घेइ न तैं विधि वदले मजला। पुढें लाभ आहे सुत तुजला ॥

परमात्मा ब्रह्मच नर बनतिल । रघुकुलभूषण भूपति होतिल ।।

**दो०–तैं हृदि विचार केला योग–मख व्रत दान।।**
**जास्तव करणें तो मिळे धर्म न या सम आन ।।४८।।**

जप तप नियम योग निज धर्म । श्रुति संभव नाना शुभ कर्म ।।
ज्ञान दया दम तीर्थी मज्जन । वदति धर्म जितके श्रुति सज्जन ।।
आगम निगम पुराण अनेक हि । श्रवुनि पढनि फल तों प्रभु एकहि
तव पदपद्मीं प्रीति निरंतर । सकल साधनां हें फल सुंदर ।।
मळें धुउनि कधि मळ कि नाशतो । वारि मथुनि कुणि घृत कि पावतो ।।
प्रेम भक्ति जल विण रघुवर तो । अभ्यंतर मल कधीं न जातो ।।
तो सर्वज्ञ तज्ञ तो पंडित । तो गुणगृह विज्ञानि अखंडित ।।
दक्ष सकल लक्षणयुत तो ही । पद सरोज–रत जो असतो ही ।।

**दो०–नाथ ! एक वर मागतो राम, कृपेनें द्याहि ।।**
**प्रतिजन्मीं प्रभुपद कमल-स्नेह न घटो कदाहि ।।४९।।**

विनवुनि मुनि वसिष्ठ-गृहिं आले । कृपासिंधुला प्रिय अति झाले ।।
हनूमान भरतादी भ्राते । सर्वे घेति सेवक सुखदाते ।।
गत कृपाल नगरांतुनि, तदा । अणविति गज रथ हय संपदा ।।
बघुनि कृपेनें त्या वाखाणिति । जें ज्या रुचलें तें त्या अर्पिति ।।
श्रमहारी प्रभुला श्रम झाले । शीतल आम्रवनीं तैं गेले ।।
पसरति वसन भरत निज हातें । वसले प्रभु सेविति ते भ्राते ।।
मारुतसुत तैं मारुत घाली । सजल नयन तनु पुलकित झाली ।।

हनुमंता सम नहिं वहुभागी । नहि कुणि राम-चरण अनुरागी ।।
गिरिजे ज्याची सेवा प्रीती । स्वमुखें प्रभु वहु वार वानिती ।।

**दो०–त्या अवसरिं मुनि नारद आले करतळि बीन ।।**
**गाउं लागले राम कल कीर्ति सदैव नवीन ।।५०।।**

मामवलोकय पंकज–लोचन । कृपाविलोकनिं शोच–विमोचन ।।
नील तामरस-शाम, काम-अरि– । हृदय-कंज–मकरंद–मधुप हरि ।।
यातुधान–वरूथ–वल–भंजन । मुनि–सज्जन–रंजन अघ–गंजन ।।
विप्रसस्य नववृंद बलाहक । अशरण–शरण दीनजन-पालक ।।
भुजवल विपुल, भार महि खंडित । खर–दूषण–विराध–वध–पंडित ।।
रावणारि सुखरूप भूपवर । जय दशरथ कुल-कुमुद-सुधाकर ।।
सुयश पुराणिं कथित निगमार्गमिं । गाती सुरमुनि संत समागमिं ।।
कारुणीक मिथ्या–मद खंडन । सकल कुशल कोशलपुर–मंडन ।।
कलिमल–मथन–नाम ममताहन । तुलसिदास प्रभु पाहि! प्रणतजन।।

**दो०–प्रेमें नारद वर्णुनी राम–गुण–ग्रामास ।।**
**धरुनी शोभासिंधु हृदिं गेले विधि–धामास ।।५१।।**

गिरिजे ऐक, विशद ही कथा– । मी सव कथित माझि मति यथा।।
रामचरित शतकोटि पार न । श्रुती शारदा वर्णनिं शक्त न ।।
राम अनंत, अमित-गुण-खाणी । जन्म कर्म अगणित नामानी ।।
जलसीकर महि रजहि गणवती । रघुपति चरित न वर्णुनि सरती ।।
विमल कथा हरिपददायिनी । श्रवण भक्ति दे अनपायिनी ।।

उमे कथा सब रुचिर वर्णिली । भुशुंडिनें जी गरुडा कथिली ॥
कथित रामगुण वर्णुनि कांहीं । सांगूं काय भवानि ! अतां ही ॥
श्रवुनि कथा शुभ उमा हर्षली । अति विनीत मृदु वाणी वदली ॥
धन्य धन्य मी धन्य पुरारी । रामगुणां श्रुत भवभयहारी ॥

**दो०–तुमच्या कृपें कृपायतन अतां कृतार्थ, न मोह ॥**
**विदित राम–महिमा प्रभु चिदानंद–संदोह॥५२ रा॥**
**स्रवत नाथ आनन–शशी कथा सुधा रघुवीर ॥**
**श्रवणपुटीं पिउनियां मन तृप्त नव्हें मतिधीर ॥५२ म॥**

राम चरित ऐकुनि जे धाती । त्यां न कळे रस विशेष जाती ॥
जीवन्मुक्त महामुनि जेही । श्रवति निरंतर हरिगुण तेही ॥
भवसागर जो लंघूं पाही । रामकथा त्या दृढ नौका ही ॥
विषयिजनांसहि हरिगुणआगर । श्रवणसुखद हृदया प्रसन्नकर ॥
श्रवणवंत जगिं कोण असा ही । रघुपति चरित जया प्रिय नाहीं ॥
आत्मघातकी जीव हि जड ते । ज्यानां रघुपति कथा न रुचते ॥
हरिचरित्र मानस तुम्हि गीत । श्रवुनि नाथ सुख मजसि अमीत ॥
तुम्हि कथिलें कि कथा ही शोभन । करि भुशुंडि गरुडाप्रति गायन ॥

**दो०–ज्ञान विरति विज्ञान दृढ रामचरणिं सुस्नेह ॥**
**वायस तनु रघुपति–भक्ति मला परम संदेह ॥५३॥**

नरसहस्रमधिं पहा पुरारी । कोणि एक धर्मव्रत धारी ॥
धर्मशील–कोटीमधिं असतो । विषय विमुख कुणि विरागि रत तो॥

कोटि विरक्तीं श्रुति वदताहे । सम्यक् ज्ञान एक कुणि लाहे ।।
ज्ञानवंत कोटींत आगळा । जीवनमुक्त एक जगिं विरळा ।।
सहस्रांत त्या सब सुखखाणी । ब्रह्मलीन दुर्लभ विज्ञानी ।।
धर्मशील सुविरागी ज्ञानी । जीवन्मुक्त ब्रह्मपर प्राणी ।।
यांहुनि तो दुर्लभ सुरराया । रामभक्तिरत गत मद माया ।।
ती हरिभक्ति काक कशि पावे । विश्वनाथ ! हें मज सांगावें ।।

**दो०—रामपरायण बोधरत गुणागार मतीधीर ।।**
**नाथ वदा कारण कवण मिळण्या काक शरीर ।।५४।।**

सुंदर हें प्रभुचरित पुनीत । कुठें कृपालु ! वायसा प्राप्त ।।
कसें श्रुत हि आपण मदनारी । सांगा मज अति कौतुक भारी ।।
गरुड महाज्ञानी गुण राशि । हरि सेवक अति निकट निवासी ।।
काकापाशीं कवण हेतु तरि । त्यजुनि निकर मुनि कथा श्रवण करि ।।
सांगा केंवि घडे संवाद । दो हरिभक्त काक उरगाद ।।
गिरा गौरिची सरल मनोहर । श्रवुनि सुखी वदले शिव सादर ।।
धन्य सती ! पावन तुझी मति । थोडि न, रघुपति-पदीं प्रीति, अति।
ऐक परम पुनीत इतिहास । श्रवुनि सकल-लोक-भ्रम-नाश ।।
उपजे राम–चरणिं विश्वास हि । नर तरतिल भव विना प्रयास हि ।।

**दो०—असे प्रश्न करि विहगपति काकाप्रति जाऊन ।।**
**सांगू सादर सब उमे ऐक चित्त लाऊन ।।५५।।**

## अध्याय ७ था

मी जशि कथा श्रुता भवमोचनि । तो प्रसंग वदुं सुमुखि सुलोचनि ।।
तुम्हि अवतरलां प्रथम दक्षघरिं । सती नाम तुमचें तेव्हां, परि ।।
होइ दक्षमखिं तव अवमान । क्रोधें तुम्हि तैं त्यजिले प्राण ।।
मम अनुचर करती मखभंगा । त्या सब जाणां तुम्हीं प्रसंगा ।।
तैं अतिशोक होइ मनिं माझ्या । प्रिये ! दुःखि बहु विरहें तूझ्या ।।
सुंदर गिरि वन सरित तडागां । बघत फिरें कौतुक विण रागा ।।
गिरि सुमेरु, उत्तर दिशिं दूरीं । एक नील गिरि सुंदर भूरी ।।
शिखरें उज्वल कनकमय तया । चार चारु रुचलीं मम हृदया ।।
प्रत्येकीं तरु एक विशाल हि । वट पिंपळ पिंपरी रसाल हि ।।
शैलावर सर सुंदर शोभे । मणि-सोपान बघुन मन लोभे ।।

**दो०-शीतल अमल मधुर जल जलज विपुल बहुरंग ।।**
**कूजति कलरव हंस गण गुंजति मंजुल भृंग ।।५६।।**

शैलिं रुचिर त्या विहग वसे तो । त्यास नास कल्पांतिं नसे तों ।।
मायाकृत गुणदोष अनेक हि । मोह मनोज आदि अविवेकहि ।।
व्यापुनि अवघ्या जगा राहती । त्या गिरि सन्निध कधि न फिरकती
तिथें वसुनि हरि भजतो काक । कसा उमे ! अनुरागें ऐक ।।
पिप्पलतलिं तो ध्याना धरतो । जपयज्ञा पिंपरितलिं करतो ।।
करि रसालतलिं मानसपूजा । भजनविना व्यवसाय न दूजा ।।
वटतळिं करि हरिकथा मनोरम । श्रवणा येति अनेक विहंगम ।।

रामचरित विचित्र विध नाना । प्रेमानें करि सादर गाना ।।
सकल विमलमति मराल ऐकति । जे त्या सरांत संतत निवसति ।।
जैं मी जाउन कौतुक पाही । तैं आनंद विशेष मनाही ।।

**दो०-काँहि काळ मी हंसतनु धरुनि तत्र कृत वास ।।**
**सादर ऐकुनि रामगुण आलो कैलासास ।। ५७ ।।**

कथित सकल इतिहासा पार्वति । कसा कदा मी गत काका प्रति ।।
अतां कथा ती श्रणु तो हेतू । काकनिकट गत खगकुल केतू ।।
जैं कृत रणि रघुनाथें क्रीडा । स्मरत चरित मज वाटे व्रीडा ।।
स्वयें इंद्रजित-पाशीं पडती । तैं नारद गरुडास धाडती ।।
गत बंधन भंगुनि भुजगाद । उपजे हृदीं प्रचंड विषाद ।।
स्मरतां प्रभुबंधन उरगारी । नानापरि करि विचार भारी ।।
व्यापी ब्रह्म विरज वागीश्वर । माया-मोह-पार परमेश्वर ।।
श्रुत मी तो जगिं अवतरलाहि । तो प्रभाव दिसला ना काहीं ।।

**दो०-भवबंधातुनि सुटति नर जपुनी यन्नामास ।।**
**क्षुद्र निशाचर बद्ध करि नागपाशि रामास ।।५८।।**

विविध विधा समजावि मनासी । ज्ञान नव्हे भ्रम हृदया ग्रासी ।।
खेद खिन्न मनि तर्क वाढवी । झाला वश मोहा तुम्हि जेवीं ।।
व्याकुळ गेला सुरर्षि पासीं । वदे सकल जे किंतु मनासी ।।
श्रवुनि नारदा येइ अति दया । खगा ! प्रबल रामाची माया ।।
जी ज्ञानी चित्ता अपहरते । बलात्कारि मनि विमोह करते ।।

जी नाचवि वहु वेळां मजला । व्यापी तीच विहगपति ! तुजला ।।
महामोह मनि तुझ्या उपजला । जाइ न शीघ्र वचें मम हरला ।।
जा चतुरानन–निकट खगेशा । तेंच करा ज्या देति निदेशा ।।

**दो०–असें वदुनि गत देवऋषि करित रामगुण–गान ।।**
**हरिमायाबल वर्णित घडि घडि परम सुजाण ।।५९।।**

खगपति विरंचिपाशीं गेला । निज संदेह निवेदन केला ।।
तैं विरंचि रामा शिर नमती । प्रभुता स्मरता प्रेमा भरती ।।
विचारास विधि करिति मनीं या । ज्ञानी कवि कोविद वश माया ।।
हरिमाया–प्रभाव–मिति नाहीं । ती नाचवि बहुवार मला ही ।।
अग-जग मय जग मीच निर्मिलें । नहि विस्मय खगराज मोहिले ।।
मग वदले विधि रुचिर खगेशा! । विदित राम महिमा किं महेशा ।
वैनतेय जा निकट शंकरा । तात ! न पुसणें कोठें इतरा ।।
ोइ तिथें तव संशय–हानी । निघे विहग ऐकत विधि-वाणी ।।

**दो०–मग परमातुर विहगपति आला जैं मजपाशि ।।**
**होतो जात कुबेरगृहि उमे ! तुम्हीं कैलासि ।।६०।।**

मम पदि सादर नमुनि शिरासी । तो सांगे निज संदेहासी ।।
त्याची श्रवुनि विनति मृदु वाणी । प्रेमें मी वदलो किं भवानी ! ।।
गरुडा ! मार्गी भेटसि मजला । अतां कसें समजावूं तुजला ।।
तदा सकल संदेहां भंग । जैं बहुकाळ करिति सत्संग ।।
तिथें रुचिर हरिकथा ऐकणें । ज्या वर्णित बहुपरीं मुनिगणें ।।

आदि-मध्य-अवसानिं जयांतहि । प्रभू राम भगवान् प्रतिपाद्यहि ॥
नित्य हरिकथा होते जेथें । करा श्रवण जा धाडूं तेथें ॥
श्रवणें जाति सकल संदेह । रामचरणिं अति उपजे स्नेह ॥

**दो०–विण सत्संगन हरिकथा त्याविण मोह न जात ॥**
**मोह नाशविण रामपदिं दृढ अनुराग न तात ॥६१॥**

रघुपतिलाभ न विण अनुरागा । ज्ञान योग तप करुनि, विरागां ॥
उत्तरेस गिरि नील मनोहर । काकभुशुंडि सुशील वसे वर ॥
रामभक्ति पथिं परम प्रविण । ज्ञानि गुणगृह बहुकालीन ॥
रामकथा तो गाई निरंतर । ऐकति सादर विविध विहगवर ॥
ऐक तिथें जा हरिगुण भूरी । होतिल मोहज दुःखे दूरीं ॥
मी त्या कथित सकल समजाउनि । हर्षित निघे पदीं शिर नमवुनि ॥
मी न उमे ! त्याला उपदिशलें । रघुपति-कृपें मर्म मज कळलें ॥
कधि असेल अभिमान किं झाला । उपटूं बघति कृपाब्धी त्याला ॥
आणिक मी न ठेविला त्यासी । जाणतात खग खग–भाषेसी ॥
प्रभु-माया बलवंत भवानी । मोहि न ज्यास कवण कीं ज्ञानी ॥

**दो०–ज्ञानी–भक्तशिरोमणि त्रिभुवनपतिचें यान ॥**
**त्यास मोहि माया, नर पामर करिति गुमान ॥६२ रा॥**

**मास पारायण, अठ्ठाविसावा विश्राम.**

❖ ❖ ❖

# अध्याय ८ वा

**दो०–शिव–विरंचिनां मोहते कोण बापुडा आन ।।**
**हें हृदिं जाणुनि भजति मुनि मायापति भगवान ।।६२म।।**

जाइ गरुड जिथं वास भुसुंडा । मति अकुंठ हरिभक्ति अखंडा ।।
मन गिरि दिसतां प्रसन्न झालें । माया मोह शोक सब पळले ।।
करुनि तडागीं मज्जन–पाना । वटतळिं गेला हर्ष बहु मना ।।
वृद्ध वृद्ध जमले हि विहंगम । श्रवणा राम चरित्रहि उत्तम ।।
कथारंभ तो करुं पाहे जैं । गेला विहंगपति तेथें तैं ।।
येतां बघुनि सकल खगराजा । हर्षे वायस सहित समाजा ।।
अति आदर खगपतिचा करुनी । शुभासना दे स्वागत पुसुनी ।।
अनुरागें खगराज पूजला । मधुर वचन मग वदे कावळा ।।

**दो०–झालो नाथ कृतार्थ मी तव दर्शनि खगराज ! ।।**
**आज्ञा द्या तें करुं अतां कां येणें प्रभु ! आज ।।६३रा।।**
**तुम्हि कृतार्थरूपचि सदा मृदु वदला विहगेश ।।**
**ज्याची स्तुति अति आदरें स्वमुखें करिति महेश ।।६३म**

तात ऐकणें आलों ज्यास्तव । तें झालें, घडलें दर्शन तव ।।
बघुनि परम पावन तव आश्रम । विगत मोह संशय नाना भ्रम ।।
आतां रामकथा अति पावन । सदा सुखद दु:खाद्रि–विनाशन ।।
तात ! ऐकवा सादर मजला । पुन: पुन्हां प्रभु ! विनंति तुजला ।।
ऐकत गरुड–गिरा सुविनीता । प्रेमळ सरळ सुखद सुपुनीता ।।

परत्मोसाह तया मनि भरला । रघुपति गुणगण सांगु लागला ॥
अति अनुरागें प्रथम भवानी । राम-चरित-सर सुंदर वानी ॥
मग नारद-मोहास अपारा । वदे पुढें रावण-अवतारा ॥
प्रभु-अवतार-कथा मग सांगे- । मग शिशुलीला अति अनुरागें ॥

**दो०-वदे बाल चरिता विविध मनीं परम उत्साह ॥**
**ऋषि-आगमना वदे मग श्री रघुवीर-विवाह ॥६४॥**

वदे राम - अभिषेक - प्रसंगा । मग नृप वचन राज्य-रस-भंगा ॥
पुरवासीजन - विरह - विषादा । वदे राम-लक्ष्मण-संवादा ॥
विपिन-गमन, नाविक-अनुरागा । पार सुरनदी वास प्रयागा, ॥
प्रभु-वाल्मीकी-मिलन वर्णिलें- । चित्रकूटिं भगवंत राहिले ॥
सचिवागमन नगरिं नृपमरणा । भरतागमना प्रेम-वर्णना- ॥
करुनि भूपती-क्रिया, सपरिजन । गेले भरत जिथें प्रभु सुखघन ॥
कृत रघुपतिनीं बहुविध सांत्वन । सहित पादुका नगरिं निवर्तन ॥
भरत-राहणी, सुरपतिसुत-कृति । प्रभु-मुनि अत्रि-भेट मग वर्णिति ॥

**दो०-मग विराधवध ज्यापरीं तनू त्यजी शरभंग ॥**
**प्रीति सुतीक्ष्णाची कथित प्रभु-अगस्ति सत्संग ॥६५॥**

मग दण्डकवन करणें पावन । नंतर जटायु-मैत्री वर्णन ॥
प्रभु मग पंचवटी मधिं वसले । मुनि निकाय भय सकल निरसलें॥
मग अनुपम उपदेश लक्ष्मणा । शूर्पणखा-श्रुति-नाक-खंडणा ॥
त्रिशिरा खर दूषण-वध कथिला । मर्म जसें दशकंठ समजला ॥

दशमुख–मारीचां संभाषण । कसें जाहलें केलें वर्णन ।।
मग माया–सीतेच्या हरणा । रघुवीराचे विरह वर्णना ।।
क्रिया करिति गृध्राची रघुपति । वधुनि कवंध दिली शवरिस गति।।
पुन्हां विरह वर्णित रघुवीरा । येणें जसें सरोवर-तीरा ।।

**दो०–प्रभु–नारद संवाद मग मारुति–मिलन सुयोग ।।**
**मैत्री सुग्रीवाशि मग वाली-प्राण-वियोग ।।६९ रा ।।**
**राज्य सुकंठा, प्रभुकृत गिरींप्रवर्षण वास ।।**
**वर्णन वर्षाशरद मग प्रभुरुष कीशभयास ।।६६ म ।।**

पाठवि केवीं कपीश कीशां । सीता शोधा जाति सव दिशां ।।
कसे कपी ते विवरीं जाती । मग कपीस भेटे संपाती ।।
ऐकुनि कथा समीर–कुमार । उल्लंघीहि पयोधि अपार ।।
लंका प्रवेश कपिनें केला । कसा धीर दिधला सीतेला ।।
वन भंगुनि रावणा प्रबोधी । पुर जाळुनि लंधिला पयोधी ।।
रघुपतिपाशि सकल कपि आले । वैदेही–कुशलाला वदले ।।
कटकासहित यथा रघुवीरा । घडे आगमन जलनिधि–तीरा ।।
येउनि भेटें कसा विभीषण । केले सागर–निग्रह–वर्णन ।।

**दो०–सेतु बांधुनी कपि चमू जाई सागर–पार ।।**
**जाइ दूत मग वीरवर जैसा वालिकुमार ।।६७ रा ।।**
**निशिचर कीश लढाई वर्णी बहू प्रकार ।।**
**कुंभकर्ण घननाद बल पौरुष कृत संहार ।।६७ म ।।**

नाना निशिचर–निकाय–मरणा । रघुपति–रावण–समर–वर्णना ॥
रावणवध मंदोदरि शोक । भूप विभीषण, देव अशोक ॥
सीता–रघुपति–मीलन, नंतर । जोडुनि कर करती स्तुति निर्जर ॥
बसुनि पुष्पकीं कपी सभेत । निघति अयोध्ये कृपा निकेत ॥
जसे राम निज नगरीं आले । वायस विशद चरित सब वदले ॥
वदले पुढें राम अभिषेका । पुर वर्णित नृपनीति अनेका ॥
कथा समस्त भुशुंडी वानी । जी मी वदलो तुम्हां भवानी ॥
ऐकुनि रामकथा खगनाहो । वदला मनीं परम उत्साहो ॥

**सो०–गेला मम संदेह श्रुत सगळें रघुपति चरित ॥**
**रामपदाब्जीं स्नेह तवचि कृपें वायस–तिलक ॥६८ रा ॥**
**झाला मज अति मोह प्रभुबंधन समरीं बघुन ॥**
**चिदानंद संदोह राम विकल कारण कवण ।·६८ म ॥**

बघुनि चरित अति नर-अनुसारी । आले हृदिं मम संशय भारी ॥
अतां गमे तो भ्रम मज हितकर । करिती अनुग्रहास कृपाकर ॥
अति आतपिं जो व्याकुळ झाला । तरु छाया सुख कळतें त्याला ॥
जर ना होता मोहच मजला । तात ! भेटतो कैसा तुजला ॥
सुंदर कशि परिसतो हरिकथा । अति विचित्र बहुपरिं तुम्हि कथिता ॥
निगमागम–पुराणमत हें हो ! । वदति सिद्ध मुनि नहिं संदेहो ॥
भेटति संत विशुद्ध तयाला । रामकृपें अवलोकिति ज्याला ॥
रामकृपें तव दर्शन घडलें । अनुग्रहें तव संशय उडले ॥

दो०-श्रवुनि विहगपति-वाणी सहित विनय अनुराग ॥
पुलक गात्रि लोचन सजल मनिं हर्षित अति काग ॥६९रा॥
श्रोता सुमति सुशील शुचि कथा रसिक हरिदास ॥
मिळतां प्रगटति गोप्यही सज्जन उमे ! तयास ॥६९ म॥

❖ ❖ ❖

## अध्याय ९ वा

पुन्हां भुशुंडी वदला सादर । प्रीति न थोडी खगनाथावर ॥
नाथ ! तुम्हीं मज पूज्य सर्वपरि । श्रीरघुनायक-कृपापात्र वरि ॥
तुम्हां न संशय माया मोह न । दया मजवरी केली आपण ॥
मोह-मिषें प्रभु तुजला धाडति । मजला महती देती रघुपति ॥
तुम्हि निज मोहा वदलां खगपति । कांहि नसे आश्चर्य यांत अति ॥
नारद भव विरंचि सनकादिक । आत्मवादि जे ही मुनिनायक ॥
मोहें अंध न कृत कोणाला । कोण, न नाचवि काम जयाला ॥
तृष्णा वेड न लावि कुणाला । क्रोध न दाहि कुणा हृदयाला ॥
दो०-ज्ञानी तापस शूर कवि कोविद गुण-आगार ॥
लोभ कुणाचें विटंबन न करी जगि या फार ॥७०रा॥
श्रीमद वक्र न कुणा करि प्रभुताबधिर न कोण ॥
कोण असा कि मृगाक्षिचे विद्ध न शर लागोन ॥७०म॥
कुणा न गुण सन्निपात झाला । कोण न मानमदें जो पिडला ॥
कोणा ज्वर यौवन ना भ्रमवी । ममता यश न कुणाचें बुडवी ॥

मत्सर कुणा कलंक न लावी । शोक–समीर न कुणा हालवी ॥
चिंता सापिण कुणा न खाते । जगिं माया व्यापि न कोणातें ॥
कीट मनोरथ दारु शरीर । लागे घुण न कोण तो धीर ॥
पुत्र–लोक–धन तीन एपणा । करिति मलिन ना मतीस कवणा ॥
हा माया परिवारचि सगळा । प्रबल, मिति न कुणि वर्णूं शकला ॥
शिव चतुरानन डरती जीतें । काय इतर जीवां गणती ते ? ॥

**दो०–विश्वा राही व्यापुनी माया कटक प्रचंड ॥**
**सेनापति कामादि, भट दंभ कपट पाखंड । ७१२॥**
**रघुवीराची दासि ती जरि मिथ्या ज्ञानास ॥**
**रामकृपेविण ना सुटे प्रभु ! वदुं करुनि पणास ॥७१म॥**

जी माया नाचवि जगतालां । जिचें चरित्र न कळे कुणाला ॥
प्रभु–भुवईनें ती खगराजा । नटिसम नाचे सहित समाजा ॥
तो सच्चिदानंदघन रामहि । अज विज्ञानरूप बल–धाम हि ॥
व्यापी व्याप्य अखंड अनंत हि । अखिल अमोघ शक्ति भगवंत हि ॥
अगुण अदभ्र गिरा–गोतीत हि । सर्वदर्शि अनवद्य अजीत हि ॥
निर्मम निराकार निर्मोहि । नित्य निरंजन सुख–संदोह ॥
प्रभू–प्रकृतिपर सब–उरवासी । ब्रह्म निरीह विरज अविनाशी ॥
येथें मोहा कारण नाहीं । रवि–सम्मुख तम जाइ कदा ही ॥

**दो०–भक्तांस्तव भगवान् प्रभु रामें धृत तनु भूप ॥**
**पावन परम चरित्र कृत प्राकृत नरानुरूप ॥७२रा॥**

**दो०-धरुनि विविध वेषां जसा नट कोणी करि नाच ॥**
**त्या त्या भावा दाखवी होइ तसा ना साच ॥७२ म ॥**

अशि रघुपति-लीला उरगारी ! । दनुज विमोहक जन-सुखकारी ॥
जे मति-मलिन विषयवश कामी । प्रभुवर लादिति मोहा स्वामी ! ॥
नयनदोष जैं ज्याला होतो । पीतवर्ण शशि तोच कि म्हणतो ॥
ज्या जैं दिग्भ्रम होई खगेश्वर । म्हणे पश्चिमे उदित दिनेश्वर ॥
नौकारूढ पळत जग पाहे । मोहें मानि अचल मी आहे ॥
भ्रमति बाल ना भ्रमति गृहादी । वदति परस्पर मिथ्या-वादी ॥
असा मोह हरिविषयिं विहंग ! । अज्ञाना स्वप्निं ना प्रसंग ॥
मायावश मतिमंद अभागे । हृदयिं जवनिका बहुविध लागे ॥
ते शठ हठवश संशय धरती । रामीं निज अज्ञान लादती ॥

**दो०-काम-कोप-मद-लोभ-रत गृहासक्त दुखरूप ॥**
**ते कीं जाणति रघुपतिस मूढ पतित तम कूप ॥७३ रा ॥**
**निर्गुण रूप सुलभ अति सगुण न जाणे कोणि ॥**
**सुगम अगम चरितां श्रवुनि जाती मुनिहि भुलोनि ॥७३ म ॥**

श्रुणु खगेश ! रघुपतिची प्रभुता । कथा यथामति रुचिर वदुं अतां ॥
झाला मोह कसा प्रभु मजला । कथा सकल ती वदतो तुजला ॥
रामकृपाभाजन तुम्हि ताता ! । प्रीति हरिगुणीं मज सुखदाता ॥
म्हणुनि तुम्हांसि न कांहि लपवतो । परम रहस्य मनोहर वदतो ॥
पहा स्वभाव सहज रामाचा । नुरविति कधि अभिमान जनाचा ॥

नाना शूलद संसृति–मूलहि । सकल शोकदायक अभिमान हि ॥
यास्तव करिति कृपानिधि दूरी । दासांवर ममता अति भूरी ॥
स्वामी ! शिशु–देहीं व्रण होतां । कापवि कठिण वनूनी माता ॥

**दो०–प्रथम दुःख जरि पावतें बालक रडे अधीर ॥**
**रोग विनाशा दुःख तें न गणी जननी धीर ॥ ७४रा ॥**
**रघुपति निज सेवक–हिता तसा हरिति अभिमान ॥**
**भ्रमा त्यजुनि तुलसी अशा प्रभुला भजसी कां न? ॥७४म॥**

रामकृपा वर्णूं निज जडता । ऐका खगेश लावुनि चित्ता ॥
जैं जैं राम मनुज तनु धरती । भक्तांस्तव बहु लीला करती ॥
अयोध्येंत मी तैं तैं जातो । बाल चरित्रा बघुनि हर्षतो ॥
जन्म महोत्सव जाउनि बघतो । वर्षे पांच लुब्ध मी वसतो ॥
इष्टदेव मम बालक राम । वपु–शोभा कोटी-शत काम ॥
बघ बघुनी निज प्रभूचें आनन । करुं उरगारी सुफल विलोचन ॥
लघु–वायस–वपुधर, हरि–संगीं । बघतो बालचरित बहुरंगी ॥

**दो०–बालपणीं जेथें फिरति तेथें सवें उडून ॥**
**अंगणि उष्टें जें पडे तें खातों उचलून ॥ ७५ रा ॥**
**एकवार अतिशय सब चरित करिति रघुवीर ॥**
**ती प्रभुलीला स्मरतही पुलके काक-शरीर ॥ ७५म ॥**

म्हणे काक ऐका खगनायक । रामचरित सेवक–सुखदायक ॥
नृप मंदिर सुंदर सब रीतीं । खचित कनकमणि नाना जाती ॥

वर्णवे न तें सुंदर आंगण । खेळति नित्य जिथें चौघेजण ।।
वाल विनोद करत रघुनायक । विचरति अजिरिं जननि सुखदायक
मृदुल कलेवर मरकत-शाम । अंगीं अंगीं छवि वहु काम ।।
नव राजीव अरुण मृदुचरण हि । पदज रुचिर, नरव शशिभा-हरणहि
ललित अंक कुलिशादिक चारी । नूपूर चारु मधुर रवकारी ।।
चारु कनक-मणि-विरचित सुंदर । कटि किंकिणि कल, मुखर मनोहर

**दो०-रेखा त्रय सुंदर उदरिं नाभि रुचिर गंभीर ।।**
**आयत उर राजति विविध बाल विभूषण चीर ।।७६।**

अरुण पाणि, नख, करज, मनोहर । वाहु विशाल विभूषण सुंदर ।।
स्कंध वालहरि, कंवूग्रीवा । चारु चिबुक आनन छविशीवा ।।
बोल वोवडे अरुण वराधर । बारिक युग युग दशन विशद वर।।
ललित गाल नासिका मनोहर । हास्य सकल सौख्यद सम शशिकर
नीलकंज लोचन भव मोचन । भ्राजत भालिं तिलक गोरोचन ।।
भृकुटि विकट, सम सुंदर कान हि । कुंचित कच मेचक छवि छान हि ।।
अंगि तलम रुचि पिवळें झवलें । दृष्टि, खिदळणें प्रिय मज गमले ।।
रुपराशि विहरती नृपांगणि । नाचति निज पडछाये पाहुनि ।।
करिति विविध विध मजसी क्रीडा । वर्णित मज अति वाटे व्रीडा ।।
खिदळत जैं मज धरण्या धावति । मी पळतां मज अपूप दावति ।।

**दो०-प्रभु हसती येतां निकट जात उडुन रडतात ।।**
**पद धरुं जातां निकट मी वळुनि बघत पळतात ।।७७रा।।**

**दो०–प्राकृत शिशु इव लीला बघुनि होइ मज मोह ।।**
**कवण चरित करिती प्रभु चिदानंद–संदोह ।। ७७म ।।**

इतके मनि आणत खगराया । प्रेरित रघुपति लागे माया ।।
ती माया न दुखद मज कांहीं । आन जीव इव संसृति नाहीं ।।
नाथ ! इथें कारण तें भिन्न । ऐका सावधान हरियान ।।
ज्ञान अखंड एक सीतावर । मायाविवश जीव सचराचर ।।
ज्ञान एकरस सर्वांचें जर । ईश्वर–जीवां भेद कुठें तर ।।
मायविवश जीव अभिमानी । ईशविवश माया गुणखाणी ।।
भगवान् स्ववश, जीव परवश ते । श्रीपति एकचि जीवं अमित ते ।।
मुधा भेद यद्यपि कृत माया । विण हरि जाइ न कोटि उपायां ।।

**दो०–रामचंद्र-भजनाविण इच्छी पद निर्वाण ।।**
**ज्ञानवंत अपि तो नर पशु विण पुच्छ विषाण ।।७८रा ।।**
**उगवति सोळा पूर्ण शशि तारागण–समुदाय ।।**
**सकल गिरिस दव लाविला रविविण रात्र न जाय ।।७८म ।।**

हरिभजनाविण तसा खगेशा । नाश नव्हें जीवांचे क्लेशां ।।
व्यापि न हरिसेवका अविद्या । व्यापी प्रभुनीं प्रेरित विद्या ।।
म्हणुनि न होतो दास नाश तर । भेदभक्ति वाढे विहंगवर ।।
राम मला भ्रमचकित पाहतां । विहसति त्या श्रुणु विशेष चरिता ।।
त्या लीलेचे मर्म न कोणी । जाणति अनुज न पिता न जननी ।।
मज धरण्या प्रभु रांगत धावति । श्यामल गात्र अरुण कर पद अति ।।

तंव मी पळत निघे उरगारी । धरण्या प्रभु पसरति भुज भारी ॥
मी जसजसा उडें आकाशीं । दिसति तिथें भुज हरि मजपाशीं ॥

**दो०–गेलो विधिलोकावधि उडत वळुनि बघुं तात ॥**
**तों दो अंगुल अंतर भुजामधें माझ्यांत ॥ ७९ रा ॥**
**सप्तावरणां भेदुनी जोंवरि गति मजलाहि ॥**
**जाइं तिथें प्रभु भुज बघुनि व्याकुळता चित्ताहि ॥७९म॥**

मिटले नयन यदा मी भ्यालों । बघतो तों कोसलपुरिं आलों ॥
हसले राम यदा मी दिसलो । हसतांक्षणिं मीं मुखीं प्रविशलो ॥
उदरांतच बघ अंडजराया । बहु पाहूं ब्रह्मांडनिकायां ॥
तत्र चित्र अति लोकांनेकां – । रचना एकाहुनि अति एकां ॥
कोटी चतुरानन गौरीश । अगणित उडुगण रवि रजनीश ॥
अगणित लोकपाल यम काल । अगणित भूधर भूमि विशाल ॥
सागर सरि सर विपिन अपार । नाना विधा सृष्टिविस्तार ॥
सुर मुनि सिद्ध नाग नर किंनर । चार तऱ्हांचे जीव चराचर ॥

**दो०–जें न दृष्ट वा नसे श्रुत जें कधि ये न मनांत ॥**
**तें सब अद्भुत पाहिलें कसें वर्णिलें जात ॥ ८०रा ॥**
**एकेका ब्रह्मांडि मी राहिं वर्ष शत एक ॥**
**फिरलो यापरिं बघत मी अंड-कटाह अनेक ॥८०म॥**

❖ ❖ ❖

# अध्याय १० वा

लोकीं लोकीं भिन्न विधाते। भिन्न विष्णु शिव मनु दिक्त्राते ।।
गंधर्वहि वेताळ भूत नर। व्याळ निशाचर पशु खग किंनर ।।
देवदनुजगण जाती नाना। जीवां सकलां आनहि वाणा ।।
महि सरि सागर सर गिरि नाना। तिथें प्रपंच सकल आनाना ।।
सर्वहि अंडकांपि निज रूप-। पाहें; अनुपम वस्तू अमूप ।।
भिन्न भुवनिं भुवनीं कोसलपुर। शरयू भिन्न भिन्न नारी नर ।।
श्रुणु, दशरथ कौसल्या माता। विविध रूप भरतादिक ताता ! ।।
प्रति ब्रह्मांडिं राम अवतारा। बालविनोदां बघें अपारां ।।

**दो०-भिन्न भिन्न सब पाहिलें अति विचित्र हरियान ।।**
**फिरत अमित भुवनीं प्रभु राम न दिसले आन ।। ८१रा ।।**
**तें शिशुपण ती शोभा ते कृपालु रघुवीर ।।**
**भुवनिं भुवनिं फिरलो बघत प्रेरित मोह समीर ।।८१म ।।**

मी भ्रमतां ब्रह्मांडिं अनेक। गेले जणूं कल्प शत एक ।।
आलो फिरत निजाश्रम जेथें। कांहि काळ राहिलोहि तेथें ।।
निज प्रभु जन्म अयोध्यें, कळला। धावत निघें प्रेम-मुद-भरला ।।
जाउनि जन्म महोत्सव पाहें। जसा प्रथम मी कथिला आहे ।।
दिसलीं रामउदरिं जग नाना। बघणें शक्य, न वर्णन जाणा ।।
तिथें पुन्हां बघुं राम सुजाणा। मायापति कृपाल भगवाना ।।
घडि घडि केला विचार मी अति। व्यापित मोहमळें माझी मति ।।

दोन घडींत मला सब दिसलें। मम मन मोहविशेषें श्रमलें ॥

**दो०–व्याकुळ बघति कृपाल मज विहसति तैं रघुवीर ॥**
**हसतां क्षणि मी मुखांतुनि येइं निघुनि मतिधीर, ॥८२ रा ॥**
**ती शिशुलीला मजसवें करुं लागति मग राम ॥**
**बहुतपरीं समजावितां मना नव्हे विश्राम ॥ ८२ म ॥**

बघुनि चरित हें, ती प्रभुता ही। स्मरतां, देह–दशा ना राही ॥
पडलो महि मुखि वदवत नाहीं। त्राहि! आर्तजनपाला! त्राही! ॥
प्रेमाकुल बघुनी प्रभु मजला। आवरिती निज माया प्रबला ॥
प्रभु मम शिरि करसरोज ठेविति। दीन दयाल दुःख सव वारिति ॥
करिति राम मज विगतविमोह। सेवक सुखद कृपा-संदोह ॥
प्रभुता प्रथम विचारुनि सारी। मम मनि होई हर्ष अति भारी ॥
प्रभुची बघुनि भक्तवत्सलता। प्रीति अधिक उपजे मम चित्ता ॥
सजल नयने पुलकित कर जुळले। प्रभुला नानापरीं विनवलें ॥

**दो०–श्रवुनी प्रेमळ वाणी बघुनि दीन निज दास ॥**
**वचन सुखद गंभीर मृदु वदले रमानिवास ॥८३ रा ॥**
**काकभुशुंडी माग वर मी प्रसन्न अति जाण ॥**
**अष्टसिद्धि ऋद्धी सकल मोक्ष सकल-सुखखाण ॥ ८३म ॥**

ज्ञान विवेक विरति विज्ञाना। मुनि-दुर्लभ गुण जे जगि नाना ॥
आज देउं सब संशय नाहीं। माग रुचेल मना जें कांहीं ॥
प्रभु–वचने प्रेमें अति भरलो। मनि अनुमाना करूं लागलो ॥

वदले प्रभु 'घे सब सुख' जरी । 'घे मम भक्ति' न वदले तरी ॥
भक्तिहीन गुण सब सुख तैंसें । विना लवण शाकादिक जैसें ॥
भजनहीन सुख कवणे काजा । असं चिंतुनि वदलो खगराजा ! ॥
प्रभु ! जर होउनि प्रसन्न द्या वर । मजवर करतां कृपा स्नेह जर ॥
वर मागतो रुचे तो स्वामी ! । तुम्हि उदार हृदयांतर्यामी ॥

**दो०–अविरल भक्ति विशुद्ध तव जी श्रुति पुराण गाति ॥**
**शोधिति मुनि योगीश, कुणा प्रभू-प्रसादें प्राप्ति ॥८४ रा॥**

**भक्त–कल्पतरु ! प्रणतहित ! कृपासिंधु ! सुखधाम ॥**
**तीच भक्ति निज मला प्रभु ! करुनि दया द्या राम ॥८४म॥**

एवमस्तु म्हणुनी रघुनायक । वदले वचन परम सुखदायक ॥
श्रुणु वायस तूं सहज शहाणा । मागसि कां न अशा वरदाना ॥
याचित भक्ति सकल सुखदानी । महाभाग तुजसम नहिं कोणी ॥
जी मुनि यत्नें कोटि न पावति । जे जप योगानलिं तनु जाळति ॥
मी प्रसन्न तव बघुनि चतुरता—। प्रिय अति मजला, भक्ति याचिता॥
श्रुणु विहंग मम अनुग्रह–बळें । तव हृदि वसतिल शुभ गुण सगळे ॥
ज्ञान भक्ति विज्ञान विरागा । योग–चरित्र रहस्य–विभागां ॥
जाणसि तूं सकलांचे भेदहि । कृपें मदीय, न साधन–खेदहि ॥

**दो०–भ्रम माया–संभूत मुळि व्यापिति अतां तुला न ॥**
**ब्रह्म अनादी अगुण अज मला गुणाकर जाण ॥८५रा॥**

**भक्त मला प्रिय संतत श्रुणु सावध हे काग !॥**
**मनकृतिवचनें मम पदीं कर अविचल अनुराग ॥८५ म॥**

श्रुणु मम बाणा अतां विमल अति । सत्य सुगम निगमागम वानति ॥
निज सिद्धान्त सांगतो तुजला । श्रुणु, मनि धर, सब तज भज मजला॥
मम माया–संभव संसारीं । जीव चराचर किती प्रकारीं ॥
प्रिय मज सगळे भ्यां उपजविले । प्रिय इतरांहुनि नर मज गमले ॥
त्यांत विप्र विप्रीं श्रुतिधारी । त्यांतहि वेद–धर्म अनुसारी ॥
त्यांत विरागी विरतीं ज्ञानी । ज्ञान्यांहुनि सुप्रिय विज्ञानी ॥
प्रिय अति त्यांहुनि मानूं दासा । ज्या गति ममहि, न दुसरी आशा ।
सत्य सत्य मी कथितो तुजला । प्रिय सेवक सम कोणि न मजला ॥
भक्तिहीन् जरि विरिंचि असला । तो प्रिय सब जीवां सम मजला ॥
जीव भक्तिमान नीच जरि महा । प्राणप्रिय मज बाणा मम हा ॥

**दो०–शुचि सुशील सेवक सुमति कोणा प्रिय ना सांग ॥**
**नीति कथित निगमागमीं श्रुणु सावध अशि काग ॥८६॥**

एक पित्याचे विपुल कुमार । होति पृथक गुण–शीलाचार ॥
पंडित कुणि तापस वा ज्ञाता । कोणि शूर धनवान् कुणि दाता ॥
कुणि सर्वज्ञ धर्मरत कांहीं । प्रीति पित्याची सम सर्वां ही ॥
कुणि पितृभक्त वचनमनकर्मीं । स्वप्निंहि नेणे दुसऱ्या धर्मा ॥
प्रिय तो सुत बापा प्राणांपरि । मूर्ख सर्वपरि तो असला जरि ॥
तसे जीव जितके हि चराचर । तिर्यक् सुर नर सहित निशाचर ॥

अखिल विश्व हें मत्कृत जाणा । सर्वांवर मम दया समाना ।।
त्यांमधि जो सोडुनि मद माया । भजे मला मन वाणी कायां ।।

**दो०–पुरुष नपुंसक नारि वा अग जग थोर कि सान ।।**
**सर्वभावि भजतो छल न, तो प्रिय अति मज जाण ।।८७रा।।**

**सो०–सत्य सागुं शुचि दास प्रिय खग! मजला प्राण सम ।।**
**त्यजुनि भरवंसा आस हें जाणुनि कर भजन मम ।। ८७ म।।**

काळ कधीं व्यापी ना तुजला । स्मरण निरंतर कर भज मजला ।।
प्रभु–वचनामृत–पानें तृप्त न । मनिं अति हर्षित रोमांचित तन ।।
तें सुख ठाउक मन–कानानां । वर्णन करूं शके ना रसना ।।
प्रभु–शोभा सुख कळलें नयनां । वदति कसे ते त्यां नहि रसना ।।
बहुविध बोधुनि मज सुख दिधलें । तें शिशुकौतुक करूं लागले ।।
लोचन सजल रुक्ष मुख केलें । बघत्ति मातृमुख फार भुकेले ।।
बघत जननि यें धावत उठुनि । घेइ हृदयिं मृदु वचनां वदुनी ।।
घेइ अंकि देई पायपाना । रघुपति चरित ललित करि गाना ।

**सो०–ज्या सौख्यार्थ पुरारि अशुभ वेष कृत शिव सुखद ।।**
**कोसलपुर-नरनारि त्या सुखिं संतत मग्न अति ।।८८रा।।**
**तेंच सौख्य लवलेश ज्यास सकृत् स्वप्निंनहि मिळत ।।**
**गणतो तो न खगेश ब्रह्मसुखहि सज्जन सुमति ।।८८म।।**

अवधि राहुं मग काहीं काळ । पाहुं बाललीलांस रसाळ ।।
रामकृपें वर भक्ति पावलो । प्रभुपदिं नमुनि निजाश्रमिं आलो ।।

व्यापि न तैंहुनि माया मजला। जैं रघुनायक म्हणति आपला ॥
गुप्त चरित हें सकल गाइलें। हरिमायें मज जसें मोहिलें ॥
निज अनुभव वदुं अतां खगेशा। विण हरिभजन नाश ना क्लेशां ॥
श्रुणु खगराया! रामकृपेविण। रामप्रभुता कळणें शक्य न ॥
न जाणतां परि न ये प्रतीति। विना प्रतीति न उपजे प्रीती ॥
प्रीति विना नहि भक्तिस दृढता। खगनाथा, जशि जलचिक्कणता ॥

**सो०—गुरुविण नोहे ज्ञान, ज्ञान कि होइ विरागविण ॥**
**गाती वेद पुराण सुख कि मिळे हरिभक्तिविण ॥८९रा॥**
**कधि विश्रामा ठाव तात! सहज संतोषविण ॥**
**चले कि जलविण नाव मर मर केले कष्ट तरि ॥८९ म॥**

काम न नाशति संतोषाविण। काम तिथें सुख भासे स्वप्नि न ॥
रामभजनविण काम न मरती। स्थलावीण तरु कधीं उगवती ॥
विज्ञानाविण समता येना। नभावीण अवकाश असेना ॥
श्रद्धेवीण धर्म कधि न घडे। महीवीण कधि गंध सांपडे ॥
तेज तपाविण कधि कीं पडते। रस कि जलाविण जगीं खगपते ॥
वुध-सेवेविण शील कि मिळतें। प्रभू! तेजविण रूप कि दिसतें ॥
स्थिर मन कीं निज सौख्यावीण। स्पर्श कि होइ समीर—विहीन ॥
कवणहि सिद्धि कि विश्वासाविण। भवभयनाश न हरिभजनाविण ॥

**दो०—विश्वासाविण भक्ति ना द्रवति न तीविण राम ॥**
**स्वप्निहि रामकृपेविण जीवा नहि विश्राम ॥ ९० रा ॥**

**सो०–हें जाणुनि मति धीर त्यज़ कुतर्क संशय सकल ॥**
**भज हि राम रघुवीर करुणाकर सुंदर सुखद ॥ ९० म ॥**

वर्णित मी हा नाथ यथामति । प्रभूचा प्रताप–महिमा खगपति ॥
युक्ति विशेषें जरा न कथिला । हा सब निज नयनीं अनुभविला ॥
महिमा नाम रूप गुण गाथा । सकल अमित अनंत रघुनाथा ॥
निज निजमति मुनि हरिगुण गाती । निगम शेष शिव पार न जाती ॥
आपणादि खग बहु मशकान्त । गगनीं उडती पावति नान्त ॥
रघुपति महिमा अगाध तेवीं । ठाव कोण कधि पावे केवीं ॥
राम काम शत कोटि सुभग-तन । दुर्गा कोटि अमित अरिमर्दन ॥
शक्र कोटिशत सदृश विलासहि । नभ शत कोटि अमित अवकाशहि

**दो०–मरुत कोटि शत विपुल बल रवि शत कोटि प्रकाश ॥**
**शशि शत कोटि सुशीतल सब भवभयहर खास ॥९१ रा॥**
**काल कोटि शत सदृश अति दुस्तर दुर्ग दुरन्त ॥**
**धूमकेतु शत कोटि सम दुराधर्ष भगवन्त ॥ ९१ म ॥**

प्रभु अगाध कोटी पाताल । शमन-कोटिशत सदृश कराल ॥
अमित कोटि तीर्था-सम पावन । नाम अखिल-अघपूग-विनाशन ॥
हिमगिरि कोटि अचल रघुवीर । सिंधु कोटि शत सम गंभीर ॥
कामधेनु शत कोटि समान । सकल काम दायक भगवान ॥
अमित कोटि शारदा-चतुरता । विधि शत कोटि सृष्टिनिपुणता ॥
विष्णु कोटि सम पालन कर्ता । रुद्र कोटि शत सम संहर्ता ॥

धनद कोटि शत सम धनवान । माया कोटि प्रपंच-निधान ॥
भारधरण शतकोटि अहीश्वर । प्रभुनिरवधि निरुपम जगदीश्वर ॥
**छं०–निरुपम, न उपमा आन, राम चि राम सम वदती श्रुती**
**सम कोटिशत खद्योत रवि वदतां जशी लघुता अती ॥**
**या रीति निज निज मत्ति विलासें हृरिस मुनिवर वानिति ।**
**प्रभु भाव घेति कृपाल अति प्रेमें श्रवुनि सुख मानिती ॥**
**दो०–राम अमित–गुण–सागर लागे थांग कुणास ॥**
**जसे सत्संगीं समजलें तसें कथित अपणांस ॥९२ रा ॥**
**सो०–भाव-वश्य भगवान सुखनिधान करुणायतन ॥**
**विण ममता मद मान भजा सदा सीतारमण ॥९२ म ॥**
वायस वचना रुचिर ऐकिलें । गरुडे हर्षें पंख फुलविलें ॥
नयनिं नीर मनिं अतिशय हर्षित । श्रीरघुपति प्रताप हृदिं आणित ॥
स्मरूनि पूर्वमोहा पस्तावत । ब्रह्म अनादि मनुज मी समजत ? ॥
घडि घडि काक चरणिं शिर नमवी । प्रभु सम गणुनी प्रेम वाढवी ॥
गुरुविण भवनिधि कोणि न तरती । जरी विरिंचि शंकर सम असती ॥
संशय सर्प तात मज डसला । दुःखद लहरि कुतर्क वाढला ॥
तव रूपें गारुडि रघुनायक । मजला जगविति जनसुखदायक ॥
गेला तुमच्या कृपें मोह मम । रामरहस्य समजलें अनुपम ॥
**दो०–तथा प्रशंसुनि बहुपरीं शिर नमि, जोडी हात ॥**
**वच विनीत सप्रेम मृदु गरुड पुन्हां वदतात ॥९३ रा ॥**

**प्रभु ! अविवेकें माझिया पुसतो स्वामि तुम्हांस ।।**
**सांगा सादर कृपानिधि जाणुनि मज निज दास ।।९३ म**

तुम्हि सर्वज्ञ तज्ञ तमपारहि । सुमति सुशिल सरल आचार हि ।।
ज्ञानविरतिविज्ञान निवासहि । तुम्हि रघुनाथाचे प्रिय दास हि ।।
कारण काय काय हा पावां । तात ! सकल मजला समजावा ।।
स्वामी ! रामचरित-सर नामी । प्राप्त कुठें सांगा नभगामी ।।
श्रुत मी नाथ कि शंभूपासीं । नाश महाप्रलयिं न अपणासी ।।
मुधा वचन नहिं ईश्वर वदती । म्हणुन संशया मम मनि वसती ।।
अग जग जीव नाग नर निर्जर । नाथ! सकल जग काल कवल तर! ।।
अंड कटाह अमित लयकारी । काल सदा दुरतिक्रम भारी ।।

**सो०-व्यापी तुम्हां न काल अति कराल कारण कवण ।।**
**तें मज वदा कृपाल ज्ञानशक्ति कीं योगबल ।। ९४ रा ।**
**दो०-प्रभु ! तव आश्रमि येतां भ्रम मम मोह हि ठार ।।**
**नाथ ! कवण कारण, सकल सांगा प्रेमें फार ।।९४ म ।।**

गरुड-गिरेनें काक हर्षला । उमे! परम अनुरागें वदला ।।
धन्य धन्य तव मति उरगारी ! । तुमचे प्रश्न मला प्रिय भारी ।।
प्रश्नें प्रेमळ रुचिर आपले, । बहु जन्मांचें स्मरण जाहले ।।
कथितो सकल कथा मम आतां । श्रुणु सादर मन लाउन ताता! ।।
व्रत जप तप मख शम दम दान । विरति विवेक योग विज्ञान ।।
सकलां फल रघुपतिपदिं प्रेमहि । त्याविण कोणि न पावे क्षेमहि ।।

रामभक्ति या तनुमधि मिळली । यास्तव मम ममता अति जडली ॥
जिथें स्वार्थ निज काहि साधतो । त्यावर कोणिहि ममता करतो ॥

**सो०–पन्नगारि अशि नीति श्रुति-संमत सज्जन वदति ॥**
**अति नीचींही प्रीति करणें जाणुनि परम हित ॥९५रा॥**

**सो०-देतो रेशिम कीट होति मनोहर वस्त्र मग ॥**
**कृमि पाळिति जन नीट प्राणांसम, जरि अशुचि अति ॥९५म॥**

स्वार्थ साच जगिं हाच जिवाचा । प्रेम रामपदि मनकृतिवाचां ॥
तें पावन तें सुभग शरीर । जें मिळुनी भजवें रघुवीर ॥
रामविमुख तनु विधिसम पावति । कवि-कोविद ना तिला प्रशंसति ॥
रामभक्ति या तनुंत उपजली । स्वामि ! म्हणुन ही प्रिय अति बनली ॥
त्यजीं न तन निजइच्छामरणी । तन विण, वेद भजन ना, वर्णी ॥
प्रथम मोह बहु छळी मलाही । रामविमुख, सुखनिद्रा नाहीं ॥
नाना जन्मि कर्म कृत नाना । योग याग जप तपादि दानां ॥
योनि अशी जगिं नहि एका ही । जिथें खगेश ! भटकलो नाहीं ॥
सर्व कर्म मी करुन पाहिलें । सुख आतांसम कधि न जाहलें ॥
स्मृति मज नाथ बहुत जन्मांची । मोह न मतिला, कृपा शिवाची ॥

**दो०–प्रथमजन्मचरिता अतां ऐका सांगुं खगेश ॥**
**श्रवणें प्रभुपदिं होइ रति तेणें टळती क्लेश ॥९६रा॥**
**पूर्वकल्पि एका प्रभो ! युग कलियुग मलमूल ॥**
**नर नारीहि अधर्मरत सब निगमां प्रतिकूल ॥९६म॥**

त्या कलियुगि कोसल पुरि जाउनि । मी जन्मलो शूद्रतनु पाउनि ॥
शिवसेवक मनकर्में वाणीं । आनदेवनिंदक अभिमानी ॥
धनमदमत्त परम वाचाळहि । उग्रबुद्धि उरि दंभ विशाळहि ॥
जरि वसलो रघुपति नृपधानीं । तरि न तदा ये महिमा ध्यानीं ॥
अतां अयोध्या प्रभाव अवगत । निगमागम पुराण हा सांगत ॥
जन्मि कुण्याहि वसे कोसल पुरि । राम परायण तो होइल तरि ॥
जीव अयोध्या प्रभाव जाणति । जैं उरि राम धनुर्धर राहति ॥
तो कलिकाल कठिण उरगारी । पाप परायण सब नरनारी ॥

**दो०-ग्रस्त कलिमलें धर्म सब लुप्त सकल सद्ग्रंथ ॥**
**दांभिक निजमतिकल्पित प्रगटविले बहु पंथ ॥९७रा ॥**
**होति मोहवश लोक सब ग्रासि लोभ शुभकर्म ॥**
**श्रुणु हरियाना ज्ञाननिधि सांगु कांहि कलिधर्म ॥९७म॥**

वर्ण धर्म ना आश्रम चारी । श्रुति विरोधरत सब नरनारी ॥
श्रुति विकती द्विज, भूप प्रजाशन । कोणि न मानि निगम अनुशासन
तोच मार्ग जो ज्याला रुचतो । पंडित तो जो शेखि मिरवतो ॥
मिथ्यारंभ दंभरत जेही । त्यांस संत म्हणती सगळे ही ॥
तोच चतुर जो परधनहारी । सदाचारि जो दंभ बहु करी ॥
वदति असत्य, मस्करी जाणति । गुणवान् गणुनी तया प्रशंसिति ॥
त्यागी श्रुतिपथ निराचार जो । कलियुगि तो ज्ञानी विरक्त तो ॥
ज्याचीं नखें जटाहि विशाला । तो प्रसिद्ध तापस कलिकालां ॥

**दो०-अशुभवेषभूषणधर भक्ष्याभक्ष्या खाति ।।**
**ते योगी ते सिद्ध नर कलियुगि पुजिले जाति ।। ९८ रा ।।**
**सो०-परापकाराचार त्यां गौरव ते मान्य अति ।।**
**मनवचकृति शठ फार त्यां कलियुगि वक्ते म्हणति ९८ म ।।**

नारि विवश नर सगळे स्वामी ! । नाचति नटमर्कट सम नामी ।।
द्विजां शूद्र उपदिशती ज्ञाना । कंठि जानवें, घेति कुदानां ।।
पुरुष कामरत लोभी क्रोधी । वेद विप्र सूर संत विरोधी ।।
त्यागुनि गुणमंदिर पति सुंदर । नारि अभागिनि भजति पुरुष पर ।।
सुवासिनी तों विना विभूषण । विधवांचे शृंगार तु नूतन ।।
अंध बधिर गुरु शिष्य वर्तती । एक न बघति न एक ऐकति ।।
हरति शिष्यधन शोक न हरती । ते गुरु दारुण नरकीं पडती ।।
मायबाप बालां बोलावति । उदर भरे तो धर्म च शिकवति ।।

**दो०- ब्रह्मज्ञान च नारिनर वदति दुजी नहिं बात ।।**
**कौडीलागीं लोभवश करति विप्रगुरुघात ।। ९९ रा ।।**
**शूद्र भांडती द्विजांसह आम्हि कि कांहीं न्यून ।।**
**ब्रह्म जाणि तो विप्रवर बघती संतापून ।। ९९ म ।।**

परवधु लंपट कपट शहाणे । लिप्त मोह ममता द्रोहानें ।।
ते अभेद वादी ज्ञानी नर । कलियुग चरित दृष्ट मी खगवर ।।
आपण पडले त्यांसहि पाडति । जे कुणि सन्मार्गीं प्रतिपालति ।।
कल्प कल्प एकैका नर्की । पडति, दूषिती श्रुति जे तर्कीं ।।

वर्णाधम तेली कुंभारहि। श्वपच किरात कोळि कलवारहि।।
स्त्री मरतां, गृहवित्त–विनाशीं। मुंडुनि मुंड होति संन्यासी।।
विप्रांकडुनि घेति पूजुनि ते। उभय लोक नाशिति निज हातें।।
विप्र निरक्षर लोलुप कामी। निराचार शठ वृषली स्वामी।।
शूद्र करिति जप व्रत तप नाना। बसुनि वरासनिं कथिति पुराणां
सब नर करिति कल्पिताचारां। वदवे ना किं अनीति अपारा।।

**दो०–होति वर्ण संकर कलि भिन्नसेतु सब लोक।।**
**करिति पाप पावति दुख भय रुज वियोग शोक।।१००रा।।**
**श्रुति संमत हरिभक्तिपथ संयुत विरति विवेक।।**
**तो न धरति नर मोहवश कल्पिति पंथ अनेक।।१००म।।**

**छं०–**

**बहु दाम सुसाजिति धाम यती। विषयीं हरली नुरली विरती।।**
**तपसी धनवंत दरिद्र गृही। कलिकौतुक ये वदतां नच ही।।**
**हकलून कुलीनहि नारि सती। गृहिं ठेविति दासि तजून गती।।**
**पितरां सुत मानिति तोंवर ही। अबलानन जोंवर दृष्ट नही।।**
**श्वशुरालय गोड गमे हि यदा। रिपुरूप कुटुंब ठरेहि तदा।।**
**नृप पापपरायण धर्म नही। जन दंडविडंबित संतत ही।**
**धनवंत कुलीन मलीन अपी। द्विजचिन्हहि जानवं नग्न तपी।।**
**नहि मानि पुराण न वेदहि जो। हरि सेवक संत खरा कलि तो।।**

कविवृंद, उदार न ये श्रवणीं । गुणदूषक वृंद; न कोणि गुणी ॥
कलि वार अनेक दुकाळ पडे । विण अन्न दुखी जनमृत्यु घडे ॥
दो०-श्रुणु खगेश कलि कपट हठ द्वेष दंभ पाखांड ॥
मान मोह मारादि मदव्याप्त सदा ब्रह्मांड ॥ १०१ रा ॥
तामस धर्मां करति नर व्रत जप तप मख दान ॥
देव न वर्षो धरणीं, उप्त न उगवे जाण ॥ १०१ म ॥
छं०-
अबला कचभूषण भूक महा । धनहीन दुखी ममता बहु हा! ॥
सुख वांछिति मूढ, न धर्मरती । मति थोडि, कठोर, न कोमल ती
जन पीडित रोग, हि भोग नहो । अभिमान विरोध अकारणही
लघु जीवन संवत पंच दहा । प्रलयींहि विनाश न दर्प महा ॥
अति हाल सदा कलिनें मनुजा नहि मानि कुणी अनुजा तनुजा
नहि तोष विचार न शीतलता । सब जातिकुजातित याचकता
इरषा परुषाक्षर लोलुपता । भरपूर वसे समता विगता ॥
सब लोक वियोग विशोकहत । वरणाश्रम धर्म अचार गत ॥
दम दान दया नहि जाणपणा । जडता परवंचनतातिघना ॥
तनुपोषक सर्वहि नारि नर । भरले परनिंदक विश्वभर ॥
दो०-व्यालारी ! श्रुणु काल कलि मल अवगुण आगार ॥
कलियुगगुण हि महान हा अनायास उद्धार ॥ १०२ रा ॥
सत्यीं त्रेतीं द्वापरीं पूजा मख नी योग ॥
देती गति ती कलि हरिनामें पावति लोक ॥ १०२ म ॥

कृतयुगिं सब योगी विज्ञानी । ध्यात हरिस भव तरती प्राणी ।।
त्रेतीं यज्ञ विविध नर करती । प्रभुस कर्म अर्पुनि भव तरती ।।
द्वापरिं करुनी रघुपति पूजा । नर भव तरति उपाय न दूजा ।।
कलियुगिं केवळ हरिगुण गाथा । भवठावा नर पावति गातां ।।
योग यज्ञ कलियुगिं ना ज्ञान हि । एक अधार रामगुणगान हि ।।
त्यजुनि भरंवसा सब जे राम हि । भजति गाति गुणगण सप्रेम हि ।।
तेच करति भव, संशय अल्प न । कलियुगिं नामप्रताप गुप्त न ।।
कलिचा एक पुनीत प्रतापहि । होई मानस पुण्य, पाप नहि ।।

**दो०—कलियुग समयुग आन ना जर नर युत विश्वास ।।**
**गाइ रामगुणगण विमल तरे भव न सायास ।। १०३ रा ।।**
**प्रगट धर्मपद चार, हा एकच कलीं प्रधान ।।**
**येन केन विधि देतां दान करी कल्याण ।। १०३ म ।।**

होति हृदयिं युगधर्म जनांचे । प्रेरित मायेनें रामाचे ।।
शुद्ध सत्व समता विज्ञान । कृतमहिमा प्रसन्न मन जाण ।।
सत्व वहुत, रज जरा, कर्मरति । त्रेताधर्म सर्वपरिं सुख अति ।।
वहु रज, सत्व अल्पही तामस । द्वापर धर्म हर्षभय मानस ।।
राजस थोडा तामस भारी । कलिमहिमा विरोध दिशि चारी ।।
वुध निज मनिं युग धर्म जाणती । त्यजुनि अधर्म धर्मरति करती ।।
कालधर्म ना बाधिति त्यासी । रघुपतिपदीं प्रीति अति ज्यासी ।।
नटकृत विकट कपट खगराया ! । नटसेवका न लागे माया ।।

**दो०–हरिमायाकृत दोषगुण विण हरिभजन न जात ॥**
**राम भजा कामां त्यजुनी हें चितुनी मनांत ॥१०४रा॥**

❖ ❖ ❖

## अध्याय १२ वा

**दो०–त्या कलिकालीं वर्ष बहु कोसलि राहुं खगेश ॥**
**पडे दुकाळ, विपत्तिवश केलें गमन विदेश ॥१०४म॥**

श्रुणु खगेश गत उज्जयिनी प्रति । म्लान दरिद्री दीन दुःखि अति ॥
जात काळ कांहीं संपत्ती– । मिळे, लागलो करुं शिवभक्ती ॥
विप्र एक वैदिक शिवपूजा– । करी सदा उद्योग न दूजा ॥
परम साधु परमार्थां विदक । शंभु उपासक नहि हरिनिंदक ॥
मी त्या सेवीं कपटसमेत । द्विज दयालु अति नीति निकेत ॥
स्वामि! बाह्य नम्रता बघुन मम । विप्र पढवि मजला पुत्रासम ॥
शंभु मंत्र मज देती द्विजवर । करिति विविध उपदेशहि सुंदर ॥
जपूं मंत्र शिवमंदिरिं जाउनि । हृदयीं दंभ अहं अति वाढुनि ॥

**दो०–मी खल मलसंकुलमति नीच जाति वश मोह ॥**
**द्विज हरिजन बघुनी जळे करीं विष्णुचा द्रोह ॥१०५रा॥**
**सो०–गुरु मज करती बोध दुःखि बघुनि आचरण मम ॥**
**मज अति उपजे क्रोध रुचे दांभिका नीति कशि ॥१०५म॥**

एक वार गुरु हांक मारती । मजला विविधा नीति शिकवती ॥
शिव सेवेचें पुत्र ! हेंच फळ । अविरल भक्ति रामपदिं निर्मळ ॥

तात ! भजति रामा शिव धाता । नरा पामरा काय कि वार्ता ॥
यच्चरणीं अज शिव अनुरागी । तद् द्रोहें सुख बघसि अभागी ?॥
गुरु हरास हरिसेवक वदले । श्रवुनि खगेश हृदय मम जळलें ॥
अधम जाति मी विद्या मिळतां । होइं जसा पय अहिस पाजतां ॥
मानी कुटिल कुभाग्य कुजाती । गुरुचा द्रोह करीं दिन रातीं ॥
अति दयालु गुरु जरा क्रोध नहि । पुनः पुन्हां मज करिति सुबोध हि॥
ज्यानें नीच महत्वा चढतो । प्रथम तयाचा करी नाश तो ॥
धूम अनल संभव खग ! जो तो । विझवि तयाला जैं धन होतो ॥
रज पथि पतित अनादृत राही । सर्वांच्या पदलत्ता साही ॥
मरुत उडवितां प्रथम तया भरि । मग नृपनयनि भरे मुकुटावरि ॥
श्रुणु खगपति बघुनि या प्रसंगा । बुध न करिति अधमाच्या संगा ॥
कवि कोविद अशि गाती नीती । कलह खला न भला ना प्रीती ॥
त्यास उदास सदाच रहावें । दुरुन खलां श्वानसे त्यजावे ॥
मी खल हृदयीं कपट कुटिलता । गुरु हित वदतां रुचे न चित्ता ॥

**दो०–एक वार हरमंदिरीं करितां जप शिवनाम ॥**
**गुरु आले, मी मदें कृत उठुनी नही प्रणाम ॥१०६रा॥**

**कांहि दयाल न बोलले उरि न रोष लवलेश ॥**
**अति अघ गुरु अपमान तो सहुं शकले न महेश ॥१०६म॥**

मंदिरींच झाली नभवाणी । रे हतभाग्य अज्ञ अभिमानी ॥
यद्यपि तव गुरुला ना क्रोध । अति कृपालु मन सम्यक बोध ॥

देतो तदपि शाप शठ तुजला । नीति विरोध न रुचतो मजला ।।
खल तुज मी जर करीन दंड न । श्रुतिमार्गा मम होईल खंडन ।।
जे शठ गुरुशीं ईर्षा करती । रौरव नर्कि कोटि युग पडती ।।
तिर्यग् योनि जन्म मग पावति । अयुत जन्मभर पीडा पावति ।।
अजगर इव पापी ! बसलासी । खल अघमयमति भुजंग होसी ।।
महाविटपकोटरांत जाउनि । बस, अधमाधम अधगति पाउनि ।।

**दो०–करिती हाहाकार गुरु श्रवुनि घोर शिवशाप ।।**
**मजला कंपित बघुनि अति उरिं उपजे परिताप ।। १०७ रा ।।**
**करुनी प्रेमें दंडवत जोडुनि शिवास हात ।।**
**बघुनि घोर मम गती, स्तुति द्विज गद्गद करतात १०७म**

**नमामीशमीशान निर्वाणरूपं । विभुं व्यापकं ब्रह्म वेदस्वरूपं ।।**
**निजं निर्गुणं निर्विकल्पं निरीहं । चिदाकाशमाकाशवासं भजेऽहं ।।**
**निराकारमोंकारमूलं तुरीयं । गिराज्ञानगोतीतमीशं गिरीशं ।।**
**करालं महाकालकालं कृपालं । गुणागार संसारपारं नतोऽहं ।।**
**तुषाराद्रिसंकाशगौरं गभीरं । मनोभूत कोटिप्रभा श्रीशरीरं ।।**
**स्फुरन्मौलिकल्लोलिनी चारुगंगा । लसद्भालबालेंदु कंठे भुजंगा**
**चलत्कुंडलं भ्रू सुनेत्रं विशालं । प्रसन्नाननं नीलकंठं दयालं ।।**
**मृगाधीशचर्माम्बरं मुण्डमालं । प्रियं शंकरं सर्वनाथं भजामि ।।**
**प्रचण्डं प्रकृष्टं प्रगल्भं परेशं । अखंडं अजं भानुकोटिप्रकाशं ।।**
**त्रयःशूलनिर्मूलनं शूलपाणिं । भजेहं भवानीपतिं भावगम्यं ।।**

कलातीत कल्याण कल्पांतकारी। सदा सज्जनानंद दाता पुरारी
चिदानंद संदोह मोहापहारी। प्रसीद प्रसीद प्रभो मन्मथारी
न यावद् उमानाथ पादारविंदं। भजंतीह लोके परे वा नराणां
न तावत्सुखं शांति सन्तापनाशं। प्रसीद प्रभो सर्वभूताधिवासं
न जानामि योगं जपं नैव पूजां। नतोऽहं सदा सर्वदा शंभु तुभ्यं
जरा जन्म दुःखौघ तातप्यमानं। प्रभो पाहि आपन्नमामीश
शंभो ॥

श्लोक०–रुद्राष्टकमिदं प्रोक्तं विप्रेण हरतोषये ॥
ये पठन्ति नरा भक्त्या तेषां शंभुः प्रसीदति ॥ १ ॥

दो०–श्रवुनि विनति सर्वज्ञ शिव बघुनि विप्र अनुराग ॥
मंदिरिं नभवाक् झाली, हे द्विजवर वर माग ॥ १०८ रा ॥
प्रभु मजवरी प्रसन्न जर स्नेह दिनावर नाथ ? ॥
प्रभुपदिं देउनि भक्ति मज, द्या दुसरा वर तात ॥ १०८ म ॥
प्रभु तव मायावश फिरे सदा भुलुनि जड जीव ॥
कोप न करणें त्यावरि भगवन् करुणाशीव ॥ १०८ चं ॥
शंकर दीनदयाल व्हा यावर नाथ ! कृपाल ॥
शापानुग्रह होइ कीं अल्पचि जातां काल ॥ १०८ द्र ॥

हा पावेल परम कल्याणा। असें करावें कृपानिधाना ॥
द्विजवच परहितपूर्ण ऐकुनी। एवमस्तु झाली नभवाणी ॥
दारुण पाप जरी कृत यानें। दिला शाप मी जरि कोपानें ॥
तरि ही तुमची बघुनि साधुता। कृपा विशेष करिन यावरतां ॥

क्षमाशील जे परोपकारी । द्विज ते प्रिय मज यथा खरारी ।।
द्विज ! मम शाप वृथा ना जाइल । जन्म हजार नर्कि या मिळतिल ।।
दु:सह दु:ख जन्मतां मरतां । यास न होइल जरा हि आतां ।।
नाश न कवणहि जन्मीं ज्ञाना । ऐक शूद्र मम वचा प्रमाणा ।।
रघुपतिपुरीं जन्म तव झाला । मम भजनीं लाविलें मनाला ।।
अनुग्रहें मम, पुरीप्रभावें । रामभक्ति तव हृदयिं उद्भवे ।।
तात; सत्य हें श्रुणु मम भाषण । द्विजसेवा हें व्रत हरितोषण ।।
आतां कर न विप्र अपमान हि । जाण कि संत अनंत समान हि ।।
इंद्रकुलिश मम शूल विशालहि । कालदंड हरिचक्र कराल हि ।।
मारुनि यानीं जो ना मरतो । द्विजद्रोहपावकिं तो जळतो ।।
हा विचार मनिं ठेव सदा ही । मग तुज जगिं दुर्लभ ना काहीं ।।
मम आशीर्वच एक आणखी । अप्रतिहत गति होइल तव कीं ।।

दो०–ऐकुनि शिववच मुदित गुरु एवमस्तु वदतात ।।
मला प्रबोधुनि जाति गृहि शंभुचरण हृदिं घ्यात ।।१०९रा
विंध्य पर्वतीं जाहलो काळगतीनें व्याळ ।।
अनायास ती त्यक्त तनु जातां काहीं काळ ।।१०९म।।
जी जी तनुधृत ती त्यजिलि अनायास हरियान ।।
पट नूतन नेसुनि जसे नर परिहरति पुराण ।।१०९चं।।
श्रुतिनीती रक्षित शिवें अल्प न मजला क्लेश ।।
धरतां बहु तनु यापरीं ज्ञान न नष्ट खगेश ।।१०९द्र।।

तिर्यक् सुर नर जी जी तनु धरुं। तिथें रामभजनातें अनुसरुं ॥
एक शूळ विसरलो न अंमळ। श्रीगुरुचा सुस्वभाव कोमळ ॥
चरम देह विप्राचा मिळला। सुरदुर्लभ निगमार्गमिं कथिला ॥
खेळुं तिथें पण बालकमेळीं। करत सकल रघुनायककेली ॥
होतां प्रौढ पिता मज पढवित। ऐकुं, विचारें कळे, नावडत ॥
मनोवासना एक न जागे। केवळ रामचरणिं लय लागे ॥
कोण असा जगिं नाथ ! अभागी। खरी सेवि सुरधेनू त्यागी ॥
प्रेममग्न मज काहिं न रुचलें। मला पढवितां पिता हि थकले ॥
होति कालवश जैं पितृजननी। जनपालकभजनास गत वनीं ॥
जिथें जिथें वनिं मुनिवर दिसले। आश्रमिं जाउनि त्यां शिर नमलें ॥
पुसत तयांस रामगुणगाथा। वदति ऐकुं हर्षित खगनाथा ॥
ऐकत फिरुं हरिगुणानुवादां। अव्याहत गति शिवप्रसादां ॥
त्रिविध एषणा गेल्या गाढ। हृदिं अति एक लालसावाढ ॥
रामचरणवारिज जैं देखूं। तैं निज जन्मसफलता लेखूं ॥
ज्यां पुसतो ते कथिति किं मुनिवर। सर्व-भूतमय आहे ईश्वर ॥
निर्गुण मत मजला न आवडे। ब्रह्मि सगुण रति हृदयिं अति जडे।

**दो०–लागे रघुपतिचरणिं मन स्मरुनी गुरुवचनास ॥**
**गात रामयश फिरूं, नव प्रीती क्षणोक्षणास ॥११०॥**

❖ ❖ ❖

# अध्याय १३ वा

**दो०-मेरुशिखरिं वटछाये मुनि लोमश आसनि ॥**
**बघुनि चरणिं शिर नमविलें वदलो वचन सुदीन ॥ ११० म ॥**
**श्रवुनि वचन मम नम्र मृदु मुनि कृपालु खगराय ॥**
**मज सादर पुसलें द्विज! हेतु आगमनिं काय? ॥ ११० चं ॥**
**तैं मी वदलो कृपानिधि ! तुम्हि सर्वज्ञ सुजाण ॥**
**ब्रह्म सगुण आराधना सांगा मज भगवान ॥ ११० द्र ॥**

तैं मुनीश रघुपतिगुणगाथा । सादर कांहि कथिति खगनाथा ! ॥
ब्रह्मबोधरत विज्ञानी मुनि । मला परम अधिकारी जाणुनि ॥
करुं लागले ब्रह्मउपदेश । अज अद्वैत अगुण हृदयेश ॥
अकल अनीह अनाम अरूप । अनुभवगम्य अखंड अनूप ॥
मनगोतीत अमल अविनाशी । निर्विकार निरवधि सुखराशी ॥
तें तूं, त्यांत तुझ्यांत भेद नहि । वारिवीचि इव गाती वेदहिं ॥
शिकविति मुनि मज विविधपरीं जरि । निर्गुण मत उतरे न गळीं तरि
मग मी विनवि नमुनि पदिं शीस । सगुण उपासन वदा मुनीश ! ॥
रामभक्तिजलि मम मन मीन । होइ अलग कसं मुने प्रवीण ? ॥
सदय करा उपदेश असा या । निज नयनीं निरखिन रघुराया
नेत्र भरुनि कोसलेश पाहिन । मग निर्गुणबोधा आकर्णिन ॥
मुनि अनुमप हरिकथा निवेदुनि । अगुण निरूपिति सगुणा खंडुनि
मी निर्गुण मत निरसुनि दूरीं । सगुण निरूपित हट्टें भूरी ॥

प्रत्युत्तर उत्तर मी केले । क्रोधचिन्ह मुनि देहिं उदेलें ॥
वहुत अवज्ञा प्रभु जैं घडें । ज्ञान्यांचें मन रोषा चढे ॥
करतां कोणी अति संघर्षण । करी प्रकट अनलास हि चंदन ॥

**दो०–वारंवार सकोप मुनि ज्ञानचि निरूपितात ॥**
**तैं बसल्या मम मानसीं विविध तर्क उठतात ॥ १११रा ॥**
**द्वैत्यबुद्धिविण कोप कीं द्वैत विना अज्ञान ॥**
**मायावश परिच्छिन्न जड जीव कि ईश-समान ॥ १११म ॥**

त्यां कि दुःख कधि, इच्छि सकलहित । तो कि दरिद्रि परीस करीं स्थित ॥
परद्रोहि कीं निर्भय वसती । कामी कधि अकलंकित असती ॥
वंश कि उरे द्विजाहित करतां । कर्म होति कीं स्वरुप जाणतां ॥
खल संगें कधि उपजे सुमति कि । परदारग कधि पावे सुगति कि ॥
भवि कि पडति परमात्माविदक । सुखी होति कीं कधि हरिनिंदक ॥
राज्य कि राही, नीति न जाणुनि । अघ कि राहि हरि चरित्र वर्णुनि ॥
पुण्याविण कि मिळे यश पावन । अपयश लाभ कि जेथें पाप न ॥
लाभ कि जगिं हरिभक्ति समान । जी गाती श्रुति संत पुराण ॥
यासम हानि असे कीं जगतीं । नरतनु मिळुनिहि राम न भजती ॥
पाप पिशुनते सम कीं आन । धर्म कि दया सदृश हरियान ॥
असे तर्क मनि करुं भाराभर । मुनि उपदेश न ऐकूं सादर ॥
सगुणपक्ष घडि घडि मी स्थापित । तैं मुनिवर वदले क्रोधान्वित ॥
मूढ सुबोधा करुं न मानसी । उत्तर प्रत्युत्तर बहु करसी ॥

सत्यवर्चांनि विश्वास न धरसी । वायस इव सर्वां घाबरसी ॥
शठ तव हृदीं स्वपक्ष विशाल । हो सपदीं पक्षी चांडाल ॥
मी मस्तकिं धृत मुनि शापाला । भय न दीनता जरा मनाला ॥

**दो०–तत्क्षणिं झालो काक मी मुनिपदिं शिर नमवून ॥**
**स्मरुनि राम रघुवंशमणि उडत निघें हर्षून ॥ ११२ रा ॥**

**रामचरणिं रत जे उमे ! गत मद काम क्रोध ॥**
**निज प्रभुमय जग पाहती करिती कुणाशिं विरोध ॥११२ म।**

श्रुणु खगेश कांहिं न ऋषि दूषण । प्रेरक हृदिं रघुवंश विभूषण ॥
कृपासिंधु मुनिमतिस भुलविती । माझी प्रेमपरिक्षा घेती ॥
मन वच कृति मज निज जन जाणति । मग भगवान् फिरवति मुनिची मति
ऋषि मम महच्छीलता पाहति । रामचरणिं विश्वास तसा अति ॥
अति विषण्ण घडि घडि पस्तावति । सादर मुनि मजला बोलावति ॥
मम परितोष परोपरिं करुनी । राममंत्र मज दिला हर्षुनी ॥
बालरूप रामाचें ध्यान । शिकविति मज मुनि कृपानिधान ॥
सुंदर सुखद मला अति रुचले । तें मी पूर्विंच तुम्हांस कथिलें ॥
कांहिं काल मुनि मजसी राखति । रामचरित मानस तैं भाषति ॥
सादर मज ही कथा ऐकवुनि । मग वदले सुंदर वचना मुनि ॥
रामचरितसर गुप्त मनोहर । मज लाभलें प्रसादें शंकर ॥
तूं निज रामभक्त हें जाणुनि । मी ही कथित सर्व वाखाणुनि ॥
रामभक्ति ज्यांचें हृदिं नाहीं । त्यांस न वदणें तात ! कदा ही ॥

समजाविति मुनि विविधा मजला । मी प्रेमें नमिलें पदकमलां ।।
करकमला ठेउनि मम शीर्षा । देति मुनीश मुदित आशीषा ।।
रामभक्ति अविरल हृदयीं तव । नित्य वसेल मदीय कृपेस्तव ।।

**दो०-व्हा रामप्रिय सदा तुम्हि शुभगुणभवन अमान ।।**
**कामरूप इच्छा मरणि ज्ञानविरागनिधान ।।११३रा।।**
**तुम्हि वसाल ज्या आश्रमीं स्मरतां श्री भगवंत ।।**
**व्यापि तिथें न अविद्या चार कोस पर्यंत ।।११३म।।**

काल कर्म गुण दोष स्वभावहि- । जनित दुःख कधि काहिं तुम्हां नहि
रामरहस्य ललित विध नाना । प्रगट गुप्त इतिहासपुराणां ।।
कळे श्रमांविण सर्व तुम्हां हो ! । स्नेह रामपदिं नित्य नवा हो ।।
जी इच्छा मनिं कराल कांहीं । हरिप्रसादें दुर्लभ नाहीं ।।
ऐकुनि मुनि आशीस् मति धीरा । ब्रह्मगिरा नभिं होइं गभीरा ।।
तव वच तथास्तु हे ! ज्ञानी मुनि ! । हा मम भक्त कर्म मन भाषणि ।।
श्रवुनि नभगिरा प्रहर्ष मजला । प्रेममग्न संशय सब सरला ।।
विनति करुनि मुनि आज्ञा घेउनि । पद पंकजि घडि घडि शिर ठेवुनि ।
या आश्रमिं आलो मी हर्षुनि । प्रभूकृपें दुर्लभ वर पावुनि ।।
येथें वसतां श्रुणु पक्षीश । गेले कल्प सात नी वीस ।।
करी सदा सादर गुणगान । सादर ऐकति विहग सुजाण ।।
अयोध्येंत जैं जैं रघुवीर । धरिति भक्तहित मनुज शरीर ।।
तदा रामपुरिं जाउनि वसतो । शिशुलीला पाहुनि सुख लुटतो ।।
मग हृदिं धरुनि रामशिशुरूपा । निजाश्रमीं येतो खगभूपा ।।

कथा सकल मी कथित तुम्हांला । काक काय मज कसा मिळाला ।।
कथित तात सब तव प्रश्नांसिहि । रामभक्तिमहिमा अति भारि हि।।

**दो०-प्रिय ही तनु मज, कीं मिळे रामपदीं सुस्नेह ।।**
**निज प्रभुदर्शन पावलो विगत सकल संदेह ।।११४रा।।**

**मास पारायण, एकोणतिसावा विश्राम ।।**

❖ ❖ ❖

## अध्याय १४ वा

**दो०-भक्तिपक्षि धरिला हठ झाला महर्षिशाप ।।**
**मुनि दुर्लभ वर पावलो भजनीं पहा प्रताप ।।११४म।।**

अशी भक्ति जाणुनि परिहरती । ज्ञाना केवळ जे श्रम करती ।।
ते जड गृहि सुरधेनू त्यजिती । दुधासाठि अर्कांस धुंडिती ।।
श्रुणु खगपति हरिभक्ति त्यागिति । अन्य साधनीं सुख जे इच्छिति ।।
ते शठ महासिंधु विण तरणी । तरुनि पार कांक्षिति जड करणी ।।
श्रवुनि भुशुंडीवचन भवानी ! । वदे गरुड हर्षे मृदु वाणी ।।
प्रभो ! प्रसादें तव, हृदयीं मम । संशय शोक न मोह नसे भ्रम ।।
पावन रामगुणग्रामां श्रुत । चित्त तवकृपें विश्रामें युत ।।
प्रभु पुसतो आपणां कृपाकर । गोष्ट एक मज वदा सविस्तर ।।
वेद पुराण संत मुनि सांगति । ज्ञानासम जगिं दुर्लभ ना अति ।।
मुनिनें तेंच तुम्हांला कथिलें । तुम्हि न भक्तिसम तें आदरिलें ।।

ज्ञानभक्ति यांमधिं किति अंतर। सकल सांगणें प्रभो! कृपाकर॥
उरगारीवचनें सुख झालें। सादर काक सुजाण म्हणाले॥
भक्तीज्ञानामधिं नहिं भेद। उभय हरिति भवसंभव खेद॥
नाथ! कथिति मुनि काहीं अंतर। सावधान तें श्रुणु विहंगवर॥
बोध विराग नि योग विबोधहि। श्रुणु हरियान पुरुष हे सर्वहि॥
पुरुषप्रताप सगळा प्रबलहि। सहज जातिजड अबला अबलहि॥

**दो०—शके पुरुष अबले त्यजूं जो विरक्त मति धीर॥**
**न तु कामी विषयां वश विमुख चरण रघुवीर॥११५रा॥**
**सो०—मुनि ते ज्ञाननिधान मृगनयनी विधुमुख बघुनि॥**
**विवश होति हरियान नारि विष्णुमाया प्रगट॥११५म॥**

पक्षपात मुळि इथें न करतो। वेदपुराणसंतमत वदतो॥
मोहे नारि न नारी-रूपा। पन्नगारि ही रीति अनूपा॥
माया भक्ति ऐक या दोनी। नारिवर्ग जाणे ही कोणी॥
प्रिय रघुवीरा भक्तिच भारी। माया खलु नर्तकी बिचारी॥
सानुकूल भक्तिस रघुराया। म्हणुन घाबरे तिज अनि माया॥
निरुपम निरुपाधिक हरिभक्ती। सदा अबाधित हृदिं करि वस्ती॥
तया बघुनि माया संकुचते। प्रभुता कार्य न निज करुं शकते॥
हे समजुनि मुनि जे विज्ञानी। याचिति भक्ति सकल सुखदानी॥

**दो०—हें रघुनाथरहस्य ना कळतें शीघ्र कुणास॥**
**जो जाणे रघुपति कृपें स्वप्निंहि मोह न त्यास॥११६रा॥**

**ज्ञानभक्तिभेदा दुजा ऐका अती प्रवीण ! ।।**
**तो ऐकुनि रति रामपदि होइ सदा अक्षीण ।।११६ म ।।**

अकथ कहाणी तात ! ऐकणें । शक्य समजणें शक्य न वदणें ।।
ईश्वरअंश जीव अविनाशी । चेतन अमल सहज सुखराशी ।।
तो प्रभु मायेला वश झाला । शुकमर्कटसम बंधनि पडला ।।
जडचेतनिं पडली ग्रंथि जी । जरी मृषा सुटणें कठिण ती ।।
तैंहुनि जीव होई संसारी । ग्रंथि सुटे, न सुख न लवभारी ।।
श्रुतिपुराण बहु उपाय वदती । न सुटे, अधिकाधिक च घट्ट ती ।।
जीवहृदयिं तम विशेष मोहो । ग्रंथि सुटे कशि, शके न पाहों ।।
ईश असां संयोग आणि जैं । शके कदाचित सुटूं ग्रंथि तैं ।।
श्रद्धा सात्विक धेनु शोभना । करि हरिकृपें हृदयिं जर सदना ।।
व्रत जप तप यम नियम अपार । वेदविहित शुभ धर्माचार ।।
तें तृण हरित गाय जैं चरते । भाव वत्स भेटत पान्हवते ।।
रज्जु निवृत्ति पात्र विश्वास । निर्मळ मन गौळी निज दास ।।
परम धर्ममय पया काढुनी । तापवि अनल अकाम बनवुनी ।।
क्षमा तोष मरुतें तें निववी । करि दधि धृति सम विर्जण लावी ।
रवि विचार, मुदिता माथणीं । दम धारण, गुण सत्य सुवाणीं ।।
मंथुनि काढुनि घे नवनीत । विमल विराग सुभग सुपुनीत ।।

**दो०–प्रगटुनि योगाग्नी, द्विविध कर्म शुभा लाऊन ।।**
**बुद्धि निर्वविते ज्ञान घृत ममता मल हि जळून ।। ११७ रा**

तें विज्ञानरूपिणी मति घृत विशद मिळून ।।
चित्त पणति भरि ठेवि दृढ समता ठाण करून ।। ११७म ।।
तीन अवस्था त्रिगुण त्या काढि कपासींतून ।।
तूल तुरीया पिंजुनी जाडी वात वळून ।। ११७ चं ।।

**सो०–असा पेटवी दीप तेजराशि विज्ञानमय ।।**
**जातां जया समीप जळति मदादिक शलभ सब ।। ११७ झ ।।**

सोहमस्मि ही वृत्ति अखंडा । दीपशिखा ती महाप्रचंडा ।।
आत्म–अनूभव सुख प्रकाश । भेदभ्रम भवमूल विनाश ।।
प्रबल अविद्येच्या परिवारा । नाश तमा मोहादि अपारा ।।
तैं बुद्धि तो प्रकाश मिळुनि । सोडी ग्रंथि हृदयगृहिं बसुनी ।।
ग्रंथिभेद ती करूं शके जर । होइ जीव मग कृतार्थ हा तर ।।
सोडत गांठ बघुनि खगराया । विघ्न अनेक करी तैं माया ।।
ऋद्धि सिद्धि बहु दे वा ! धाडुनि । मतिला प्रलोभ दाविति येउनि ।।
कळ बळ छळ करि समीप जाते । विझवी दीपा अंचल वातें ।।
असे बुद्धि जर परम शहाणी । तिज न लक्षिते अहित जाणुनी ।।
त्या बुद्धिस जर विघ्न न बाधी । तर नंतर सुर करिति उपाधी ।।
गोगोलकें झरोके नाना । स्थित तेथें सुर मांडुनि ठाणा ।।
येतां पाहुनि विषय समीरण । बळें उघडिती द्वारें सुरगण ।।
जैं उरगृहिं तो घुसे प्रभंजन । तदा दीप विज्ञान विभंजन ।।
ग्रंथि न सुटली तेज हरपलें । होइ विकल मति विषयवादळें ।।
करणसुरानां ज्ञान नावडे । विषयभोग अति सदा आवडे ।।

विषयसमीरें बुद्धि बावळी । तसा दीप मग कोण पाजळीं ॥

**दो०-जीव पुन्हां तैं विविधविध भोगि संसृती क्लेश ॥**
**हरिमाया अति दुस्तर तरवे ना विहगेश ॥ ११८ रा ॥**
**वदत कठिण समजत कठिण साधत कठिण विवेक ॥**
**घुणाक्षरें न्यायें घडे तरि विघ्नें हि अनेक ॥ ११८ म ॥**

ज्ञानाचा पथ कृपाणधार हि । पडत खगेश ! न लागे वार हि ॥
निभावतो निर्विघ्न पथा जो । तो कैवल्य परमपद लभतो ॥
अति दुर्लभ कैवल्य परमपद । संत पुराण निगम आगम वद ॥
स्वामी ! राम भजत मुक्ती ते । न इच्छितां जबरीनें येते ॥
स्थलविण जल कधि राहुं न शकतें। यत्न कोटिही करुन विविध ते ॥
तसें मोक्षसुख ब्रघ खगराया । टिकुं न शके हरिभक्ति विना या ॥
हें समजुनि हरिभक्त सुज्ञ जे । मुक्ति अनाद्रिति भक्तिलुब्ध ते ॥
भक्ति करत यत्नां विण कष्टां । संसृतिमूल अविद्या नष्टा ॥
तृप्ति हितास्तव करिति भोजना । पचवि जसें जठरानल अशना ॥
तशि हरिभक्ति सुगम सुखदाती । कोण असा जड न रुचे ज्या ती ॥

**दो०-सेवक सेव्यभाव विण भवतरण न उरगारि ॥**
**भजा रामपदपंकजा या सिद्धान्त विचारि ॥११९ रा ॥**
**चेतनास जो करी जड जडा करी चैतन्य ॥**
**अशा समर्था रघुपतिसि भजति जीव ते धन्य ॥ ११९ म ॥**

❖ ❖ ❖

# अध्याय १५ वा

समजाविला ज्ञानसिद्धान्त । भक्तिमणी प्रभुता श्रुणु तात ! ॥
रामभक्ति चिंतामणी सुंदर । वसे गरुड ! ज्याचे हृदयांतर ॥
परम प्रकाशरूप दिनराती । काहिंच नको दिवा घृत वाती ॥
निकट मोह दारिद्र्य येत ना । त्याला विझवीं लोभ वात ना ॥
प्रबल अविद्या तिमिर नासतो । सकल शलभ समुदाय हारतो ॥
खल कामादि निकट ना वळती । ज्याचें हृदयिं भक्ति करि वसती॥
गरल सुधासम अरि हित होती । त्या मणि विण सुख कुणि न पावती॥
व्यापिति मानस रोग न भारी । ज्यां वश जीवां दुःखें सारीं ॥
रामभक्ति मणि ज्या उरिं राही । दुःखलेश त्या स्वप्निंहि नाहीं ॥
चतुर शिरोमणि तेच कि जगतीं । मण्यासाठिं जे सुयत्न करती ॥
प्रगट यदपि तो मणि जगिं आहे । रामकृपेविण कोणि न लाहे ॥
सुगम उपाय जरी पावाया । नर हतभागी उडविति पायां ॥
वेदपुराणें पर्वत पावन । रामकथा रुचिराकर पार न ॥
मर्मी सज्जन सुमति पहारी । ज्ञान विराग नयन उरगारी ॥
शोधिल जो प्राणी सद्भावें । सबसुखदानि भक्तिमणि पावे ॥
हा विश्वास मला प्रभु ! वाटे । रामदास रामाहुनि मोठे ॥
रामसिंधु घन सज्जन धीर । चंदनतरु हरि संत समीर ॥
सकल फलहि हरिभक्ति सुशोभन । संत कृपेविण कुणाहि लाभ न ॥
हें समजुनि जो करि सत्संगा । रामभक्ति त्या सुलभ विहंगा ॥

**दो०–ब्रह्म पयोनिधि, मंदर ज्ञान, ज्ञाण सुर संत ।।**
**काढिति मथुनि कथा सुधा भक्तिमाधुरीमंत ।। १२०रा ।।**
**विरति ढाल, असि बोध, रिपु लोभ मदादि वधून ।।**
**जय देते ती हरिभक्ति, बघ खगेश चिंतून ।।१२० म ।।**

मग सप्रेम वदे खगराव । जर कृपालु ! मजवरती भाव ।।
नाथ ! मला निज सेवक जाणुनि । सप्त प्रश्न मम सांगा वर्णुनि ।।
प्रथमचि वदा नाथ ! मति धीर । सर्वीं दुर्लभ कवण शरीर ।।
मोठें दुःख कवण सुख भारी । तें संक्षेपें वदा विचारीं ।।
संतअसंतमर्म तुम्हि जाणां । सहजस्वभाव त्यांचा वाना ।।
पुण्य महा श्रुतिविदित कोणतें । वदा घोर अति पाप कवण तें ।।
सांगा मानस रोग सविस्तर । तुम्हि सर्वज्ञ कृपा अति मजवर ।।
श्रुणु ताता ! सादर सुप्रीतीं । मी संक्षिप्त वदें ही नीती ।।
नरतनु सम नहि देह दुजा वर । तया याचिती जीव चराचर ।।
नर्क नाक अपवर्गीं निसणी । ज्ञान विराग भक्ति शुभ देणी ।।
ती तनुधर हरि भजति न जे नर । होति विषयरत मंद मंदतर ।।
काचखंड ते बदला घेती । करगत परीस फेकुन देती ।।
दारिद्र्यासम जगीं दुःख ना । संतभेटिसम जगांत सुख ना ।।
पर–उपकार वचन मनकायां । प्रकृति सहज संतां खगराया ।।
संत सहति दुख परहित लागीं । परदुःखार्थ असंत अभागी ।।
भूर्जतरूसम कृपालु संत हि । परहितिं सहति विपद अति सततहि

सण इव खल परबंधन करतो । साल काढवुनि विपदीं मरतो ।।
विना स्वार्थ खल पर-अपकारी । अहि-मूषकसा श्रुणु उरगारी ।।
पर संपत्ति विनाशुनि नासति । पीक विनाशुनि गारा वितळति ।।
दुष्टउदय जगदार्ती हेतू । प्रथित अधम जैसा ग्रह केतू ।।
संतउदय संतत हितकारी । विश्व-सुखद इव इंदु-तमारी ।।
परमधर्म वेदोक्त अहिंसा । परनिंदा अघ अधिक गिरीशा ।।
हरिगुरुनिंदक दर्दुर होतो । जन्म सहस्र तीच तनु लभतो ।।
द्विजनिंदक बहु नरकां भोगुनि । जगीं जन्मतो वायस होउनि ।।
देव-वेद-निंदक अभिमानी । रौरव नरकिं पडति ते प्राणि ।।
होति उलूक संत निंदारत । मोह निशा प्रिय बोध भानु गत ।।
निंदितात जे जड सर्वांनां । वटवाघुळ अवतार तयानां ।।
तात ऐक मानस रोगानां । दुःख देति जे सब लोकानां ।।
मोह सकल रोगांचें मूळ हि । तेथुनि बहु उद्भवती शूळ हिं ।।
काम वात कफ लोभ अमित तो । क्रोध पित्त उर नित्य जाळतो ।।
प्रीति करिति जर तीन्ही भाई । उपजे सन्निपात दुखदाई ।।
विषय मनोरथ दुर्गम नाना । सकल शूल ते मिति नामां ना ।।
ईर्षा कच्छू दद्रू ममता । हर्ष विषादां ग्रहां विपुलता ।।
क्षय जळणें परसुख पाहतां । कुष्ट दुष्टता मनकुटिलता ।।
अहंकार अर्बुद अति दुःखद । नारू दंभ हि कपट मान मद ।।
तृष्णा उदरवृद्धि अति भारी । त्रिविध एषणा तरुण तिजारी ।।
दोन्ही ज्वर मत्सर अविवेक । कुठवर सांगु कुरोग अनेक ।।

**दो०–एक रोगवश नर मरति बहु असाध्य या व्याधि ॥**
**संतत जीवा पीडिती तो कशि लभे समाधि ॥ १२१ रा ॥**
**नेम धर्म आचार तप ज्ञान यज्ञ जप दान ॥**
**भेषज कोटि करून नहि जाति रोग हरियान ॥ १२१ म ॥**

यापरिं सकल जीव जगिं रोगी । शोक हर्ष भी प्रीति वियोगी ॥
मानस रोग कांहि मी वर्णित । सकलां असुनि एक कुणि जाणत ॥
जाणत जरा क्षीण, परि पापी– । नाश न पावति जन परितापी ॥
विपयकुपथ्य मिळत धडफुडे । मुनि–हृदयिं हि नर किति बापुडे ॥
रामकृपें सब रोग विनाशति । असा सुयोग कधीं जर लाभति ॥
सद्गुरु–वैद्य–वचनिं विश्वास हि । संयम हा कीं विषयाशा नहि ॥
रघुपतिभक्ति मुळी संजीवनि । अनुपाना श्रद्धा अति पावनि ॥
सुखें याचपरिं रोग नाशती । ना तर कोटि उपायिं न जाती ॥
जाणा स्वामि ! विरुज मन तेव्हां । हृदिं वल विराग वाढे जेव्हां ॥
क्षुधा सुमति दिन दिन वाढतां । विषयाशा दुर्बलता गता ॥
ज्ञान विमल जलिं करी स्नान जैं । रामभक्ति उरिं करी स्थान तैं ॥
शिव अज शुक सनकादिक नारद, । मुनि जे ब्रह्म विचार विशारद ॥
सर्वांचें मत खगपति हें हो ! । करा रामपदकंजीं स्नेहो ॥
श्रुति पुराण सद्ग्रंथ वदति ही । रघुपतिभक्तिविना सुख नाहीं ॥
कमठ-पृष्ठि जरि वाढति बाल । वंध्यासुत जरि कोणि वधाल ॥
फुललीं नभिं जरि बहुविध फूलहि । जीवा सुख न हरीप्रतिकूल हि ॥
तृषाशान्ति जरि मृगजल पानें । फुटलीं जरि शशशिरीं विषाणें ॥

अंधारें जरि रविस गिळावें । रामविमुख न जीव सुख पावे ।।
अनल जरी प्रगटला हिमांतुनि । विमुख राम सुख पावे ना कुणि ।।
**दो०-वारि मथुनि घृत होई जरि सिकते पासुनि तेल ।।**
**विण हरिभजन न भवतरण सिद्धांत, चि न टळेल ।। १२२रा ।।**
**प्रभु विरिंचि मशका करिति मशकाहुनि अज हीन ।।**
**हें जाणुनि संशय तजुनि रामहि भजे प्रवीण ।। १२२ म ।।**
**श्लो०-विनिश्चितं वदामि ते न अन्यथा वचांसि मे ।।**
**हरि नरा भजंति येऽति दुस्तरं तरंति ते ।।१२२ चं।।**

❖ ❖ ❖

## अध्याय १६ वा

कथित नाथ हरिचरित्र अनुपम । व्याससमासें यथा बुद्धि मम ।।
उरगारी ! हा श्रुति सिद्धान्त हि । राम भजा भुलुनी सब काजहि ।।
भजय कोण तजुनी प्रभु रघुपति । ज्याची ममता शठि मजशा अति ।।
तुम्हि विज्ञानरूप नहि मोहो । नाथ ! कृपाकृत मजवर अति हो !
पुसिली रामकथा अति पावनि । शुकसनकादि शंभुमनभावनि ।।
सत्संगति दुर्लभ संसारां । निमिष घडीभर एकहि वारां ।।
बघा गरुड ! निज हृदि सुविचारीं । मी रघुवीर भजन अधिकारी ! ।।
शकुनाधम सबरींति अपावन । प्रभु मज करिति विदित जग पावन ।।
**दो०-आज धन्य मी धन्य अति सर्वपरीं जरि हीन ।।**
**संतसमागम राम दे जाणुनि निज जन दीन ।। १२३रा ।।**

**नाथ ! यथामति कथित मी कांहीहि न गोपोनि ।।**
**चरितसिंधु रघुनायक ठाव कि पावे कोणि ।।१२३ म ।।**

स्मरुनि रामगुणगणांस नाना । घडि घडि हर्ष भुशुंडि सुजाणा ।।
नेति नेति महिमा श्रुति वर्णित । प्रभुता प्रताप बलही अतुलित ।।
शिव अज पूज्य चरण जे रघुवर । कृपा परम मृदुलता कि मजवर ।।
कुठें स्वभाव न हा श्रुत देखूं । कुणा खगेश राम सम लेखूं ।।
साधक सिद्ध विमुक्त उदासी । कवि कोविद कृतज्ञ संन्यासी ।।
शूर सुतापस योगी ज्ञानी । धर्मनिरत पंडित विज्ञानी ।।
तरति न सेवेविण मत्स्वामी । राम नमामि नमामि नमामी ।।
शरण जात मजसे अघराशी । होति शुद्ध नमामि अविनाशी ।।

**दो०–यस्य नाम भवभेषज घोर हरी त्रय शूल ।।**
**तो कृपाल मज तुजवरी असो सदा अनुकूल ।।१२४ रा ।।**
**श्रवुनि भुशुंडीवचन शुभ प्रभुपदि बघुनी स्नेह ।।**
**प्रेमसहित वदला गिरा गरुड विगत–संदेह ।। १२४ म ।।**

मज कृत्यकृत्य करी तव भाषण । जैं रघुवीरभक्तिरसमिश्रण ।।
रामचरणि नव रति उपजली । माया जनित विपद नासली ।।
मोह जलधि जहाज जाहलां । दिधलें नाथ ! विविध सुख मला।।
मज करवे ना प्रत्युपकारा । पाया पडतो वारंवारां ।।
पूरितकाम राम–अनुरागी । कुणि न तुम्हांसम तात सुभागी ।।
संत विटप सरिता गिरि धरणी । सर्वांची परहितार्थ करणी ।।

संत हृदय लोण्यासम वदले-- । जे कवि त्यांना मर्म न कळलें ।।
निज परितापें द्रव नवनीता । द्रव परदुःखि सुपावन संतां ।।
माझें जीवन जन्म हि सुफलित । तव प्रसादें संशय सब गत ।।
समजा सदा मजसि निज किंकर । घडि घडि उमे ! वदे विहंगवर।

**दो०–त्याचे पदि शिर नमवुनि प्रेमानें मतिधीर ।।**
**वैकुंठा गेला गरुड हृदयि धरुनि रघुवीर ।। १२५ रा ।।**
**गिरिजे ! संत समागम सम न लाभ जगि आन ।।**
**तो न मिळे हरिकृपेविण गाती वेद पुराण ।। १२५ म ।।**

कथित परम पुनीत इतिहास । श्रवत कानिं सुटती भवपाश ।।
प्रणत कल्पतरु करुणापुंजीं । उपजे प्रीति रामपदकंजीं ।।
मन कृति वचन जनित अघ भंजन । श्रवति कथा लावुनि जे श्रुति मन।।
तीर्थाटन नाना साधन गण । योग विरक्ती ज्ञान निपुणपण ।।
कर्म धर्म नाना व्रत दानें । शम दम जप तप यज्ञ साधनें ।।
द्विजगुरु सेवा भूतसदयता । विद्या विनय विवेक महत्ता ।।
साधन जितकें श्रुति वाखाणी । सर्वांफल हरिभक्ति भवानी ।।
श्रुति–गीता रघुनाथ भक्ति ते । रामकृपें कुणि एका मिळते ।।

**दो०–मुनि दुर्लभ हरिभक्ति नर पावति विना प्रयास ।।**
**जे ही कथा निरंतर ऐकति युत विश्वास ।। १२६ ।।**

तो सर्वज्ञ गुणी तो ज्ञाता । तो महि मंडित पंडित दाता ।।
धर्मपरायण कुलपाता तो । रामचरणिं मन ज्याचें रत तो ।।

नीति निपुण तो परम शहाणा । श्रुति सिद्धान्त सुज्ञ तो जाणा ॥
तो कवि कोविद तो रणधीर । भजे त्यजुनि छल जो रघुवीर ॥
धन्य देश जेथें सुरसरी । ती स्त्री धन्य पतिव्रत करी ॥
धन्य भूप जो नीती पाळी । धन्य विप्र निज धर्म न टाळी ॥
तें धन धन्य चि जया प्रथम गति । धन्य पुण्यरत पावन ती मति ॥
जँ सत्संगति काळ धन्य तो । द्विज भक्ती दृढ धन्य जन्म तो ॥

**दो०-ऐक उमे! कुळ धन्य तें जगत्पूज्य सुपुनीत ॥**
**श्री रघुवीर परायण जिथं नर होइ विनीत ॥१२७॥**

कथा यथामति मी सांगितली । प्रथम जरी ती गुप्त राखिली ॥
प्रीति अधिक तव मनीं पाहिली । रघुपति कथा तदा मी कथिली ॥
ही न वदावि शठां हठशीलां । श्रवति न लावुनि मन हरिलीला॥
न वदा लोभी, क्रोधि, कामिला । जे न भजति अग-जगत्स्वामिला ॥
द्विजां द्रोहि त्या कधि न वदा ही । सुरपति सम जरि नृप असला ही॥
राम कथेचे ते अधिकारी । सत्संगति ज्यानां प्रिय भारी ॥
प्रीति गुरुपदीं नीति निरत जे । अधिकारी द्विज-सेवारत ते ॥
ही तयास विशेष सुखदायक । प्राणप्रिय ज्या श्रीरघुनायक ॥

**दो०-रामचरणि रति वांछि जो अथवा पदनिर्वाण ॥**
**भावसहित तो ही कथा, करो श्रवणपुटिं पान॥१२८॥**

गिरिजे ! रामकथा कृत वर्णन । कलिमल शमन मनोमल नाशन ॥
संजीवनि मुळि भवरोगा, ती- । रामकथा, श्रुति सूरी गाती ॥

रुचिर हिच्यांत सप्त सोपान । रघुपति भक्तीचे पंथान ॥
होते अति हरि-कृपा जयावर । पाय देइ तो या मार्गावर ॥
पावति मनकामना सिद्धि ते । त्यजुनि कपट ही कथा गाति जे ॥
श्रवण कथन अनुमोदन करती । ते भवनिधि गोपद इव तरती ॥
श्रवुनि कथा सब हृदि अति भरली । रुचिर गिरा गिरिजा उद्धिरली ॥
नाथकृपें मम गत संदेहो । रामचरणिं नव उपजे स्नेहो ॥

**दो०-मी कृतार्थ झाले अतां कृपें तव हि विश्वेश ॥**
**रामभक्ति दृढ उपजली गेले सगळें क्लेश ॥ १२९ ॥**

हा शुभ शंभु-उमासंवाद । सुख संपादन शमन विषाद ॥
संदेहां गंजन भवभंजन । हाचि सज्जना प्रिय जनरंजन ॥
राम उपासक जगामधें जे । प्रिय यासम काहीं ना त्यांतें ॥
रघुपति कृपें यथामति गीत । मी हें सुंदर चरित पुनीत ॥
या कलिकालीं दुजें न साधन । योग यज्ञ जप, व्रत तप पूजन ॥
रामचि गाणे स्मरणें राम हि । श्रवणें सतत राम गुण वृंदहि ॥
यस्य पतित पावन बाणा अति । श्रुति पुराण कवि साधू वानति ॥
त्यजुनि कुटिलता तया भज मना । राम भजुनि गति लब्ध न कवणा॥

**छं०-गति कुणा प्राप्त न पतित पावन राम भजुनी शठ मना!**
**गणिका अजामिल मृगयु गृध्र गजादि तारित खलगणां ॥**
**आभीर यवन किरात खस चाण्डाल अति अघरूप जे ।**
**ते नाम सकृदपि वदत पावन होति राम नमामि ते ॥१॥**

रघुवंशभूषण चरित हें नर कथिति परिसति गाति जे ।
कलिमल मनोमल धुउनि अश्रम रामधामीं जाति ते ॥
पांच् सात चौपाया मनोहर जाणुनी नर उरि धरी ।
दारुण अविद्या पंच,–जानित विकार श्री रघुवर हरी ॥२॥
सुंदर सुजाण कृपानिधान अनाथि करतो प्रीति जो ।
तो एक राम अकामहित निर्वाणदायक नान्य तों ॥
ज्याच्या कृपालेशामुळें मतिमंद तुलसीदास ही ।
पावे परम विश्राम तो प्रभु राम, सम कोठें नही ॥३॥
दो०–मजसम दीन न, दीनहित सम रघुवीर तुम्हांहि ॥
हें जाणुनि रघुवंशमणि भवभय विषम हरा हि ॥१३०रा॥
दो०–कामि नरा प्रिय नारि जशि लोभि नरा प्रिय दाम ॥
मज रघुनाथ ! निरंतर व्हा प्रिय तसेच राम ॥१३० म ।
श्ला० वि०–यत्पूर्वं प्रभुणा । कृतं सुकविना श्री शंभुना दुर्गमम् ।
श्रीमद्रामपदाब्जभक्तिमनिशं प्राप्त्यै तु रामायणम् ॥
मत्वा तद्रघुनाथनामनिरतं स्वान्तस्तमः शान्तये ।
भाषाबद्धमिदं चकार तुलसीदासस्तथा मानसम् ॥१॥
पुण्यं पापहरं सदा शिवकरं विज्ञानभक्तिप्रदं ।
मायामोहमलापहं सुविमलं प्रेमाम्बुपूरं शुभम् ॥
श्रीमद्रामचरित्रमानसमिदं भक्त्याऽवगाहन्ति ये ।
ते संसारपतंगघोर किरणैर्दह्यन्ति नो मानवाः ॥२॥

## अनुवादककृत उपसंहार

आर्या०– श्रीरामा तव नामीं सुखदामीं नित्य चित्त रंगावें।
कोमलपदकमलीं तव मन मधुपें नित्यची तरंगावें ॥१॥
गावा गुणगणगरिमा गगनाहुनि गहन गोड गंभीर।
तारी त्रितापतरणी तापार्णव दावि चरण तव तीर ॥२॥
देवा! प्रज्ञानाला द्यावें जों कायसंघ निश्वासें
सेवा विश्वाची या तवरूपाची घडो सुविश्वासें ॥३॥

मास पारायण, तिसावा विश्राम.

नवाह्न पारायण, नवम विश्राम.

इति श्रीमद्रामचरित-मानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने
सप्तमः सोपानः

उत्तरकाण्डं समाप्तम्

समाप्त

# अनुवादकाची सज्जनांस विनंति

**पृथ्वी०**—नसे कुशल हा कवी कुशल ना जनां शीकवी ।
परेश रघुनाथ जो करि सनाथ या, तो कवी– ।।
स्वयेंचि करवी तरी मिरवुं कां वृथा थोरवी ।
जसा रविमणि द्रवे उगवतां नभीं तो रवि ।। १ ।।

न शब्दपटुताऽथवा सुखदकाव्य -कौशल्यता ।
परी तुलसिदास सत्कवितरुवरी ही लता ।।
गुरुपदरजक्षमा जल कृपा वरी घालता– ।
विदेहतनयापती, फळलि बोलतां चालतां ।। २ ।।

तृणासि करि वज्र जो तृण लघू पवीतें करी ।
मुखीं वदवि वेद जो जड अशा पशूच्या हरि ।।
अशक्य किमपी नसे रघुवरा करा ना स्मय ।
सरोजपद वंदुनी जयति बोलतो जय् जय ।। ३ ।।

अजाण मतिमंद मी; परि धरुन हाती मला ।
चरित्रअनुवाद हा करविला हरींने भला ।।
असें बघुनि जाति जे शरण राघवा मानव ।
तयांस सुखलाभ तो; प्रतिदिनीं मिळे मा नव । ।। ४ ।

सुसंगति धरुन जे पठति या चरित्रा नव ।
स्वधर्म अवलंबुनी भजति राम भक्तीस्तव ।।

विवेक विरती सवें जपति नाम जे राघव ।
जिवंत असतां तनू सहज लंघिती ते भव ॥ ५ ॥
बसून तरणीमधें उतरती जलाब्धी जसे ।
तसाच अनुवाद हा मम कृती जरा ही नसे ॥
वसे हृदयिं राम जो सकल तोच हें बोलतो ।
शुका शिकविती जसे नर वदे तसे बोल तो ॥ ६ ॥

❖ ❖ ❖

## श्रीरामायणजीकी आरती (तुलसीकृत)

आरति श्रीरामायनजी की । कीरति कलित ललित सिय पी की ॥ धृ ॥
गावत ब्रह्मादिक मुनि नारद । बालमीक बिग्यान बिसारद ॥
सुक सनकादि सेष अरु सारद । बरनि पवनसुत कीरति नीकी ॥१॥
गावत बेद पुरान अष्टदस । छओ सास्त्र सब ग्रन्थन को रस ॥
मुनि जन धन संतन को सरबस । सार अंस संमत सबही की ॥२॥
गावत संतत संभु भवानी । अरु घटसंभव मुनि बिग्यानी ॥
व्यास आदि कविबर्ज बखानी । काग भुसुंडि गरुड के ही की ॥३॥
कलिमल हरनि विषय रस फीकी । सुभग सिंगार मुक्ति जुबती की ॥
दलन रोग भव मूरि अमी की । तात मात सब विधि तुलसी की ॥४॥

❖ ❖ ❖

# आरती श्री बावा गंगादासाची

प्रेमें आरति ओवाळूं जय गंगादासातें ।
प्रेमाचा पुतळाच भासला जो जगतीं मातें ॥ ध्रृ ॥
भक्तिरसाची खाण असुनि नहि वैराग्या वाण ।
मान मोह मद मार नसोनी पूर्ण असे ज्ञान ॥ १ ॥
देहिं सर्वदा उदास राही कर्दळि–कौपीन ॥
रसनेचा जय पूर्ण असोनी नाहीं तनु पीन ॥ २ ॥
रामरसाचा पाझर झरतो नयनीं नहि भान ॥
सर्व भूतहितनिरत, सतत रत राम–चरितगान ॥ ३ ॥
भक्तिरसाचा स्वाद चाखिला ज्यांच्या संगतिनें ॥
किति उपकारां वानूं त्यांच्या अतर्क्य मनमतिनें ॥ ४ ॥
केवळ आशीर्वादें ज्यानी रहस्य हें दिधलें ॥
प्रभुपदिं निष्ठा अचळ समर्पुनि चित्तमळां धुतलें ॥ ५ ॥
हा अनुवाद तयासी अर्पूं पुष्पांजलि हातें ॥
प्रेम जयाचें अखंड निर्मळ प्राणांहुनि माते ॥ ६ ॥
करूं दंडवत अखंड नमुनी त्यांच्या चरणांते ॥
उपकारां उत्तीर्ण व्हावया शक्ति न प्रज्ञातें ॥ ७ ॥

# शब्दसूची ( स्वल्प सहाय )

अक–दुःख
अज–अजन्मा
अजिर–आंगण
अणि–अग्रानें ( अणीनें )
अंतवरी–चौदा वर्षे
अदभ्र-मोठ्याहून मोठा
अधगो–खालचीं इंद्रियें
अनल–अग्नि
अनवद्य–निर्दोषी
अनी–सैन्याचे विभाग
अनीह–निरिच्छ
अनुरागति - प्रेममग्न झाले
अन्वहं–प्रतिदिन
अभिराम - प्रसन्नता, आनंद
अराग–अनासक्ति
अरुणचूड–कोंबडा
अभिमानी - ज्ञानाभिमानी, जडतर
अलान–हत्तीचा बंधनस्तंभ
अलेख–अपार

अलोल - अचंचल स्थिर
अवध–अयोध्या
अवधी–चौदावर्षें
आकरं-खाण
आजीं–युद्धांतून
आमलक–आवळा
आयस–पोलादि
आलीं–सखी
आलोकीं–दृष्टीस
आवर्त–भोवरा
आशा-दिशा
आशीस–शिखान्त, डोक्यापर्यंत
इती–इति - म्हणून
इयत्ता–परमावधि
ईति–अतिवृष्टि इत्यादि *
उपमागारी–उपमा + आगार
( निवासस्थान )
उपल–दगड
उपवीत-यज्ञोपवीत, जानवे

* अतिवृष्टिरनावृष्टिर्मूषकाः शलभाः शुकाः । स्वचक्रं परचक्रंच सप्तैता " ईतयः " स्मृताः ॥

उरदाह–पश्चाताप
उल्बण–घोर
ऊनपचास–४९ दितिपुत्र, मरुत
अंस–खांदा
कटक–सेना
कनकाट्टारीं–सोन्याच्या गच्चीवर
कमनीया–अत्यंत सुंदर स्त्री
कर्मनाशा–स्नानानें सत्कर्म नाश करणारी नदी
कर–सोंड, हात
कलिमलसरि–वैतरणी
कलित–सुंदर
कांचनकण–सोन्याच्या टिकल्या ( हळदी-कुंकवावरील )
काचे–कच्चे, कोवळे
कामतरु–कल्पवृक्ष
कारणमनुज–मायामनुष्य
कारवि–पानें फुले नसलेलें एक प्रकारचे झाड
काळू–एक जातीचा मासा
कालव–या नांवाचा जलचर ज्या शिंपीत जन्मास येतो ती
किण–घट्टे
किंशुक–पळस
कीश–वानर
कुकर–श्वान, कुत्रा
कुचाली–दुर्वर्तन, कुतर्क, खोडी
कुंतवन–बाणांचें वन
कुथाट–दुष्ट प्रयत्न
कुपति–पृथ्वीपति
कुलिश–हिरा, वज्र
कुमंत्र–दुर्विचारानें
कुवलय–चंद्रविकासी कमल
कुंभुज–अगस्ति ऋषि
केतू -धूमकेतू
केवलं–पूर्ण
कृशान–अग्नि
कोल–डुक्कर
कोविद–पंडित
कौल–शाक्त पंथी, वाममार्गी
कौणप–राक्षस

क्रोष्ट्र–कोल्हा
क्रोड–वराह
क्षार–राख, भस्म
क्षेपणी–सुकाणूचें दांडे
क्ष्मा–पृथ्वी
कं–सुखं
कंक–करकोचे
कः–आत्मा, ब्रह्मदेव
खरि–अमोघ
खर्पर–डोक्याची कवटी
खर्व–खुजा, क्षुद्र, अत्यंत लहान
खाजें–भक्ष्य
गढुळी–माजा–पावसाचें नवीन पाणी व त्यावरील फेस (माशांना विषाप्रमाणें)
गणपाल–गणेश
गतप्रदायक–गेलेले प्राप्त करून देणारे
गवार–गांवढळ
गवाशी–कसाई
गिराप्रसाद–सरस्वतीच प्रसन्न

गुमान–घमेंड
गुमानी–घमेंडखोर
गुरु–जड
ग्रह–ग्रहदशा
गांधिल–खोडकर, वात्रट
घटज–अगस्तिऋषि
घट्टा–समुहां
घर्म–ऊन
घमोई–कटिधोत्रा, सत्यानाशी
घुण–वाळवी
चक्र–चक्रवाक
चापत–चावली (जीभ)
चार–हेर
चाहुरी–बैलगाडीस चार बैल जोडतात त्यांतील पुढचे दोन
चोर नारी–चोरी करतांना मार-मिळालेली स्त्री
चौतनी–चौकोनी टोप्या
छद–पंख
छळें–कपटानें
छिद्र–भेद–दोष

जवनिका–पटल
जिता–सर्वजण जिवंत असतां
जुग–दोन
झषकेतु–मदन
टेक–हट्ट, दृढनेम
डांगर–भोपळा
तमोरी–तमः+अरि ( सूर्य )
तरतां–पोहतांना
तराज्ञा–तर+आज्ञा
तरंगी–रंगेले
तल्प–पत्नि
ताल–सात ताडांचीं झाडें
तुरीयं–सर्व सत्त्वांच्या व प्रकृती-च्याहि पलीकडे असलेलें.
तुंबडी–भोपळा
तूल–कापूस
तृण तोडुनी–काडीमोड करुन
तोक–बालक
तोण–भाता
त्रिका–तीन मुखांनी
दक्षिण–उजवा, अनुकूल
दर–शंख
दल–सैन्य
दारिद्रय–मोह
दारु–लाकूड
दारुनारी–काष्ठपुतळी–बाहुली
दिगंबर–दिग्+अंबर ( दिशा व आकाश )
दोः–बाहू
द्रुहिण–ब्रह्मदेव
धसे–खचे
धाता–विधाता, ब्रह्मदेव
धुनि–नदी
धूर्त–लबाड, दिसण्यांत चतुर पण कपटी
नस–शिरा
नर्मद–सुखद
नाका-स्वर्गावर
नाग–हत्ती
नार्थ-न+अर्थ
नाडियुग–दोन घटका
नाह–नाथ

नाहू–नाथ
निकर–समुदाय
निकुरंवक–समुदाय
निकेत–रंगभूमींतील स्थानें
निभावक-निर्वाह करणारे
निवह–समुदाय
निःश्रेणी–शिडी
पट–वस्त्र
पतंग-सूर्य
पर–दुसरे
पराभव–नाश, संहार
परिकर–काचा
परिपाटी-पद्धति
पसाय–प्रसाद
पाकरी–पिंपरी
पाणि पतंगा–हातात चेंडू घेतलेल्या
पाथ–पाणी
पातें–राक्षते
पितरी–आईबाप
पिरोज-एक प्रकारचें रत्न
पिशुन–परपापवक्ता, निंदक
पिळून-मंथन करुन
पुकार–ओरडा
पुरटपट–दरवाज्याच्या सोन्याच्या फळया व भरजरी पडदे
पुरु-पुष्कळ
पुरोध–पुरोहित, वसिष्ठ
पेटचा–( भोपळ्याच्या )
पृथुराज–वरप्राप्तीनंर भगवत्कथा दहा हजार कानांनी ऐकणारा
पोतकडाकिनी–बालकें खाणारी पिशाच्चिनी
प्रकृति अभिमानी-देहाभिमानी स्वभाव
प्रपंच–माया, कपट.
प्रमथ–शिवगण
प्रमोद पात्र–हर्षानें भरली
प्राकृत–अष्टधा प्रकृतीनें निर्मिलेल्या
प्लव–वेडूक
प्रियानुज–वामनावतार
फरी–छोटी ढाल

फेरव–फेरपासून नामधातू आज्ञार्थ संस्कृतांत याचा अर्थ जंबूक त्यामुळे श्लेश साधला.
बजाज–व्यापारी
बर्बर–जंगली
बरवा–चांगला, भरपूर
बाणा–वीरवेष, ब्रीद
बीज–मूळ
बंका–विकट
बंदी–भाट
भरणी–एकपक्षी
भल्ल–अस्वल
भव–शंकर, संसार
भवभव–संसारोत्पत्ति
भानुनदिनी–यमुनानदी
भारती–सरस्वती
भूति–ऐश्वर्य
भूमिनाग–दानवा, गांडूळ
भेक–बेडूक
मइत्री–मैत्री
मज्जन–स्नान
मज्जति–स्नान करतात
मदमस्त–दारू पिऊन उन्मत्त
मरकत–नीलमणि
मराल–हंस
मल्लिक–हंसाची एक जात
मसि–काजळ
महागद–महा + अगद औषध
महिषेश्वर–महिषासुर ( 'यम' अर्थचूक–यम:संयमतामहम् )
मा–लक्ष्मी
मारी–महामारी
मारू–मदन
मार्गण–बाण
मुकुर–आरसा
मुकुल–कळया
मेचक–काळा, कृष्ण, शाम
मेकलशैलसुता नर्मदा
मंद–विद्रुप
यथेभ–यथा + इभ (हत्ती)
यवकीटक–सातूतील किडे ( सातू बरोबर ते भरडले जातात.)

यवासा–धमासा

याद–आठवण

यान–वाहन

यामीक–पहारेकरी

रजु-रज्जू

रस-पारा (त्याच्या सिद्धीसाठीं)

रसाल आंबा

राउळ-राजा

राकेशकर–पूर्ण चंद्रकिरण

राय–धन

रीस-अस्वल

रुंड–मस्तकहीन धड

रूख–वृक्ष

रोह–दसऱ्याच्या वेळच्या घटाखालील अंकूर

लसे–विलसे, शोभे

लुटत–जमिनीवर गडबडा लोळत असलेलें

लेख–देव

वद–वक्ता

वरी–वरली

वर्ष्म–शरीर

वाढा–वाढलेले

वाणा-प्रकार, नमुना

वाम–डावा, करंटा, प्रतिकूल

वारिणा–निवारण करणाऱ्या

वारी–दाबते

विटप–वृक्ष, झाड

विटपा–शाखा

वितथ-खोटा

वितान–मंडप

विधुपूषण–चंद्र–सुर्य

विपणि-बाजार

विभक्ता–वाटली गेली

विभव–स्थिति, पालन

विमाना–देवादिकांस

विषमशर-मदन

विग्रह–देह

विंध्यनंदिनी-नर्मदा

वीची–लहान लाटा

वीथी–रस्ता

वृष–बैल

व्याली-साप (गळ्यांत) घालून घेणारा (शंकर)
शक-शंका
शठ-दुर्जन, मूर्ख
शरासुर-बाणासुर
शाली-शाली, साळी, भात
शिक्षा-शिकवण
शिशु-बालमुकुंद
शुच-शोक
शून्यीं-एकांतात, कोणी नसतांना
शोध-बातमी
सकृत-एकदमच
सगर्भ-गूढ
सडकी सडकला (चाबूक)
सदागति-वारा
समीहा-सामान्य इच्छा
सरणी-पद्धति, रीत, विधि
साज-सैन्य, कोष इ.
सिता साखर
सिय-सीता
सीम-सीमा, मर्यादा
सुकंठ-सुग्रीव
सुखाकर-सुख + आकर (खाण)
सुगल-सुग्रीव
सुगेह-माहेरघर
सुभाग-उत्तम भाग्य
सुरमणी-चिंतामणी
सुरधुनी गंगा-भागिरथी
सुरवीथी-आकाशगंगा
सुरानीक-१ सुर+अनीक (सेना)-देव सैन्य २ सुरा + नीक
सुषमा परमशोभा
सोनकमळ-लाल कमळ
संसार-जग
स्त्रुवा-पळी (आहुतीची)
स्वागति-वऱ्हाडास सामोरे जाणारी मंडळी

❖ ❖ ❖

## आमची काहीं मराठी प्रकाशनें :–

| | | किंमत रु. |
|---|---|---|
| १. गुरुदेव रानडे : | प्रा. भा. रा. मोडक व सौ. वसुधा मोडक | ३ |
| २. श्री ज्ञानेश्वर चरित्र : | रामचंद्र नारायण सराफ | ८ |
| ३. गुरुदेव रानडे व त्यांची पारमार्थिक शिकवण | काकासाहेब तुळपुळे | १५ |
| ४. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान | सौ. पद्मा कुलकर्णी एम. ए. | १८ |
| ५. श्री ज्ञानेश्वरांचे आत्म-दर्शन अर्थात कार्य आणि तत्त्वज्ञान | रामचंद्र नारायण सराफ | ४० |
| ६. समर्थ रामदास : जीवन व तत्त्वज्ञान ( परिसंवाद ) | | ३० |

साधक लोकांना सवलतीची किंमत.

संपर्क : **गुरुदेव रानडे मंदिर,**
**हिंदवाडी, बेळगांव–५९००११**